॥ श्रीगुरुःशरणम् ॥


॥ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ॥

श्रीथोरलेस्वामीमहाराज

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती
टेम्बेस्वामीमहाराज यांचे चरित्र

(उत्तरार्ध – सिद्धखण्ड – क्रमाङ्क ५)

– खण्ड सहावा –



-: लेखक :-

द. सा. मांजरेकर

डॉ. केशव रामचंद्र जोशी

एम्. ए., पीएच्. डी.

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ॥



श्रीथोरलेस्वामीमहाराज

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेंम्बेस्वामीमहाराज यांचे चरित्र

(उत्तरार्ध – सिद्धखण्ड – क्रमाङ्क ५)

– खण्ड सहावा –



शक्तिपात



–: लेखक :–

द. सा. मांजरेकर

डॉ. केशव रामचंद्र जोशी

एम. ए., पीएच.डी.

★ प्रकाशक :
व्यवस्थापक,
सिद्धयोग प्रकाशन,
२६/२०२ लक्ष्मीनगर,
पुणे ९.
पिन ४११००९

★

★ मुद्रक :
ज. प. खरे
आदित्य मुद्रण,
१४४२ शुक्रवार पेठ,
पुणे २.
पिन ४११००२

★

★ प्रकाशनकाल :
प्रथमावृत्ती–१९९२

★

★ मूल्य ८० रुपये

– नमन –

श्रीवासुदेवा जगत्पालका । जय विधे जगत्कारका ।
जय शंभो जगत्तारका । चित्तहारका तुज नमो ॥१॥
तूंची आर्यसंरक्षक । तूंची अनार्यशिक्षक ।
तूंची हें ग्रंथकौतुक । करविसी लोक तारावया ॥२॥
परात्पर परंज्योती । तूंची परब्रह्ममूर्ती ।
कोण जाणे तुझी गती । स्वयंज्योती तूं श्रीदत्त ॥३॥
विविध धर्मान्वित । ज्ञानभक्तिरसभरित ।
असे हे श्रीवासुदेव चरित । मूर्तिमंत अमृत कीं ॥४॥
विहार तुझा स्वभक्त हृदयांत । तूं भक्ताधीन सतत ।
केशव मागतो पसरून हात । ह्या ग्रंथीं सतत सान्निध्य ठेवी ।



– समर्पण –

अनन्तकोटी ब्रह्माण्डनायक भक्तवत्सल भक्ताभिमानी भक्तकामकल्पद्रुम भक्तहृदयनिवासी राजराजेश्वर श्रीसद्‌गुरुनाथवासुदेवस्वरूप श्रीमन् शक्तिपाताचार्यवर्य महासिद्धयोगी श्रीयुक्त श्रीसमर्थ सकलसन्तश्रेष्ठ श्रीसद्‌गुरुनाथ श्रीवामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज यांच्या परमपवित्र व परमकोमल चरणी कोटी कोटी साष्टांग दण्डवत् प्रणाम करून परमप्रेमपूर्वक व परमशरणागतिपूर्वक सादर समर्पण.

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

– श्रीसद्गुरुध्यान –

आदौ रूपमरूप ते गुणगणेशान्मानवं स्वीकृतं ।
वर्णाद्याश्रमधर्मधारणमथो श्रीदत्तदेवेड्गुरो ॥
तत्संस्थापनतीर्थपादवपुयुक्तुर्यैकवीट्स्वार्तिहृन् ।
वंदे ते गुरुवासुदेव यतिराट् सेव्यांघ्रिकंजं परं ॥



॥ श्रीसद्गुरुचरणी विज्ञापना ॥

श्रीगुरुदत्ता ये अवधूता भक्तजनांतें सांभाळीं ।
सर्व संकटें दूर करोनी आपुल्या भक्तां परिपाळी ॥ध्रु०॥
भवाटवीचा मार्ग भयंकर मदनव्याघ्र हा बहु पीडी ।
क्रोध लोभ हे जंबुक निशिदिनि भक्षिति मजला घालि उडी
बहुविध योनी भ्रमण करीतां विसरुनि गेलों तव स्वरुपा।
मायापाशीं बद्ध होउनीं संचय केला बहु पापा ॥२॥
परधन दारा आप्त सुतादिक यांवरि जडलें मन माझें ।
पुराण कीर्तन सद्गुरुसेवा कधिं नच घडली या देहें ॥३॥
दीनदयाघन अत्रि (रमा) नंदना मम अपराधा क्षमा करीं ।
तव गुण गाया द्याव। सन्मति सीताराम ही विनति करी ॥४॥

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

॥ ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीशिववामनाय नमः ॥

प्रस्तावना :–

॥ श्रीश्रीसद्गुरुचरित्रसंग माहात्म्य ॥

गुरुचरित्रमिदं खलु कामधुक् ॥
भजति यः सततं तदनन्यभुक् ॥
निधिरहो न जहाति तदालयं ॥
तत इदं विदिता भजतालयं ॥

★ ★ ★

चरित्र हें श्रीगुरुचें बुध हो, कामधेनु खरोखर आहे ॥धृ०॥
सेविल जो नर अनन्य होउनी ॥
सदैव निधि राहिल तत्सदनीं ॥
भजा ग्रंथ हा दत्तचि मानुनी ॥
मोक्ष तुम्हां लाहे ॥ खरोखर ॥ चरित्र० ॥१॥
ग्रंथराज हा कलियुगिं त्राता ॥
चारहि पुरुषार्थांचा दाता ॥
पापताप दैन्यासि वारिता ॥
केशव शिरिं वाहे ॥ खरोखर ॥ चरित्र० ॥२॥

★ ★ ★

सद्गुरुचरणीं रत हो मनुजा। मार्ग सुलभ तुज़ कथितों रे ॥ धृ० ॥
मानव देह मोठा दुर्लभ। पुन्हां न ये बा तुजला रे ॥
निशिदिनिं सज्जनसंग धरुनियां। मुक्तिपदा तरि जावें रे ॥ सद्गुरु०

यमनियमादिक प्रथम साधुनी । आसन सुस्थिर राखावें रे ॥
रेचक पूरक गुरुमुखें जाणुनि । वायुनिरोधन साधी रे ॥ सद्गुरु० २॥
विषयापासुनि मन फिरवोनी । दत्तस्वरूपीं ठेवीं रे ॥
त्रिमूर्ति षड्भुज काषायांबर । ध्यान हृदयिंतव स्थिर करी रे ॥ सद्गुरु
तत्त्वमसीति श्रुतिवाक्याचें । विवरण करुनी पाहीं रे ॥
निवातदीपस्थितिवन्मन हें । होतां स्वरूप प्रगटे रे ॥ सद्गुरु० ४ ॥
सेवा करितां गुरुचरणाची । होईल प्राप्ति स्वरुपाचि रे ॥
स्वानुभवानें सीताराम हा । कथितो हृद्गुज तुजसी रे ॥सद्गुरु० ५॥

श्रीमान् शक्तिपाताचार्यवर्य महासिद्धयोगी श्रीसन्त सद्गुरू श्रीवामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज यांच्या असीम व लोकोत्तर प्रेमकृपाशीर्वाद बलाने, आज त्यांचे श्रीसमर्थ सद्गुरू "श्रीथोरले-स्वामीमहाराज" अर्थात् अनन्त कोटी ब्रह्माण्डनायक राजाधिराज श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बे-स्वामीमहाराज यांच्या विस्तृत व खण्डशः प्रसिद्ध होणाऱ्या चरित्राचा सहावा खण्ड अर्थात् उत्तरार्ध—सिद्धखण्ड—क्रमाङ्क—पाच हा प्रसिद्ध होत आहे, ही परमभाग्याची गोष्ट आहे.

"श्रीथोरलेस्वामीमहाराज" या खण्डात्मक चरित्रग्रंथाच्या पहिल्या खण्डाच्या प्रस्तावनेत कथन केल्याप्रमाणे हे "श्रीवासु-देवमाहात्म्य" किंवा "श्रीवासुदेवमहापुराण" असून या अलौकिक, लोकोत्तर व एकमेवाद्वितीय अशा महापुराणाच्या पहिल्या खण्डात श्रीस्वामीमहाराजांचा श्रीक्षेत्र माणगाव येथे जन्म झाल्यापासून म्हणजे शके १७७६ अर्थात् इ. स. १८५४ ते त्यांनी श्रीक्षेत्र उज्ज-यिनी येथे दण्डग्रहण केले म्हणजे शके १८१३ अर्थात् इ. स. १८९१

पर्यन्तचा जीवनवृत्तान्त कथन केला आहे. अर्थात् प्रथम खण्डात श्रीस्वामीमहाराजांच्या वयाच्या ३६ व्या वर्षांपर्यन्तची सर्व हकीकत आली असून एक प्रकारे त्यांच्या जीवनाच्या पूर्वार्धामधील साधन काळातील वृत्तान्त यात सामाविलेला आहे. त्यामुळे या खण्डाला पूर्वार्ध साधनाखण्ड असे म्हटले आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या वयाच्या ३६ व्या वर्षी ज्यावेळी श्रीगोदावरीनदीच्या तीरी श्रीक्षेत्र गंगाखेड येथे त्यांची मंडळी सौ. अन्नपूर्णाबाई यांना देवाज्ञा झाली त्यावेळी त्यांनी आपल्या सौ. पत्नीच्या तेराव्या दिवसांपर्यंतच्या सर्व क्रिया यथाविधी केल्यानंतर चौदाव्या दिवशी संन्यास घेऊन पुढे श्रीक्षेत्र उज्जयिनी येथे जाऊन श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीनारायणानन्दसरस्वतीस्वामीमहाराज यांच्याकडून दण्ड ग्रहण केला. त्यावेळी श्रीदत्तप्रभूंनी त्यांना अशी आज्ञा केली की, "आज सर्वत्र वर्णाश्रमधर्माचा लोप झालेला आहे; तरी यापुढे सर्व भरत-खण्डात पायीच संचार करून सर्व लोकांना दीक्षोपदेश द्यावा व धर्ममार्गाची स्थापना करून ईश्वर निष्ठा व स्वधर्मनिष्ठा जागृत करावी." या आज्ञेचे श्रीक्षेत्र उज्जयिनी येथपासून पालन करता करता वयाच्या ६० व्या वर्षी श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे समाधी घेई-पर्यन्त श्रीस्वामीमहाराजांचे एकूण २३ चातुर्मास झाले. त्यातील शके १८१३ अर्थात् इ. स. १८९१ ते शके १८२६ अर्थात् इ. स. १९०४ पर्यन्तच्या १४ चातुर्मासांचा म्हणजे श्रीस्वामीमहाराजांच्या वयाच्या ५० व्या वर्षांपर्यन्तचा काल दुसऱ्या खंडात अर्थात् "उत्तरार्ध सिद्धखण्ड—क्रमाङ्क १" यात कथन केला असून शके १८२७ अर्थात् इ. स. १९०५ च्या १५ व्या चातुर्मासापासून शके १८३० अर्थात् इ. स. १९०८च्या १८ व्या चातुर्मासापर्यन्तचा म्हणजे वयाच्या [illegible] व्या वर्षांपर्यन्तचा काल तिसऱ्या खण्डात म्हणजे

"उत्तरार्ध–सिद्धखण्ड–क्रमाङ्क २" यात चित्रित केला आहे. चवथ्या खण्डात म्हणजे "उत्तरार्ध–सिद्धखण्ड–क्रमाङ्क ३" मध्ये शके १८३१ अर्थात् इ. स. १९०९ च्या १९ व्या चातुर्मासापासून शके १८३२ अर्थात् इ. स. १९१०–११ च्या २० व्या चातुर्मासा-पर्यन्तचा म्हणजे वयाच्या ५७ व्या वर्षापर्यन्तचा काळ चित्रित केला असून पाचव्या खण्डात म्हणजे "उत्तरार्ध – सिद्धखण्ड – क्रमांक ४" मध्ये शके १८३३ अर्थात इ. स. १९११ च्या २१ व्या चातुर्मासापर्यन्तचा म्हणजे त्यांच्या वयाच्या ५८ व्या वर्षापर्यंतचा काळ चित्रित केला आहे. प्रस्तुत सहाव्या खण्डात म्हणजे "उत्तरार्ध–सिद्धखण्ड – क्रमांक ५" मध्ये शके १८३४ अर्थात् इ. स. १९१२ ला श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा २२ वा चातुर्मास सुरू झाल्यापासून ते पुढे श्रीक्षेत्र कातरखेडा येथे दोन–तीन महिने राहून श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे चैत्र वद्य ८ शके १८३५ अर्थात् इ. स. १९१३ ला जाईपर्यंतचा म्हणजे ५९ व्या वर्षापर्यंतचा काळ चित्रित केला आहे.

श्रीस्वामीमहाराजांच्या सिद्ध अशा लोकोत्तर जीवनातील कितीतरी महत्त्वाचे अपूर्व, अभ्यसनीय, आदर्श, मनोहारी व अलौकिक पैलू या सहाव्या खण्डात कथन केलेल्या जीवन–चरित्रात घडलेल्या अनेक घटनांतून व कथेतून प्रकट झालेले दिसून येतात. त्यातील काही मनोज्ञ पैलूंचे दिग्दर्शन केले; तर ते सर्व साधक–भक्तांना आपली त्यांच्या चरणांवरील श्रद्धा दृढतम करण्याला, उत्तरोत्तर शरणागती वृद्धिगत करण्याला व त्यांच्यावरील भक्तिप्रेमाची चढती-कमान कायम ठेवण्याला उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राच्या या सहाव्या खण्डात प्रस्तुत झालेल्या त्यांच्या जीवनात प्रकट झालेला सर्वात महत्त्वाचा पहिला

पैलू "मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरें लावावें। अलौकिक नोहावें। लोकांप्रति ॥ ३.१७१ ॥" या श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "श्रीज्ञानेश्वरीत" सांगितलेल्या न्यायाने अखंड "लोकहितरतता" हा आहे. श्रीस्वामीमहाराजांची लोकहिताची ही दृष्टी पाहिली की, ते अवतारी महापुरुष कसे होते याची प्रचीती आल्याशिवाय राहात नाही. या दृष्टीने त्यांनी श्रीक्षेत्र चिखलदा येथे सुरू झालेल्या महामारीच्या शांत्यर्थ सप्तशतीचे पाठ व हवन होऊन मनुष्य संहार होऊ नये म्हणून कृतककोप धारण करून लोकांकडून हे कार्य कसे करवून घेतले, ही सर्वच कथा वाचनीय आहे. (पृ. ७ ते १०) त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र चिखलदा येथील कॉलऱ्याच्या साथीत लोकांना औषध देता देता श्रीस्वामीमहाराजांचे हात दुखावयास लागत असले; तरी त्यांनी कधीही कोणाला औषध देण्यास नकार दिला नाही. समाज पुरुषाला देव मानून त्याची सेवा करण्यातच त्यांचे अवतारित्व दडलेले होते. (पृ. ३६, ३७) श्रीस्वामीमहाराजांनी लोकसेवेचे जे व्रत आमरणान्त चालविले होते त्या दृष्टीनेच ते श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीदेवांच्या खजिन्यातून लग्ने व मुंजी लावणे, लोकांना व्रतवैकल्यासाठी मदत करणे, समाराधना करणे व व्रतोद्यापनादि करणे इत्यादि लोकोपयोगी कार्ये सेवकांकडून करवून घेत असत. (पृ. ५१) या दृष्टीनेच श्रीस्वामीमहाराज सर्व भक्तमंडळींवर आईच्या मायेने प्रेम करीत असत व प्रत्येक सणाला उचित व योग्य असा नवीन पदार्थ तयार करवून तो सर्वांना प्रेमाने व आग्रहाने खाऊ घालीत असत. (पृ. ५९)

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनातील दुसरा महत्त्वाचा पैलू "देव-भक्तांच्या अलौकिक अंतरंग लीलेने" नटलेला आहे. या दृष्टीने

श्रीस्वामीमहाराजांनी श्रीदेवांच्या खजिन्यातील पैसे खर्च करून स्वयंपाकाकरिता बांधलेले छप्पर श्रीदेवांनी कसे पाडून टाकले ही कथा पाहण्यासारखी आहे. (पृ. ९ ते ११) श्रीदेवांनी हे छप्पर का पाडले याचे उत्तर त्या कथेत नाही; मात्र त्याचे उत्तर श्रीसंत तुकाराममहाराजांनी "न कळती तुझिया मावा।" असे म्हणून दिले आहे. देवभक्तांच्या अंतरंग लीलेचे हे दर्शन घडविताना ते आपल्या अभंगात असे म्हणतात की—

आम्ही भाव जाणों देवा। न कळती तुझिया मावा॥
गणिकेचा कुढावा। पतना न्यावा दशरथ॥ १॥
तरी म्यां काय गा करावें। कोण्यारीती तुज पावावें।
न सांगतां ठावें। तुम्हांविण न पडे॥ २॥
दोनी फांकविल्या वाटा। गोवा केला घटापटा।
नव्हे धीर फाटा। आडरानें भरती॥ ३॥
तुका म्हणे माझे डोळे। तुझे देखती हे चाळे।
आतां येणें वेळें। चरण जीवें न सोडी॥ ४॥

देवा ! आम्हाला तुझे मनोगत काय कळणार आहे ? तुझे कोणांविषयी कोणते कपट कारस्थान असते, ते आम्हा भोळयांना कळत नाही. तुम्ही व्यभिचार करणाऱ्या गणिकेचे रक्षण केले आणि पुत्रप्रेमाने रामराम म्हणत प्राण सोडणाऱ्या दशरथाला अधोगतीला नेले. ॥ १ ॥ असे जर आहे तर आम्ही काय करावे ? कोणत्या रीतीने तुला प्राप्त करून घ्यावे ? हे आम्हाला कळत नाही. खरे सांगावयाचे म्हणजे तुम्ही सांगितल्यावाचून भक्तीचे वर्म आम्हाला कळावयाचे नाही. ॥ २ ॥ कर्ममार्गामध्ये विधी आणि निषेध अशा दोन वाटा आहेत; पण त्याही कळणे कठीण आहेत. घटपटांच्या तर्ककर्कश चर्चेने तर कित्येक पंडितांना बंधनातच घातले आहे.

साधारण माणसांना तर तुझी प्राप्ती करून घेण्याइतके सात्त्विक धैर्य किंवा बुद्धी नसते. त्यामुळे ते आपल्या कल्पनेनेच तुमच्या प्राप्तीसाठी आडरानाने फाटे फुटतील तसे पळत जाणाऱ्या माणसाप्रमाणे वाटेल ती साधने करतात. ।। ३ ।। श्रीसंत तुकाराममहाराज असे म्हणतात की, तुझे एकाविषयी एक वर्तन, तर दुसऱ्याविषयी दुसरेच वर्तन मी माझ्या डोळ्यांनी बघत आहे. असे असले तरी मला असे वाटते की; यावेळी तुझे पाय मनापासून सोडू नयेत. ।। ४ ।।

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा तिसरा महत्त्वाचा पैलू "स्वामीसेवक अन्योन्य प्रीतीने" नटलेला आहे. श्रीस्वामीमहाराजांचे आपल्या सेवकांवर व भक्तांवर अपार प्रेम होते. या दृष्टीने श्रीस्वामीमहाराजांची अनुज्ञा नसताना त्यांचे परमभक्त श्री. धोंडोपंत कोपरकर श्रीक्षेत्र चिखलद्याला आल्यानंतर घडलेली कथा (पृ. १३ ते २०), एका श्रीमंत जहागिरदारबाईंची जहागिरी मोकळी कशी करून दिली ही कथा (पृ. ७० ते ७२), पूर्वाश्रमीचे स्नेही व भक्त श्री. नारोपंत उकिडवे यांना त्यांच्या सावंतवाडीच्या मोडकळीस आलेल्या श्रीदत्त मंदिरासाठी दिलेल्या मदतीची हकीकत (पृ. १७४,१७५), श्री दफ्तरदार यांच्या मुलीच्या लग्नाचा सर्व खर्च देवांच्या पैशातून केल्याची हकीकत (पृ. १७५,१७६), श्री. अग्निहोत्रीबुवांच्या श्रीगायत्री पुरश्चरणाची व हवनाची आशीर्वादाने केलेली पूर्तता (पृ. १७६ ते १८३), श्रीक्षेत्र कातरखेडा येथील भिल्ल व तडवी नाईक या लोकांवर केलेल्या व त्यांनी श्रीस्वामीमहाराजांवर केलेल्या प्रेमाची व सेवेची हकीकत (पृ. २१०, २११), आपले परमभक्त श्री. गंगाधरपंत वैद्य यांना दिलेला छाटीचा प्रसाद (पृ. २१८, २१९) इत्यादि सर्व कथा या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत.

"श्रीस्वामीमहाराज हे अलौकिक विद्वान्, सर्व शास्त्रांचे ज्ञाते व अद्वैत वेदान्ती होते," हा त्यांच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा असा चौथा पैलू आहे. या दृष्टीने श्रीस्वामीमहाराजांनी एका गृहस्थांना सांगितलेले भक्तीचे अपूर्व वर्म आणि त्याचवेळी तेलंगणातील एका विद्यार्थ्याची गोष्ट सांगून "तत्त्वमसि" महावाक्याच्या अर्थांतराकडे किंवा परार्थाकडे वेधलेले लक्ष हे पाहण्यासारखे आहे. (पृ. २० ते २६) त्याचप्रमाणे श्रीसप्तशतीच्या श्लोकांच्या द्वारा केलेले बीजसिद्धीचे विवेचन (पृ. ५२ ते ५९), श्रीगणेशदेवतेसंबंधी सांगोपांग माहिती सांगून व गुह्यज्ञान प्रकट करून केलेल्या संशयाच्या निवृत्तीचे विवेचन (पृ. ७२, ७३), श्री. बाळशास्त्री हरदास यांना समजावून सांगितलेले मांडूक्योपनिषदाचे विवेचन (पृ. ७६ ते १२१), श्री. सुखानंदी यांना सांगितलेले आत्मचिंतनाचे विवेचन (पृ. २२७ ते २३१), श्री. गंगाधरपंत वैद्य यांना सांगितलेली श्रीकैवल्यादि उपनिषदे, श्रीमद्भगवद्गीता, आत्मचिंतन व श्रीमद्अध्यात्मरामायणांतर्गत श्रीरामगीतादि ग्रंथांचे विवेचन (पृ. १२२ ते १६५) इत्यादि सर्व विवेचनांचा साक्षेपाने अभ्यास केला तर श्रीस्वामीमहाराजांची अलौकिक विद्वत्ता व श्रीमदाद्यशंकराचार्य प्रणीत अद्वैत वेदान्ताची आपल्या शिष्यांना शिकवण देण्याची व ती समाजात दृढमूल करण्याची दृष्टी स्पष्ट होते. या दृष्टीने श्रीमदाद्यशंकराचार्यांचे अद्वैतमत काय होते, हे पाहिले म्हणजे श्रीस्वामीमहाराजांनी जन्मभर भारतवर्षभर प्रवास करून कोणत्या मताचा प्रसार करून ते दृढमूल करण्याचा प्रयत्न केला, हे लक्षात येईल. हे मत साकल्याने मांडताना महामहोपाध्याय श्री. वासुदेवशास्त्री अभ्यंकरांनी शांकर ब्रह्मसूत्र भाष्याच्या मराठी भाषांतराच्या प्रस्तावनेत असे लिहिले आहे की,

श्रीमदाद्य शंकराचार्यांचे अद्वैतमत अथवा मायावाद किंवा मायावादाचे मूलभूत सिद्धान्त :–

" शंकराचार्यांच्या मताने ब्रह्मच परमार्थसत्य आहे. ते सद्, चित् व आनंदस्वरूप आहे. ते सर्व विश्वाचे विवर्तोपादानकारण आहे. अपरब्रह्म अथवा माया ही उपादानकारण आहे. ब्रह्म हे श्रुतिसाध्य आहे. ते तर्कसाध्य नाही. म्हणून त्या बाबतीत अनुमानाला मुळीच जागा नाही. कार्याला म्हणजे जगातील कोणत्याही वस्तूला कारणाशिवाय म्हणजे ब्रह्माशिवाय स्वतंत्र अस्तित्व असणे शक्य नाही. म्हणून सर्व कार्यांना व्यावहारिक सत्यत्व आहे. कार्य हे शून्यही नाही किंवा निव्वळ प्रातिभासिकही नाही. सर्व धर्म हे आभास आहेत. अविद्येने आरोपिलेल्या गुणांनी युक्त असे जे सगुणब्रह्म ते व्यावहारिक सत्य आहे. उपनिषदातील सगुणब्रह्मपर वाक्ये ही व्यावहारिक सत्स्वरूपाच्या अपरब्रह्माचे प्रतिपादन करतात व निर्गुणब्रह्मपर वाक्ये ही पारमार्थिक ब्रह्माचे प्रतिपादन करतात. जीव आणि ब्रह्म ही एकच आहेत. ज्याप्रमाणे घटाकाश हे मर्यादित झालेले आकाशच असते, त्याप्रमाणे अविद्येने मर्यादित झालेला परमात्माच जीवात्मा नावाने समजला जातो. अर्थात् अविद्योपाधीने युक्त परब्रह्म म्हणजेच जीव होय. पाण्यामध्ये सूर्याचे प्रतिबिंब जसे सूर्यापासून निराळे असते तसाच अविद्येमध्ये प्रतिबिंबित झालेला आत्माच हा जीवात्मा समजला जातो असेही मानिले असता चालेल. तसेच ज्याप्रमाणे जास्वंदीच्या फुलाजवळ धरलेला स्फटिकाचा तुकडा तांबडा नसून तांबडा दिसतो त्याप्रमाणे जीवात्मा निर्गुण असून सुद्धा अविद्येच्या सान्निध्यामुळे सगुण दिसतो. जीव हा वस्तुतः ज्ञानस्वरूप आहे. पण अविद्येने त्याचे ज्ञान झाकलेले आहे. त्यामुळेच तो संसारात गटांगळ्या खात राहतो. ज्ञातृत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व

वगैरे सर्व गुण जीवामध्ये औपाधिकच आहेत. श्रौतस्मार्त कर्मे करण्याने जीवाची चित्तशुद्धी होते व उपासनेने चित्त स्थिर होते. नंतर विवेक व वैराग्य प्राप्त झाल्यानंतर चित्ताचे समाधान होते. श्रवण, मनन व निदिध्यासन यांनी आत्म्याच्या ज्ञानाला मदत होते. आत्म्याचे ज्ञान ही काही एरव्हीच्या ज्ञेय वस्तुसारखी ज्ञेय वस्तू नाही. आत्मसाक्षात्कार म्हणजे स्वत:सिद्धच असलेले जे जीवाचे पारमार्थिक स्वरूप त्याचे प्रत्यक्षीकरण होय. या साक्षात्काराला ज्ञानकर्मसमुच्चय किंवा ज्ञानकर्मसहप्रयोगाची मुळीच अपेक्षा नाही. पूर्ण चित्तशुद्धी, कडकडीत वैराग्य, निर्मल ज्ञान व निर्विकल्प समाधी यांनीच आत्मज्ञान अथवा आत्मसाक्षात्कार होतो व जीवांची संसारापासून मुक्ती होते."

हे सर्व विवेचन वाचले म्हणजे श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य, श्री. बाळशास्त्री हरदास इत्यादि आपल्या परमभक्तांना वर उल्लेखिलेल्या पुस्तकांच्या द्वारा जो अद्वैत वेदान्ताचा उपदेश केला त्याचे साररूप लक्षात येईल.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा पाचवा महत्त्वाचा पैलू त्यांची "अपूर्व यौगिक शक्ती" हा आहे. या दृष्टीने श्रीक्षेत्र चिखलदा येथे राजा रसाळ नावाच्या मुलाने आणलेली तीन बोरे आपल्या हातात घेऊन श्रीस्वामीमहाराजांनी अनेकांना कशी वाटली (पृ. २६, २७) व श्रीक्षेत्र कातरखेडा येथे मृत बैलाला कसे उठविले (पृ. २७) या दोन्ही कथा मोठ्या वाचनीय अशा आहेत.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा सहावा महत्त्वाचा पैलू म्हणजे ते अत्यंत काटेकोरपणे शास्त्राज्ञांचे पालन करीत असत. या दृष्टीने पुढे येणाऱ्या द्रव्याला (पैशाला) कधीही स्पर्श न करणे (पृ. ४०, ४१), चंद्रग्रहणाच्या वेळी सर्व आचारांचे केलेले

पालन (पृ. २१४) इत्यादि सर्व गोष्टी मोठ्या मार्मिक आहेत, हे लक्षात येते.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा सातवा महत्त्वाचा पैलू म्हणजे ते प्रपंचात अत्यंत साक्षेपी होते. श्रीस्वामीमहाराज संन्यासी असले तरी ते सर्व जगाचा संसार करीत असल्यामुळे त्यांचा प्रपंचातील हा साक्षेपीपणा उत्कटत्वाने दिसून येतो. त्यामुळे देवापुढे आलेल्या प्रत्येक वस्तूचा विनियोग चांगला व्हावा या कटाक्षापोटीच कोठीच्या दारात पडलेली एक मिरचीही उचलून त्यांनी कोठीवाल्याला कशी दिली (पृ. ४१), ही सर्वच कथा वाचनीय आहे.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा आठवा महत्त्वाचा पैलू "निस्पृहता" हा आहे. या दृष्टीने एका श्रीमंत जहागिरदाराच्या पत्नीला एकांतात बोलणे नाकारणे (पृ. ७०) व भाष्यपाठाच्या वेळी बढवाणीच्या श्रीराजेसाहेबांना व श्रीराणीसाहेबांना दर्शन नाकारणे (पृ. ४५ ते ४८) या दोन्ही कथा अत्यंत चिंतनीय व मननीय आहेत, यात काही शंकाच नाही.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा नववा महत्त्वाचा पैलू "गुण-ग्राहकता" हा आहे. या दृष्टीने श्रीमती लक्ष्मीबाई जाधव यांच्या नम्रतेचे व लीनतेचे त्यांनी जे कौतुक केले ते अत्यंत स्पृहणीय आहे, यात तिल:प्राय शंका नाही. (पृ. ४८ ते ५१) वास्तविक पाहता श्रीस्वामीमहाराजांच्या सहवासात आलेले जे सर्व लोक मार्गी लागलेले दिसतात, त्याच्या मुळाशी त्यांच्या या अपूर्व गुणाचे अधिष्ठान असल्याचे अत्यंत सूक्ष्म दृष्टीने पाहिले म्हणजे लक्षात येते.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा सर्वात महत्त्वाचा दहावा पैलू म्हणजे त्यांचे जीवन स्थूल, सूक्ष्म व पर या तीन पातळ्यांवर एकाच वेळी प्रवाहित झालेले दृष्टीस पडते. अशा प्रकारे एकाच वेळी

तीनही पातळ्यांचे दर्शन घडविणारे चरित्र या भूतलावर दुसरे झाले असे वाटत नाही. त्यामुळेच महामहोपाध्याय डॉ. श्रीगोपीनाथ कविराज यांनी म्हटल्याप्रमाणे "श्रीमदाद्यशंकराचार्यांनंतर श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराजांसारखा दुसरा संन्यासी या भूतलावर झाला नाही," हे म्हणणे किती सार्थ आहे, याची प्रचीती "श्रीथोरलेस्वामीमहाराज" यांच्या चरित्राचे सर्व खंड वाचल्यानंतर पूर्णांशाने येते. या दृष्टीने सहाव्या खंडात श्री. बाळशास्त्री हरदास किंवा श्री. गंगाधरपंत वैद्य यांना केलेले तत्त्वज्ञानाचे कथन हे परपातळीचे उत्तम निदर्शक असून श्री. गोविंदबुवा हरदास यांना शिकविलेला योगाभ्यास हा सूक्ष्मपातळीचा निदर्शक आहे. (पृ. १६९) श्री. भैय्याजी नाईक यांच्या पत्नीची श्रीस्वामीमहाराजांनी भूतबाधा कशी दूर केली ही सर्व हकीकत स्थूलपातळीची निदर्शक आहे. (पृ. १६९ ते १७४)

अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांच्या परपातळीवरील कार्याचा विचार केला असता कृपादान, ज्ञानदान, अप्राकृतभक्ती, इत्यादि नानाविध गुणांचे दर्शन होते. त्यांच्या सूक्ष्मपातळीवरील कार्याचा विचार केला असता ते आपल्या शिष्यांना योग, मंत्रजप इत्यादि साधने सांगून व ती त्यांच्याकडून करवून घेऊन त्यांची आध्यात्मिक प्रगती कशी करीत असत हे लक्षात येते आणि त्यांच्या स्थूल पातळीच्या कार्याचे दर्शन घेत असताना भूत, प्रेतपिशाच्चादींनी पछाडलेल्या लोकांना मुक्त करून त्यांनी त्यांचे जीवन सुखी कसे केले हे लक्षात येऊन त्यांच्या प्राणिमात्रांवरील प्रेमाचे, करुणासंपन्नतेचे व सेवाव्रताचे दर्शन होते.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा अकरावा महत्त्वाचा पैलू म्हणजे आपल्याकडे आत्मवस्तू मागणारा कोणी दृष्टीस पडत नाही

म्हणून त्यांना खंत वाटत असे. आपल्याकडे येणाऱ्या लोकांनी स्थूल वस्तू न मागता अध्यात्मज्ञान मागावे अशी त्यांची इच्छा असे आणि श्रीसंत ज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीज्ञानेश्वरीत सांगितल्याप्रमाणे "तेविं सदभ्यासें निरंतर। चित्तासि परमपुरुषाची मोहोर। लावीं मग शरीर। राहो अथवा जावो ॥८.८२॥" या न्यायानें अखंड साधनरत व अध्यात्मरत असावे अशी त्यांची इच्छा असे. या दृष्टीने श्रीस्वामीमहाराजांनी स्वमुखाने सांगितलेले सर्व विवेचन अभ्यासण्यासारखे व मननचिंतन करण्यासारखे आहे, यात तिलःप्राय शंका नाही. ज्यांना खरोखरीच अध्यात्माची वाटचाल करावयाची आहे व सामरस्याचा, मोक्षाचा, कैवल्याचा, अमनस्क अवस्थेचा किंवा अद्वैताचा मुक्काम गाठावयाचा आहे त्यांना श्रीस्वामीमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे अखंड अभ्यास करणे आवश्यक आहे.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा बारावा महत्त्वाचा पैलू "अहिंसा परमो धर्मः।" हा आहे. या दृष्टीने श्रीक्षेत्र कातरखेडा येथे अनेक विंचू रोज सतत निघत असले तरी ते सर्व विंचू एका पात्रात घालून दूर नेऊन कसे सोडून देण्यात येत असत, या संबंधीचे सर्व विवेचन वाचण्यासारखे आहे. (पृ. २२१, २२२) या दृष्टीने सर्व साधक वाचकांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील "अहिंसा" ॥१३.७॥ या पदाचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी "श्रीज्ञानेश्वरीत" ओवी क्र. २१८ ते ३३९ पर्यंत केलेले सर्व विवेचन मनन करण्यासारखे आहे. या मननामुळे श्रीस्वामीमहाराजांना अभिप्रेत असलेल्या अहिंसेचे स्वरूप स्पष्ट होऊन ते मनात रुजेल व श्रीपतंजलीमहामुनींनी योगसूत्रात सांगितलेल्या यशाची सिद्धी होईल.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा तेरावा महत्त्वाचा पैलू म्हणजे

"श्रीक्षेत्र नरसोबावाडीचे पुजारी म्हणजे साक्षात् श्रीदत्तच आहेत," अशी त्यांची दृढ धारणा होती. या दृष्टीने डहीच्या श्री. राजेसाहेबांनी श्रीस्वामीमहाराजांना श्रीक्षेत्र कातरखेडा येथून त्यांच्या राजधानीपर्यंत हत्तीवरून मिरवीत नेण्याचे ठरविले तेव्हा त्यांनी श्रीक्षेत्र नरसोबावाडीचे पुजारी श्री. केशवभटजी विभूते यांना हत्तीवर बसवून कसे मिरवीत नेले, (पृ. २२४, २५) ही सर्व कथा मोठी वाचनीय आहे. श्रीस्वामीमहाराजांचे श्रीक्षेत्र नरसोबावाडीवर किती अलोट प्रेम होते, हेच यावरून सिद्ध होते.

श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनाचा चौदावा महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांना एकांतवास अत्यंत प्रिय होता. त्यामुळेच ते श्रीक्षेत्र चिखलद्याहून श्रीक्षेत्र कातरखेडा येथे गेले होते. (पृ. २०७) मात्र तेथेही लोकांनी त्यांची पाठ न सोडल्यामुळे त्यांना एकांत मिळाला नाही. श्रीस्वामीमहाराजांच्या या एकांतप्रियतेमुळेच व प्रवासात कोणीही बरोबर न घेण्याच्या वृत्तीमुळे ते श्रीक्षेत्र गरुडेश्वरी कसे गेले ही सर्व कथा पाहण्यासारखी आहे. (पृ. २३३) या एकांत प्रवासातच त्यांना श्रीअश्वत्थाम्याचे दर्शन घडले. (पृ. २३४ ते २३८)

येथे एक गोष्ट नमूद करणे आवश्यक वाटते की, श्रीस्वामीमहाराजांचे हे चरित्र खण्डशः प्रसिद्ध करीत असताना त्यांचे दर्शन व अनुग्रह घेतलेल्या व्यक्तींना भेटणे, त्यांच्या चातुर्मासाची व ते इतरत्र जेथे राहिले ती स्थाने पाहणे आणि तेथील श्रीस्वामीमहाराजांच्या वस्तूंची व वास्तूंची छायाचित्रे घेणे, त्यांनी साधकभक्तांना पाठविलेली पत्रे जमविणे इत्यादि कार्येही चालू आहेत. या कार्याच्या पूर्तीसाठीच शके १९१४ च्या ज्येष्ठ महिन्यात अर्थात् इ. स. १९९२ च्या जून महिन्यात मी १७-१८ लोकांसह श्रीक्षेत्र चिखलदा, श्रीक्षेत्र कातरखेडा, श्रीक्षेत्र उज्जयिनी, डही इत्यादि

ठिकाणी गेलो होतो. त्यावेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराज प्रथम ज्या मारुती मंदिरात व नंतर ज्या झोपडीत राहात होते त्या मंदिराची, श्रीमारुतीरायांचा झोपडीच्या जागेची (ही झोपडी १९७१ च्या श्रीनर्मदानदीच्या महापुरात वाहून गेल्याने तेथे आता फक्त घळवजा जागा आहे.) व श्रीमारुती मंदिराजवळील दोन्ही श्रीशिवमंदिरांची छायाचित्रे काढून आणली. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र कातरखेडा येथे श्रीस्वामीमहाराजांची जेथे झोपडी असण्याचा संभव होता त्या जागेची (पृ. २०७); (कारण तेथे सध्या फक्त चारच झोपड्या आहेत व गाव असे नाहीच.), पूर्वीच्या डही संस्थानचे राजे श्री. गणपतीसिंह ठाकूरसाहेब यांनी श्रीस्वामीमहाराजांना ज्या बगिच्यात उतरवून व्यवस्था केली होती व तेथे श्रीस्वामीमहाराजांच्या पादुका स्थापून जे मंदिर बांधिले आहे त्या मंदिराची व त्यांच्या पादुकांची आणि श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र कातरखेड्याहून निघून पूर्वीच्या डही संस्थानातील ज्या श्रीराममंदिरात थांबून श्रीरामनवमीचा उत्सव करून पुढे श्रीक्षेत्र गरुडेश्वराला गेले त्या मंदिराची (पृ. २३१) अशी विविध ठिकाणची छायाचित्रे काढून आणून ती या खण्डात समाविष्ट केली आहेत. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांचे चरित्रकार श्री. म्हाइंभट यांनी त्यांच्या विषयीं लिहिताना "एथचिया संबंधा आले गेले ओटे गोटे तुम्हा नमस्करणीय की गा," असे म्हणून त्यांच्या राहण्याच्या सर्व ठिकाणांबद्दल व वस्तूंबद्दल जी पराकाष्ठेची भक्ती, एकांतिक आदर व निष्ठा व्यक्त केली आहे, तशीच पराकाष्ठेची भक्ती, निष्ठा व आदर श्रीस्वामीमहाराज जेथे जेथे राहिले व त्यांनी ज्या ज्या वस्तू वापरल्या त्याबद्दल माझ्या अंतःकरणात वसत असल्यामुळे हा महदुद्योग केला आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या या

सर्व स्थानांच्या छायाचित्रांचे व वस्तूंचे सर्व साधक, भक्त व वाचक श्री. म्हाइंभटांइतक्याच प्रेमाने, भक्तीने व निष्ठेने स्वागत करतील अशी नितांत खात्री वाटते. श्रीस्वामीमहाराजांच्या वस्तू, पत्रे, कथा आणि ते आपल्या चातुर्मासाच्या काळात ज्या क्षेत्रांमध्ये राहिले व प्रवासात इतर वेळीही जेथे जेथे त्यांनी निवास केला ती सर्व ठिकाणे त्यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली असल्यामुळे हा श्रीस्वामी-महाराजांनी आम्हा सर्व साधक-भक्त-वाचकांवर अनुग्रह व मार्ग-दर्शन करण्यासाठी ठेवलेला अमोल ठेवा आहे, अशी आम्हा सर्व भक्त मंडळींची दृढ श्रद्धा आहे. श्रीस्वामीमहाराजांचे चरण ज्या ज्या ठिकाणी पडले तेथील चरणधूळ आपल्या अंगावर पडून आपण कृतार्थ व धन्य व्हावे, त्यांच्या चरित्र वाचनाने अध्यात्माचे व परमार्थाचे मार्गदर्शन व्हावे, त्यांनी प्रवर्तित केलेल्या "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या महामंत्राच्या जपाने समाधि-सुखाचा लाभ व्हावा आणि या सर्व गोष्टींच्या द्वारा त्यांची चरण-सेवा पराकाष्ठेच्या प्रेमाने, उत्कट भक्तीने, अपूर्व श्रद्धेने व एकांतिक निष्ठेने त्यांनी आम्हा सर्व सेवक-भक्तांकडून करून घेऊन, आम्हा सर्वांवर आपल्या प्रेमकृपाशीर्वादरूपी अमृताचा अखंड वर्षाव करून आमचे जीवन धन्य व कृतार्थ करावे अशी आम्हा सर्वांची त्यांच्या व त्यांचे परमश्रेष्ठभक्त माझे श्रीसद्गुरुनाथमहाराज यांच्या परम-कोमलचरणी पराकोटीच्या शरणागतीपूर्वक प्रार्थना आहे.

सारांश, श्रीथोरलेस्वामीमहाराजांच्या चरित्राच्या सहाव्या खंडात चित्रित झालेले श्रीस्वामीमहाराज "ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥ १८. १७९९ ॥" या श्रीसन्त ज्ञानेश्वरमहाराजांनी "श्रीज्ञानेश्वरीत", सांगितलेल्या न्यायाने श्रीस्वामीमहाराजांसारखे अवतारी पुरुष, सज्जन, भगवद्भक्त हे सकल जीवांना नेहमी

सोयरे होऊन सर्व समाजाला अध्यात्माची प्राप्ती व्हावी म्हणून सतत झटत असतात. याकरिता "श्रीवासुदेवाय नमः।" अशी त्यांची अखंड प्रार्थना करीत आपले जीवन कृतकृत्य करण्यातच खरी धन्यता आहे. श्रीस्वामीमहाराजांचे अनन्य भक्त व त्यांचे पूर्वाश्रमातील धाकटे बंधू श्रीसीतारामहाराज यांनी "वासुदेव तूं राम तूं हरी ॥" असे म्हणून श्रीस्वामीमहाराजांचे ज अपूर्व गौरवपूर्वक स्मरण केले आहे ते त्यांच्या शब्दातच करून, ज्याप्रमाणे मेघ हा चातकपक्षावर जलवर्षाव करून त्याला अनासायासाने जलप्रसाद प्राप्त करून देऊन संतुष्ट करतो त्याप्रमाणे सर्व साधकभक्तांवर श्रीस्वामीमहाराजांनी कृपावर्षाव करून आपला अनादि मोहमायादि अंधकार दूर करून आपणा सर्वांना अनासायासाने संसार सागरातून तरून न्यावे म्हणून, प्रार्थना, धावा व स्मरण करणे योग्य ठरेल.

जयपरात्परा सद्गुणाकरा ॥ भुवनसुंदरा लक्ष्मीवरा ॥
जयसुरोत्तमा, भीतिभंजना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ १ ॥
प्रगटलासि तू अनसुयोदरीं ॥ प्रथम अत्रिच्या आश्रमान्तरीं ॥
भजकपालका, योगमुनिधना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ २ ॥
सुमतिच्या कुशीं येशि नंतरीं ॥ जन्मशी तसा अंबिकोदरीं ॥
कलिमलान्तका पतितपावना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ३ ॥
तो त्रिमूर्ति तूं माणगांवि या ॥ श्रीगणेश टेंब्ये द्विजालया ॥
प्रगटशी पुन्हां धर्मपालना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ४ ॥
सर्वशक्ति तूं सर्व जाणता ॥ श्रेय या जनालागिं अर्पिता ॥
दीनबांधवा सौख्यवर्धना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ५ ॥
असशि तूं दयावंत अंतरीं ॥ स्नेह बहु तुझां ह्या जिवांवरी ॥
मायबाप तूं विश्वजीवना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ६ ॥

धर्म कलियुगीं सोडिला जनीं । कष्टमय दशा त्यांचि पाहुनी ॥
दाविशी तया मुक्तिसाधना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ७ ॥
आचरोनियां धर्मपद्धती ॥ शिकविशी स्वयें या जगाप्रती ॥
सद्गुरूच तूं बोधिशी जनां ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ८ ॥
मच्छकच्छवाराहनरहरी ॥ वासुदेव तूं राम तूं हरी ॥
कल्कि तोहि तूं होशि वामना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥ ९ ॥
ब्रह्मदेव तूं सृष्टिकारण ॥ विष्णुमूर्ति तूं भक्ततारण ॥
असशि शंकर स्वात्मबोधना ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥१०॥
नेणती तुला सर्वथा या श्रुती ॥ ह्यांपुढे वृथां गाउं मी किती ॥
घेइ मानुनी बालभाषणा ॥ नमन तुज रमासाध्विनंदना ॥११॥

अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांचे निरंतर ध्यान व स्तुती करून स्मरण केले म्हणजे श्रीसद्गुरू हे सर्व संसारभ्रम दूर करून स्वस्वरूपी लीन करणारे अर्थात् मोक्षदाते व कल्याणरूप आहेत अशी धारणा अंतःकरणात कशी उपस्थित होते याचे वर्णन करताना श्रीसीताराम-महाराज असे म्हणतात की–

रामा आली आतां निवृत्ति मजला । हर्ष बहु झाला मनीं माझ्या ॥१॥
ऐसें हें स्त्रीरत्न गुरुरायें दिल्हें । मोक्षपद आलें माझ्या हातां ॥ २ ॥
आतां कैंचें जन्म गेला भवभ्रम । मनीं दत्ताराम प्रकटला ॥ ३ ॥
प्रगटला ज्ञानदीप हा हृदयीं । अज्ञानासी घाई झाली बहु ॥ ४ ॥
माझा सर्व भ्रम वासुदेवें नेला । स्वरूपीं लीन केला सीतारामा ॥५॥

आता खण्डशः प्रसिद्ध होणाऱ्या या बृहत् चरित्राच्या लेखनासाठी, छायाचित्रे काढण्यासाठी, छपाईसाठी व प्रसारासाठी ज्यांचे साहाय्य झाले व होत आहे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे.

प्रथमतः श्रीस्वामीमहाराजांचे एकांतिक भक्तश्रेष्ठ परमपूजनीय श्री. नि. अ. तथा श्री. राजाभाऊ करंदीकरमहाराज, संस्थापक, श्रीवासुदेवानन्दसरस्वती ॐ श्रीसद्‌गुरु प्रतिष्ठान, बोरिवली, त्यांचे सर्व साधक, भक्त व कार्यकर्ते, माझे गुरुबन्धू श्री. यशवन्त महादेव बांके, बोरिवली, आणि श्री. दत्तात्रेय कोंडीराम शिंदे व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सुलभाताई दत्तात्रेय शिंदे, बोरिवली, या सर्वांनी श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राच्या छपाईसाठी आणि त्यांनी रचलेल्या इतर ग्रंथांच्या प्रसारासाठी जे साहाय्य व जी अमोलिक मदत करून अपार कष्ट घेतले, घेत आहेत व घेणार आहेत त्याबद्दल मी त्यांचा अपार ऋणी आहे. याबाबतीत परमपूजनीय श्रीस्वामीचरणभक्तश्रेष्ठ श्री. करंदीकरमहाराज यांचे साहाय्य व परिश्रम हे शब्दातीत असून त्यांच्या या उभयविध सहकार्याबद्दल त्यांना व त्यांच्या साधक-भक्त कार्यकर्त्यांना माझे शतशः हार्दिक धन्यवाद आहेत !

याशिवाय श्री. सूर्यकान्त काशिनाथ भावे, सौ. उषाताई सूर्यकान्त भावे, सौ. विजयाताई रघुवीर माटेगावकर, श्री. कृष्णाजी शिवराम आठवले, श्री. गोपाळराव सदाशिवराव खांडेकर, श्री. श्रीराम गोपाळराव खांडेकर, श्री. परमानन्द नैलवाल, श्री. रघुनाथ राजाराम ऊर्फ अण्णासाहेब आपटे, श्री. शरद सीताराम ऊर्फ राजाभाऊ अत्रे, श्री. अरुणराव प्रभाकरराव राजे, श्री. उत्तमराव दिनकरराव पाटील, सौ. हेमलताताई उत्तमराव पाटील, श्री. चन्द्रकान्तराव रघुनाथराव पाटील, सौ. रेखाताई चन्द्रकान्तराव पाटील, श्री. शिरीष इच्छाराम चौधरी, श्री. यशवन्तराव गजाननराव ताटके, श्री. श्रीधर दिनकर ऊर्फ दादा खांडेकर, श्रीमती पद्मजा प्रशान्त सोनारीकर, श्री. पंडितराव रामचंद्रराव दातार (वकील), श्री.

प्रभाकर धोण्डोपन्त अजोतीकर, श्री. सुभाष दिनकर ऊर्फ नाना खांडेकर, श्री. किशोर नारायण गोराडे, श्री. दत्तात्रेय वासुदेव ऊर्फ पोपटराव जोशी, सौ. सखूबाई दगडू पाटील, श्री. बबनराव देवबा लांडगे, श्री. सदाशिवराव भालचन्द्र शारंगपाणी, सौ. विद्याताई सदाशिवराव शारंगपाणि, श्री. मंगलदास शंकरराव अंजने, श्री. मधुसूदन शंकरराव अंजने, श्री. आनन्दराव कृष्णाजी पाठक, श्री. गोपाळराव रामचन्द्रराव देशपांडे, प्रा. श्री. प्रकाश मोतीराम पाटील, सौ. अनसूयाबाई मोतीराम पाटील, श्री. सुधीर मनोहर देसाई, श्री. व्ही. जी. खेर, श्री. सुरेशराव रघुनाथराव पंडित, श्री. प्रभाकरराव नानाजी चौंबळ, श्री. कमलाकरराव गजाननराव पाटील, कै. श्रीमती विजयाताई यज्ञेश्वर पंडित, कै. श्री. सुरेशराव रामचन्द्रराव मल्लापूर, श्री. श्रीकान्त दिनकर ऊर्फ बण्डोपन्त खाण्डेकर, श्री. शा. द. करन्दीकर, श्री. लक्ष्मणराव परशुरामराव पाटील, सौ. मालतीबाई लक्ष्मणराव पाटील, श्री. सुहासराव वासुदेवराव भारंबे, सौ. प्रतिभाताई सुहासराव भारंबे, गं. भा. द्वारकाताई नथ्थू चौधरी, श्री. घन:श्यामराव बाबूराव वायंगणकर, श्री. अनिल शंकर मुळचे, श्री. भास्कर मोरेश्वर आठवले, श्रीमती मंदाकिनीताई मराठे (परमपूजनीय श्रीवामन दत्तात्रेय गुळवणीमहाराज यांच्या नावाने साहाय्य) श्री. सदाशिवराव श्रीनिवासराव कुलकर्णी, श्री. अविनाश भालचन्द्र धामणकर, श्री. दत्तात्रेय मुकुंद सरदेसाई, श्री. श्रीकान्त दत्तात्रेय सरदेसाई, श्री. दत्तात्रेय गुलाबसा क्षत्रीय, श्री. मुकुन्दराव नारायणराव केन्दूरकर, श्री. हरिभाऊ नारायणराव कुलकर्णी, सौ. मीराताई हरिभाऊ कुलकर्णी, श्री. दत्तात्रेय नारायण मोहन–पाटील, सौ. दयाबाई दत्तात्रेय मोहन-पाटील, श्री. माधवराव धोण्डोपन्त अजोतीकर, श्री. विश्वनाथराव

आनन्दराव पाटील, सौ. सुमनताई विश्वनाथराव पाटील, श्री. अ. स. कानेटकर, श्री. हरिहर गोपीनाथराव दाभाडे, श्री. बळवन्तराव केशवराव जोशी, श्री. दादासाहेब यंदे, सौ. उषाताई कुलकर्णी, श्री. अरुणकुमार शंकरराव वाघ, डॉ. सौ. कुमुदिनीताई अरुणकुमार वाघ, सौ. शांताताई पंढरीनाथ बिरादार, श्रीमती सुमतीताई विजयराव परळकर, श्री. ज. पां. खवणेकर, कै. श्री. प्रभाकर कृष्णाजी भिडे, श्री. विष्णुपंत बाळकृष्ण आपटे, श्री. पुरुषोत्तम विष्णू आपटे, श्रीमती कान्ताबेन प्राणुभाई देसाई, श्री. यशवंत महादेव वाझे, श्री. त्र्यंबकराव रामचंद्र बेलापूरकर, कै. श्री. बाळकृष्ण सिद्धनाथ कुलकर्णी, श्री. उदय मोतीराम पाटील, श्री. अजय कमलाकर भवाळकर, श्री. सुधीर अनंत चौधरी, श्री. रमणलाल राजाराम आळतेकर, श्री. सदानंद शांताराम पारकर, श्री. प्रभाकर आनंदराव नगरसे, श्री. गोकुळदास वा. चिमलकर, सौ. वेदव्रती विजयकुमार कुलकर्णी, डॉ. श्री. मनोहर अनन्त फणसळकर, सौ. सुजाताताई मनोहर फणसळकर, डॉ. श्री. रमेश लक्ष्मण पाटकर, श्री. दामोदर दत्तात्रेय पोळ, सौ. अनुराधाताई दामोदर पोळ, सौ. सुजाताताई भायदे, श्री. लक्ष्मणराव राजाराम महाजन, श्री. श्रीकृष्ण सदाशिव महाडेश्वर, श्री. प्रदीप पीरचंद पाटील, डॉ. श्री. गोविंद हरि चौधरी, सौ. राधाताई गोविंद चौधरी, श्रीमती पद्मावतीताई एकनाथराव कुलकर्णी, श्री. न. रा. अभ्यंकर, श्री. स. ल. खाडिलकर, या व इतरही सर्व गुरुबन्धू, गुरुभगिनी, साधक व प्रेमी मंडळींचे श्रीथोरलेस्वामीमहाराज यांच्या चरित्राच्या प्रकाशन कार्यासाठी अपरंपार साहाय्य झाले असून पुढील सर्व खण्डांसाठी हे व इतरही सर्व प्रेमी मंडळी साहाय्य करणार आहेत, ही श्रीस्वामीमहाराजांची व श्रीगुरु-

चरणांची अपार कृपा आहे, यात काहीच शंका नाही. या सर्वांच्या साहाय्याविना श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राचा हा सहावा खण्ड छापून प्रसिद्ध होणे कदापीही शक्य झाले नसते व पुढील खण्डही छापून प्रसिद्ध होणे शक्य नाही, हे नितान्त सत्य आहे. या सर्वांचे हे साहाय्य अत्यन्त निरपेक्ष असल्यामुळे त्यांनी केलेली ही सेवा श्रीथोरलेस्वामी-महाराज व श्रीसद्गुरुनाथमहाराज यांच्या चरणी रुजू होऊन या उभयतांनी आपल्या प्रेमकृपाशीर्वादाचे अखंड छत्र या सर्वांवर व त्यांच्या कुटुंबीय मंडळींवर ठेवावे अशी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्राच्या या सहाव्या खण्डात श्रीक्षेत्र चिखलदा व श्रीक्षेत्र कातरखेडा येथील जी जी विविध चित्रे छापली आहेत, ती ती सर्व छायाचित्रे श्री. विनय मुरलीधर देशपांडे, भुसावळ, श्री. भूषण पंडितराव जाधव, भुसावळ, श्री. प्रदीप पीरचंद पाटील, दीपनगर, श्री. सुरेश बाळकृष्ण दैठणकर, कोपरगाव यांनी मोठ्या प्रेमाने, आत्मीयतेने व आपुलकीने त्या ठिकाणी स्वखर्चाने स्वतः जाऊन काढून आणून दिल्यामुळेच ती या खण्डात छापता येणे शक्य झाले.

या सहाव्या खण्डाची छपाईप्रत माझे धाकटे बंधू चि. हरिहर यांच्या दोन मुली चि. सौ. विजयागौरी महेश पटवर्धन चि. सौ. रोहिणी गुरुप्रसाद पुजारी या दोघींनी मिळून अत्यन्त सुवाच्च अक्षरात खूप कष्ट घेऊन लिहून देऊन माझे श्रम हलके केले. श्री. द. सा. मांजरेकर यांनी अपरंपार कष्ट घेऊन हे चरित्र लिहून श्रीस्वामीमहाराजांच्या चरणांची जी सेवा केली आहे, ती मोठी स्पृहणीय आहे, यात काहीच शंका नाही. त्याचप्रमाणे या चरित्राची मुद्रिते वाचणे, तपासणे इत्यादि इतर सर्व कामे श्री. माधव-राव धोण्डोपन्त अजोतीकर, चि. अजय सूर्यकांत भावे, चि. धनंजय

गजानन जोशी, श्री. शरद सीताराम ऊर्फ राजाभाऊ अत्रे, श्री. मधुकरराव गावडे, चि. हरिहर, सौ. रमा, चि. योगेश, चि. सौ. विजयागौरी व चि.सौ. रोहिणी या सर्व घरातील मंडळींनी श्रीस्वामी-महाराजांची व श्रीसद्गुरुनाथमहाराजांची अत्यन्त प्रेमाने सेवा म्हणून केली, ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. उपरोक्त सर्वांनी केलेली ही त्यांची विविध सेवा, प्रेम व भक्ती श्रीस्वामीमहाराजांनी व श्रीसद्गुरुनाथमहाराजांनी मान्य करून घेऊन, या सर्वांना व त्यांच्या कुटुंबीय मंडळींना धन्य व कृतार्थ करून त्या सर्वांवर प्रेम-कृपाशीर्वादाचे छत्र अखण्ड धारण करावे म्हणून या उभयतांच्या चरणी शरणागतीपूर्वक प्रार्थना आहे.

या चरित्रग्रंथाच्या सहाव्या खण्डाची छपाई माझे मित्र व श्रीस्वामीमहाराजांचे सांप्रदायी श्री. ज. प. खरे यांनी हे आपले स्वतःचेच काम आहे या धारणेने व श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी आपली ही सेवा रुजू व्हावी म्हणून अत्यन्त प्रेमाने केली असून पुढील सर्व खंडांची छपाई ते मोठ्या आत्मीयतेनें करून देणार आहेत, याबद्दल मी जेवढी कृतज्ञता व्यक्त करीन व त्यांना धन्य-वाद देईन तेवढे थोडेच आहेत. त्यांची ही सेवा त्यांचे परमपूजनीय प्रातःस्मरणीय श्रीसद्गुरू श्रीनारायणमहाराज, त्यांचे श्रीसद्गुरू श्रीसीताराममहाराज व त्यांचे श्रीसद्गुरू ज्ञान व योगमूर्ती अखंड मंडलाकार श्रीथोरलेस्वामीमहाराज या श्रीदत्तस्वरूप त्रयमूर्तींनी रुजू करून घेऊन त्यांना धन्य व कृतार्थ करावे अशी त्या सर्वांच्या चरणी नम्रतापूर्वक प्रार्थना आहे. त्याचप्रमाणे आदित्य मुद्रणालया-तील काम करणाऱ्या सर्वांचे अपरिमित साहाय्य झाले, होत आहे व होणार आहे हे नमूद करताना अत्यंत समाधान वाटत आहे. या सर्व प्रेमी कर्मचारी बंधूंना श्रीस्वामीमहाराजांनी प्रेम, कृपा व

आशीर्वाद देऊन त्यांचे इहपर अखंड कल्याण करावे म्हणून त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

इत्यलम्। श्रीसरस्वतीगंगाधर यांच्या "श्रीगुरुचरित्र" या ग्रंथातील शब्दात अल्पसा बदल करून असे म्हणता येईल की, "श्रीस्वामीचरित्रामृत। सेविता तृष्णा अधिक होत।।" हेच खरे आहे; कारण "श्रीस्वामीचरित्र ऐकता। लाधली सकळाभीष्टता। याकारणें ऐका समस्ता। श्रीस्वामीचरित्र कामधेनू।। ५६.६७ ।। अमृताची असे साथणीं। स्वीकारितां भाविकजनीं। धर्मार्थकाम-मोक्षसाधनीं। हेचि कथा ऐकावी ।।६८।। चतुर्विध पुरुषार्थ। लाधती श्रवणें परमार्थ। श्रीवासुदेवानंदसरस्वती गुरुनाथ। रक्षी त्यांचे वंशोवंशीं ।।७१।।" अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांचे चरित्र हे कामधेनू व चिन्तामणी असल्यामुळे श्रीस्वामीमहाराजांचे परमभक्त व शिष्यश्रेष्ठ श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीयोगानन्दसरस्वती-स्वामीमहाराज ऊर्फ श्रीगांडामहाराज यांनी स्वकृत "श्रीगुरुमूर्ति-चरित्रात" आपल्या हृदयस्थ श्रीसद्गुरुमहाराजांचे जे गुणगान केले आहे ते करून धन्यतेस पात्र होणेच इष्ट आहे. ते असे म्हणतात की, "श्रीदत्त समर्थ ।। श्रीगणेशाय नमः ।। अहो श्रीगुरु समर्था। तुमचे चरणीं ठेवोनी माथा। नमस्कारितों अनाथनाथा। प्रार्थना आतां अंगिकारा ।। २-१ ।। आपण जो भवरूप इभ (हत्ती)। तत्काल केसरीरूप सुप्रभ। दासा मोक्ष परम पदलाभ। देशी स्वयं गुरुमूर्ते ।।२।। जन्ममृत्यू दारिद्र्य हरणें। ऐसें आपुलें उदार देणें। यास्तव जगीं सद्गुरु येणें। नामाभिधानें विराजसी ।। ३ ।। तूं परमात्मा मायें करून। रूपें धरिसी भिन्न भिन्न। निराकारीं साकारपण। भासमान उद्भवसी ।। ४।। तूंच ब्रह्मा विष्णु रुद्र। गणेश शक्ति आणि इंद्र। वरुण वायु यम सूर्य चंद्र। अग्नि धनद चराचर ।।५।।

रामकृष्णादि अवतार। सर्व तुमचाचि जगविस्तार। जो जो कांहीं दिसे आकार। तो साचार रूप तुमचें ॥ ६ ॥ तो तूं माझें इष्ट दैवत। अत्रितनुज श्रीदत्त। श्रीवासुदेवानंद होत। भेद उभयतां न दिसे ॥७॥ तया श्रीगुरूपासी। गांडा नाम पूर्वींचे ज्यासी। तयातेंच योगानंद ऐसी। संज्ञा देसी गुरुवर्या ॥ ८ ॥ तो शिष्य तुझिये पद-कल्हारीं। सविनय भावें प्रार्थना करी। कीं मम हृदयकुमुदांतरीं। भक्तकैवारी वसोनी तूं ॥ ९ ॥ मम हृदयींचें जें अज्ञान। आणि वासनाजाल संपूर्ण। करी तयाचें शीघ्र निकृंतन। प्रार्थनावचन परिसा हें ॥१०॥ माझी बुद्धि आणि मन। अहंकारतिमिरें व्याप्त पूर्ण। तूं प्रगटतां चंडकिरण। दिसेल कोठून खद्योत तें ॥११॥ तुमची कृपा झालिया वरी। लिंगदेह निरसे तो निर्धारीं। तेणें मीतूंपण होय दूरी। प्रगटे अंतरीं चिद्रूपत्व ॥१२॥ ऐसी स्थिति झालिया पूर्ण। बुद्धि वैखरी आणि मन। सहजचि आलस्य दूर त्यागून। सदा तव गुण वर्णितील ॥१३॥ करुणार्णवा सद्‌गुरुराया। आपुलें महत्त्व वर्णावया। कवणा शक्ति जेथें माया। जात लया संपूर्ण ॥ १४ ॥ सत्य स्वरूप तुमचें शुद्ध। नित्य निःसंग अभेद। जगतामाजीं सुप्रसिद्ध। निरुपमानंद पूर्ण ॥ १५ ॥ आपणा सारिखें दुजें असावें। तरी तें उपमें तुम्हां द्यावें। म्हणोनी वाचा निज स्वभावें। तटस्थ राहे निवांतपणें ॥१६॥ आपुली स्वयंप्रकाश ज्योति। माझिये हृदयीं प्रगटोनी दीप्ति। करितां महत्कार्यें घडती। जी दुस्तर भवनदी ॥ १७ ॥ तरुनी जाया त्या नदीतुनी। त्वत्पदांबुज सुदृढ तरणि। इतर मार्ग या वांचुनी। सुलभपणीं नसे कीं ॥१८॥ सुवर्णा देणें रजत ढाळ। कीं मौक्तिकातें अधिक तेजाळ। करण्या योजिलें जेवीं जळ। उटणें विमल रवीतें ॥ १९ ॥ तेवीं सद्‌गुरु तुमची स्तुति। करितसें मी अल्पमति। सच्चिद्‌घना तुज वर्णितां

श्रुति। नेति नेति वदोनी श्रमे ॥२०॥ यास्तव शब्दालंकार सोडोनी। सोहं शब्दें जय जय करोनी। सप्रेम माथा ठेविला चरणीं। वरद पाणि शिरीं ठेवा ॥२१॥ मुख्य आपुलें स्वरूप निर्गुण। भक्तकार्यास्तव होतसे सगुण। भक्तें करितांचि आठवण। येता धांऊन दयार्णवा ॥२२॥ स्तुति परिसोनी सद्गुरुराज। हृदयीं प्रगटले सहज। सुहास्य प्रसन्न मुखांबुज। म्हणती मज काय हेतू ॥२३॥ धरोनी वत्सा तूं बाहसी। श्रीवासुदेवानंदसरस्वतीसी। योगानंद ते अति हर्षी। म्हणे मानसी योजिलें ॥२४॥ सद्गुरुनाथा तव गुणसागर। तयाचा न लगे कवणा अंतपार। परी तूं प्रेरिसी तें सत्वर। मुखा बाहेर काढितसें ॥२५॥ तूंचि स्तुत्य तूंचि स्तविता। तूंचि वदता आणि वदविता। तूंचि सर्व कर्ता करविता। माझी सत्ता नसे कांहीं ॥२६॥ ”

सारांश, “ शिवशक्तिसमावेशें। मियां नमन केलें ऐसें। रंभागर्भ आकाशें। रिगाला जैसा ॥१.६४॥ ” असे जे सकलसंतशिरोमणी श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी “ अनुभवामृत ” ग्रंथात म्हटले आहे त्याप्रमाणे शिवशक्तिसमावेशपूर्वक श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी नमनरूप सामरस्य घडून यावे व “ श्रीगुरुरूपी नारायणा। विश्वंभर दिनोद्धारणा। आपण आपुली दावूनि खुणा। गुरुशिष्यरूपें क्रीडसी ॥५३.१०४॥ ” असे जे श्रीसरस्वतीगंगाधर यांनी श्रीगुरुचरित्रात म्हटले आहे, त्या न्यायाने श्रीस्यामीमहाराजांनी आम्हा सर्वांचा शिष्यरूपाने स्वीकार करून अनुग्रह करावा आणि आम्हा सर्व साधक–भक्तांना आपल्या अप्राकृत गुरुशिष्यक्रीडेत समाविष्ट करून घ्यावे अशी त्यांच्या चरणी आम्हा सर्व सेवकांची अनन्यशरणागतीपूर्वक अखंड प्रार्थना आहे.

श्रीगुरुचरणरजसेवक
केशव रामचंद्र जोशी

– अनुक्रमणिका –

विषय	पृष्ठ
१) प्रस्तावना	१
२) अध्याय पंचविसावा–चातुर्मास बाविसावा	१
३) अध्याय सव्विसावा–श्रीक्षेत्र कातखेडा	२०६
४) परिशिष्ट क्रमांक १	२६१
५) परिशिष्ट क्रमांक २	३०१

॥ श्रीदत्तगुरु भगवान् ॥


श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य

श्रीवासुदेवानंदसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज



श्रीवासुदेवानंदसरस्वती। भगवान् स्वये श्रीदत्तमूर्ती।
समर्थ श्रीसद्गुरु पावनकीर्ती। चक्रवर्ती योग्यांचे॥

॥ भगवान् श्रीदत्तात्रेय ॥




निम्नहातीं मालाकमंडलू । मध्यहातीं त्रिशूल-डमरू ।
ऊर्ध्वहातीं शंखचक्रू । तो हा महायोगेश्वर श्रीदत्तात्रेय ॥

॥ श्रीदत्तगुरू भगवान् ॥




श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य ।
श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज ॥

श्रीगुरुशिष्यपंचायतन



॥ योगिराज सद्गुरु श्रीसन्त वामनरावजी गुळवणीमहाराज ॥



शक्तिपाताचा महामेरू । वहुत जनांसी आधारू ।
ब्रह्मस्थितीचा निर्धारू । शाम्भव योगी ॥

जन्म शके १८०८ दि. २३-१२-१८८६ मार्गशीर्ष वद्य १३, श्रीक्षेत्र कुडुत्री
समाधी शके १८९६ दि. १५-१-१९७४ पौष वद्य ८, श्रीक्षेत्र पुणे.

॥ श्रीसद्गुरु श्रीसीताराममहाराज टेंबे ॥




सीतारामो योगिवरो ब्रह्मचारी कवीश्वरः ।
गुरुपादार्पिततनुः समदृग्गुरुतांगतः ॥

समाधी : फाल्गुन शुद्ध ८ शके १८४० - इ. स. १९१८

श्रीक्षेत्र वढणेरी, जि. अमरावती

॥ श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामीमहाराज ॥



प्रकटोनी या धरेवरती । निजजनोद्धार करती ।
शान्त दान्त मुनिस्वामी । ते हे श्रीनृसिंहसरस्वती यती ॥
जन्म : चैत्र शुद्ध १, शके १७८८ इ. स. १८६६
समाधी : आश्विन वद्य ७, शके १८४९ इ. स. १९२७, अयोध्या

॥ श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
श्रीयोगानन्दसरस्वतीस्वामी ऊर्फ श्रीगांडामहाराज ॥



यो वै भूमा तत्सुखं त्वेतिगीतं गेयातीतं ध्यानगम्यं मुनीन्द्रम् ।
भक्तैकार्यं ह्यात्त मानुष्यमूर्तिं योगानन्दं तं यतीन्द्रं नतोऽस्मि ॥


जन्म : शके १७९० इ. स. १८६८ मार्गशीर्ष शुद्ध १५, श्रीक्षेत्र तलंगपूर
समाधी : शके १८५० इ. स. १९२८ फाल्गुन वद्य १२, श्रीक्षेत्र गुंज

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांचे शिष्य.
श्रीसद्गुरू योगानंद सरस्वती (गांडामहाराज) (ऐन तारुण्यात)






श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्रीस्वामीमहाराजांचे
वास्तव्य असलेल्या झोपडीची जागा




श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडी शेजारी असलेले श्रीहनुमानजी




श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडी शेजारील पहिले श्रीशिवमंदिर




श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडी शेजारील दुसरे श्रीशिवमंदिर



श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडी शेजारील श्रीहनुमानजींचे मंदिर



श्रीक्षेत्र चिखलद्याच्या श्रीस्वामीमहाराजांच्या
चातुर्मासाच्या जागेजवळील नवा पूल व घाट



श्रीक्षेत्र कातरखेडा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडीची जागा




श्रीक्षेत्र कातरखेडा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडीच्या जागेवर पडलेले दगड




श्रीक्षेत्र कातरखेडा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
झोपडीची जागा

श्रीक्षेत्र कातरखेडा येथील सध्यांची झोपडी व
तेथील रहिवासी




श्रीस्वामीमहाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला
डही येथील राजवाडा




श्रीस्वामीमहाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली


डहीच्या राजवाड्यातील जागा



डही येथील बगिच्यातील श्रीस्वामीमहाराजांच्या
वास्तव्याच्या जागेवर बांधलेले मंदिर



डही येथील बगिच्यातील
श्रीस्वामीमहाराजांच्या पादुका




डही येथील श्रीस्वामीमहाराजांच्या
पादुकामंदिराशेजारील श्रीशनी मंदिर




श्रीस्वामीमहाराजांनी श्रीरामनवमीचा उत्सव केलेले


डही येथील श्रीराममंदिर




डही येथील श्रीराम मंदिरातील
श्रीराम, श्रीलक्ष्मण व श्रीसीता यांच्या मूर्ती



श्रीक्षेत्र चिखलदा येथील
श्रीहनुमानजी



डही येथील बगिच्यातील
श्रीशनिमंदिर



श्रीक्षेत्र चिखलदा येथील
श्रीशिवमंदिर

भगवान् श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
।। श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज ।।



दीक्षा द्यावया साधुजना । उद्धरावया भक्तजना ।।
अवतरे श्रीदत्तमहाराणा । श्रीमन्नृसिंहसरस्वती शंकर ।।


॥ श्रीनर्मदादेवी ॥

उभयतटपुण्यतीर्था प्रक्षालित सकललोक तुरितौघा ।
देव मुनि-मनुज वन्द्या हरतुसदा नर्मदा दुरितम् ॥



यंन्मूलेऽस्त्यमरेश्वरो विजयते श्रीसिद्धनाथस्तथा ।
कावेरी-परिवेष्ठितो गतिदओंकारोऽपरेचामिताः ॥
मध्येऽन्येपिच शूलपर्णिसहिता पश्चात्यभागे स्थिताः ।
सर्वेते [illegible] नर्मदा ॥

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
॥ श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज ॥



॥ भगवान् श्रीदत्तात्रेय ॥



मालाकमंडलुरधःकरपद्मयुग्मे । मध्यस्थपाणियुगले डमरुत्रिशूले ।
यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे । वन्दे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥

।। श्रीगुरुःशरणम् ।।

।। ॐ श्रीमद् अमृतमूर्तये श्रीदत्तवासुदेवाय नमः ।।

श्रीथोरलेस्वामीमहाराज

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज यांचे चरित्र

(उत्तरार्ध - सिद्धखण्ड - क्रमाङ्क ५)

-खण्ड सहावा-

-अध्याय पंचविसावा-

अभंग १

नंदन जो अनसूयेचा ।। तो तूं कैवारी आमुचा ।।१।।
आमुचा तूं म्हणो जरी ।। भेट कां न देसी हरी ।।२।।
हरी माझी अंतर्व्यथा ।। पद दावी तुझे नाथा ।।३।।
नाथा आलों काकूळती ।। कळकळसी न कां चित्तीं ।।४।।
कां चित्तीं न ये दया ।। वासुदेवाची गुरुराया ।।५।।

अभंग २

भाव भक्ति अंगीं उठे ।। प्रेमभरें कंठ दाटे ।।१।।
दाटे प्रेमाश्रु लोचनीं ।। रोम राहे उभारूनी ।।२।।
उठोनिया आलिंगायां ।। आतां जातां न ये पाया ।।३।।
पाया पडुनी स्तवूं जरी ।। तरी शब्द नुमटे हरि ।।४।।
हरिलें त्वां देहभान ।। आतां कोणा करूं नमन ।।५।।
मन दत्तरूप होता ।। वासुदेवी ये धन्यता ।।६।।

अभंग ३

मित्र मित्र जरि भांडती । तरी पुनः एक होती ॥१॥
दंपतीचा हो कलह । लवमात्र न तुटे स्नेह ॥२॥
देवभक्ताचें भांडणें । परभक्तीचें तें ठाणें ॥३॥
वासु म्हणे हा विनोद । देतो दत्ता परानंद ॥४॥

अभंग ४

भयाचें जें भय भक्तां दे अभय । ते हे दत्तात्रेयपाय वंद्य ॥१॥
भासे जें द्वितीय तेंचि दावि भय । म्हणुनी हे पाय ध्यावे चित्तीं ॥२॥
मुळीं नसें द्वय तेथें कैंचें भय । बाळा जेवीं द्वय भासे छाया ॥३॥
पाहुनी साउली बाळक आपुली । भी तसी ही बोली हो मायिक ॥४॥
अंतर्दृष्टीनें हें दत्तपद ध्यातां । भयाची न वार्ता काळत्रयीं ॥५॥
वासुदेव म्हणे स्वाभिन्न हें पद । ध्यातां भय खेद भेद कैंचा ॥६॥

अभंग ५

मोक्षाचें आम्हांसी नाहीं अवघड । तो आहे उघड गाठोडीसी ॥१॥
त्यासी त्यास देणें कोण तें उचित । मानूनियां हित घेतों सुख ॥२॥
भक्ताचे सोहाळे होतील जीवासी । नवल तेवीं मी पूरविता ॥३॥
वासुदेव म्हणे सुखें देई तो संसार । आवडीसी थार करी माझे ॥४॥

चातुर्मास बाविसावा– शके १८३४–इ. स. १९१२–

श्रीक्षेत्र चिखलदा :–

श्रीस्वामीमहाराज राजूरचा श्रीसंहितास्वाहाकार पूर्ण करून पुढे श्रीनर्मदानदींच्या तीरातीरानें मंडलेश्वर, महेश्वर इत्यादि गावांवरून संचार करीत करीत धर्मपुरी या गावाहून ५० मैल दूर असलेल्या श्रीक्षेत्र चिखलदा या गावी इ. स. १९१२ च्या अधिक

आषाढ मासात आले. येथे आल्यावर प्रथम त्यांनी आपला मुक्काम काही काळ श्रीराम मंदिरात केला होता. त्यानन्तर काही दिवस त्यांनी आपले आसन श्रीनर्मदामातेच्या मंदिरात ठेवले. मात्र निज आषाढ मासातील पौर्णिमेला व्यासपूजा करून ज्यावेळी त्यांनी आपला बाविसावा चातुर्मास सुरू केला त्यावेळी मात्र त्यांनी श्रीमारुती मंदिराच्या उत्तरेकडील कडछातीत मुक्काम केला.

श्रीस्वामीमहाराजांची श्रीक्षेत्र चिखलदा येथे येण्याची ही तिसरी वेळ होती. येथे आल्यावर श्रीराम मंदिरातून ते ज्या श्रीनर्मदामातेच्या मंदिरात मुक्कामास आले होते ते श्रीनर्मदामातेचे मंदिर वेदमूर्ती श्री. आप्पासाहेब चापेकर ऊर्फ श्री. भरतभटजी यांनी इ. स. १९०९ मध्ये आपल्या स्वकष्टार्जित द्रव्याने बांधलेले आहे. त्यानन्तर श्रीस्वामीमहाराजांनी ज्या श्रीमारुती मंदिरात राहून आपला चातुर्मास पूर्ण केला त्या जागेची पुढे कालौघात वेदशास्त्रसंपन्न श्री. गोविंदभटजी उपाध्ये यांनी दुरुस्ती केली व त्या ठिकाणी त्यांनी स्वखर्चाने पार बांधून घेतला. सध्या तेथे श्रीदत्तात्रेयांच्या पादुका स्थापन केल्या आहेत. श्रीस्वामीमहाराजांच्या एकांतिक भक्त असलेल्या इंदूरच्या कै. सौ. इंदिराबाईराणीसाहेब होळकर यांनी शके १८४९ अर्थात् इ. स. १९२७ मध्ये येथील पुजाऱ्यांना दरमहा १५ रुपये पगार चालू केला होता.

श्रीस्वामीमहाजांनी आपला बाविसावा चातुर्मास श्रीक्षेत्र चिखलदा येथेच करण्याचे जे ठरविले होते त्याला दोन–तीन कारणे होती. श्रीस्वामीमहाराज इ. स. १८९७ साली पेटलादचा सहावा चातुर्मास संपवून प्रथमच श्रीक्षेत्र चिखलद्याला आले होतेः त्यावेळी त्यांचा तेथे आठ-नऊ महिने मुक्काम झाला होता. त्यामुळे श्रीक्षेत्र चिखलद्यामध्ये त्यांची पुष्कळशी मंडळी परिचित झाली होती. त्यानंतर

श्रीस्वामीमहाराज वैशाख वद्य अमावस्या शके १८२२ म्हणजेच इ. स. १९०० मध्ये शिनोरहून निघून श्रीक्षेत्र चिखलद्याला आले होते. त्यावेळी त्यांनी आपला दहावा चातुर्मास येथे केला होता व ते चातुर्मास संपल्याबरोबर येथून निघून गेले होते. अशा प्रकारे यापूर्वी दोन वेळा श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलद्याला आल्यामुळे येथील एकान्तता, शान्तता आणि श्रीनर्मदामातेची मनोहारिता इत्यादि सर्वच गोष्टी त्यांच्या मनात अगदी भरून गेल्या होत्या.

श्रीस्वामीमहाराजांच्या या तिसऱ्या खेपेच्या आगमनाच्या वेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे दक्षिणी ब्राह्मणांची मोजून चारच घरे होती. त्यामुळे यावेळी श्रीस्वामीमहाराजांची येथे भिक्षेची फारच उत्तम सोय झाली. कमीत कमी तीन घरी आणि तेही दक्षिणी ब्राह्मणांच्याच येथे माधुकरीची भिक्षा मागून आणून ती सेवन करण्याचा श्रीस्वामीमहाराजांचा नियम असल्यामुळे तो येथे अगदी अनासायास सिद्धीस गेला. श्रीस्वामीमहाराज उभ्या आयुष्यात कधी कोणाच्या घरी पुडीला गेले नव्हते. मग येथे तर काही प्रश्नच नव्हता. त्यातच श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले आहेत असे निसरपूर येथे कळले. त्यामुळे तेथून श्री. गंगाधरपंत वैद्य व इतर अनेक मंडळींचे श्रीक्षेत्र चिखलद्याला येणे-जाणे सुरू झाले. निसरपूर येथील चार दक्षिणी ब्राह्मणांची घरे, इंदूर येथील वेदशास्त्रसंपन्न श्री. लक्ष्मणराव टिल्लू आणि नागपूरकडील निरनिराळ्या गावातील कित्येक भक्तजन चिखलदा येथे येऊन राहिल्यामुळे यावेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे चातुर्मासाच्या दोन महिन्यांच्या व पुढील पाच महिन्यांच्या काळात श्रीस्वामीमहाराजांना नित्य एकाच घरी भिक्षेस जाण्याचा प्रसंग आला नाही. श्रीस्वामीमहाराज येथे नित्य तीन अथवा पाच किंवा सात घरी भिक्षेस जाऊन एकवेळ दिवसा

भिक्षान्न सेवन करीत असत. श्रीस्वामीमहाराजांनी प्रथमपासूनच साखर खाणे सोडले होते व गूळ, तूप, गव्हाची पोळी हे पदार्थ त्यांना सोसत नसत. त्यामुळे ज्वारीची भाकरी, ताक, भात, लिंबू व मीठ एवढेच पदार्थ त्यांनी आपल्या खाण्यात ठेवले होते व तेही आठ घास होतील इतक्या अल्पप्रमाणात ते सेवन करीत असत. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे त्यांचा आहार २० तोळ्याच्या आतच होता हे लक्षात येते.

श्रीस्वामीमहाराजांचे श्रीक्षेत्र चिखलदा येथे इ. स. १९०० साली आगमन होऊन त्यांचा १० वा चातुर्मास ज्यावेळी येथे झाला होता त्यावेळी भिक्षा व भोजन झाल्यानन्तर साधारण एक तासभराने ते दीड किंवा दोन मासेपर्यन्त काळे मीठ पाण्यात घालून घेत असत. मात्र पुढे त्यांचे ज्यावेळी दुसऱ्यांदा श्रीक्षेत्र चिखलदा येथे आगमन झाले त्यावेळी ते पाण्याऐवजी ताकात मीठ घालून पीत असत. संग्रहणीचा विकार असल्यामुळे नुसते पाणी पिणे त्यांना सोसत नसे; मात्र ताक पिणे त्यांना सोसत असे. ताक सोसत असले; तरी तेही ते दिवसातून एक वेळाच सेवन करीत असत. या तिसऱ्या वेळीही ताकात मीठ घालून ते दिवसातून एकवेळा सेवन करण्याचा त्यांचा क्रम येथे चालू होता. भक्तजनांकडून आलेला प्रसाद त्यांनी कधीही ग्रहण केला नाही. त्यांच्यापुढे आलेला सर्व प्रसाद दर्शनार्थी भक्त लोकांना नेहमी वाटून दिला जात असे.

श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलदा येथे तिसऱ्यांदा येऊन त्यांचा चातुर्मास सुरू झाला तरी पाऊस पडण्यास विलंब झाल्यामुळे श्रावण महिन्यात कॉलरा, वांती, जुलाब होऊन पुष्कळ माणसे या विकारांमुळे मृत्युमुखी पडली. या विकारांच्या शमनार्थ श्रीस्वामी-महाराजांनी श्रीदुर्गासप्तशतीच्या पाठांचे आणि त्याच्या हवनाचे

अनुष्ठान कसे करविले याची सर्व हकीकत पुढे आली आहे.

या आजाराच्या काळात परगावचे लोक दर्शनासाठी आले तर श्रीस्वामीमहाराज त्यांना लगेच परत जाण्यास सांगत असत; कारण त्या दिवसात बाहेरील लोकांना गावात राहण्यास कोठे जागाच उरली नव्हती. त्याचप्रमाणे कॉलऱ्याचा जोर अधिक असल्यामुळे खूपच माणसे त्या काळात मृत्युमुखी पडत होती व त्यांना जाळण्यास लाकडे व गवऱ्या मिळणेही कठीण झाले होते. त्या दिवसात स्वयंपाकासाठीही लाकडे व गवऱ्या मिळणे दुरापास्त झाले होते. त्यामुळे बढवाणी येथील संस्थानचे खाजगी दिवाण व इतर मंडळी स्वयंपाकासाठी लागणारी लाकडे, पाने, पत्रावळी इत्यादि सर्व सामान वारंवार श्रीक्षेत्र चिखलद्याला पाठवीत असत. पुढे चातुर्मास संपल्यानन्तर श्रीस्वामीमहाराजांचा या ठिकाणी पाच महिने मुक्काम असेपर्यन्त बढवाणीच्या संस्थानिकांनी धरमराय येथून जाळण्याची लाकडे पाठवून दिल्याने येथील स्वयंपाकासाठी चांगलीच मदत झाली.

श्रीक्षेत्र चिखलदा हे गाव श्रीनर्मदानदीच्या उत्तर किनाऱ्यावर असून ते पूर्वी इंदूर संस्थानामध्ये येत असे. या गावाच्या म्हणजेच श्रीनर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यावर बढवाणी हे संस्थान होते. तेथील राजे श्री. गणपतीसिंह ठाकोरसाहेब हे श्रीस्वामीमहाराजांचे भक्त होते. त्यांच्या अत्यधिक आग्रहामुळेच शके १८२२ अर्थात् इ. स. १९०० चा दहावा चातुर्मास श्रीस्वामीमहाराजांनी येथे केला होता. (खण्ड २ पृ. २२७)

श्रीस्वामीमहाराज प्रवास करीत करीत श्रीक्षेत्र चिखलदा येथे आल्याचे व त्यांना वाढदिसावा चातुर्मास तेथेच होणार असल्याचे कळल्याबरोबर चहूकडून अनेक भक्त मंडळी येथे जमा होऊ लागली.

श्रीस्वामीमहाराज येथे आल्या दिवसापासून त्यांचे कार्यक्रम पहिल्या दोन खेपेला जसे होते तसेच सुरू झाले. येथे अगदी पहाटे ते जिज्ञासू व अधिकारी लोकांना प्रस्थानत्रयी सांगत असत. त्यानन्तर सकाळी ते जिज्ञासूंना ब्रह्मकर्म व शास्त्राभ्यास सांगून योगाभ्यास शिकवीत असत. दुपारी संकटग्रस्त लोकांना संकट निवारणार्थ नानाविध उपाय सांगून संध्याकाळी सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना पुराण सांगत असत. या सर्व कार्यक्रमामुळे आपला दिवस केव्हा उजाडतो आणि केव्हा मावळतो हे सुद्धा तेथील लोकांना कळत नसे.

अशा प्रकारे श्रीक्षेत्र चिखलद्याला श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास सुरू झाला व नेहमीचे सर्व कार्यक्रम सुरू झाले; तरी त्या प्रान्तात त्यावेळी सर्वत्र महामारीची साथ सुरू असल्यामुळे लोकांना श्रीक्षेत्र चिखलद्याला येण्यास बंदी होती. त्यामुळे आपोआपच तेथे नेहमीप्रमाणे होणाऱ्या गर्दीला आळा बसला. मात्र त्यानंतर लवकरच श्रीक्षेत्र चिखलद्याला महामारीची साथ सुरू झाली. हे पाहताच श्रीस्वामीमहाराजांनी तेथील लोकांना देवीचे अनुष्ठान करण्यास सांगितले; परन्तु ही गोष्ट तेथील लोकांना न पटल्यामुळे त्यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. क्रमशः महामारीची साथ गावात हळूहळू वाढू लागली. त्यामुळे श्रीस्वामीमहाराज दंडकमंडलू घेऊन गावाच्या सीमेवर जाऊन बसले. हे पाहताच सर्व लोक त्यांच्या जवळ आले व ते त्यांना असे म्हणाले की, "प्रभो ! चातुर्मास चालू असताना आपण येथे येऊन का बसलात ? आपण आमच्यावर रागावलात का ?" हे ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्या सर्व लोकांना असे म्हणाले की, "आमचे कोणी ऐकत नाही: त्यामुळे गावात महामारीची साथ वाढतच चालली आहे. अशा स्थितीत तुम्हा सर्व लोकांची दुरवस्था

व संहार आम्हाला आमच्या डोळ्यांनी पाहवणार नाही. त्यामुळे आम्ही हा गाव सोडून निघून जातो." श्रीस्वामीमहाराजांचे हे कृतककोपाने दिलेले उत्तर ऐकताच सर्व लोकांना असे वाटले की, आपल्या सर्वांच्या कल्याणासाठी श्रीस्वामीमहाराज जी गोष्ट सांगत आहेत ती हिताची असूनही आपण कोणीच ऐकत नसल्यामुळे आपल्या चातुर्मासाच्या नियमांचाही भंग करून ते येथून निघून गेल्याशिवाय राहणार नाहीत, यात काहीच शंका नाही." या विचारांमुळे भयकंपित होऊन श्रीक्षेत्र चिखलद्याचे सर्व गावकरी लोक श्रीस्वामीमहाराजांना शरण गेले व त्यांना साष्टांग नमस्कार करून ते सर्वजण असे म्हणाले की, "प्रभो! आम्ही आपण सांगाल तसे करू व वागू; पण आपण आम्हाला सोडून जाऊ नका. आपण आमच्या हिताच्या सर्व गोष्टी सांगत असूनही आम्ही त्या ऐकल्या नाहीत हा आमच्या सर्व लोकांकडून आपला अक्षम्य अपराध झाला आहे. आपण त्याबद्दल आम्हा सर्व लोकांना उदार अन्तःकरणाने क्षमा करा. आपण सांगाल ते अनुष्ठान आम्ही सर्वजण करू. तरी आपण आमच्यावर कृपा करा व येथेच राहून आपला चातुर्मास यथाशास्त्र पूर्ण करा." अशा प्रकारे सर्व लोकांनी केलेली प्रार्थना ऐकताच श्रीस्वामीमहाराजांचे कोमल अन्तःकरण द्रवले व ते आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी परत आले.

श्रीस्वामीमहाराज श्रीमारुती मंदिरात परत आल्यावर सर्व लोकांना असे म्हणाले की, "महामारी ही रुद्ररूप परमेश्वराची संहारक शक्ती आहे. ही महामारी शक्ती येथे येऊन आम्हाला असे म्हणाली की, "मी ईश्वराच्या आज्ञेने येथे आले आहे. तरी मला बळी पाहिजे. मी उपाशी आहे." तिचे हे म्हणणे ऐकताच आम्ही तिला असे सांगितले की, "आम्ही येथे असेपर्यन्त आमच्याकडे

येणाऱ्या कोणत्याही भक्ताला तुझ्यापासून त्रास होता कामा नये व तू कोणालाही मारता कामा नये. आमच्या सर्व भक्तांचे रक्षण झालेच पाहिजे. यामुळे तुला येथून गेलेच पाहिजे. मात्र तू उपाशी असल्यामुळे तुझ्याकरिता सप्तशतीचे पाठ व हवन करून आम्ही तुला संतुष्ट करू." आम्ही त्या देवतेला असे सांगितल्यामुळे हे अनुष्ठान करणे आवश्यक आहे."

श्रीस्वामीमहाराजांनी अशा प्रकारे सर्व काही खुलासेवार सांगितल्यावर श्रीक्षेत्र चिखलद्याच्या सर्व लोकांनी तेथील ब्राह्मणांकडून श्रीसप्तशतीचे पाठ व हवन केले. हे अनुष्ठान केल्यामुळे कोणालाही महामारीचा उपद्रव झाला नाही, कोणीही मृत्यू पावले नाही व पुढे ही साथही आटोक्यात आली.

श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास श्रीक्षेत्र चिखलद्याला सुरू झाल्यावर त्या प्रांतात महामारीचा उपद्रव सुरू झाल्यामुळे सरकारने इतर लोकांना तिकडे जाण्यास बंदी केली होती. त्यामुळे आपोआपच लोकांची गर्दी कमी झाली व श्रीस्वामीमहाराजांना काही प्रमाणात विश्रांती मिळू लागली. हे सर्व जरी खरे असले; तरी अशाही परिस्थितीत लोक श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला येतच असत. श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला येणारे भक्त त्यांच्यापुढे जे पैसे ठेवीत असत त्या पैशांना श्रीस्वामीमहाराज कधीच स्पर्श करीत नसत. ते या सर्व पैशांना केरच मानीत असल्यामुळे त्या पैशांवर देवांचीच मालकी होती. त्यामुळे श्रीस्वामीमहाराजांपुढे येणारा पैसा हा "देवांचा खजिना" म्हणून जमा होत असे.

श्रीक्षेत्र चिखलद्याला चातुर्मास सुरू करण्यापूर्वी श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठी म्हणून त्या दिवशी तेथे येणाऱ्या सर्व मंडळींची सोय

व्हावी या दृष्टीने श्रीस्वामीमहाराजांनी श्रीनर्मदेच्या पुजाऱ्यांच्या जागेत श्रीदेवांच्या खजिन्यातील पैसा खर्च करून स्वयंपाककरिता एक नुसते छप्पर असलेले बांधकाम करून घेतले. ज्या दिवशी त्या छप्पराचे बांधकाम पूर्ण झाले त्या दिवशीच श्रीदेवांनी श्रीस्वामीमहाराजांना दृष्टान्त देऊन असे सांगितले की, "आपल्यापुढे येणारा सर्व पैसा हा आमचा असून तो आमच्याच खजिन्यात जमा होत असल्यामुळे आमच्या पैशातून बांधलेल्या छप्परात पुजाऱ्याने राहता कामा नये व त्याचा वापरही त्याने करता कामा नये. याकरिता ते छप्पर तू तत्काळ पाडून टाक." श्रीदेवांनी असे सांगताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "उद्या श्रीगुरुपौर्णिमेचा दिवस आहे. येथे येणाऱ्या सर्व लोकांची जेवण-खाण्याची सोय झाली की, संध्याकाळी ते छप्पर पाडून टाकीन." अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांनी जरी श्रीदेवांची समजूत घातली; तरी ती श्रीदेवांना न पटल्यामुळे त्या रात्रीच श्रीदेवांनी ते छप्पर पाडून टाकले.

ही सर्व कथा वाचली म्हणजे देवभक्तांच्या अपूर्व अशा अतरंग लीलेचे दर्शन होऊन त्यातून दृग्गोचर होणाऱ्या दोघांच्याही अलौकिक दृष्टीचे दर्शन होऊन आपण धन्य व कृतार्थ झालो आहोत याचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. श्रीस्वामीमहाराजांचे अंतःकरण अत्यंत विशाल, कोमल, उदार व करुणासंपन्न असल्यामुळे श्रीक्षेत्र चिखलद्याला येणाऱ्या भक्तांची सर्वतोपरी सोय व्हावी म्हणून त्यांच्या अंतःकरणाची तळमळ चालली होती. त्यामुळे श्रीदेवांच्या आज्ञेप्रमाणे तत्काळ छप्पर न पाडता ते आपण दुसऱ्या दिवशी पाडून टाकू असे श्रीदेवांना सांगण्यासही त्यांनी मागे-पुढे पाहिले नाही. मात्र श्रीदेवांची दृष्टी अगदी निराळी होती. त्यांना आपल्या भक्ताची ही मायात्मक स्थूल दृष्टी बिलकूल मान्य नव्हती.

आपल्या भक्ताने व त्याच्या भक्तांनी आपल्या जीवनात परार्थ दृष्टीच आत्मसात करावी हे " गृहेंचि पाहाता वेथें। गृहस्वामीस पाहाणें। देवाल्यें पुजीतां खोटें। आधीं देवासी पाहणें॥ पंचीकरण-योग २-२०॥ " या श्रीसर्थरामदासस्वामीमहाराजांनी "पंचीकरण-योग" या प्रकरण ग्रंथात सांगितलेल्या न्यायाने श्रीदेवांना स्पष्ट करावयाची असल्यामुळे त्यांनी श्रीस्वामीमहाराजांनी बांधलेले ते छप्परयुक्त बांधकाम पाडून टाकले. ही परार्थ दृष्टी किती अपूर्व आहे याचा प्रत्यय पुढील ओव्यांमधून आल्याशिवाय राहणार नाही. श्रीसमर्थ असे म्हणतात की–

संसार सांगणें किती। लोक सर्वत्र जाणती।
नेणती देव तो कैसा। सिणती बहुतांपरीं ॥१॥
सर्वही सांडणें मागें। आधीं देवासी धुंडणें।
धुंडितां धुंडितां देवो। सत्संगें सांपडे जनीं ॥२॥
देहपुरामध्ये आहे। पुरुष म्हणती तया।
देह तो पंचभूतांचा। नरनारीनपुंसकु ॥ ३ ॥
सर्वत्र चालवी देवो। अंतरीचा कळेचिना।
तयासी नेणतां प्राणी। पुढें तीर्थासी धांवती ॥४॥
लौकिक लागला मोठा। लौकिकें लोक वर्तती।
लौकिकें चालती कर्में। देखोवेखी परस्परें ॥५॥
स्नान संध्या टिळे माळा। श्रीमुद्रा गोपीचंदनें।
गवाळीं आसनें चंबु। सोंवळीं तें परोपरीं ॥६॥
नाना देवार्चनें ध्यानें। पूजनें मंत्र यंत्र ते।
अन्न गंधादिकें सर्वें। विध्युक्त सांग धारणा ॥७॥
नाना तपें पुरश्चर्णें। निग्रहें करिती किती।
दिरबंध आसनें मुद्रा। अष्टयोग देखणी ॥८॥

वेद पारायणें चर्चा । पुराणें माहात्म्यें किती ।
भुयेरीं विवरें गुंफा । देवाल्यें पुष्पवाटिका ॥९॥
होमयागादिकें लिंगें । पूजणें देवदेवता ।
कितेक आगमी क्रिया । वाम सव्य परोपरीं ॥१०॥
कर्माची निर्फळी विद्या । उपासनाची कामना ।
ज्ञानेंचि जाणणें सर्वं । कर्माकर्मविवंचना ॥११॥
तें ज्ञान कोणतें कैसें । अभ्यासें पाविजे जनीं ।
श्रवणभक्तीच्या योगें । मुक्ती सायोज्य पाविजे ॥१२॥
कर्म तो पीपिलिका मार्ग । ज्ञानमार्ग विहंगमु ।
तात्काळ पाविजें ज्ञानें । कर्माकर्में हळु हळु ॥१३॥
ज्ञानउपासनेमधें । भेद तो पाहतां नसे ।
मनेंची जाणिजे ज्ञान । मनरूप उपासना ॥१४॥
सत्यसंकल्प तो विष्णु । तेची ज्ञान उपासना ।
सर्वज्ञ बोलिजे देव । ज्ञान सर्वज्ञ होय कीं ॥१५॥
ज्ञानेंची चालती सृष्टी । ज्ञान हें देव बोलिजे ।
ज्ञानेंची पाविजे सर्वं । ज्ञानरूप हरी पाहा ॥१६॥
हरी तो अंतरीं नांदे । अंतःकर्णची जाणिजे ।
तो देव सकळां पाळी । आतां प्रत्यक्ष रोकडा ॥१७॥
हरिदाता हरीर्भोक्ता । हरिरन्नं प्रजापती ।
एकांशें चालवी सर्वं । त्रैलोक्य सचराचरी ॥१८॥
विवराना विचाराना । उगेंची सीणता कसे ।
देव सांडुनि देवाल्यें । बाह्याकारें पुजीतसा ॥१९॥
गृहेंचि पाहतां व्यर्थें । गृहस्वामीस पाहाणें ।
देवाल्यें पुजीतां खोटें । आधीं देवासी पाहाणें ॥२०॥

श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलद्याला चातुर्मास करीत आहेत. असे समजल्यावर त्यांचे परमभक्त श्री. धोंडोपंत कोपरकर यांना त्यांच्या दर्शनास जावे अशी उत्कट इच्छा झाली. वास्तविक पाहता राजूर येथील श्रीसंहितास्वाहाकारप्रसंगी ज्यावेळी श्री. धोंडोपंत यांना श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन झाले होते त्यावेळी त्यांनी त्यांना श्रीनर्मदातीरी येण्यासंबंधी प्रार्थना केली होती; परन्तु त्यावेळी श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले होते की, "श्रीदेवांनी श्रीगोदावरीतीराने प्रवास करण्याची आज्ञा केलेली असल्यामुळे यावेळी तिकडे येणे शक्य होणार नाही." श्रीस्वामीमहाराजांनी असे सांगितल्यामुळे श्री. धोंडोपंत त्यावेळी गप्प बसले व सिद्धपूरला परत गेले. परन्तु श्रीस्वामीमहाराज चिखलद्यास आल्याचे कळताच श्री. धोंडोपंतांना आता आपल्याला आपल्या हृदयसिंहासनाधिष्ठित श्रीगुरुदेवांच्या दर्शनाचा व सहवासाचा लाभ होणार या विचाराने परमानंद झाला. त्यामुळे श्री. धोंडोपंतानी श्रीस्वामीमहाजांना पत्र लिहून असे विचारले की, "श्रीगुरुचरणांचे खूप दिवसात दर्शन झाले नाही. ते व्हावे अशी खूप उत्कट इच्छा आहे. आपल्या चरण-दर्शनाचा व कृपादृष्टीचा लाभ व्हावा म्हणून श्रीक्षेत्र चिखलद्याला येण्याची अनुज्ञा असावी. बालकाचे मनोरथ श्रींनी पूर्ण करावेत हीच चरणी प्रार्थना आहे"

श्री धोंडोपंत कोपरकरांचे पत्र ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांना मिळाले त्यावेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे महामारीची साथ चालू होती. त्यामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या आपल्या भक्तमंडळींना येथे आल्यावर कसलाही त्रास होऊ नये व त्यांचे जीवित संकटात सापडू नये असे श्रीस्वामीमहाराजांना वाटत असल्यामुळे त्यांनी श्री. धोंडोपंतांच्या पत्राला उत्तर देताना असे लिहिले की, "मोर-

टक्क्याहून (आता हल्लीच्या ॐकारेश्वर रोड स्टेशन जवळील गाव) चिखलदा ८० मैल दूर आहे. प्रवासाची सोय नाही. श्रीनर्मदेतून उलट प्रवास करून येथे येण्यास दोनतीन दिवस तरी लागतील. मात्र योग्य वारा न मिळाल्यास होडीला येथे यावयास किती दिवस लागतील व किती त्रास होईल हे काही सांगता येत नाही. या सर्व अडचणींचा विचार करून यावेळी चिखलद्यास न येता पत्रद्वारे दर्शन घेऊन त्यात समाधान मानावे."

अशा प्रकारचे श्रीस्वामीमहाराजांचे चिखलद्याला न येण्या-संबंधीचे पत्र श्री. धोंडोपंत यांना मिळाले तरी श्रीगुरुचरणांच्या दर्शनाच्या उत्कट इच्छेने व अत्यधिक तळमळीमुळे श्री. धोंडोपंतांच्या मनात असे विचार आले की, "या प्रवासात येणाऱ्या अडचणींचा व त्रासाचा विचार केला; तर आपण श्रीगुरुचरणांच्या अलभ्य दर्शनाला मुकल्याशिवाय राहणार नाही. प्रवासातील कष्ट सहन केल्याशिवाय श्रीगुरुचरणांचे दर्शन थोडेच होणार आहे? आणि श्रीस्वामीमहाराजांनी आपल्यावरील प्रेमामुळे व आपल्याला कष्ट होऊ नयेत म्हणूनच तिकडे येऊ नये असे लिहिले असणार. त्यामुळे तितक्याच प्रेमाने आपण श्रीक्षेत्र चिखद्याला जाऊन त्यांच्या चरणकमलांचे दर्शन घेतले तर आपणास गुर्वाज्ञाभंगाचे पातक निश्चितच लागणार नाही. श्रीस्वामीमहाराज आपले आई-वडील, हितकर्ते, कृपादाते, साक्षात् ज्ञानदाते श्रीसद्गुरू व सर्व काही आहेत आपण श्रीनर्मदेतून प्रवासास निघालो आणि जरी संकटात सापडलो. तरी शेवटी तेच आपणास साहाय्य करणारे आहेत ! आपल्या-सारख्या शरणागताचे रक्षण करण्यास श्रीस्वामीमहाराज समर्थ आहेत, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. आपण अंतःकरणात श्रीस्वामी-महाराजांचे चरणकमल धारण करून बाह्यतः मुखाने त्यांचा

जयजयकार करीत गेलो म्हणजे हा प्रवासच काय; पण आपला सबंध जीवन-प्रवासाच सुखकारक झाल्याशिवाय राहणार नाही यात काहीच शंका नाही."

अशा प्रकारे सर्व विचार करून श्री. धोंडोपंत कोपरकर सहकुटुंब श्रीक्षेत्र चिखद्याला जावयास निघाले. त्यांच्या बरोबर श्री. दिनकरराव जोशी वकील, श्री. शंकरराव अत्रे व श्री. जगन्नाथराव शर्मा इत्यादि अनेक मंडळी होती. ही सर्व मंडळी इंदूरला आली असताना त्यांना श्री. सखारामशास्त्री टिल्लू हे भेटले. तेही श्रीस्वामीमहाराजांचे एकांतिक व एकनिष्ठ भक्त होते. त्यांनाही श्रीस्वामीमहाराजांच्या चरणकमलदर्शनाची ओढ लागली होती. त्यामुळे त्यांना जेव्हा ही सर्व मंडळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी निघाल्याचे समजले त्यावेळी तेही या लोकांबरोबर श्रीगुरुचरणसवेसाठी निघाले.

ही सर्व मंडळी इंदूरहून आगगाडीने निघून मोरटक्का (हल्लीचे ॐकारेश्वर रोड) स्टेशनवर उतरली व तेथून नावेने निघून तिसऱ्या दिवशी श्रीक्षेत्र चिखलद्यास पोहोचली तेथील घाटावर उतरून ज्यावेळी ही सर्व मंडळी श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाकरिता जाण्यास निघाली त्यावेळी गावात महामारीची साथ असल्यामुळे तेथील सरकारी नोकरांनी त्यांना गावात जाण्यास मनाई केली. आता या स्थितीत काय करणार असा विचार जेव्हा त्या सर्वांच्या मनात आला त्यावेळी सरकारी अधिकाऱ्यांची समजूत घालून व दोघा माणसांपुरती परवानगी मिळवून सर्व मंडळींना घाटावरच सोडून देऊन श्री. धोंडोपंत कोपरकर व श्री. सखारामशास्त्री टिल्लू हे दोघेजण श्रीमारुती मंदिरात श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी गेले.

श्रीमारुतीच्या मंदिरात आल्यावर ज्यावेळी हे दोघेजण श्रीस्वामीमहाराजांना अत्यंत भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार घालून उभे राहिले त्यावेळी त्यांना पाहताच श्रीस्वामीमहाराजांनी अत्यंत रागाने त्या उभयतांना असे विचारले की, "पत्र मिळाले की नाही ?" हा प्रश्न ऐकताच श्री. धोंडोपंतांनी श्रीस्वामीमहाराजांना असे सांगितले की, "प्रभो ! आपल्या चरणकमलदर्शनाच्या प्रबळ इच्छेमुळे आमचे मन इतके उतावीळ झाले की, आपल्या आज्ञेचा भंग करून आम्ही सर्वजण येथे आलो. अशा प्रकारे आम्ही सर्वांनी आपल्या शब्दांचा अवमान केला असला तरी आपण आम्हा सर्व बालकांना क्षमा करावी." श्री. धोंडोपंतांनी अत्यंत करुणभावाने व नम्रतापूर्वक असे सांगितल्यावर श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "आता दर्शन झाले ना ? मग येथे थांबू नका. परत जा." श्रीस्वामीमहाराजांचे हे रागाचे बोलणे ऐकताच श्री सखाराम-शास्त्र्यांनी श्रीस्वामीमहाराजांना पुन्हा एकदा साष्टांग नमस्कार केला व उभे राहून ते त्यांना असे म्हणाले की, "प्रभो ! आम्ही सर्वजण गेले चार दिवस सतत श्रीनर्मदा नदीतून प्रवास करीत असल्यामुळे आम्हाला कोणालाही भोजन मिळालेले नाही. त्यामुळे सर्वच माणसे अत्यंत भुकेलेली आहेत. तशातच जर आपल्या आज्ञेप्रमाणे आम्ही सर्वजण तत्काळ परत निघालो तर आज प्रदोष असल्यामुळे पुन्हा परत तो रस्त्यात कोठे सोडावा हा मोठाच प्रश्न आहे." श्री. सखारामशास्त्र्यांनी असे सांगितल्यावर श्रीस्वामी-महाराज त्यांना असे म्हणाले की, "ठीक आहे ! काही हरकत नाही. आज सर्व मंडळींनी प्रदोष येथेच सोडा व मग विश्रांती घेऊन निघा."

श्रीस्वामीमहाराजांनी अशी आज्ञा दिल्यामुळे श्री. धोंडोपंतांना

व श्री. सखारामशास्त्र्यांना अत्यंत आनंद झाला. ते तेथून परत घाटावर आले व सर्व मंडळींना घेऊन परत आले. श्रीमारुती मंदिराच्या जवळ असलेल्या श्रीशंकराच्या मंदिराच्या ओवऱ्यात त्या सर्वांनी बिऱ्हाड केले व स्वयंपाकाची तयारी करून ते सर्वजण स्नान करण्यासाठी नदीवर गेले. श्रीनर्मदानदीत स्नान करून सर्व मंडळी ज्यावेळी मुक्कामी परत आली त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्या सर्वांना सामानासह आपल्या निवासस्थानी बोलावून घेतले व श्री. धोंडोपंतांच्या पत्नीला फक्त भात-पिठले करावयास सांगितले; कारण श्री. धोंडोपंत दुसऱ्याच्या हातचे खात नाहीत ही गोष्ट श्रीस्वामीमहाराजांना माहीत होती. पुढे जेवण तयार होईतोपर्यन्त श्री. धोंडोपंत, श्री. सखारामशास्त्री वगैरे सर्व मंडळींनी आपले आन्हिक उरकल्यावर नैवेद्य–वैश्वदेव वगैरे करून श्री. धोंडोपंतांनी सर्व मंडळींसह प्रदोष सोडला.

श्री. धोंडोपंत ज्यावेळी सिद्धपुराहून श्रीस्वामीमहाराजांच्या चरणकमलदर्शनार्थ निघाले होते त्यावेळी श्री. परशुरामभट इंजिनियर यांनी श्रीक्षेत्र चिखलद्याला ब्राह्मण समाराधना करण्यासाठी श्री. धोंडोपंत कोपरकर यांच्याकडे काही पैसे दिले होते. ते पैसे दुसऱ्या दिवशी श्री. धोंडोपंतांनी श्रीस्वामीमहाराजांपुढे ठेवले व बेसनाच्या लाडवांचा बेत करून समाराधना करावी ही श्री. परशुरामभट यांची इच्छा श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी निवेदन केली. श्रीस्वामीमहाराजांनी ही गोष्ट मोठ्या आनंदाने मान्य केली. त्यानन्तर श्रीस्वामीमहाराजांचा कृतककोप एकदम निघून गेल्यामुळे श्री. धोंडोपंत, श्री. सखारामशास्त्री व त्यांच्या बरोबर आलेली सर्व मंडळी त्यांच्या सत्संगतीत काही दिवस राहून भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला परत गेली.

श्रीस्वामीमहाराजांवर त्यांच्या भक्तांची असलेली ही श्रद्धा-भक्ती पाहिली व आपल्या भक्तांच्या कल्याणार्थ कृतककोप धारण करणारे श्रीस्वामीमहाराज पाहिले की, आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. श्री. धोंडोपंत, श्री. सखारामशास्त्री इत्यादि सर्व भक्तांच्या दृष्टीने श्रीस्वामीमहाराज साक्षात् श्रीदत्तात्रेयच असल्या-मुळे देवभक्तांची अन्योन्य प्रीती मोठी अपूर्व होती यात काहीच शंका नाही. "भक्तांचें न्यून सोसीना । न्यून तें पुरतें करी । भक्तांचा भारवाही तो । ब्रीद्रेंचि चालिली असे ।।" असेच श्रीसमर्थ रामदास-स्वामीमहाराजांनी वर्णिल्याप्रमाणे श्रीस्वामीमहाराजांचे कीर्तिब्रीद होते. श्रीसमर्थांच्या शब्दातच जर आपण या अन्योन्य प्रीतीचे दर्शन घेतले तर आपणास या देवभक्तांच्या प्रीतीमध्ये अंशतः समाविष्ट झाल्याचे समाधान मिळाल्याशिवाय राहणार नाही. श्लोकबद्ध विविध प्रकरणे यातील "देवभक्तांची अन्योन्यप्रीति" या प्रकरणात श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराज असे म्हणतात की–

।। देवाभक्तांची अन्योन्यप्रीति ।।

भक्तांचा देव लोभाळू । भक्तांचे मनीचें करी ।
हारद्र जीवीचें जाणे । राजा त्रैलोक्यनाथ कीं ।। १ ।।

भक्तांसी त्याविणें नाहीं । त्यासही भक्त दुल्लभु ।
विदेशी येक ते दोघे । वेगळे नव्हती कदा ।। २ ।।

सांपडे भक्त जो जैसा । तैसा तो होतसे तया ।
सर्वही आपणापासीं । मनासी पुसणे बरें ।। ३ ।।

देव तो दयाळु मीठा । अन्याय क्षमणे बहु ।
भक्तांचा स्वाभिमानी तो । बुद्धिदाता परोपरी ।। ४ ।।

कोण रे चालवी ऐसें । न्यून तें पुरतें करी ।
उभाचि पाठिसी देवो । जेव्हां तेव्हां क्षणाक्षणा ।। ५ ।।
साहेब जाहाला मोठा । कोण वेळेसी पावतो ।
धणी ते लालची मोठे । चोरटे सेवक जनीं ।। ६ ।।
विश्वास येकमेकाचा । कदापी न घडे जनीं ।
जपती येकमेकांला । परस्परेंची घातकी ।। ७ ।।
मारिती वीष देताती । स्वामी सेवक ते पाहा ।
आडोन चालते सृष्टी । विपट पडिलें सदा ।। ८ ।।
देवासी तुळणा कैंची । पाहो जातां भूमंडळीं ।
भक्त होईल देवाचा । संसार सर्व सांडुनी ।। ९ ।।
त्यास वोढेल हे सृष्टी । यदर्थीं संशयो नसे ।
प्रत्यय वाक्य नेमाचें । कीतेक जाणते जनीं ।। १० ।।
भक्तांला काय उणें रें । देव त्रैलोक्य वर्तवी ।
तो देव आपुला जाला । वैभवा कोण पूसतें ।। ११ ।।
टाकितां लावितो मागें । देव दाताचि जाहला ।
घ्यावें तें कोण तें कीती । त्रैलोक्य भरलें असें ।। १२ ।।
आपण सर्व देवाचा । देवाचें आपणाकडे ।
किती घ्यावें किती न्यावें । भोगावे कोण तें किती ।। १३ ।।
दाता अनंत भुजांचा । भडसा पुरवीतसे ।
पुरे पुरे पुरे आतां । देव देता विटेचिना ।। १४ ।।
भक्त तो घेईना कांहीं । देवें त्रैलोक्य दीधलें ।
सर्वंही सांडिलें दोघीं । येकमेकासि लाविती ।। १५ ।।
ऐसी हे प्रीती दोघांची.। चढती वाढती सदा ।
दोघेही तापसी योगी । वियोगी नव्हती कधीं ।। १६ ।।

भक्तानें अंतरीं देवो । जाणोनी धरिला बळें ।
देवही विसंबेना कीं । सोडीना भक्तवत्सल ।। १७ ।।
भक्तांचें न्यून सोसीना । न्यून तें पुरतें करी ।
भक्तांचा भारवाही तो । ब्रोदेंचि चालिली असे ।। १८ ।।
अभावें भर्वसा नाहीं । मूढाला निश्चयो नसे ।
दया हे थोर देवाची । भक्ताला वज्रपंजरु ।। १९ ।।
रामदास म्हणे माझा । राम स्वामी दयानिधी ।
सोडिले बंद देवाचे । तो हा त्रैलोक्यनायकु ।। २० ।।

श्रीक्षेत्र चिखलद्याला चातुर्मास चालू असताना एके दिवशी एक गृहस्थ श्रीस्वामीमहाराजांकडे आले व त्यांनी त्यांना साष्टांग नमस्कार करून अत्यंत नम्रतापूवक असे विचारले की, " महाराज ! माझ्या सारख्या सामान्य जडजीवांनी आपल्या ठिकाणी ईश्वरभक्ती निर्माण होण्यासाठी कोणता उपाय करावा ? आम्हाला आमच्या अंतःकरणात ईश्वराबद्दल खूप प्रेम निर्माण व्हावे, त्याच्यासाठी आपल्याही डोळ्यातून सतत अश्रू पाझरावेत व आपले हृदय अगदी कोमल बनावे असे वाटते; परन्तु आमचे मन अगदी दगडासारखे जड असल्यामुळे त्याला भक्तीचा पाझरच फुटत नाही. तरी आपण कृपा करून असा एखादा उपाय किंवा मार्ग सांगावा की, ज्यामुळे आम्हाला भक्तीचे सुख अनुभविण्यास मिळेल. "

त्या गृहस्थांचा हा प्रश्न ऐकताच त्याला उत्तर देताना श्रीस्वामीमहाराज असे म्हणाले की, "श्रीज्ञानेश्वरी, श्रीदासबोध, श्रीएकनाथी भागवत, श्रीतुकाराममहाराजांचा अभंगगाथा, भक्तिविजय या ग्रंथांपैकी आपणास आवडेल तो ग्रंथ निवडून त्याचे नित्यशः क्रमाक्रमाने वाचन केल्यास मनःशुद्धी व चित्तशुद्धी होऊन ईश्वरभक्ती उत्पन्न होईल. हे सर्व ग्रंथ ईश्वराचे विग्रहच आहेत हे लक्षात घेऊन

आपण निवडलेल्या ग्रंथांचे नियमितपणे, उत्तमरीतीने व श्रद्धाभक्तिपूर्वक दीर्घकाल अखंड वाचन करीत गेले तर त्या ग्रंथांचा प्रसाद साधकावर होऊन त्याच्या ठिकाणी ईश्वरभक्ती व प्रेम उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. तरी अशा प्रकारे परिपाठ ठेवून त्याचा अनुभव अवश्य घ्यावा."

श्रीस्वामीमहाराजांनी त्या गृहस्थांना इतके सांगितल्यानन्तर उपरोक्त प्रकारे ग्रंथवाचनाच्या कर्ममार्गाची व तद्द्वारा प्राप्त होणाऱ्या भक्तीची अर्थात् अन्तःकरण शुद्धीची व तदंगभूत ज्ञान प्रकटीकरणाची महती सांगताना तेलंगणातील एका विद्यार्थ्याची गोष्ट सांगताना ते असे म्हणाले की, "आम्ही तेलंगणात संचारार्थ गेलो असताना एके दिवशी एक विद्यार्थी दर्शनास आला. त्या विद्यार्थ्याला आमच्याकडे येण्याचे कारण विचारले असता तो आम्हाला असे म्हणाला की, "मला परीक्षेत उत्तम यश मिळावे म्हणून मी आपल्या दर्शनाला आलो. आत्तापर्यन्त मी संस्कृत भाषेच्या प्रथमा व मध्यमा अशा दोन परीक्षा दिल्या असून पुढील परीक्षेसाठी श्रीमद्भगवद्गीतेवरील श्रीमध्वाचार्य व श्रीरामानुजाचार्य यांची भाष्ये वाचली आहेत व श्रीशंकराचार्यांचे भाष्य मी वाचत आहे." त्या विद्यार्थ्याने असे सांगताच आम्ही त्याला असे विचारले की, "या तिघांनी श्रीमद्भगवद्गीतेवर भाष्य लिहून अनुक्रमे करून द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत अशी जी तीन मते प्रस्थापित केली आहेत त्यातील कोणते मत तुला पटते ते सांग." त्या विद्यार्थ्याला असे विचारले असता त्याला त्या प्रश्नाचे काही उत्तर देता आले नाही.'

श्रीस्वामीमहाराजांनी इतकी कथा सांगितल्यावर ते पुढे असे म्हणाले की, "त्या विद्यार्थ्याचे हे मौन पाहिल्यावर आम्ही त्याल पुढील गोष्ट सांगितली. 'एका गुरूकडे दोघे शिष्य अध्ययन करीत

होते. अशा प्रकारे त्या शिष्यांचे अध्ययन काही दिवस झाल्यानन्तर एके दिवशी त्यांच्या गुरूंनी त्यांना "तत्त्वमसि" या महावाक्याचा अर्थ करावयास सांगितले. त्यावेळी त्यातील पहिल्या शिष्याने "तत् त्वं असि" म्हणजे "ते ब्रह्मच तू आहेस," असा महावाक्याचा अद्वैतपर अर्थ केला. ज्यावेळी दुसऱ्या शिष्याला या महावाक्याचा अर्थ विचारला त्यावेळी त्याने "तस्य त्वं असि" म्हणजे त्या देवाचा तू (भक्त) आहेस, असा द्वैतपर अर्थ केला. दुसऱ्या विद्यार्थ्याने केलेला अर्थ ऐकून गुरूला आश्चर्य वाटले. आपण आपल्या दोन्हीही विद्यार्थ्यांना एकाच अर्थाचा उपदेश करूनही दुसऱ्याचे अन्तःकरण शुद्ध झाले नसल्यामुळे महावाक्याचे हृद्गत त्याला कळले नाही हे गुरुजींनी ओळखले. शेवटी ते गुरुजी त्या शिष्याला असे म्हणाले की, "तुला इतके शिकविले व तू इतके ग्रंथ वाचलेस तरी तुझ्या मनातील द्वैत काही गेले नाही, हे खरोखर आश्चर्यच आहे. "तत्त्वमसि" महावाक्याचा तू द्वैतपर अर्थ लावलास. अरे! जोपर्यन्त अन्तःकरण शुद्ध होत नाही तोपर्यन्त आतून अद्वैत प्रस्फुटित होत नाही. त्यामुळे जोपर्यन्त आतून "मी ब्रह्मच आहे" हे वेदान्त ज्ञान प्रकट व प्रकाशित होत नाही तोपर्यन्त सर्व अध्ययन व्यर्थ व फुकट आहे. अन्तःकरणाची अशुद्धता कर्ममार्गाने घालविली म्हणजे खरे ज्ञान प्रकट होते.".

श्रीस्वामीमहाराजांनी ही जी गोष्ट कथन केली त्यातील अर्थान्तरात प्रवेश केल्याशिवाय त्या कथेचे रहस्य हाती लागणार नाही. कर्माच्या द्वारा म्हणजे श्रीसद्गुरूंनी दिलेल्या साधनेच्या द्वारा अन्तःकरण शुद्ध झाल्याशिवाय "अहं ब्रह्मास्मि," "तत्त्वमसि," "प्रज्ञानं ब्रह्म" व "अयं आत्मा ब्रह्म" या चारही महावाक्यांच्या अर्थाचा म्हणजेच वेदान्ताचा प्रकाश अन्तरंगात प्रस्फुटित होत

नाही, हेच यातील खरे रहस्य आहे. या रहस्याची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर श्रीसमर्थरामदासस्वामीमहाराजांनी ग्रंथराज दासबोधात म्हटल्याप्रमाणे "ज्ञानवन्ही प्रकटे। तेणें दृश्य केर आटे। तदाकारें मूळ तुटे। भिन्नत्वाचें ।। ५,६.५० ।।" या न्यायाने कर्माने म्हणजे साधनाने ज्ञानवन्ही प्रकट झाला पाहिजे अर्थात् ज्ञानाग्नीस्वरूप आत्मशक्ती कुंडलिनी श्रीसद्गुरूंनी केलेल्या शक्तिपाताने जागृत झाली पाहिजे. असे झाले म्हणजे द्वैतज्ञान दूर होऊन अद्वैतज्ञान प्रकट होते. ज्ञान म्हणजे काय व हा अद्वैत–वेदान्त–सिद्धान्त कसा सिद्ध होतो हे सांगताना श्रीसमर्थ असे म्हणतात की–

ऐका ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणास आपण । या नांव ज्ञान ।। ५.६.१ ।।
मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप ओळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ।। २ ।।
जेथें दृश्य प्रकृति सरे । पांचभौतिक हे वोसरे ।
समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ।। ३ ।।
मनोबुद्धि अगोचर । न चले तर्काचा विचार ।
उल्लेख परेहून पर । या नांव ज्ञान ।। ४ ।।
जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ।। ५ ।।
सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया ।
परी तें जाणिजे वाया । पदार्थज्ञान ।। ६ ।।
दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञांन ।। ७ ।।
जेथें सर्वचि नाहीं ठायींचें । तेथें सर्वसाक्षित्व कैंचें ।
म्हणोनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानेंचि नये ।। ८ ।।

ज्ञान म्हणजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।
म्हणोनि शुद्ध ज्ञान तें सतत । वेगळेंचि असे ॥ ९ ॥
ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण ।
या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ॥ १० ॥
महावाक्य उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला ।
तेथींचा तो विचार केला । पाहिजे साधकें ॥ ११ ॥
महावाक्य उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार ।
त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ॥ १२ ॥
महावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तूचि तत्त्वतां ।
त्याचा जप करितां । वृथां शिण होय ॥ १३ ॥
महावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ।
शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तूचि आहे ॥१४॥
आपला आपणासी लाभ । हें ज्ञान परम दुर्लभ ।
जें आदि अंतीं स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ॥१५॥
जेथूनि हें सर्वंहि प्रकटे । आणि सकळहि जेथें आटे ।
तें ज्ञान ज्ञालिया फिटे । भ्रांति बंधनाची ॥१६॥
मतें आणि मतांतरें । जेथें होती निर्विकारें ।
अति सूक्ष्म विचारें । पाहतां ऐक्य ॥१७॥
जें या चराचरांचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥१८॥
शोधितां आपण मूळस्थान । सहजचि उडे अज्ञान ।
या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायक ॥१९॥
आपणासि ओळखों जातां । अंगीं वागे सर्वज्ञता ।
तेणें एकदेशी वार्ता । निःशेष घडे ॥२०॥

मी कोण ऐसा हेत। धरूनि पाहतां देहातीत।
अवलोकितां नेमस्त। स्वरूपचि होय ॥२१॥

* * *

ऐक शिष्या येथींचें वर्म। स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म।
ये विषयीं संदेह भ्रम। धरूंच नको ॥४५॥
नवविध प्रकारें भजन। त्यांत मुख्य आत्मनिवेदन।
तें समग्र प्रकारें कथन। कीजेल आतां ॥४६॥
निर्माण पंचभूतें इयें। कल्पांतीं नासती यथान्वयें।
प्रकृति पुरुष जियें। तेहि ब्रह्म होती ॥४७॥
दृश्य पदार्थ आटता। आपणहि नुरे तत्त्वतां।
ऐक्यरूपें ऐक्यता। मुळींच आहे ॥४८॥
सृष्टीची नाहीं वार्ता। तेथें मुळीच ऐक्यता।
पिंड ब्रह्मांड पाहों जातां। दिसेल कोठें ॥४९॥
ज्ञानवह्नि प्रकटे। तेणें दृश्य केर आटे।
तदाकारें मूळ तुटे। भिन्नत्वाचें ॥५०॥
मिथ्यात्वें वृत्ति फिरे। तों दृश्य असतांच वोसरे।
सहजचि येणें प्रकारें। झालें आत्मनिवेदन ॥५१॥
असो सद्गुरूचें ठायीं अनन्यता। तरी तुज कायसी रे चिंता।
वेगळेपणें अभक्ता। उरोंचि नको ॥५२॥
आतां हेंचि दृढीकरण। व्हावया करी सद्गुरुभजन।
सद्गुरुभजनें समाधान। नेमस्त आहे ॥५३॥
या नांव शिष्या आत्मज्ञान। येणें पाविजे समाधान।
भवभयाचें बंधन। समूळ मिथ्या ॥५४॥

४

"देह मी" वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा।
देहाभिमानें येरझारा। भोगिल्याच भोगी ॥५५॥
असो चहूं देहांवेगळा। जन्मकर्मानिराळा।
सकळ आबाळगोंबळा। सबाह्य तूं ॥५६॥
कोणासीच नाहीं बंधन। भ्रांतिस्तव भुललें जन।
दृढ घेतला देहाभिमान। म्हणोनियां ॥५७॥
शिष्या एकांतीं बैसावें। स्वरूपीं विश्रांतीस जावें।
तेणें गुणें दृढ व्हावें। परमार्थी सदा ॥५८॥
अखंड घडे श्रवण मनन। तरीच पाविजे समाधान।
पूर्ण झालिया ब्रह्मज्ञान। वैराग्य भरे अंगीं ॥५९॥
शिष्या मुक्तपणें अनर्गळ। करिसी इंद्रियें बाष्कळ।
तेणें तुझी तळमळ। जाणार नाहीं ॥६०॥
विषयीं वैराग्य उपजलें। तयासीच पूर्ण ज्ञान झालें।
मणि टाकितांचि लाधलें। राज्य जेवीं ॥६१॥

श्रीक्षेत्र चिखलदा येथे चातुर्मास सुरू असताना एके दिवशी तसऱ्या प्रहरानन्तर आठ वर्षे वयाचा राजा रसाळ या नावाचा कोकणस्थ ब्राह्मणाचा एक मुलगा श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाकरिता आला. त्याने आपल्या घरातील बोराच्या झाडावरील सात बोरे एका वाटीत घालून ती वाटी श्रीस्वामीमहाराजांच्या प्रसादाकरिता म्हणून पुढे ठेवली. ती बोरे पाहताच श्रीस्वामीमहाराज त्या मुलाला असे म्हणाले की, "ही बोरे येथे जमलेल्या सर्व मुलांना वाटून दे." श्रीस्वामीमहाराजाची ही आज्ञा ऐकून त्या राजा नावाच्या मुलाला अत्यन्त संकोच वाटला; कारण ज्यावेळी त्याने सभोवार पाहिले, त्यावेळी त्याच्या असे लक्षात आले की, "येथे यावेळी पुष्कळ मुले जमलेली असून त्या सर्वांना इतकी कमी

बोरे पुरणार नाहीत." या विचारामुळे तो राजा नावाचा मुलगा ओशाळून जाऊन स्वस्थ बसला. श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे ती प्रसादाची वाटी उचलून त्यातील बोरांचा प्रसाद सर्व मुलांना वाटण्याचे त्याला धैर्यच झाले नाही.

अशा रीतीने काही क्षण शांततेत पार पडले असता तेथे जमलेल्या एका मुलाने आपल्याला बोराचा प्रसाद मिळावा या इच्छेने श्रीस्वामीमहाराजांपुढे आपला हात केला. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्याला त्या वाटीतील एक बोर दिले. हे पाहून दुसऱ्या मुलाने प्रसादासाठी म्हणून आपला हात श्रीस्वामीमहाराजांपुढे लांब केला. त्या मुलालाही श्रीस्वामीमहाराजांनी वाटीतील एक बोर प्रसाद म्हणून दिले. इतक्यात तिसऱ्या मुलाने प्रसादासाठी म्हणून आपला हात पुढे केला. ते पाहून श्रीस्वामीमहाराजांनी त्या वाटीतून तीन बोरे आपल्या डाव्या हातात घेतली व मूठ वळवून आपल्या उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी या दोन बोटांनी एक बोर मुठीतून काढून सर्वांना प्रसाद देण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे जोपर्यन्त प्रसाद देण्याचे काम चालू होते तोपर्यन्त श्रीस्वामीमहाराजांनी आपली मूठ जी घट्ट मिटून ठेवलेली होती ती तशीच कायम होती. याच रीतीने श्रीस्वामीमहाराजांनी दहा मुलांना प्रसाद दिला. प्रथम सर्व मुलांना तो प्रसाद वाटून झाल्यानन्तर श्रीस्वामीमहाराजांनी तेथे जमलेल्या वृद्ध, विद्वान्, शास्त्री, पुराणिक आणि सर्व मंडळींना तो बोराचा प्रसाद वाटला. त्यानन्तर तेथे जमलेल्या सर्व बायकांना व मुलींनाही त्यांनी तो बोराचा प्रसाद वाटला.

यावेळी पंधरा हात अंतरावर उभे राहून श्री. गंगाधरपंत वैद्य (ज्यांनी हा सर्व प्रसंग आपल्या वहीत लिहून ठेवला आहे) व

श्री. रामभाऊ बापट हा सर्व अद्‌भुत व अलौकिक चमत्कार अवलोकन करीत होते. ज्यावेळी तेथे जमलेल्या सर्व लोकांना बोराचा प्रसाद वाटून झाला त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांचे लक्ष या दोघांकडे गेले. त्यांनी त्यांच्याकडे मोठ्या कृपापूर्ण दृष्टीने नजर टाकून त्यांना प्रसाद घेण्यासाठी जवळ बोलाविले. श्रीगंगाधरपंत वैद्य व श्री. रामभाऊ बापट यांनी श्रीस्वामीमहाराजांजवळ जाऊन तो बोरांचा प्रसाद ग्रहण केला व त्यांना वंदन करून ते उभयता परत आपल्या जागेवर आल्यावर त्यांनी तो प्रसाद मोठ्या प्रेमाने सेवन केला. त्यावेळी त्या दोघांनाही त्या बोराची रुची मोठी अद्वितीय लागली.

त्यानन्तर सर्वांना बोराचा प्रसाद वाटून झाल्यावर श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या डाव्या हाताची मूठ उघडून त्यातील तीन बोरे परत वाटीत ठेवून दिली व ती वाटी त्यांनी राजा रसाळच्या हातात परत दिली. अशा रीतीने ज्यावेळी हा चमत्कार घडला त्यावेळी तेथे पन्नास लोकांच्यावर मंडळी उपस्थित होती. मात्र या सर्व लोकांना आपल्या समक्ष काहीतरी अद्‌भुत व अलौकिक चमत्कार घडत आहे याची काहीच जाणीव झाली नाही आणि कोणालाही श्रीस्वामीमहाराजांची ही अद्‌भुत लीला कळली नाही.

ही सर्व कथा वाचली म्हणजे "मम माया दुरत्यया ॥७.१४॥" या श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील श्रीभगवन्ताच्या वचनाचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही; कारण श्रीस्वामीमहाराजांनी हा जो स्थूल चमत्कार केला तो जर तेथे जमलेल्या लोकांच्या लक्षात आला नाही; तर मग भगवत्स्वरूप श्रीस्वामीमहाराजांची माया ओलांडून पलीकडे जाऊन त्यांच्या स्वरूपाशी एकरूप होणे किती कठीण आहे याची प्रचीती आल्याशिवाय राहात नाही. महापुरुषांच्या स्थूल स्वरूपाचा म्हणजे मायेचा भेद करून त्यांच्या पर म्हणजे श्रेष्ठ

अशा तात्त्विक रहस्यमय स्वरूपाप्रत जाणे किती अवघड आहे याची कल्पना मूळ श्रीमद्भगवद्गीतेचा श्लोक व त्याचा श्रीसंत-ज्ञानेश्वरमहाराज यांनी ज्ञानेश्वरीत प्रकट केलेला भावार्थ पाहिला म्हणजे आल्याशिवाय राहणार नाही; कारण " जयां सद्गुरुतारूं फुडे। जे अनुभवाचे कांसे गाढे। जयां आत्मनिवेदनतरांडे। आकळलें ॥ ७.९८॥ " या सिद्धांताप्रमाणे जोपर्यंत श्रीसद्गुरूंचा कृपाप्रसाद प्राप्त होऊन शक्तिसंचार होत नाही आणि प्राणोत्थान होऊन सुषुम्णेद्वारा सहस्राराकडे जाणारे सिद्धयोगाचे साधन मिळत नाही तोपर्यन्त खरे आत्मनिवेदन घडत नाही व अनुभवामृतही प्राप्त होत नाही. श्रीगुरुकृपेशिवाय व तदंगभूत साधनाशिवाय सर्व व्यर्थ आहे, हेच सिद्धान्तरूपाने येथे स्पष्ट होते. यामुळेच श्रीमद्भगवद्गीतेत श्रीभगवंतांनी असे म्हटले आहे की–

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥७.१४॥

योगिराज श्रीश्यामाचरण लाहिडी महाशय आपल्या आध्यात्मिक दीपिकेत " या श्लोकाचा रहस्यार्थ स्पष्ट करताना असे म्हणतात की, " दैवी अर्थात् कूटस्थ ब्रह्मात राहता राहता दैवी गुण प्राप्त होतात. माझी माया आत्म्यात आहे. जर साधकाने ब्रह्माशिवाय अन्य वस्तू आहे असे पाहिले तर तो ब्रह्माला पाहू शकत नाही; मात्र तो जर आत्म्यात राहिला तर ब्रह्माला पाहू शकतो. अर्थात् आत्म्यापासून दूर झाल्यास तो हे पाहू शकत नाही. जो कोणी साधक माझ्या आत्म्यात नेहमी राहतो तो माझ्या मायेतून उत्तीर्ण होतो अर्थात् साधनक्रिया करीत राहतो. प्राणांच्या चंचलतेमुळेच " मी आणि माझे " यांचा बोध होत राहतो. हीच माया आहे. मात्र सतत स्थिर राहणाऱ्या आत्मभावामध्ये " मी आणि

माझे " यांचा बोध होत नाही अर्थात् तेथे माया असत नाही. हाच दैवीभाव आहे व हेच कूटस्थ ब्रह्म आहे. अशा प्रकारे जर साधक (स्थूलापलीकडे) मन ठेवू शकला तर त्याला दैवी गुणाची प्राप्ती होते. मग त्याला पुन्हा मायेमुळे मोहित होण्याचे कारण पडत नाही. जर साधक आत्मभावापासून दूर राहिला तर तो मायेचे अतिक्रमण करू शकत नाही. जे साधक अखंड व नियमितरूपाने साधन क्रिया करीत राहून आत्म्यात राहतात त्यांच्या प्राणांची चंचलता राहात नाही. त्यामुळे अचंचल स्थिर ब्रह्मरूपाची प्राप्ती करून साधक अखंड नृत्य करणाऱ्या चंचल प्राणरूप मायेला ओलांडून पलीकडे जातात. प्राणांच्या चंचलतेमुळेच मनाची चंचलता असते. जर मन चंचल राहिले तर कोणीही आत्मस्वरूपाला जाणू शकत नाही; कारण आत्मा स्थिर आहे. त्यामुळे मन स्थिर झाल्याशिवाय कोणीही त्याला पकडू शकत नाही. ज्याप्रमाणे ज्या घरात अंधकार असतो त्या घरालाच तो झाकून टाकतो त्याप्रमाणेच त्या स्थिर प्राणांच्या अर्थात् आत्म्याच्या आश्रयाने जे चंचल प्राण राहतात ते चंचल प्राणच आत्म्याच्या कायमच्या स्थिर भावाला आच्छादित करतात. आत्म-क्रियेच्या अर्थात् साधनेच्या द्वारा या चंचल प्राणांना स्थिर केल्यावर ते स्थिर प्राणाबरोबरच एकरूप होतात. हे जे दुःखक्लेशमय चंचल प्राण आहेत त्यांच्या शक्तीमुळेच गतिमान होऊन मन एका विषया-पासून दुसऱ्या विषयापर्यंत धावत असते आणि नाना प्रकारचे दुःख व कष्ट भोगीत असते. तेच मन जर विचार करून आत्मक्रियेच्या द्वारा प्राणांना शरणागत झाले तर या साधनाचे फल म्हणून तेही तरून जाण्यास अत्यंत कठिण असलेली माया अर्थात् चांचल्य भाव ओलांडून पलीकडे जाते. मन लावून क्रिया अर्थात् साधन केले तर या सर्व गोष्टी लक्षात येतात. पुष्कळ लोक (साधक) असे

समजतात की, परमेश्वरावर सर्व भार टाकून आपण काहीच प्रयत्न करावयाचा नाही असा शरणागतीचा अर्थ आहे. परंतु हा शरणागतीचा भाव नाही. खरे तर ही चित्ताची मूढता आणि आळसामुळे होणारी चूक आहे. ज्यावेळी साधक विचारहीन होतो त्यावेळीच त्याच्या मनात असा भ्रम उत्पन्न होतो. श्रीमदाद्य शंकराचार्यांनी असे म्हटले आहे की, "सर्वधर्मान् परित्यज्य मामेव मायाविनं स्वात्मभूतं सर्वात्मना ये प्रपद्यन्ते ते मायामेतां सर्वभूतचित्तमोहिनीं तरन्त्यतिक्रामन्ति।" आवरण आणि विक्षेप या दोन शक्तींनाच अविद्या किंवा प्रकृती असे म्हणतात. हेच चंचल प्राण होत आणि "मायिनन्तु महेश्वरम्" अर्थात् स्थिर प्राणच आत्मा किंवा महेश्वर आहे. जे साधक दुसरीकडे कोठेही न पाहता केवळ गुरुवाक्यावर विश्वास ठेवून साधन करतात तेच या स्थिर प्राणरूपी श्रीमहेश्वराला जाणू शकतात. इतर कोठेही लक्ष न देता केवळ साधनाचा आश्रय घेणे यालाच शरणागती असे म्हणतात. अशा प्रकारे शरणागत झालेले साधकच या मायेचे अतिक्रमण करू शकतात अर्थात् त्यांचे चंचल प्राण स्थिरभाव धारण करू शकतात. अशा प्रकारे शरणागती आणि पौरुष–प्रयत्न या दोन्ही गोष्टी एकच आहेत. पुरुषाकाराशिवाय अर्थात् प्रयत्नाशिवाय प्रारब्धाचा क्षय होत नाही आणि संस्कारही संपुष्टात येत नाहीत. पुरुषाची शक्ती हेच तर खरे पौरुष आहे. पुरुष हाच एकमात्र आत्मा आहे. ज्यावेळी मनुष्य (साधक) साधन करतो त्यावेळी तो आपल्या आत्मशक्तीच्या द्वाराच साधन करीत असतो. हे चंचल प्राणच महामाया आहेत. तीच बलपूर्वक आकर्षण करून जीवाला मोहयुक्त करते. या दृष्टीनेच "श्रीदुर्गासप्तशती" या ग्रंथात असे म्हटले आहे की, "बलादाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति।" परन्तु जो साधक आपण अत्यंत दीन आहोत असे समजून

आर्त्तभावाने तिला शरणागत होतो त्याचे रक्षण करणे तिचा स्वभाव आहे, हे जाणून जीवाला निश्चित राहिले पाहिजे. इतर दुसरीकडे कोठेही लक्ष न देता व पाहता गुरुवाक्यावर विश्वास ठेवून अटळ श्रद्धायुक्त होऊन साधन करीत राहिले पाहिजे. यामळे जीवाची वारंवार होणाऱ्या जन्ममरणपरंपरेच्या क्लेशातून सुटका होते. प्राण चंचल होऊन मनाला शेकडोशे बंधनांमध्ये जखडून ठेवतात. ज्यावेळी साधकाच्या मनाचे हे बंधन सुटते त्यावेळी त्याच्या त्रितापांच्या सर्व ज्वाळा शांत होतात. साधन करून कूटस्थामध्ये राहिल्याने सर्व दैवी गुण साधकाचा आश्रय करतात. जो आपल्या आत्मस्वरूपात राहतो तो मायेचे स्वरूप पाहू शकतो आणि त्यामुळे तो पुन्हा मायेच्या स्वरूपाला भुलून जात नाही. जो साधन करीत नाही तो आत्मस्वरूपात राहात नाही. त्यामुळे तो मायेला पकडू शकत नाही. साधनाने स्थिर भाव प्राप्त झाल्यावर साधक मायेचे अतिक्रमण करू शकतो."

उपरोक्त श्रीमद्भगवद्गीतोक्त श्लोकातील भावार्थ प्रकट करताना श्रीसंतज्ञानेश्वरमहाराजांनी "ज्ञानेश्वरीत" असे म्हटले आहे की–

येथ एक नवलावो। जो जो कीजे तरणोपावो।
तो तो अपावो। होय तें ऐक ॥ ७.८२ ॥
एक स्वयंबुद्धीच्या बाहीं। रिगाले तयांची शुद्धीवि नाहीं।
एक जाणिवेचे डोहीं। गर्वेचि गिळिले ॥८३॥
एकीं वेदत्रयाचिया सांगडी। घेतल्या अहंभावाचिया धोंडी।
ते मदमीनाच्यां तोंडीं। सगळेचि गेले ॥८४॥
एकीं वयसेचें जाड बांधले। मग मन्मथाचिये कांसे लागले।
ते विषयमगरीं सांडिले। चघळूनियां ॥८५॥

आतां वार्धक्याच्या तरंगा–। माजीं मतिभ्रंशाचा जरंगा।
तेणें कवळिजताती पैं गा। चहूंकडे ॥८६॥
आणि शोकाचा कडा उपडत। क्रोधाच्या आवर्ती दाटत।
आपदागिधीं चुंबिजत। उधवला ठायीं ॥८७॥
मग दु:खाचेनि बरबटें बोंबलें। पाठीं मरणाचिये रेवे रेवले।
ऐसे कामाचे कांसे लागले। ते गेले वायां ॥८८॥
एकीं यजनक्रियेची पेटी। बांधोनि घातली पोटीं।
ते स्वर्गसुखाच्या कपाटीं। शिरकोनि ठेले ॥८९॥
एकीं मोक्षीं लागावयाचिया आशा।
केला कर्मबाह्यांचा भरंवसा।
परी ते पडिले वळसां। विधिनिषेधाच्या ॥९०॥
जेथ वैराग्याची नाव न रिगे। विवेकाचा तागा न लगे॥
वरि कांहीं तरों ये योगें। तरी विपाय तो ॥९१॥
ऐसें तरी जीवाचिये आंगवणें। इये मायानदीचें तरणें।
हें कासयासारिखें बोलणें। म्हणावें पां ॥९२॥
जरी अपथ्यशीळा व्याधी। आकळे साधूंसी दुर्जनाची बुद्धी।
कीं रागी सांडी रिद्धी। आली सांती ॥९३॥
जरी चोरां सभा दाटे। अथवा मीनां गळु घोटे।
ना तरी भेडा उलटे। पिंवसी जरी ॥९४॥
पाडस वागुर करांडी। कां मुंगी मेरु वोलांडी।
तरी मायेची पैलथडी। देखती जीव ॥९५॥
म्हणौनि गा पंडुसुता। जैसी सकामा न जिणवेचि वनिता।
तेवीं मायामय हे सरिता। न तरवे जीवां ॥९६॥

येथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले ।
तयां ऐलीच थडी सरलें । मायाजळ ॥९७॥
जयां सद्‌गुरुतारूं फुडें । जे अनुभवाचे कांसे गाढे ।
जयां आत्मनिवेदनतरांडें । आकळलें ॥९८॥
जे अहंभावाचें वोझें सांडुनी । विकल्पाचियां झुळका चुकाउनि ।
अनुरागाचा निरुता होउनी । पाणिढाळु ॥९९॥
जया ऐक्याचिया उतारा । बोधाचा जोडला तारा ।
मग निवृत्तीचिया पैल तीरा । झेंपावले जे ॥१००॥
ते उपरतीच्या वांवीं सेलत । सोहंभावाचेनि थावें पेलत ।
मग निघाले अनकळित । निवृत्तितटीं ॥१०१॥
येणें उपायें मज भजले । ते हे माझी माया तरले ।
परी ऐसे भक्त विपाइले । बहुवस नाहीं ॥१०२॥

याचा अर्थ असा आहे की, येथे एक मोठेंच नवल असे आहे की, या मायानदीतून तरून जाण्याला जे जे उपाय करावेत ते ते सर्व अपायच होतात. ।।८२।। कोणी कोणी स्वतःच्याच बुद्धिरूपी बाहुबळावर मायानदीमधून तरून जाण्यासाठी तिच्यात उडी टाकतात; परंतु ते कोणीकडे गेले त्याचा तर पत्ताच लागत नाही. काहीजण ज्ञानरूपी डोहात गर्वानेच पार बुडून जातात. ।।८३।। कित्येकजण वेदत्रयाच्या सांगडीचा तरून जाण्यासाठी आश्रय घेतात; परंतु त्या सांगडीवर मीपणाचे धोंडे बांधून घेऊन तरून जाण्यासाठी निघाल्यामुळे ते सर्वजण मदनरूपी माशाच्या तोंडात जातात. ।।८४।। काहीजण तारुण्याच्या बळाच्या जोरावर कामरूप मदनाच्या कासेला लागून त्याला जिंकण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना विषयरूप मगरचं चघळून टाकते. ।।८५।। त्यामुळे ते वार्धक्यरूपी लाटांमध्ये तरंगत जात असता मतिभ्रंशरूप आळ्यात सापडून

चहूंकडून जखडले जातात. ॥८६॥ या स्थितीत ते शोकरूप कड्यावर आपटले जातात आणि पुढे ते क्रोधरूपी भोवऱ्यात गुरफटले असता त्यातून कोठे डोके वर काढण्याचा प्रयत्न करतात न करतात तोच आपत्तिरूप गिधाडे त्यांना टोचटोचून खाऊ लागतात. ॥८७॥ मग ते दुःखरूप चिखलाने माखले जातात व मरणरूप गाळात रुतले जातात. अशाप्रकारे जे कामाच्या मागे लागतात ते सर्व फुकट जातात. ॥८८॥ काहीजण यज्ञादिक क्रियारूपी 'पेटी' बांधून ती आपल्या पोटाखाली घेतात. ते स्वर्गसुखरूपी कपारीत अडकून राहतात. ॥८९॥ कोणी मोक्षरूपी पैलतीराला लागावे या आशेने कर्मरूप बाहुबलावर विश्वास ठेवतात; परंतु ते विधिनिषेधाच्याच भोवऱ्यात सापडतात. ॥९०॥ जर मायानदीमध्ये वैराग्यरूप नाव प्रवेश करू शकली नाही आणि जर तेथे विचाराचा टिकावच लागत नाही तर उपरोक्त प्रकारच्या कोणत्याही साधनावलंबनाने ही मायानदी तरून जाता येणे क्वचितच शक्य होईल. ॥९१॥ याप्रमाणे जीवाच्या अंगवळाने या मायारूप नदीतून तरून जाता येते हे म्हणणे कशासारखे आहे म्हणून म्हणावे? ॥९२॥ जर पथ्य न करणाराचा रोग टळेल, साधूला दुर्जनाची बुद्धी कळेल, एखादा लोभी पुरुष ऐश्वर्य प्राप्त झाले असता त्याचा त्याग करील, ॥९३॥ जर चोरांच्या सभेला गर्दी होईल, माशाला गळ गिळता येईल, एखादा भित्रा पिशाच्चावर हल्ला करून त्याला परत फिरवील, ॥९४॥ हरणाचे पाडस जाळे कुरतडील आणि मुंगी मेरूपर्वत ओलांडील अर्थात् इतक्या गोष्टी घडून येणे शक्य होईल तरच जीवांना आपल्या स्वतःच्या बुद्धीने किंवा सामर्थ्याने ही मायानदी तरून पलीकडल्या तीरी जाता येईल. ॥९५॥ हे अर्जुना! ज्याप्रमाणे विषयासक्त पुरुषाला स्त्री अर्थात् स्त्रीची वासना जिंकवतच नाही

त्याप्रमाणे ही मायारूप नदी जीवाला तरवतच नाही. ॥९६॥ मग मायानदी तरून जाणे शक्यच नाही असे झाले, असे म्हणशील तर तसे नाही. त्यास एकच उपाय आहे. तो असा की, जे सर्व भावाने मला शरण येतील तेच फक्त या दुस्तर मायानदीतून सहज तरून जातील. इतकेच नव्हे; तर त्यास अलीकडच्या काठावरच मायारूप नदीचे जल पार नाहीसे होईल; कारण परमार्थदृष्टचा ते वस्तुतः नसतेच. ॥९७॥ ज्यांना मायानदी तरून जाण्यासाठी श्रीसद्गुरू हाच कोणी चांगला नावाडी मिळाला आहे, ज्यांनी ब्रह्मसाक्षात्काराच्या अनुभवाची कास बळकट धरली आहे, ज्यांना आत्मनिवेदनरूपी पराभक्तीचा तराफा हस्तगत झाला आहे, ॥९८॥ जे अहंभावाचे ओझे टाकून विकल्परूपी वाऱ्याच्या झुळुका चुकवून आणि संसारावरील प्रेमरूपी पाण्याची धार चुकवून ॥९९॥ जीव ब्रह्माचे ऐक्य हाच 'उतार' असलेल्या पाण्यात बोधरूपी ताऱ्याच्या आश्रयाने निवृत्तीच्या पलीकडील तीरावर झेप घालून सत्वर निघतात ॥१००॥ ते वैराग्यरूपी हातांनी पाणी तोडीत 'अहं ब्रह्म' या भावाच्या बळावर पोहत अनायासे मुक्तितटावर अचूकपणे बाहेर निघतात. ॥१०१॥ जे या एकाच उपायाने मला भजतात ते या मायारूप नदीतून तरून जातात; परंतु असे भक्त अगदी थोडे आहेत, फार नाहीत. ॥१०२॥

अशा रीतीने ज्यावेळी साधकावर श्रीगुरुकृपा होते त्यावेळी आत्मशक्ती जागृत होऊन तिचा सुषुम्नेत प्रवेश होतो व जगत्‌लीला, संसारलीला किंवा जीवलीला संपुष्टात येते. हे ज्यावेळी घडते त्यावेळीच श्रीस्वामीमहाराजांची माया ओलांडून त्यांच्या अनन्तरूपाशी एकरूप होता येते.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे ज्या काळात कॉलऱ्याच्या साथीने तीव्र जोर पकडला होता त्या काळात बहुतेक सर्व लोक औषध घेण्या-

साठी श्रीस्वामीमहाराजांकडे येत असत. त्या लोकांना औषध देता देता श्रीस्वामीमहाराजांचा हात दुखावयास लागत असे. असे असले तरी त्यांनी कधीही कोणाला औषध देण्यास नकार दिला नाही. त्यामुळे शेकडो लोक आजारातून मुक्त होऊन त्यांना जीवनदान मिळाले. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांनी आपला स्वतःचा देह झिजवून समाज पुरुषाला देव मानून त्याची जी सेवा केली ती पाहिली म्हणजे या एका गोष्टीत त्यांच्या विभुत्वाचे कितीतरी पैलू दडले आहेत याची प्रचीती येते. श्रीस्वामीमहाराजांच्या या पैलूंचे दर्शन सर्वार्थाने श्रीसंततुकाराममहाराज यांच्या पुढील अभंगातून प्रकर्षत्वाने होत असल्याने तद्द्वारा आपण जर त्यांच्या महानतेच्या अंतरंगात प्रवेश केला तर श्रीसमर्थ रामदासस्वामी-महाराजांनी म्हटल्याप्रमाणे "जीवात जीव घालून लोक कसे वोढावे ?" या प्रात्यक्षिकाची प्रचीती येईल. या दृष्टीने श्रीसंत-तुकाराममहाराज असे म्हणतात की–

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥१॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥२॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

★ ★ ★

नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥ १ ॥
येथें नाहीं वेश सतत आडनांव । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ २ ॥
नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा प्रावरणासी ॥ ३ ॥
नव्हती ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ४ ॥

नव्हती ते संत वेदाच्या पठणीं । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ५ ॥
नव्हती ते संत करितां तप तीर्थाटन । सेविलिया वन नव्हती संत ॥६॥
नव्हती ते संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ॥७॥
तुका म्हणे नाहीं निरसला देहें । तोंवरी आघवे सांसारिक ॥ ८ ॥

★ ★ ★

नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥ १ ॥
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥ २ ॥
तुका म्हणे मिळे जिवाचिये साठीं । नाहीं तरी गोष्टी सांगों नये ॥३॥

★ ★ ★

बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ॥ १ ॥
नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वाटे खरें ॥ २ ॥
विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तोचि एक सोसी ॥ ३ ॥
तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥ ४ ॥

श्रीसमर्थरामदासस्वामीमहाराजांनी श्रीस्वामीमहाराजांच्या कार्याचेच जणूकाही वर्णन करताना "जीवात जीव घालून लोकांना भक्तिमार्गाला कसे लावावे ?," हे सांगताना असे म्हटले आहे की–

॥ जीवांत जीव घालावा, लोक वोढावे कसे ? ॥

पाडवा आडवा आला । मन घाला अभ्यासितां ।
विवरणें अंतःकर्णें हो । सांगणें अर्थ येथिचा ॥ १ ॥
गाळावें ना घालावें ना । पल्लवीचें (पदरचें) कांहीं तरी ।
नेमस्त बोलिला कैचा । कळेसें सांगणें जना ॥ २ ॥
अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा ।
उदंड बोलणें लागे । यथातथ्य हळू हळू ॥ ३ ॥
तेव्हां ते समजती प्राणी । कोण्हा मानूं नये कदा ।
जीवांत जीव घालावा । चालावा भक्तिमार्ग हा ॥ ४ ॥

दुसऱ्यास कळेसें करणें । विवरणें जाणती मनीं ।
ते लाभ मानिती मोठा । गाटा (हट्टी) लोक गमावितो ॥५॥
सर्वंही पेरणें विद्या । लोकांमधें हळू हळू ।
नेणते जाणते करणे । कथानिरूपणें सदा ॥ ६ ॥
निश्चय बिंबवावे ते । प्रत्यय सद्य रोकडे ।
उकलुनी सांगणें सोपें । क्षणक्षणा पुन:पुन्हा ॥ ७॥
कंटाळा दूरि टाकावा । मनामधें त्रासों नये ।
सांगता सांगता हांसे । हांसे खेळे अर्हानिशी ॥ ८ ॥
झिंजी (गर्दी) हे सर्व लोकांची । चुकतां झीडकूं नये ।
मनापासून वोढावें । ज्यासी त्यासी क्षणक्षणा ॥ ९ ॥
लोक हे आभारें भारें । विचारें दाटले बहू ।
अखंड सर्वस्वें राजी । नवाजीतो मृदूत्तरें ॥१०॥
मैत्रिकी सर्वलोकांसीं । मनापासून जाहली ।
वेध हा लागला मोठा । लोक भाटचि जाहले ॥११॥
अंतरीं लागली माया । परस्परें सुटेचिना ।
मित्र ते जाहले भागी । विभागी परलोकींचे ॥१२॥
कंठेना येक येकाला । अंतरें मिळाली बरीं ।
साक्षेपी नेटके जाले । मानलें जगदंतरें ॥१३॥
कथानिरूपणें चर्चा । थोरथोरास मानली ।
कंठेना लोक येताती । कोठकोठून चालिले ॥१४॥
सर्वांसी राखणें राजी । सर्वकाळ मृदूत्तरें ।
येकचि जीव सर्वांचा । कद्रूबंद ढळेचिना ॥१५॥
सर्वांस सुख होताहे । ज्याचे त्याचे परी सदां ।
विचित्र साज सामे ते । किती म्हणोनि सांगणें ॥१६॥

सोईऱ्या धाईऱ्या लोकां । सर्वेचि लागली सदां ।
राजकी भोवते येती । तेहि त्यासीच मीळती ॥१७॥
धाकुटी थोरली मुलें । वृद्ध तारुण्य सारिखें ।
उदंड वृद्ध म्हाताऱ्या । मुलें घेऊन धांवती ॥१८॥
सर्वत्र वोढती तेथें । विचित्र न कळे कळा ।
स्थळ ते माजलें मोठें । माजलें वाद्यगायना ॥१९॥
भक्तीचा जिव्हाळा मोठा । खोटा मार्ग असेचिना ।
रामदास म्हणे माझा । राम त्रैलोक्यनायकु ॥२०॥

श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास भाद्रपद शुद्ध पौर्णिमेला संपल्यावर श्रीक्षेत्र चिखलदा येथील महामारीचा अर्थात् कॉलऱ्याचा उपद्रव कमी झाला व दर्शनासाठी येणाऱ्या लोकांची ये-जा वाढली. श्रीस्वामीमहाराजांसमोर पुष्कळ द्रव्य व प्रसादाच्या वस्तू जमा होत असत; परंतु त्यांपैकी ते कशालाही स्पर्श करीत नसत. आषाढ शुद्ध पौर्णिमेपर्यन्त श्रीस्वामीमहाराजांपुढे जे द्रव्य येत असे ते श्री. आप्पासाहेब देव हे उचलून त्याचा हिशेब ठेवीत असत; परन्तु त्यानन्तर मात्र श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेने हे काम श्री. गंगाधरपंत वैद्य करू लागले. ज्यावेळी श्री. गंगाधरपंत हे श्रीस्वामीमहाराजांजवळ असत त्यावेळी ते स्वतः सर्व पैसे उचलून घेत असत; मात्र ज्यावेळी ते जवळ नसत त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांजवळ असलेल्या मंडळींतून कोणीतरी ते पैसे गोळा करीत असे व ते श्री. गंगाधरपंत वैद्य यांच्याकडे आणून देत असे. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांपुढे जी रक्कम जमा होत असे त्या सर्व शिल्लक रकमेचा विनियोग त्यांची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणे ब्राह्मणभोजनासाठी किंवा कोणाला देणगी देण्यासाठी अगर इतरही महत्त्वाच्या कामासाठी केला जात असे. श्रीस्वामीमहाराज नाण्याला स्पर्श करीत नसत.

एवढेच नव्हे; तर भक्तमंडळींकडून त्यांना जे धनादेश (मनी ऑर्डरी) येत असत त्यावरही ते कधी सही करीत नसत. श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास सुरू झाल्यावर व त्यानन्तरही त्यांचा येथे मुक्काम असेपर्यंन्त रोज १०-१५ पत्रे नित्य येत असत. त्यांना आलेल्या सर्व पत्रांची उत्तरे ते मोठ्या कटाक्षाने स्वतःच लिहीत असत. असा कटाक्ष असला; तरी ज्यावेळी अत्यधिक पत्रे येत असत किंवा लोकांची दर्शनासाठी गर्दी होत असे त्यावेळी ते श्रीक्षेत्र नरसी येथील श्री. कृष्णाजी नरसीकर किंवा श्री. बापूजी नरसीकर यांच्या हातून पत्रांची उत्तरे लिहून घेत असत.

श्रीस्वामीमहाराज आपल्यापुढे किंवा श्रीदेवांपुढे आलेल्या द्रव्याला किंवा वस्तूला स्पर्श करीत नसले; तरी भक्तांनी अर्पण केलेल्या किंवा श्रीक्षेत्र चिखलद्याला आलेल्या भक्तांच्या सोयीकरिता किंवा भोजनाकरिता विकत आणलेल्या प्रत्येक वस्तूचा योग्य विनियोग व्हावा असा त्यांचा कटाक्ष असे. एकदा श्रीस्वामीमहाराजांना कोठीच्या दारात एक मिरची पडलेली दिसली. त्यांनी ती लगेच उचलली व कोठीवाल्याकडे देऊन त्याला असे सांगितले की, " ही श्रीदत्तमहाराजांच्या कोठीतील मिरची आहे. ती वाया जाणे चांगले नाही. व्यवहार व परमार्थ या दोन्ही ठिकाणी "क्षणशः कणशश्चैव विद्यां वित्तं च साधयेत् ॥" असे दक्षतेने वागले पाहिजे. या दृष्टीने एका मिरचीचाही संग्रह केला पाहिजे."

ही सर्व कथा वाचली म्हणजे श्रीस्वामीमहाराज प्रपंचाच्या बाबतीत किती साक्षेपी होते याचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. श्रीसमर्थरामदासस्वामीमहाराजांनी ग्रंथराज श्रीदासबोधात "प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण । प्रपंचीं जो अप्र-

माण। तो परमार्थीं खोटा ॥ " असे म्हणून जो महासिद्धान्त प्रस्थापित केला आहे तो सर्वांनी आत्मसात करून " भोगश्च मोक्षश्च करस्थ एव " अशी स्थिती प्राप्त केली पाहिजे असाच त्यांचा या रीतीने उपदेश करण्याचा हेतू होता हे स्पष्ट आहे. श्रीस्वामीमहाराजांची ही दृष्टी किती व्यापक, किती सखोल व किती गंभीर आहे याची प्रचीती श्रीसमर्थांच्या ग्रंथराज दासबोधातील " विवेक वैराग्यदशक बारावा " यातील पहिल्याच " विमललक्षणनिरूपण " या समासावरून आल्याशिवाय राहात नाही. ते असे म्हणतात की—

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका ॥
येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १२.१.१ ॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ॥
प्रपंचपरमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खावयाला ।
मग तया करंटयाला । परमार्थ कैंचा ॥ ३ ॥
परमार्थ सांडूनि प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी ।
अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ४ ॥
साहेब कामास नाहीं गेला । गृहींच सुरवडोन बैसला ।
तरी साहेब कुटिल तयालां । पाहती लोक ॥ ५ ॥
तेव्हां महत्त्वचि गेलें । दुर्जनाचें हांसें झालें ।
दुःख उदंड भोगिलें । आपुल्या जीवें ॥ ६ ॥
तैसेंचि होणार अंतीं । म्हणोनि भजावें भगवंतीं ।
परमार्थाची प्रचीती । रोकडी घ्यावी ॥ ७ ॥
संसारीं असतां मुक्त । तोचि जाणावा संयुक्त ।
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ॥ ८ ॥

प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण।
प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थीं खोटा ॥ ९ ॥
म्हणोन सावधानपणें। प्रपंच परमार्थ चालवणें।
ऐसें न करितां भोगणें। नाना दुःखें ॥१०॥
पर्णाळी पाहोन उचले। जीवसृष्टि विवेकें चाले।
आणि पुरुष होऊन भ्रमले। यासि काय म्हणावें ॥११॥
म्हणोन असावी दीर्घसूचना। अखंड करावी चालना।
पुढील होणार अनुमाना। आणून सोडावें ॥१२॥
सुखी असतो खबरदार। दुःखी होतो बेखबर।
ऐसा हा लौकिक विचार। दिसतचि आहे ॥१३॥
म्हणोन सर्वसावधान। धन्य तयाचें महिमान।
जनीं राखे समाधान। तोचि एक ॥१४॥
चाळणेचा आळस केला। तरी अवचितां पडेल घाला।
ते वेळे सांवरायाला। अवकाश कैंचा ॥१५॥
म्हणोन दीर्घसूचनेचे लोक। त्यांचा पाहावा विवेक।
लोकांकरितां लोक। शाहणे होती ॥१६॥
परी ते शाहणे वोळखावे। गुणवंताचे गुण घ्यावे।
अवगुण देखोन सांडावे। जनांमध्यें ॥१७॥
मनुष्य पारखूं राहेना। आणि कोणाचें मन तोडीना।
मनुष्यमात्र अनुमाना। आणून पाहे ॥ १८ ॥
दिसे सकळांसि सारिखा। पाहता विवेकी नेटका।
कामी निकामी लोकां। बरें पाहें ॥ १९ ॥
जाणोन पाहिजेत सर्व। हेंचि तयाचें अपूर्व।
ज्यांचें त्यापरी गौरव। राखों जाणे ॥ २० ॥

श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांचे प्रपंच-परमार्थाच्या विवेकाचे हे सार जर आपल्या हाती आले तर श्रीस्वामीमहाराजांचे अंतरंग आपल्याला उलगडेल व आपण कोणाच्या संगतीत आहोत याची प्रचीती येईल. अशी प्रचीती आली की, "संसारास आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक । इहलोक आणि परलोक । दोन्ही साधिले ॥ दासबोध १७.१.२१॥ हे घडल्याशिवाय राहणार नाही. श्रीस्वामीमहाराजांच्या चरित्ररूपी सत्संगाचा हाच अपूर्व व लोकोत्तर महिमा आहे. त्याचे वर्णन करताना ग्रंथराज श्रीदासबोधात श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराज असे म्हणतात की–

संसारास आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक ।
इहलोक आणि परलोक । दोन्ही साधिले ॥ १७.१.२१ ॥
मननशीळ लोकांपाशीं । अखंड देव अहर्निशीं ।
पाहतां त्याच्या पूर्वसंचितासी । जोडा नाहीं ॥ २२ ॥
अखंड योग म्हणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी ।
वियोगी तोही योगी । योगबळें ॥ २३ ॥
भल्याचि महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी ।
पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदी ॥ २४ ॥
स्थूळसूक्ष्मतत्त्वझाडा । पिंड ब्रह्मांडाचा निवाडा ।
प्रचीत आहे ऐसा थोडा । भूमंडळीं ॥ २५ ॥
वेदांतींचें पंचीकरण । अखंड तयाचें विवरण ।
महावाक्यें अंतःकरण । रहस्य पाहे ॥ २६ ॥
ये पृथ्वीमध्यें विवेक असती । धन्य तयांची संगति ।
श्रवणमात्रें पावती गति । प्राणिमात्र ॥२७॥
सत्संग आणि सच्छास्त्रश्रवण । अखंड होतसे विवरण ॥

नाना सत्संग आणि उत्तम गुण । परोपकाराचे ॥ २८ ॥
जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ २९ ॥
विशेष सारासार विचार । तेणे होय जगदुद्धार ।
संगत्यागें निरंतर । होऊन गेले ॥ ३० ॥

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास चालू असताना व त्यानन्तर त्यांचा ५–६ महिने तेथे जो मुक्काम झाला त्या काळात रोज सकाळी श्रीमद्भगवद्गीता, ब्रह्मसूत्र व उपनिषदे या प्रस्थानत्रयीवर श्रीमद् आद्य शंकराचार्य यांनी लिहिलेल्या भाष्याचा पाठ सांगण्याचा कार्यक्रम श्रीस्वामीमहाराजांच्या निवासस्थानाच्या अंतरंग भागात दरवाजे लावून चालत असे. हे प्रस्थानत्रयीवरील भाष्य व त्याचे श्रीस्वामीमहाराजांनी केलेले विवरण ऐकावयास येणारी निष्ठावन्त ब्राह्मण मंडळी स्नानसंध्या करून सोवळ्यामध्ये बसत असत. यावेळी इतर लोकांना आत प्रवेश करण्यास बंदी असे. अशा प्रकारे प्रतिदिनी हा कार्यश्रम चालला असताना एके दिवशी नेमके या भाष्य पाठाच्याच वेळी बढवाणी संस्थानचे राजे श्रीठाकूरसाहेब हे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला आले. राजे श्रीठाकूरसाहेब हे श्रीस्वामीमहाराजांचे एकांतिक भक्त असल्यामुळे ते श्रीस्वामीमहाराजांच्या या मुक्कामात रोजच अन्य वेळी दर्शनाला येत असत; परन्तु त्या दिवशी ब्रिटिश सरकारचे राजदूत (पॉलिटिकल एजंट) बढवाई संस्थानला भेट देण्यासाठी दुपारी दोन वाजता राजवाड्यावर येणार असल्यामळे श्रीराजेसाहेबांना श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेऊन तत्पूर्वी राज-

वाड्यावर लवकर परत जाऊन त्यांच्या स्वागताची तयारी करावयाची असल्यामुळे ते नेमके भाष्यपाठाच्या वेळीच दर्शनाला आले. त्या दिवसांमध्ये राजदूत (पॉलिटिकल एजंट) म्हणजे फार मोठे प्रस्थ होते. त्यांच्या भ्रुकुटीभंगावरच हिंदुस्थानातील संस्थानचे भवितव्य नाचत असे. यामुळे हा राहू आपल्या संस्थानात येण्यापूर्वी आपल्या श्रीगुरुदेवांचे दर्शन घेऊन व त्यांच्या आशीर्वादाचे भक्कम कवच अंगावर चढवून त्याला सामोरे जावे या विचाराने राजे श्रीठाकूरसाहेब आपल्या श्रीराणीसाहेबांना बरोबर घेऊन श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला आले होते.

श्रीराजेसाहेब व श्रीराणीसाहेब श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला आल्याचे त्यांच्या नोकराने कळविताच श्रीस्वामीमहाराज भाष्यपाठ सांगत असले तरी तेथील कोणीतरी सेवकाने आत जाऊन त्यांना असे सांगितले की, " श्रीराजेसाहेब व श्रीराणीसाहेब आपल्या दर्शनासाठी येऊ इच्छितात तरी त्यांना आत सोडू का? " हा निरोप ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्या सेवकाला असे म्हणाले की, " आता भाष्यपाठ चालू आहे, आता यावेळी दर्शन होणार नाही, असा त्यांना निरोप द्या."

श्रीस्वामीमहाराजांच्या सेवकानें हा निरोप श्रीराजेसाहेबांना सांगितला. तो ऐकताच श्रीराजेसाहेब एक क्षणभर स्तंभितच झाले. वास्तविक पाहता बढवाणीचे श्रीराजेसाहेब हे श्रीस्वामीमहाराजांचे एकांतिक भक्त होते. श्रीस्वामीमहाराजांचे सर्व नियम त्यांना माहीत होते व त्यांची कडक शिस्तही त्यांना चांगली परिचित होती. त्यामुळे भाष्यपाठाच्या वेळी आपल्याला दर्शनासाठी प्रवेश मिळणे शक्य नाही हेही श्रीराजेसाहेबांना चांगले माहीत होते. परंतु श्रीराजेसाहेब निस्सीम भक्त असले तरी ते एक व्यवहारात

गुंतलेले राजे होते. त्यामुळे आपली सर्व मिजास वढवाई संस्थानच्या अस्तित्वावर अवलंबून आहे याची त्यांना अगदी पुरेपूर जाणीव होती. यामुळे श्रीराजेसाहेबांच्या पुढे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. राजदूताच्या (पॉलिटिकल एजंटच्या) स्वागतासाठी श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन व आशीर्वाद घेतल्याशिवाय परत जावयाचे की श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी राजदूताची (पॉलिटिकल एजंटची) उपेक्षा करावयाची ? या दोलायमान मनःस्थितीत श्रीराजेसाहेबांच्या गुरुभक्तीचा विजय झाला. ते स्वामीमहाराजांचे दर्शन होईपर्यन्त देवळाबाहेर थांबले. त्या दिवशी भाष्यपाठ संपण्यासही उशीर झाला. त्यामुळे व इतरही कारणांमुळे त्यांना व श्रीराणीसाहेबांना साडेअकरा वाजल्यानन्तर श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन झाले व प्रसादाशीर्वाद मिळाला. त्यानन्तर ते उभयता राजवाड्यावर परत आले. त्या दिवशी राजदूत (पॉलिटिकल एजंट) संध्याकाळी चार वाजल्यानन्तर राजवाड्यावर आले. आपल्या भक्तावर आलेला प्रसंग श्रीस्वामीमहाराजांना आधीच कळला होता. त्यामुळेच हे घडले. हा शिष्याच्या श्रीगुरुभक्तीचा विजय आहे तसाच तो श्रीगुरूंच्या शिष्यावरील प्रेमाचा निदर्शक आहे.

ही सर्व कथा वाचली म्हणजे श्रीस्वामीमहाराजांच्या अपूर्व निःस्पृहतेचे मूर्तिमंत दर्शन झाल्याशिवाय राहात नाही. श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी ग्रंथराज दासबोधात म्हटल्याप्रमाणे श्रीस्वामीमहाराज " एक द्रव्याचे विकिले । एक शिष्याचे आंखिले । ऐसे दुराशेनें केलें । दीनरूप ॥५.२.२३॥ जें जें रुचे शिष्यांचे मनीं । तैसीच करी मनधरणी । ऐसी कामना पापिणी । पड़िली गळां ॥२४॥ जो गुरु भीडसारू । तो अधमाहूनि अधमु थोरू । चोरटा मैंद पामरू । द्रव्यभोंदू ॥२५॥ जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी । आणि

शेखी भीड करी। घातघेणा ॥२६॥ तैसा सद्‌गुरु नसावा। जेणें अंतर पडे देवा। भीड करूनियां गोवा। घाली बंधनाचा ॥२७॥ " असे श्रीसद्‌गुरू नव्हते, हे निःसंशयपणे सिद्ध होते. यामुळे उपरोक्त कथेतून प्रकट झालेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या अपूर्व निःस्पृहतेचे व तदंगभूत महासिद्धाचे व साधूचे दर्शन घेऊन कृतार्थ व्हावयाचे असेल तर आपणास श्रीसमर्थरामदास स्वामीमहाराजांच्या ग्रंथराज दासबोधातील पुढील ओव्यांचाच आश्रय घ्यावा लागेल. असा निःस्पृह साधू कसा असतो हे सांगताना ते असे म्हणतात की—

साधु स्वरूप स्वयंभ। तेथें कैंचा असेल दंभ।
जेथें द्वैताचा आरंभ। जाहलाचि नाहीं ॥८ ९.३१॥
जेणें दृश्य केलें विसंच। तयास कैंचा होय प्रपंच।
याकारणें निष्प्रंपच। साधु जाणावा ॥३२॥
अवघें ब्रह्मांड त्याचें घर। पांचभौतिक हा जोजार।
मिथ्या जाणोनि सत्वर। त्याग केला ॥३३॥
याकारणें लोभ नसे। साधु सदा निर्लोभ असे।
जयाची वासना समरसे। शुद्ध स्वरूपीं ॥३४॥
मोहें झळंबावें मन। तरी तें मनचि झालें उन्मन।
याकारणें साधुजन। मोहातीत ॥३८॥

श्रीसमर्थांनी हें मोहातीतत्त्व अर्थात् निःस्पृहत्त्व कसे बाणते याची सांगोपांग चर्चा ग्रंथराज श्रीदासबोधातील दशक १३ समास १०, दशक १४ समास १, दशक १५ समास २ व दशक १८ समास ३ मध्ये केली आहे. ती जिज्ञासू साधकांनी व वाचकांनी अवश्य पाहावी,

लष्कर ग्वाल्हेर येथील श्रीमंत राजघराण्यातील श्रीमती लक्ष्मी-

बाई जाधव या श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास चालू असताना बरेच दिवस येऊन राहिल्या होत्या. त्या श्रीस्वामीमहाराजांची रोज यथासांग पूजा करून त्यांचे अगदी मनोभावे दर्शन घेत असत त्याचप्रमाणे त्या रोज दुपारी श्रीस्वामी-महाराजांच्या पुराण श्रवणास अगदी नित्य नियमाने येत असत. अशा प्रकारे त्या श्रीस्वामीमहाराजांची अत्यंत निरलसपणे व निर-भिमानवृत्तीने सेवा करीत असत. त्यांच्या सारख्या राजघराण्यातील स्त्रीच्या ठिकाणी वसत असलेली ही नम्रता, सेवावृत्ती व निरभि-मानता पाहून सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटत असे. त्यांच्या या स्वभावामुळे भारावून जाऊनच एकदा श्रीस्वामीमहाराज सर्वांना उद्देशून असे म्हणाले की, " जर माणसाच्या अंगी नम्रपणा असला तरच त्याला मोठेपणा मिळतो. "

श्रीमती लक्ष्मीबाई जाधवांनी त्यांच्या मुक्कामातील एक दिवस भंडारा करून श्रीक्षेत्र चिखलद्यातील सर्व जातीच्या लोकांना व बायका मुलांना भोजन देऊन संतुष्ट केले. त्याचप्रमाणे पुढे त्यांनी काही दिवसपर्यन्त तेथे असलेल्या व बाहेर गावाहून तेथे आलेल्या सर्व ब्राह्मणांना पक्वान्नांचे भोजन दिले. श्रीमती लक्ष्मीबाई यांच्या बरोबर त्यांचे बंधूही आले होते. ग्वाल्हेरच्या राजघराण्यातील इतरही बरीच मंडळी श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला येत असत; पण श्रीमती लक्ष्मीबाईंप्रमाणे ती मंडळी बरेच दिवसपर्यन्त श्रीक्षेत्र चिखलदा येथे राहू न शकल्यामुळे त्यांना श्रीस्वामीमहाराजांची सेवा करण्याचे भाग्य लाभले नाही.

वरील सर्व कथा वाचल्यानन्तर आपण जर " माणसाच्या अंगी नम्रपणा असला तरच त्याला मोठेपणा मिळतो, " या श्रीस्वामी-

महाराजांनी केलेल्या उपदेशाचा एकाग्रपणे विचार केला तर एका लीनतेपणामुळे देहबुद्धी जाऊन साधकाला शांतीची प्राप्ती कशी होते याचे रहस्य लक्षात येईल. नम्रता म्हणजे तितिक्षा. " नास्ति तितिक्षा-सम साधनम् । " म्हणजे तितिक्षेसारखे अर्थात् सहनशीलतेसारखे, नम्रतेसारखे दुसरे साधन नाही असेच शास्त्रकारांनी सांगितले आहे. या साधनाचा हा अपरंपार महिमा वर्णन करताना " जुना दासबोध " या ग्रंथात श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराज असे म्हणतात की—

लीनतेसारिखें रत्न । उदंड केला जरी प्रयत्न ।
तरी न जोडे यत्न । केला पाहिजे ।। १०.९ ।।
लीनता अखंड जयापाशीं । तेथें ठाव नाहीं क्रोधासी ।
लीनतेनें अभिमानासी । देशधडी केलें ।। १० ।।
अतिलीनता जिहीं धरिली । त्यांची देहबुद्धि खंगोनि गेली ।
दिवसेंदिवस गृहासि आली । न पाचारितां शांती ।।११।।
लीनता महत्त्वाचा थारा । लीनता पाषांडाचा मातेरा ।
करूनि टाकी एकसरा । नव्हतेंचि जैसें ।।१२।।
कलह अत्यंत मांडिला । ऐसें जाणविलें लीनतेला ।
तेणें जरी प्राणी सांभाळिला । तरी कलह कैंचा तेथें ।।१३।।
लीनता अंगीं धरावी । देहबुद्धि जीवेंचि मारावी ।
मग ये शांतीची करावी । न लगे चिंता ।।१४।।

★ ★ ★

श्रीक्षेत्र चिखलदा येथील चातुर्मास संपल्यानन्तर येथील महामारीचा त्रासही कमी झाला व श्रीनर्मदानदीचे पाणीही कमी झाले. त्यामुळे बाहेर गावाहून बरीच मंडळी सारखी येऊ लागली. अशा रीतीने भक्तमंडळी येत राहिल्यामुळे श्रीस्वामीमहाराजांच्या पुढे

पुष्कळ पैसे जमा होत असत. या सर्व पैशांमधून लग्ने व मुंजी करणे, लोकांना व्रतवैकल्यासाठी मदत करणे, समाराधना करणे व व्रतोद्यापनादि करणे अशा प्रकारची अनेक लोकोपयोगी कार्ये श्रीस्वामीमहाराज जवळील सेवकांकडून करवून घेत असत. याच पैशातून येथे रोज पक्वान्नभोजन चालू होते. श्रीस्वामीमहाराजांच्या या सर्व मुक्कामाच्या काळात एकंदर किती मंडळी जेवली याला तर काही गणतीच राहिली नाही. या सर्व काळात बढवाणी संस्थानचे राजे श्री. गणपतीसिंह ठाकूरसाहेब हे जातीने उपस्थित राहून सर्व व्यवस्था पाहात असत.

अशा रीतीने चातुर्मास संपल्यानंतरचा श्रीस्वामीमहाराजांचा काळ श्रीक्षेत्र चिखलदा येथे चालला असताना भाद्रपदाच्या वद्य पक्षात श्रीस्वामीमहाराजांच्या बंधूंचे जावई श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले होते. पुढे आश्विन महिन्यात नवरात्र सुरू झाल्यावर तेथे आलेल्या लोकांनी श्रीस्वामीमहाराजांना श्रीदुर्गासप्तशतीचा अर्थ सांगण्याची आग्रहाची प्रार्थना केली. श्रीस्वामीमहाराजांनी सर्व लोकांनी केलेली ही प्रार्थना मान्य करून नवरात्राच्या पहिल्या दिवसापासून अर्थ सांगण्याचे मान्य केले.

श्रीस्वामीमहाराजांनी आश्विन शुद्ध प्रतिपदेला म्हणजे नवरात्राच्या पहिल्या दिवशी सायंसंध्या झाल्यावर ज्यावेळी सर्व मंडळी एकत्रित झाली त्यावेळी उपक्रम विधीने इष्ट देवतेचे स्मरण करून नंतर श्रीदुर्गासप्तशतीचा प्रथम श्लोक वाचला व त्याच्या कथेला अनुसरून अर्थ सांगण्यास प्रारंभ केला. तो श्लोक असा—

सावर्णिः सूर्यतनयो यो मनुः कथ्यतेऽष्टमः ।
निशामय तदुत्पत्तिं विस्तराद् गदतो मम ॥ २ ॥

याचा अर्थ असा आहे की, सावर्णि हा सूर्याचा मुलगा असून त्यालाच आठवा मनू असे म्हटले जाते. त्याच्या उत्पत्तीची कथी मी

सांगतो ती आपण ऐका – (असे श्रीमार्कंडेय महामुनी म्हणाले)

अशा प्रकारे या श्लोकाचा अर्थ सांगून झाल्यावर श्रीस्वामीमहाराजांनी याच श्लोकाने "ऱ्हीं" बीज सिद्ध करून दाखविले. हे "ऱ्हीं" बीज कसे सिद्ध होते याचे विवेचन करण्यास त्यांना सुमारे अर्धा तास लागला. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज सर्वांना उद्देशून असे म्हणाले की, "श्रीदुर्गासप्तशती" ग्रंथाचे एकूण सातशे श्लोक आहेत. त्यातील प्रत्येक श्लोकाने एक एक बीज सिद्ध होते. अशा रीतीने प्रत्येक श्लोकाचे बीज तयार करून अर्थ सांगावयास कित्येक महिने लागतील. आपल्याला तर नऊ दिवसात ही पोथी संपवावयाची आहे. यामुळे प्रत्येक श्लोकाचे बीज सिद्ध न करता कथेला अनुसरून श्लोकांचा जो अर्थ असेल तेवढाच सांगणे सोयीचे व योग्य होईल." त्यानंतर श्रीस्वामीमहाराजांनी श्रीदुर्गासप्तशतीच्या कथेला अनुसरून सर्व श्लोकांचा अर्थ नऊ दिवसात सांगून पोथी संपविली.

अशा रीतीने श्रीदुर्गासप्तशतीच्या एक एक श्लोकाने एक एक बीज मंत्र तयार होतो हे या पूर्वी बहुतेकांना किंबहुना सर्वच मंडळींना अवगत नव्हते. मात्र काही लोकांनी अशा प्रकारे बीज सिद्ध करतात असे ऐकले होते. असे बीज सिद्ध करणारा अर्थ ज्यावेळी या सर्व लोकांनी ऐकला त्यावेळी ते आश्चर्याने दिङ्मूढ झाले. ज्यावेळी तेथे जमलेल्या लोकांमधील विद्वान् मंडळींनी यासंबंधी श्रीस्वामीमहाराजांना माहिती विचारली त्यावेळी ते त्यांना असे म्हणाले की, "श्री. भट्टोजी दीक्षित यांनी सिद्धान्त कौमुदी हा व्याकरणशास्त्राचा प्रख्यात ग्रंथ लिहिला असून त्यांनीच श्रीदुर्गासप्तशतीवर भाष्यग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथात सातशे श्लोकातील सातशे बीजे (मंत्र) सिद्ध करून दाखविली आहेत."

श्रीस्वामीमहाराजांना श्रीदुर्गासप्तशतीवरील उपरोक्त भाष्य मुखोद्गत होते. ज्यांनी तीन–तीन चार–चार शास्त्रे पूर्णपणे आत्मसात केली आहेत अशी शास्त्री मंडळी, पुराणिक लोक आणि भाविक जन श्रीस्वामीमहाराज सांगत असलेल्या श्रीदुर्गासप्तशतीचा अर्थ ऐकावयास येत असत. अजाण माणसांसमोर अर्थ सांगणे कदाचित् सोपे होऊ शकेल; पण विद्वान् मंडळींच्या समोर पुराण वाचून अर्थ सांगणे फार कठीण आहे. परंतु हे सर्व कठीण व कसोटीचे कार्य श्रीस्वामीमहाराज इतक्या लीलया करीत असत की, सर्व शास्त्री मंडळी अगदी थक्क होऊन जात असत. श्रीस्वामीमहाराजांनी पहिल्या दिवशी ज्यावेळी "ह्रीं" बीज सिद्ध करून दाखविले त्यावेळी खरगोण येथील श्री नारायणराव संवत्सर हे प्रसिद्ध विद्वान् शास्त्री त्या ठिकाणी वसले होते. श्रीस्वामीमहाराजांची अपूर्व व अलौकिक विद्वत्ता पाहून त्यांनी धन्यता प्रदर्शित केली. या प्रसंगी खरगोण येथील इतरही शास्त्री मंडळी व दशग्रंथी ब्राह्मण मंडळी आली होती. त्यांनी श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन करून कृतकृत्यता प्रदर्शित केली व ते श्रीस्वामीमहाराजांचा प्रसाद घेऊन परत गेले.

वरील सर्व हकीकत वाचली म्हणजे श्रीस्वामीमहाराजांचे सर्व शास्त्रांमधील ज्ञान किती अगाध होते याची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. असे ज्ञान ईश्वरापाशीच असल्याने श्रीस्वामीमहाराज हे साक्षात् ईश्वर होते ही धारणा मनात दृढ झाल्याशिवाय राहात नाही. त्यांचे हे ईश्वरीयत्व आपल्या मनात दृढ व्हावे म्हणून व मानवरूपाने त्यांच्याकडे पाहण्यासाठी आपली दृष्टी पूर्णतया नाहीशी व्हावी यासाठी पातंजलयोगसूत्रातील पुढील सूत्रांच्या अंतरंगात आपण प्रवेश केला; तर श्रीस्वामीमहाराजांचे ईश्वरीयत्व मनात

त्राणून आपण धन्य व कृतार्थ तर होऊच; पण या दृष्टीच्या प्राप्तीने अर्थात् श्रीस्वामीमहाराजांवरील अनन्यतम भक्तीने आपला ऊर्ध्व-मार्ग मोकळा झाल्याशिवाय राहणार नाही, कारण अशा प्रकारचे ईश्वर-प्रणिधान हे तत्काळ समाधिलाभ प्राप्त करून देणारे असते, हे नितांत सत्य आहे. या दृष्टीनेच श्रीपतंजली महामुनी आपल्या योग सूत्रात असे म्हणतात की—

ईश्वरप्रणिधानाद्वा ।। समाधिपाद ।।२३।।
क्लेशकर्मविपाकाशयैरेपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ।।२४।।
तत्र निरतिशयं सर्वज्ञबीजम् ।।२५।।
प्रातिभाद् वा सर्वम् ।। विभूतिपाद ।।३३।।

ईश्वराच्या प्रणिधानाने अर्थात् कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया त्याच्या अधीन राहून केल्यामुळे, सर्व कर्मे व त्यांची फले ईश्वराला समर्पण केल्यामुळे आणि त्याच्या गुणांचे व स्वरूपाचे चिन्तन केल्यामुळे त्याच्या अनुग्रहाने तत्काळ समाधि-लाभ होतो. ।।२३।। क्लेश, कर्म, कर्मांची फळे आणि वासनांशी संबंध नसलेल्या अन्य पुरुषविशेष चेतनाला किंवा चैतन्याला ईश्वर म्हणतात. ।।२४।। या ईश्वरामध्ये पराकोटीचे सर्वज्ञतेचे बीज समाहित असते. ।।२५।। प्रातिभ ज्ञानाने योगी सर्वकाही जाणू शकतो. ।।३३।।

उपरोक्त २४ व २५ व्या सूत्रांच्या अर्थांतरात प्रवेश केला म्हणजे श्रीस्वामीमहाराज हे साक्षात् ईश्वरच होते याची प्रचीती आपल्याला आल्याशिवाय राहणार नाही. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश असे पाच प्रकारचे क्लेश असून ते सर्व दुःखदायक असतात "अविद्यास्मितारागद्वेषाभिनिवेशाः क्लेशाः ।। साधन-पाद ३ ।।" अनित्यामध्ये नित्य, अपवित्रात पवित्र, दुःखात सुख आणि अनात्म्यामध्ये आत्म्यांचे ज्ञान भासणे याला अविद्या-क्लेश

असे म्हणतात. पुरुष म्हणजे शिव हा द्रष्टा, चैतन्ययुक्त, क्रियारहित, केवल व अपरिणामी असून चित्त म्हणजे चेतन शक्ती ही पाहण्याचे साधन, जड, प्रसवधर्मी अर्थात् क्रिया करणारी त्रिगुणमय व परिणामशील आहे. अशा प्रकारे पुरुषात व चित्तात अर्थात् शिवात व शक्तीत भेद असला तरी या दोन्ही गोष्टी अविद्येमुळे किंवा अहंकारामुळे एक आहेत अशी प्रतीती येणे अर्थात् दृक्शक्ती आणि दर्शनशक्ती एकस्वरूप आहेत असे भान होणे याला अस्मिता-क्लेश असे म्हणतात. चित्तामध्ये सुख भोगण्याची जी इच्छा राहते त्याला राग म्हणजे प्रेम – क्लेश असे म्हणतात. त्याचप्रमाणे चित्तामध्ये दुःखांबद्दल जी घृणेची वासना राहते त्याला द्वेष – क्लेश असे म्हणतात. प्रत्येक प्राणिमात्रात स्वभावतःच मृत्यूचे भय असते आणि हे भय मूर्खांप्रमाणे विद्वानांमध्येही दिसून येते, त्याला अभिनिवेश–क्लेश असे म्हणतात.

या पाच क्लेशांपासून धर्म, अधर्म अर्थात् शुभ, अशुभ आणि मिश्र अशा प्रकारची कर्मे उत्पन्न होतात. अशा प्रकारे अविद्यादि क्लेशांपासून माणसाला जाती, आयुष्य व भोगांची प्राप्ती होते. येथपर्यन्त वर्णन केलेल्या क्लेश, कर्म, कर्मांचे फल व वासनांशी ईश्वराशी लेशमात्र संबंध नसतो. त्यामुळेच त्याला चेतन ईश्वर असे म्हणतात. हा ईश्वर आपल्या इच्छेमात्रेकरून संपूर्ण जगताचा उद्धार करण्यास समर्थ असतो. त्यामुळे ज्याच्या ठिकाणी ज्ञान आणि ऐश्वर्याची पराकाष्ठा असते, जो क्लेश, कर्म, वासनादिरहित असतो, जो सदासर्वदा मुक्त, नित्य निरतिशय, अनादि, अनन्त व सर्वज्ञ आहे त्या पुरुषविशेषाला ईश्वर असे म्हणतात. अशा या ईश्वराचे वर्णन करताना "श्वेताश्वतर उपनिषदातील" अध्याय ६ मंत्र ८ मध्ये असे म्हटले आहे की–

न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते ।
परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ।।

ईश्वराला कोणतेही कार्य नाहीं. त्याला उत्पत्ती, स्थिती व लयाकरिता कोणतेही साधन लागत नाही. त्याची बरोबरी करणारा कोणीही नसतो. त्याच्यापेक्षा कोणीही मोठा असत नाही. त्याची उत्कृष्ट शक्ती अनेक प्रकारची आहे असे ऐकिवात आहे. त्याचे ज्ञान, बल आणि क्रिया या तिन्हीही गोष्टी स्वाभाविक व नित्य आहेत.

अशा या ईश्वराच्या ठिकाणी पराकोटीची सर्वज्ञता असते; कारण ज्ञानाच्या पराकाष्ठेचा आधार ईश्वरच असतो. जीवांवर भोगाचा व अपवर्गरूप मोक्षाचा अनुग्रह करणे हेच ईश्वराचे दयालुत्व आहे.

ज्यावेळी योग्याला कोणत्याही बाह्य निमित्ताशिवाय आतूनच (Intutional insight) ज्ञान प्राप्त होते त्यावेळी त्याला प्रातिभ-ज्ञान प्राप्त होते. हे विवेक ज्ञानाचे प्रथमरूप आहे. या प्रातिभ ज्ञानालाच तारकज्ञान असे म्हणतात. यालाच "तारकं सर्वविषयं सर्वथा-विषयमक्रमं चेति विवेकजं ज्ञानम् ।। ३.५४ विभूतिपाद ।। " असे योगसूत्रात म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की, विवेकज्ञान तारक. म्हणजे कोणत्याही बाह्य निमित्ताशिवाय आपल्या प्रभेने स्वतः उत्पन्न होणारे असून ते साधक योग्याला संसारसागरातून तारून नेते ते सर्व विषयांसंबंधीचे असते म्हणजे या ज्ञानामुळे महदादिपर्यंतच्या सर्व तत्त्वांचे आकलन होते. ते सर्वथाविषय म्हणजे सर्व अवस्थांमध्ये स्थूल, सूक्ष्म, आदि भेदाने त्याच्या तिन्ही परिणामांसहित सर्व विषयांना जाणणारे आणि अक्रम म्हणजे क्रमांची अपेक्षा न ठेवणारे असते, या ज्ञानामुळे सर्व प्रकारच्या विषयांचे एका क्षणात ज्ञान होते.

अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांसारख्या ईश्वरस्वरूप योग्याचा जन्म किती दुर्लभ आहे हे कथन करताना श्रीमद्‌भगवद्‌गीतेत असे असे म्हटले आहे की–

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥६.४२॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥४३॥

अर्थात् तो वैराग्यशील योगभ्रष्ट पुरुष बुद्धिमान् व ज्ञानवान् दरिद्र्यांच्याच कुलात जन्म घेतो; मात्र या संसारात अशा प्रकारे शुद्ध व ज्ञानसंपन्न अशा दरिद्री योग्यांच्या कुळात होणारा अशा प्रकारचा हा जन्म निःसंशय अत्यंत दुर्मिळ आहे. ॥ ४२ ॥ अशा प्रकारचा जन्म प्राप्त झाल्यावर तेथे त्या योगभ्रष्ट पुरुषाला पूर्वजन्मी केलेल्या साधनाची, योगाची व ज्ञानाची बुद्धी प्राप्त होते आणि हे अर्जुना ! ! पूर्वजन्मातील या संस्कारांमुळे तो योगसिद्धीसाठी किंवा भगवत् प्राप्तीसाठी पुन्हा मोठ्या उत्साहाने पूर्वीपेक्षा अधिकच प्रयत्न करतो. ॥ ४३ ॥

याचा भावार्थ स्पष्ट करतांना श्रीज्ञानेश्वरमहाराज "ज्ञानेश्वरीत" असे म्हणतात की–

अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मण्यश्रोत्री ।
महासुखक्षेत्रीं । आदिवंत ॥६.४४९ ॥
जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं ।
जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ॥ ४५० ॥
जे विवेकद्रुमाचे मुळीं । बैसले आहाति नित्य फळीं ।
तया योगियांचिया कुळीं । जन्म पावे ॥ ५१ ॥

मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहांट फुटे ।
सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा ॥ ५२ ॥
तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गावा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥५३॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।
मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥५४॥
ऐसें जे जन्म । जयालागीं देव सकाम ।
स्वर्गीं ठेले जप होम । करिती सदा ॥५५॥
अमरीं भाट होईजे । मग मृत्युलोकातें वानिजे ।
ऐसें जन्म पार्था गा जे । तें तो पावे ॥५६॥

याचा अर्थ असा आहे की, " अथवा जे ज्ञानरूप अग्नीमध्ये हवन करतात, जे परब्रह्मानुभूतिसंपन्न व वेदसंपन्न आहेत, जे परब्रह्म-सुखरूप गावाचे वतनदार आहेत, जे सामरस्याच्या सिद्धान्तावर बसून त्रिभुवनाचे राज्य करतात, जे संतोषरूप वनात मधुरध्वनी करणारे कोकिळ आहेत आणि जे नित्यानित्यविवेकाच्या मुळाशी बसून ब्रह्मस्वरूप प्राप्तीच्या नित्य फळाचे सेवन करतात अशा योग्यांच्या कुळात त्या ईश्वरस्वरूप योगी पुरुषाचा जन्म होतो. ॥ ४९ ते ५१ ॥ तेथे जन्म घेतल्यावर लहान वयातच त्या योग्याच्या ठिकाणी आत्मज्ञानाची पहाट होते. ज्याप्रमाणे सूर्य उगवण्याच्या अगोदर चहूकडे अरुणोदयाची प्रभा फाकते त्याप्रमाणे योग्य अवस्थेची वाट न पाहाता व प्रौढावस्था प्राप्त न होताच ज्ञान किंवा सर्वज्ञता ही बालपणीच अशा योगीपुरुषाच्या ठिकाणी प्रकट होते. ॥ ५२-५३ ॥ अशा रीतीने पूर्वजन्मी केलेल्या साधनामुळे प्राप्त झालेल्या सिद्धप्रज्ञेमुळे त्याचे मनच सर्व विद्यांना प्रसवते व त्याच्या मुखातून सर्व शास्त्रे स्वतःच आपोआप निघू लागतात. ॥ ५४ ॥

अशा प्रकारे आपल्याला उत्तम कुळात जन्म प्राप्त व्हावा म्हणून स्वर्गवासी देव देखील मनात हा हेतू धरून नेहमी जप, होम करीत असतात. ।। ५५ ।। हे अर्जुना ! देवही स्तुतिपाठक होऊन ज्या मृत्यु-लोकातील ज्ञानयोगसंपन्न योगी कुलाचे वर्णन करतात. त्या सर्व-श्रेष्ठ कुलात तो ईश्वरसदृश योगी पुरुष जन्म पावतो. ।। ५६ ।।

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी प्रकट केलेला हा भावार्थ पाहिला म्हणजे श्रीस्वामीमहाराज ईश्वर तर होतेच होते; पण श्रीज्ञाने-श्वरमहाराजांनी श्रीज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणे " अगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देवो जाणिजे । आणि सुखसर्वस्व माझें । चैतन्य तो ।।६.४८२।।" असे महासिद्धयोगी होते याची खात्री पटून त्यांच्या चरणांच्या आराधनेकरिता मन लालायित व उताविळ झाल्याशिवाय राहात नाही, कारण " तरी मी देह तो आत्मा ।। ६.४८५ ।। असेच ईश्वराचे व योग्याचे ऐक्य असते हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सिद्धान्तरूपाने स्पष्ट केले आहे.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा जोपर्यंन्त मुक्काम होता तोपर्यंन्त त्यांच्या दर्शनाला अगणित भक्तमंडळी आली. आपल्या दर्शनाला येणाऱ्या सर्व भक्तमंडळींवर श्रीस्वामीमहाराज आईच्या मायेने प्रेम करीत असत. त्यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या सर्व भक्तमंडळींच्या भोजनाची सोय श्रीस्वामीमहाराज आपल्या सेवकां-तर्फे करीत असत. ते प्रत्येक सणाला उचित व योग्य असा नवीन पदार्थ तयार करावयास सांगत असत व सर्वांना अत्यंत प्रेमाने व आग्रहाने खाऊ घालीत असत. ते पाहिले म्हणजे आई–बापांचे आपल्या मुलांवर जितके प्रेम असेल त्यापेक्षा श्रीस्वामीमहाराजांचे कितीतरी अधिक प्रेम आपल्या भक्तांवर असल्याचे स्पष्टपणे दिसत असे. येथे जो स्वयंपाक तयार होत असे त्यात कोणत्याही प्रकारे

साखरेचा वापर केला जाणार नाही हे कटाक्षाने पाहिले जात असे. त्या काळांत बनारस साखर, देशी साखर, मोरस साखर, पिसलेली साखर इत्यादि साखरेचे विविध प्रकार पसरलेले असल्यामुळे व त्यांबद्दल संशय वाटत असल्यामुळे कोणत्याच प्रकारची साखर स्वयंपाकात न वापरता सर्व पदार्थांत गूळ वापरण्यात येत असे. येथील सर्व पक्वान्नेही गुळाचीच केली जात असत. गुळापासून केलेल्या सर्व पदार्थांना व पक्वान्नांना इतकी अपूर्व गोडी असे की, त्यापुढे अमृतही फिके असेल असे वाटत असे. त्यामुळे या गुळाच्या पदार्थांनी कोणालाही कधीही अरुची उत्पन्न झाली नाही; मग कष्ट होण्याची गोष्ट तर दूरच राहिली.

वास्तविक पाहता दह्यातील पाणी काढून टाकल्यावर त्याचा जो चक्का तयार होतो त्यात साखर मिसळली की, श्रीखंड तयार होते. परंतु कोणत्याच पदार्थात साखर वापरण्यास श्रीस्वामीमहाराजांची बंदी असल्यामुळे आणि गूळ व दही अर्थात् चक्का हे पदार्थ एकत्र करून खाण्यास शास्त्राची आज्ञा नसल्यामुळे येथे केव्हातरी लोणी, गूळ, केशर, वेलदोडे इत्यादि पदार्थांचे श्रीखंड तयार करीत असत. अशा प्रकारे तयार केलेले श्रीखंड एक महिन्यापर्यंत ठेवले तरी ते वाईट न होता चांगले टिकत असे. कधी कधी तर दही, केशर, वेलदोडे, जायफळ यांमध्ये गुळाऐवजी किसमिस बारीक वाटून श्रीखंड तयार करीत असत. या श्रीखंडाची रुची अत्यंत अप्रतिम अशी लागत असे. या श्रीखंडाची परीक्षा कोणालाही कधीच करता आली नाही. मात्र जिलबी, लाडू, घारगे इत्यादि सर्व पक्वान्नांमध्ये गूळ घालून ती तयार करीत असत. त्यामुळे शास्त्राज्ञा भंग करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नसे. त्याचप्रमाणे येथे गूळ घालून दुधाची खीर नेहमीच केली जात असे.

ज्या सणाला जे आवश्यक असेल ते करण्याकडे श्रीस्वामीमहाराजांचा कल व कटाक्ष असे. त्यामुळे त्यांनी भाद्रपदात श्रीगणेश चतुर्थीच्या सणाला गूळ खोवरे एकत्र करून त्याचे मोदक व करंज्या करून त्या सर्वांना प्रसाद म्हणून वाटल्या. त्याचप्रमाणे अनंत-चतुर्दशीच्या दिवशी घारगे व खीर करून त्याचा प्रसाद सर्वांना दिला. पुढे आश्विन शुद्ध षष्ठीला श्रीस्वामीमहाराजांनी श्रीसरस्वती आवाहनाच्या दिवशी सर्वांच्या पोथ्या एकत्रित ठेवून तीन दिवस मोठ्या समारंभाने सरस्वतीचे पूजन व आरती केली. त्यानंतर पुढे दिवाळीमध्ये श्रीस्वामीमहाराजांनी सर्वांच्या अंगाला सुगंधी तेल लावण्याची व्यवस्था करवून श्रीनर्मदानदीवर पाणी तापवून सर्व मंडळीची अभ्यंग स्नानाची व्यवस्था केली व सर्वांना स्वतःही स्नान घातले. त्याचप्रमाणे दिवाळीतील अमावस्येला श्री. लोंढे यांच्या घरात लक्ष्मीपूजन झाले. त्यावेळी तेथे जमलेल्या सर्व मंडळींना दक्षिणा म्हणून नगदी नाणे देण्यात आले. अशा रीतीने श्रीस्वामी-महाराजांनी श्रीक्षेत्र चिखलदा येथील दिवाळी तेथे जमलेल्या सर्व मंडळींसह मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी केली.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीनर्मदानदीच्या किनाऱ्यावरील खडक कोरून स्वयंभू घाट तयार केला आहे. या घाटावर दोन अडीचशे मंडळी कोणतीही अडचण न येता मोठ्या आनंदाने बसू शकतील एवढा तो मोठा असल्याने श्रीस्वामीमहाराजांनी त्या घाटावर जाऊन कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्याचे ठरविले. पूर्वी ठरविल्याप्रमाणे कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी श्रीस्वामीमहाराज व इतर सर्व मंडळी त्या स्वयंभू घाटावर गेली. तेथे दूध तापवून त्यात गूळ, जायफळ व वेलदोडे घालून ते श्रीस्वामीमहाराजांनी सर्वांना आकंठ प्यावयास दिले. श्रीस्वामीमहाराजांनी या सोहळयात मोठ्या

आनंदाने भाग घेतला; मात्र स्वत:ला दूध सोसत नसल्याने ते त्यांनी घेतले नाही.

त्यानन्तर श्रीक्षेत्र चिखलदा येथील मुक्कामात श्रीदत्तजयंतीचा उत्सव आला. या उत्सवापूर्वी सात दिवस नामसप्ताह, भजनसप्ताह व श्रीगुरुचरित्रादि ग्रंथांच्या वाचनाचे सप्ताह करण्यात आले. या सप्ताहांची समाप्ती श्रीदत्तजयंतीच्या दिवशी मोठ्या उत्साहाने व आनंदाने करण्यात आली. यावेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीदत्त-जयंतीच्या उत्सवाकरिता खूपच मंडळी एकत्र आली होती. त्या दिवशी सप्ताह समाप्तीचा सोहळा सकाळी दहा वाजता संपल्यावर तेथे जमलेल्या सर्व मंडळींनी श्रीस्वामीमहाराजांना बढवाणी येथे येण्याबद्दल खूप आग्रह केला. त्या सर्व लोकांचा तो प्रेमाग्रह मोडणे शक्य न झाल्याने श्रीस्वामीमहाराज बढवाणीला गेले व सायसंध्येला श्रीक्षेत्र चिखलदा येथे परत आले. त्या दिवशी सायंकाळी कीर्तन होऊन श्रीदत्तजन्म साजरा करण्यात आला. दुसऱ्या दिवशी श्रीदत्त-जयंतीचे पारणे अत्यंत थाटाने व उत्साहाने साजरे करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्री. लोंढे यांची जागा पारण्याच्या भोजनासाठी घेतली होती. परन्तु प्रसादाला आलेल्या लोकांची संख्या वाढल्यामुळे श्री. लोंढे यांची जागा सर्व लोकांना पुरली नाही. त्यामुळे सर्व लोकाना परत श्रीलक्ष्मीनारायणाच्या मंदिराचा आश्रय घेऊन तेथे जेवणे उरकावी लागली. त्या दिवशी भोजनप्रसादास आलेल्या सर्व स्त्री, पुरुष, मुलांना प्रत्येकी एक एक रुपया भोजन दक्षिणा म्हणून देण्यात आली. (या काळात सोने २० रु. तोळा होते. याचा अर्थ आजच्या काळाच्या दृष्टीने भोजन दक्षिणा २०० रु. होते. यावरून श्रीस्वामीमहाराजांच्या अपरंपार औदार्याची कल्पना येईल.) अशा रीतीने श्रीदत्तजयंतीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा झाला.

त्यानन्तर धनसंक्रातीला धनुर्मास सुरू झाला. तो ही मोठ्या उत्साहाने साजरा झाला. त्यातील एक दिवसाचा कार्यक्रम श्रीनर्मदा नदीच्या स्वयंभू घाटावर करण्यात आला. या धनुर्मासानिमत्त जेवण्या-खाण्याचा जो खर्च आला तो सर्व श्री. परशुराम हरि देशमुख यांनी दिला.

श्रीक्षेत्र चिखलदा येथील स्वयंभू घाटाचा जो उल्लेख आत्तापर्यन्त दोन-तीन वेळा आला आहे तो घाट श्रींनर्मदानदीच्या किनाऱ्यावरील खडक कोरून तयार केला असून त्यावर दोन-अडीचशे मंडळी सहज बसू शकतील इतका तो ऐसपैस आहे. हा घाट कोरण्याचे काम श्री. हरि संभाजी देशमुख हे श्रीक्षेत्र चिखलद्याला अधिकारी पदावर (आमीन) असताना त्यांनी सुरू केले होते. पुढे श्री. होळकर सरकार यांच्याकडून या कामासाठी पांचशे रुपये देण्यात आले. या घाटाच्या कामाला अंदाजे पंधरा हजार रुपये खर्च आला. श्री. हरि संभाजी देशमुख यांनी प्रथमपासून ते नोकरी सुटेपर्यन्त या कामात लक्ष घालून स्वत:ला वाहून घेतले होते. श्री. होळकर सरकारांच्या मदती व्यतिरिक्त इतर सर्व खर्च त्यांनी स्वत: केला. हे घाटाचे काम चालू असताना श्री. नारायणराव कृष्णराव ढवळे यांनी शारीरिक मेहनत करून हा घाट कोरून काढण्यास मनापासून अपरंपार अशी मदत केली. हा घाट खडकात कोरून तयार करण्यात आला असल्या-मुळे तो कधी सुद्धा फुटण्याची किंवा प्रवाहात वाहून जाण्याची भीती नाही. श्रीस्वामीमहाराजांचा श्रीक्षेत्र चिखलदा येथे चातुर्मास सुरू झाल्यावर ते याच घाटावर सकाळ-संध्याकाळ स्नानाला व संध्येला जात असत. ज्यावेळी श्रीस्वामीमहाराज अशा प्रकारे दोन्ही वेळा स्नान संध्येला जात असत त्यावेळी इतरही सर्व मंडळी व मुले त्यांच्या बरोबर श्रीनर्मदानदीवर जात असत व भजन करीत परत येत असत.

श्रीक्षेत्र चिखलद्याचा चातुर्मास संपल्यानन्तर श्रीस्वामीमहाराजांनी वेदमूर्ती श्री. आप्पादेव चाफेकर यांना यज्ञ करण्यासाठी यजमान करून त्यांच्याकडून श्रीलक्ष्मीनारायणाच्या मंदिरात देवासमोर पहिला संहितास्वाहाकार करविला. या स्वाहाकाराच्या कार्याला आठ दिवस लागले. या आठही दिवसात श्रीस्वामीमहाराज दररोज होमाच्या वेळी यज्ञवेदीजवळ येऊन बसत असत. संहितास्वाहाकाराचा रोजचा कार्यक्रम पूर्ण झाला की, दुपारी याच मंदिरात भोजनाचा कार्यक्रम होत असे.

हा संहितास्वाहाकार झाल्यावर श्रीस्वामीमहाराजांनी येथेच बारा पवमान स्वाहाकार केले. या प्रत्येक स्वाहाकाराला यजमान व उपाध्याय (आचार्य) वेगवेगळे असत. यातील एका पवमान स्वाहाकाराला श्री. गंगाधरपंत वैद्य उपाध्याय होते; तर दुसऱ्या एका स्वाहाकाराचे उपाध्याय सागरकडील श्री. नारायण शिवराम शेंडे हे होते. यावरून हे स्पष्ट होते की, श्रीस्वामीमहाराजांचा श्रीक्षेत्र चिखलदा येथे मुक्काम असताना दूरदूरच्या प्रांतांमधून विद्वान् भिक्षुक मंडळी मुद्दाम त्यांच्या दर्शनाला येत असत. त्यामुळे या स्वाहाकारामध्ये त्यांची योजना करवून श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेने त्यांची उत्तम संभावनाही करता येत असे.

अशा रीतीने एक संहितास्वाहाकार व बारा पवमानस्वाहाकार झाल्यानन्तर याच श्रीलक्ष्मीनारायणाच्या मंदिरात श्रीरुद्राचे दोन व श्रीगायत्री मंत्राचा एक स्वाहाकार झाला. त्याचप्रमाणे तीस सुवासिनी स्त्रियांची व्रतोद्यापने केली गेली. प्रत्येक यज्ञकार्याच्या प्रथम दिवशी आधीवासन व दुसऱ्या दिवशी होम करून सांगतेनिमित्त ब्राह्मणभोजन केले जात असे. श्रीलक्ष्मीनारायणाच्या मंदिरात उपरोक्त सर्व कार्ये झाल्याने त्याचा या सर्व कार्यक्रमासाठी

फार उपयोग झाला यात काहीच शंका नाही.

श्रीक्षेत्र चिखलद्याला जे स्वाहाकार झाले त्या प्रत्येक स्वाहाकाराचा अग्नी सूर्यापासून उत्पन्न करून मग तो स्थापन करण्यात आला होता. आगपेटीच्या किंवा इतर कोणत्याही प्रकारे उत्पन्न झालेल्या अग्नीचा त्यासाठी स्वीकार केलेला नव्हता. प्रत्येक यज्ञाच्या वेळी अग्नी स्थापन करण्याची वेळ आली की, वेदमूर्ती श्री. आप्पादेव यांचा चष्मा आणून तो उन्हात धरून त्याचा प्रकाश एका गवरीवर दुसऱ्या एका गवरीचा चुरा ठेवून त्यावर पाडीत असत. त्यामुळे एका मिनिटाच्या आत अग्नी तयार होत असे. त्यामुळे तेथे जमलेल्या सर्व लोकांना असे वाटू लागले की, अशा प्रकारे अग्नी उत्पन्न करणे हा या चष्म्याचा स्वाभाविक धर्म आहे. त्यामुळे इतर लोकांनीही खात्री करून घेण्यासाठी अर्धातासापर्यन्त तोच चष्मा उन्हात धरून अग्नी उत्पन्न होण्यासाठी प्रयत्न केला; पण तशा प्रकारे अग्नी उत्पन्न झाला नाही. वास्तविक पाहता श्रीस्वामीमहाराजांच्या समक्ष ज्यावेळी हा चष्मा उन्हात धरला जात असे त्यावेळीच असा अग्नी उपस्थित होत असे.

वरील सर्व कथा वाचली म्हणजे श्रीस्वामीमहाजांकडून देव किती अगाध लीला करीत होते याचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. देवांच्या लीलेला तुलना नसल्यामुळे व तो भक्तांचा भारवाही असल्यामुळे हे सर्व चमत्कार घडत असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. देव भक्तांसाठी या लीला कशा करतो, तो भक्तांसाठी उदार कसा होतो व अभक्तांसाठी कसा कठीण बनतो हे सर्व अंतरंग रहस्य व वर्म अत्यंत मार्मिकपणे प्रकट करताना श्रीसंत नामदेवमहाराज आपल्या अभंगात असे म्हणतात की–

दुरोनि ओळंगिल्या अविनाश देताहे ।
तो जवळीं जातां काय देईल नेणों ॥१॥
ऐसा हा कृपाळू लक्ष्मीकांत आहे ।
साधन प्रवाहें वोळगती प्राणी ॥२॥
सेवा माझा स्वामी वैकुंठनायक ।
भुक्तिमुक्तिदायक आणिक नाहीं ॥३॥
साधिलें नगर देऊनियां शिर ।
कष्ट दशशिरें एवढें केलें ॥४॥
तें दिलें बिभीषणा एका नमस्कारा ।
त्या माझ्या उदारा कां न भजा ॥५॥
मांडी बैसों नेदी सापत्न ते माता ।
म्हणे राज्यधुरूसुता नव्हसी तूं ॥६॥
हें ऐकोनि वना जाय तो तत्त्वतां ।
सकळ देवा माथा वरिष्ट केला ॥७॥
दुर्योधनें भोजना बहु केले सायास ।
परि न घे ग्रास तयां घरीं ॥ ८ ॥
विदुराचें घरीं न पुसतां जाय ।
भक्ति प्रिय होय स्वामी माझा ॥ ९ ॥
अर्जुनाचे काजीं सांडीं निज पैजा ।
सुदर्शन वोजा धरियेलें ॥१०॥
आपण लटिका जाला भीष्म साच केला ।
काळाचा अंबुला स्वामी माझा ॥११॥
दीक्षित अवदान देती निज करीं ।
परि मुख न करी तयांकडे ॥१२॥

सुदामा जो पोहे देत मुष्टीभरी ।
तयासी श्रीहरी पसरी हात ॥१३॥
म्हणउनि गावा हाचि मनीं ध्यावा ।
हाचि वो धरावा हृदयकमळीं ॥१४॥
हरिगुण नाम हेंचि प्रिय आम्हां ।
कीर्ती गाय नामा होऊनि भाट ॥१५॥

अशा प्रकारे श्रीलक्ष्मीनारायणाच्या मंदिरात स्वयंपाक, ब्राह्मण-भोजन व स्वाहाकारादि कार्यक्रम दोन महिनेपर्यन्त अखण्ड चालले होते. हे सर्व कार्यक्रम संपल्यानन्तर श्रीलक्ष्मीनारायण मंदिराच्या अगदी जवळच राहात असलेल्या श्री. लोंढेसाहेबांची जागाही स्वयंपाक करण्यासाठी घेतली. ही जागा प्रशस्त असल्याने तेथे सर्व लोकांची भोजनाची व्यवस्था उत्तम रीतीने करता आली व सामान एका स्वतंत्र खोलीत ठेवण्याचीही सोय करता आली. पुढे श्रीस्वामी-महाराजांचा श्रीक्षेत्र चिखलदा येथे जोपर्यंन्त मुक्काम होता तोपर्यंन्त या जागेतच स्वयंपाक, ब्राह्मणभोजन इत्यादि होत राहिले.

श्रीस्वामीमहाराजांनी या स्वयंपाकातून बहुधा भिक्षा घेतली नाही. ते गावातून माधुकरी मागून आणीत असत व ज्या श्रीमारुती मंदिराच्या उत्तर दिशेकडील कडछातीत त्यांचे वास्तव्य होते तेथेच ते भिक्षान्नाचे सेवन करीत असत. त्यानन्तर ते पंधरा मिनिटे वामकुक्षी करीत असत. ज्यावेळी श्री. लोंढेसाहेबांच्या घरात सर्व मंडळी भोजनासाठी बसत असत त्यावेळी श्रीस्वामीमहाराज तेथे येत असत व सर्वांना आग्रहपूर्वक वाढावयास लावीत असत. या मुक्कामात श्रीक्षेत्र नरसोबावाडीहून भिक्षुक वगैरे मंडळी आली होती. या सर्वच मंडळींवर व श्रीक्षेत्र नरसोबावाडीवर श्रीस्वामी-

महाराजांचे प्रेम असल्यामुळे व त्या सर्वांचा पूर्व परिचय असल्यामुळे श्रीस्वामीमहाराज त्यांच्याशी विनोदपर भाषण करीत असत. श्रीक्षेत्र चिखलदा येथे झालेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या या चातुर्मासाच्या व पुढील वास्तव्याच्या काळात वऱ्हाड, नागपूर इत्यादि कितीतरी ठिकाणांहून कितीतरी श्रीमंत लोक सत्संगाच्या इच्छेने येथे येऊन बरेच दिवस रहिले होते. त्याचप्रमाणे ब्रह्मचारी, शास्त्राध्ययन केलेले विद्वान् शास्त्री व इतरही अनेक पुराणिक, कीर्तनकारादि लोक श्रीस्वामीमहाराजांच्या संगतीत राहून त्यांच्या माहात्म्याचा व कृपाशीर्वादाचा लाभ घेण्यासाठी श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले होते. यावेळी येथे आलेले कित्येक ब्रह्मचारी लोक गावात व रसोड्यात माधुकरी मागून भोजन करीत असत. यातील काही लोक मात्र फक्त रसोड्यातच नित्य भोजन करीत असत. येथे रोज सायंकाळी भजनाचा कार्यक्रम चालत असे. तो झाल्यावर मुगाची डाळ शिजवून ती तयार करून सर्वांना प्रसाद म्हणून वाटीत असत.

यावेळी येथे आलेल्या काही मंडळींनी खेचरी मुद्रा शिकण्याची इच्छा श्रीस्वामीमहाराजांजवळ व्यक्त केली. त्या लोकांची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी बढवाणी येथील डॉक्टर साहेबांकडून जिभेच्या खालील शिरेचे छेदन करून घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे दर आठ दिवसांनी बढवाणीचे डॉक्टर श्रीक्षेत्र चिखलद्याला येऊन खेचरी मुद्रा लावण्याची इच्छा असणाऱ्यांचे जिव्हाशिरच्छेदन करीत असत, पुढे सहा महिन्यात ते पूर्ण बरे होत असे व खेचरी मुद्रा सिद्ध होत असे. मात्र ज्या लोकांचे पूर्वकर्म साधनानुकूल नसेल त्यांना पूर्वकर्म प्रतिबंधामुळे कार्यसिद्धी होत नसे. खण्ड २ पृ. २६० ते २६३ वर वर्णन केल्याप्रमाणे पूर्वीही गुणा छावणी येथील डॉक्टर श्री. ताटकेसाहेब यांनी श्रीक्षेत्र महेश्वरचे श्री. व्यंकटराव स्टेशन-

मास्तर, गुजराथ मधील प. प. श्रीगांडामहाराज व श्री. आप्पासाहेब निगडीकर यांच्या जिभेखालील शिरेचे छेदन केले होते. पण या तिघांपैकी फक्त श्री. प. प. श्रीगांडामहाराजांच्या जिभेखालील शिरेचे छेदन उत्तम झाल्याने त्यांना खेचरी मुद्रा साध्य झाली; मात्र उरलेल्या दोघांना खेचरी मुद्रा साध्य झाली नाही. याचा अर्थच असा आहे की, अनेक जन्मात पुण्य कर्म घडत जाईल तरच इष्टप्राप्ती होते, अन्यथा कधीही होत नाही. श्रीसमर्थ रामदासस्वामीमहाराजांनी या दृष्टीने "जनीं जाणिजे योग हा सुकृताचा।" असे म्हणून एका श्लोकबद्ध प्रकरणात जे वर्णन केले आहे ते पाहण्यासारखे आहे. श्रीसमर्थ असे म्हणतात की–

॥ जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥

मनासारिखी सुंदरा ते अनन्या। मनासारिखे पुत्र ज्यामात कन्या।
सदा सर्वदा बोलती रम्य वाचा। जनीं जाणिजें योग हा सुकृताचा॥
मनासारिखे दीर भर्तार भावे। मनासारिखें सासुर तें असावें।
सुखें बोलती लेश नाहीं गमाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा॥
भलीं मायबापें भले मित्र बंधु। भले सोइरे राखती स्नेहवादु।
मुलें लेंकुरें येरु मेळा सुखाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा॥
भले धाकुटे थोरले सर्व कांहीं। भले गोत्रजु भिन्न भावार्थ नाहीं।
अखंडीत हा काळ जातो सुखाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा॥
गुरें वांसुरें शिगुरें दास दासी। गुराखे सुणीं मर्जरें गुणरासी।
समा चालतो लेश नाहीं तमाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा॥
धनें धान्य पात्रें अळंकार चीरें। विसोरे घरें सुंदरें रम्य सारें।
देहे चालतो सर्व आरोग्य ज्याचा। जनीं जाणिजे योग हा सुकृतांचा॥

यहलोकिचे लोक ते ही गुणाचे। परत्रीक ते ही बहू लक्षणाचे।
समुदाव उछाव ग्रेका मनाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
मनासारिखे ग्राम ग्रामाधिकारी। मनासारिखे लोक शोकापहारी।
मनासारखा संग साधुजनाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
मनासारिखें चिंतिता देव पावे। मनासारिखे भक्त भावें मिळावे।
सदा बोलती बोल सारांश वाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
म्हणें दास सायास केल्यां घडेना। विकल्पें जनीं येक ठाईं पडेना।
घडे योग होतां विवेकी जनाचा। जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा मुक्काम असताना एकदा एका श्रीमंत जहागिरदारांच्या पत्नी त्यांच्या दर्शनाला आल्या. त्यांच्या बरोबर त्यांच्या नोकर चाकर वगैरे मंडळीचा सरंजाम होता. त्यातील एका नोकरातर्फे त्यांनी श्रीस्वामीमहाराजांना असा निरोप पाठविला की, " आम्हाला आपल्याशी एकांतामध्ये काही खाजगी गोष्टी बोलावयाच्या आहेत. तरी आपली अनुज्ञा असावी. " हा निरोप मिळताच श्रीस्वामीमहाराजांनी आलेल्या नोकराबरोबरच त्या श्रीमंत जहागिरदारांच्या मंडळींना असे कळविले की, " येथे सर्वत्र श्रीहरि भरून राहिले आहेत. त्यामुळे एकान्तात बोलणे शक्य होणार नाही. " श्रीस्वामीमहाराजांनी पाठविलेला निरोप ज्यावेळी त्या श्रीमंत जहागिरदारबाईंनी आपल्या नोकराच्या मुखातून ऐकला त्यावेळी त्या एक क्षणभर स्तंभितच झाल्या. शेवटी नाईलाज झाल्यामुळे मनाचा हिय्या करून त्या श्रीस्वामीमहाराज जेथे बसले होते तेथेच त्यांच्या दर्शनासाठी गेल्या.

श्रीमंत जहागिरदारांच्या पत्नी श्रीस्वामीमहाराजांसमोर आल्यावर त्यांनी त्यांच्या पायाशी पैशांची एक भली मोठी थैली ठेवली व त्या त्यांना नमस्कार करून अत्यंत नम्रतेने तेथे उभ्या राहिल्या.

त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे सांगितले की, " आपण आमच्यापुढे ठेवलेली ही पैशांची थैली उचलून ती श्रीदत्तचरणी ठेवा. " श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्या श्रीमंत जहागिरदारबाईंनी तत्काळ ती पैशांची थैली उचलून श्रीदत्तचरणी नेऊन ठेवली. त्यानंतर त्या श्रीस्वामीमहाराजांपुढे येऊन उभ्या राहिल्या व त्या त्यांना असे म्हणाल्या की, " सरकारी आज्ञेने आमची जहागिरी जप्त झाली आहे, ती मोकळी व्हावी अशी आपल्या चरणी प्रार्थना आहे." त्या श्रीमंत जहागिरदारबाईंचे हे निवेदन ऐकताच श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे विचारले की, " देवा ब्राह्मणांवर आपली श्रद्धा आहे काय ? " हा प्रश्न ऐकताच त्या बाई असे म्हणाल्या की, " होय महाराज ! त्या श्रद्धेनेच तर मला येथवर आपल्या पायापाशी आणले आहे. "

त्या श्रीमंत जहागिरदारबाईंची नम्रता, आज्ञाधारकपणा, सेवावृत्ती व श्रद्धाभाव पाहून श्रीस्वामीमहाराज त्यांच्यावर प्रसन्न झाले. त्यांनी एका कागदावर कार्तवीर्याचा मंत्र लिहिला व एका ब्राह्मणाला बोलावून घेऊन ते त्या श्रीमंत जहागिरदारबाईंना असे म्हणाले की, " आपल्या कार्याच्या सिद्धीसाठी हा मंत्र दिला आहे, त्याचे या ब्राह्मणाकडून येथे श्रीनर्मदातीरी सव्वा वर्ष अनुष्ठान करून घ्या. हे सर्व अनुष्ठान कसे करावयाचे ते या ब्राह्मणाला समजावून सांगितले आहे. हे अनुष्ठात पूर्ण होईपर्यंत आपण या ब्राह्मणाच्या अन्नवस्त्राची व्यवस्था ठेवा व त्यानंतर त्याची योग्य ती संभावना करा. पुढे आपल्या इच्छेप्रमाणे कार्य सिद्धीस नेण्यास श्रीदत्तसमर्थ आहेत. "

श्रीस्वामीमहाराजांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी त्या श्रीमंत जहागिरदारबाईंनी मोठ्या आनंदाने कबूल केल्या. त्यानंतर

श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेने श्रीदत्तचरणी ठेवलेल्या पैशांच्या थैलीमधील अधिक द्रव्याची भर घालून त्या श्रीमंत जहागिरदार-वाईंनी ते सर्व पैसे श्रीस्वामीमहाराजांनी रचलेल्या ग्रंथांच्या प्रकाशनकार्यास साहाय्य म्हणून दिले. पुढे श्रीस्वामीमहाराजांनी सांगितलेल्या कार्तवीर्याच्या मंत्राचे त्या ब्राह्मणाने सव्वावर्षपर्यन्त ब्रह्मचर्यव्रत पाळून यथाविधी व यथायोग्य रीतीने अनुष्ठान केले. हे अनुष्ठान पूर्ण झाल्यावर त्या श्रीमंत जहागिरदारबाईंची जहागिरी सरकारच्या बंदीतून मुक्त होऊन त्यांना परत मिळाली. ही जहागिरी परत मिळाल्यावर त्या श्रीमंत जहागिरदाबाईंनी श्रीक्षेत्र चिखद्याच्या श्रीदत्तमंदिराला चांदीची भांडी दिली व आपल्या जहागिरीच्या गावी श्रीदत्तमंदिर उभारून तेथील नित्यनैमित्तिक सेवेची व्यवस्था केली.

श्रीस्वामीमहाराजांचा श्रीक्षेत्र चिखलदा येथे चातुर्मास चालू असताना त्यांच्या दर्शनासाठी तेथे जे लोक आले होते त्यांच्यापैकी कांही लोकांच्या मनामध्ये व श्रीनर्मदा परिक्रमा करणाऱ्या काही लोकांच्या मनामध्ये अशी शंका येत असे की, " विवाहादि मंगल कार्यात प्रारंभी श्रीगणपतीचे पूजन होत असते. श्रीगणपती हा शंकर–पार्वतीचा पुत्र आहे. अशा स्थितीत शिव–पार्वतीच्या विवाहात श्रीगणपतीचे पूजन कसे झाले? किंवा ते केले किंवा नाही? अर्थात् श्रीगणेश ही देवता अनादि आहे की नाही? " ज्या दिवशी श्रीस्वामीमहाराजांना कुतार्किक लोकांच्या मनातील हे विचार समजले त्या दिवशी या सर्व लोकांना श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्री. नानासाहेब ढवळे यांनी त्यांच्या घरी श्रीगणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीगणेशाच्या दर्शनासाठी पाचारण केले होते. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनाही तेथे बोलावले होते. त्यामुळे त्या दिवशी रात्रीच्या वेळी जेव्हां सर्व मंडळी तेथे दर्शनासाठी आली

तेव्हा श्रीस्वामीमहाराजांनी श्रीगणेश देवतेसंबंधीचे वेदातील मंत्र व त्यांचा अर्थ सांगून श्रीगणपती ही देवता अनादि असल्याचे सिद्ध केले आणि श्रीशिव-पार्वतीच्या विवाहाच्या वेळी श्रीगणपतीपूजन झाले होते हे सांगून सर्व कुतार्किक लोकांच्या व श्रीनर्मदा परिक्रमा करणाऱ्या लोकांच्या मनातील संशयाची निवृत्ती केली.

ही सर्व हकीकत वाचली म्हणजे लोकांच्या संशयाची निवृत्ती करणे व गुह्यज्ञान प्रकट करून त्यांना मार्गाला लावणे हेच श्रीस्वामीमहाराजांसारख्या अवतारी संतांचे महान् कार्य असते, याचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. या प्रत्ययापोटीच "आता वंदीन संतसज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान । जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ।। १.५.१ ।।" अशी सुरुवात करून श्रीसमर्थरामदास-स्वामीमहाराजांनी श्रीसंतांचे स्तवन केले आहे. हे स्तवन जर आपण मननपूर्वक वाचले तर अजंठा, वेरुळ, इत्यादि लेण्यांचे बाहेरून दर्शन घेतल्यावर जे वाटते त्यापेक्षा ज्यावेळी त्या लेण्यांच्या अंतरंगात शिरून आपण दर्शन घेतो त्यावेळी तेथील कलाकृतींची भव्यता, दिव्यता, अपरूपता, अलौकिकपणा, लोकोत्तरता व अनन्यसाधारणता पाहून मन ज्याप्रमाणे दिङ्मूढ होते त्याप्रमाणे श्रीसमर्थांनी केलेले श्रीसंतस्तवन वाचल्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या रूपाने या भूतला-वर अवतरलेल्या कलाकृतीच्या अपूर्व दर्शनाने आपण विस्मयचकित झाल्याशिवाय राहात नाही. श्रीसंतांचे हे अलौकिक दर्शन घडविताना श्रीसमर्थ असे म्हणतात की–

आता वंदीन संत सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान ।
जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ।। १.५.१ ।।

जें वस्तु परम दुर्लभ । जियेचा अलभ्य लाभ ।
तेंचि होय परम सुलभ । संतसंगेंकरूनी ॥ २ ॥
वस्तु प्रगटचि असे । पाहतां कोणासीच न दिसें ।
नाना साधनें सायासें । न पडे ठायीं ॥ ३ ॥
जेथें परीक्षावंत ठकले । नातरी डोळसचि अंध झाले ।
पाहत असतांचि चुकले । निजवस्तूसी ॥ ४ ॥
जे दीपांचेनि दिसेना । नाना प्रकाशें गवसेना ।
नेत्रांजनेंही बसेना । दृष्टीपुढें ॥ ५ ॥
सोळा कळीं पूर्ण शशी । दाखवूं शकेना वस्तूसी ।
तीव्र आदित्य कळाराशी । तोही दाखवीना ॥ ६ ॥
जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंतू तोही दिसे ।
नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणुवादिक ॥ ७ ॥
चिरलें बालाग्र तेंही प्रकाशी । परी तो दाखवीना वस्तूसी ।
तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होय ॥ ८ ॥
जेथें आक्षेप आटले । जेथें प्रयत्न पस्तावले ।
जेथें तर्क मंदावले । तर्कितां निजवस्तूसी ॥ ९ ॥
पडे विवेकाची वेगडी । वळे शब्दांची बोबडी ।
जेथें मनाची तातडी । कामा नये सर्वथा ॥१०॥
जो बोलकेपणें विशेष । सहस्रमुखांचा जो शेष ।
तोही शिणला निःशेष । वस्तु न सांगवे ॥११॥
वेदें प्रकाशिलें सर्वही । वेदविरहित कांहीं नाहीं ।
तो वेद कोणासही । दाखवूं शकेना ॥१२॥
तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे ।
त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणू ॥१३॥

विचित्र कळा ये मायेची। परी ओळखी न सांगवे वस्तूची।
मायातीत अनंताची। संत सोय सांगती ॥१४॥
वस्तूसि वर्णिलें न वचे। तेंचि स्वरूप संतांचें।
या कारणें वचनाचें। कार्य नाहीं ॥१५॥
संत आनंदाचें स्थळ। संत सुखचि केवळ।
नाना संतोषांचें मूळ। ते हे संत ॥१६॥
संत मोक्षाची विश्रांती। संत तृप्तीची निजतृप्ती।
नातरी भक्तीची फलश्रुती। ते हे संत ॥१७॥
संत धर्माचें क्षेत्र। संत स्वरूपाचें सत्पात्र।
नातरी पुण्याचि पवित्र। पुण्यभूमी ॥१८॥
संत समाधीचें मंदिर। संत विवेकाचें भांडार।
नातरी बोलिजे माहेर। सायुज्यमुक्तीचें ॥१९॥
संत सत्याचा निश्चयो। संत सार्थकाचा जयो।
संत प्राप्तीचा समयो। सिद्धस्वरूप ॥२०॥
मोक्षश्रिया अलंकृत। ऐसे हे संत श्रीमंत।
जीव दरिद्री असंख्यात। नृपती केले ॥२१॥
जे समर्थपणें उदार। जे कां अत्यंत दानशूर।
तयांचेनि हा ज्ञानविचार। दिधला न वचे ॥२२॥
महाराजे चक्रवर्ती। झाले आहेत पुढें होती।
परंतु कोणी सायुज्यमुक्ती। देणार नाहीं ॥२३॥
जें त्रैलोक्यीं नाहीं दान। तेंचि करिती संतसज्जन।
तया संतांचें महिमान। काय म्हणोनि वर्णावें ॥२४॥
जें त्रैलोक्याहूनि वेगळें। जें वेदश्रुतीसी नाकळे।
तेंचि जयांचेनि वोळे। परब्रह्म अंतरीं ॥२५॥

ऐसा संताचा महिमा। बोलिजे तितुकी उणी उपमा।
जयांचेनि मुख्य परमात्मा। प्रगट होय ॥२६॥

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा जो सहा-सात महिने मुक्काम झाला त्या मुक्कामात नागपूरचे श्री. बाळशास्त्री हरदास व ह. भ. प. श्री. गोविंदबुवा हरदास हे दोघे बंधुद्वय योगाभ्यास शिकण्यासाठी मुद्दाम आले होते. परंतु या दोघांपैकी ह. भ. प. श्रीगोविंदबुवा हरदास हेच फक्त योगाभ्यास शिकण्यास अधिकारी पुरुष असल्याने श्रीस्वामीमहाराजांनी त्यांनाच फक्त योगाभ्यासाची प्रक्रिया समजावून सांगितली व त्याप्रमाणे आपल्या समक्ष अभ्यास करवून घेतला. श्री. बाळशास्त्री हरदास हे योगाभ्यासाला अनधिकारी आहेत हे पाहून श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना मांडूक्य उपनिषद् श्रीमदाद्य शंकराचार्यांच्या भाष्यासह समजावून दिले.

श्रीस्वामीमहाराजांनी श्री. बाळशास्त्री हरदास यांना एकमात्र मांडूक्योपनिषदाचे भाष्य सांगण्याचे खरे कारण असे आहे की, या एकमात्र उपनिषदात सर्व उपनिषदांचे सार आले असून तेच मुमुक्षुजनांना मुक्ती प्रदान करण्यास समर्थ आहे, हे श्रीमारुतीरायांना सांगताना श्रीप्रभू रामचंद्रांनी मुक्तिकोपनिषदात असे म्हटले आहे की—

गुरूपदिष्टमार्गेण ध्यायन्मद्गुणमव्ययम्।
मत्सायुज्यं द्विजः सम्यग्भजेद्भ्रमरकीटवत् ॥१.२४॥
सैव सायुज्यमुक्तिः स्याद्ब्रह्मानन्दकरी शिवा।
चतुर्विधा तु या मुक्तिर्मदुपासनया भवेत् ॥२५॥
इयं कैवल्यमुक्तिस्तु केनोपायेन सिध्यति।
माण्डूक्यमेकमेवालं मुमुक्षूणां विमुक्तये ॥२६॥

ज्यावेळी श्रीगुरूंनी उपदेश केलेल्या मार्गाने साधक माझ्या अव्यय व निर्विकार स्वरूपाचे ध्यान करतो त्यावेळी तो भ्रमरकीटकाप्रमाणे

माझे सायुज्यपद प्राप्त करतो. हीच कल्याणकारक अशी ब्रह्मानन्द प्रदान करणारी सायुज्य मुक्ती आहे. माझ्या उपासनेमुळे सायुज्य, सारूप्य, सालोक्य व कैवल्य अशा चार प्रकारच्या मुक्ती प्राप्त होतात. त्यातील कैवल्य मुक्ती कोणत्या उपायाच्या अवलंबनाने सिद्ध होते हे सांगतो. एकमात्र मांडूक्योपनिषद हेच मुमुक्षूजनांना मुक्ती प्रदान करण्यास समर्थ आहे.

श्रीस्वामीमहाराजांनी श्री. बाळशास्त्री हरदास यांना श्रीमद् आद्यशंकराचार्य यांच्या भाष्यासह मांडूक्योपनिषदाचा जो अर्थ समजावून सांगितला त्याचा विचार श्रीस्वामीमहाराजांचे एक ज्ञानी भक्त श्री. चिंतामण गंगाधर भानू यांनी लिहिलेल्या मांडूक्योपनिषदाच्या भाष्यभाषांतरासह येथे साकल्याने प्रस्तुत केला तर त्याचा लाभ सर्व साधकवाचकांना झाल्याशिवाय राहणार नाही. श्रीमद आद्यशंकराचार्यांचे परात्पर गुरू श्रीमद् गौडपादाचार्य यांनी मांडूक्योपनिषदावर कारिका लिहून अद्वैत वेदान्ताचा पाया घातला आहे. अशा रीतीने अद्वैत वेदान्ताचे सर्व सार मांडूक्योपनिषदात, त्यावरील श्रीमदाद्य शंकराचार्यांच्या भाष्यात व त्यावरील श्रीमद् गौडपादाचार्यांच्या कारिकेत आला असल्यामुळे त्याचाच प्रचार श्रीस्वामीमहाराजांनी आयुष्यभर करून त्याची प्रतिष्ठा भारतभर पायी प्रवास करून व मुमुक्षूंना उपदेश देऊन मोठ्या हिरीरीने केल्याचे दिसून येते. अद्वैत वेदान्त हे श्रीस्वामीमहाराजांच्या जीविताचे निजगूज आहे. त्यामुळेच उपरोक्त अद्वैत वेदान्ताच्या साराचेही सार ज्यात समाविष्ट झाले आहे अशी श्रीमद् भगवद्गीतेवरील श्रीसदाशिवब्रह्मेंद्र लिखित वृत्ती त्यांनी स्वहस्ते लिहून ती सतत आपल्याजवळ बाळगली होती. लांबट कागदावर लिहिलेली ही वृत्ती श्रीस्वामीमहाराज प्रवासातही आपल्या कंबरेला बांधून घेत असत.

आता मांडूक्योपनिषद, त्याचे भाषांतर व त्यावरील श्रीमदाद्य शंकराचार्यांच्या भाष्याचे भाषांतर पाहून श्रीस्वामीमहाराजांच्या पराकोटीच्या प्रेमास्पद तत्त्वज्ञानाच्या अंतरंगात प्रवेश करून आपलेही जीवन धन्य व कृतार्थ करण्याचा प्रयत्न करू. श्रीस्वामी-महाराजांच्या चरणकृपेने त्यांच्या जीविताचे हे निजगूज आपल्याही अंत:करणात प्रतिष्ठित व्हावे म्हणून त्यांच्या चरणी अनन्यभावाने नम्र प्रार्थना आहे.

माण्डूक्योपनिषत्

॥ ॐ तत्सद् ब्रह्मणे नमः ॥

प्रज्ञानांशुप्रतानैः स्थिरचरनिकरव्यापिभिर्व्याप्य लोकान् ।
भुक्त्वा भोगान्स्थविष्ठान्पुनरपि धिषणोद्भासितान्कामजन्यान् ॥
पीत्वा सर्वान्विशेषान्स्वपिति मधुरभुङ्मायया भोजयन्नो ।
मायासंख्यातुरीयं परममृतमजं ब्रह्म यत्तन्नतोऽस्मि ॥ १ ॥

अर्थ :– चराचर समूहाला व्यापून टाकणाऱ्या ज्ञानरूप कूटस्थ सूर्याच्या किरणविस्तारांनी (जीवशरीरांनी) सर्व भुवनांना (विषयांना) व्यापून आणि सर्व स्थूल भोगांचा जागृतीत उपभोग घेऊन अविद्येने प्रेरिलेल्या कर्मांनी उत्पन्न झालेल्या मनोवासनेने पुन्हा प्रकाशित केलेल्या विषयांचा उपभोग स्वप्नात घेऊन आणि सर्व विशेष गिळून टाकून निद्रेमध्ये आनंदाचा उपभोग घेणारा व आपल्या मायेने आम्हा सर्वांना उपभोग घ्यावयास लावणारा जो परमात्मा झोपी जातो त्या तिन्ही अवस्थांच्या पलीकडे तुरीय अवस्थेत असणाऱ्या परम अमृतरूप व अजन्मा अशा परब्रह्माला मी नमस्कार करतो.

विवरण :– या नमनाच्या श्लोकात आचार्यांनी जागृतादि तिन्ही कल्पित अवस्थांचा उल्लेख करून शेवटी तुरीयावस्थेचा उल्लेख केला आहे आणि त्या अतिश्रेष्ठ व अमृत परब्रह्माला नमस्कार केला आहे. स्थूल भोग भोगण्याची जागरित अवस्था (विराट्त्व), पुढे वासनात्मक भोग भोगण्याची स्वाप्निक अवस्था (हिरण्यगर्भत्व), नंतर क्षशेष विशेष गिळून टाकून व टाकवून आनंद भोगण्याची व भोगविण्याची अविकृतावस्था आणि शेवटची तुरीयावस्था अशा या उपनिषदात विवेचित केलेल्या चारी अवस्थांचा उल्लेख करून, एकच ब्रह्म सर्वव्यापी आहे, असा सहज लीलेने पुढील विषयांचा उपोद्धातही केला आहे. येथे जीवब्रह्मैक्य हा विषय, जन्ममरणरहित असणारा जो मोक्ष त्याची प्राप्ती हे प्रयोजन सुचविले आहे आणि याप्रमाणे विषय व प्रयोजन सुचवून संबंध व अधिकारी यांचाही ध्वनी सूचित केला आहे. ॥ १ ॥

यो विश्वात्मा विधिजनविषयान्प्राश्य भोगान्स्थविष्ठान् ।
पश्चाच्चान्यान्स्वमतिविभवान् ज्योतिषा स्वेन सूक्ष्मान् ॥
सर्वानेतान्पुनरपि शनैः स्वात्मनि स्थापयित्वा ।
हित्वा सर्वान्विशेषान्विगतगुणगणः पात्वसौ नस्तुरीयः ॥२॥

अर्थः–वेदविहित आणि अविहित कर्मानि उत्पन्न झालेले स्थूल-सूक्ष्म भोगांचे प्राशन करून जो विश्वात्मक प्रत्यगात्मा सिद्ध होतो, पुन्हा आपल्या मतीने उत्पन्न केलेल्या दुसऱ्या भोगांचा आपल्या सतेज अंत:करणाने उपभोग घेऊन जो तैजस राहतो, त्यानन्तर पुन्हां हे सर्व भोग आपल्या स्वत:मध्ये हळूहळू लीन करणारा जो प्राज्ञ स्वरूपाने राहतो आणि सर्व विशेष निराकृत करून जो गुणगणशून्य होतो, तो तुरीयावस्थेमध्ये नित्य असणारा प्रत्यगात्मा आमचे संरक्षण करो.

विवरण :–या श्लोकात जीवात्म्याच्या चारी अवस्थांचे वर्णन करून जीवात्मा आणि परमात्मा वस्तुतः एकरूप आहेत, असे दाखविले आहे. मागील श्लोकात अस्तिरूप वर्णन आहे. या श्लोकात निषेधमुखाने वर्णन केले आहे. विश्वात्मा, तैजसात्मा, प्राज्ञ, हे अनुक्रमे जागृती, स्वप्न व सुषुप्ती यांचे अधिष्ठाते असून यांचा प्रत्यगात्मा व परमात्मा या स्वरूपांवर आरोप मात्र होतो. तुरीय हा सर्व–विलक्षण असून तोच एक आहे, असे सर्व इतर अवस्थांचा निषेध करून सांगितले आहे. स्थूलाचा अभिमान धरणारा विश्व सूक्ष्माचा अभिमानी तैजस, आनंदाचा प्राज्ञ, या तिन्ही अवस्था कल्पित आहेत व मोक्षमार्गाचा प्रतिरोध करणाऱ्या आहेत. यांचा त्याग या नमनात विहित केला आहे. ॥ २ ॥

ॐ भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाँसस्तनूभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ॥
भद्रं नो अपि वातय मनः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अन्वय व अर्थ :–देवाः कर्णेभिः भद्रं शृणुयाम (हे देव हो ! आमच्या कानांनी आम्हाला मंगल वृत्त ऐकण्यास येवो.) यजत्राः अक्षभिः भद्रं पश्येम (हे यज्ञसंरक्षक अग्नीत्यादि महानुभावांनो ! आमच्या डोळ्यांना मंगलवस्तूंचे दर्शन होवो.) तनूभिः स्थिरैः अंगैः तुष्टुवांसः (स्थिर अशा अंगोपांगांनी आम्ही परमेश्वराची सेवा व स्तुती करण्यासाठी तत्पर असावे.) यद् आयुः देवहितं व्यशेम (जोपर्यंत आयुष्य आहे, तोपर्यंत देव संतुष्ट होतील अशी आमची

व्यवस्था असू दे.) भद्रं नो अपि वातय मनः (हे मना ! आमचे कल्याण होईल, अशा स्वरूपाने राहा.)

सिद्धान्ती :– " ॐ हे जे मंगलावह अक्षर आहे, त्याचे आता आम्ही व्याख्यान करण्यास आरंभ करतो. " हे या उपनिषदातील पहिल्या मंत्राचे प्रास्ताविक वाक्य आहे. सर्व विश्व ओंकारात्मक आहे व ओंकार हा सर्व वेदांताच्या अर्थाचे सारसर्वस्व आहे. मांडूक्य उपनिषदामध्ये वेदान्ताच्या सारसर्वस्वाचे आविष्करण चार प्रकरणामध्ये केले आहे, म्हणून (ओंकार हा विषय शास्त्रशुद्ध असून त्याच्या द्वारे अधिकारी कोण ? गुरूला शरण कसे जावे ? जीव आणि ब्रह्म यांच्या ऐक्याला जे जे विरोध येतात, त्यांच्या परिहारांची साधने कोणती ? ब्रह्मात्मैक्य ज्ञानाचे फल काय ? इत्यादि प्रश्नांचा निर्णय करणारा जो पदार्थ, वेदांतव्याख्यान, त्याचे सार म्हणजे जीवात्म्याचे ऐक्य, त्याचा येथे निश्चयात्मक संग्रह या प्रकरणात केला आहे. म्हणून)–हे शास्त्रीय प्रकरण आहे. म्हणून शास्त्रास अवश्य असणाऱ्या संबंध, हेतू इत्यादि अनुबंधचतुष्टयाचा विचार येथे निराळा करण्याचे कारण नाही. वेदांतशास्त्रात संबंध, विषय, प्रयोजन इत्यादि जे अनुबंधचतुष्टय सांगितलेले असते, ते न सांगताही येथे ओघाने प्राप्तच होते. अशी जरी वस्तुस्थिती आहे, तथापि जो जो व्याख्याता कोणत्याही प्रकरणाचे प्रवचन करतो, त्याला अनुबंधचतुष्टयाचा विचार संक्षेपाने का होईना, पण करावा लागतो. म्हणून आम्ही आता संक्षेपतः अधिकारी, संबंध, विषय आणि प्रयोजन या चार वस्तूंचा विचार करतो.

सिद्धान्ती :–आता शास्त्र असो किंवा प्रकरण असो, ते कोणत्या-तरी प्रयोजनफलाची प्राप्ती परंपरेने करून देणारे असते; कारण

शास्त्राचा 'ज्ञान'रूपी साधन स्पष्ट करण्याचा हेतू असतो. अर्थातच त्याचा व विषयाचा संबंध निश्चित येतो. यावरून जरी साक्षात् नव्हे, तरी परंपरेने या शास्त्रप्रकरणाचा हेतू ब्रह्मज्ञान करून द्यावा, असा असतो. म्हणून ब्रह्मरूपविषयाशी व मोक्षनामक फलाशी या शास्त्राचा व प्रकरणाचा प्रतिपाद्यप्रतिपादकपरंपरेने संबंध स्पष्ट होतो. सारांश, हे शास्त्र विशेषसंबंध, विशेषविषय व विशेषफल सांगणारे होते. सारांश, मोक्षाचे साधन ब्रह्मज्ञान आहे. ब्रह्मज्ञान वेदांतशास्त्रानें होते. यामुळे शास्त्र व मोक्ष यांचा संबंध परंपरित असतो. असाच विषयादिकांचा शास्त्रांशी परंपरित संबंध प्राप्त होतो.

सिद्धान्ती :– या पुढे कोणी असे विचारील की, शास्त्राचे प्रयोजन तरी काय आहे ? या प्रश्नाचे उत्तर असे आहे. जो कोणी रोगाने जर्जर झाला असेल, त्याची रोगनिवृत्ती झाली म्हणजें त्याला स्वस्थता हे फल प्राप्त होते. याचप्रमाणे दुःखाने गांजून गेलेल्या जीवात्म्याच्या दुःखाचा उपशम द्वैतरूपी प्रपंचाचा नाश झाला असता मात्र होऊन त्याला स्वस्थता म्हणजे स्वरूपाची स्थिती प्राप्त होते; म्हणून अद्वैतनिश्चय करून " मी अद्वैत आहे, " अशी भावना करून देणे, हे शास्त्राचे प्रयोजन आहे. आता, द्वैतभावनेने निर्माण केलेला प्रपंच अविद्येने (अज्ञानाने) किंवा मायेने उत्पन्न झालेला असतो व त्याचा नाश विद्येने म्हणजे ब्रह्म आणि जीवात्मा यांचे एकत्व प्रतिपादन करणाऱ्या शास्त्राने होतो. असे आहे, म्हणून ब्रह्मविद्येचे प्रकाशन करण्यासाठी या प्रकरणाने आरंभ करतो, असे श्रुती म्हणते.

(येथे जीवात्म्याची नित्य असणारी आत्मस्थिती अज्ञानाने नाहीशी झाली आहे, असा भास होत असतो. हे उत्पन्न झालेले

अज्ञान नाहीसे करून पूर्वीच्या स्वरूपस्थितीचे ज्ञान निरावृत्त करावयाचे असते. सारांश, येथे नवीन स्थिती उत्पन्न करावयाची नाही. जीवास प्राप्त झालेले अज्ञान नाहीसे करावयाचे आहे. आणि हे ज्ञानाचे आविष्करण अज्ञानाच्या निरसनाने होते, हे तात्पर्य होय.)

सिद्धान्ती :– असे म्हटले आहे की, "जेथे द्वैत आहे, असा भास असतो, जेथे दुसरा पदार्थ आहे, असे मिथ्या ज्ञान होते, तेथे एक दुसऱ्याला पाहील, एकाला दुसऱ्याचे ज्ञान होईल, पण जेथे सर्वत्र आत्मस्वरूपाचे सर्वव्यापित्व असते, सर्वत्र ब्रह्म दिसते, तेथे कोण कोणाला पाहील, किंवा कोणाचे ज्ञान कोणाला होईल ?"

अर्थात् आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला असता, अज्ञानाने उत्पन्न झालेले द्वैत आणि द्वैतापासून निर्माण होणारे दुःख या सर्वांचा नाश श्रुतीच्या अर्थाने म्हणजे विचारशुद्ध ब्रह्मात्मैक्यज्ञानाने होतो. सारांश, आपला पुरुषार्थ या व अन्य श्रुतींनी सिद्ध होतो. श्रुतीचा विचार शास्त्र करते; म्हणून शास्त्रही प्रयोजनवत् होते. म्हणजे शास्त्राचे प्रयोजनत्व सिद्ध होते. याप्रमाणे ब्रह्म हा विषय, अज्ञानाचा निरास निर्मळ मनाने करू इच्छिणारा तो अधिकारी, मोक्ष हे फल आणि मोक्ष मिळविणे आणि मोक्ष देणे हा संबंध, असे अनुबंधचतुष्टय सिद्ध होते.

सिद्धान्ती :– आता प्रथमच अशी शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे की, "ओंकारस्वरूपाचा निर्णय झाला असता, तो आत्मतत्त्वप्राप्तीचे साधन कसा होतो ? ओंकारस्वरूपाच्या निर्णयाने ब्रह्मात्मधी (ब्रह्म आणि आत्मा ही एकच आहेत असे ज्ञान) कशी उत्पन्न व्हावी ? एका वस्तूचे यथार्थ ज्ञान झाले, म्हणून त्या ज्ञानाने दुसऱ्या वस्तूचे यथाभूत ज्ञान आपल्याला होत नाही. सारांश, येथे ओंकारज्ञान आणि आत्मज्ञान यांचा साध्यसाधन संबंध आहे, असे

सिद्ध होणे शक्य नाही. किंवा आत्मज्ञान हे ओंकारज्ञानाचे फलही नाही." यावर आमचे म्हणणे असे आहे की, आम्ही ओंकारस्वरूपाचा निर्णय आत्मस्वरूपाची प्राप्ती करून देतो, असे म्हटले आहे, ते अनुमानाच्या जोरावर म्हटले नाही. आमचे म्हणणे श्रुतींच्या आधारावर आहे. श्रुती हा आमचा बळकट पुरावा आहे. म्हणून आम्हास व्याप्तिमूलक साहचर्याचा अथवा कार्यकारणसंबंधाचा विचार करण्याचे कारण नाही. प्रत्यक्ष श्रुतिमाता आमच्या म्हणण्यास आधार आहे. "ओंकार हे सर्व आहे" "ओंकार श्रेष्ठ आलंबन आहे." "हे सत्यकाम! ओंकार अपर ब्रह्माचे व परब्रह्माचे प्रतीक व वाचक आहे." "ओंकार आत्मस्वरूप आहे," असे समजून ध्यानमूलक योगाभ्यास करावा. "ओंकार हे ब्रह्म आहे." "सर्व काही ओंकार मात्र आहे." इत्यादि अनेक श्रुती आमच्या म्हणण्याचे समर्थन करतात आणि ओंकारज्ञानाने ब्रह्मज्ञान होते, असे सांगतात. सारांश, ओंकाराचे ज्ञान होणे, हा ब्रह्मज्ञानप्राप्तीचा उपाय आहे, असे श्रुतिद्वारा सिद्ध होते. तसेच सर्प, रजत् इत्यादि भ्रांतिगतज्ञानाचे अधिष्ठान रज्जू, शुक्ती इत्यादिकांचे ज्ञान असते. रज्जू आहे म्हणून रज्जूवर सर्पाची भ्रांती होते, सर्पभ्रांतीचे अधिष्ठान रज्जू असते; याप्रमाणे आत्मा हा परमार्थ असून (सत्यस्वरूप असून) प्राणादिसारख्या उत्पन्न होणाऱ्या भ्रांतींचे अधिष्ठान असतो, आत्मस्वरूपावर प्राणादिकांची भ्रांती होते. पण रज्जूप्रमाणे आत्मवस्तू सत्य असते आणि तिच्यावर प्राणादिकांचा आरोप होतो. आता या आरोपांचे अधिष्ठान जसा आत्मा असतो त्याचप्रमाणे ओंकार हा सर्व वाक्प्रपंचाचे अधिष्ठान आहे. आपला हा सर्व वाक्प्रपंच ॐकारात्मक असतो. आपली ही सर्व नामरूपात्मक सृष्टी म्हणजे आत्म्यावर झालेल्या प्राणादिभ्रांतींची सृष्टी, म्हणजे वाक्प्रपंचाचा तात्पर्यतः

ओंकाराचा अभिधेय विषय असतो. सारांश, आत्मस्वरूपावर जसा प्राणादि मिथ्यावस्तूंचा आरोप होतो, तसाच ॐकाररूपी अधिष्ठानावर नामरूप वाक्प्रपंचाचा आरोप होत असतो. हे पूर्वोक्त श्रुतींचे सांगणे आहे. तात्पर्य, आत्मस्वरूप आणि ओंकारस्वरूप ही परमार्थतः एकच आहेत, असे श्रुती म्हणतात, म्हणून ओंकारस्वरूपाचे ज्ञान हे आत्मस्वरूपाचे ज्ञान करून देते.

सिद्धान्ती :—यावरून हे सिद्ध झाले की, सर्व नामस्वरूपात्मक सृष्टीचे अधिष्ठान आत्मरूप आहे, तसेच ओंकारस्वरूपही वाक्यप्रपंचाचे (नामजाताचे) अधिष्ठान आहे. ही स्वरूपे परस्पर भिन्न नसून एकात्मक आहेत. ओंकार म्हणजेच आत्मा; कारण ओंकार हे आत्म्याचे नाव आहे. आणि आत्मस्वरूपावर प्राणादिकांचे जे जे काही आरोप होतात त्या सर्वांची नामे म्हटली म्हणजे ओंकारशब्दापासून विकृत झालेल्या सर्व शब्दांची स्वरूपे होत. आत्मस्वरूपाचा वाचक ॐकार आहे. त्याप्रमाणे आत्मस्वरूपावर होणारे सर्व आरोपाचे वाचक शब्द म्हणजे ओंकारापासून निर्माण झालेले सर्व विकृत शब्द होत. सारांश, आत्मस्वरूपाचे नाव ओंकार आणि आत्मस्वरूपावर झालेल्या प्राणादि आरोपांचे वाचक शब्द म्हणजे ओंकाराची निरनिराळी विकृत स्वरूपे होत. नाव नाही, असा आत्म्याचा विकल्पच नाही. असो; अनेक श्रुती आम्ही म्हणतो याला प्रमाण आहेत. "या प्रपंचामध्ये भासमान होणारे सर्व पदार्थ नाममात्र आहेत. शब्दापलीकडे त्यात परमार्थतत्त्व असे काही नाही." "हा ब्रह्मस्वरूपावर भासमान होणारा सर्व प्रपंच ओंकाररूपी–ब्रह्मवाचक वाणीरूपी–तंतूपासून उत्पन्न झालेल्या नामरूपी जाळ्यांनी बांधून टाकलेला आहे." "हे सर्व प्रपंच–दर्शन नाममात्र आहे." या सर्व श्रुतींचा अभिप्राय एकच आहे.

(हा सर्व प्रपंच विवर्तरूप आहे, भ्रांतिरूप आहे. आणि याचे अधिष्ठान ब्रह्म आहे. या प्रपंचात जी अनंत नामरूपे दिसतात, ती सर्व ब्रह्मवाचक ओंकाराचे विकार आहेत. सारांश, ब्रह्म म्हणजे ओंकार, आणि हा सर्व प्रपंच म्हणजे ओंकाराची निरनिराळी विकृतरूपे होत. म्हणून ओंकाराचे ज्ञान झाले असता ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान होते, असे श्रुतींचे सांगणे आहे.)

सिद्धान्ती :– म्हणून पहिल्या मंत्राचा अवतार करून श्रुती म्हणते–

मंत्र पहिला

हरिः ॐ। ओमित्येतदक्षरमिदं सर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोंकार एव। यच्चान्यत्त्रिकालातीतं तदप्योंकार एव ॥ १ ॥

अन्वय व अर्थ :– ॐ इति एतत् अक्षरं (ॐ हे अक्षर, हे परब्रह्म आहे.) इदं सर्वं तस्य उपव्याख्यानं; भूतं, भवत्, भविष्यत् इति सर्वं ओंकारः एव (हे सर्व दृश्य विश्व त्याचे उपव्याख्यान आहे, सर्व भूत, भविष्य, वर्तमान जे काही आहे ते सर्व ओंकार हेच आहे.) यत् च अन्यत् त्रिकालातीतं तत् अपि ओंकारः एव (जे काही दुसरे त्रिकालाच्या पलीकडे आहे, ते सर्वही ओंकारमात्र आहे.)॥१॥

सारांश, विश्वातील सर्व पदार्थ म्हणजे तिन्ही कालात असणारे व त्रिकालाच्याही पलीकडे असणारे सर्व मूर्तामूर्त पदार्थ ॐकाररूपी आहेत. ॥ १ ॥

सिद्धान्ती :– विश्वामध्ये जे सर्व काही दिसत भासत आहे, ते सर्व ओंकारात्मक आहे, असा मंत्रारंभ आहे. ओंकार हा अक्षर म्हणजे अविनाशी आहे व तोच परमात्मा आहे. कारण, जो जो पदार्थ नाम–ग्रहण करण्यास योग्य आहे, त्याचा व त्याच्या नावाचा

नित्य संबंध असतो. म्हणजे पदार्थ व त्याचे नाव ही दोन्ही साहचर्याने राहतात. त्यांचा वियोग केव्हाही होत नाही. पुन्हा ओंकाराचा विकार असणारे नाम आणि ओंकार यांची सहचारिता नित्य आहे. म्हणून वाच्यपदार्थ आणि ॐकारवाचक नामे ही सर्व ॐकाराभिन्न व ॐकारस्वरूपी आहेत. इतकेच काय; पण परब्रह्म-सुद्धा ज्यावेळी परोक्षतः ज्ञात होते, त्यावेळी कोणत्या तरी नामाने मात्र ते अवगत होते, म्हणून परब्रह्मही नामग्रहण करण्यास योग्य असते! तसेच नाम असणाऱ्या पदार्थांची व त्याच्या नामाची व्याप्ती अखंड आहे. म्हणून परब्रह्मही ॐकारात्मक होते. अर्थात् हे परब्रह्म म्हणजे विश्वाचे अधिष्ठान असणारे ब्रह्म होय. सारांश, वाचकब्रह्म ॐकाररूपी असल्यामुळे लक्ष्यब्रह्मही ॐकाराच्या साहाय्याने लक्षित होते. तात्पर्य, वाणीच्या पलीकडे जे ज्ञानरूप ब्रह्म आहे, ते मात्र ॐकारस्वरूपाने किंवा ॐकारनामाने गोचर होत नाही, हे खरे; तरी ते चिन्मात्र परब्रह्म ॐकारध्यानाने लक्षित होते. असे पाहा की, झाडाच्या फांदीवर चंद्र आहे, तसे जसे आपण लक्षणेने चंद्रज्ञान करून देतो घेतो, तसाच ॐकार हा ब्रह्मस्वरूपाचा लक्षक होतो. याप्रमाणे सर्व ॐकार आहे, हे ठरले. असो; पर आणि अपर ब्रह्म-स्वरूपाचा – अविनाशी ब्रह्मस्वरूपाचा – ॐकार हा जो वाचक शब्द आहे, तोच पर व अपर ब्रह्माचे उत्तम उपव्याख्यान आहे. हे उपव्याख्यान समजून देण्यासाठी श्रुती म्हणते–

शिष्य :– उपव्याख्यान म्हणजे विशेष स्पष्टीकरण करून पदार्थाचे विस्तृत स्वरूपवर्णन आहे काय?

सिद्धान्ती :– होय. ॐकार हा ब्रह्मस्वरूपाचा निकटवर्ती असणारा पदार्थ असल्यामुळे तो ब्रह्मज्ञानाचा, म्हणजे ब्रह्मप्राप्तीचा उत्तम उपाय असतो. सारांश, ॐकार हा ब्रह्मप्राप्तीचे उत्तम साधन

असल्यामुळे ॐकाराचे स्वरूप उत्तम रीतीने समजून घेणे प्रस्तुत प्रसंगी योग्यच आहे. मागे जो न्याय सांगितला, जे प्रमाणसिद्ध व्याख्यान केले, त्यावरून हे स्पष्ट होते की, भूत–भविष्य–वर्तमान-काली (तिन्ही कालात) जे जे वाच्य पदार्थ असतात व दिसतात, त्या सर्वांचे वाचक ॐकारस्वरूपी आहेत व असले पाहिजेत. त्याच-प्रमाणे त्रिकालाच्या पलीकडे जे काही आहे, जे त्रिकालातीत आहे आणि कार्यावरूनच मात्र ज्याची कल्पना करता येते, त्या अव्याकृत, प्रधान वस्तू आणि इतर कालातीत वस्तूही ॐकारात्मक आहेत. सारांश, कालास गोचर असणाऱ्या व गोचर नसणाऱ्या सर्व वाच्य वस्तू ॐकारस्वरूपाच्या, ॐकारोत्पन्न शब्दात्मक, वाचकस्वरूपाच्या आहेत. ॥ १ ॥

सिद्धान्ती :– मागच्या मंत्रात नाम आणि नाम असणारी वस्तू, ह्या दोन्ही एकस्वरूपी आहेत, असे सांगितले; तथापि तेथे नाम-प्राधान्याने (नाम हीच प्रधान वस्तू आहे, अशा स्वरूपाने) या एकत्वाचा निर्देश झाला आहे. म्हणजे हे सर्व काही दिसणारे व न दिसणारे पदार्थजात ओंकारात्मक आहे, असा नामप्राधान्याने मात्र निर्देश केला आहे; पण या निर्देशाने वाच्यवाचकांचे एकत्व एक-देशी होते; म्हणून या दुसऱ्या मंत्रात अभिधेयप्राधान्याने (नाम ग्रहण) करण्यास योग्य असणारी वस्तू प्रधान आहे असे समजून) ओंकाराचा निर्देश केला. हेतू हा आहे की, वाच्य आणि वाचक यांमध्ये असणारे एकत्व स्पष्ट प्रतीतीला यावे असे केले नाही तर (वाच्य आणि वाचक ही दोन्ही एका योग्यतेची आहेत, असे सांगितले नाही तर) वाचक शब्दाच्या तंत्राने मात्र वाच्य वस्तूचे ज्ञान होते, असे होऊन एकत्वाला गौणत्व प्राप्त होईल. वाचक शब्दाचे (साधनाचे) व वाच्यवस्तूचे (साध्यवस्तूचे) एकत्व कमी

योग्यतेचे आहे, अशी शंका प्राप्त होईल ! म्हणून श्रुतीने या मंत्रात वाच्यप्रधानत्वाने ओंकाराचा निर्देश केला आहे. वर सांगितल्या-प्रमाणे हेतू हा आहे की, वाच्यवाचकांचे एकत्व अथवा तादात्म्य स्पष्ट प्रतीत व्हावे. हे तादात्म्य स्पष्ट झाले म्हणजे, एकप्रयत्नाने (एकदम) वाच्यवाचकांचा प्रविलाप करता येऊन (वाच्यवाचकांचा निरास एकदम करता येऊन) त्यांच्याहून विलक्षण असणारे जे ब्रह्म, त्याची प्राप्ती सहज होईल. उघड आहे की, वाच्याचा निरास आणि वाचकाचा निरास असे दोन निरास करण्याचे परिश्रम होण्याच्या ऐवजी वाच्य – वाचक एकात्मक आहेत, असे समजले म्हणजे – उभयतांचा निरास एकदम करण्याचे कार्य लीलेने सिद्ध होते; आणि या उभयतांहून निराळे असणारे ब्रह्म प्रतीत होते. हाच अभिप्राय मनात आणून पुढेही श्रुती असे सांगेल की, " आत्म्याचे चरण ह्या ॐकारमात्रा आहेत, आणि ॐकारमात्रा ह्या आत्म्याचे चरण आहेत. " सारांश, मात्रा आणि चरण एकरूप व एकच आहेत, असे श्रुती पुढे सांगणारच आहे. असो; श्रुती म्हणत आहे की,–

मंत्र दुसरा

सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥ २ ॥

अन्वय व अर्थ :– एतत् हि सर्वं ब्रह्म (हे सर्व ब्रह्म आहे.) अयं आत्मा ब्रह्म (जीवात्मा ब्रह्म आहे.) सः अयं आत्मा चतुष्पात् (तो हा आत्मा चार पायांचा आहे.) ॥ २ ॥

सारांश, हे सर्व विश्व आणि त्याला पाहणारा जीवात्मा ब्रह्मरूप असून त्याला चार पाय असतात. हा वाच्यप्रधान निर्देश होय. ॥ २ ॥

सिद्धान्ती :– सर्वं कार्यं आणि कारण ब्रह्मरूप आहे. यच्च यावत् कार्ये ब्रह्म आणि कारणे ब्रह्मरूप असतात. कारण मागे जे जे काही ओंकारात्मक म्हणून सांगितले आहे, ते ते परब्रह्मरूप आहे. आता कोणी असे म्हणेल की, पहिल्या मंत्रात व येथें ब्रह्माचे कथन परोक्ष झाले. प्रत्यक्ष झाले नाही. ही शंका निवारण करण्यासाठी श्रुती ब्रह्माचा प्रत्यक्ष निर्देश विशेषत: करून सांगते की, हा आत्माही ब्रह्म आहे. ज्याला पुढे चार पाय आहेत, असे सांगावयाचे आहे. आत्म्याला चार पाय आहेत असे ज्या आत्म्याचे विभाजन करावयाचे आहे– त्याचे भाग सांगावयाचे आहेत.– त्या प्रत्यगात्मद्वारा परमात्म्याचा निर्देश श्रुती 'हा' या समीपदर्शक सर्वनामाने करीत आहे.–आपण छातीला हात लावून "हा मी" असा आपल्या स्वत:च्या संबंधाने निर्देश करतो, त्याप्रमाणे 'हा' या सर्वनामाचा उपयोग करून श्रुतीने जीवात्म्याच्या द्वारे 'हा आत्मा' असा निर्देश केला आहे.–या आत्म्याचेही ओंकारनामाने ग्रहण होते. हा आत्मा पर आणि अपर (श्रेष्ठ आणि कनिष्ठ) अशा स्वरूपाचा असतो. याला चार पाय आहेत; पण गायीला चार पाय वास्तविक असतात, त्या प्रकारचे हे पाय नव्हेत. तर कार्षापण या नावाचे जे एक नाणे असते, त्याच्या संबंधाने 'चार अंश' आहेत, असे आपण म्हणतो, तसे हे आत्म्याचे चार पाय असतात.

शिष्य :– पाद (पाय) म्हणजे काय ?

सिद्धान्ती :– पुढे श्रुती विश्व, तैजस आणि प्राज्ञ या आभासिक आत्म्यांचा उल्लेख करणार आहे. तो अशा करिता की, विश्वाचा लय तैजसात, तैजसाचा प्राज्ञात करून तुरीय जो आत्मा त्याची प्राप्ती व्हावी. असा हेतू मनात आणून श्रुतीने पाद शब्दाची योजना केली आहे. पाद म्हणजे करण, साधन, होय. कारण, त्याच्या

योगाने तुरीय ब्रह्माची प्राप्ती होते. ब्रह्मप्राप्तीचे करण म्हणजे पाद होय. कुंभकाराचा दांडा हे जसे करण (साधन) त्याप्रमाणे पाद हे ब्रह्मप्राप्तीचे साधन होय. यांच्या योगाने ब्रह्मप्राप्ती होते; पण तुरीय ब्रह्माचीही पादामध्ये गणना आहे; म्हणून तुरीय हेही एक करण होईल ! अशी शंका मनात आणून पाद म्हणजे तुरीयाकडे नेणारे कर्मसाधन असा याचा अर्थ आचार्यांनी केला आहे. तात्पर्य, पद म्हणजे विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय हे विभाग होत. हे विभाग आभासिक आहेत, वास्तविक नाहीत. ॥ २ ॥

सिद्धान्ती :–अवयवशून्य आत्म्याला चार पाद आहेत, असे श्रुती म्हणते, हे कसे ? अवयवशून्याला अवयव कसे ? अशी शंका येईल, म्हणून म्हणतात–

मंत्र तिसरा

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ :–जागरितस्थानः, बहिष्प्रज्ञः, सप्ताङ्गः, एकोनविंशतिमुखः, स्थूलभुक्, वैश्वानरः प्रथमः पादः (ज्याचे स्थान जागरित अवस्था हे आहे, ज्याची प्रज्ञा बाहेरील विषय बघते; ज्याला सात अंगे आहेत, ज्याला एकोणीस मुखे आहेत; जो स्थूलवस्तूंचे भक्षण करतो, तो वैश्वानर म्हणजे आत्म्याचा प्रथम पाद आहे.) ॥ ३ ॥

सिद्धांती :– ज्याचा विषय अथवा स्थान (अभिमान) जागृत अवस्था हा आहे, तो जागृत अवस्थेचा अभिमानी होय. आत्मव्यतिरिक्त जे बाह्य विषय आहेत, ते ग्रहण करण्याविषयी मात्र ज्याची प्रज्ञा समर्थ आहे, तो बहिष्प्रज्ञ होय. वस्तुतः पाहिले असता बाहेरचे विषय परमार्थतः नाहीत, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. म्हणून

सिद्धान्ती :– सर्वं कार्यं आणि कारण ब्रह्मरूप आहे. यच्च यावत् कार्ये ब्रह्म आणि कारणे ब्रह्मरूप असतात. कारण मागे जे जे काही ओंकारात्मक म्हणून सांगितले आहे, ते ते परब्रह्मरूप आहे. आता कोणी असे म्हणेल की, पहिल्या मंत्रात व येथे ब्रह्माचे कथन परोक्ष झाले. प्रत्यक्ष झाले नाही. ही शंका निवारण करण्यासाठी श्रुती ब्रह्माचा प्रत्यक्ष निर्देश विशेषत: करून सांगते की, हा आत्माही ब्रह्म आहे. ज्याला पुढे चार पाय आहेत, असे सांगावयाचे आहे. आत्म्याला चार पाय आहेत असे ज्या आत्म्याचे विभाजन करा-वयाचे आहे – त्याचे भाग सांगावयाचे आहेत.– त्या प्रत्यगात्म-द्वारा परमात्म्याचा निर्देश श्रुती 'हा' या समीपदर्शक सर्वनामाने करीत आहे.–आपण छातीला हात लावून "हा मी" असा आपल्या स्वत:च्या संबंधाने निर्देश करतो, त्याप्रमाणे 'हा' या सर्वनामाचा उपयोग करून श्रुतीने जीवात्म्याच्या द्वारे 'हा आत्मा' असा निर्देश केला आहे.–या आत्म्याचेही ओंकारनामाने ग्रहण होते. हा आत्मा पर आणि अपर (श्रेष्ठ आणि कनिष्ठ) अशा स्वरूपाचा असतो. याला चार पाय आहेत; पण गायीला चार पाय वास्तविक असतात, त्या प्रकारचे हे पाय नव्हेत. तर कार्षापण या नावाचे जे एक नाणे असते, त्याच्या संबंधाने 'चार अंश' आहेत, असे आपण म्हणतो, तसे हे आत्म्याचे चार पाय असतात.

शिष्य :– पाद (पाय) म्हणजे काय ?

सिद्धान्ती :– पुढे श्रुती विश्व, तैजस आणि प्राज्ञ या आभासिक आत्म्यांचा उल्लेख करणार आहे. तो अशा करिता की, विश्वाचा लय तैजसात, तैजसाचा प्राज्ञात करून तुरीय जो आत्मा त्याची प्राप्ती व्हावी. असा हेतू मनात आणून श्रुतीने पाद शब्दाची योजना केली आहे. पाद म्हणजे करण, साधन, होय. कारण, त्याच्या

योगाने तुरीय ब्रह्माची प्राप्ती होते. ब्रह्मप्राप्तीचे करण म्हणजे पाद होय. कुंभकाराचा दांडा हे जसे करण (साधन) त्याप्रमाणे पाद हे ब्रह्मप्राप्तीचे साधन होय. यांच्या योगाने ब्रह्मप्राप्ती होते; पण तुरीय ब्रह्माचीही पादामध्ये गणना आहे; म्हणून तुरीय हेही एक करण होईल! अशी शंका मनात आणून पाद म्हणजे तुरीयाकडे नेणारे कर्मसाधन असा याचा अर्थ आचार्यांनी केला आहे. तात्पर्य, पद म्हणजे विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय हे विभाग होत. हे विभाग आभासिक आहेत, वास्तविक नाहीत. ॥ २ ॥

सिद्धान्ती :—अवयवशून्य आत्म्याला चार पाद आहेत, असे श्रुती म्हणते, हे कसे ? अवयवशून्याला अवयव कसे ? अशी शंका येईल, म्हणून म्हणतात—

मंत्र तिसरा

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥ ३ ॥

अन्वय व अर्थ :—जागरितस्थानः, बहिष्प्रज्ञः, सप्ताङ्गः, एकोनविंशतिमुखः, स्थूलभुक्, वैश्वानरः प्रथमः पादः (ज्याचे स्थान जागरित अवस्था हे आहे, ज्याची प्रज्ञा बाहेरील विषय बघते; ज्याला सात अंगे आहेत, ज्याला एकोणीस मुखे आहेत; जो स्थूलवस्तूंचे भक्षण करतो, तो वैश्वानर म्हणजे आत्म्याचा प्रथम पाद आहे.) ॥ ३ ॥

सिद्धांती :— ज्याचा विषय अथवा स्थान (अभिमान) जागृत अवस्था हा आहे, तो जागृत अवस्थेचा अभिमानी होय. आत्मव्यतिरिक्त जे बाह्य विषय आहेत, ते ग्रहण करण्याविषयी मात्र ज्याची प्रज्ञा समर्थ आहे, तो बहिष्प्रज्ञ होय. वस्तुतः पाहिले असता बाहेरचे विषय परमार्थतः नाहीत, असा श्रुतीचा अभिप्राय आहे. म्हणून

आचार्यांनी अविद्येने सिद्ध झालेली प्रज्ञा जणू काही परमार्थतः नसलेल्या विषयाचे, व्यावहारिक विषयाचे, ग्रहण करते, म्हणून हे विषयग्रहण काल्पनिक अथवा प्रातिभासिक आहेत, असे सुचविण्यासाठी 'बहिर्विषया इव (बाहेरचेच विषय जणू जिचे आहेत) ' असे म्हटले आहे. सारांश, अज्ञानकल्पित बुद्धी प्रातिभासिक (भासमान होणाऱ्या परंतु वस्तुतः न असणाऱ्या) बाह्य विषयांचे मात्र ग्रहण करते. म्हणून बहिष्प्रज्ञ असे श्रुतीने वैश्वानराला विशेषण दिले आहे. त्याला सात अंगे आहेत. " त्या ह्या वैश्वानर नामक आत्म्याचे मस्तक तेजस्वी द्युलोक आहे. अनेक प्रकारची स्वरूपे असणारा सूर्य हा त्याचा चक्षू आहे. नानाविध मार्गांनी संचार करणे, हा ज्याचा स्वभाव आहे, तो वायू वैश्वानराचा प्राण होय. विस्तीर्णत्व हा गुण असणारे आकाश वैश्वानराचा मध्यभाग आहे. रयी म्हणजे अन्न; त्याचा हेतू जे उदक, ते या वैश्वानराचे मूत्रस्थान आहे, आणि सर्वांस आधार देणारी पृथ्वी त्याचे दोन पाय आहेत, " अशी छांदोग्यश्रुतीने अग्निहोत्र कल्पना केली आहे व असे तेथे म्हटले आहे. त्यातील एकशेष भाग म्हणजे आहवनीय अग्नी होय, " हा अग्नी वैश्वानराचे मुख आहे. " (पाहा छां. ५–१८–२) यावरून अग्नी हा वैश्वानराचे मुख होय असा भाग झाला. याप्रमाणे ही त्याची सात अंगे आहेत, असे समजावे. त्याला सप्तांग म्हणतात. तसेच वैश्वानराला एकोणीस मुखे आहेत. ती–पांच ज्ञानेंद्रिये, पांच कर्मेंद्रिये, पांच प्राणादि वायू, मिळून पंधरा झाली व मन, बुद्धी, अहंकार आणि चित्त मिळून एकोणीस होतात. ही आत्म्याच्या उपलब्धीची द्वारे होतात, आत्मा प्रकट करतात, म्हणून यांना आत्म्याची जणू काही मुखेच आहेत, असे श्रुतीने साहजिकच अलंकारिक भाषेने म्हटले आहे. याप्रमाणे विशिष्ट स्वरूपाचा

'वैश्वानर' आताच सांगितलेल्या मुखांनी शब्दादि स्थूल विषयांचा उपभोग घेतो, म्हणून ह्याला 'स्थूलभुक्' असे नाव दिले आहे. त्याला वैश्वानर असे म्हणतात. कारण हा विश्व (वैश्वानर) सर्व जीवांना अनंत प्रकाराने सुखदुःखादि उपभोग तत्तत्कर्मानुसार प्राप्त करून देतो. विश्व म्हणजे सर्व, नर म्हणजे जीव (परमेश्वराच्या ताब्यात असणारे) आहेत, म्हणून याला वैश्वानर हे नाव आहे. किंवा सर्व शरीरात जे जीवात्मे आहेत, त्यांच्या पारमार्थिक स्वरूपाहून ज्याचे स्वरूप भिन्न नाही, तो विश्व, आणि असा नर तो वैश्वानर. असाही कर्मधारय समास करून अर्थ करिता येईल. याला 'पहिला पाय' असे म्हटले, कारण याचा पहिल्या प्रथम स्वीकार करावा, तेव्हा दुसऱ्या पादाचे ज्ञान होते. म्हणून मात्र याला प्रथमस्थान श्रुतीने दिले आहे. निरास करावयाचा, तेव्हा प्रथम स्थूलभुक् वैश्वानराचा निरास करावा लागतो. म्हणून याला प्रथमत्व येते. याप्रमाणे हा जागृतिस्थितीत असणारा, बाह्यप्रज्ञ, सप्तांगी, एकोणीस तोंडांचा, दृश्य विषयांचा भोक्ता, वैश्वानररूपी आत्मा हा प्रथम चरण आहे, असे श्रुतीचे म्हणणे आहे.

सिद्धान्ती :–आता "हा आत्मा, ब्रह्म आहे" अशी प्रत्यगात्म्याच्या संबंधाने व प्रत्यगात्म्याच्या चतुष्पादत्वासंबंधाने विवादवस्तू असता द्युलोकादि ह्या प्रत्यगात्म्याची मस्तकादि अंगे आहेत, असे कशाला अप्रस्तुत व्याख्यान करता? अशी शंका येईल. "हा जीवात्मा ब्रह्म आहे, असे दुसऱ्या मंत्रात सांगितले असता, ह्या आत्म्याला द्युलोकादि विश्वातील भाग प्रत्यगात्म्याचे अवयव होतात असे कशाला सांगता ?" पण अशी शंका येण्याचे कारण नाही. कारण आध्यात्मिक आणि आधिदैविक स्वरूपांमध्ये भेद नाही, म्हणून आधिदैविकासह सर्व आध्यात्मिक प्रपंचाचे, सर्व स्थूलपदार्थांचे

चतुष्पादत्व सांगावयाचे आहे; ते याच आत्म्याचे (विराट्, हिरण्यगर्भ, अविकृत आणि सच्चिदानंद हे आधिदैविक आत्म्याचे व वैश्वानर, तैजस, प्राज्ञ आणि तुरीय हे आध्यात्मिक आत्म्याचे कल्पित भाग होत. हे या आत्म्याच्या) संबंधाने सांगावयाचे आहे. म्हणून द्युलोकादिकांचा मूर्धांगत्वाने उल्लेख केला आहे. तो यथायोग्यच आहे. सारांश, मागील द्युलोकादि विषयाचा अवतार प्रस्तुत आहे, अप्रस्तुत नाही. स्थूल प्रपंपाचाचे प्रथम पादत्व विराट् व वैश्वानर स्वरूपाने सांगितले, हे तात्पर्य होय.

(शंका अशी आहे की, जीवात्म्याचे वर्णन चालले असता विराटाच्या अंगांचा विचार श्रुतीने कसा प्रस्तुत केला. आचार्य म्हणतात, की हा दोष नाही; कारण की, आध्यात्मिक जीवात्म्याचे जे चार चरण कल्पित होतात, तेच आधिदैविक आत्म्याचे होतात, हे श्रुतीला मुख्यत: सांगावयाचे आहे, आणि जीवाम्यैक्य सिद्ध करावयाचे आहे. जीवात्म्याच्या विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय अशा चार अवस्था असतात. तशाच आधिदैविक आत्म्याच्या विराट्, हिरण्यगर्भ, अविकृत आणि सच्चिदानंद असा चार अवस्था असतात. म्हणून विराट् व विश्व एकच स्वरूपाचे आहेत, हे दाखविण्यासाठी आधिदैविक स्वरूपाचा श्रुतीने अवतार केला आहे.)

सिद्धान्ती :— असे एकत्व ज्ञान होऊन सर्व प्रपंचाचा उपशम होईल तर मात्र अद्वैताची सिद्धी होईल. आणि सर्व भूतांमध्ये राहणारा आत्मा एक व अद्वितीय आहे. असा आपण पाहिला व समजून घेतला, असे होईल. तसेच सर्वभूते आत्म्यामध्ये आहेत असेही आपण पाहू लागू. तात्पर्य "जो सर्वभूते आत्म्यामध्ये आहेत," इत्यादि श्रुतीचा अर्थ उपसंहृत केला म्हणजे असेच तात्पर्य निवते, असे होईल. पण, ही चतुष्पादत्वाची कल्पना घेतली नाही तर, "प्रत्येक देहाने

मर्यादित झालेला जीव हाच प्रतिदेही निराळा प्रत्यगात्मा आहे," असे कापिलसांख्य म्हणतात, तसेच आपल्यासही म्हणावे लागेल. एकदा "आत्मे अनंत आहेत," असे सांख्याप्रमाणे आपण म्हणू लागलो म्हणजे अपौरुषेय श्रुतीचा विशेष जे अद्वैतज्ञान ते नाहीसे होऊन अपौरुषेय श्रुती आणि मानवी सांख्यस्मृती एकाच किंमतीच्या होतील व श्रुतीच्या उपदेशाची अपेक्षा राहणार नाही. पण असें होणे इष्ट नाही.

सिद्धान्ती :— सर्व उपनिषदांमध्ये अनंत जीवांचे आत्मे एकरूपी आहेत, सर्व जीवांमध्ये एकच आत्मा वास्तव्य करीत आहे, असे स्पष्टीकरण झाले आहे. श्रुतीला अनेक आत्मे मान्यच नाहीत. म्हणून आध्यात्मिक जो पिंडात्मा त्याचे, द्युलोकादि शिर आहे. ज्याचे असा जो आधिदैविक विराट आत्मा, त्याच्याशी तादात्म्य आहे, —अंगोपांगे एक आहेत म्हणून, जीवात्म्याचे विराट्स्वरूपाशी ऐक्यत्व असणे योग्यच आहे. हा अभिप्राय मनामध्ये घेऊन या मंत्रात श्रुतीने "सप्तांग" असे विश्वाचे, जीवात्म्याचे, स्वरूपवर्णन केले आहे. श्रुतीने "सप्तांग" हे विशेषण विश्वाला दिले आहे, ते सर्वश्रुतींना आध्यात्मिक व आधिदैविक आत्म्यांचे एकत्व इष्ट आहे. हा अभिप्राय लक्षात ठेऊन दिले आहे, ते योग्यच होय. छांदोग्यामध्ये "तुझे शिर खाली पडेल" असे जे श्रुतिवाक्य आहे, त्यावरून स्पष्ट होते की, व्यस्त उपासनेची निंदा आणि समस्त उपासनेच्या विधीची विहितता स्थापन करणे हे श्रुतीला इष्ट आहे. (जीवाने समस्त जो आत्मा त्याची उपासना करावी हा अभिप्राय मनात ठेवून पिंडात्म्याच्या एकांगी उपासनेची निंदा केली आहे.) या निंदेच्या चिन्हावरून स्पष्ट होते की, श्रुतीला विराट् आत्म्याची व विश्वाची एकता अभीष्ट आहे.

सिद्धान्ती :–पिंडात्म्याचे विराट् आत्म्याशी एकत्व सांगितले ते केवळ उपलक्षण होय. यावरून हिरण्यगर्भ आणि अव्याकृत यांचेही एकत्व पिंडात्म्याशी (तैजस व प्राज्ञ यांच्याशी) आहे असे सांगण्याचा श्रुत्यभिप्राय आहे, हे उघड होते. मधुब्राह्मणामध्ये असे म्हटले आहे की, "हा जो आमचा जीवात्मा आहे, तो आणि या पृथ्वीमध्ये जो तेजोमय आणि अमृतमय आत्मा आहे"–ते एकरूप आहेत–हे वाक्य स्पष्ट सांगते की, तैजस आणि हिरण्यगर्भ हे एकरूप होत. सुषुप्त (प्राज्ञ) आणि अव्याकृत या उभयतांचे एकत्व तर सिद्धच आहे, कारण त्यांमध्ये कोणताही विशेष नाही. उभयता ही निर्विशेष आहेत, उभयतास विशेषाचे भान नसते. सारांश, विश्व आणि विराट्, तैजस आणि हिरण्यगर्भ, प्राज्ञ आणि अव्याकृत हे सर्व समान धर्मांचे आहेत, म्हणून (यात काही विशेष नाहीत म्हणून) एकच आहेत, असे सिद्ध होते. अर्थातच याप्रमाणे सर्व द्वैताचा निरास होऊन एक अद्वैत मात्र सिद्ध होते.

(तात्पर्य हे आहे की, बाह्यदृष्टी असणारा, जागृतस्थितीत असणारा, जीवात्मा स्वरूपतः परमात्मा असतो.) ॥ ३ ॥

मंत्र चवथा

स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक्तैजसो द्वितीयः पादः ॥ ४ ॥

अन्वय व अर्थः–स्वप्नस्थानः, अंतःप्रज्ञः, सप्तांगः, एकोनविंशतिमुखः, प्रविविक्तभुक्, तैजसः, द्वितीयः पादः (स्वप्न हे ज्याचे स्थान आहे, जो अंतर्यामातील वासनादिकांचा ज्ञाता आहे, ज्याला सात अंगे आहेत, एकोणीस मुखे आहेत, जो वासनेचा, सूक्ष्माचा मात्र उपभोग घेतो तो आत्म्याचा तैजस नामक द्वितीय चरण आहे.) हे द्वितीय चरणाचे वर्णन आहे. ॥ ४ ॥

सिद्धान्ती :— तैजस नामक आत्म्याचे वसतिस्थान स्वप्न हे आहे. म्हणून त्याला स्वप्नस्थान हे नाव आहे. स्वप्न हा याचा विषय आहे. आता, जागृतस्थितीत असणारी प्रज्ञा (बुद्धी) अनेकसाधनात्मक असते. बाह्य विषय समजून घेण्याला या प्रज्ञेला अनेक इंद्रिये असतात; म्हणून ती जणू काही बाह्यविषयरूपाने प्रकाशित होणारी अशी प्रकट होते असे दिसते. पण वास्तविक प्रकार असा की, तीच मनाचे स्पंदनरूप होते; ती परमार्थतः नाहीच. तथापि ही प्रातिभासिक बहिःप्रज्ञा त्या स्वस्वरूपाने उत्पन्न झालेले संस्कार मनामध्ये धारण करते.

(जागृत स्थितीतील जीवात्म्याची बुद्धी ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने व्यापार करीत असते, म्हणून सामान्यतः असे वाटते की, तीच सर्व बाहेरचे ज्ञानविषय आहे. बाहेरचे विषय प्रकट करणारी असे तिचे स्वरूप दिसते; पण काळजीपूर्वक पाहिले असता बाहेरचे विषय म्हणजे, आपल्या मनाचा व्यापार असणारे कल्पित विषय होत. म्हणून जीवाच्या मनाने केलेल्या अनेक प्रकारच्या प्रेरणा ही मनात नेऊन ठेवते. अथवा मनाने मात्र सर्व बाह्य विश्व उत्पन्न करणारी, मनाचे स्पंदन मात्र असणारी ही प्रज्ञा आहे; आणि अनेक संस्कार उत्पन्न करून घेऊन ते ते संस्कार ही प्रज्ञा मनामध्ये स्थापित करते.)

याप्रमाणे संस्कृत झालेले मन एखाद्या चित्रे काढलेल्या वस्त्राप्रमाणे चित्रित होते. आणि बाह्य साधनांची अपेक्षा न करता केवळ अविद्या, काम आणि कर्म यांनी प्रेरित झालेले मन जागृतस्थितीत असल्याप्रमाणे अंतर्विषयांना, वासनांना, प्रकाशित करते. म्हटले आहे— " सर्वसाधनसंपत्ती जेथे आहे तो सर्ववान् व लोक म्हणजे

अवस्था होय. या सर्ववान् लोकांची (जागृतस्थितीची) एक मात्रा (अंश) घेऊन जीव स्वप्नस्थितीचा अनुभव घेतो " आणि "श्रेष्ठ आणि दिव्य मनामध्ये सर्व एक होते," असा प्रारंभ करून "हा मनोदेव स्वप्नामध्ये स्वमहिम्याचा अनुभव घेतो;" (प्रश्नोपनिषत् पाहा.) असे श्रुती म्हणते. याप्रमाणे मनाचे कल्पनासामर्थ्य आहे. असो; इंद्रियांच्या दृष्टीने आत असणारे मन आहे. ह्यामध्ये वासनारूपाने स्वप्नामध्ये जी प्रज्ञा विद्यमान असते तिला अंत:प्रज्ञा म्हणावे. आणि अंत:प्रज्ञा ज्याला असते तो अंत:प्रज्ञ आहे असे समजावे.

(आचार्यांचा असा सिद्धांत आहे की, आपल्या इंद्रियांच्या द्वारांनी जे विषय आपल्याला गोचर होतात, ते दिसतात तसे स्वरूपतः नसून आपल्या मनाच्या व्यापारांनी उत्पन्न झालेले असतात. मनाला व्यापार करावयास लावणाऱ्या वस्तू म्हणजे अविद्या, काम आणि कर्म ही होत. स्वरूपाचे अज्ञान असते म्हणून मनामध्ये इच्छा उत्पन्न होतात. या इच्छा कर्म करावयास लावतात. म्हणून अविद्या, काम आणि कर्म ही मनाचे प्रेरक होतात. याप्रकारे प्रेरित झालेले मन आपल्यास दिसणारे विश्व उत्पन्न करते. आणि तेच मन या उत्पन्न केलेल्या विश्वाचे संस्कार आपल्यावर करून घेते. हे संस्कार ज्या बुद्धीला समजतात त्या बुद्धीला अंत:प्रज्ञा असे म्हणतात. ही बुद्धी ज्याला असते त्याला अंत:प्रज्ञ असे म्हणावयाचे आणि स्वप्नामध्येच वरील सर्व व्यापार होतात, म्हणून स्वप्न हेच अंत:प्रज्ञाचे वसतिस्थान होते, यास्तव त्याला स्वप्नस्थान असे म्हणतात.)

केवल प्रकाशरूप असणारी जी स्थूलविषयशून्य प्रज्ञा-तेजस्वरूप प्रज्ञा-तिच्यामध्ये अंत:प्रज्ञाचा ज्ञान–विषय असतो; अंत:प्रज्ञेविषयी व मनोनिर्मित स्थूलशून्य कल्पना हा ज्ञानविषय होय. म्हणून याला

तैजस असे म्हणतात. हा द्वितीय तैजस चरण विश्वाहून–बहिष्प्रज्ञ नामक प्रथम चरणाहून–निराळा आहे. कारण बहिष्प्रज्ञ हा बाह्य विषयांचा मात्र उपभोक्ता असतो आणि अंतप्रज्ञः हा केवल वासनामात्र प्रकाशस्वरूप प्रज्ञेचा भोक्ता असतो. म्हणून त्याला " प्रविविक्तभुक् " असे म्हणतात. पहिल्यामध्ये बाह्य विषयभोग असतो, आणि दुसऱ्याचा बाह्यविषयाहून निराळा, बाह्य विषयशून्य, असा वासनामात्र, सूक्ष्म भोग असतो, म्हणून त्याला प्रविविक्त-भोक्ता असे म्हणावयाचे. विविक्त याचा अर्थ निराळा काढलेला एकाकी असा आहे. स्थूलापासून वेगळा काढलेला जो सूक्ष्म विषय तो प्रविविक्त होय. याप्रमाणे हा तैजस नामक द्वितीय चरण, स्वप्नस्थान, अंतःप्रज्ञ, सप्तांगी, एकोनविंशतिमुखांचा (१९ तोंडांचा) आणि वासनामात्रभोक्ता असा आहे. हा लिंगात्मा होय. याचे स्वरूप आणि हिरण्यगर्भाचे स्वरूप एकच असते. ॥ ४ ॥

मंत्र पांचवा

यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् । सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवाऽऽनन्दमयो ह्यानन्दभुक्चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥ ५ ॥

अन्वय व अर्थ :– **तत् सुषुप्तं; यत्र सुप्तः न कंचन कामं कामयते, न कंचन स्वप्नं पश्यति** (ती सुषुप्त स्थिती होय की, जेथे सुप्त झालेला–गाढ निद्रा लागलेला पुरुष–कोणतीही इच्छा करीत नाही व कोणत्याही प्रकारचे स्वप्न पाहत नाही.) **सुषुप्तस्थानः एकीभूतः प्रज्ञानघनः एव, आनंदमयः, हि आनंदभुक्, चेतोमुखः, प्राज्ञः तृतीयः पादः** (सुषुप्ती हे ज्याचे वसतिस्थान झाले आहे, ज्याचे स्वरूप एकरूप मात्र आहे, जो प्रज्ञानघन, आनंदपूर्ण, आनंदभोक्ता व

चेतोमुख म्हणजे अंतःकरण हेच आहे मुख ज्याचे, असा प्राज्ञ हा तृतीय चरण आहे.) ॥ ५ ॥

सिद्धान्ती :– बाह्य विषयांचे दर्शन होणे, ही जागृतस्थितीतील वृत्ती आणि त्यांचे वासनामूलक दर्शन होणे ही स्वप्नस्थितीतील वृत्ती. या उभयतांचेही लक्षण परमार्थ वस्तूचे अज्ञान असणे हे आहे. तसेच, निद्रेचेही तेच लक्षण आहे. या तिन्ही स्थितींचे एकच लक्षण हे आहे की, या तिन्ही अवस्थांत परमार्थवस्तूचे अज्ञान असते. म्हणून जागृतस्थिती आणि स्वप्नस्थिती यांपासून सुषुप्तीला निराळे काढावे, एतदर्थ " ती सुषुप्तस्थिती म्हणावी की जेथे " इत्यादि विशेषण श्रुतीने येथे उपयोजिले आहे. किंवा तिन्ही अवस्थांत तत्त्वाचे अज्ञान (तत्त्वाचा अप्रतिबोध) हे एकच सामान्य लक्षण आहे, असे म्हणून निद्रा ही पूर्वीच्या दोन अवस्थांतून निराळी काढलेली आहे. ती अशी :– ज्या स्थानी किंवा ज्या काली (जेथे आणि जेव्हा) निद्रावश पुरुष कोणत्याही विषयाचे स्वप्न पाहत नाही किंवा कोणत्याही विषयाची इच्छा करीत नाही, म्हणजे ज्या स्थितीत पूर्वीच्या दोन स्थितींप्रमाणे अन्यथाज्ञानाचे दर्शन होत नाही ते सुषुप्त होय. या स्थानी ज्याचे वास्तव्य असते, त्याला सुषुप्तस्थान असे म्हणतात. आता, जेथे म्हणून मनाने उत्पन्न केलेले द्वैत दिसते, अनेकत्व दिसते, ते सर्व जागृत किंवा स्वप्नस्थितीत स्वयोग्यतेनुसार समर्पित होते. मनःकल्पित सर्व स्थूलसूक्ष्माचे ज्ञान जागृतस्वप्न-स्थितीत मात्र होते. येथे अन्यथाज्ञान असते. पण राहूने ग्रस्त केले असता (अत्यंत गडद अंधकार पडला असता) जसा दिवस नाहीसा होतो किंवा सूर्य अदृश्य होतो, त्याप्रमाणे आपल्या स्वरूपाचा त्याग न करिता व आपली सर्व मनबुद्धी आदि साधने यांचा त्याग न

करता जीवाला ही शुद्ध अज्ञान स्थिती प्राप्त होते व सर्व एकरूप आहे, असे भान होते, त्याला एकीभूत असे म्हणावयाचे.

(अत्यंत घनदाट अंधकार पडला असता उजेड नाहीसा होतो; म्हणून विश्वातील सर्व पदार्थ निरनिराळ्या स्वरूपाने विद्यमान असतात, तरी ते सर्व एक स्वरूपाचे आहेत असे भान होते. त्याप्रमाणे आपल्या बुद्धीमध्ये शुद्ध अज्ञान प्रसृत झाले, गाढनिद्रा आली, म्हणजे विद्यमान असणारी सर्व विशेषज्ञाने जशीच्या तशीच विद्यमान असतात तरी, ती सर्व एकरूप आहेत असा अनुभव येतो, त्याला एकीभूत असे श्रुतीने विशेषण दिले आहे. सुषुप्तस्थिती एकरूप असते व इतर अवस्था अनेकरूप असतात, हा उभयतांमधील विशेष आहे.)

या एकीभूत प्राज्ञाला प्रज्ञानघन असेही नाव प्राप्त होते. याचे कारण स्वप्न आणि जागृतस्थितीत व्यापार करणारी मनस्पंदनात्मक विशेष प्रज्ञाने ही सर्व जणू काही घन होतात. म्हणजे हा सर्व कार्य-प्रपंच स्वकारणामध्ये एकरूप होतो, घट्ट होतो, एकरस होतो, म्हणून या अज्ञानरूपी जीवावस्थेला प्रज्ञानघन असे म्हणतात. अमावास्येच्या काळ्या कुट्ट अंधकारात पदार्थांचे विभाजन करता न आल्यामुळे सर्व एकच (घन) आहे, असा भास होतो; हे प्रसिद्ध आहे. असो; मंत्रात "प्रज्ञानघन मात्र" असे विशेषण दिले आहे, याचे कारण तेथे प्रज्ञानाशिवाय दुसरे काहीएक नसते. सारांश, तेथे विशेष प्रज्ञाने नसतात. या स्थितीत मनाला कोणत्याही प्रकारचे आयास पडत नाहीत, किंवा दुःख होत नाही. कारण विषयाकार होऊन व विषयी होऊन व्यापार करण्याचे श्रम या अवस्थेत मनाला नसतात, म्हणून दुःखाचा अभाव असणारी जी अवस्था तिला प्रायः आनंदमय असे म्हटले आहे. ही शुद्ध व अत्यंत आनंदाची अवस्था

नव्हे, येथे दुःखाचा अभाव असतो, म्हणून हिला आनंदमय अवस्था किंवा आनंदप्राय अवस्था असे म्हटले आहे. आता हे उघड आहे की, शुद्ध आनंद व्हावयचा, तो एक ज्ञान स्थितीत मात्र होणार. प्राज्ञाची स्थिती अज्ञानघन असते; पण हे अज्ञान निर्विशेष असते, दुःखाचे भान येथे नसते, म्हणून या स्थितीला आनंदमय असे म्हटले. आता, व्यवहारामध्ये काही एक आयास न करता ज्या पुरुषाचा योगक्षेम चालतो, त्याला सुखी किंवा आनंदाचा उपभोक्ता असे म्हणतात, हे आपण नित्य ऐकतो. सुषुप्तीची स्थिती आयासशून्य आहे. तेथे यत्किंचित्‌ही आयास नाहीत. म्हणून या स्थितीचा अनुभव घेणाऱ्या प्राज्ञाला आनंदभुक् असे म्हणतात. "हा त्याचा श्रेष्ठ आनंद आहे," असे श्रुतीही म्हणतात. प्राज्ञाला चेतोमुख असेही एक विशेषण श्रुतीने दिले आहे. स्वप्न आणि जागृत यांचे ज्ञान करून देणाऱ्या अंतःकरणाला जो प्राज्ञ द्वारस्वरूपाने असतो, म्हणजे ज्या अज्ञानस्वरूपाच्या योगाने जागृत आणि स्वप्न स्थितीतील अन्यथा ज्ञान किंवा विपरीत ज्ञान उत्पन्न होते, त्या कारणस्वरूपी प्राज्ञाला (निद्रास्थितीचा अनुभव घेणाऱ्याला) चेतोमुख असे म्हटले आहे. किंवा ज्ञानरूपी असणारे अंतःकरण ज्याचे द्वार (मुख) असते आणि ज्या द्वारामुळे स्वप्नादिकांचे आगमन होते, त्याला चेतोमुख असे म्हणतात. असो; भूतभविष्य जाणणारा व सर्व विषयांचे ज्ञान असणारा हा आनंदभोक्ता असतो. म्हणून याला प्राज्ञ असे म्हटले आहे. या प्राज्ञाला त्रैकालिक ज्ञान असते. असे पाहा की, जीव सुषुप्तस्थितीत सर्व विशेषज्ञानाविषयी अज्ञानी असतो, तथापि भूतकाली जी जी विशेषज्ञाने त्याला स्वप्नस्थितीत अथवा जागृतावस्थेत झालेली असतात व भविष्यत्कालीन अनुमाने त्याने केलेली असतात, ती ती सर्व त्याच्या ठिकाणी मात्र वर्तमान-

काळी विद्यमान असतात; व निद्राभंग झाल्यावर उद्बुद्धही होतात. म्हणून त्याला प्राज्ञ असे म्हणतात. किंवा अज्ञानाचे शुद्ध ज्ञान असणे हेच ज्याचे विलक्षण (असाधारण) स्वरूप आहे, त्याला प्राज्ञ म्हणावे, असेही म्हणता येईल. जागृतस्वप्नस्थितीत जीवाला विशेष विज्ञान असते; पण सुषुप्ताला शुद्ध अविद्येचे ज्ञान असते. म्हणूनही प्राज्ञ असे म्हणावे. हा तिसरा चरण होय. सारांश, सुषुप्त-स्थितीत राहणारा, एकरूप, प्रज्ञानमात्रघन, आनंदमय, आनंदभोक्ता, चेतोमुख आणि प्राज्ञ असे याचे स्वरूप आहे. प्राज्ञ आणि अव्याकृत यांची एकच स्वरूपे आहेत. तात्पर्य, गाढ निद्रा लागली असता शुद्ध अज्ञानाचे मात्र भान असणारा आनंदी आणि आनंदभोक्ता व सर्व विशेष विज्ञानांचे कारण असणारा प्राज्ञ आहे. ॥ ५ ॥

मंत्र सहावा

एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥ ६ ॥

अन्वय व अर्थः–एषः सर्वेश्वरः, एषः सर्वज्ञः, एषः अंतर्यामी, एषः सर्वस्य योनिः, हि भूतानां प्रभवाप्ययौ (हा प्राज्ञ सर्वस्वामी, सर्वज्ञ, सर्वांतर्यामी, सर्वकारण आणि सर्वभूतांच्या उत्पत्तिलयांचे स्थान असणारा आहे.) ॥ ६ ॥

सिद्धान्ती :–हा स्वरूपामध्ये राहणारा आणि चेतनैकप्रधान असणारा प्राज्ञ, सर्वेश्वर आहे. हा सर्व आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक प्रपंचाचा, या भेदपूर्ण विश्वाचा स्वामी आहे. याच्यासारखा दुसरा कोणीही स्वतंत्र स्वामी नाही. इतर ठिकाणी अनेक प्रकारचे अनेक स्वामी असतात. तसा प्रकार येथे नाही. " हे सौम्य, मन हे (जीव हे) प्राणाने म्हणजे परब्रह्मरूपाने

नियंत्रित झाले आहे." ही श्रुती परमेश्वराचे सर्वेश्वरत्वाला प्रमाण आहे. सारांश, व्यवहारत: जीव आणि सर्व जड परमेश्वराच्या आधीन आहे. अशा अर्थाची ही श्रुती आहे. असो; हा प्राज्ञ किंवा अव्याकृताचा अभिमानी परमेश्वर सर्वभूतस्थ असल्यामुळे सर्व भेदाभेदांचा ज्ञाता, सर्वज्ञ आहे. त्याचप्रमाणे सर्वांच्या अंत:करणात प्रवेश करून त्यांचे नियमनही करणारा हा प्राज्ञ मात्र आहे. हा सर्वनियंता आहे, म्हणून आताच सांगितलेले भेदस्वरूपी मन:-कल्पित स्थूल सूक्ष्म विश्व (सर्व आधिदैविक व आध्यात्मिक विश्व) यापासूनच उत्पन्न होते. यामुळे याला सर्वकारण असे म्हणावयाचे. हा सर्वकारण आहे, म्हणून भूतांची उत्पत्ती आणि त्यांचा लय येथेच होतो. तात्पर्य, हा सर्वांचे उपादानकारण आणि निमित्त-कारण आहे. ॥ ६ ॥

मंत्र सातवा

नान्त:प्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयत:प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ।
अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं
प्रपंचोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेय: ॥७॥

अन्वय व अर्थ :— न अंत:प्रज्ञं, न बहिष्प्रज्ञं, न उभयत: प्रज्ञं, न प्रज्ञानघनं, न प्रज्ञं, न अप्रज्ञं, (तो अंत:प्रज्ञ नाही, बहिष्प्रज्ञ नाही, उभय प्रकारचा प्रज्ञ नाही, प्रज्ञानघन नाही, प्रज्ञ नाही, अप्रज्ञ नाही.) अदृष्टं, अव्यवहार्यं, अग्राह्यं, अलक्षणं, अचिंत्यं, अव्यपदेश्यं, एकात्म-प्रत्ययसारं, प्रपंचोपशमम्, शांतं, शिवं, अद्वैतं, चतुर्थं, मन्यन्ते; स: आत्मा, स: विज्ञेय: (तो अदृष्ट आहे, अव्यवहार्य आहे, अग्राह्य, लक्षणशून्य, अचिंत्य, अव्यपदेश्य, एकात्मत्वाच्या प्रत्ययाचे सर्वस्व, प्रपंचाचा निरास करणारा, शांत, मंगलकारी, द्वितीयशून्य असा हा

चौथा चरण आहे, असे विद्वान् मानतात. तोच आत्मा होय, जाणून घेण्यास तोच योग्य आहे.) ॥ ७ ॥

सिद्धान्ती :– या मंत्राचे व्याख्यान करावयाच्या प्रारंभी एक शंका घेतात; ती अशी: "आत्मा हा चतुष्पाद आहे, अशी प्रतिज्ञा करून त्याच्या पादत्रयाचे व्याख्यान केले, हे व्याख्यानच चौथ्या चरणाचे स्वरूप अन्य आहे; भिन्न आहे; असे ठरवीत आहे. तर येथे हा जो निषेधात्मक मंत्र अवतीर्ण झाला आहे, तो अनावश्यक आहे." पण असे म्हणणे बरोबर नाही. सर्पादि जी भ्रांती झालेली असते, तिचा प्रतिषेध केला तरच रज्जूच्या स्वरूपाचे ज्ञान होते. त्याप्रमाणे तिन्ही भ्रांतिस्थ अवस्थात राहणाऱ्या आत्म्याला चौथी अवस्था आहे, तुरीय आहे, असा अस्तित्वाचा उपदेश करणे इष्ट आहे. म्हणून तो करण्याचा अभिप्राय आहे. "ते तू आहेस" असे स्पष्ट सांगणे श्रुतीला अवश्य वाटते. शिवाय, तुरीय आत्मा पादत्रयाहून विलक्षण आहे, असे सिद्ध झाले: तरी स्थानत्रयविशिष्ट जो जीवात्मा तोच ब्रह्मस्वरूप आहे, याचे ज्ञान उपदेशाशिवाय सिद्ध होत नाही. एवंच "तत्त्वमसि" इत्यादि वाक्ये लक्षणेने ब्रह्मस्वरूपाचा बोध करतात. त्याचप्रमाणे हा निषेधात्मक मंत्र तात्पर्य–वृत्तीने तुरीयाची स्थापना करीत आहे.

सिद्धान्ती :– यावर आणखी एक शंका उत्पन्न होते, ती अशी:– तिन्ही अवस्थातील आत्मलक्षणांहून हे तुरीय अत्यंत विलक्षण आहे, असे म्हणणे बरोबर नाही, तसे म्हटल्यास त्या अत्यंत विलक्षण तुरीयाचे ज्ञान होण्याला साधन असणे शक्य नाही, म्हणून शास्त्राचा उपदेश व्यर्थ होणार आहे. आणि तुरीयाची प्राप्ती होणे अशक्य होणार. पुन्हा दुसऱ्या कोणत्याही विशिष्टस्वरूपांची प्राप्ती क्षण-

भंगुर; म्हणून अनावश्यक. एवंच, शून्यवादाचा प्रसंग उत्पन्न होतो. असे होणे इष्ट नाही. म्हणून तुरीय ब्रह्मविशिष्ट विश्वादिकांहून अत्यंत विलक्षण नाही.

(या शंकेचा अर्थ असा आहे की, शास्त्राला ब्रह्माचा उपदेश साक्षात् किंवा परोक्षरीतीने करता यावयाचा नाही; कारण की, तिन्ही अवस्था व चतुर्थ अवस्था यांमध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्यामुळे, तुरीयज्ञान होणे अशक्य आहे. आणि तुरीयाचे ज्ञान झाले नाही, (तुरीय हे इंद्रिये, मन व विशिष्ट बुद्धी यांना अगोचर असते म्हणून कोणताही संबंध नसतो.) व विश्वादि आत्मे विशिष्टस्वरूपाचे आहेत, असे म्हटले म्हणजे निरात्मक बुद्धी किंवा शून्य बुद्धी अवतीर्ण होते. यावर हे उत्तर आहे की, मागे जी तीन अंतःप्रज्ञ, बहिष्प्रज्ञ इत्यादि आत्मस्थाने सांगितली, तेथे प्रकाशित होणारी स्वरूपे तुरीयाहून अत्यंत विलक्षण नाहीत. या तीन विशेषणांचा म्हणजे विशिष्टांचा अपवाद केला म्हणजे शुद्ध ब्रह्म मात्र शिल्लक राहते. या ब्रह्माचा उपदेश शास्त्राला लक्षणेने करता येतो. शुद्ध ब्रह्म केव्हाही नाहीसे होत नाही म्हणून शून्यवादाचा प्रसंग येत नाही).

सिद्धान्ती :– भ्रांतीच्या योगाने सर्प, जलधारा इत्यादि कल्पना रज्जूवर होतात, पण अधिष्ठान जी रज्जू, ती एकच असून ती सर्वदा विद्यमान असते, त्याप्रमाणेच मागे सांगितलेल्या स्थानत्रयात विद्यमान असणारा आत्मा एकच असून अंतःप्रज्ञ, बहिष्प्रज्ञ इत्यादि आभासिक स्वरूपांनी जेव्हा जेव्हा दृश्यमान होतो, तेव्हा तेव्हा तेथे दिसणारे अंतःप्रज्ञत्व, बहिष्प्रज्ञत्व इत्यादिकांचा प्रतिषेध करणारे प्रामाणिक विज्ञान आत्म्यामध्ये दृश्यमान होऊन अनर्थ उत्पन्न करणाऱ्या किंवा अतात्त्विक असणाऱ्या प्रपंचाची निवृत्ती होणे हे फल

आपोआप प्राप्त होते. म्हणून तुरीयाचा अधिगम होण्यासाठी दुसऱ्या प्रमाणांची किंवा दुसऱ्या साधनांची मार्गप्रतीक्षा करण्याचे कारण राहत नाही.

(दोरीवर दिसणारा भ्रांतिकल्पित सर्पादि आभास नाहीसा झाल्याबरोबर रज्जूचे स्वरूप स्पष्ट दिसते; त्याप्रमाणे आत्मस्वरूपावर स्थूलसूक्ष्मादि देहांचे जे आरोप अज्ञानाने निर्माण केलेले असतात, त्यांचा नाश–निराकरण–प्रामाणिक श्रुतिज्ञानाने होताक्षणी आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान होते. सारांश, आभासांचा नाश होणे, आभास निषिद्ध होणे हीच गोष्ट स्वरूपज्ञान उत्पन्न करण्यामध्ये परिसमाप्त होते. आरशावरील मळ काढला म्हणजे आरशाने स्वरूप स्वच्छ दाखवावे, असे होते. प्रतिबिंबदर्शनासाठी आरशावर अन्य संस्कार करावे लागत नाहीत. असो; श्रुतिविगीत ज्ञान आभासाचा नाश करते आणि तत्क्षणी साधकाचा स्वरूपनिश्चय होतो. तात्पर्य, आभासाचा नाश झाला की, स्वरूपविज्ञान होते. स्वरूपज्ञानासाठी दुसऱ्या प्रमाणांची आवश्यकता राहत नाही. शिवाय, प्रमाणांना अगोचर असणारे ब्रह्म सिद्ध करणारे प्रमाणही असणे शक्य नाही.

सिद्धान्ती :– याप्रमाणे रज्जुसर्पामध्ये विवेक होताक्षणी रज्जूमधील सर्प निवृत्त होतो म्हणजे रज्जूचे स्वरूप समजते. असा जो अनुभव आहे, त्याचे संकीर्तन झाले. पण अंधकाराचा नाश करण्याशिवाय तेथे असलेल्या घटादिकांचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी ज्यांना दीपाशिवाय दुसरे काही असावे, असे वाटते, घट-दर्शनाच्या सिद्धीसाठी अंधकारनाशक दीपाशिवाय आणखी काही साधन हवे असे वाटते, ते लोक समजतात की, छेद्यवृक्षाचे अवयवसंबंधाचा वियोग केला, तरी त्या अवयवांचा छेद करण्यासाठी छेदनाचा

व्यापार पुनः सुरू केला पाहिजे ! असे म्हणणे अप्रयोजक वेडचा-सारखे होईल. नाही काय ?

(याचे तात्पर्य इतकेच आहे की, अंधकाराचा नाश करणे हेच मात्र दीपज्योतीचे कर्म आहे असे नव्हे, तर तेथे असलेल्या घटाचेही दर्शन त्या दीपज्योतीने केले पाहिजे; मंद उजेडात पसरलेल्या दोरीवर सर्पभ्रांती होते. आणि ही भ्रांती दीपज्योतीने नष्ट होते; म्हणजे रज्जूचे सत्यस्वरूप प्रकट होते. त्यासाठी दीपाव्यतिरिक्त अन्यसाधनाची अपेक्षा असत नाही. सारांश, सर्पादिकांचा प्रतिषेध म्हणजेच रज्जूचा अधिगम होय. घटादि निराळ्या पदार्थांचे दर्शन दीपज्योतीने होईल. केव्हा ? रज्जूशिवाय घटादि दुसरे पदार्थ तेथे असतील. तेव्हा पण रज्जूशिवाय दुसरा पदार्थच नाही, (आत्म-व्यतिरिक्त दुसरा पदार्थच नाही,) असे शास्त्राचे सांगणे आहे. तेव्हा वेदप्रमाण शास्त्र हे, जी वस्तू जाणून टाकून द्यावयाची आहे, जो अज्ञानवृक्ष तोडावयाचा आहे, त्याचा मात्र विचार करते. अन्य गोष्टी नसतातच; म्हणून त्यांचा विचार वैदिकशास्त्र करीत नाही.

सिद्धान्ती :– आता घट आणि तम यांचा विवेक करण्यासाठी ज्या प्रमाणांचा आपण उपयोग करतो (दीपप्रकाशाने हा विवेक होतो) ते प्रमाण (दीप) अनिष्टतमाची निवृत्ती करते. तमाचा नाश करणे हेच काय ते दीपाचे कर्तव्य असते. अंधकार गेला की, घट आपोआप दिसतो. असे पाहा की, वृक्षाचा व त्याच्या शाखा-दिकांचा संबंध नाहीसा करण्यासाठी ज्या छेदनव्यापाराचा आपण अंगीकार करतो, तोच व्यापार अवयवांना (वृक्षशाखांना) विभक्त करतो. या विभागीकरणाला अन्य छेदनक्रियेची अपेक्षा असत नाही. याचप्रमाणे घटाची ही गोष्ट आहे. घटामध्ये व आपल्या दृष्टीमध्ये जो अंधकाराचा पडदा होता, तो दीपाने नष्ट होतो व घट प्रकट

होतो. पण दीपाचे काम केवळ अंधकारविनाशाचे आहे. घट प्रकट करण्याचे नाही. घट आपोआपच दिसतो. म्हणून त्याच्यासाठी अन्य-प्रमाणाची म्हणजे दीपाची आवश्यकता असत नाही.

(प्रश्न असा आहे; वस्तू अमुक तऱ्हेची नाही, तमुक तऱ्हेची नाही, असा प्रतिषेध केला तरी ती अमुक स्वरूपाची आहे, असे प्रमाणतः सांगितले तर मात्र त्या वस्तूचे ज्ञान होते. तसा प्रमाणप्रकार आत्मस्वरूपासंबंधाने नाही, म्हणून व्हावयाचे प्रमाणद्वारा किंवा अन्यद्वारा आत्मज्ञान नाही. याला उत्तर आचार्य देतात की, प्रमाण, प्रमेय, प्रमाता हे सर्व व्यावहारिक भेद आहेत. परमार्थात भेद नाही, म्हणजे तेथे प्रमाणप्रमेयादि काही नाही. तेव्हा व्यावहारिक जे अज्ञान व तज्जन्य प्रमाणादि भेद यांचा नाश श्रुतिवाक्यांनी व तदाश्रित प्रत्यक्षादिप्रमाणांनी केला म्हणजे प्रमाणादिकांची इतिकर्तव्यता संपली. हे झाले म्हणजे एक अद्वितीय ब्रह्म मात्र शुद्धस्वरूपाने अवशिष्ट राहते. ते स्वयंप्रकाश असते. म्हणून ते ज्ञात होण्याला प्रमाणाची अपेक्षा असत नाही.)

सिद्धान्ती :– त्याचप्रमाणे आत्म्यावर ज्यांचा नित्य आरोप होत असतो, त्या अंतःप्रज्ञत्वादि स्वरूपांचा विवेक करण्यासाठी, त्याची नित्यानित्यता (सत्यासत्यता) ठरविण्यासाठी, जे निषेधात्मक प्रामाणिकविज्ञान प्रवृत्त होते, ते ज्ञनविज्ञान अनिष्ट म्हणजे अमंगल अंतःप्रज्ञत्वादि आभासांची निवृत्ती करते. या पलीकडे दुसरा काही एक व्यापार ते करील असे म्हणणे योग्य नाही. म्हणजे तुरीय शोधून काढण्याच्या कामी ते प्रयत्न करीत नाही, करण्याची अपेक्षा नाही. नव्हे ! ते करूही शकत नाही. याचे कारण असे आहे की, अंतःप्रज्ञ-त्वादि आरोपांची निवृत्ती होताक्षणी प्रमाता (प्रमाणाने शोध लावू इच्छिणारा) प्रमेय (ज्ञेयवस्तु) आणि प्रमाण, इत्यादिकांमधील

भेदांचा नाश होऊन प्रमाता-प्रमुख सर्व द्वैतांचा नाश होतो. पुढेच असे सांगणार आहेत की, "वस्तूचे ज्ञान झाल्यानंतर द्वैत राहत नाही." हे उघड आहे की, द्वैतनिवृत्ती होण्याच्या क्षणापलीकडे एक क्षणभरही विशिष्ट ज्ञान विद्यमान असत नाही. ज्ञेय वस्तू निवृत्त होताक्षणी ज्ञान ही निवृत्त होते. पाहा की, "द्वैत–निवृत्ती झाल्यावरही ज्ञान राहते, अद्वैताचे ज्ञान असते, असे म्हटले म्हणजे अद्वैत आणि अद्वैताचे ज्ञान असे द्वैत उत्पन्न झालेच म्हणावयाचे! या द्वैताची निवृत्ती करण्याला दुसरे ज्ञान हवे. ते आणि अद्वैत मिळून पुनः द्वैत झाले! अशी ही न संपणारी अनवस्था उत्पन्न होते. तात्पर्य, विशिष्ट ज्ञान एक क्षणभरही पाठीमागे राहत नाही. अज्ञान निवृत्त झाले की, ज्ञानही निवृत्त होते. आणि एक अद्वितीय आत्मा अवशिष्ट रहातो.

(येथे 'ज्ञान' शब्द नीट समजून घेतला पाहिजे. कारण हा समज नसल्यामुळे वादविवादाचा निरर्थक प्रसंग उत्पन्न होतो. ज्ञान म्हणजे जीवाला उत्पन्न होणारी जाणीव, हा सर्वसंमत अर्थ आहे. पण हे ज्ञान विशिष्ट स्वरूपाचे असते व ज्ञाता व ज्ञेय यांची अपेक्षा करते. "आत्मा ज्ञान आहे" या श्रुतिवाक्यात ज्ञान म्हणजे सर्व विशिष्ट ज्ञानांचे अधिष्ठान असणारे सामान्यस्वरूप होय. ह्या सामान्य स्वरूपात ज्ञाता, ज्ञेयाची अपेक्षा नसते हे ध्यानात ठेवावे.)

सिद्धान्ती :– म्हणून, अन्तःप्रज्ञत्वादि आरोपितांचा निषेध करणाऱ्या प्रामाणिक विज्ञानाचा व्यापार होतो, त्याक्षणीच आत्म्यावर आरोपित झालेल्या अंतःप्रज्ञत्वादि अर्थशून्य आभासांची निवृत्ती होते, हे सिद्ध झाले. म्हणून या सातव्या उपनिषद्मंत्रात "ते अंतःप्रज्ञ नाही" असे म्हणून तैजसाचा प्रतिषेध केला. "बहिष्प्रज्ञ नाही" असे सांगून "विश्वाचा" प्रतिषेध केला, "उभयतः प्रज्ञ नाही" असे म्हणून जागृत् स्वप्न स्थितींमध्ये जो काही अवकाश

असेल त्या अवस्थेचाही प्रतिषेध केला. " व ते प्रज्ञानघन नाही " असे म्हणून सुषुप्तावस्थेचा अथवा प्राज्ञाचा प्रतिषेध्र केला.

शिष्य :– या गाढ निद्रावस्थेत विपरीत ज्ञानाचे बीज म्हणजे अज्ञान असते म्हणून या अवस्थेचा (मायेचा) निषेध केला. होय ना ?

सिद्धान्ती :– होय. याच अविद्यारूपी बीजापासून पुढे जागृत् आणि स्वप्न स्थितीत विशेष म्हणून अतात्त्विक विज्ञाने होत असतात. सुषुप्तीत मात्र सर्व विशेष विज्ञानाचा अभाव असतो. तरी येथे अज्ञान असते. याचप्रमाणे ते प्रज्ञ (एककाली, एकदम, पूर्ण) नाही, असे म्हणून सर्व विषयांच्या ज्ञातृत्वांचा (जीवांचा) निषेध केला. आणि " ते अप्रज्ञ नाही " असे म्हणून जडाचा निषेध केला.

(येथे दिसणाऱ्या व भासणाऱ्या आब्रह्मस्तंबपर्यंत सर्व चराचरांचा, त्यांच्या गुणधर्मांचा आणि व्यापारांचा निषेध केला आहे.)

सिद्धान्ती :– आता कोणी अशी शंका काढील की, " रज्ज्वादि पदार्थांवर सर्पादिकांची भ्रांती होते, ते भ्रांतीतील सर्पादि असत असतात, हे कबूल; पण आत्मस्वरूपाच्या ठिकाणी प्रमाणतः भासमान होणाऱ्या अंतःप्रज्ञत्वादि स्वरूपास ही नित्य सत्ता नाही, असे कसे म्हणता येईल ?" यावर आमचे प्रतिविधान हे आहे. जरी अंतःप्रज्ञ, बहिष्प्रज्ञ, प्राज्ञ, प्रज्ञ इत्यादिकांमध्ये ज्ञरूप (ज्ञातृत्वरूप) सर्वसाधारण आहे; तथापि येथे इतरेतरांचा व्यभिचार होत असतो. म्हणजे अंतःप्रज्ञत्व जेथे असते, तेथे बहिष्प्रज्ञत्व असतेच, असा नियम नाही. असे पाहा की, रज्ज्वादिकांचे ठिकाणी सर्प, धारा इत्यादिकांचा विकल्प होतो. पण ज्याला सर्पभ्रांती होते त्याला जलधारेची भ्रांती होत नाही, किंवा ज्याला जलधारेची

भ्रांती होते त्याला सर्पभ्रांतीही होत नाही. सारांश, व्यभिचार होतो, हे स्पष्ट आहे; त्याचप्रमाणे आत्मस्वरूपावर जेव्हा अंतः-प्रज्ञत्वाची भ्रांती होते, त्यावेळी बहिष्प्रज्ञत्वाचा आरोप होत नाही. म्हणजे अंतःप्रज्ञत्व आहे तर बहिष्प्रज्ञत्व नाही. दुसरे आहे तेथे पहिले नाही, असा व्यभिचार होतो. म्हणून ते सर्वच्या सर्व आरोप आहेत, मिथ्या आहेत, सत्य नाहीत असे ठरते. स्वरूपाचे मात्र तसे नाही. या स्वरूपाचा केव्हाही व्यभिचार होत नाही. हे केव्हाही नसते असे नाही. अंतःप्रज्ञत्व असो, बहिष्प्रज्ञत्व वा प्रज्ञानघनत्व असो (स्वप्न असो, जागृती असो, वा सुषुप्ती असो) तेथे आत्म-स्वरूप नाही, असे केव्हाही होत नाही. म्हणून ते सत्य आहे. 'ज्ञ' स्वरूपाचा अभाव सुषुप्तीमध्ये असतो असेही म्हणता येत नाही. कारण सुषुप्त जीवाला सुखाचा अनुभव होत असतो, हे "मी अत्यंत सुखाने निजलो होतो. निद्रास्थितीत मी अत्यंत सुखी होतो," असे जागा झालेला जीव म्हणतो, हे सर्व विदित आहे. सारांश, तेथेही चैतन्याचे स्फुरण निराबाध असते. श्रुतीही म्हणते की, विज्ञात्याच्या विज्ञानाचा केव्हाही लोप होत नाही.

सिद्धान्ती :-- याप्रमाणे तुरीय हे निर्विशेष आहे, म्हणून ते ज्ञानेंद्रियांना अगोचर आहे. ते इंद्रियागोचर आहे. म्हणून ते क्रिया-रहित अथवा अविकारी आहे. अर्थात् ते कर्मेंद्रियाना अगोचर (अप्राप्य) आहे. म्हणून ते लक्षणशून्य आहे. म्हणजे त्याला असे कोणतेही लिंग नाही, चिन्ह नाही, की ज्याच्या योगाने त्याचे व तत्स्वरूपाचे अनुमान करता येईल. अर्थातच मनाला त्याचे चिंतन चिंतिता येत नाही म्हणून वाणीला त्याचे वर्णन करता येत नाही. ते एकात्मप्रत्ययसार आहे. म्हणजे जागृदादि अवस्थांमध्ये असणार, हा नित्य आत्मा आहे, असा जो नित्य प्रत्यय, त्याने हे अनुसरणीय

असते किंवा आत्मप्रत्यय हेच त्या तुरीय ज्ञान–प्राप्तीचे प्रमाण आहे. हेच " आत्मप्रत्ययसार " होय. श्रुतीही म्हणते की, आत्मा या दृष्टीने मात्र त्याची उपासना करा म्हणजे प्रत्यगात्म्याने मात्र परमात्म्याचे स्वरूप समजून घ्या. स्वसंवेद्य प्रत्यगात्मा व परमात्मा एकच आहेत असा निश्चय करून आत्मोपासना म्हणजे आत्मध्यान करा.

(एवंच, आत्मा हा अदृष्ट आहे, असे म्हटले की ओघानेच तो अव्यवहार्य, अग्राह्य इत्यादि अभावसूचक विशेषणे प्राप्त होतात. सारांश, सर्व विशेषणांचा निरास होऊन एक अद्वितीय स्वरूप मात्र विद्यमान असते आणि ते स्वसंवेद्य आहे म्हणून आत्मानुभवाला मात्र गोचर होते. सारांश, जीवात्मा व परमात्मा एकरूप म्हणजे ज्ञानरूप आहेत असे स्वानुभवाने समजते.)

सिद्धान्ती :– याप्रमाणे अंतःप्रज्ञत्वादि स्थानिधर्मांचा प्रतिषेध केला. या प्रतिषेधाने प्रपंचाचा निरास होतो; म्हणजे जागृती आदि अवस्थांचे जे भिन्न धर्म आहेत त्या सर्वांचा अत्यंत अभाव तुरीयामध्ये आहे, असे ठरते, म्हणूनच त्याला प्रपंचोपशम असे म्हटले. याप्रमाणे अनित्य व चंचल प्रपंच संपतो म्हणून ते शांतरूप आहे. मंगलरूप आहे, कारण, ते अद्वितीय आहे; असे ठरते. येथे भेदांच्या विकल्पाचे अवस्थान एक क्षणभरसुद्धा सहन होत नाही. हा तुरीयात्मक चतुर्थ चरण होय. यालाच " तुरीय " म्हणतात. कारण तुरीय हे प्रतीतीला येणाऱ्या पादत्रयांच्या स्वरूपांहून विलक्षण आहे. " हाच आत्मा होय, हीच विज्ञेय वस्तू आहे, " असे श्रुती म्हणतात. ध्यानात ठेवा की, मन्द प्रकाशात सर्पभ्रांती, भूच्छिद्रभ्रांती, (भुईत भेग पडली आहे अशी भ्रांती), दंडभ्रांती इत्यादि सर्व भ्रांतींपासून जशी मुक्त

झालेली तद्विलक्षणरज्जू सत्य आहे, असे आपण दीपसाहाय्याने समजून घेतो, त्याप्रमाणे "ते तूं आहेस" इत्यादि महावाक्यांच्या साहाय्याने अदृष्ट आत्मा मात्र सत्य असून तोच द्रष्टा आहे, हे समजून घ्यावे. "द्रष्टयाच्या दृष्टीचा केव्हाही लोप होत नाही," इत्यादि वाक्यांनी सांगितलेला जो आत्मा तो जाणून घ्यावा. आता जो अविज्ञेय आहे तो कसा जाणून घ्यावा ? या शंकेचे समाधान असे की, अज्ञानावस्थेत त्याला आपण ज्ञेय म्हणत होतो, तसाच आत्मसाक्षात्कार होईपर्यंत तो विज्ञेय आहे, असे समजावे. आणि अज्ञानाचा ध्वंस होताक्षणी ज्ञानाचाही लोप करून शुद्ध द्वैत–शून्य, अद्वितीय होऊन राहावे. ॥ ७ ॥

मंत्र आठवा

सोऽयमात्माऽध्यक्षरमोंकारोऽधिमात्रं पादा मात्राः ।
मात्राश्च पादा अकार उकारो मकार इति ॥ ८ ॥

अन्वय व अर्थः–सः अयं आत्मा अध्यक्षरं ओंकारः अधिमात्रं; पादाः मात्राः, मात्राः च पादाः, अकारः, उकारः मकारः इति (तो हा आत्मा अध्यक्षर आहे, ओंकार आहे व ओंकार हा अधिमात्र आहे. पाद याच मात्रा आणि मात्रां हेच पाद आहेत. या मात्रा अकार, उकार, आणि मकार या होत. अ, उ आणि म् या तीन मात्रा आहेत.) ॥ ८ ॥

सिद्धान्ती :– अभिधेयांमध्ये (नामात्मक वस्तूंमध्ये) असणारा ओंकार हा चतुष्पाद असणारा आत्मा आहे, असे मागे व्याख्यान केले आहे. ओंकार हा सर्व नामात्मक असणाऱ्या वस्तूत श्रेष्ठ आहे. म्हणून त्याला अभिधेयप्रधान असे म्हटले. असो. हा जो चतुष्पाद आत्मा आहे, तो अक्षरांच्या दृष्टीने अतिश्रेष्ठ नामाभिधान देऊन

त्याचे वर्णन करावे अशा योग्यतेचा आहे. म्हणज आत्मा हे नाम, हा शब्द, सर्व अक्षरांमध्ये श्रेष्ठ आहे. म्हणून त्याला अध्याक्षर म्हटले. ते श्रेष्ठ अक्षर म्हणजे ॐकार होय. हा ॐकार पादशः विभागिता येतो. म्हणजे मात्रादृष्टीने याचा विभाग करता येतो व तिन्ही मात्रांचा हा ॐकार मुख्य किंवा सर्वश्रेष्ठा अथवा अधिष्ठाता स्वामी असतो म्हणून त्याला अधिमात्र असे म्हटले. याचे मोजमापही करता येत नाही. कारण मोजण्याचे माप ॐच असतो. असो; आत्म्याचे जे पाद आहेत, त्या ॐकाराच्या मात्रा होत आणि ॐकारमात्रा या आत्म्याचे पाद अथवा चरण होत. त्या मात्रा कोणत्या ? असे म्हणाल तर ऐका: अकार, उकार व मकार (अ उ व म) या त्या तीन मात्रा होत. ॥ ८ ॥

(हा व यापुढील उपदेश मन्द अधिकाऱ्यांसाठी आहे.)

मंत्र नववा

जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राऽऽप्तेरादिमत्त्वा-द्वाऽऽप्नोति ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥ ९ ॥

अन्वय व अर्थ :– जागरितस्थानः वैश्वानरः अकारः प्रथमा मात्रा (जागृतस्थानी असणारा वैश्वानर–विश्व–हा अकार आहे. ही ॐकाराची प्रथम मात्रा आहे, अशी कल्पना करावी.) आप्तेः, आदिमत्त्वात् वा (अकार सर्वव्यापक आहे, किंवा प्रथम अक्षर आहे, म्हणून 'अ' काराला प्रथम मात्रा असे म्हटले.) यः एवं वेद, सर्वान् कामान् आप्नोति च आदिः भवति ह वै (हे ज्याला समजले त्याला इष्ट असणाऱ्या सर्व वस्तू प्राप्त होतात आणि तो सर्वश्रेष्ठ होतो.) ॥ ९ ॥

सिद्धान्ती :– आता येथे विशेष वस्तूंचा नियम करण्यासाठी

(आत्म्याचा कोणता विशेष पाद ॐकाराच्या कोणत्या विशेष मात्रेशी एकत्वाने असतो हे सांगण्यासाठी) या मंत्राची योजना आहे. जागृतस्थानी राहणारा जो वैश्वानर तो ॐकाराची प्रथम मात्रा म्हणजे 'अ'कार याच्याशी तादात्म्याने असतो, असे आत्म-जिज्ञासू मंदाधिकाऱ्याने समजावे. शिवाय, अशी कल्पना करणे काही अयोग्य नाही. कारण 'अ' काराने ('अ' या अक्षराने) सर्व वाणी व्यापिलेली आहे. वाणीतील सर्व अक्षरे, शब्द, वाक्ये इत्यादि 'अ'कार मूलक आहेत. "सर्व वाणी अकाररूपी आहे, हे सुप्रसिद्ध आहे," अशी श्रुती आहे. त्याचप्रमाणे वैश्वानराने हे सर्व जगत् व्यापले आहे. "त्या ह्या वैश्वानर आत्म्याचे मस्तक सुतेजा म्हणजे द्युलोक आहे, अशीही श्रुती आहे." याप्रमाणे 'अ' सर्वव्यापी आहे, तसाच वैश्वानर हा सर्वव्यापी आहे. म्हणून 'अ' ही मात्रा वैश्वानररूपी आहे, अशी कल्पना करणे अयोग्य नाही. पुन्हा कोणतेही नाम आणि ते नाम असणारी वस्तू ही एकच असतात, हे आम्ही मागे सांगितले आहे. म्हणून 'अ' तोच विश्व आणि विश्व तोच 'अ' होय. सारांश, सर्वव्यापी 'अ' कार हाच सर्वव्यापी वैश्वानर किंवा विश्व आहे. असो, जो आदि म्हणजे प्रथम आहे, तो आदि-मान् होय. अक्षरवाटिकेत 'अ' हे प्रथम अक्षर आहे; त्याचप्रमाणे विश्वात वैश्वानर हाही प्रथम आहे. वैश्वानर, तैजस आणि प्राज्ञ असा क्रम असतो, त्यात वैश्वानराला अग्रस्थान दिले आहे; म्हणून उभयतांमध्ये प्रथमत्व हा सामान्य गुण आहे. हा व सर्वव्यापित्व हे सामान्य गुण आहेत म्हणून वैश्वानर हा अकाररूपी आहे. असो; हे आता सांगितलेले 'अ'चे व विश्वाचे एकत्वज्ञान ज्याला होते; त्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण होतात आणि तो श्रेष्ठ पुरुषांचा प्रमुख होतो. ॥ ९ ॥

मंत्र दहावा

स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रोत्कर्षादुभयत्वाद्वोत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति नास्याब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥ १० ॥

अन्वय व अर्थ :– स्वप्नस्थानः तैजसः उकारः द्वितीया मात्रा (स्वप्नस्थानात राहणारा तैजस ही ओंकाराची द्वितीय मात्रा म्हणजे उकार–उ–आहे.) **उत्कर्षात् उभयत्वात् वा** (उत्कृष्ट आहेत आणि उभयात्मक आहेत म्हणून) **यः एवं वेद ज्ञानसंततिं ह वै उत्कर्षति, समानः च भवति, अस्य कुले अब्रह्मवित् न भवति** (हे एकात्मक ज्ञान ज्याला होते तो ज्ञानाचा विस्तार करतो, समवृत्तीने राहतो आणि त्याच्या कुलात अब्रह्मवेत्ता होत नाही. ॥१०॥

सिद्धान्ती :–स्वप्नस्थानात राहणारा तैजस हा ओंकाराची द्वितीय मात्रा म्हणजे उकार आहे. उभयतात कोणते गुण समान आहेत ते पाहा. अकारापेक्षा उकार श्रेष्ठ आहे. कारण उत्कृष्ट अकारही उकाराच्या पुढे जणू काही सेवकासारखा असतो. याचप्रमाणे विश्वापेक्षा तैजस श्रेष्ठ आहे, उत्कृष्ट आहे; कारण तैजसाच्या प्रेरणेने विश्व कर्म करीत असते. तसेच, उकार हा अकार आणि मकार यांच्यामध्ये आहे. उकाराचा उच्चार करताना ‘अ’ची स्वरात्मकता आणि ‘म’ची ओष्ठस्थानता असा संबंध असतो, म्हणजे उभयतांशीही याचा संबंध आहे. तैजस हाही विश्व आणि प्राज्ञ यांच्यामध्ये असतो आणि उभयतांशी संबंध ठेवून उभयात्मक होतो. विश्वाचे अन्यथा ज्ञान तैजसात असते, आणि प्राज्ञाचे अंतःप्रज्ञत्वही यात असते. हे उत्कृष्टत्व व हे एकत्व ज्ञान (उकाराची व तैजसाची एकात्मकता) ज्याला समजते, तो ज्ञान–विज्ञानाची व विशेषतः विज्ञानाची वृद्धी करतो; तो सर्वांशी समवृत्तीने वागतो. तो

जसा मित्रांशी तसाच शत्रूंशीही वागून उभयतांस अद्वेध्य होतो, अद्वेष्टा असतो. त्याच्या कुलात ब्रह्मज्ञान नसणारा पुरुष उत्पन्न होत नाही, ही या ज्ञानाची फलश्रुती होय, सारांश, ॐकारातील 'उ' कार हा 'तैजस' आहे, अशी कल्पना करून घ्यावी व उकार हा जसा 'अ' कारापेक्षा श्रेष्ठ आहे व तो 'अ' आणि 'म्' यांच्यामध्ये असून उभयतास जवळ आणणारा आहे, तसाच विश्व-प्रेरक तैजस हा विश्वापेक्षा श्रेष्ठ असून, तो विश्व आणि प्राज्ञ या उभयतांचे संनिधित्व करणारा आहे; असा निश्चय केला असता ज्ञानवृद्धी व अद्वेष्टत्व प्राप्त होतात, हे येथे सांगितले आहे. ॥१०॥

मंत्र अकरावा

सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदं सर्वमपीतिश्च भवति य एवं वेद ॥ ११ ॥

अन्वय व अर्थ :– सुषुप्तस्थानः प्राज्ञः तृतीया मात्रा मकारः (सुषुप्तस्थानी असणारा प्राज्ञ ॐकाराची तिसरी मात्रा 'म'कार असतो.) मितेः, अपीतेः, वा (तो माप करणारा असतो व एकत्व करणारा असतो म्हणून) यः एवं वेद, इदं सर्वं ह वै मिनोति, अपीतिः च भवति (हे ज्ञान ज्याला होते, तो या सर्व विश्वाचा ज्ञाता होतो आणि जगत्कारण होऊन सर्व कर्ता होतो, हे प्रसिद्ध आहे.) ॥ ११ ॥

सिद्धान्ती :– सुषुप्तस्थानी असणारा जो प्राज्ञ तो ॐकाराची तिसरी मात्रा म्हणजे 'म'कार होय. उभयतांमध्ये सामान्य गुण कोणते आहेत ते पाहा :– ज्याप्रमाणे प्रस्थाने (पूर्वी प्रस्थ हे धान्य मोजण्याचे माप होते. 'प्रस्थ म्हणजे बत्तीस पल = एक चतुर्थांश अढक = आठ (?) कुडव) यव मोजतात. त्याप्रमाणे विश्व–

तैजसांचे हा प्राज्ञ मोजमाप करतो. त्यांचे उत्पत्ती – प्रलय किंवा आपल्यामध्ये विश्वतैजसांचे प्रवेश व आपल्यामधून त्यांची निष्क्रां-तीही तो पाहतो व मोजमाप करतो. त्याप्रमाणे एका ॐकाराची समाप्ती झाली व पुन: ध्यानाला प्रारंभ झाला म्हणजे अकार व उकार हे मकारामध्ये प्रवेश करून पुन्हा बाहेर येतात.

तसेच अपीतीमध्ये म्हणजे एकीभावामध्येही साम्य आहे. ॐकाराचा उच्चार पूर्ण केला असता शेवटचे अक्षर म्हणजे 'म्' कार हा जणू काही अकार आणि उकार यास एकत्व देणारे अक्षर आहे. तसेच सुषुप्तिकाली विश्व आणि तैजस हे प्राज्ञामध्ये लीन होऊन एक होतात. याप्रमाणे मापकता व अपीति हे दोन सामान्य गुण प्राज्ञ आणि म्कार यांचे एकत्व स्थापित करतात. हे ज्ञान ज्याला होते, त्याला ह्या सर्वांचे म्हणजे जगताचे यथार्थ स्वरूप समजते. त्याचप्रमाणे तो जगताचा कारणात्मा म्हणजे अव्याकृत-स्वरूप होतो. पण येथे ही जी आत्मज्ञानास अप्रस्तुत असणारी फले सांगितली आहेत, ती अर्थवादपर आहेत आणि केवळ ब्रह्मध्यानाचे साधन जो ॐकार त्याची स्तुती करण्याकरता मात्र सांगितली आहेत.

सारांश, 'म्' हा किती वेळा अ व उ येऊन गेले, हे मोजण्याचे साधन आहे. नाममंत्र जपताना शेवटच्या मण्याने किती वेळ जप झाला हे समजते, तसाच हा प्रकार होय. शिवाय 'म्' मध्ये 'अ' व 'उ' हे लीन होतात. हेच धर्म प्राज्ञामध्ये आहेत, म्हणून उभयतांचे साम्य आहे. शेवटी श्रीमच्छंकराचार्य म्हणतात की, फलश्रुतीचा अवतार केवळ ध्यानाकडे मंदाधिकाऱ्यांची प्रेरणा करावी एतदर्थ आहे. आत्मज्ञाला फलापेक्षा नसते, हे सर्वश्रुत आहे. ।। ११ ।।

मंत्र बारावा

अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपंचोपशमः शिवोऽद्वैत एवमोंकार आत्मैव संविशत्यात्मनाऽऽत्मानं य एवं वेद ।। १२ ।।

अन्वय व अर्थ :– अमात्रः चतुर्थः, अव्यवहार्यः प्रपंचोपशमः, शिवः अद्वैतः (मात्राशून्यता हा चौथा पाद आहे. हा व्यवहार्य नाही. हा पाद म्हणजे प्रपंचाचा उपशम करणारा होय. हा शिवरूप आहे आणि अद्वैत आहे.) **एवं ॐकारः आत्मा एव, यः एवं वेद आत्मनः आत्मानं संविशति** (याप्रमाणे ॐकार आत्मा आहे, असे ज्याला ज्ञान होते; तो ॐकाररूपी आत्मा आत्मसाहाय्याने आत्मस्वरूपात प्रवेश करतो.) ।।१२।।

सिद्धान्ती :– ज्याला मात्रा नाहीत तो अमात्र ओंकार होय. याला चतुर्थ किंवा तुरीय म्हणतात. हा आत्मा केवल म्हणजे अद्वितीय आहे. तसेच अभिधान म्हणजे नाम किंवा वाणी, व अभिधेय (नाम) आहे अशी वस्तू, नाम आणि नाम असणारी वस्तू, ही ज्यांची स्वरूपे किंवा प्रकट झालेले पदार्थधर्म आहेत, ती वाणी आणि मन ही उभयतांही क्षीण झाल्यामुळे, मनोवाणीस अगोचर असल्यामुळे, बोलणे आणि चिंतन करणे यांस अगोचर असा हा आत्मा आहे. हा प्रपंचाचा उपशम करणारा (प्रपंचातीत,) आनंदरूप आणि अद्वितीय स्वरूपाचा आहे. हे ज्ञान व आत्मपाद व ॐकारमात्रा एकच आहेत, असे विज्ञान ज्याला झालेले आहे, त्याने त्रिमात्र व त्रिपाद ॐकाराचे ध्यान केले असता (श्लोक २२–२३ पहा) तो ज्ञानी पुरुष आत्मरूप होऊन आत्मसाधनाने आपण स्वतः परमार्थतः आत्मस्वरूपामध्ये (आपल्या स्वरूपामध्ये) प्रवेश करतो. परमात्मस्वरूपाने ॐकाराचे ध्यान करणारा आत्मज्ञानी

तत्त्ववेत्ता समूळ, सबीज आणि सांकुर अज्ञानाचा नाश करून तृतीय-स्थानी असणाऱ्या अज्ञानरूपी बीजाला जाळून टाकीत होत्साता परमात्मस्वरूपात प्रवेश करतो. त्याला पुन्हा जन्मप्राप्ती होत नाही; कारण तुरीयस्थान हे निर्बीज आहे. रज्जु-सर्पाचा विवेक झाल्या-नंतर रज्जूमध्ये प्रविष्ट झालेला भ्रांतिजन्य सर्प जसा पुन्हा त्या दोरीत उत्पन्न झाला आहे, असे विवेकी पुरुषाला पूर्वीप्रमाणे दिसत नाही, रज्जु-सर्पभ्रांती पुन्हा होत नाही, त्याप्रमाणे आत्मज्ञानी पुरुषाचे अज्ञान दग्ध झाले असल्यामुळे त्याला पुन्हा संसाराची किंवा तद्गत सुख-दुःखांची भ्रांती उत्पन्न होत नाही. ही उत्तम अधिकाऱ्याची गोष्ट झाली; पण जे मंदबुद्धीचे किंवा मध्यम बुद्धीचे लोक आहेत, साधक स्वरूपाला लागणाऱ्या गोष्टी ज्यांना अविगत झाल्या आहेत, जे सन्मार्गाने जाणारे आहेत, ज्यांनी संसारत्याग केला आहे, ॐकारमात्रा आणि आत्मपाद यांच्यामधील संस्कार-जनित साम्य ज्यांना विदित आहे, त्यांनी जर ॐकाराची ब्रह्म-प्राप्तीसाठी यथोक्त उपासना केली, तर हा उपास्यमान ॐकार ब्रह्मप्राप्तीचे साधन होईल. हा क्रम-मुक्तीचा मार्ग आहे."।।१२।।

श्रीक्षेत्र चिखलद्याच्या या मुक्कामात श्रीस्वामीमहाराजांच्या सत्सगासाठी, त्यांच्याकडून योग, प्रस्थानत्रयीवरील भाष्यादि शिक-ण्यासाठी आणि त्यांच्या सेवेसाठी श्री. गंगाधरपंत वैद्य व श्री. बाळाभाऊ वैद्य हे बंधुद्वय मुद्दाम येऊन राहिले होते. हे दोघे बंधू सरकारी नोकरीमध्ये होते. श्रीस्वामीमहाराजांचा श्रीक्षेत्र चिखलदा येथे मुक्काम असताना किंवा जवळपास संचार चालू असताना हे दोघेही श्रीस्वामीमहाराजांबरोबर असत. या दोघांपैकी श्री. गंगा-धरपंत वैद्य यांना प्रथम श्रीस्वामीमहाराजांनी अशी आज्ञा केली

होती की, "येथे रोज जी कमी-जास्त मंडळी येतील त्याप्रमाणे लागणारे डाळ, तांदूळ, गूळ, भाजी, मिरची, मसाला, तेल, तूप, दूध, दही इत्यादि कमी-जास्त सामान जसे लागेल तसे आणून द्यावे." श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी ही सेवा उत्तम प्रकारे केली. या सेवेमुळे श्रीस्वामीमहाराज त्यांच्यावर अत्यंत संतुष्ट झाले व त्यांची त्यांच्यावर विशेष मर्जी बसली. त्यामुळे श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना सर्व योगाभ्यास शिकविला. त्यानंतर श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना उपनिषदादि भाष्यांसह समजावून सांगावयाचे ठरविल्यामुळे त्यांच्यावर प्रथम सोपविलेले सामान आणण्याचे काम त्यांच्याकडून काढून घेऊन ते काम श्री. कृष्णाजी नरसीकर यांच्यावर सोपविले व श्री. गंगाधरपंत वैद्य यांना अशी आज्ञा केली की, "रोज सकाळी लवकर स्नान करून येऊन भाष्य श्रवण करावे." श्रीस्वामीमहाराजांनी आज्ञा केल्याप्रमाणे श्री. गंगाधरपंत वैद्य रोज उपनिषद्भाष्याचा पाठ श्रवण करण्यासाठी येऊन बसू लागले. यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना श्रीकैवल्य, श्रीश्वेताश्वतर, श्रीमुक्ती व श्रीदत्तात्रेय या चार उपनिषदांचे पाठ सांगून त्यांचे भाष्यही सांगितले. इतकेच नव्हे; तर श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांच्यावरील प्रेमापोटी ही चारही उपनिषदे आपल्या हाताने लिहून ती सर्व पाठ करण्यासाठी त्यांना दिली. या उपनिषदांचे पाठ झाल्यावर ईश, केन, कठ, मांडूक्य इत्यादि दशोपनिषदांचे पाठ सांगून त्यांचे भाष्यही सांगितले. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र चिखलदा येथेच श्री. गंगाधरपंत वैद्य यांना श्रीमद्भगवद्गीता व श्रीविष्णुसहस्रनामाचे पाठ सांगून ते गुरुमुख करवून दिले. याशिवाय श्रीलघुवासुदेव मननसार, आत्मचिंतन हेही ग्रंथ त्यांना स्वमुखाने मोठ्या प्रेमाने शिकविले. एवढेच नव्हे; तर

शेवटी शेवटी श्रीस्वामीमहाराजांनी येथेच त्यांना अरणे सांगून त्यांचे भाष्य मात्र येथील मुक्काम संपवून पुढे कातरखेड्यास गेल्यावर सांगितले. वास्तविक पाहता शके १८२२ च्या दहाव्या चातुर्मासात श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना आत्मषट्क भाष्यासह शिकविले होते. त्याचप्रमाणे त्यावेळी योग्यता पाहून पुष्कळ मंडळीप्रमाणे श्री. गंगाधरपंत वैद्य यांनाही ऐतरेय उपनिषद् भाष्यासह शिकविले होते. याशिवाय अध्यात्म रामायणातील सुंदर कांड व अयोध्याकांड ही दोन्ही कांडे एखादे पुराण सांगावे तसे समजावून सांगितले होते. त्याचप्रमाणे श्रीरामगीता सांगितली होती व संस्कृत भाषेच्या स्वतंत्र अध्ययनासाठी काही द्व्यर्थी संस्कृत श्लोक अर्थासह लिहून दिले होते.

श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना श्रीअध्यात्म-रामायणांतर्गत अयोध्याकांड, सुंदरकांड व उत्तरकांडातील पाचव्या सर्गातील श्रीरामगीता हे एखादे पुराण सांगावे त्याप्रमाणे समजावून का सांगितले असावे याचा जर अत्यंत सूक्ष्मपणे व साक्षेपाने विचार विचार केला तर आपल्या हे लक्षात येते की, ज्याप्रमाणे मांडूक्योप-निषदात तत्त्वज्ञानाचे सार आले असल्यामुळे ते श्री. बाळशास्त्री हरदास यांना आपल्या जीविताचे निजगूज म्हणून समजावून दिले त्याचप्रमाणे उपरोक्त श्रीअध्यात्मरामायणांतर्गत अध्यात्म व सुंदर कांडामध्ये श्रीस्वामीमहाराज जे तत्त्वज्ञान क्षणक्षणाला जगले, ज्या तत्त्वज्ञानाच्या चिंतनात त्यांनी अहोरात्री घालविल्या, जे तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनाचे अंतरंग रहस्य होते व ज्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करून त्यांनी भारताची पुनर्प्रतिष्ठापना करण्याकरिता आपले जीवनच यज्ञरूप बनविले होते, त्याचे सार आलेले असल्यामुळे, ते श्री. गंगाधरपंत वैद्य यांना अत्यंत आत्मीयतेने शिकविल्याचे लक्षात

येते. आपण जर श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना शिकविलेल्या श्रीअध्यात्मरामायणाच्या उपरोक्त कांडामध्ये आलेल्या तत्त्वज्ञानात प्रवेश केला तर आपणासही धन्यता व कृतार्थता प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही, हे नितांत सत्य आहे. अशा या श्रीरगंभीर व गहनतम तत्त्वज्ञानाचा श्रीमहादेवांनी श्रीपार्वतीला उपदेश करताना असे सांगितले की–

"एकदा श्रीनारदमुनी श्रीरामांचे दर्शन घेण्यासाठी आले असता त्यांना आलेले पाहून श्रीराम सीतेसह एकदम उठले आणि प्रेमपुरस्सर हात जोडून त्यांनी त्या ऋषींना साष्टांग प्रणाम केला आणि ते अत्यंत प्रेमाने श्रीनारदऋषींना असे म्हणाले की, "अहो मुनिश्रेष्ठ ! आम्हासारख्या संसारी माणसांना आपले दर्शन हे अत्यंत दुर्लभ आहे; कारण आमची मने विषयात पराकाष्ठेची आसक्त झालेली असतात. माझी पूर्वजन्मार्जित सर्व पुण्ये आज फळास आली आहेत; कारण माझ्या सारख्या संसारी माणसाला सत्समागम घडत आहे. याकरिता हे मुनीश्वर ! आपल्या दर्शनाने मी कृतकृत्य झालो आहे. आपले कोणते कार्य माझ्याकडून होण्यासारखे आहे, ते आपण मला सांगावे, ते मी करतो." त्यावर श्रीनारदमुनी त्या भक्तवत्सल श्रीरामांना असे म्हणाले की, "हे प्रभो ! श्रीरामा ! ! आपण एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणे भाषण करून मला कशाकरिता मोहवीत आहात ! हे विभो ! "मी संसारी आहे," असे आपण म्हटलेत ते बरोबर आहे. सर्व जगाची आदिकरण असलेली माया ही आपली पत्नी आहे. तिच्या ठिकाणी आपल्याच आश्रयाने ब्रह्मादिक प्रजा निर्माण होतात. ती त्रिगुणात्मक माया सदोदित आपल्याच आधाराने भासत असते. ती माया नेहमी पांढऱ्या, काळ्या आणि तांबड्या वर्णांच्या प्रजा जन्माला घालते. खरोखर !

आपण त्रैलोक्यरूपी भव्य गृहात राहणारे गृहस्थ आहात, असे जे म्हटले ते सत्य आहे. आपण विष्णू आणि जानकी लक्ष्मी आहे. आपण शिव आणि जानकी पार्वती आहे. आपण ब्रह्मदेव आणि जानकी सरस्वती आहे. आपण सूर्य आणि जानकी प्रभा आहे. आपण चंद्र आणि जानकी शुभलक्षणा रोहिणी आहे. आपण इंद्र आणि जानकी पौलोमी इंद्राणी आहे. त्याचप्रमाणे आपण अग्नी आणि जानकी स्वाहा आहे. हे प्रभो ! आपण कालस्वरूपी यम असून जानकी म्हणजे त्याची नियमन करणारी शक्ती आहे. हे जगन्नाथा ! आपण नैऋत्यदिशेचे अधिपती असून कल्याणी जानकीही तामसी आहे. हे प्रभो रामचंद्रा ! आपण वरुण आणि शुभरूपा जानकी भार्गवी आहे. हे श्रीरामा! आपणच वायूआणि जानकी म्हणजे सतत गतिरूप शक्ती आहे. हे श्रीरामा ! आपण कुबेर आणि जानकी सर्व संपत्ती आहे. आपण सर्व लोकांचे संहार करणारे रुद्र असून जानकी रुद्राणी आहे. या जगामध्ये स्त्रीवाचक अर्थात् स्त्रीलिंगी म्हणून ज्या ज्या काही वस्तू आहेत त्या त्या सर्व शुभलक्षणा जानकी होय आणि त्याचप्रमाणे या जगामध्ये जितके म्हणून पदार्थ आहेत ते सर्व हे श्रीराघवा! आपणच आहात. याकरिता हे श्रीराघवा! या लोकत्रयामध्ये आपणा दोघांच्या पलीकडे काहीही वेगळे म्हणून नाही. आपल्या मायेच्या योगाने उत्पन्न झालेले अज्ञान हे अव्याकृत म्हणजे स्पष्ट न समजणारे आहे. या अव्याकृतापासून महान् महत्तत्त्व, महत्त्वापासून सूत्र–अहंकार आणि अहंकारापासून सर्व कार्यात्मक लिंगदेह उत्पन्न होतो. अहंकार, बुद्धी, पंचप्राण आणि दहा इंद्रिये यांनाच शहाणे लोक लिंगदेह असें म्हणतात आणि या लिंगदेहालाच जन्म, मृत्यू, सुख, दुःख वगैरे विकार होतात. या लिंगदेहालाच जीव ही संज्ञा आहे आणि जगामध्ये तोच जगत्स्वरूपी

अर्थात् समष्टिरूप भासतो. अनिर्वाच्य आणि अनादि अशी अविद्या-रूपी उपाधी हीच त्याचे कारण होय. मूळ चैतन्यस्वरूपाला स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन प्रकारच्या उपाधी आहेत. या उपाधींनी युक्त अशा चैतन्याला "जीव" असे म्हणतात व याही विरहित चैतन्याला परमेश्वर असे म्हणतात. जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तीन नावांनी युक्त असा संसार असतो. अहो श्रीरघूत्तमा ! आपण या संसाराहून वेगळे असून त्या संसाराला प्रत्यक्ष पाहणारे आहात. हे सर्व जग आपल्यापासून निर्माण झाले असून ते आपल्या ठिकाणीच राहिले आहे आणि ते सर्व आपल्या ठिकाणीच लय पावते. यामुळे आपण या सर्व सृष्टीचे कारण आहात. ज्याप्रमाणे दोरीला साप मानल्याने भय वाटते त्याप्रमाणे आत्म्याला जीव मानल्याने भय वाटते; मात्र मीच परमात्मा आहे असे जाणले की, तो जीव भयापासून मुक्त होतो. ज्ञानरूप तेजाने सर्व शरीरात सर्व बुद्धी आपल्याकडून प्रकाशिल्या जात असल्यामुळे आपणच सर्वांचे आत्मा आहात. अज्ञानामुळे जसा दोरीवर सर्पाचा आरोप केला जातो तसा आपल्यावर सर्व जगाचा आरोप अज्ञानामुळे केला जातो. परंतु आपले ज्ञान झाले असता सर्व प्रपंचमय अज्ञान लयाला जाते. याकरिता नेहमीच ज्ञानाचा अभ्यास करावा. आपल्या चरणांची भक्ती करणाऱ्यांनाच क्रमाने विज्ञान म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान होत असते. याकरिता आपली भक्ती करणाऱ्यांनाच मुक्तीची—मोक्षाची प्राप्ती होते. मी केवळ आपल्या भक्तांचाच नव्हे; तर आपल्या भक्तांच्या भक्तांचाही सेवक आहे. याकरिता हे प्रभो ! आपण माझ्यावर कृपा करा आणि मला मोहात घालू नका." (श्रीमद अध्यात्मरामायण—अयोध्याकांडप्रथम सर्ग—५ ते ३०)

पुढे कैकयीमुळे श्रीरामचंद्रांना वनवास घडणार असल्याचे

श्रीलक्ष्मणाला कळताच तो संतप्त झाला असता श्रीरामचंद्र उपदेश करताना त्याला असे म्हणाले की, " हे राज्य, हा देह वगैरे जे काही सर्व दिसते आहे ते जर सत्य असते तर त्यासंबंधी प्रयत्न सफल झाला असता. हे भोग मेघमंडळावर चमकणाऱ्या विजेप्रमाणे चंचल आहेत आणि हे आयुष्य अग्नीने तापलेल्य. लोखंडी पत्र्यावर पडलेल्या पाण्याच्या थेंबाप्रमाणे क्षणभंगुर आहे। ज्याप्रमाणे सापाच्या तोंडात सापडलेला बेडूकही माशा खाण्याची धडपड करतो त्याप्रमाणे कालरूपी सर्पाच्या दाढेत सापडला असताही मनुष्य नश्वर भोगांची इच्छा करतो. शरीरभोग मिळावेत म्हणून मनुष्य रात्रंदिवस कष्ट सोसून कर्मकटकटी करीत असतो; परंतु देहच जर पुरुषाहून म्हणजे आत्म्याहून भिन्न आहे असे दिसते तर मग या भोगांपैकी कोणता भोग त्या पुरुषाला भोगावयाला मिळतो ? ज्याप्रमाणे पाणपोईवर अनेक लोक पाणी पिण्यासाठी क्षणमात्र एकत्र जमतात त्याप्रमाणेच आई, वडील, मुलगा, भाऊ, बायको, सोयरे, धायरे यांचा संसारात समागम होत असतो. वाहत्या नदीत काष्ठांचा आणि प्रवाहाचा संबंध जसा चंचल असतो तसाच प्राण्यांचा समागम चंचल असतो. लक्ष्मी ही छायेप्रमाणे चंचल असून तारुण्य हे पाण्याच्या लाटांप्रमाणे अस्थिर आहे आणि स्त्रीसुख हे स्वप्नासारखे असून आयुष्य हें फारच थोडे आहे. ही गोष्ट सर्वांच्या अनुभवास येत असूनही प्राणी अभिमान वाहतो. हा संसार स्वप्नाप्रमाणे असून रोगादिकांनी सदासर्वदा व्यापलेला आहे. याकरिता या संसाराला गंधर्वनगर म्हणजे आकाशातील ढगांप्रमाणे वरचेवर रंग व आकार बदलणारा हे नांव आहे. असे असले; तरीही मूढ लोक अशा संसारांत आनंद मानून राहतात. सूर्याच्या उदयास्तांमुळे आयुष्य सारखे क्षीण होत असून त्यामुळेच लोक

म्हातारे होऊन मृत्यू पावतात. या सर्व गोष्टी जरी मनुष्य डोळ्यां-पुढे सतत पाहत असला तरी त्या त्याला उमजत नाहीत. कालचाच दिवस व कालचीच रात्र आजही आहे असे समजून मनुष्य भोग भोगण्यात आसक्त होत असल्यामुळे कालाचा वेग त्याच्या लक्षात येत नाही. प्रत्येक क्षणी माणसाचे आयुष्य कच्च्या घडचातील पाण्याप्रमाणे क्षीण होत असते. रोगांचे समुदाय शत्रूंप्रमाणे शरी-रावर सारखे प्रहार करीत असतात. वृद्धावस्था वाघिणीप्रमाणे भय दाखवीत पुढे उभी राहत असते. मृत्यू जन्मतःच आपल्या-बरोबर राहत असून तो वेळ केव्हा भरते याची वाट पाहत असतो. देहाचा अभिमान धरून मनुष्य हा आपल्याला मी राजा आहे, लोकप्रसिद्ध आहे इत्यादि काहीतरी मानीत असतो; परंतु खरे तर या शरीराला किडे, विष्ठा, भस्म यांपैकी काहीतरी नाव देणेच योग्य आहे. हा देहच त्वचा, हाडे, मांस, विष्ठा, मूत्र, रेत रक्त इत्यादिकांनी युक्त असून तो नाना विकार पावणारा व निरनिराळ्या अवस्थांप्रत जाणारा असतो. असा हा देह निर्विकार व परिणामहीन आत्मा कसा होऊ शकेल ? आणि अशा या देहाचा अभिमान धरून हे लक्ष्मणा ! तू लोकांना जाळू इच्छित आहेस ! देहाभिमानानेच मनुष्याच्या हातून सर्व प्रकारचे दोष घडत अस-तात. “देह हाच मी आहे,” अशी जी बुद्धी तिलाच “अविद्या” असे म्हणतात. “मी देह नसून ज्ञानस्वरूप आहे,” अशी जी बुद्धी तीच “विद्या” होय. अविद्या किंवा अज्ञान हेच संसाराचे मूळ कारण होय. विद्या किंवा ज्ञान हे त्या संसाराला दूर करते. याकरिता मुमुक्षूंनी ज्ञानाचा अभ्यास करण्याचा सतत प्रयत्न करावा. हे लक्ष्मणा ! मोक्षप्राप्तीच्या मार्गात कामक्रोधादि हे शत्रू आहेत, त्यातही मोक्षाच्या कामी विघ्न करण्यास एकटा क्रोधच

नेहमी पुरा असतो. त्या क्रोधाने व्याप्त होऊनच मनुष्य, बाप, भाऊ, आप्त, मित्र इत्यादिकांचा नाश करण्यास प्रवृत्त होतो. क्रोध हेच मनस्तापाचे मूळ कारण आहे. या क्रोधामुळेच मनुष्याला संसारात बंधन प्राप्त होते. क्रोध हा धर्माचा क्षय करणारा आहे. याकरिता हे लक्ष्मणा ! तू क्रोधाचा त्याग कर. क्रोध हा एक मोठा शत्रू आहे आणि तृष्णा अर्थात् भोगादिकांची इच्छा ही वैतरणीनदी अर्थात् यमाच्या नगराजवळ पू, रक्त, इत्यादि घाणेरड्या पदार्थांनी भरलेली नरकनदी आहे. त्याचप्रमाणे संतोष हे नंदनवन आणि शांती ही कामधेनू आहे. याकरिता तू शांती व क्षमा धारण कर. असे केल्याने तुला कोणीच शत्रू होणार नाही. आत्मा हा देह, इंद्रिये, मन, प्राण व बुद्धी या सर्वांहून वेगळा आहे. तो शुद्ध, स्वयंप्रकाश, अविकारी व निराकार आहे. जोपर्यंत देह, इंद्रिये व प्राण यांहून आत्मा भिन्न आहे हे समजत नाही तोपर्यंतच मृत्यूची भीती घेऊन संसारातील दुःखांनी प्राणी पीडित होतात. याकरिता आत्मा शरीरादिकांहून भिन्न आहे अशी भावना तू नेहमी मनात ठेव. आपण बुद्ध्यादिकांहून भिन्न आहे असे मानून सर्व बाह्य व्यवहार करीत जा. त्याबद्दल खेद मानू नकोस. प्रारब्धाने जी सुखदुःखे भोगावी लागतील ती भोगीत जा. अशा रीतीने संसार-प्रवाहात पडून कर्मे करीत राहिलास तरीही तू कर्मांनी लिप्त होणार नाहीस. हे लक्ष्मणा ! बाहेरून सर्व कार्यात तुझ्याकडे कर्तृत्व असले तरी तुझे अंतःकरण शुद्ध असल्यास त्या कर्मांचा लेप तुला कधीही लागणार नाही. मी सांगितलेले हे सर्व तत्त्वज्ञान नेहमी हृदयात ठेव. तू जर असे केलेस तर कितीही संसारदुःखे तुझ्यावर आली तरी त्यांपासून तुला बाधा म्हणून होणार नाही."

(श्रीमद् अध्यात्मरामायण अयोध्याकांड चतुर्थ सर्ग १९ ते ४४)

प्रभू श्रीरामचंद्र सीतेसह वनवासात गेल्यावर त्यांची श्रीगंगा-तीरावर भिल्लांचा राजा श्री. गुहाची भेट झाली. त्याने जेव्हा श्रीसीतारामचंद्रांना दर्भाच्या व वृक्षपर्णांच्या शय्येवर झोपल्याचे पाहिले त्यावेळी त्याच्या डोळ्यांमधून अश्रू वाहू लागले व तो विनयपूर्वक श्रीलक्ष्मणाला असे म्हणाला की, " हे बंधो ! जे आपल्या उत्तम मंदिरात सुवर्णाच्या पलंगावर सुंदर शय्येवर निजावयाचे तेच श्रीरामप्रभू आज सीतेसह दर्भ आणि पर्णांच्या शय्येवर निजले आहेत हे तू पाहतच आहेस. श्रीरामप्रभूंच्या या दुःखाचे कारण दैवयोगेकरून कैकयी झाली आहे. तिने मंथरेच्या उपदेशाने हे पाप केले आहे. " श्री. गुहराजांचे हे म्हणणे ऐकून श्री. लक्ष्मण त्यांना असे म्हणाला की, " मित्रा ! माझे भाषण ऐक. कोण कोणाच्या दुःखाचे व कोणकोणाच्या सुखाचे कारण आहे ? खरे तर सुख-दुःखाचे कारण प्राण्यांचे पूर्वजन्मार्जित कर्मच असते. सुख किंवा दुःख कोणीही देत नाही आणि ते दुसरा कोणी तरी देतो असे समजणे ही बुद्धीच खोटी आहे. मी करतो हा अभिमान व्यर्थ आहे; कारण सर्व लोक आपापल्या पूर्वार्जित कर्माच्या सूत्राने बांधलेले असतात. आपण ज्याप्रमाणे कर्माचरण केलेले असते त्याप्रमाणे तद-नुसारच आपल्याला आप्त, मित्र, शत्रू, उदासीन, द्वेषी, मध्यस्थ आणि बांधव हे ठिकठिकाणी भेटत असतात. मनुष्य हा पूर्णपणे कर्माच्या स्वाधीन असल्यामुळे त्याने सुख किंवा दुःख हे जसे जसे प्राप्त होईल ते तसे तसे भोगून स्वस्थ राहावे. त्याचप्रमाणे भोग भोगावे अशी मला इच्छा नाही किंवा ते त्यागावे अशीही इच्छा नाही आणि ते मिळोत अथवा न मिळोत मी त्यांच्या अधीन राहणार नाही अशा विचाराने वागावे. ज्या स्थळी किंवा काळी,

ज्यामुळे किंवा ज्या योगाने शुभ किंवा अशुभ कर्म ज्या कोणी केलें असेल त्याला त्या त्या काळी त्याच त्या रीतीने त्यांचे फळ भोगावे लागते. त्यात कधीही फरक म्हणून होत नाही. याकरिता शुभ किंवा अशुभ अशी कशीही फले प्राप्त झाली तरी त्यांबद्दल हर्ष किंवा विषाद मानू नये. ब्रह्मदेवाने जे काही ठरविले आहे ते चुकविण्याचे सामर्थ्य देवांना आणि दैत्यांनाही नाही. मनुष्याचा नेहमीच सुख-दुःखांशी संबंध येत असतो; कारण शरीर हे पुण्य आणि पाप यांपासूनच उत्पन्न झालेले असल्यामुळे त्याला सुखदुःखे जडलेली असतात. सुखामागून दुःख आणि दुःखामागून सुख ही दिवसरात्रीं-प्रमाणे प्राण्यांना कधीही टाळता येत नाहीत. पाणी व चिखल यांप्रमाणे सुखामध्ये दुःख आणि दुःखामध्ये सुख गुरफटून गेले आहे. त्यामुळे विद्वान् लोक अनुकूल किंवा प्रतिकूल अशा कोणत्याही स्थितीत धैर्य धरून, ही सर्व माया आहे, असे समजून आनंदही पावत नाहीत व मोहही पावत नाहीत." (श्रीमद् अध्यात्मरामायण अयोध्याकांड षष्ठ सर्ग १ ते १५)

श्रीराम वनवासाला गेल्यावर ज्यावेळी ते महर्षी श्रीवाल्मी-कींच्या आश्रमात गेले व मला राहावयाला सुखकारक असे स्थान सांगा असे म्हणाले त्यावेळी महर्षी श्रीवाल्मीकी महामुनी त्यांना असे म्हणाले की, " हे रामा ! तूच सर्व लोकांचे निवासस्थान आहेस आणि त्याप्रमाणेच सर्व भूते ही तुझी राहण्याची ठिकाणे आहेत. हे रघुनंदना ! हे तुझे सामान्य असे स्थान सांगितले; परंतु सीतेसह राहण्यास योग्य असे स्थल कोणते म्हणून विशेष प्रश्न करीत आहेस, त्या अर्थी ते सांगतो. हे रघुश्रेष्ठा ! जे शांत आहेत, ज्यांच्या ठिकाणी भेददृष्टी नाही, जे कोणाही प्राण्याशी द्वेष धरीत नाहीत व जे सतत तुलाच भजतात अशांचे हृदय हेच तुझे निवास-

स्थान आहे. धर्म्य व अधर्म्य या दोन्ही भावना टाकून देऊन जो तुलाच एकट्याला रात्रंदिवस भजतो त्याचे हृदय हेच तुझे सुंदर मंदिर होय. अहंकार, प्रीती व द्वेष यांचा त्याग करून ज्यांनी शांती धारण केली आहे आणि मातीचे ढेकूळ, दगड किंवा सोने यासंबंधी समदृष्टी ठेवली आहे, त्यांचे हृदय हेच तुझे घर आहे. तुझ्या ठिकाणी मन आणि बुद्धी ठेवून जो नेहमी संतुष्ट राहतो आणि आपली सर्व कर्मे तुला अर्पण करतो, त्याचे मन हेच तुझे सुंदर घर आहे. अप्रिय वस्तूच्या प्राप्तीने ज्याच्या ठिकाणी द्वेष उत्पन्न होत नाही, प्रिय वस्तूच्या लाभाने ज्याला आनंद होत नाही आणि ही सर्व माया आहे असा निश्चय करून जो तुला भजतो त्याचेच मन हे तुझे घर आहे. जन्मास येणे, असणे, वाढणे, पूर्ण होणे, क्षीण होणे व नाश पावणे हे सहा भाव वगैरे विकार देहाला आहेत, आत्म्याला नाहीत, असे जो पाहतो आणि भूक, तहान हे प्राणाचे व सुख, दुःख, भीती हे बुद्धीचे विकार आहेत, आत्म्याचे नाहीत, असे जो जाणतो, तो पुरुष संसाराच्या धर्मांपासून मुक्त असल्यामुळे त्याचे मनच तुझे घर आहे. तू सर्वांच्या बुद्धीत राहणारा, ज्ञानपूर्ण, सत्यस्वरूप, अनंत, एक, द्वैतरहित, अलिप्त, सर्वत्र भरलेला व श्रेष्ठ आहेस अशा दृष्टीने जे तुला पाहतात त्यांच्या हृदयकमली तू सीतेसह वास कर. ज्यांची अंतःकरणे निरंतर अभ्यासाने तुझ्या ठिकाणी दृढ झाली आहेत, जे तुझ्या चरणसेवेत रंगले आहेत व ज्यांची पापे तुझ्या नामसंकीर्तनाने नष्ट झाली आहेत त्यांच्या हृदयकमलात तुझे घर आहे. हे रामा! तुझा नाममहिमा कोणाला कसा वर्णन करता येईल? या तुझ्या नामाच्या प्रभावानेच मी ब्रह्मर्षिपदाला प्राप्त झालो आहे." (श्रीमद् अध्यात्मरामायण अयोध्याकांड—षष्ठ सर्ग ५८ ते ६४)

राजा श्रीदशरथांच्या मृत्यूने शोकविव्हल झालेल्या श्रीभरताला उपदेश करताना महर्षी श्रीवसिष्ठ त्याला आदरपूर्वक असे म्हणाले की, "वृद्ध दशरथ राजा ज्ञानी आणि सत्यपराक्रमी असा होता. तो मोक्षाला पात्र असल्यामुळे त्याच्याबद्दल शोक करणे योग्य नाही. तू विनाकारण शोक करीत आहेस; कारण आत्मा नित्य, विकाररहित, शुद्ध आणि जन्म व नाश नसलेला असा आहे. शरीर हे जड असून अत्यंत अपवित्र आहे. ते नाशवंत आहे. या दृष्टीने विचार करून पाहिले असता शोक करण्याचे काहीच कारण नाही. पिता काय किंवा पुत्र काय मृत्युवश झाला असता जे कोणी त्याबद्दल देहताडन करून शोक करतात ते केवळ मूर्ख होत. या असार संसारामध्ये ज्ञानी मनुष्याला वियोग हा नेहमीच वैराग्यप्राप्तीला कारण होत असतो आणि पुढे तोच वियोग शांतिसुखही देत असतो. ज्याअर्थी प्राणी या लोकात जन्मास आला आहे त्याअर्थी मृत्यू त्याच्या मागे लागलेलाच आहे. त्यामुळे जन्मास येणाऱ्या माणसांना मृत्यू टाळताच येत नाही. सर्व जंतूंना जन्म आणि विनाश हे त्यांच्या त्यांच्या कर्मानुसार असतात असे जो जाणतो तो अज्ञानी असला तरी तो बंधनांबद्दल शोक कसा बरे करील? आजपर्यंत कोटचवधी ब्रह्मांडे नष्ट झाली आहेत, अनेक सृष्टी नाश पावल्या आहेत आणि सर्व समुद्रही शुष्क होऊन गेले आहेत. अशा स्थितीत या क्षणिक जीविताची आस्था ती काय म्हणून धरावयाची? चंचल पर्णाच्या अग्रभागी लागलेल्या जलबिंदूप्रमाणे आयुष्य हे क्षणभंगुर असून प्राण्याला ते अवेळी सोडून जाते. अशा स्थितीत त्याच्यावर तुझा विश्वास का असावा? पूर्वजन्मी केलेल्या कर्मांप्रमाणे जीव पुन्हा देह धारण करतो. त्या नवीन देहात तो कर्मे करतो. त्यामुळे तदनुसार पुन्हा दुसरा देह आत्म्याला प्राप्त होतो. ज्याप्रमाणे

एखादा मनुष्य जीर्ण वस्त्र टाकून नवीन वस्त्र धारण करतो त्याच-प्रमाणे आत्मा सर्वदा जीर्ण देहाचा त्याग करून नवीन देह धारण करतो. अशा स्थितीत त्याबद्दल शोकाला जागा तरी कोठे आहे ? आत्मा कधी मरत नाही, कधी जन्म घेत नाही किंवा वाढतही नाही. तो षड्भावरहित व अनंत असून सत्यज्ञान अर्थात् आत्म-स्वरूपज्ञान हेच त्याचे शरीर आहे. तो आनंदरूप बुद्ध्यादिकांचा साक्षी व नाशरहित आहे. आत्मा एकच, सर्वत्र पूर्णत्वाने भरलेला, द्वैतभावरहित व सत्तारूपाने सारखा राहिलेला असा आहे. याकरिता असे आत्मस्वरूप पक्के जाणून शोक टाकून दे आणि क्रिया कर." (श्रीमद् अध्यात्मरामायण अयोध्याकांड–सप्तम सर्ग–९३ते१०७)

पुढे ज्यावेळी श्रीमेघनादाने श्रीमारुतीला ब्रह्मास्त्रपाशाने बांधून त्याला श्रीरावणापुढे आणले त्यावेळी श्रीमारुतीने श्रीरावणाला उपदेश करताना श्रीमद् अध्यात्मरामायणातील सुंदरकांडात असे सांगितले की, "हे रावणा ! तुला काही हिताच्या गोष्टी सांगाव्यात या उद्देशाने मी ब्रह्मास्त्राने बांधल्यासारखा होऊन येथे आलो आहे. तुझ्याविषयी करुणा उत्पन्न होऊन माझे चित्त अत्यंत कळवळले आहे. हे रावणा ! विचारपूर्वक वागल्याने लोकांना सद्गती मिळते, ही गोष्ट लक्षात घेऊन राक्षसी बुद्धीचा स्वीकार करू नकोस. संसारातून मुक्त होण्याला साधनभूत अशा दैवी मार्गाचा आश्रय कर. त्यातच तुझ्या आत्म्याचे अनंत कल्याण आहे. तू ब्राह्मण असून तुझा जन्म उत्तम कुळात झालेला आहे. तू पौलस्त्याचा पुत्र असून कुबेराचा बंधू आहेस. हे लक्षात घे की, तू देहात्मबुद्धीने म्हणजे देह हाच आत्मा आहे अशा बुद्धीने पाहिलेस तरी तू राक्षस नसून ब्राह्मण आहेस आणि,उलट आत्मबुद्धीने म्हणजे आत्मा देहाहून वेगळा आहे असे मानलेस तरी तू राक्षस नाहीस,

हे वेगळे कशाला सांगितले पाहिजे ? शरीर, बुद्धी व इंद्रिये यांपासून उद्‌भवणारी दुःखे तुला लागत नाहीत; कारण दुःख परंपरा हे चित्ताचे धर्म असून ते चित्त तू नाहीस. तू निर्विकार आत्मा आहेस. ज्याप्रमाणे प्राण्याला स्वप्नात दिसणारे पदार्थ वस्तुतः असत्य असतात त्याप्रमाणेच ही दुःखसंतती अज्ञानमूलक असल्या-मुळे असत्य आहे. तुझे स्वरूप सत्य आहे. तुला विकार म्हणून नाहीत. तुझ्या ठिकाणी द्वैत नसल्याकारणाने विकाराचे कारण असलेले अज्ञान संभवत नाही. ज्याप्रमाणे आकाश सर्वत्र भरलेले असून कशानेही लिप्त होत नाही त्याप्रमाणेच तू अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे देहात वास करूनही दुःखादिकांनी लिप्त होत नाहीस. सूक्ष्म शरीर, इंद्रिये, प्राण आणि स्थूल शरीर यांचा संबंध घडून प्राणी त्यांनाच अज्ञानाने आत्मा असे मानतो आणि त्यामुळे तो सर्व प्रकारच्या बंधनात सापडतो. मी चैतन्यरूप आहे, मी जन्मरहित आहे, मी अक्षर म्हणजे नाशरहित आहे व मी आनंदमय आहे असा विचार केला की, प्राणी मुक्त होतो. देह हा पृथ्वीच्या विकारापासून उत्पन्न झाल्यामुळे तो आत्मा नाही. प्राणही आत्मा नाही; कारण तो प्राण म्हणजे केवळ वायू होय. मन हा अहंकाराचा विकार असल्यामुळे ते आत्मा नव्हे; बुद्धी देखील आत्मा नव्हे; कारण ती प्रकृतीच्या विकारापासून उत्पन्न होते. आत्मा हा चैतन्यरूप, आनंदमय, विकाररहित, देहादि समुदायांपासून निराळा, सर्वशक्तिमान्, अलिप्त व सर्वदा उपाधींपासून मुक्त आहे, असे ज्ञान झाले म्हणजे पुरुष संसारातून मुक्त होतो. याकरिता हे महामते रावणा ! मोक्षाचे निश्चित असे साधन मी तुला सांगतो. ते तू लक्ष देऊन ऐक. श्रीविष्णूची भक्ती हे चित्ताला शुद्ध करण्याचे उत्तम साधन होय. अशा रीतीने

चित्त शुद्ध झाले असता अत्यंत निर्मल असे ज्ञान प्राप्त होते. त्या ज्ञानापासून परम शुद्ध असा तत्त्वानुभव प्राप्त होतो. अशा प्रकारे ज्याला उत्तम तत्त्वज्ञान प्राप्त होते त्याला परमपदाची प्राप्ती होते. याकरिता तू आता श्रीरामांची भक्ती कर. हे श्रीराम म्हणजे साक्षात् लक्ष्मीपती श्रीविष्णूच आहेत. हे प्रकृतीपासून अलिप्त असून सर्वव्यापी पुराणपुरुष आहेत. शरणागत भक्तजनांविषयी त्यांना फार प्रेम आहे. याकरिता हृदयातील मूर्खपणा व शत्रुभाव सोडून देऊन श्रीसीतेला पुढे कर आणि त्या श्रीरामांचा पुत्र बांधवासह आश्रय करून त्यांना नमस्कार कर. असे केले म्हणजे तू भयापासून मुक्त होशील. श्रीराम हे परमात्मा आहेत व ते सर्वांच्या हृदयात राहणार असून सुखरूप व अद्वितीय आहेत, अशी भक्तिपूर्वक भावना जो कोणी ठेवीत नाही, तो मनुष्य दुःखरूपी लाटांनी तुडुंब भरलेल्या संसार समुद्राच्या परतीराला कसा जाऊन पोहोचेल ? अशी भक्तिपूर्वक भावना जर तू ठेवली नाहीस तर अज्ञानरूप अग्नीने जळणाऱ्या आत्म्याचे शत्रूप्रमाणे आरक्षण केल्यासारखे होईल आणि आपण स्वतः केलेल्या पातकांनी तू त्या आत्म्याला अधोगतीला नेशील. यामुळे मग मोक्षाची आशा करण्यास तुला जागाच राहणार नाही." (श्रीमद् अध्यात्मरामायण सुंदरकांड–चतुर्थसर्ग १४ ते २५)

सारांश, श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना अशा प्रकारे श्रीमद् अध्यात्मरामायणातील अयोध्याकांडादि कांडे एखादे पुराण सांगावे त्याप्रमाणे समजावून का सांगितली असावीत याचा उलगडा येथपर्यंत जे तत्त्वज्ञान पाहिले त्यावरून झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र या तत्त्वज्ञानाचे खरे रहस्य सामरस्य हेच असून ते प्राप्त व्हावे म्हणूनच श्रीस्वामीमहाराजांनी ते आग्रहपूर्वक

सांगितल्याचे दिसून येते. या रहस्याचा उलगडा श्रीसंत एकनाथ-महाराजांनी "श्रीभावार्थ रामायणातील" अयोध्याकांडाच्या सुरुवातीला मोठ्या अपूर्व रीतीने केला आहे. तो पाहिला म्हणजे श्रीस्वामीमहाराजांच्या अंतरंग दृष्टीचा उलगडा होऊन श्री. गंगाधरपंत वैद्य यांना जो लाभ झाला तसाच आपल्यालाही होईल अशी खात्री वाटते. श्रीसंत एकनाथमहाराज असे म्हणतात की–

श्रीरामकथेची नव्हाळी । शेष वंदी पाताळीं ।
शिव वंदी प्रेमसमेळीं । कथा भूतळीं जगद्वंद्य ।। १ ।।
तरी तें शतकोटी रामायण । आळवूं शकेल कोण ।
तेथें मी अपुरतें दीन । परी तो जनार्दन स्वयें वदवी ।।२।।
तरी श्रीरामस्वरूप चिद्रूपता । चैतन्यशोभांकित सीता ।
तरी देवभक्तांच्या कृतकार्यार्था । मानुष्यजाड्यता अवतारू ।।३।।
अर्धनारीनटेश्वरी । जो पुरुष तेचि नारी ।
तेंवी ते सीता निर्धारीं । एकात्मतेवरी स्त्रीपुरुष ।।४।।
जैसीं बहुरूपी रावराणी । परी स्त्रीपुरुषभाव नाहीं मनीं ।
तरी तेचि संपादणी । लोकसंरक्षणीं सत्यत्वें दावी ।। ५ ।।
'एकाकी न रमते' या श्रुती । सवतीमत्सरू स्वयें म्हणती ।
तरी हे बृहदारण्य वेदोक्ती । द्वैती कल्पिती अद्वैतभावो ।।६।।
परब्रह्म जें अतिरिक्त । 'सहैतावन्नास' द्विधांग पावत ।
तरी हा वेदांतींचा इत्यर्थ । द्वैत कल्पित अद्वैतत्वें ।।७।।
यापरी सुखें श्रीरामसीता । दोनी नांदती एकात्मता ।
ऐसिया स्थितीची व्यवस्था । जे अवतरता नटनाट्यें ।।८।।
तरी व्यवस्था पावे अधिकारविधी । आणि भक्तां नांदवावें निजपदीं ।
म्हणोनि याचिलागीं त्रिशुद्धी । अवतार सिद्धि श्रीराम ।।९।।

ऊंस गाळून काढिजे रस। मग तोही जाळून असोस।
शर्करा कीजे अति सुरस। तिचाही निर्मळांश नाबाद[1] कीजे ॥१०॥
मग नाबदेचीं अति निगुतीं। फळे नारळे चतुर करिती।
आणि तेथेंही कवठें काढिती। ते करंटे निश्चितीं निजस्वादा ॥११॥
तेंवी परब्रह्मतेचि रसें। देहाकृतीच्चिये मुसें।
ओतींव रामरूपाचे ठसे। आले आपेसे चित्स्वरूपा ॥१२॥
ऐसी श्रीरामाची शुद्धमूर्ती। शोभा शोभवी त्रिजगती।
तरी तेथें स्थूलत्व भाविती। ते करंटे निश्चितीं अभागी ॥१३॥
जे मनुष्य मानिती श्रीरामा। ज्याचेनि नामें नाश भवभ्रमा।
त्यासी मानवी महिमा। बोलोंचि नये ॥१४॥
श्रीरामाची निजस्थिती। शिवभवानी नाम जपती।
आणि त्यासी लक्ष्मण अनुवर्ती[2]। सखा सांगाती सर्वस्वें ॥१५॥
तरी लक्ष्मण एकात्मता रामांकित। केवळ भावार्थ तो भरत।
शत्रुघ्न तो धैर्यवंत। हा व्यूहवृत्तांत[3] चतुष्टयाचा ॥१६॥
मुख्य मुळीं एक मूर्ती। तेचि चतुर्धा अभिव्यक्ती।
या नांव व्यूहचतुष्टय म्हणती। एक निश्चितीं विभाग ॥१७॥
आत्मप्रबोध तो लक्ष्मण। भावार्थ तो भरत जाण।
निजनिर्धारी तो शत्रुघ्न। आनंदविग्रही पूर्ण श्रीराम ॥१८॥
अहमात्मा तोचि दशरथ। उत्पत्तीसी मुख्य हेत।
दूर गेलिया श्रीरघुनाथ। निवर्तत अहमात्मा ॥१९॥
आतां विवेक आणि निजविचारू। तैसे वसिष्ठविश्वामित्र गुरू।
ज्यांपासोनि अति साचारू। शस्त्रास्त्रविद्या दृढ केली ॥२०॥
कौसल्या ते सुविद्या। सुमित्रा ते शुद्ध मेधा[4]।
कैकयी ते अति अविद्या[5]। मंथरा कुविद्या तीपासीं ॥२१॥

---

१ खडीसाखर. २ बरोबर राहणारा. ३ मतितार्थ. ४ धारणाशक्ती, बुद्धी. ५ अज्ञान.

कुविद्या क्षोभवोनि अविद्येसीं । श्रीराम केला वनवासी ।
तव सीता अनन्य भावेसीं । श्रीरामासरसी निघाली ॥२२॥
सूर्यासवे जैसी प्रभा । वसंतासवे शोभे वनशोभा ।
तैंवी जानकी जगदंबा । प्राणवल्लभासवें निघे ॥२३॥
जेंवी साकरेतें न सांडी गोडी । तैंवी सीता रामा न सोडी ।
केवळ सेवेची आवडी । वनीं रोकडी दासत्वाची ॥२४॥
राज्यीं असतां रघुनंदनासी । सेवा वांटिली सेवकांसी ।
तरी ते मी एकली वनवासीं । सर्व सेवेसी पात्र होईन ॥२५॥
श्रीरामसेवा जरी ये हातां । ऐसें भाग्य दुर्लभ सर्वथा ।
ते सेवावया तत्त्वतां । चरणचालीं सीता वना आली ॥२६॥
ऐसी हे सीतेची गती । तैसीच लक्ष्मणाची स्थिती ।
श्रीरामसेवे वनाप्रती । आला निश्चितीं सर्वभावें ॥२७॥
जैसा आत्म्यापासीं निजबोधु । तैसा श्रीरामासवे निजबंधु ।
दोघांचा एक संवादु । परम आल्हादु वनवासीं ॥२८॥
जैसे बोध विरक्ति परमार्थासीं । तैसे सीता लक्ष्मण श्रीरामासरसीं ।
ऐसे तिघे निघाले वनवासीं । कृतकार्यासी लक्षोनी ॥२९॥
लक्षोनि पुढील कार्यार्थ । वना निघाला श्रीरघुनाथ ।
येथोनि चालिला ग्रंथार्थ । तो श्रोतीं भावार्थ अवधारिजे ॥३०॥
रामायणींचा ग्रंथार्थ । त्यामाजीं जो निजभावार्थ ।
श्रोतीं पाहावा सावधानार्थ । अर्थें परमार्थ सहज जोडे ॥३१॥
एका जनार्दना शरण । हें भावार्थरामायण ।
श्रीरामाचें निरूपण । दावी लक्ष्मण व्यूहचतुष्टयाचें ॥३२॥

श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना श्रीमद् अध्यात्म-रामायणातील उत्तरकांडात आलेली श्रीरामगीता अत्यंत प्रेमपूर्वक समजावून का सांगितली असेल हे मूळ श्रीरामगीता वाचून तिचा अर्थ पाहिला म्हणजे लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

॥ श्रीमद् अध्यात्मरामायणम् ॥

॥ उत्तरकाण्डम् – पंचम सर्गः ॥

॥ श्रीरामगीता ॥

श्रीमहादेव उवाच ।

ततो जगन्मङ्गलमंगलात्मना
विधाय रामायणकीर्तिमुत्तमाम् ।
चचार पूर्वाचरितं रघूत्तमो
राजर्षिवर्यैरभिसेवितं यथा ॥ १ ॥

सौमित्रिणा पृष्ट उदारबुद्धिना
रामः कथाः प्राह पुरातनीः शुभाः ।
राज्ञः प्रमत्तस्य नृगस्य शापतो
द्विजस्य तिर्यक्त्वमथाह राघवः ॥ २ ॥

कदाचिदेकान्त उपस्थितं प्रभुं
रामं रमालालितपादपङ्कजम् ।
सौमित्रिरासादितशुद्धभावनः
प्रणम्य भक्त्या विनयान्वितोऽब्रवीत् ॥ ३ ॥

त्वं शुद्धबोधोऽसि हि सर्वदेहिनाम्
आत्मास्यधीशोऽसि निराकृतिः स्वयम् ।
प्रतीयसे ज्ञानदृशां महामते
पादाब्जभृङ्गाहितसंगसंगिनाम् ॥ ४ ॥

अहं प्रपन्नोऽस्मि पदाम्बुजं प्रभो
भवापवर्गं तव योगिभावितम् ।
यथांजसा ज्ञानमपारवारिधिं
सुखं चरिष्यामि तथानुशाधि माम् ॥ ५ ॥

श्रुत्वाऽथ सौमित्रिवचोऽखिलं तदा
प्राह प्रपन्नार्तिहरः प्रसन्नधीः ।
विज्ञानमज्ञानतमोपशान्तये
श्रुतिप्रपन्नं क्षितिपालभूषणः ॥ ६ ॥

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः
कृत्वा समासादितशुद्धमानसः ।
समाप्य तत्पूर्वमुपात्तसाधनः
समाश्रयेत्सद् गुरुमात्मलब्धये ॥ ७ ॥

क्रिया शरीरोद्भवहेतुरादृता
प्रियाप्रियौ तौ भवतः सुरागिणः ।
धर्मेतरौ तत्र पुनः शरीरकं
पुनः क्रिया चक्रवदीर्यते भवः ॥ ८ ॥

अज्ञानमेवास्य हि मूलकारणं
तद्धानमेवात्र विधौ विधीयते ।
विद्यैव तन्नाशविधौ पटीयसी
न कर्म तज्जं सविरोधमीरितम् ॥ ९ ॥

नाज्ञानहानिर्न च रागसंक्षयो
भवेत्ततः कर्म सदोषमुद्भवेत् ।
ततः पुनः संसृतिरप्यवारिता
तस्माद्बुधो ज्ञानविचारवान्भवेत् ॥१०॥

ननु क्रिया वेदमुखेन चोदिता
यथैव विद्या पुरुषार्थसाधनम् ।
कर्तव्यता प्राणभृतः प्रचोदिता
विद्यासहायत्वमुपैति सा पुनः ॥११॥

कर्माकृतौ दोषमपि श्रुतिर्जगौ
तस्मात्सदा कार्यमिदं मुमुक्षुणा ।
ननु स्वतन्त्रा ध्रुवकार्यकारिणी
विद्या न किंचिन्मनसाऽप्यपेक्षते ॥१२॥

न सत्यकार्योऽपि हि यद्वदध्वरः
प्रकाङ्क्षतेऽन्यानपि कारकादिकान् ।
तथैव विद्या विधितः प्रकाशितै:
र्विशिष्यते कर्मभिरेव मुक्तये ॥१३॥

केचिद्वदन्तीति वितर्कवादिनः
तदप्यसद्दृष्टविरोधकारणात् ।
देहाभिमानादभिवर्धते क्रिया
विद्या गताहङ्कृतितः प्रसिद्धयति ॥ १४ ॥

विशुद्धविज्ञानविरोचनांचिता
विद्याऽत्मवृत्तिश्चरमेति भण्यते ।
उदेति कर्माखिलकारकादिभिः
निहन्ति विद्याऽखिलकारकादिकम् ॥१५॥

तस्मात्त्यजेत्कार्यमशेषतः सुधीः
विद्याविरोधान्न समुच्चयो भवेत् ।
आत्मानुसंधानपरायणः सदा
निवृत्तसर्वेन्द्रियवृत्तिगोचरः ॥१६॥

यावच्छरीरादिषु माययाऽऽत्मधीः
तावद्विधेयो विधिवादकर्मणाम् ।
नेतीति वाक्यैरखिलं निषिध्य तत्
ज्ञात्वा परात्मानमथ त्यजेत्क्रियाः ॥१७॥

यदा परात्मात्मविभेदभेदकं
विज्ञानमात्मन्यवभाति भास्वरम् ।
तदैव माया प्रविलीयतेंऽजसा
सकारका कारणमात्मसंसृतेः ॥१८॥

श्रुतिप्रमाणाभिविनाशिता च सा
कथं भविष्यत्यपि कार्यकारिणी ।
विज्ञानमात्रादमलाद्द्वितीयतः
तस्मादविद्या न पुनर्भविष्यति ॥१९॥

यदि स्म नष्टा न पुनः प्रसूयते
कर्ताऽहमस्येति मतिः कथं भवेत् ।
तस्मात्स्वतन्त्रा न किमप्यपेक्षते
विद्या विमोक्षाय विभाति केवला ॥२०॥

सा तैत्तिरीयश्रुतिराह सादरं
न्यासं प्रशस्ताखिलकर्मणां स्फुटम् ।
एतावदित्याह च वाजिनां श्रुतिः
ज्ञानं विमोक्षाय न कर्म साधनम् ॥२१॥

विद्यासमत्वेन तु दर्शितस्त्वया
क्रतुर्न दृष्टान्त उदाहृतः समः ।
फलैः पृथक्त्वाद्बहुकारकैः क्रतुः
संसाध्यते ज्ञानमतो विपर्ययम् ॥२२॥

सप्रत्यवायो ह्यहमित्यनात्मधीरः
अज्ञप्रसिद्धा नतु तत्त्वदर्शिनः ।
तस्माद्बुधैस्त्याज्यमपि क्रियात्मभिः
विधानतः कर्म विधिप्रकाशितम् ॥२३॥

श्रद्धान्वितस्तत्त्वमसीति वाक्यतो
गुरोः प्रसादादपि शुद्धमानसः ।
विज्ञाय चैकात्म्यमथात्मजीवयोः
सुखी भवेन्मेरुरिवाप्रकम्पनः ॥२४॥

आदौ पदार्थावगतिर्हि कारणं
वाक्यार्थविज्ञानविधौ विधानतः ।
तत्त्वंपदार्थौ परमात्मजीवका-
वसीति चैकात्म्यमथानयोर्भवेत् ।।२५।।

प्रत्यक्परोक्षादिविरोधमात्मनो-
र्विहाय संगृह्य तयोश्चिदात्मताम् ।
संशोधितां लक्षणया च लक्षितां
ज्ञात्वा स्वमात्मानमथाद्वयो भवेत् ।।२६।।

एकात्मकत्वाज्जहती न संभवे-
त्तथाऽजहल्लक्षणता विरोधतः ।
सोऽयंपदार्थाविव भागलक्षणा
युज्येत तत्त्वंपदयोरदोषतः ।।२७।।

रसादिपंचिकृतभूतसंभवं
भोगालयं दुःखसुखादिकर्मणाम् ।
शरीरमाद्यन्तवदादिकर्मजं
मायामयं स्थूलमुपाधिमात्मनः ।।२८।।

सूक्ष्मं मनोबुद्धिदशेन्द्रियैर्युतं
प्राणैरपंचिकृतभूतसंभवम् ।
भोक्तुः सुखादेरनुसाधनं भवेत्
शरीरमन्यद्विदुरात्मनो बुधाः ।।२९।।

अनाद्यनिर्वाच्यमपीह कारणं
माया प्रधानं तु परं शरीरकम् ।
उपाधिभेदात्तु यतः पृथक् स्थितं
स्वात्मानमात्मन्यवधारयेत्क्रमात् ।।३०।।

कोशेष्वयं तेषु तु तत्तदाकृतिः
विभाति संगात्स्फटिकोपलो यथा ।
असंगरूपोऽयमजो यतोऽद्वयो
विज्ञायतेऽस्मिन्परितो विचारिते ।।३१।।

बुद्धेस्त्रिधा वृत्तिरपीह दृश्यते
स्वप्नादिभेदेन गुणत्रयात्मनः ।
अन्योऽन्यतोऽस्मिन्व्यभिचारतो मृषा ।
नित्ये परे ब्रह्मणि केवले शिवे ।।३२।।

देहेन्द्रियप्राणमनश्चिदात्मनां
संघादजस्रं परिवर्तते धियः ।
वृत्तिस्तमोमूलतयाऽज्ञलक्षणा
यावद्भवेत्तावदसौ भवोद्भवः ।।३३।।

नेतिप्रमाणेन निराकृताखिलो
हृदा समास्वादितचिद्घनामृतः ।
त्यजेदशेषं जगदात्तसद्रसं
पीत्वा यथाऽम्भः प्रजहाति तत्फलम् ।।३४।।

कदाचिदात्मा न मृतो न जायते
न क्षीयते नापि विवर्धतेऽनवः ।
निरस्तसर्वातिशयः सुखात्मकः
स्वयंप्रभः सर्वगतोऽयमद्वयः ॥३५॥

एवंविधे ज्ञानमये सुखात्मके
कथं भवो दुःखमयः प्रतीयते ।
अज्ञानतोऽध्यासवशात्प्रकाशते
ज्ञाने विलीयेत विरोधतः क्षणात् ॥३६॥

यदन्यदन्यत्र विभाव्यतेऽभ्रमा-
दध्यासमित्याहुरमुं विपश्चितः ।
असर्पभूतेऽहिविभावनं यथा
रज्ज्वादिके तद्वदपीश्वरे जगत् ॥३७॥

विकल्पमायारहिते चिदात्मकेऽ-
हङ्कार एष प्रथमः प्रकल्पितः ।
अध्यास एवात्मनि सर्वकारणे
निरामये ब्रह्मणि केवले परे ॥३८॥

इच्छादिरागादिसुखादिधर्मिकाः
सदा धियः संसृतिहेतवः परे ।
यस्मात्प्रसुप्तौ तदभावतः परः
सुखस्वरूपेण विभाव्यते हि नः ॥३९॥

अनाद्यविद्योद्भवबुद्धिबिम्बितो
जीवः प्रकाशोऽयमितीर्यते चितः ।
आत्मा धियः साक्षितया पृथक् स्थितो
बुद्ध्याऽपरिच्छिन्नपरः स एव हि ॥४०॥

चिद्बिम्बसाक्षात्मधियां प्रसंगतः
त्वेकत्रवासादनलाक्तलोहवत् ।
अन्योन्यमध्यासवशात्प्रतीयते
जडाजडत्वं च चिदात्मचेतसोः ॥४१॥

गुरोः सकाशादपि वेदवाक्यतः
संजातविद्यानुभवो निरीक्ष्य तम् ।
स्वात्मानमात्मस्थमुपाधिवर्जितं
त्यजेदशेषं जडमात्मगोचरम् ॥४२॥

प्रकाशरूपोऽहमजोऽहमद्वयोऽ-
सकृद्विभातोऽहमतीव निर्मलः ।
विशुद्धविज्ञानघनो निरामयः
संपूर्ण आनन्दमयोऽहमक्रियः ॥४३॥

सदैव मुक्तोऽहमचिंत्यशक्तिमान्
अतीन्द्रियज्ञानमविक्रियात्मकः ।
अनन्तपारोऽहमहर्निशं बुधैः
विभावितोऽहं हृदि वेदवादिभिः ॥४४॥

एवं सदात्मानमखण्डितात्मना
विचारमाणस्य विशुद्धभावना ।
हन्यादविद्यामचिरेण कारकै ।
रसायनं यद्वदुपासितं रुजः ॥४५॥

विविक्त आसीन उपारतेन्द्रियो
विर्निर्जितात्मा विमलान्तराशयः ।
विभावयेदेकमनन्यसाधनो
विज्ञानदृक्केवल आत्मसंस्थितः ॥४६॥

विश्वं यदेतत्परमात्मदर्शनं
विलापयेदात्मनि सर्वकारणे ।
पूर्णश्चिदानन्दमयोऽवतिष्ठते
न वेद बाह्यं न च किंचिदान्तरम् ॥४७॥

पूर्वं समाधेरखिलं विचिन्तयेत्
ओङ्कारमात्रं सचराचरं जगत् ।
तदेव वाच्यं प्रणवो हि वाचको
विभाव्यतेऽज्ञानवशान्न बोधतः ॥४८॥

अकारसंज्ञः पुरुषो हि विश्वको
ह्युकारकस्तैजस ईर्यते क्रमात् ।
प्राज्ञो मकारः परिपठ्यतेऽखिलैः
समाधिपूर्वं न तु तत्त्वतो भवेत् ॥४९॥

विश्वं त्वकारं पुरुषं विलापयेत्
उकारमध्ये बहुधा व्यवस्थितम् ।
ततो मकारे प्रविलाप्य तैजसं
द्वितीयवर्णं प्रणवस्य चान्तिमे ॥५०॥

मकारमप्यात्मनि चिद्घने परे
विलापयेत्प्राज्ञमपीह कारणम् ।
सोऽहं परं ब्रह्म सदा विमुक्तिमत्
विज्ञानदृङ् मुक्त उपाधितोऽमलः ॥५१॥

एवं सदा जातपरात्मभावनः
स्वानन्दतुष्टः परिविस्मृताखिलः ।
आस्ते स नित्यात्मसुखप्रकाशकः
साक्षाद्विमुक्तोऽचलवारिसिंधुवत् ॥५२॥

एवं सदाऽभ्यस्तसमाधियोगिनो
निवृत्तसर्वेन्द्रियगोचरस्य हि ।
विनिर्जिताशेषरिपोरहं सदा
दृश्यो भवेयं जितषड्गुणात्मनः ॥५३॥

ध्यात्वैवमात्मानमहर्निशं मुनिः
तिष्ठेत्सदा मुक्तसमस्तबन्धनः ।
प्रारब्धमश्नन्नभिमानवर्जितो
मय्येव साक्षात्प्रविलीयते ततः ॥५४॥

आदौ च मध्ये च तथैव चान्ततो
भवं विदित्वा भयशोककारणम् ।
हित्वा समस्तं विधिवादचोदितं
भजेत्स्वमात्मानमथाखिलात्मनाम् ॥५५॥

आत्मन्यभेदेन विभावयन्निदं
भवत्यभेदेन मयात्मना तदा ।
यथा जलं वारिनिधौ यथा पयः
क्षीरे वियद्व्योम्न्यनिले यथानिलः ॥५६॥

इत्थं यदीक्षेत हि लोकसंस्थितो
जगन्मृषैवेति विभावयन्मुनिः
निराकृतत्वाच्छ्रुतियुक्तिमानतो
यथेन्दुभेदो दिशि दिग्भ्रमादयः ॥५७॥

यावन्न पश्येदखिलं मदात्मकं
तावन्मदाराधनतत्परो भवेत् ।
श्रद्धालुरत्यूर्जितभक्तिलक्षणो
यस्तस्य दृश्योऽहमहर्निशं हृदि ॥५८॥

रहस्यमेतच्छ्रुतिसारसंग्रहं
मया विनिश्चित्य तवोदितं प्रिय ।
यस्त्वेतदालोचयतीह बुद्धिमान्
स मुच्यते पातकराशिभिः क्षणात् ॥५९॥

भ्रातर्यदीदं परिदृश्यते जगन्
मायैव सर्वं परिहृत्य चेतसा ।
मद्भावनाभावितशुद्धमानसः
सुखी भवानन्दमयो निरामयः ॥६०॥

यः सेवते मामगुणं गुणात्परं
हृदा कदा वा यदि वा गुणात्मकम् ।
सोहं स्वपादांचितरेणुभिः स्पृशन्
पुनाति लोकत्रितय यथा रविः ॥६१॥

विज्ञानमेतदखिलं श्रुतिसारमेकं
वेदान्तवेद्यचरणेन मयैव गीतम् ।
यः श्रद्धया परिपठेद्गुरुभक्तियुक्तो
मद्रूपमेति यदि मद्वचनेषु भक्तिः ॥६२॥

॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे
उत्तरकाण्डे श्रीरामगीतानाम पंचमः सर्गः ॥

– श्रीरामगीतेचा अर्थ –

श्रीमहादेव म्हणाले, " हे पार्वती ! रघूत्तम श्रीराम म्हणजे जगतात ज्या काही मंगलरूप व कल्याणरूप गोष्टी आहेत, त्या सर्वांना मंगलत्व देणारी प्रत्यक्ष ब्रह्मानंदमूर्तीच आहे. अशा त्या श्रीरामाने आपल्या चरित्र्याच्या आधारावर अनेक रामायणे होतील अशी उत्तम कीर्ती संपादन केली. सीतात्यागानंतर तो श्रीराम आपल्या पूर्वजांनी व इतर राजर्षींनी आदरपूर्वक स्वीकारलेल्या आचारांच्या अनुरोधाने वागत असे. ॥१॥ श्रीलक्ष्मणाने विचारल्यावर प्राचीन काळी घडलेल्या कित्येक पुण्यकथा उदार मनाचा श्रीराम त्याला सांगत असे. एका प्रसंगी नकळत अपराध घडून शाप पावलेल्या नृग राजाला क्षुद्र प्राण्याचा–सरडयाचा–जन्म कसा प्राप्त झाला, ती कथा श्रीरामाने श्रीलक्ष्मणाला सांगितली. ॥२॥ (फार प्राचीन काळी नृग नावाचा एक प्रख्यात राजा होऊन गेला. तो नित्य ब्राह्मणांना शेकडो गायी दान देत असे. एकदा त्याच्या गायींच्या कळपात एका ब्राह्मणाची गाय चुकून आली. ही गोष्ट राजाला ठाऊक नसल्यामुळे इतर गायींबरोबर हीही गाय त्याने ब्राह्मणाला दान दिली. पुढे ज्या ब्राह्मणाची गाय हरवली होती, त्याला आपली गाय राजाने दुसऱ्या ब्राह्मणास दिल्याचे कळून आले. त्यामुळे क्रुद्ध होऊन त्या ब्राह्मणाने नृग राजाला "तू सरडयाचा जन्म घेशील," असा शाप दिला. न कळता देखील ब्रह्मस्वहरण केल्याने परम धार्मिकाचीही कशी स्थिती होते, हे येथे दाखविले आहे.) एकदा श्रीलक्ष्मी एकांतात प्रभू श्रीरामाच्या पदकमलाची सेवा करीत बसली असता श्रीलक्ष्मण तेथे आला. नंतर

त्यानें भक्तिपूर्वक श्रीरामाला नमस्कार केला आणि जिज्ञासूला योग्य अशा शुद्धभावाने त्याने त्याला नम्रतापूर्वक असे विचारले की, ॥३॥ हे महामते श्रीरामा! तू निर्मल ज्ञानस्वरूप आहेस. तू सर्वांचा अंतर्यामी आत्मा आहेस. तू स्वतः निराकार असूनही सर्वांचा नियंता आहेस. ज्ञानाच्या दिव्यदृष्टीला तू प्रतीत होणारा आहेस. कमलाच्या ठायी रुंजी घालणाऱ्या भ्रमराप्रमाणे ज्यांची अंतःकरणे तुझ्या चरणी आसक्त होतात, त्यांनाच ही दिव्य दृष्टी प्राप्त होते. ॥ ४ ॥ प्रभो! संसाराची निवृत्ती करणारे, योगिजनांनी ध्याइलेलें, असे जे तुझे पदकमल आहेत, त्याला मी शरण आलो आहे. ज्यामुळे अज्ञानरूप समुद्र मी सुखाने आणि लवकर तरून जाईन, असा कांहीं उपदेश मला कर. ॥ ५ ॥ श्रीरामाचे ब्रीद म्हणजे शरणागतांची दुःखे हरण करणे, हे असे. श्रीलक्ष्मणाचे समस्त भाषण ऐकून त्या राजशिरोमणी श्रीरामाला परम संतोष झाला. त्यावेळी सर्व लोकांच्या अज्ञानतमाचा नाश जेणेकरून होईल, असे वेदांनाही संमत जे आत्म-तत्त्वज्ञान तें त्याने लक्ष्मणाला सांगितले. ॥ ६ ॥ श्रीराम म्हणाला, "प्रथमतः मनुष्याने स्ववर्णाश्रमानुसार नित्यनैमित्तिक कर्मे करावी. त्यामुळे अंतःकरण शुद्धी होईल. पुढे त्या अंतःकरणशुद्धीमुळे शमदमादि साधने प्राप्त झाली असता, कर्माचरण सोडून द्यावे व आत्मज्ञानासाठी श्रीसद्‌गुरूंचा आश्रय करावा. ॥ ७ ॥ पूर्वजन्मी प्राण्याने आदरपूर्वक केलेली कर्मे हेच या शरीराच्या जन्माला कारण असते. या जन्मातही तो विषयांवर प्रेम करू लागला म्हणजे त्याच्या हातून धर्म व अधर्म घडतात व ते धर्माधर्म त्याला सुखदुःखजनक असे होतात. पुढे ते कर्मच मूळ होऊन प्राण्याला पुन्हा जन्म घ्यावा लागतो. त्या जन्मातही तो पुन्हा कर्म करतो. अशा रीतीने कर्मापासून जन्म व जन्मातून कर्म, हे संसारचक्र सारखे चालत असते,

असे म्हणतात. ॥ ८ ॥ या संसाराला मूळ कारण म्हटले म्हणजे अज्ञानच होय आणि ते दूर करणे हे प्राण्याचे अवश्य कर्तव्य होय. अज्ञानाचा नाश करण्यास समर्थ म्हणजे एक ज्ञानच–आत्मतत्त्व-ज्ञानच–आहे. अज्ञानोत्पन्न कर्मापासून त्याच्या अज्ञानाचा नाश होणे शक्य नाही; कारण जे सविरोध असते, तेच नाशक होते, असे म्हटले आहे. ॥ ९ ॥ कर्माच्या योगे अज्ञानाचाही नाश होत नाही आणि विषयासक्तीही क्षय पावत नाही. त्यापासून सदोष असे नवे कर्म मात्र उत्पन्न होते. त्यापासून पुन्हा संसार मागे लागतो. त्या संसारास टाळता येणे शक्य नाही. म्हणून सुज्ञ मनुष्याने सदैव आत्मज्ञानविचार करावा. ॥१०॥

(यावर असा आक्षेप आहे की,) वेदाने आपल्या मुखाने ज्ञान हे जसे पुरुषार्थाचे साधन म्हणून सांगितले आहे, तसेच कर्मे – नित्यनैमित्तिक कर्मे – प्राण्याने अवश्य केली पाहिजेत, असेही सांगितले आहे. कर्म हे ज्ञानास पुष्टी करणारे आहे. ॥११॥ कर्म न केले असता दोष लागतो, असेही श्रुतीने सांगितले आहे. म्हणून मुमुक्षूने कर्म अवश्य केले पाहिजे." (या आक्षेपावर असे म्हणणे आहे की,) "ज्ञान हेच स्वतंत्रपणाने निश्चित कार्य करणारे–मोक्ष पावविणारे–आहे. ते कोणाचे साह्य घेण्याचे मनातही आणीत नाही." ॥१२॥ (यावर ते आक्षेपक असे म्हणतात की,) "असे नाही. यज्ञाचे फल सत्यपणे मिळायचे असते, तरीही त्याला सिद्धी-करता इतर अंगांची–साधनांची–अपेक्षा करावी लागते. त्याचप्रमाणे ज्ञानास शास्त्रविहित कर्मांची जोड मिळेल तरच ते ज्ञान मोक्ष देण्यास समर्थ होईल." ॥१३॥ कित्येक वितर्कवाद्यांचे असे जे म्हणणे आहे, तेही सत्यास सोडून आहे; कारण कर्म आणि ज्ञान ह्यांचा उघड उघड विरोध आहे. देहाभिमान ठेवल्याने प्राण्याच्या

ठिकाणी क्रिया वाढत जाईल. तो देहाभिमान जाईल, तेव्हाच त्याला ज्ञान प्राप्त होईल. ॥१४॥ परम निर्मल आत्मज्ञान करून देणाऱ्या वेदान्तवाक्यांच्या आलोचनाने जी शेवटी अंतःकरणाची ब्रह्माकार वृत्ती होते, तिलाच विद्या–तत्त्वज्ञान–असे (विद्वान् लोक) म्हणतात. सकल कारकांच्या–अंगांच्या–योगे कर्म उदयाला येते. उलट ज्ञान सर्व कारकांचा–कर्तृत्वादि बुद्धीचा–नाश करते. ॥१५॥ म्हणून मुमुक्षू पुरुषाने कर्माचा पूर्णपणे त्याग करावा. कारण कर्माचा ज्ञानाशी विरोध आहे आणि म्हणून (कर्म आणि ज्ञान) या दोघांचा समुच्चय – एकत्र राहणे – शक्य नाही. याकरता सर्व इंद्रियांच्या वृत्तींचे विषय नित्य सोडून द्यावे आणि आत्मानुसंधानपरायण होऊन राहावे. ॥१६॥ जोपर्यंत प्राणी शरीरादि (जड) वस्तूंवर अज्ञानाने अहंभाव–मी म्हणजे शरीर ही बुद्धी–ठेवतो, तोपर्यंत वेदातील कर्मबोधक विधी त्याला पाळावे लागतात. परंतु 'नेति नेति' हे असे नव्हे, हे असे नव्हे, ह्या वचनांनी सर्व जगत् मिथ्या आहे, असे पक्के समजून आले आणि परमात्मा त्या जगाहून वेगळा, अर्थात् सत्य आहे, हे ज्ञान झाले म्हणजे सर्व कर्मे मुमुक्षूने सोडावी. ॥१७॥ जेव्हा आत्मा आणि परमात्मा हा भेद दूर करणारे प्रकाशमय आत्मज्ञान अंतःकरणात उत्पन्न होते, तेव्हा माया आपल्या कारकांसह–कारणासह–तत्काल लयाला जाते. जीवाला संसारात पाडण्याचे कारण म्हटले म्हणजे ही मायाच होय. ॥१८॥ श्रुतिप्रमाणोत्पन्न ज्ञानाच्या योगे ही माया एकदा नष्ट केली, म्हणजे मग ती पुन्हा आपले कार्य–संसार–कसा बरे करील? निर्मल व द्वैतरहित आत्मतत्त्वज्ञानाने ती नष्ट झाली असता पुन्हा उत्पन्नच होणार नाही. ॥१९॥ ती माया नष्ट होऊन पुनः उत्पन्न होत नाही, असे झाल्यावर 'मी कर्ता' हा अभिमान तरी कसा उत्पन्न होईल? म्हणून ज्ञान

हेच एकटे स्वतंत्र असे मोक्षाचे साधन असून त्याला दुसऱ्या कोणाच्याही साहाय्याची अपेक्षा नाही. ॥२०॥

त्या तैत्तिरीय उपनिषदात आदरपूर्वक असे स्पष्टपणे सांगितले आहे की, वेदात (अर्थवादवाक्यांनी) कर्मांची प्रशंसा केली असली, तरी ती सर्व कर्मे सोडून द्यावी. वाजसनेयी शाखेच्या 'एतावत्' ह्या श्रुतीनेही हेच सांगितले आहे की, ज्ञान हे मोक्षाचे साधन आहे, कर्म साधन नाही. ॥२१॥ (हे समुच्चयवाद्या !) यज्ञ ज्ञानासारखा आहे, हे तू दाखविलेस; परंतु त्याला योग्य असा दृष्टान्त सांगितला नाहीस. यज्ञांची फळे वेगवेगळी असल्यामुळे त्यांच्या सिद्धतेस विपुल साधने लागतात. ज्ञान ह्याच्या उलट आहे. ॥२२॥ "कर्मत्यागाने मी दोषी होईन," हा जडधर्माचा आरोप अज्ञानी–तत्त्वज्ञान नसलेल्या–जनांच्या ठिकाणी आढळून येतो. परंतु जे तत्त्वज्ञानी आहेत, त्यांना तसे वाटत नसते: म्हणून सुज्ञ पुरुषांनी शास्त्रातील विहित कर्मे देखील सोडून द्यावी. ॥२३॥ श्रद्धायुक्त होऊन आणि मन निर्मळ करून गुरुकृपेने 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यांनी परात्मा आणि जीवात्मा यांचे एकरूपत्व जाणावे आणि मेरूप्रमाणे निश्चल व सुखरूप होऊन राहावे. ॥२४॥ (हे लक्ष्मणा !) वाक्याचा बरोबर–भ्रमरहित–अर्थ कळण्याकरिता प्रथमतः त्यातील पदांचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. महावाक्यातील – 'तत्त्वमसि –' यातील 'तत्' आणि 'त्वं' ह्या दोन पदांचे अर्थ 'परमात्मा' आणि 'जीव' हे आहेत. 'असि' हे पद उभयांचे ऐक्य दाखविते. ॥२५॥ (आता परमात्मा सर्वज्ञ आहे. आणि जीव किंचिज्ज्ञ आहे, ह्यामुळे दोघांचे ऐक्य होणे विरुद्ध होय. ह्या आशंकेला उत्तर असे की,) जीवाच्या ठिकाणी अहंबुद्धिनेयत्व आहे. ईश्वराच्या ठिकाणी ते नाही. अर्थात् अंतःकरणा-

तील अहंभावनेनेच समजून येणारा जीव आणि अहंभाव नष्ट झाल्यावर समजून येणारे ईशस्वरूप यांमधील प्रत्यक्षत्वपरोक्षत्वाचा विरोध काढून टाकावा आणि लक्षणेने विचार करून ते दोघेही चैतन्यरूपाने एक आहेत, हे जाणावे. मग आपण जीव–आपला आत्मा–तसाच चैतन्यमय आहे, हे समजून तद्रूप व्हावे. ॥२६॥ जीवात्मा व परमात्मा ह्यांचे स्वरूप एकच असल्यामुळे येथे ('तत्त्वमसि' चा अर्थ करताना) 'जहत्स्वार्थलक्षणा –' मूळचा अर्थ सोडून धोरणाने दुसरा स्वीकारणे–संभवत नाही. तसेच 'अजहत्स्वार्थलक्षणा –' मूळचा अर्थ न सोडता धोरणाने दुसरा भरीला घालणे–हेही संभवत नाही. कारण तेथे ह्या दोघांचा विरोध आहे. आता राहिलेली 'जहदजहत्स्वार्थलक्षणा' किंवा 'भागलक्षणा–' मूळचा काही अर्थ सोडणे व काही न सोडणे–ती येथे जुळते. कारण, 'सोऽयं'–'तो हा' ह्या पदांप्रमाणे 'तत् त्वं'–'ते तू'–ह्या पदातील अनुक्रमे सर्वज्ञत्व व अल्पज्ञत्व सोडून दोघांचे चिदात्मकत्व –ब्रह्मरूपत्व – घ्यावयाचे आहे. अशा रीतीने 'तत्त्वं' ह्या पदांचा अविरोधाने अर्थ लावावा. ॥२७॥ हे शरीर पृथ्व्यादि एकवटलेल्या पंचभूतांच्या योगे उत्पन्न झालेले असून सुखदुःखादि प्राप्त करून देणाऱ्या कर्मांचे भोगस्थान आहे. ह्याला उत्पत्ती व नाश ही आहेत. हे पूर्वजन्मार्जित कर्मांपासून उत्पन्न झालेले आहे. हे परंपरेने मायेचे कार्य आहे. असे हे शरीर म्हणजे जीवाची स्थूल उपाधी होय. ॥२८॥ विद्वान् लोक, मन, बुद्धी, दहा इंद्रिये आणि पंचप्राण ह्यांनी युक्त, असे दुसरे एक सूक्ष्म शरीर जीवाची उपाधी आहे, असे मानतात. याची उत्पत्ती अपंचीकृत–मिश्र न झालेल्या–पाच भूतांपासून होते. भोक्त्याला सुखदुःखादि भोग मिळण्याचे साधन म्हणजे हेच होय. ॥२९॥ (आता ईश्वराची उपाधी कोणती, ते सांगतो.)

अनादि, अनिर्वचनीय, सकल जगताच्या उत्पत्तीचे कारण अशी माया म्हणजे ईश्वराचे परम प्रधान शरीर आहे. मूळ आत्मा एक आहे, तरी ह्या उपाधिभेदामुळे तो जीव आणि ईश्वर असा वेगळा होऊन राहिला आहे म्हणून (श्रवण, मनन, निदिध्यासन ह्या) क्रमाने जीवात्म्याचे परमात्म्याशी ऐक्य आहे, असे जाणावे. ॥३०॥

ह्या आत्मा शरीरामध्ये असणाऱ्या अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय अशा पाच कोशांच्या संबंधामुळे त्या त्या आकाराने भासू लागतो. स्फटिकाच्या खड्याच्या संगतीत जशी वस्तू असेल, तसा त्या स्फटिकाला रंग येतो. (हे येथे उदाहरण होय.) 'तत्त्वमसि' या (महावाक्याचा) म्हणजे "ते तू ब्रह्मच आहेस," याचा सम्यक् रीतीने विचार केला असता हा आत्मा असंग, अज, अद्वितीय आहे, अशी प्रतीती येते. ॥ ३१ ॥ ह्या, (आत्म्याच्या) ठिकाणी स्वप्न, जागृती आणि सुषुप्ती अशा तीन प्रकारच्या अवस्था भासतात. त्या रज, सत्त्व आणि तम ह्या त्रिगुणात्मक बुद्धीचे धर्म होत. (आत्म्याचे नव्हेत.) आत्मा नित्य तिन्ही गुणांवेगळा, व्यापक, असंग आणि आनंदरूप आहे. अशा आत्म्यावर हे अनित्य, मिथ्या अवस्थात्रय आरोपिले जाते. बुद्धीच्या अध्यासामुळे तसा भास होतो. ह्या तीन अवस्थांपैकी एक अनुभवीत असता दुसऱ्या दोन हातच्या जातात, म्हणून ह्या तीन अवस्था क्षणिक अतएव अनित्य आहेत. ॥३२॥ देह, इंद्रिये, प्राण आणि मन ह्यांपैकी प्रत्येकाचा आत्म्यावर अध्यास झाल्यामुळे बुद्धीचा तमोमूल आणि अज्ञानजन्य प्रवाह सर्वदा चालू राहातो आणि हा जोपर्यंत वाहात राहील, तोपर्यंत संसाराचे ऱ्हाटगाडगे चालू असायचेच. ॥३३॥ 'नेति नेति' ह्या प्रमाणावरून दृश्य हे सारे खोटे आहे. असे कळले आणि सत्त्वगुणप्रधान हृदयात चिद्घनामृताचा–ज्ञानमय

सुखाचा – अनुभव आला, म्हणजे कोवळ्या नारळातील मधुर रस पिऊन ती करवंची जशी फेकून दिली जाते, त्याप्रमाणे निखिल जगताचा त्याग करावा. (त्याविषयी उदासीन राहावे.) ॥३४॥ हा आत्मा कधी मेला नाही, उत्पन्न होत नाही, क्षीण होत नाही वाढत किंवा नवा होत नाही. त्याने देहेंद्रियादि सर्वांचे महत्त्व नाहीसे केले आहे. हा सुखरूप, स्वयंप्रभ, सर्वव्यापी व द्वैतविहीन आहे. ॥३५॥ (ह्यावर शंका.) अशा प्रकारचा ज्ञानस्वरूप आणि सुखमय आत्मा आहे, तर त्याच्यावर दुःखात्मक संसार कसा बरे प्रत्ययाला–अनुभवाला–येतो ? (याला उत्तर) अज्ञानामुळे आत्म्यावर (देहेंद्रियांचा) अध्यास केल्याने हा संसार अनुभवास येतो. परंतु एकदा स्वरूपज्ञान झाले की, तो क्षणात नाश पावतो; कारण अज्ञान आणि ज्ञान ह्यांचा विरोध आहे. ॥३६॥ पदार्थ वेगळाच असून त्यावर भलत्याच पदार्थाचा भ्रमामुळे आरोप केला जातो. ह्याला विद्वान् लोक 'अध्यास' असे म्हणतात. उदाहरणार्थ वस्तुतः सर्प नव्हे, अशा दोरी वगैरे पदार्थावर अध्यासाने सर्पाचा आरोप करतात, त्याचप्रमाणे ईश्वरावर जगाचा अध्यास (लोकांकडून) केला जातो. ॥३७॥ ज्ञानस्वरूप आत्म्याच्या ठिकाणी विकल्पाचे कारण जी माया ती नाही. आत्मा हा सर्वांचे कारण, दुःखरहित, सर्वव्यापी, सर्वविकारशून्य, दिसणाऱ्या सृष्टीहून वेगळा, असा आहे. त्याच्यावर प्रथमतः अहंकार कल्पिला गेला. हाच अध्यास होय. ॥३८॥ इच्छा–उपेक्षा, प्रीती–द्वेष, सुख–दुःख ही ज्यांचे गुणधर्म, ती संसाराची कारणे परमेश्वरावर आरोपिली जातात, वस्तुतः ती बुद्धीवर राहाणारीं होत. झोपेमध्ये ह्या भावनांचा लोप होत असल्यामुळे सुखस्वरूप आत्मप्रत्यय येत असतो. ॥३९॥ अनादि अविद्येपासून जी बुद्धी उत्पन्न होते, तिच्यामध्ये चैतन्याच्या प्रका-

शाचे प्रतिबिंब पडले असता, त्या प्रतिबिंबाला 'जीव' असें म्हणतात. तेथे आत्मा बुद्धीचा साक्षी होऊन वेगळा राहत असतो. बुद्धीला त्याचा परिच्छेद करता येत नाही. (तो व्यापक आहे.) ।।४०।। लोखंड अग्नीत घालून तप्त केले असता एकत्र सहवासामुळे, त्याला अग्नी हे नाव प्राप्त होते व लोखंडाचाही गुण अग्नीवर दिसतो, त्याप्रमाणे चैतन्याचें प्रतिबिंब (जीव) आणि इंद्रियांसहित मन, ह्यांच्या सान्निध्याने परस्पर अध्यास होऊन आत्म्याचा धर्म चेतनत्व मनावर व मनाचा धर्म जडत्व आत्म्यावर होतो. ।।४१।। म्हणून गुरूपासून अगर वेदवचनांकडून ज्ञानरूप आत्मानुभव प्राप्त करून घ्यावा, त्याचे नीट चिंतन करावे आणि आपला आत्मा उपाधिवर्जित असून हृदयात राहात असतो, हे जाणून आत्म्यावर दृश्य होणाऱ्या सर्व जड देहेंद्रियादिकांस टाकून द्यावें. (त्याविषयी उदासीन राहावे.) ।।४२।। मी प्रकाशरूप आहे, मी अज आहे, मी अद्वय आहे, मी नित्य प्रतीत आहे, मी अत्यंत निर्मल आहे, मी शुद्ध-ज्ञानाने भरलेला आहे, मी दुःखरहित, व्यापक व आनंदमय आहें, मी अक्रिय आहे, ।।४३।। मी नित्यमुक्त आहे, माझ्या शक्तीला पार नाही, अतीन्द्रियज्ञान हे माझे रूप आहे, मी परिणामहीन आहे, मी अनंत, अपार आहे, वेदवेत्ते विद्वान् लोक अंतःकरणात अहर्निश माझे चिंतन करतात, ।।४४।। असे चिंतन करीत पुरुष चित्ताला विषयांकडे जाऊ न देता स्वरूपविचार करीत राहील, तर त्याची अंतःकरणवृत्ती ब्रह्माकार होऊन जाईल आणि मग त्या योगे अविद्या सर्व कारकांसह – देहान्तराला कारण अशा कर्मांसह – तत्काल लयाला जाईल. रसायन घेतले असता रोगाचा तत्क्षणी नाश होतोच. (तद्वतच या वृत्तीनें अज्ञानाचा नाश होतो.)

॥४५॥ पुरुषाने विजनस्थानी आसनावर बसावे, इंद्रिये आटोक्यात ठेवावी, प्राणायामादि साधनांनी मन जिंकावे, चित्त शुद्ध करावे, आत्मज्ञानावाचून (मोक्षाचे) दुसरे कोणतेच साधन नाही, हा निश्चय करावा, आत्मज्ञानाकडेच दृष्टी लावावी आणि मग असंग होऊन आत्मस्वरूपी लीन व्हावे. ॥४६॥ या सगळ्या जगताला प्रकाशित करणारा म्हटला म्हणजे परमात्मा होय. तो जगाचे सर्व कारण–उपादानकारण–आहे. तरी अशा आत्मरूपी सर्व जगताचा लय करावा. असा पुरुष पूर्ण चिदानंदमय होऊन राहातो. त्याला बाह्य किंवा आंतर विषयांचे ज्ञानच राहात नाही. ॥४७॥ त्याने समाधीच्यापूर्वी सर्व स्थावरजंगमात्मक जगत् ओंकारमात्र आहे, असे मानावे. जग हे प्रणवाचे – ओंकाराचे – वाच्य आहे व प्रणव हा जगताचा वाचक आहे, हे प्रसिद्ध आहे. जगत् ओंकाररूप पाहणे, हादेखील अज्ञानाचा प्रकार होय. ज्ञान झाले असता ही वृत्ती राहात नाही. ॥४८॥ 'ओम्' हा शब्द अ, उ, म् अशी तीन अक्षरे मिळून झाला आहे. जागृतावस्थेचा साक्षी जो 'विश्व' त्याचीच 'अ' ही संज्ञा आहे. क्रमाने दुसरा वर्ण 'उ' हा स्वप्नावस्थेचा साक्षी असून त्याला 'तैजस' असे म्हणतात आणि तिसरा 'म्' हा सुषुप्त्य-वस्थेचा साक्षी असून त्याला 'प्राज्ञ' असे सगळे लोक म्हणतात. हा विचार समाधीपूर्वीचा होय. तत्त्वज्ञान झाल्यावर हा विचारच राहात नाही. ॥४९॥ जागृतावस्थेचा अभिमानी असलेला 'विश्व' पुरुष व त्याचा वाचक 'अ' वर्ण ह्यांना उकारामध्ये विलीन करावे; नंतर स्वप्नावस्थेचा अभिमानी 'तैजस' आणि त्याचा वाचक 'उ' यांना प्रणवाच्या शेवटच्या वर्णात – 'म्' वर्णात – लीन करावे. ॥५०॥

नंतर त्या मकराला आणि त्याचा वाच्य आणि कारणाभिमानी

प्राज्ञ पुरुष यांना चिदात्मरूपावर विलीन करावे आणि मग विज्ञानंदृष्टी होऊन आणि सर्व उपाधींपासून मुक्त, अर्थात् रागद्वेषादि मलरहित होऊन, ते नित्यमुक्त परब्रह्म मी आहे, अशी भावना करावी. ।।५१।। अशा प्रकारे परमात्मरूपी ऐक्यस्थिती झाली असता तो सर्व – पुत्रगेहादि–विसरून जातो आणि स्वरूपानंदानेच तुष्ट होतो. नित्य आत्मसुखाचा प्रकाश हेच त्याचे रूप होय; असा तो पूर्ण निर्मुक्त–जीवन्मुक्त–पुरुष निश्चल उदकाने भरलेल्या समुद्रासारखा स्थिर असतो. ।।५२।। अशा रीतीने जो सर्वदा समाधियोगाचा अभ्यास करतो, सर्व इंद्रियविषयांपासून दूर राहातो, सर्व कामक्रोधादिक रिपूंना जिंकतो व षड्गुणसंपन्न आत्म्याला स्वाधीन करून घेतो, त्यालाच माझे दर्शन होते.।।५३।। मुनीने अशा रीतीने अहर्निश आत्मस्वरूपी आपले ध्यान लावावे आणि समस्त बंधांतून मुक्त होऊन राहावे. प्रारब्ध कर्मे करून जे प्राप्त होईल, ते अभिमान सोडून भोगावे, म्हणजे तो माझ्याच स्वरूपी लय पावेल. ।।५४।। हा संसार म्हणजे प्रारंभी, मध्ये व अंतीही भय आणि शोक यांचे कारण आहे, असे जाणून विधिवाक्यांनी सांगितलेली सर्व कर्मे सोडून द्यावी, सर्वांतरी असणारा आत्मा–परमेश्वर–जो मी त्या माझीच भक्ती करावी. ।।५५।। माझ्या स्वरूपी जीव अभेदाने आहे, असे चिंतन करीत जो राहातो, तो माझ्याशी ऐक्य पावतो. समुद्राला पाणी जाऊन मिळाले की, ते समुद्ररूप होते; दुधात दूध मिळाले की ते एकरूप होते; घट फुटला असता त्यातील आकाश मोठ्या आकाशात मिळते; (बाहेरील) वातावरणात (भात्यातील) वायू एकटवून जातो, त्याचप्रमाणे जीवात्मा परमात्म्याशी तद्रूप होतो. ।। ५६ ।। अशा रीतीने लौकिक व्यवहार करीत असताही मुनी 'जग खोटेच आहे,'

असा सतत विचार करीत राहील, तर त्याला ऐक्यज्ञान होईल. आणि त्याची जगतावरील सत्यपणाची भ्रांती दूर होईल. कारण श्रुती आणि युक्ती ह्या दोन्ही प्रमाणांनी दृश्य – जगत् – हे सारे खोटे ठरवून त्याचा निरास केला आहे. ज्याप्रमाणे मनुष्याला कधी एका चंद्राचे दोन चंद्र दिसतात, किंवा दिशाभूल होते, परंतु सत्य-ज्ञान झाले असता हे भ्रम दूर होतात, त्याचप्रमाणे आत्मतत्त्वज्ञान झाल्याने सर्व जगत् मद्रूप आहे, असे दिसून येते. ॥५७॥ जोपर्यंत हे सर्व जगत् मद्रूप आहे, ही गोष्ट दृष्टीला समजून येत नाही, तोपर्यंत मनुष्याने माझे आराधन करण्यात तत्पर राहावे. ज्या श्रद्धाळू पुरुषाच्या हृदयात माझ्याविषयी अत्यंत भक्ती असल्याचे चिन्ह दिसून येते, त्याच्याच हृदयात मी दृश्य होतो. ॥ ५८ ॥

हे प्रिय (लक्ष्मणा !) सर्व वेदांचा सारसंग्रह म्हणून निश्चित केलेला असा जो अत्यंत गुप्त तत्त्वविचार तो मी तुला सांगितला. जो बुद्धिमान् पुरुष याचा नीट विचार करील, तो क्षणामध्ये पातकांच्या अनेक राशींपासून मुक्त होईल. ॥ ५९ ॥ बंधो ! हे जे सर्व जगत् दिसत आहे, ती सर्व मायाच आहे, असे समज आणि अंतःकरणातून तिचा त्याग कर. मग माझ्या चिंतनाने तुझे मन शुद्ध होईल आणि तू आनंदमय, निरामय आणि सुखी असा होशील. ॥ ६० ॥ मी सत्त्वादि गुणांनी रहित आहे, मी गुणातीत–त्रिगुणात्मक मायेच्या पलीकडे–आहे; मी कधीकाळी गुणांनी युक्त असे–सगुण–रूपही धारण करतो. अशा माझी निर्मल अंतःकरणाने जो सेवा करतो, तो मद्रूप होऊन जातो. जसा सूर्य आपल्या किरणांनी जगत्रयाला पवित्र करतो, त्याचप्रमाणे तो भक्तही आपल्या चरण-धूलीच्या स्पर्शाने त्रैलोक्याला शुद्ध–पवित्र–करतो. ॥ ६१ ॥ वेदा-न्तरहस्य समजल्यानेच ज्याच्या चरित्राचे यथार्थ आकलन होऊ

शकते, तो मी आहे. सगळ्या श्रुतीत जणू काय एकच सार, असले हे विज्ञान–तत्त्वज्ञान–मी तुला सांगितले. त्याचे जो श्रद्धेने आणि गुरुभक्तिपूर्वक पठण करील आणि माझ्या वचनावर भक्ती ठेवून राहील, त्याला माझ्या स्वरूपी गती मिळेल. ॥ ६२ ॥

अशा रीतीने श्रीमद् अध्यात्मरामायणातील श्रीउमामहेश्वर-संवादयुक्त उत्तरकांडातील श्रीरामगीता नावाचा पाचवा सर्ग समाप्त झाला.

उपरोक्त श्रीरामगीतेप्रमाणेच श्रीमदाद्यशंकराचार्य कृत मूळ " आत्मषट्क स्तोत्र " व त्याचा अर्थ पाहणे इष्ट ठरेल.

॥ आत्मषट्कम् ॥

(वेदातील 'नेति नेति' इत्यादि निषेधवाक्यांच्या अनुरोधाने, जाणिवेत येणाऱ्या सर्व वस्तूंचा "त्या आत्मा नव्हेत" असा निषेध केल्यानंतर सर्व निषेधांचा अवधी म्हणून जे शिल्लक राहते तोच आत्मा होय. तो सर्व विश्वाचे अधिष्ठान असून अत्यंत शुद्ध व सच्चिदानंदस्वरूप आहे. तो शिव म्हणजे सुखस्वरूप, मंगलमय, आनंदमय आहे. त्यालाच ब्रह्म म्हणतात आणि तेच मी आहे. मी दुसरा कोणी नाही. असा दृढ निश्चय या आत्मषट्काच्या मननाने साधकास करून घेता येईल.

या स्तोत्राला 'निर्वाणषट्कं' असेही नाव दिलेले आढळते. निर्वाण शब्दाचा अर्थ पूर्ण सुख, पूर्ण आनंद असा आहे. पूर्ण आनंदातच चित्ताला पूर्ण शांती मिळते म्हणून निर्वाण शब्दाचा 'पूर्ण शांती' असाही अर्थ होतो. या सहा श्लोकांच्या अर्थाचे मनन केल्यास निश्चित पूर्ण शांतीचा लाभ होईल.)

मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं
न च श्रोत्रजिव्हे न च घ्राणनेत्रे ।
न च व्योमभूमिर्न तेजो न वायु–
श्चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥ १ ॥

मी कोण आहे ? मन, बुद्धी अहंकार आणि चित्त मी नव्हे. श्रोत्रेंद्रिय किंवा रसनेंद्रिय मी नव्हे. घ्राणेंद्रिय किंवा चक्षुरिन्द्रिय मी नव्हे. पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते म्हणजे मी नव्हे. शुद्धचैतन्य आणि आनंद हेच माझे रूप आहे. मी शिव म्हणजे मंगलमय परिपूर्ण परब्रह्म आहे. मी चिदानंदरूप शिवस्वरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

न च प्राणसंज्ञो न वै पंचवायुर्
न वा सप्त धातुर्न वा पंचकोषः ।
न वाक् पाणिपादौ न चोपस्थपायू
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥ २ ॥

शरीरामध्ये संचार करणारा जो प्राणवायू तो मी नव्हे. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे पंचप्राणही पण मी नव्हे. रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा आणि शुक्र हे सप्तधातूही मी नव्हे. रसरक्तादि सप्तधातू शरीराची धारणा करतात म्हणून त्यांना धातू असे म्हणतात. ते दृश्य म्हणजे डोळ्यांनी दिसणारे किंवा बहिरिंद्रियांनी कळणारे आहत ते आत्मा कसे असू शकतील ? अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय हे आत्म्याचे पाच कोश आहेत. तलवार जशी म्यानामध्ये झाकली जाते त्याप्रमाणेच हे कोश आत्म्याला झाकून टाकतात. ते आत्मस्वरूपाची

प्रतीती येऊ देत नाहीत म्हणून त्यांना आत्म्याचे कोश असे म्हटले आहे. हे दृश्य व ज्ञेय आहेत. आत्मा या सर्वांचा द्रष्टा आहे. ज्ञाता आहे. तोच मी आहे म्हणून पंचकोशही नव्हे. हात, पाय, तोंड, गुद आणि उपस्थ ही पंचकर्मेंद्रिये मी नव्हे. मी चिदानंदरूप शिवस्वरूप आहे. मी पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे.

न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ
मदो नैव मे नैव मात्सर्यभावः ।
न धर्मो नचार्थो न कामो न मोक्ष-
श्चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।।३।।

मला कोणाचाही द्वेष नाही व कशाचीही आसक्ती नाही. मला कशाचाही लोभ नाही. मला कशाचाही गर्व नाही व कोणाबद्दल मत्सरही नाही. मला आता धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांचीही अपेक्षा उरली नाही. मी चिदानंदरूप शिवस्वरूप आहे. मी शिव म्हणजे परब्रह्मस्वरूप आहे.

न पुण्यं न पापं न सौख्यं न दुखं
न मन्त्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः ।
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।। ४ ।।

मला पुण्य नाही, पाप नाही, सुख नाही व दुःखही नाही. मंत्र, तीर्थ, वेद आणि यज्ञ इत्यादि कोणत्याहि गोष्टींची मला आता आवश्यकता राहिली नाही. मी भोजन नव्हे, भोज्य नव्हे आणि भोक्ताही नव्हे. याचप्रमाणे दृश्य, दर्शन आणि द्रष्टा इत्यादि कोण-

तीही त्रिपुटी मी नव्हे. मी चिदानंदस्वरूप परब्रह्म आहे. मी शिवरूप आहे. मी ब्रह्मस्वरूप आहे.

न मे मृत्युशङ्का न मे जातिभेदः
पिता नैव मे नैव माता न जन्म ।
न बन्धुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्य-
श्चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ॥ ५ ॥

मला मृत्यूचे भय नाही. ब्राह्मण किंवा शूद्र, अंत्यज किंवा चांडाळ इत्यादि जातिभेदहि मला उरला नाही. मला कोणी माता किंवा माझा कोणी पिताही नाही. जन्मच नाही मला, मग मृत्यू कसा असणार? मला कोणी बंधू नाही. मित्र नाही. गुरू नाही व शिष्यही नाही. मी केवळ चिदानंदरूप सत् चित् आनंदघन परिपूर्ण परब्रह्म आहे. मी शिवस्वरूप आहे. मी शिव आहे.

अहं निर्विकल्पो निराकाररूपो
विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ।
सदा मे समत्वं न मुक्तिर्न बन्ध-
श्चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोहम् ॥ ६ ॥

मी निर्विकल्प म्हणजे भेदातीत आहे. मी निर्विकार निराकार आहे. मी विभू म्हणजे सर्व विश्वाला व्यापून रहाणारा आहे. सर्वव्यापी आहे. सर्वस्वरूप आहे. सर्व ठिकाणी आहे. सर्व इंद्रियांनाही व्यापून राहिलो आहे. मी सदा सर्वकाळ समस्वरूप म्हणजे एकरूप आहे. मला मुक्ती नाही व संसाराचे बंधनही नाही. मी चिदानंदस्वरूप शिवरूप आहे. मी शिवस्वरूप आहे.

अशा रीतीने श्रीक्षेत्र चिखलद्याच्या मुक्कामात श्रीस्वामीमहाराजांचे श्री. बाळशास्त्री हरदास व श्री.गंगाधरपंत वैद्य यांच्यासारख्या श्रेष्ठ भक्तांसाठी परपातळीवरून तत्त्वज्ञान कथनाचे व अध्यात्म संक्रमणाचे कार्य चालू असताना श्री. गोविंदबुवा हरदास यांच्यासारख्या दृढतम अभ्यासकांसाठी सूक्ष्मपातळीवरून योगाभ्यास शिकविण्याचे कामही चालू होते. याप्रमाणेच श्रीस्वामीमहाराज स्थूल पातळीवर उतरूनही कार्य करीत असल्याचे पुढील कथेवरून स्पष्ट होते. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांचे एकाच वेळी स्थूल, सूक्ष्म व परपातळ्यांवर कार्य करण्याचे अलौकिक, लोकोत्तर व एकमेवाद्वितीय सामर्थ्य पाहिले म्हणजे असे कार्य केवळ ईश्वरच करू शकतो याची जाणीव होऊन "धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार ॥१८.६.२०॥" या श्रीसमर्थरामदासस्वामी महाराजांनी दासबोधात कथन केलेल्या न्यायाची प्रचीती आल्याशिवाय राहात नाही.

पूर्वीच्या धार संस्थानातील श्री. भय्याजी नाईक म्हणून एका सज्जन गृहस्थांच्या पत्नीला पिशाच्च बाधा झाली होती. आपल्या पत्नीची ही बाधा दूर व्हावी म्हणून श्री. भय्याजी नाईक यांनी खूप वर्षे अनेक उपाय केले; परंतु त्यातील कोणत्याच उपायांनी त्या बाईंना कधीच बरे वाटले नाही. श्री. भय्याजी नाईक यांच्या मंडळींना खरोखरच कशाची पीडा होत आहे याचे निदान कोणालाच झाले नाही. शेवटी ज्यावेळी श्री. भय्याजी नाईक यांच्या कानावर श्रीस्वामीमहाराजांची कीर्ती आली त्यावेळी ते आपल्या पत्नीला घेऊन श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे आल्यावर श्री. भय्याजी नाईक आपल्या

पत्नीला घेऊन श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला गेले. तेथे त्या उभयतांनी त्यांना नमस्कार केल्यावर श्री. भय्याजी नाईक श्रीस्वामी-महाराजांना असे म्हणाले की, "हे प्रभो ! माझ्या पत्नीला गेली कित्येक वर्षे कसलीतरी पीडा होत आहे; परंतु अद्यापपर्यंत या पीडेचे निदान कोणालाच झाले नाही. आपण सर्वज्ञ व सर्वशक्तिसंपन्न प्रभू आहात. तरी आपण दयाळू अंतःकरणाने माझ्या पत्नीवर कृपा करून तिला या त्रासातून मुक्त करावे अशी माझी आपल्या चरणी अनन्यभावान प्रार्थना आहे. आपल्या कृपाकटाक्षाने ती एका क्षणात या त्रासापासून मुक्त होईल असा माझा विश्वास आहे. तरी आपण माझ्यावर कृपा करून माझ्या पत्नीला पीडामुक्त करावे."

अशा प्रकारे श्री. भय्याजी नाईक यांनी अत्यंत कळकळीने प्रार्थना केल्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या अंतःकरणात कमालीचे कारुण्य उत्पन्न होऊन ज्यावेळी त्यांनी श्री. भय्याजी नाईक यांच्या पत्नीकडे पाहिले त्यावेळी या बाईंना एका भुताची पीडा नसून त्यांना तीन पिशाच्चे त्रास देत आहेत हे त्यांच्या एका क्षणात लक्षात आले. श्रीस्वामीमहाराजांना कोणाचीही पिशाच्चबाधा दूर करण्यासाठी लिंबू, गुग्गुळ, उद, रेशीम इत्यादि कोणताही बाह्य पदार्थ लागत नसे. ते फक्त आपल्या कमंडलूतील पाणी पिशाच्चबाधा झालेल्या व्यक्तीवर शिंपडून त्याला त्रास देणाऱ्या पिशाच्चाला बोलते करून बाहेर घालवीत असत.

श्री. भय्याजी नाईक यांच्या पत्नीला आपल्यासमोर बसवून श्रीस्वामीमहाराजांनी तिच्या अंगावर आपल्या कमंडलूतील पाणी टाकताच तिच्या ठिकाणी प्रविष्ट झालेल्या तिन्ही पिशाच्चांनी आपापली नावे, जात व कोणत्या कारणासाठी या बाईला धरून आपण त्रास देत आहोत हे सर्व सांगितले. त्यानंतर श्रीस्वामी-

महाराजांनी पहिल्या पिशाच्चाला "या बाईला सोडून या योनीतून मुक्त हो," असे सांगताच ते पिशाच्च श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "आपण जर मला या योनीतून मुक्त करून चांगली गती प्राप्त करून देत असाल तर मी आनंदाने या बाईंना सोडून देतो." त्या पिशाच्चाचे हे म्हणणे ऐकताच श्रीस्वामीमहाराजांनी पुन्हा एकदा आपल्या कमंडलूमधील पाणी तिच्या अंगावर शिंपडले व ते त्या पिशाच्चाला असे म्हणाले की, "जा! तुला उत्तम गती प्राप्त होईल!" त्यांनी असे म्हणताच ते पिशाच्च त्या बाईंना सोडून गेले व त्यामुळे त्यांना थोडे हलके वाटले.

त्यानंतर श्रीस्वामीमहाराजांनी पुन्हा त्या बाईंच्या अंगावर पाणी शिंपडून दुसऱ्या पिशाच्चाला बोलते केले. त्यावेळी ते पिशाच्च श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "हे प्रभो! आपल्या अंगस्पर्शाने पवित्र झालेले श्रीनर्मदानदीचे पाणी माझ्या अंगावरून गेले की, मी या योनीतून मुक्त होऊन मला उत्तम गती मिळेल अशी मला खात्री आहे. आपल्या अंगस्पर्शाने पवित्र झालेल्या उदकाचा प्रभाव अलौकिक आहे याची जाणीव मला आहे." त्याचे हे म्हणणे ऐकताच श्रीस्वामीमहाराज स्वस्थ बसले. त्यानंतर एके दिवशी तिसऱ्या प्रहरी श्रीस्वामीमहाराज श्रीनर्मदानदीवर स्नानास गेले आहेत असे पाहून त्या दुसऱ्या पिशाच्चाने श्री. भय्याजी नाईक यांच्या पत्नीच्या अंगात संचार केला व ते श्रीक्षेत्र चिखलदा येथील श्री नाईक यांच्या घरून धावत धावत श्रीनर्मदानदीवर गेले आणि श्रीस्वामीमहाराज जेथे स्नान करीत होते त्याच्या खालच्या भागी अर्थात् पश्चिमेकडे वाहणाऱ्या पाण्यात त्याने एकाएकी उडी मारली तेवढ्यात श्री. भय्याजी नाईक व त्यांच्या घरातील सर्व मंडळी त्या बाईंचा शोध घेत घेत त्या ठिकाणी आली. त्यांनी

त्या बाईंना पाण्यात पडलेले पाहताच तत्क्षणी त्यांना पाण्यातून बाहेर काढले. त्यावेळी ते दुसरे पिशाच्च श्रीस्वामीमहाराजांच्या अंगस्पर्शाच्या पवित्र पाण्यात स्नान करून सद्‌गतीला गेल्यामुळे त्या बाईंना आणखी हलके वाटले. त्यानंतर त्या पिशाच्चाने त्या बाईंना पुन्हा कधीही त्रास दिला नाही.

अशा रीतीने दोन पिशाच्चांचा त्रास दूर झाल्यामुळे श्री. भय्याजी नाईक यांच्या सौ. मंडळींना खूपच बरे वाटू लागले. त्यामुळे त्या रोजच त्रिकाळ त्यांच्या दर्शनासाठी जात असत. एके दिवशी दुपारच्या वेळी त्या बाई त्यांच्या नित्यनेमाप्रमाणे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी आल्या असता उरलेल्या तिसऱ्या पिशाच्चाने त्यांच्या अंगात संचार केला व ते श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणू लागले की, "प्रभो! आपण इतर दोघा पिशाच्चांना ज्याप्रमाणे मुक्ती दिली त्याप्रमाणे मलाही या योनीतून मोकळे करून सद्‌गती द्या. आपण कृपा केली म्हणजे या जगात कोणतीही गोष्ट सिद्धीस जाईल. आपणास काहीच अशक्य नाही." त्याची ही प्रार्थना ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्या पिशाच्चाला असे म्हणाले की, "तू श्रीक्षेत्र नरसोबावाडीला जाऊन श्रीदत्तांची सेवा कर म्हणजे तू त्वरित मुक्त होशील." श्रीस्वामीमहाराजांचे हे म्हणणे ऐकताच ते पिशाच्च त्यांना असे म्हणाले की, "महाराज! श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीचा दत्त तर येथे आला आहे. तो तर माझ्या समोर बसून माझ्याशी बोलतो आहे. मग तेथे जाऊन काय होणार? मला जी सद्‌गती मिळणार आहे ती आपल्या चरणकृपाप्रभावानेच प्राप्त होणार आहे." त्या पिशाच्चाचे हे म्हणणे ऐकताक्षणीच श्रीस्वामीमहाराज त्याला असे म्हणाले की, "चूप रहा! जास्त बोलू नकोस!" इतके म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी एक पळीभर

पाणी त्या तिसऱ्या पिशाच्याच्या अंगावर टाकले. त्या पवित्र पाण्याचा स्पर्श होताच ते पिशाच्च तत्क्षणी मुक्त झाले व त्या बाईही देहभानावर आल्या. त्यानन्तर त्यांचे शरीर पूर्णपणे मोकळे झाले. अशा रितीने पिशाच्यांच्या पीडेतून पूर्णपणे मुक्तता झाल्यावर त्या बाईंनी श्रीस्वामीमहाराजांना भावपूर्ण नमस्कार करून आपली कृतज्ञता व्यक्त केली.

ही सर्व कथा वाचली आणि या कथेपूर्वी केलेले श्रीस्वामीमहाराजांच्या स्थूल, सूक्ष्म व पर कार्याचे विवेचन मननपूर्वक वाचले तर श्रीस्वामीमहाराजांच्या अवतारकार्याचे रहस्य लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. या रहस्याचा भेद करताना श्रीसंत एकनाथमहाराजांनी आपल्या एका अभंगात असे म्हटले आहे की –

आम्ही कां संसारा न येणें ।
करोनियां हरिभक्ती । रामनाम किर्ती ।
जड जीव उद्धरणें ।। धृ. ।।
साच असतां तरी । धाक धरितां चित्तीं ।
भवविभव प्राप्ती । समूळ मिथ्या ।। १ ।।
जैं धर्माचि वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।
तैं आम्हां येणे पडे । संसारस्थिती ।। २ ।।
नाना मतें पाखांड । कर्मठायीं अतिबंड ।
तयाचें ठेचावें तोंड । हरिभजनें ।। ३ ।।
जें जे लीला विचित्र । तें तें माझें चरित्र ।
देवभक्त एकत्र । भेद नाहीं ।। ४ ।।
जो अवतार हरि धरी । तो तो मीच अवधारी ।
हरि नाम गजरीं । जगदोद्धारा ।। ५ ।।

सर्व भूतीं भगवद्भावो । भक्तीचा निर्वाहो ।
धर्माचा अहंभावो । वाढविणें ॥ ६ ॥
सर्व भूतीं भगवद्भक्ती । प्रतिपादावी वेदोक्ती ।
हेंचि एक निश्चिती । करणें आम्हां ॥ ७ ॥
लीला विग्रही भगवंत । तया म्हणती नित्य मुक्त ।
आम्हीं काय तेथें । वेगळें असों ॥ ८ ॥
विश्वरूप सृष्टी । अर्जुना दाविली दिठी ।
भिन्न भेदाची गोष्टी । बोलों नये ॥ ९ ॥
वत्सा हरणीचें चरित्र । वत्सें गोवळें स्वयें स्वतंत्र ।
पावे पायतणें कटिसूत्र । आपण जाला ॥१०॥
एका जनार्दनी विश्वरूप गोविंद ।
भेद धरि तो निंद्यहि अतिनिंद्य ॥११॥

श्रीस्वामीमहाराजांच्या श्रीक्षेत्र चिखलद्याच्या या चातुर्मासाच्या काळात त्यांचे पूर्वाश्रमातील स्नेही आणि भक्त श्री. नारायण गोविंद उर्फ नारोपंत उकिडवे हे त्यांच्या दर्शनासाठी आले होते. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांचे व त्यांचे अत्यंत प्रेमाने बोलणे होत असे. एके दिवशी या बोलण्यातच श्री. नारोपंतांनी सावंतवाडी-तील आपल्या श्रीदत्तमंदिरासंबंधी विषय काढला व ते श्रीस्वामी-महाराजांना असे म्हणाले की, “ महाराज ! सावंतवाडीचे आमचे हे दत्तमंदिर आता अगदी मोडकळीस आले आहे. त्याची डागडुजी केल्याशिवाय ते पुढील काळात उभे राहू शकणार नाही. ” अशा प्रकारे श्री. नारोपंतांनी या मंदिराच्या दुरुस्तीचा विचार श्रीस्वामी-महाराजांच्या कानावर घातला. दुरुस्तीच्या खर्चाचा एकंदर अंदाज श्री. नारोपंत यांनी सांगितल्यावर श्रीस्वामीमहाराजांनीही देवांच्या

पैशातून बरीच रक्कम श्रीदत्तमंदिराच्या दुरुस्तीसाठी श्री. नारोपंत यांच्या हवाली केली.

श्री. नारोपंत उकिडव्यांप्रमाणेच सागर, जालवण वगैरे अनेक गावातील पुष्कळ भिक्षुक मंडळी, कित्येक गावातील दर्शनार्थी व कित्येक ठिकाणचे द्रव्यार्थी हे या काळात श्रीस्वामीमहाराजांकडे आले. त्याचप्रमाणे यावेळी श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या बऱ्याच अनाथ स्त्रिया येथे आल्या होत्या. त्या सर्वांना द्रव्यादि देऊन श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना संतुष्ट केले व त्या सर्वांचे मनोरथ पूर्ण केले.

आपणाकडे येणाऱ्या भक्तमंडळींवर श्रीस्वामीमहाराजांचे किती प्रेम होते व त्यांचे दुःख निवारण करण्यासाठी ते त्यांना कसे साहाय्य करीत असत याचे एक उदाहरण यावेळी दिसून आले. एके दिवशी श्री. नारायणराव कृष्णराव दफ्तरदार हे श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले व श्रीस्वामीमहाराजांना अत्यंत नम्रतेने प्रार्थना करून असे म्हणाले की, "हे प्रभो ! मला दोन मुली असून त्या दोन्ही मुलींची लग्ने आपल्यासमोर करावीत अशी माझी इच्छा आहे. माझ्या मोठ्या मुलीचा विवाह मी पुण्यातील एका मुलाशी निश्चित केला असून माझी धाकटी मुलगी ही सौ. मथूताई यांचा सर्वात वडील मुलगा चि. गणपती याला द्यावी असे निश्चित केले आहे. मात्र आर्थिक दृष्ट्या ही दोन्ही कार्ये एकदम करणे मला शक्य नाही. तरी आपणच आता काहीतरी साहाय्य करून माझी ही अडचण दूर करावी व ही कार्ये कडेला लावून द्यावीत अशी माझी आपल्या चरणी प्रार्थना आहे. वास्तविक पाहता आपल्यासारख्या महापुरुषाला, माझ्या या क्षुद्र कामासाठी त्रास देणे हे केव्हाही योग्य नाही. परंतु आपल्या चरणांशिवाय मला दुसरा आश्रय नसल्यामुळे मी अनन्यगतिक होऊन हे सर्व आपल्या कानावर

घातले आहे. माझ्या या धृष्टतेबद्दल आपण मला क्षमा करावी व मला साहाय्य करावे. प्रभो ! आपण दयाळू आहात ! आपल्याला काहीच अशक्य नाही. "

श्री. दफ्तरदार यांची ही प्रार्थना ऐकताच श्रीस्वामीमहाराजांचे अंत:करण अगदी द्रवून गेले व ते त्यांना असे म्हणाले की, "आपली अडचण आमच्या लक्षात आली. आपण काहीही काळजी करू नये. आम्ही देवांच्या पैशातून सर्व खर्च करू. " पुढे श्रीस्वामीमहाराजांनी श्री. दफ्तरदार यांच्या दोन्ही मुलींची कार्ये माघ वद्यात आपल्या समक्ष करविली. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी श्री. दफ्तरदार यांना लागलेला लग्नाचा सर्व खर्च दिला. इतकेच नव्हे; तर व्याह्यांकडील भोजनाचाही सर्व खर्च त्यांनी आपल्या आज्ञेने देवविला.

श्रीस्वामीमहाराजांच्या वरील सर्व कथा वाचल्या म्हणजे संत-जन हे स्थूलात्मक पातळीवरूनही दीनजनांचा उद्धार करण्यासाठी या भूतलावर अवतार धारण करतात याची प्रचीती येते व त्यांचा सर्वसामान्यांबद्दलचा कळवळा पाहून त्यांच्या उदारपणामुळे मन अगदी भरून येते. श्रीस्वामीमहाराजांची ही अपार करुणा "ब्रह्म-मूर्ती संत जगीं अवतरलें।" या श्रीसंत नामदेवमहाराजांनी कथन केलेल्या न्यायाची असल्यामुळे त्यांच्या शब्दातच हे अपार, अलौकिक व लोकोत्तर संतपण कसे आहे याची अनुभूती आपण घेतली तर आपण कोणाच्या सहवासात राहणार आहोत व आपला उद्धार कसा होणार आहे याची प्रचीती येऊन मन परमानंदाने भरून गेल्याशिवाय राहणार नाही. या दृष्टीने श्रीसंत नामदेवमहाराराज जणू काही श्रीस्वामीमहाराजांचे वर्णन करताना आपल्या अभंग-वाणीत असे म्हणतात की—

ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरले। उद्धरावया आले दीनजनां ॥ १ ॥
ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी। नाम घे वदनीं दोषजाती ॥ २ ॥
हो कां दुराचारी विषयीं आसक्त। संतकृपें त्वरित उद्धरतो ॥ ३ ॥
अखंडित नामा त्याचा वास पाहे। निशिदिनीं ध्याय सत्संगती ॥ ४ ॥

★ ★ ★

संतांचा हा महिमा कोण जाणे सीमा। सीणला हा ब्रह्मा बोलवेना।
संतांची हे कळा पाहतां न कळे। खेळोनियां खेळ वेगळाची ॥ २ ॥
संतांचिया पारा नेणें अवतारा। म्हणती याच्या पारा कोण जाणे।
नामा म्हणे धन्य धन्य भेट जाली। कल्पना निमाली संतांपायीं ॥ ४ ॥

★ ★ ★

रविरश्मी धरोनि स्वर्गीं जाऊं येईल।
परि साधुसंगतीचा पार न कळे न कळे ॥ १ ॥
वैतरणी उतरोनि वैकुंठा जाऊं येईल।
परि साधुसंगतीचा पार न कळे न कळे ॥ २ ॥
स्वप्नींचा ठेवा साचहि होईल।
परि साधुसंगतीचा पार न कळे न कळे ॥ ३ ॥
मायबाप बंधू भगिनी मिळे योनी।
परि साधुची मिळणे भाग्ययोगें ॥ ४ ॥
तपें व्रतें दानें गोविंद पैं भेटे।
परि साधु तंव न भेटे भाग्येंविण ॥ ५ ॥
नामा म्हणे केशवा बरा साधुसंग।
या वेगळा भवरोग न तुटे न तुटे ॥ ६ ॥

श्रीक्षेत्र चिखलदा येथील २२वा चातुर्मास संपल्यावरही श्रीस्वामी-महाराजांनी पुढे काही महिने तेथे राहण्याचे ठरविले. त्यामुळे श्रीक्षेत्र

चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराज आषाढ शुद्ध त्रयोदशी ते माघ शुद्ध पौर्णिमेपर्यंत म्हणजे जवळ जवळ सात महिने राहिले. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज तेथून निघून पुढे श्री नर्मदा किनाऱ्याने कातरखेडा येथे जाण्यास निघाले. त्यांना वाटेतच जितूरचे श्री. अग्निहोत्री व त्यांच्या बरोबर असलेली इतर मंडळी भेटली. या श्री. अग्निहोत्रीबुवांनी पूर्वी श्रीस्वामीमहाराजांच्या अनुज्ञेनेच अग्निसेवा घेतली होती. त्यांची श्रीगायत्रीपुरश्चरण करण्याची इच्छा होती. ही इच्छा श्रीस्वामी महाराजांना कथन करून त्यांच्याकडून तत्संबंधी अनुज्ञा घेऊन मगच पुरश्चरणाला सुरुवात करावी या हेतूनेच ते श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला आले होते.

श्री. अग्निहोत्रीबुवांनी श्रीस्वामीमहाराजांना पाहताच रस्त्यातच त्यांना साष्टांग नमस्कार घातला. ते उठून उभे राहताक्षणीच श्रीस्वामीमहाराज त्यांच्या मनातील इच्छा ओळखून त्यांना असे म्हणाले की, "बुवा ! श्रीगायत्रीपुरश्चरण करण्याची तुमची इच्छा असली तर ती लवकरात लवकर पूर्ण करा. मात्र पुरश्चरण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी श्रीगायत्री हवन होईल त्यावेळी अन्नसंतर्पणात तुपाची बिलकुल कसर करू नका.".

श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या मनातील इच्छा भेटताक्षणीच बोलून दाखविल्याचे पाहून श्री. अग्निहोत्रीबुवा एक क्षणभर स्तिमित झाले. त्यानन्तर ते त्यांना असे म्हणाले की, "महाराज ! एवढे पैसे काही माझ्याजवळ नाहीत. त्यामुळे आपण म्हणता त्याप्रमाणे अन्नसंतर्पणादि खर्चाचे काम माझ्याकडून घडेल असे मला वाटत नाही."

श्री. अग्निहोत्रीबुवा यांचे हे म्हणणे ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "तुम्ही पैशाची बिलकुल काळजी करू नका. ते योग्यवेळी आपोआप मिळतील आणि देवकार्यासाठी खर्च काढले

तरी हरकत नाही. ते काही प्रापंचिक सुख-सोहळे भोगण्यासाठी किंवा इतर सांसारिक कार्यासाठी काढलेले ऋण नव्हे. त्यामुळे देवासाठी काढलेल्या ऋणाची जबाबदारी देवावर राहील."

श्रीस्वामीमहाराजांच्या बोलण्याने श्री. अग्निहोत्रीबुवांना धीर आला व त्यांचा विश्वास शतगुणित झाला. त्यामुळे ते श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "महाराज ! आपल्या कृपेने अग्निनारायणाची सेवा निर्विघ्नपणे चालू आहे. त्यात आजतागायत कसलीही अडचण आली नाही. ज्याप्रमाणे आपल्या कृपेने अग्निसेवेचे हे कार्य निर्विघ्नपणे होत आहे त्याप्रमाणेच आपल्या कृपाप्रसादाने हे गायत्रीपुरश्चरणाचे व त्याच्या हवनाचे कार्य निर्विघ्नपणे पार पडेल अशी माझी खात्री आहे. आपल्या चरणकृपेने कोणतेही कार्य सिद्धीस जाईल यात काहीच संशय नाही. मात्र यावेळी माझी आपल्या परमपवित्र चरणी एवढीच प्रार्थना आहे की, आपण श्रीगायत्रीहवनाच्या वेळी अवश्य आले पाहिजे. माझी ही प्रार्थना मान्य करून आपण मला कृतार्थ करावे."

श्री. अग्निहोत्रीबुवांची ही प्रार्थना ऐकून श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "आपल्या इच्छेप्रमाणे आमचे त्यावेळी येणे होईल. मात्र आपण त्यावेळी टाकळीकर दाजीबुवांना अवश्य बोलवावे." इतके सांगून झाल्यावर श्रीस्वामीमहाराज श्री. अग्निहोत्रीबुवांना असे म्हणाले की, "आजच्या दिवस येथेच राहा. उद्या डही संस्थानची सरकारस्वारी इकडे येणार असल्याचे त्यांच्या लोकांकडून कळले आहे. ते आले म्हणजे त्यांचे तुमच्या या श्रीगायत्रीपुरश्चरण-हवनादि कार्यात द्रव्यसाहाय्य होईल."

श्रीस्वामीमहाराजांचे हे म्हणणे ऐकताच श्री. अग्निहोत्रीबुवा त्यांच्या चरणविश्वासाधाराने त्यांना असे म्हणाले की, "महाराज !

आपली कृपादृष्टी असली म्हणजे पुरे. आपल्या नुसत्या संकल्पानेच हे कार्य शेवटास जाईल. अशी वास्तविक स्थिती असल्यामुळे एखाद्या राजाचे पैसे घेऊन हे कार्य करावे अशी माझी बिलकुल इच्छा नाही. आजपर्यंतच्या आयुष्यात देवकार्यासाठी कोणाजवळही याचना करण्याची पाळी माझ्यावर आली नाही. त्यामुळे या कार्या-करताही मी यावेळी याचना करणार नाही. आपल्या चरणकृपेने हे सर्व निर्विघ्नपणे सिद्धीस जाईल अशी माझी नितांत श्रद्धा आहे."

श्री. अग्निहोत्रीबुवांची ही श्रद्धा पाहिल्यावर श्रीस्वामीमहारा-जांना अत्यंत समाधान वाटले व ते अत्यंत प्रसन्नतेने त्यांना असे म्हणाले की, "आता आपण घरी जाऊन चांगला मुहूर्त पाहून गायत्रीपुरश्चरण सुरू करण्यास हरकत नाही."

श्रीस्वामीमहाराजांनी आज्ञा दिल्याप्रमाणे श्री. अग्निहोत्रीबुवा जिंतूरला आपल्या घरी आले व त्यानंतर लगेचच श्री. दाजीबुवांना श्रीगायत्रीपुरश्चरणानंतर होणाऱ्या हवनाच्या कार्यक्रमाला येण्या-संबंधी निमंत्रण देण्यासाठी टाकळीला गेले. तेथे गेल्यावर त्यांनी आपल्या श्रीगायत्रीपुरश्चरणाची व श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शन-भेटीची सर्व हकीकत त्यांच्या कानावर घातली व श्रीगायत्री हवनाला येण्यासंबंधी श्रीस्वामीमहाराजांचा निरोप त्यांना सांगितला. त्यावेळी श्री. दाजीबुवांवर कोणीतरी दुष्ट माणसाने मारणप्रयोग केल्यामुळे त्यांना रक्त पडत होते व शरीर अगदी क्षीण झाले होते. त्यामुळे ते श्री. अग्निहोत्रीबुवांना असे म्हणाले की, "माझ्यावर झालेल्या मारण प्रयोगामुळे माझे शरीर अत्यंत क्षीण व अशक्त झाले आहे. यावेळी जर श्रीस्वामीमहाराजांनी मला या व्याधीतून मुक्त केले तर मी आपल्या कार्यक्रमाला अवश्य येईन."

श्री. दाजीबुवांचे हे म्हणणे ऐकताच श्री. अग्निहोत्रीबुवा त्यांना

असे म्हणाले की, "आपण दोघेही थोर सत्पुरुष आहात आणि श्रीस्वामीमहाराज तर साक्षात् श्रीदत्तावतार आहेत. ते आपल्या-वरील हे संकट दूर करून आपल्याला निश्चितपणे आपल्या या दुखण्यातूत बरे करतील." इतके सांगून श्री. अग्निहोत्रीबुवा आपल्या घरी जितूरला परत आले.

त्यानंतर काही दिवसांनंतर शुभ मुहूर्त पाहून श्री. अग्निहोत्री-बुवांनी श्रीगायत्रीपुरश्चरणास प्रारंभ केला व ते पूर्ण झाल्यावर त्यांनी ठरल्याप्रमाण हवनास प्रारंभ केला. मात्र यावेळी श्री. दाजीबुवांची प्रकृती श्रीगुरुकृपेने उत्तम बरी झाली असूनही त्यांनी जितुरास जाण्याकडे दुर्लक्ष केले व ते "माझी प्रकृती श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने बरी झाली तर हवनाला अवश्य येईन," या श्री. अग्निहोत्री-बुवांना दिलेल्या वचनाप्रमाणे त्यांच्याकडे गेले नाहीत. एक प्रकारे त्यांनी जितूरच्या कार्यक्रमाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. असे असले; तरी पूर्णाहूतीच्या आधल्या दिवशी श्री. दाजीबुवा संध्या करीत बसले असताना अकस्मात एकाएकी त्यांच्या दंडावर कोणीतरी जोरात मारले. त्याबरोबर श्री. दाजीबुवा एकदम दचकले. आपल्याला कोणी मारले म्हणून ते इकडे तिकडे वळून पाहू लागले. त्यावेळी त्यांच्या कानावर असे शब्द आले की, "जितूरला अग्निहोत्रीबुवांच्या गायत्री पुरश्चरणाच्या हवनाला जाण्यासाठी तुला बरे केले असता तू जितुरास का गेला नाहीस ?"

हे शब्द ऐकताच ते श्रीस्वामीमहाराजांचेच आहेत याची मनो-मन खात्री पटून श्री. दाजीबुवांच्या मनश्चक्षूंपुढे त्यांची मूर्ती उभी राहिली. "आपल्या संकल्पाप्रमाणे श्रीस्वामींमहाराजांनी आपला शब्द पाळून आपल्याला बरे केले; पण आपण मात्र श्री. अग्नि-होत्रीबुवांना दिलेला शब्द पाळला नाही," या विचाराने त्यांचे

अंतःकरण व्यथित झाले. एक प्रकारे आपण श्रीस्वामीमहाराजांची व पर्यायाने श्री. अग्निहोत्रीबुवांची प्रतारणा केली, या विचाराने अत्यंत खेद झाल्यामुळे ते घरात कोणालाही न सांगता एका वस्त्रानिशी तत्काळ जितूरला जाण्यासाठी निघाले. अशा प्रकारे आपल्या घरातून व्यथित अंतःकरणाने बाहेर पडलेले श्री. दाजी-बुवा टाकळीहून बावीस कोस पायी चालत जाऊन पूर्णाहुतीच्या दिवशी जितुरास जाऊन पोहोचले.

ज्या दिवशी श्री. अग्निहोत्रीबुवांच्या श्रीगायत्रीपुरश्चरणाचे पूर्णाहुतीच्या दिवशीचे हवन जितुरास चालले होते त्यादिवशीच श्रीस्वामीमहाराज कातरखेड्याच्या जंगलातून श्रीक्षेत्र गरुडेश्वरला जावयास निघाले होते. असे असले तरी आपण श्री. अग्निहोत्री-बुवांना श्रीगायत्री पुरश्चरणाच्या पूर्णाहुतीला उपस्थित राहण्याचे वचन दिले आहे याची पूर्ण जाणीव श्रीस्वामीमहाराजांच्या अंतः-करणात तेवत होती. त्यामुळे आपले वचन पूर्ण करण्याकरिता ते दुसरे रूप घेऊन जितूरला पूर्णाहूतीच्या दिवशी सुरुवातीपासून उपस्थित होते.

अशा रीतीने त्या दिवशी श्रीस्वामीमहाराजांच्या उपस्थितीत श्रीगायत्रीहवनाची पूर्णाहुती होणार असल्याचे पाहून जितूरच्या सर्वच मंडळींना अत्यानंद झाला होता. इतक्यात टाकळीचे श्री. दाजीबुवा यज्ञमंडपात आले. त्यांनी आल्याबरोबर श्रीस्वामी-महाराजांना साष्टांग नमस्कार करून घडलेली एकंदर सर्व हकीकत श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी विवेदन केली. ही सर्व हकीकत ज्यावेळी तेथे जमलेल्या मंडळींना समजली त्यावेळी सर्व मंडळींनी श्रीस्वामीमहाराजांच्या भावाने 'जो जयजयकार केला त्यामुळे आकाश दुमदुमून गेले. सर्व लोक आनंदात बुडून गेले. श्रीस्वामी-

महाराजांच्या आशीर्वादाने यावेळी पुष्कळ पैसा जमा होऊन हवनाचा सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला व त्यानिमित्ताने अपरंपार अन्नसंतर्पण होऊन सर्वांनाच भरपूर तूप वाढले गेले. त्यात श्रीस्वामीमहाराजांच्या इच्छेप्रमाणे यत्किंचितही कसूर झाली नाही. यावेळीच श्रीस्वामीमहाराजांच्या हस्ते जिंतूर येथे श्रीदत्त-पादुकांची स्थापना झाली.

श्रीस्वामीमहाराज ! आपण अनन्तकोटी ब्रह्माण्डनायक राजाधिराज श्रीसद्गुरुनाथमहाराज आहात ! आपण या निखिल भूमंडलातील सर्वश्रेष्ठ असे परमहंस परिव्राजकाचार्य आहात ! आपण साक्षात् पूर्णब्रह्म असून आपल्या रूपाने जणूकाही अमृताची मूर्तीच साकार झाली आहे. आपण आमच्या हृदयस्थ श्रीसद्गुरुनाथ महाराजांचे प्राणाराम श्रीसद्गुरू आहात ! आपला अखंड जयजयकार असो.

श्रीस्वामीमहाराज ! हे श्रीनर्मदातीरविहारी श्रीवासुदेवानंद-सरस्वतीसद्गुरो ! ! आपला दिगंत जयजयकार असो ! आपणास आमचे नमस्कार असोत. निर्मल ब्रह्मज्ञानाचा बोध करण्यात चतुर आणि विद्यारूप कमल विकासित करणारे जे आपण त्या आपणाला आमचे अनेक नमस्कार असोत. संसाररूप निबिड अंधकाराचा नाश करणारे व तारुण्यभरात असणाऱ्या तुर्यावस्थेशी विलास करणारे जे तुम्ही त्या तुम्हास आमचे नमस्कार असोत. सज्जनरूपवनात चंदनासारखे श्रेष्ठ आणि ज्यांचे स्वरूप आराधन करण्यास योग्य, असे जे तुम्ही त्या तुम्हाला आमचे नमस्कार असोत. भावयुक्तज्ञान्यांच्या भजनास योग्य व संसाररूप गजाचे मस्तक फोडणारे जे तुम्ही त्या तुम्हांला आमचे नमस्कार असोत. तुम्ही सर्वांचे विश्रांतिस्थान असून सर्वांच्या हृदयात "अहं ब्रह्मास्मि"

हे तत्त्व स्पष्ट उठविणारे आहात. तुमचा जयजयकार असो. जे कोणी तुम्हांला देहबुद्धीने पाहतात त्यांना हे दुःखरूपी नश्वर जग खरे आहे असे वाटून त्यातून मुक्त होण्याचा म्हणून यत्न करतात; परंतु त्या यत्नाने ते अधिकाधिक दुःखाचा मात्र अनुभव घेतात. मात्र जे कोणी तुम्हाला ब्रह्मरूपाने पाहतात त्यांना तुमच्याशिवाय दु.खरूपी जग म्हणून काही आहे असे वाटतच नाही. अर्थात् कोणताही यत्न न करता ते नेहमी परमानंदाचाच अनुभव घेत असतात. नजरबंदीच्या खेळात गारुडी दुसऱ्याची नजर बंद करून त्यास फसवू शकतो; परंतु तो स्वतः आपणास फसवू शकत नाही. पण आपल्या मायेचा प्रभाव असा विलक्षण आहे की, तिच्या सपाट्यात जो सापडतो त्यास स्वतः आपण कोण हीच ओळख राहत नाही. या सर्व जगतात तुम्हीच कोणाला ज्ञानाचा उपदेश करता व तुम्हीच कोणाला मायेच्या सपाट्यात गुंतविता असा तुमचा हा सहज खेळ नेहमी सुरू असतो. सूर्यापुढे जसा खद्योत तसा मतिमंद अज्ञानी मी, आपले वर्णन ते काय करणार ? मुकाट्याने आपले चरणी मस्तक ठेवून आपली प्रार्थना करतो.

श्रीस्वामीमहाराज ! हे श्रीगरुडेश्वरनिवासी कृपामूर्ते ! ! प्रणतकामकल्पतरो ! ! आपला त्रिभुवनात जयजयकार असो ! हे श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज ! तुमच्या चरणी आम्ही साष्टांग नमस्कार करतो. आपण विघ्नहरणी गणपती, बुद्धिदानी सरस्वती आणि ज्ञानदानी श्रीदत्तमूर्ती आहात.

आजपर्यंत आम्ही प्रपंचाभिमुख होऊन, मी पुरुष, मी स्त्री, मी मूल, मी लहान, मी मोठा, मी रोड, मी वृद्ध, मी तरुण, मी मूर्ख मी विद्वान, इत्यादि नावांनी अनेक जन्म भटकत होतो व अविद्यारूप नावेच्या सपाट्यात सापडल्यामुळे आजपर्यंत आम्हाला विषय-

रूपीप्रपंच सत्य वाटला होता. परंतु आता मात्र पूर्वप्रारब्धयोगा-प्रमाणे एकाएकी आपले दर्शन घडल्यामुळे या सद्गुरुपाद दर्शनाने आमच्या अविद्येची निवृत्ती होऊन असे ज्ञान झाले की, मी, तू, पुरुष, स्त्री, मूल इत्यादि अनेक नावे, ही सत्यस्वरूपाच्या अज्ञानाने उत्पन्न झालेली असून, त्यांचा संबंध फक्त देहाकडे आहे, माझ्या शुद्धस्वरूपाकडे नाही. माझे शुद्धस्वरूप नामरूपातीत व देहाहून अगदी भिन्न असून त्याच्या ठिकाणी कोणताही काम नाही व ते निष्कामही नाही. तर ते केवळ सच्चिदानंदरूप व स्वयंप्रकाश असून कोणत्याही कर्माचा परिणाम त्याच्यावर होऊ शकत नाही, असे ते आहे. हे सद्गुरो ! आता आपल्या उपदेशाने माझे मन आत्मारामस्वरूपी रमू लागले आहे. याकरिता आपणास आम्ही नम्रभावाने नमस्कार करीत आहोत.

ज्यांच्या कृपेने हे दुःखरूप सर्वविश्व, आनंदरूप ब्रह्म वाटू लागते व सर्वच श्रमकार्याचे निवारण होते व ज्यांच्या पदी वंदन केले असता, सर्व अज्ञानाचा नाश होऊन कैवल्याचा ठेवा प्राप्त होतो, त्या सद्गुरू श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांना आमचा साष्टांग नमस्कार असो. हे सद्गुरो ! सर्व विद्यांचे आश्रयस्थान असे जे आपले चरणकमल त्यास आम्ही वंदन करतो. आपले नेहमी स्मरण केले असता कवित्वशक्ती येते, असा पुष्कळांनी अनुभव घेतला आहे. तसेच सर्व विद्या जिव्हाग्री येतात, भाषणाला अमृताप्रमाणे माधुर्य येते व आत्मज्ञानाचे वर्म स्पष्ट समजते, ही गोष्ट निःसंशय सत्य आहे. आपणास आमचा नमस्कार असो.

श्रीस्वामीमहाराज ! आपण शके १८३४ अर्थात् इ. स. १९१२ मध्ये श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीनर्मदानदीच्या तीरावर आल्यावर



अखेरपर्यंत तिच्या तीरावरच राहिलात. श्रीनर्मदामातेचे आपल्यावर निरतिशय प्रेम असल्यामुळे आपण तिच्याच स्वरूपाशी एकरूप होऊन प्रवाहित होत असल्यामुळे व तिच्या तीरावर राहून तिच्या रूपाने आपली सेवा करणाऱ्यांचे आपल्या द्वारा अखंड कल्याणमंगल करता यावे म्हणून ती आपल्या रूपानेच अखंड प्रवाहित होऊन वाहत आहे. श्रीस्वामीमहाराज ! आपण श्रीनर्मदामातेची आरती करताना "रक्षास्माનतिघोरे मग्नानसंसारे ।" असे म्हणून तिची जी प्रार्थना केली आहे तीच आपल्या चरणी प्रस्तुत करून "या अत्यंत घोर अशा संसारसागरात मग्न झालेल्या आम्हा संसारी लोकांचा उद्धार करा," अशी आम्ही आपल्या पवित्र व कोमलचरणी प्रार्थना करीत आहोत !

हे श्रीस्वामीमहाराज प्रभो ! अशा रीतीने आपण श्रीनर्मदास्वरूप असल्यामुळे श्रीमन्महर्षिकृष्णद्वैपायनव्यासविरचित श्रीस्कंदपुराणान्तर्गत श्रीनर्मदापुराणातील रेवाखंडात आलेली श्रीनर्मदामातेची स्तुती करून आम्ही धन्य होतो. श्रीनर्मदामातेचे माहात्म्य म्हणजे आपलेचमाहात्म्य आहे अशी आमची दृढ श्रद्धा, भक्ती व धारणा आहे. तरी आपण या स्तुतीचा स्वीकार करून आम्हा सर्वांचा उद्धार करून आपल्याशी एकरूप करा, अशी आपल्या परमपवित्र चरणकमली विनम्र प्रार्थना आहे हे श्रीनर्मदास्वरूप श्रीस्वामीमहाराज ! आपण श्रीगंगेपेक्षाही श्रेष्ठ आहात; कारण आपले हे श्रीरेवारूप माहात्म्य श्रीयुधिष्ठिराला सांगताना श्रीव्यास महर्षी असे म्हणतात की –

इयं माहेश्वरी गंगा महेश्वरतनूद्भवा ।
प्रोक्ता दक्षिणगंगेति भारतस्य युधिष्ठिर ॥१॥
जान्हवी वैष्णवी गंगा ब्राह्मी गंगा सरस्वती ।
इयं माहेश्वरी गंगा रेवा नास्त्यत्र संशयः ॥२॥

यथाहि पुरुषे देवस्त्रैमूर्तत्वमुपाश्रितः ।
ब्रह्माविष्णुमहेशाख्यं स भेदस्तत्र वै यथा ॥३॥
तथा सरित्त्रये पार्थ भेदं मनसि मा कृथा ।
त्रिभिः सारस्वतं पुण्यं सप्ताहेन तु यामुनम् ।
सद्यः पुनाति गांगेयं दर्शनादेव नर्मदा ॥४॥
गंगा कनखले पुण्या कुरुक्षेत्रे सरस्वती ।
ग्रामे वा यदि वाऽरण्ये पुण्या सर्वत्र नर्मदा ॥५॥
समुद्राः सरितः सर्वाः कल्पे कल्पे क्षयं गतः ।
सप्त कल्पक्षये क्षीणे न मृता तेन नर्मदा ॥६॥
रेवायां स्नानदानादि जपहोमार्चनादिकम् ।
यः कुर्यान्मनुजः श्रेष्ठः सोऽश्वमेधफलं लभेत् ॥७॥
स्मरणाज्जन्मजं पापं दर्शनेन त्रिजन्मजम् ।
स्नानाज्जन्मसहस्राख्यं हन्ति रेवा कलौ युगे ॥८॥

हे युधिष्ठिरा ! श्रीमहेश्वराच्या दिव्य शरीरापासून प्रकट झालेली ही श्रीमाहेश्वरीगंगा आहे. ही भारताच्या दक्षिण भागातून वाहत असल्यामुळे हिला दक्षिण गंगा असे म्हणतात. ॥ १ ॥ श्रीजान्हवीला वैष्णवी–गंगा असे म्हणतात, श्रीसरस्वतीला ब्राह्मी–गंगा असे म्हणतात आणि ही श्रीनर्मदा निस्संदेहपणे साक्षात् श्रीशांकरी-गंगा आहे. ॥ २ ॥ ज्याप्रमाणे एकच परमेश्वरपुरुष श्रीब्रह्मा, श्रीविष्णू व श्रीशिव अशा रीतीने तीन मूर्ती धारण करणारा होतो त्याप्रमाणे हे कौन्तेय ! या तिन्ही देवनद्यांमध्ये स्वरूपतः कोणताच भेद नाही. हे कौन्तेय ! या तीन देवनद्यांमध्ये भेदबुद्धी म्हणजे श्रेष्ठ–कनिष्ठ बुद्धी करू नये; (कारण "नद्यस्तिस्रस्त्रिदेवताः । " म्हणजे देवही तीन आहेत आणि त्यांच्या अनुग्रहमूर्ती श्रीसरस्वती, श्रीगंगा व श्रीनर्मदा या नद्याही तीन आहेत.) ॥ ३ ॥ श्रीसरस्वती

नदीचे पाणी तीन दिवसात, श्रीयमुनानदीचे पाणी सात दिवसात आणि श्रीगंगानदीचे पाणी स्नान करताच मनुष्यमात्रास तत्काळ पवित्र करते. परंतु श्रीनर्मदानदीचे पाणी दर्शनानेच माणसाला पवित्र करते. ॥ ४ ॥ श्रीगंगानदी कनखल अर्थात् हरिद्वारमध्ये व श्रीसरस्वतीनदी कुरुक्षेत्रात विशेषरूपाने पुण्यरूप आहे; परंतु श्रीनर्मदानदी गावातून किंवा अरण्यातून कोठेही वाहत असली तरी ती सर्वत्र पुण्यकारक मानली जाते. ॥ ५ ॥ प्रत्येक कल्पातील प्रलयकालामध्ये सर्व सागर व सर्व नद्या या स्वरूपत: क्षीण होत होत शेवटी नष्ट होतात; परंतु ही श्रीनर्मदानदी सात कल्पांपर्यंत नष्ट झाली नाही. यामुळेच या नदीचे नाव श्रीनर्मदा म्हणजे न मरणारी असे प्रसिद्ध झाले. ॥ ६ ॥ जो मनुष्य या श्रीनर्मदानदीत विधिवत् स्नान, दान, जप, होम, अर्चन, सेवा इत्यादि तिच्या निमित्त करतो तो निस्संदेह अश्वमेध यज्ञाचे फळ प्राप्त करतो. ॥ ७ ॥ जो मनुष्य या कलियुगात श्रीनर्मदानदीचे स्मरण करतो त्याचे जन्मभरातील पाप, जो तिचे दर्शन घेतो त्याचे तीन जन्मांचे पाप आणि जो श्रीनर्मदा नदीत स्नान करतो त्याचे हजार जन्मांचे पाप ती नष्ट करते. ॥ ८ ॥ (श्रीस्कंदपुराणात असे म्हटले आहे की, कलियुगाची पाच हजार वर्षे पूर्ण झाली की, श्रीगंगानदीचे सर्व माहात्म्य श्रीनर्मदानदीत मिसळून जाईल.)

श्रीस्वामीमहाराज ! आपले हे पवित्र चरित्र जो प्रेमाने ऐकतो तो मुक्त होतो; कारण श्रीव्यासमहर्षींनी आपले हे श्रीनर्मदारूप कथेचे माहात्म्य युधिष्ठिराला सांगताना असे म्हटले आहे की—

गंगा तु वैष्णवी मूर्त्तिः सर्वपापप्रणाशिनी ।
रुद्रदेहसमुद्भूता नर्मदा चैवमेव तु ॥ रेवाखंड ॥ ९.४६ ॥

ब्राह्मी सरस्वती मूर्त्तिस्त्रिषु लोकेषु विश्रुता ।
दिव्या कामगमा देवी वाग्विभूत्यै तु संस्थिता ॥४७॥
नर्मदा परमा काचिन्मर्त्यमूर्त्तिकला शिवा ।
दिव्या कामगमा देवी सर्वत्र सुरपूजिता ॥४८॥
व्यापिनी सर्वभूतानां सूक्ष्मात्सूक्ष्मतरा स्मृता ।
अक्षया ह्यमृता ह्येषा स्वर्गसोपानमुत्तमा ॥४९॥
सृष्टा रुद्रेण लोकानां संसारार्णवतारिणी ॥५०॥
सरिज्जलं येऽपि पिबन्ति लोके, मुच्यन्ति ते पापविशेषसङ्घैः ।
व्रजन्ति संसारमनादिभावं, त्यक्त्वा चिरं मोक्षपदं विशुद्धम ॥
यथा गंगा तथा रेवा तथा चैव सरस्वती ।
समं पुण्यफलं प्रोक्तं स्नानदर्शनचिन्तनैः ॥५२॥
वरदानान्महाभागा ह्यधिका चोच्यते बुधैः ।
कारुण्यान्तरभावेन न मृता समुपागता ॥५३॥
मुच्यन्ते दर्शनात्तेन पातकैः स्नानमंगलैः ।
नर्मदायां नृपश्रेष्ठ ये नमन्ति त्रिलोचनम् ॥५४॥
उमारुद्रांगसंभूता येन चैषा महानदी ।
लोकान्प्रापयती स्वर्गं तेन पुण्यत्वमागता ॥५५॥
य एवमीशानवरस्य देहं विभज्य देवीमिह संश्रृणोति ।
स याति रुद्रं महता रवेण,गन्धर्वयक्षैरपि गीयमानः ॥५६॥

श्रीगंगानदी ही सर्व पापे नष्ट करणारी श्रीविष्णूची वैष्णवमूर्ती आहे. श्रीरुद्राच्या शरीरापासून उत्पन्न झालेली श्रीनर्मदानदी ही सर्व पापे नष्ट करते. ॥ ४६ ॥ आणि तिन्ही लोकात प्रसिद्ध असलेली श्रीसरस्वतीनदी ही दिव्य रूपाची, आपल्या इच्छेप्रमाणे सर्वत्र गमन करणारी देवी आणि ब्रह्माशक्तिसंपन्न अशी श्रीसरस्वतीची साक्षात् मूर्ती असून ती वाणीच्या विभूतीच्या रूपाने स्थित

आहे. ।।४७।। भगवती श्रीनर्मदानदी ही अत्यंत अनिर्वचनीय अशा शिवशक्तिस्वरूप दिव्य रूपाची असून ती यथेच्छ गती असणारी आहे. तिची सर्व देवांकडून पूजा होते. ।।४८।। श्रीनर्मदानदी ही सर्व भूतांना व्यापून असणारी, अत्यंत सूक्ष्म मृत्युलोकामधील अमर मूर्तिकला व अक्षय अमृतस्वरूप असून ती स्वर्गाला जाण्याची उत्तम अशी शिडी आहे. ।।४९।। सर्व लोकांना संसारसागरातून पार करणारी ही श्रीनर्मदानदी श्रीरुद्रापासून उत्पन्न झाली आहे. ।। ५० ।। जो मनुष्य या श्रीनर्मदानदीचे पाणी प्राशन करतो तो सर्व पापांपासून मुक्त होतो. तो अनादि कालापासून चालत आलेल्या संसाराचा पूर्णपणे त्याग करून स्थिर परमशुद्ध व मोक्षस्वरूप असे भगवत्पद प्राप्त करतो. ।। ५१ ।। श्रीगंगा, श्रीनर्मदा व श्रीसरस्वती ह्या तिन्ही एकसारख्या आहेत. या तिन्ही नद्यांचे स्नान, दर्शन आणि स्मरण यांचे पुण्यफल हे एकसारखेच असते असे शास्त्रकारांनी सांगितले आहे. ।।५२।। श्रीनर्मदानदीने श्रीशंकरांकडे वरदान मागितल्यामुळे ती श्रेष्ठ झाली आहे, असे विद्वानांचे कथन आहे. श्रीनर्मदामाता ही अत्यंत दयाळू अंतःकरणाची असल्यामुळे अमृतस्वरूप आहे. ।।५३।। हे राजश्रेष्ठ युधिष्ठिरा ! जे लोक श्रीनर्मदानदीमध्ये स्नानादि मंगल कार्ये करून व भक्तिभावाने दर्शन घेऊन तिच्या तीरावर श्रीशंकरांना नमन करतात ते सर्व पातकांपासून सुटतात. ।।५४।। ही श्रीनर्मदामहानदी ही श्रीपार्वती व श्रीशंकर यांच्या अंगांपासून उत्पन्न झालेली असल्यामुळे ती तिच्या दर्शनाने, स्मरणाने व स्नानाने लोकांना स्वर्गप्राप्ती करून देते. ।।५५।। यामुळे ही श्रीनर्मदानदी अत्यंत पुण्यशालिनी आहे. जो मनुष्य या रीतीने श्रीशंकरांच्या देहापासून उत्पन्न झालेल्या श्रीनर्मदेची पवित्र कथा प्रेमाने ऐकतो तो मनुष्य

गंधर्व व यक्षांच्या द्वारा उच्चस्वराने गायीलेली आपली स्वतःची प्रशंसा ऐकत श्रीशंकरांशी एकरूप होतो. ॥५६॥

श्रीस्वामीमहाराज ! आपण साक्षात् श्रीशंकर असून आपल्यापासूनच या श्रीनर्मदानदीचा उद्भव झालेला असल्यामुळे जो आपल्या चरित्राचे अत्यंत भक्तिभावाने हे वाचन करून आपल्या स्वरूपाशी एकरूप असलेल्या श्रीनर्मदानदीचे माहात्म्य प्रेमाने अंतःकरणात धारण करतो, त्याला उत्तम गती प्राप्त होते; कारण श्रीनर्मदामातेचा हा महिमा कथन करताना महर्षी श्रीवेदव्यास स्कंदपुराणांतर्गत रेवाखंडात असे म्हणतात की –

ये पुनर्देवमीशानं भवं भक्तिसुसंस्थिताः ॥ १०.५३ ॥
यजन्ति नर्मदातीरे न पुनस्ते भवन्ति च ।
आदेहपतनात्केचिदुपासन्तः परं गताः ॥५४॥
केचिद्द्वादशभिर्वर्षैः षड्भिरन्ये तपोधनः ।
त्रिभिः संवत्सरैः केचित्केचित् संवत्सरेण तु ॥ ५५ ॥
षड्भिर्मासैस्तु संसिद्धिस्त्रिभिर्मासैस्तथा परे ।
मुनयो देवमाश्रित्य नर्मदा च यशस्विनीम् ॥ ५६ ॥
छित्त्वा संसारदोषाँश्च अगमन्ब्रह्मशाश्वतम् ।
एवं कलियुगे घोरे शतशोऽथ सहस्रशः ॥ ५७ ॥
नर्मदातीरमाश्रित्य मनुयो रुद्रमाविशन् ॥ ५८ ॥
ये नर्मदा तीरमुपेत्य विप्राः शैवव्रते यत्नमुपप्रपन्नाः ।
त्रिकालमम्भः प्रविगाह्य भक्त्या देवं समभ्यर्च्य शिवं व्रजन्ति ॥५९॥
ध्यानार्च्चनैर्जाप्य महाव्रतैश्च नारायणं वा सततं स्मरन्ति ।
ये धौतपाण्डुरपटा इव राजहंसाः संसारसागरजलस्य तरन्ति पारम् ॥
सत्यं सत्यं पुनः सत्यमुत्क्षिप्य भुजमुच्यते ।
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा ॥६१॥

यो वा हरं पूजयते जितात्मा मासं च पक्षं च वसन्नरेन्द्र ।
रेवां समाश्रित्य महानुभावः, स देवदेवोऽथ भवेत्पिनाकी ॥६२॥
कीटाः पतंगाश्च पिपीलिकाश्च, ये वै म्रियन्तेऽम्भसि नर्मदायाः ।
ते दिव्य रूपास्तु कुलप्रसूताः, शतं समा धर्मपरा भवन्ति ॥६३॥
कालेन वृक्षाः प्रपतन्ति येऽपि, महातरंगौघनिकृत्तमूलाः ।
ते नर्मदाम्भोभिरपास्तपापा देदीप्यमानास्त्रिदिवं प्रयान्ति ॥६४॥
अकामकामाश्च तथा सकामा, रेवान्तमाश्रित्य म्रियन्ति तीरे ।
जडान्धमूकास्त्रिदिवं प्रयान्ति, किमत्र विप्रा भवभावयुक्ताः ॥६५॥
मासोपवासैरपि शोषितांगा, न तां गतिं यान्ति विमुक्तदेहाः ।
म्रियन्ति रेवाजलपूत कायाः, शिवार्चने केशवभावयुक्ताः ॥६६॥
ये नर्मदातीरमनुप्रपन्ना अभ्यर्चयित्वा शिवमव्ययाख्यम् ।
नारायणं वा मनसा सुपूताः पिबन्ति मातुर्न पुनः स्तनं ते ॥६७॥
नीवारश्यामाकयवेङ्गुदाद्यैरन्यैर्मुनीन्द्रा इह वर्तयन्ति ।
आश्रित्य कूलं त्रिदशानुगीतं ते नर्मदाया न विशन्ति मृत्युम् ॥६८॥
भ्रमन्ति ये तीरमुपेत्य देव्यास्त्रिकालदेवार्चनसत्यपूताः ।
विण्मूत्रचर्मास्थिशिरोपधानाः, कुक्षौ युवत्या न वसन्ति भूयः ॥६९॥
किं यज्ञदानैर्बहुभिश्च तेषां, निषेवितैस्तीर्थवरैः समस्तैः ।
रेवातट दक्षिणमुत्तरं वा सेवन्ति ते रुद्रचरानुपूर्वम् ॥७०॥
ते वंचिताः पंगुजडान्धभूता, लोकेषु मर्त्याः पशुभिश्च तुल्याः ।
ये नाऽऽश्रिता रुद्रशरीभूतां सोपानपंक्ति त्रिदिवस्य रेवाम् ॥७१॥
युगं कलिं घोरमिमं य इच्छेद्, द्रष्टुं कदाचिन्न पुनर्द्विजेन्द्रः ।
स नर्मदातीरमुपेत्य सर्वं, सम्पूजयेत्सर्वविमुक्तसंगः ॥७२॥
विघ्नैरनेकैरतियोज्यमाना, ये तीरमुज्झन्ति न नर्मदायाः ।
ते चैवं सर्वस्य हितार्थभूता वंद्याश्च ते सर्वजनस्य मान्याः ॥७३॥

भृग्वत्रिगार्ग्यवशिष्ठकङ्कः, शतैः समेतैर्नियतास्त्वसङ्ख्यैः ।
सिद्धिं परां ते हि जलप्लुताङ्गाः, प्राप्तास्तु लोकान्मरुतां न चान्ये
ज्ञानं महत्पुण्यतमं पवित्रं पठन्त्यदो नित्यविशुद्धसत्त्वाः ।
गतिं परां यान्ति महानुभावा रुद्रस्य वाक्यं हि यथा प्रमाणम् ॥७५॥

जे लोक सर्वांना उत्पन्न करणाऱ्या भगवान् श्रीशंकरांच्या ठिकाणी सुस्थिर होऊन श्रीनर्मदेच्या तीरावर त्यांचे अत्यंत भक्तिभावाने व प्रेमाने भजन करतात त्यांना पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. जे लोक श्रीनर्मदामातेची आमरणान्त सेवा व उपासना करतात ते परब्रह्माची प्राप्ती करतात. ॥५३–५४॥ काही तपस्वी लोक बारा वर्षात, दुसरे काही सहा वर्षात, अन्य काही तीन वर्षात इतर काही एक वर्षात, बाकी काही सहा महिन्यात व उरलेले काही मुनी भगवान् श्रीशंकर व भगवती कीर्तिशालिनी श्रीनर्मदामातेचा आश्रय घेऊन केवळ तीन महिन्यातच उत्तम सिद्धी प्राप्त करतात. ॥५५–५६॥ हे सर्व मुनी या प्रकारच्या तपश्चर्येमुळे संसार दोष जाळून टाकून सनातन ब्रह्मरूप झाले. या रीतीने या घोर अशा कलियुगात शेकडो व हजारो मुनी श्रीनर्मदानदीच्या तीराचा आश्रय घेऊन भगवान् श्रीशंकरांशी एकरूप झाले आहेत. ॥५७-५८॥ जे ब्राह्मण श्रीनर्मदानदीच्या तीरावर जाऊन शैवव्रताने राहून, यत्नपूर्वक तन्मय होऊन, श्रद्धेने व भक्तिभावाने त्रिकाल स्नान, संध्या व देवतार्चन करून श्रीशिवाची आराधना, उपासना करतात ते शेवटी श्रीशिवरूप होतात. किंवा जे या श्रीनर्मदानदीच्या तीरावर राहून जप, ध्यान, अर्चना आदि साधना करून श्रीनारायणाचे निरंतर चिंतन, स्मरण, भजन व नामस्मरण करतात ते सर्व श्वेतवस्त्रधारी महात्मा राजहंसांच्याप्रमाणे हा संसारसागर ओलां-

डून पलीकडे जातात. (याचा अर्थ असा की, श्रीनर्मदानदीच्या तीरावर कोणीही श्रीशंकरांचे किंवा श्रीविष्णूंचे असे कोणाचेही भजन केले तरी त्याचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.) ।।५९-६०।। श्रीव्यासमहर्षी असे म्हणतात की, श्रीनर्मदानदीच्या तीरावर, जो अखंड सिद्ध आहे, त्या श्रीनारायणाचेच सदा सर्वदा चिंतन केले पाहिजे हे त्रिवार सत्य आहे. ।।६१।। हे राजाधिराज युधिष्ठिरा ! जो पुरुष इंद्रियांना आणि मनाला ताब्यात ठेवून श्रीनर्मदानदीच्या तीरावर उत्तम रीतीने एक महिनाभर किंवा पंधरा दिवस राहून भगवान् श्रीशंकरांचे पूजन करतो तो महानुभाव अर्थात् महातेजस्वी पुरुष साक्षात् देवाधिदेव श्रीशंकरच होतो. ।। ६२-६३।।

जे किडे, पतंग, पक्षी, मुंग्या इत्यादि सर्व व अन्य सर्व जीव श्रीनर्मदानदीच्या पाण्यात मृत्यू पावतात ते प्रथम दिव्यरूप होतात आणि त्यानंतर त्यांचा उत्तम कुळात जन्म होऊन ते शंभर वर्षेपर्यंत धर्मपरायण होऊन जगतात. ।। ६३ ।। जे वृक्ष कालौघात श्रीनर्मदानदीच्या प्रचंड प्रवाहामुळे मुळासकट उखडून तिच्या पात्रात पडतात त्यांचीही पापे तिच्या पाण्यामुळे नष्ट होऊन ते दिव्य शरीर धारण करून देवलोकात जातात. ।। ६४।। ज्यांच्या सर्व इच्छा, आशा व कामना नष्ट झाल्या आहेत अशा लोकांपैकी आणि जे कामनायुक्त, इच्छायुक्त किंवा वासनायुक्त आहेत अशा लोकांपैकी कोणीही जरी श्रीनर्मदानदीच्या तीरावर मृत्यू पावला आणि तो जरी जड, आंधळा किंवा मुका असला तरीही तो स्वर्गलोकी जातो, अशी वास्तविक स्थिती आहे; तर मग श्रीनर्मदानदीतीरावर राहून जो वैदिक ब्राह्मण श्रीभवानीशंकरांची श्रद्धाभक्तिपूर्वक पूजा करील त्याच्या संबंधी विचार

करण्याचे कारणच काय आहे ? ॥ ६५ ॥ एक महिनाभर उपवास करून व शरीर सुकवून श्रीशिवपूजन किंवा श्रीविष्णुपूजन करणाऱ्या पुरुषांना जी गती प्राप्त होत नाही ती गती जे पुरुष श्रीनर्मदानदीच्या तीरावर राहून तिच्या जलाने आपले शरीर पवित्र करून श्रीशिवांची किंवा श्रीविष्णूंची भक्ती करतात त्यांना प्राप्त होते. ॥६६॥ श्रीनर्मदेच्या तीरावर राहणारे जे भक्तजन मनाने त्या अविनाशी श्रीसदाशिवांची किंवा श्रीनारायणांची अर्चा करून पवित्र होतात ते भक्तजन पुन्हा जन्म घेऊन आईचे दूध पीत नाहीत ॥६७॥ जे मुनी देवपूजित श्रीनर्मदानदीच्या तीराचा आश्रय घेऊन देवभात, साव्याचे धान्य, जव, इंगुदी फळे इत्यादि खाऊन आपले जीवन चालवितात ते पुन्हा मृत्यू पावत नाहीत. ॥६८॥ श्रीनर्मदानदीच्या तटावर राहून जो पुरुष त्रिकाल देवपूजन आणि सत्यव्रत धारण करून अर्थात् सत्याने पवित्र होऊन श्रीनर्मदानदीची प्रदक्षिणा करतो तो पुरुष पुन्हा विष्ठा, मूत्र, चर्म, हाडे यांनी युक्त होऊन आणि डोके खाली करून आईच्या गर्भात निवास करीत नाही. ॥६९॥ खूप यज्ञ व दान करून आणि इतर संपूर्ण तीर्थांचे सेवन करून खरोखरी काय होणार ? जे नर्मदानदीच्या उत्तर किंवा दक्षिण तटावर निवास करतात ते भगवान् श्रीशंकरांचे पार्श्वगण किंवा पार्षद होतात. ॥७०॥ जे पुरुष श्रीशंकरांच्या शरीरापासून उत्पन्न झालेल्या व स्वर्गाची जणूकाही शिडीच असलेल्या अशा श्रीनर्मदानदीचे सेवन करीत नाहीत ते लोक आंधळे, लंगडे, जडमूढ आणि पशुसमान असतात. ॥७१॥ ज्या पुरुषश्रेष्ठ ब्राह्मणाला हे घोर असे कलियुग पुन्हा कधीही पाहण्याची इच्छा नाही त्याने सर्व आसक्ती सोडून देऊन श्रीनर्मदानदीच्या तटावर जाऊन श्रीशिवांचे पूजन करावे. ॥७२॥ जे लोक अनेक विघ्ने

उत्पन्न झाली तरी श्रीनर्मदानदीच्या तीराचा कधीही त्याग करीत नाहीत ते लोक सर्वांना हितकारक आणि सर्व लोकांना मान्य असे वन्दनीय महामानवच असतात. ॥७३॥ भृगू, अत्री, वशिष्ठ, गार्ग्य, कंक इत्यादि शेकडोशे असंख्य ऋषी, मुनी व महात्मे श्रीनर्मदानदीच्या तीरावर राहिले व त्यांनी तपश्चर्या करून सिद्धी प्राप्त केली आणि शेवटी श्रीनर्मदानदीच्या पाण्यात स्नान करून व आपले शरीर ओलेचिंब ठेवून ते सर्वजण त्या पवित्र जलामुळे दिव्य लोकाला निघून गेले अर्थात् ब्रह्मपदाला प्राप्त झाले. अशा प्रकारची दिव्य गती इतर कोणालाही मिळत नाही. ॥७४॥ निर्मल चित्ताचे व विशुद्ध अंतःकरणाचे जे लोक अत्यंत पुण्यपवित्र ज्ञानाने युक्त असलेले हे श्रीनर्मदामाहात्म्य वाचतात ते महानुभाव परमपद प्राप्त करतात यात संशय नाही. भगवान् श्रीशंकरांची ही वाणी नितांत सत्य व प्रामाणिक आहे. ॥७५॥

श्रीस्वामीमहाराज ! आपल्यावर श्रीनर्मदामातेचे अपार प्रेम असल्यामुळे आपण तिच्या तीराचा अखंड आश्रय घेऊन शेवटी तिच्याशी एकरसरूप झाला आहात ! याकरिता श्रीव्यासमहर्षींनी स्कंद पुराणान्तर्गत रेवाखंडात श्रीनर्मदास्तोत्राच्या द्वारा जी तिची स्तुती केली आहे त्या शब्दांच्या आश्रयानेच आम्ही आपली स्तुती करीत आहोत. तिचा स्वीकार करून आपण आम्हाला धन्य व कृतार्थ करावे, ही आपल्या पवित्र व कोमल चरणी प्रार्थना आहे.

श्रीमार्कण्डेय उवाच –

एतच्छ्रुत्वा वचो राजन्संहृष्टा ऋषयोऽभवन् ।
नर्मदां स्तोतुमारब्धाः कृतांजलिपुटा द्विजाः ॥१२.१ ॥
नमोऽस्तु ते पुण्यजले नमो मकरगामिनी ।
नमस्ते पापमोचिन्यै नमो देवि ! वरानने ॥२॥

नमोऽस्तु ते पुण्यजलाश्रये! शुभे! विशुद्धसत्त्वे! सुरसिद्धसेविते।
नमोऽस्तु ते तीर्थगणैर्निषेविते नमोऽस्तु रुद्रांगसमुद्‌भवे! वरे ॥३॥
नमोऽस्तु ते देवि! समुद्रगामिनी! नमोस्तु ते देवि वरप्रदे शिवे।
नमोऽस्तु लोकद्वयसौख्यदायिनी! ह्यनेकभूतौघसमाश्रितेऽनघे ॥४॥
सरिद्वरे पापहरे विचित्रिते गन्धर्वयक्षोरगसेवितांऽगे।
सनातनि प्राणिगणानुकम्पिनि मोक्षप्रदे देवि विधेहि शं नः ॥५॥
महागजौघैर्महिषैर्वराहैः संसेविते देवि महोर्मिमाले।
नताः स्म सर्वे वरदे सुखप्रदे विमोचयास्मात्पशुपाशबन्धात् ॥६॥
पापैरनेकैरशुभैर्विबद्धा भ्रमन्ति तावन्नरकेषु मर्त्याः।
महानिलोद्‌भूततरंग भूतं यावत्त्वाम्भो हि न संस्पृशन्ति ॥७॥
अनेकदुःखौघभयार्दितानां पापैरनेकैरभिवेष्टितानाम्।
गतिस्त्वमम्भोजसमानवक्त्रे द्वन्द्वैरनेकैरपि सम्वृतानाम् ॥८॥
नद्यश्च पूता विमला भवन्ति, त्वां देवि सम्प्राप्य न संशयोऽत्र।
दुःखातुराणामभयं ददासि शिष्टैरनैकैरभिपूजितासि ॥९॥
स्पृष्टं करैश्चन्द्रमसो रवेश्च तदैव दद्यात्परमं पदं तु।
यत्रोपलाः पुण्यजलाप्लुतास्ते शिवत्वमायान्ति किमत्र चित्रम् ॥१०॥
भ्रमन्ति तावन्नरकेषु मर्त्या दुःखातुराः पापपरीतदेहाः।
महानिलोद्‌भूततरंगभंगं यावत्त्वम्भो न हि संश्रयन्ति ॥११॥
म्लेच्छाः पुलिन्दास्त्वथ यातुधानाः पिबन्ति येऽम्भस्तव देवि पुण्यम्।
मुक्ता भवन्तीह भयात्तु घोरान्निःसंशयं तेऽपि किमत्र चित्रम् ॥१२॥
सरांसि नद्यः क्षयमभ्युपेता घोरे युगेऽस्मिन्हि कलौ प्रदूषिते।
त्वं भ्राजसे देवि जलौघपूर्णा दिवीव नक्षत्रपथे च गंगा ॥१३॥
तव प्रसादाद्वरदे वरिष्ठे कालं यथेमं परिपालयित्वा।
यामोऽथ रुद्रं तव सुप्रसादाद्वयं तथा त्वं कुरु वै प्रसादम् ॥१४॥
गतिस्त्वमम्बेव पितेव पुत्रांस्त्वं पाहि नो यावदिमं युगान्तम्।-

काले त्वनावृष्टिहतं सुघोरं यावत्तरामस्तव सुप्रसादात् ॥१५॥
पठन्ति ये स्तोत्रमिदं द्विजेन्द्राः शृण्वति ये चापि नराः प्रशान्ताः ।
ते यान्ति रुद्रं वृषसंयुतेन यानेन दिव्याम्बरभूषिताश्च ॥१६॥
ये स्तोत्रमेततसततं पठन्ति स्नात्वा तु तोये खलु नर्मदायाः ।
अन्ते हि तेषां सरिदुत्तमेयं गतिं विशुद्धामचिराद्ददाति ॥१७॥
प्रातः समुत्थाय तथा शयानो यः कीर्तयेताऽनुदिनं स्तवं च ।
स मुक्तपापः सुविशुद्धदेहः समाश्रयं याति महेश्वरस्य ॥१८॥

इति श्रीस्कान्दे महापुराणे एकाशीति साहस्रायां
संहितायां पंचमेऽवन्तीखण्डे रेवाखण्डे नर्मदामाहात्म्ये
नर्मदास्तोत्र कथनं नाम द्वादशोऽध्यायः ॥

श्रीमार्कंण्डेय ऋषी असे म्हणाले की, हे राजा ! (मागे सांगितल्याप्रमाणे श्रीनर्मदानदीच्या तीरावर जे महात्मा लोक राहतात ते नानाविध द्वंद्वे, सुख–दुःखे, तहान–भूक आणि मोठ्या भयापासून मुक्त होतात. याकरिता या लोकात आणि परलोकात आपले परम कल्याण व्हावे अशी ज्यांची इच्छा आहे त्या सर्व लोकांनी सर्वश्रेष्ठ श्रीनर्मदानदीचे सर्व प्रकारांनी सेवन केले पाहिजे.) हे ऐकून सर्व ऋषी अत्यंत प्रसन्न झाले आणि ते सर्व ब्राह्मणऋषी श्रीनर्मदानदीची हात जोडून स्तुती करू लागले. ॥ १ ॥ हे पवित्र जलाने युक्त असलेल्या श्रीनर्मदे ! तुला आमचे नमस्कार असोत. हे मगर वाहन असणाऱ्या देवी श्रीनर्मदा माते ! तुला आमचे प्रणाम असोत. हे सुंदरमुख असणाऱ्या देवी श्रीनर्मदे ! तू सर्व लोकांना पापांपासून सोडविणारी असल्यामुळे तुला पुनःपुन्हा नमस्कार असोत. ॥ २ ॥ हे श्रीनर्मदादेवी ! तू पुण्यजलाचा आश्रयच आहेस. तू शुभकारक आहेस. तू विशुद्ध सत्त्वयुक्त आहेस. देव व सिद्ध हे नेहमीच तुझी पूजा करतात. तुझ्या ठिकाणी अनेक

तीर्थे असल्यामुळे तू सेवा करण्यास योग्य आहेस. हे शिवाच्या अंगापासून उत्पन्न झालेल्या शोभने श्रीनर्मदादेवी तुला नमन असो. ।। ३ ।। हे समुद्राला जाऊन मिळणाऱ्या श्रीनर्मदादेवी ! तुला प्रणाम असोत. हे वर देणाऱ्या कल्याणमयी देवी ! या लोकात व परलोकात सर्व सुखसाधने देणारी व अनन्त जीवांना आश्रय देणारी अशी तू निष्पाप व निर्मल माताच असल्यामुळे तुला नमन असो. ।।४।। हे सर्व नद्यांमधील श्रेष्ठ अशा श्रीनर्मदे ! हे पापांचे हरण करणाऱ्या, विचित्र कर्मांनी युक्त असलेल्या, गंधर्व–यक्ष–सर्पा-द्वारा सर्वांगाने सेवा घेणाऱ्या, निरंतर अस्तित्व असलेल्या, सर्व प्राण्यांवर अखंड दया करणाऱ्या आणि मोक्ष देणाऱ्या हे देवी ! तू आम्हा सर्वांचे कल्याण कर. ।। ५ ।। हे मोठ-मोठ्या हत्तींच्या, म्हशींच्या व डुकरांच्या वास्तव्याने युक्त अस-लेल्या, दोन्ही तटांमधून वाहणाऱ्या, अनंत तरंगरूपी मालांनी युक्त असलेल्या व सुखदायक वर देणाऱ्या श्रीनर्मदादेवी ! तुला नमस्कार असो. आम्ही सर्वजण तुला वंदन करतो. तू आम्हा सर्वांना पशु-पाशबंधनातून अर्थात् अज्ञानबंधनातून मुक्त कर. ।। ६ ।। जोपर्यंत अत्यंत वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे तुझ्यावर उठणाऱ्या तरंगयुक्त पवित्र पाण्याचा स्पर्श मनुष्याला होत नाही तोपर्यंत अनेक अशुभ पापांनी दृढपणे बांधला गेलेला मनुष्य नरकामध्ये भ्रमण करतो. ।। ७ ।। हे कमलाच्या समान सुंदरनेत्र असणाऱ्या श्रीनर्मदे ! अनेक दुःखांनी, तीव्र भयाने, अनेकविध पापांनी, राग-द्वेष, शोक-मोहादि विविध द्वंद्वांनी वेष्टिलेल्या व ज्यांना कोठेही काहीच गती नाही अशा लोकांची तूच एकमात्र गती आहेस. ।। ८ ।। हे देवी ! ज्यावेळी इतर नद्या तुला येऊन मिळतात त्यावेळी त्या पवित्र होतात यात काहीच संशय नाही. तू दुःखाने व्याकुळ

झालेल्या जीवांना अभय देतेस. सर्व महात्मे लोक तुझी नेहमीच पूजा करतात. ॥ ९ ॥ हे माता श्रीनर्मदादेवी ! चंद्र व सूर्य हे आपल्या किरणांनी तुझ्या पाण्याला स्पर्श करीत असताना जर त्यात स्नान केले तर तुझे पाणी त्या मनुष्याला परमपद देऊ शकते. मग जर तुझ्या पुण्यजलात बुडलेले पाषाण शिवभावाला प्राप्त झाले तर त्यात आश्चर्य वाटण्याचे काय कारण आहे ? ॥१०॥ हे भगवती श्रीनर्मदादेवी ! जोपर्यंत महावायूमुळे उत्पन्न झालेल्या लाटांनी युक्त असलेल्या अशा तुझ्या पवित्र जलाचा आश्रय मनुष्य घेत नाही तोपर्यंत पापांनी युक्त असलेला व दु:खाने व्याकुळ झालेला मनुष्य नरकामध्येच फिरत राहतो. ॥११॥ हे देवी श्रीनर्मदे ! म्लेच्छ, पुलिंद आणि राक्षसादि जो कोणी तुझे पवित्र व पुण्यकारक जल प्राशन करतो तो घोर अशा भयापासून निस्संदेह मुक्त होतो यात काय आश्चर्य आहे ? ॥१२॥ या दूषित अशा कलियुगात सर्व सरोवरे व नद्या या आटून जातात; परंतु हे देवी श्रीनर्मदे ! तू नेहमीच पाण्याने परिपूर्ण राहून आकाशगंगेप्रमाणे सुशोभित दिसतेस. ॥१३॥ हे वरदायिनी श्रेष्ठ माते श्रीनर्मदे ! तुझ्या कृपेने माझी कालक्रमणा उत्तमरीतीने व्हावी व तुझ्या सुप्रसादाने मला श्रीशंकरांची प्राप्ती व्हावी अशी तू माझ्यावर कृपा कर. ॥१४॥ हे श्रीदेवी नर्मदे ! तू मातेप्रमाणे आम्हाला सांभाळ व ज्याप्रमाणे पिता पुत्राचे रक्षण करतो त्याप्रमाणे तू आमचे रक्षण कर. आम्ही जोपर्यंत अवर्षणामुळे पीडित होऊन या भयंकर कालातून तुझ्या कृपेने पार पडत नाही तोपर्यंत तू आमचे युगान्तापर्यंत रक्षण कर. ॥१५॥ हे श्रेष्ठ ब्राह्मणांनो ! जे लोक हे स्तोत्र अत्यंत आदरपूर्वक वाचतात आणि जे शांतपुरुष हे स्तोत्र ऐकतात ते दिव्यवस्त्रालंकारांनी युक्त

होऊन धर्मयुक्त विमानाने साक्षात् श्रीशंकरांना प्राप्त करतात अर्थात् त्यांच्याशी एकरूप होतात. ॥१६॥ जे लोक श्रीनर्मदानदीत स्नान करून या स्तोत्राचा नेहमी पाठ करतात त्या सर्वांना ही उत्तम नदी भगवती श्रीनर्मदा शेवटी अत्यंत त्वरेने कायमची परमपवित्र गती देते. ॥१७॥ जो मनुष्य सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपताना दररोज हे श्रीनर्मदास्तोत्र म्हणतो तो मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होऊन परम निर्मल अंत:करणयुक्त व दिव्य शरीरयुक्त होऊन शिवसायुज्य प्राप्त करतो. ॥१८॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तू श्रीस्वामीमहाराजस्वरूप असल्यामुळे श्रीस्वामीमहाराजांचे परमभक्त व त्यांचे पूर्वाश्रमातील धाकटे बंधू श्रीसीताराममहाराज यांनी तुझी जी आरती केली आहे ती तुझ्या म्हणजेच श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी प्रस्तुत करून आम्ही धन्यता प्राप्त करीत आहोत.

॥ आरती ॥

(चाल – करितों प्रेमें तुज नीरांजन)

आरति करितों सप्रेमानें मेकलतनयेला ।
जननमरण भयहरण करोनी दे जी सद्गतिला ॥ धृ० ॥
अमरकंठ हें स्थान मनोहर पाहुनी तूं जननी ।
प्रगट होउनि रूप दाविलें जलमय होवोनी ।
दर्शनमात्रें अघ शमवोनी रक्षिसि दिनरजनी ।
विबुध ऋषीश्वर द्विजगण हे तव ध्याती पदकमळा ॥१॥ आरति ॥
योग याग तप मंत्र जपादिक कष्टसाध्य असती ।
अंतराय बहु निजकर्मानें अध:पात देती ।

ऐसे तुझिया दर्शनमात्रें मिळे भुक्ति मुक्ति ।
अनन्यभावें शरण मी आलो दावी स्वरुपाला ॥ २ ॥ आरति० ॥
कपिलमहर्षी सिद्ध पदवितें मेळवि तव कृपया ।
जामदग्न्य तो अतुल बलाने क्षत्रिय मर्दुनियां ।
सहस्त्रार्जुनें तव प्रसादें दत्ता तोषुनियां ।
सर्वैश्वर्या भोगुनि अंतीं वरि जो मुक्तीला ॥ ३ ॥ आरति० ॥
भिल्ल किरातादिक जडजीवां तारिशी तूं जननी ।
त्वत्सम अन्या या भूवरती न देखिजे नयनीं ।
अनन्यभावें शरण मी आलों तारी दिनरजनीं ।
सीतारामा दे विश्रामा प्रार्थितसे तुजला ॥ ४ ॥ आरति० ॥

श्रीस्वामीमहाराज ! अशा प्रकारे आपली जीवनकथा ही परमश्रेष्ठ व परमपावन अशी श्रीनर्मदा महानदीच आहे. या महानदीच्या तीरावर राहून आपली सेवा आमच्याकडून घडावी अशी आमची तीव्र इच्छा आहे; पण या संसारात पार बुडून गेलेल्या आमच्यासारख्या नानाविध वासनांनी व इच्छांनी भरलेल्या लोकांकडून अशी सेवा होणे शक्य होत नसल्यामुळे आम्ही आपले परम भक्त व पूर्वाश्रमातील धाकटे बंधू श्रीसीतारामहाराज यांनी स्वत: म्हटल्याप्रमाणे " गुरुराया धावरे लवकरी । तव विरहें मज दु:ख होई भारी ॥ " अशी प्रार्थना करून आपल्यालाच आमच्याकडे येऊन आम्हाला पावन करण्याची प्रार्थना करीत आहोत. आमची ही प्रार्थना आपण मान्य करून घेऊन आम्हाला स्वस्वरूपी ठाव द्यावा अशी आपल्या परमकोमलचरणीं अत्यंत नम्र व करुणरसपूर्ण मागणी आहे.

।। पद ।।

गुरुराया धावरे लवकरी । तव विरहें मज दुःख होई भारी ।।१।।
गुंतलासी कोणत्या भक्तकाजा । उडी घालुन तूं राखी प्राण माझा ।।
भक्तवत्सल तूं असति जगन्नाथा । राखि ब्रीद आपुलें दिनानाथा ।।
दयाळू तूं सर्वज्ञ जरी होसी । कृपा करुनि मज राखें पायापासीं ।।४।
भवरोगें त्रासलों स्वामिराया । ज्ञानभेषज देवोनि हरीं माया ।।५।।
कसा निष्ठुर तूं होसि वासुदेवा । सीतारामाचा नाइकसी धांवा ।।६।।

श्रीस्वामीमहाराज ! आपली संपूर्ण जीवन–चरित्र–कथा ही स्कंदपुराणांतर्गत रेवाखंडात वर्णन केल्याप्रमाणे परमपावन व त्रिभुवनैक दुर्लभ अशी श्रीनर्मदामहानदीच आहे. ज्याप्रमाणे श्रीनर्मदेच्या स्नानाने, पानाने व तिच्या तीरावर निवास केल्यानें मनुष्यमात्राला परमपदाचा लाभ होतो त्याप्रमाणेच आपल्या या चरित्रकथेच्या वाचनाने, चिन्तनाने, मननाने व निरन्तर गायनाने सर्व भक्ताभक्तांना सायुज्यपदाचा लाभ झाल्याशिवाय राहणार नाही. अशी वास्तविक स्थिती असल्यामुळे श्रीसंत ज्ञानेश्वर-महाराजांनी म्हटल्याप्रमाणे "यालागीं आतां । स्तुति सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें ।।," हे खरे असले तरी आपली स्तुती केल्याशिवाय राहवत नसल्यामुळे व त्याशिवाय मनाचे समाधान होणार नसल्याने आपले परमभक्त व पूर्वाश्रमा-तील धाकटे बंधू श्रीसीताराममहाराज यांनी आपली आरती करून जी स्तुती केली आहे ती करून आपल्या चरणी जीवभाव ओवाळून ठेवीत आहोत. तरी ही स्तुती स्वीकारून आपण आम्हाला आपल्या परमस्वरूपात मिळवून घ्यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना आहे.

– आरती –

जयदेव जयदेव जय पुरुषोत्तममूर्ते, जय आनंदमयमूर्ते ।
वासुदेवानंदसरस्वति गुरुकीर्ते ।। जयदेव जयदेव ।। धृ० ।।
कृष्णावेणीपंचगंगासंगमीं ।
येउनि सुरमुनि वंदिति श्रीदत्तस्वामी ।।
तो करुणासिंधु हृदयिं सांठविला नामी ।।
तद्रूपचि होउनियां विचरतसां स्वामी ।। १ ।। जयदेव जयदेव० ।।
सद्विद्या संपादुनि उपनिषदीं रमला ।
तीर्थें हिंडुनि सर्वां गुरुपदिं रंगविला ।
गुरुचरितादि ग्रंथामृत हें पाजविला ।
यच्छ्रवणें पठणें हरिहर भवविधिजाला ।। २ ।। जयदेव जयदेव० ।।
श्रीमद्दत्तगुरुयशा दशदिशिं गाजविलें ।
जगदीश्वर दत्त गुरु हृदिं ज्यांच्या डोले ।
सुरमुनि गंगा कृष्णा रेवा स्तुति बोले ।
तो हा सद्‌गुरु यत्पदिं मम मानस रमलें ।। ३ ।। जयदेव जयदेव० ।।
प्रथमानंदवत्सरिं देहीसा जहाला ।
अव्यानंदवत्सरिं विदेही हा भरला ।
मध्यें सर्वानंदमयकायचि मज गमला ।
तो आनंदमयचि हा गुरु मद्‌हृदिं गमला ।।४।। जयदेव जयदेव० ।।
अठराशें छत्तिस शकिं जेष्ठीं कुहुतिथिला ।
आनंद संवत्सरिं स्वानंदीं भरला ।
मंगलदिनिं सवितास्ता ऊर्ध्व वसूघटिला ।
ब्रह्मचि होऊनि ब्रह्मीं गुरुपदिं हा बसला ।।५।। जयदेव जयदेव० ।।
सद्‌बुद्धी देउनियां यन्मार्गी लावी ।

द्या तव पदभक्ति जी भवसिंधुस नुरवी ।
अघौघह रक नामस्मरण मनीं वसवी ।
त्वत्पदकमलरसास्पद नृसिंहहृत्करवी ॥ ६ ॥ जयदेव जयदेव० ॥

॥ प्रातःस्मरणयुक्त ध्यान ॥

जयति श्रौतसद्धर्मरक्षको भक्तवत्सलः ।
दत्तात्रेयावतारोऽयं वासुदेवयतीश्वरः ॥ १ ॥
वासुदेवमनुध्यायन् प्राप्तः श्रीवासुदेवताम् ।
सोऽयं श्रीकेशवानन्दयतीन्द्रो दययाऽवतु ॥ २ ॥
आनन्दवनविद्योतिनित्यानन्दपदाम्बुजम् ।
वन्दे चिन्मकरन्दाय मिलिन्द इव सन्ततम् ॥ ३ ॥
अहो निजाभिर्लीलाभिरलालयदसौ जनान् ।
सद्गुरोर्वासुदेवस्य दत्तात्रेयस्वरूपिणः ॥ ४ ॥
केवलं तत्पादलग्नधूलिलोठनलालसः ।
तस्यैव कृपया नित्यानन्दपादाम्बुजं श्रयन् ॥ ५ ॥

॥ श्रीसद्गुरुप्रार्थना ॥

जयगरुडेश्वरवासिन् सद्गुरो । पालय मां प्रभो दीनदयाघन ॥धृ०॥
पतितोद्धारा अखिलउदारा । कुरुभयशमनं यतिराड्भूमन् ॥
जयगरुडेश्वरवासिन्० ॥ १ ॥
त्वमसि पिता त्वं माता त्वमेवहि । ममापराधन् क्षमस्व भूमन् ॥
जयगरुडेश्वरवासिन्० ॥ २ ॥
जयजय भगवन्नचिन्त्यमहिमन् । मामुद्धर भो सद्गतिदायिन् ॥
जयगरुडेश्वरवासिन्०॥ ३ ॥

भजन

वासुदेवगुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।।

-अध्याय सव्विसावा-

★ पद ★

जीवें भावें श्रीदत्ता ध्या । हेंचि वेद वदे संध्या ।।
हे विज्ञाना प्रसवे संध्या । वंध्या लौकिकसंध्या ते ।।१।।
उपनिषत्सारज्ञाते । हो भजा ह्या संध्येतें ।।
इणें लाभेल हो तुम्हांतें । सुख तरती इणें ध्याते ।। धृ० ।।
करूनी मानसिकस्नान । करा मायावरणाचमन ।।
मनें द्वैतें मार्जन करुन । पापपुण्य ब्रह्मीं द्या ते ।।
उपनिषत्सारज्ञाते० ।।२।।
भूरादिलोक सलोक । ओंकारस्वरूपीं देख ।।
प्राणायामीं ठरवितां ऐक । ब्रह्ममय होती ध्याते ।।
उपनिषत्सारज्ञाते० ।।३।।
ममाहंभावाघमर्षण । करुनि कीजे चित्किरण ।।
देहत्रयार्घ्यसमर्पण । करीं साक्षन माळ घ्या ते ।।
उपनिषत्सारज्ञाते० ।।४।।
सेव्यपापभर्जक लोक । सवित्याचें तें रूप एक ।।
ध्या तो धर्मी देव मर्म चोख । प्रेरिल तुमच्या भजा यातें ।।
उपनिषत्सारज्ञाते० ।।५।।

तन्मयचि होऊनी राहणें । हें उपस्थानचि करणें ।।
ऐसी संध्या केली ज्याणें । त्याणें धरिली मोक्षवाट ।।
उपनिषत्सारज्ञाते० ।।६।।

मोहमयी माता मेली । बोधपुत्रोत्पत्ती झाली ।।
तेव्हां थोडी संध्या केली । तोषवो ही दत्तातें ।।
उपनिषत्सारज्ञाते० ।।७।।

माघ व. ११ ते चैत्र शु. ८, शके १८३४-३५ इ.स.१९१२-१३
श्रीक्षेत्र कातरखेडा :–

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा सात महिने मुक्काम झाल्यावर माघ वद्यातील एके दिवशी प्रातःकाळी ते श्रीनर्मदा-नदीच्या किनाऱ्या किनाऱ्याने कातरखेडा येथे जाण्यास निघाले. त्यावेळी त्यांच्या बरोबर श्रीक्षेत्र नरसी येथील श्री. कृष्णा व श्री. बापू ही दोन मुले होती. पहिल्या दिवशी त्यांनी धरमराय येथे मुक्काम केला व दुसऱ्या दिवशी सकाळीच तेथून निघून ते डही संस्थानातील कातरखेडा या गावी येऊन पोहोचले. श्रीस्वामीमहाराज कातर-खेडचाला जाऊन राहिल्यावर मागाहून तेथे श्री. मार्तंड ब्रह्मचारी, श्रीक्षेत्र नरसोबावाडीची काही पुजारी मंडळी व इतरही काही लोक आले.

कातरखेडा हे श्रीनर्मदानदीच्या तीरावरील घनदाट अरण्यातील गाव असून येथे विशेष वस्ती नाही. कातरखेडचाहून डही संस्थान तीन कोस दूर आहे. येथे फक्त भिल्ल, भिलावे व तडवी नाईक या लोकांचीच विरळ वस्ती होती व आहे. श्रीनर्मदा परिक्रमा करणाऱ्या परिक्रमावासियांची राहण्याची व जेवणाची सोय व्हावी

म्हणून इंदूरच्या दरबाराकडून येथे एक जागा बांधून सदावर्त चालू करण्यात आले होते. तेथे या सदावर्ताची व्यवस्था पाहण्यासाठी एक मनुष्यही राहत असे. त्यावेळी दर महिन्यास खर्चासाठी १२॥ रुपये मिळत असत. त्यात हे सदावर्त उत्तम चालत असे.

श्रीस्वामीमहाराजांचा मुक्काम कातरखेडा येथे होणार असल्याचे ज्यावेळी डहीचे रजपूत राजे श्रीमंत गणपतसिंहजी धर्मराय यांना माहीत झाले त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांच्या सेवेचा आपल्याला अपूर्व लाभ होणार या विचाराने त्यांना परमानंद झाला. श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेब हे मोठे धर्मनिष्ठ असून साधुसत्पुरुषांची सेवा करण्यात त्यांना परम समाधान वाटत असे. त्यामुळे श्रीमंत राजेसाहेबांनी श्रीनर्मदानदीच्या वाळवंटात सुमारे सव्वाशे छोटेमोठे मंडप तयार करून ठेवले होते. त्यामुळे येथे आलेल्या सर्व लोकांची स्वतंत्र राहण्याची सोय झाली. त्याचप्रमाणे लोकांना उन्हाळ्याचा व थंडीचा त्रास होऊ नये म्हणून श्रीमंत राजेसाहेबांनी हे सर्व मंडप जांभळीच्या पानांनी शाकारून घेतले होते. त्यामुळे श्रीस्वामी-महाराजांच्या बरोबर येथे राहिलेल्या कोणाही भक्ताला दिवसा उन्हाचा ताप व रात्री थंडीचे कष्ट झाले नाहीत. श्री. गंगाधरपंत वैद्य यांना श्रीस्वामीमहाराजांनी कातरखेडा येथेच अरणांचे भाष्य समजावून सांगितले होते. त्यावेळीं फाल्गुन महिना असूनही दिवसा कडक उन्हाळा व रात्री अतिशय थंडी असा अनुभव त्यांना आला.

कातरखेड्याच्या भोवती त्यावेळी खूपच दाट जंगल असल्यामुळे त्या जंगलात क्रूर श्वापदे राहात असत. ही सर्व श्वापदे रात्रीच्या वेळी मुक्त संचार करीत असत व रात्रीच्या वेळीच कातरखेड्या-जवळील श्रीनर्मदेच्या कांठावर पाणी पिण्यासाठी येत असत. या सर्व श्वापदांपासून येथे राहणाऱ्या सर्व श्रीस्वामीभक्तांचे संरक्षण व्हावे

व त्यांचा मुक्काम सुखावह व्हावा म्हणून येथील जागले लोक या तात्पुरत्या उभ्या केलेल्या वस्तीच्या चारही बाजूला जागे राहून पहारा देत असत. ही सर्व व्यवस्था व स्वयंपाकासाठी लागणारे सामान, सरपण, पानपत्रावळी इत्यादि सर्व सामान पुरविण्याची व्यवस्था श्रीमंत गणपतसिंहजी राजेसाहेबांनी अगदी चोख ठेवली होती. कातरखेड्यासारख्या अरण्याच्या भागात राहावयाचे म्हणजे नुसते द्रव्य असून भागत नाही. त्यासाठी श्रीमंत राजेसाहेबांसारखा सेवाभावी भक्त व अधिकारी असणे अत्यंत आवश्यक असते; कारण तोच द्रव्य खर्च करून सामान आणविण्यास समर्थ असतो. श्रीमंत गणपतसिंहजी राजेसाहेब वारंवार डही येथून कातरखेड्यास येऊन श्रीस्वामीमहाराजांच्या सत्संगाचा आणि प्रसाद भोजनाचा लाभ घेत असत.

कातरखेड्याच्या आसपास भिल्ल व तडवी नाईक या लोकांचीच वस्ती असल्यामुळे व त्यांचाच हा प्रदेश असल्यामुळे हेच लोक श्रीस्वामीमहाराजांची कीर्ती ऐकून अधिक प्रमाणात वारंवार त्यांच्या दर्शनासाठी येत असत. या लोकांची भाषा अत्यंत अवघड असल्यामुळे ती कोणालाही समजत नसे. मात्र डही संस्थानच्या दिवाणसाहेबांच्या बंधूंना या लोकांची भाषा चांगली अवगत असल्यामुळे तेच दुभाषाचे काम करून श्रीस्वामीमहाराजांना या लोकांचे बोलणे समजावून सांगत असत. श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी येणारे भिल्ल लोक हातात धनुष्यबाण घेऊनच येत असत व त्यांना आपल्या निशाणबाजीचे खेळ करून दाखवीत असत एखाद्या झाडावर उंच जागी नारळ बांधून अंगठा न लावता बाण मारून ते त्या नारळाचा अचूक वेध करीत असत. श्रीस्वामी-

महाराज त्यांचे खेळ मोठ्या आवडीने पाहात असत व त्यांच्या या अपूर्व कौशल्याचे खूप कौतुक करीत असत. श्रीस्वामीमहाराजांनी केलेले कौतुक ऐकून या भिल्ल लोकांना अगदी धन्य धन्य वाटत असे. या भिल्लांना मुबलक प्रमाणात भाजलेले चणे व गूळ देऊन ते त्यांची बोळवण करीत असत. अशा प्रकारे लोकांच्या गुणांचे कौतुक करून त्यांना आवडेल ते खावयास घालणे हा श्रीस्वामीमहाराजांचा उपजत स्वभाव होता. त्यामुळे श्रीस्वामीमहाराज आपले मायबाप आहेत अशी सर्व लोकांची भावना होत असे.

श्रीस्वामीमहाराज आपल्यावर आई-वडिलांच्या मायेने प्रेम करीत असल्याची ही भावना भिल्ल मंडळींच्या ठिकाणी रुजून गेल्यामुळे ते सर्वजण श्रीस्वामीमहाराजांच्या रक्षणाची अत्यंत प्रेमाने काळजी घेत असत. त्यांना वाघाचा उपद्रव होऊ नये म्हणून ते त्यांच्या झोपडीपासून थोड्या अंतरावर शेकोटी पेटवून तेथे रात्र भर जागता पहारा देत असत. अशा प्रकारे हिंस्र श्वापदांच्या उपद्रवाची रात्री भीती असल्यामुळे रोज सायंकाळी सायंसंध्या झाल्यावर सर्व मंडळींना पुढे करून श्रीस्वामीमहाराज श्रीनर्मदानदीच्या किनाऱ्या किनाऱ्याने फिरून आपल्या मुक्कामावर परत येत असत. त्यानंतर मग मात्र कोणीही आपले निवासस्थान सोडून जाऊ नये अशी श्रीस्वामीमहाराजांनी सर्वांना आज्ञा केली होती. एके दिवशी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास लोकांच्या वसतिस्थानासमोरील दक्षिण किनाऱ्यावर येऊन एक मोठा वाघ जोरजोराने गर्जना करू लागला. त्या वाघाच्या गर्जनेचा प्रतिध्वनी इतका मोठा होत होता की, त्यामुळे सर्व लोकांची झोप उडून गेली व त्यांना अत्यंत भीती वाटू लागली. एकंदर सर्व परिस्थिती लक्षात घेऊन श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या सिद्ध संकल्पाने त्या वाघाला शांत करताच त्याच्या

भीषण गर्जना थांबल्या व तो काही वेळाने जंगलात निघून गेला. त्यानंतर सर्वांची भीती दूर होऊन प्रत्येकजण आपापल्या उद्योगाला लागला.

ही सर्व कथा वाचली म्हणजे श्रीस्वामीमहाराजांच्या अंतरस्थितीच्या अपार उंचीची व त्यांच्या शिवत्वाची प्रचीती आल्याशिवाय राहात नाही. साध्य-साधक-भावाने साधकभक्तांपुढे एक अपूर्व आदर्श निर्माण करणारे हे एक अलौकिक व्यक्तित्व होते. श्रीसंत तुकाराममहाराजांच्या पुढील अभंगांच्या अंतरंगात परार्थाने प्रवेश केला की, श्रीस्वामीमहाराजांच्या उपरोक्त कथेतील रहस्याचे व आदर्शाचे सार हाती येईल. श्रीसंत तुकाराममहाराज असे म्हणतात की —

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती। व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥
विष तें अमृत आघात तें हित। अकर्तव्य नीत होय त्यासी ॥
दुःख तें देईल सर्व सुख फळ। होतील शीतळ अग्निज्वाळा ॥
आवडेल जीवां जीवाचिये परी। सकळां अंतरीं एकभाव ॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें। जाणिजे तें येणें अनुभवें ॥

* * *

क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं। दुष्ट तयाप्रती काय करी ॥
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि। जाय तो विझोनि आपसया ॥
तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित। धरा अखंडित सुखरूप ॥

* * *

कातरखेडा हा जंगली भाग असला व या गावाजवळ कोणतेही मोठे शहर नसले तरी श्रीस्वामीमहाराजांच्या वास्तव्यामुळे या ठिकाणी राहिलेल्या सर्व भक्तमंडळींना सर्व प्रकारची फळे, मेवा वगैरे सर्व वस्तूंचा प्रसाद अगदी मुबलक प्रमाणात मिळत असे.

त्यामुळे कातरखेडा हे अरण्य आहे असे कोणालाही या काळात केव्हाही भासले नाही.

श्रीस्वामीमहाराज कातरखेडा येथे येऊन राहिल्यानंतर सुरुवातीच्या काळातच वऱ्हाडातून आलेल्या श्री. मालक या नावाच्या गृहस्थांचा स्वाहाकार झाला. हे गृहस्थ श्रीस्वामीमहाराजांना श्रीक्षेत्र चिखलदा येथे प्रथम येऊन भेटले होते. परंतु ज्यावेळी ते भेटले त्यावेळी श्रीस्वामीमहाराज तेथून निघून कातरखेडा येथे येण्यास निघाले होते. त्यामुळे त्यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या जवळ ज्यावेळी स्वाहाकार करण्याची इच्छा व्यक्त केली त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे सांगितले की, "आपण कातरखेडा येथे यावे. तेथे आपल्या इच्छेप्रमाणे स्वाहाकार करण्यात येईल." श्रीस्वामीमहाराजांची ही आज्ञा शिरसावंद्य मानून श्री. मालक स्वाहाकाराकरिता आणलेले द्रव्य बरोबर घेऊन सहकुटुंब कातरखेडा येथे गेले. तेथे गेल्यावर श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने त्यांची इच्छा परिपूर्ण झाली. श्री. मालक यांच्या इच्छेप्रमाणे स्वाहाकार ब्राह्मणभोजनासह परिपूर्ण झाला. या स्वाहाकाराप्रमाणेच श्रीस्वामीमहाराजांचे वऱ्हाडातील एक भक्त श्री. अंबादास हेही यावेळी कातरखेड्यास आले होते. त्यांनी श्रीस्वामीमहाराजांपुढे दोन हजार रुपये ठेवून काहीतरी देव कार्य करण्याची इच्छा व्यक्त केली. श्री. अंबादास यांचा भक्तिभाव, श्रद्धा व निष्ठा पाहून श्रीस्वामीमहाराजांनी त्यांच्या हातून एक स्वाहाकार करून त्यांचा ऐहलौकिक व पर्यायाने पारलौकिक कल्याणाचा मार्ग मोकळा करून दिला.

अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराज सकळ जीवांचा संसार करीत होते. एवढेच नव्हे; तर आपल्या जवळ आलेल्या या सर्व भक्तमनांचे अर्थात् भूतांचे पालन करून ते देवाची पूजा करीत होते

आणि जणू काही आपला देह त्यांनी या सर्व भक्तांना अर्पण केला होता. श्रीस्वामीमहाराजांच्या या दिव्य धारणांचे अर्थात् त्यांच्या रूपाने अवतरलेल्या विश्वात्मक देवाचे दर्शन पुढील अभंगातून होते. श्रीसंत तुकाराममहाराज या दृष्टीने असे म्हणतात की–

देवाची पूजा हें भूतांचें पाळण। मत्सर तो सीण बहुतांचा ॥
रुसावें फुगावें आपुलियावरी। उरला तो हरि सकळही ॥
तुका म्हणे संतपण याचि नांवें। जरी होय जीव सकळांचा ॥

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा। न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥
सत्यवादी करी संसार सकळ। अलिप्त कमळ जळीं जैसें ॥
घडे ज्या उपकार भूतांची ते दया। आत्मस्थिति तया अंगीं वसे ॥
ना बोले गुण दोष नाइके जो कानीं। वर्तोनी तो जनीं जनार्दन ॥
तुका म्हणे वर्म जाणितल्याविण। पावे करितां सीण सांडी मांडी ॥

संसार तिही केला पाठमोरा। नाहीं द्रव्यदारा जया चित्तीं ॥
शुभाशुभ नाहीं हर्षामर्ष अंगीं। जनार्दन जगीं होऊनि ठेला ॥
तुका म्हणे देह दिला एकसरें। जयासी दुसरें नाहीं मग ॥

श्रीक्षेत्र चिखलदा येथील चातुर्मास संपल्यानंतर श्रीस्वामीमहाराजांचा मुक्काम श्रीनर्मदानदीच्या तीरावर कातरखेडा येथे आहे असे समजल्यानंतर दूरदूरचे दर्शनाभिलाशी स्त्री–पुरुष, ब्रह्मचारी, संन्याशी इत्यादि सर्व लोक कातरखेड्यास येत असत. त्या सर्वांची देखभाल करण्यात श्रीस्वामीमहाराजांचा काळ मोठ्या आनंदात चालला होता. पुढे महाशिवरात्र आली; तीही त्यांनी येथेच केली. त्यानन्तर त्यांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना निसरपूर येथे असा

निरोप पाठविला की, " आता येथे सवड आहे. तरी आपण अरणाच्या भाष्याची पोथी घेऊन यावे. श्रीक्षेत्र चिखलदा येथे सांगावयाचे राहिलेले भाष्य पूर्ण करण्यात येईल. " हा निरोप मिळताच श्री. गंगाधरपंत वैद्य अरणाच्या भाष्याची पोथी घेऊन फाल्गुन शुद्ध १०, संवत् १९६९ अर्थात् इ. स. १९१३ ला तेथे आले. दुसऱ्या दिवसापासून श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना भाष्य समजावून सांगण्यास प्रारंभ केला. हे काम चैत्र शुद्ध अष्टमी संवत् १९७० पर्यंत चालू होते. श्री. गंगाधरपंत वैद्य यांना भाष्य सांगण्याचे काम संपल्यावर श्रीस्वामीमहाराजांनीही आपला मुक्काम कातरखेडचाहून हलविला व ते तेथून निघून पुढे श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे गेले.

श्रीस्वामीमहाराजांच्या कातरखेड्याच्या या मुक्कामात मध्यंतरी फाल्गुनी पौर्णिमेला होळीचा सण आला. त्या दिवशी चंद्रग्रहण ग्रस्तास्त असल्याने दुसऱ्या दिवशी कातरखेडा येथे आलेल्या सर्व मंडळींनी दिवसभर उपवास करून सायंकाळी शुद्ध चंद्रमंडळ पाहिल्यावर स्नानसंध्यावंदनादि केले. त्यानंतर भात-पिठले करून सर्वांनी भोजन केले. मात्र त्यावेळी रात्र असल्याने श्रीस्वामीमहाराजांनी नुसता फराळ देखील केला नाही. "

ही सर्व कथा वाचली म्हणजे काटेकोरपणे शास्त्रपालन करणारे श्रीस्वामीमहाराज हे एकमात्र संन्याशी होते याची प्रचीती आल्याशिवाय राहात नाही. " श्रीस्वामीमहाराजांसारखा शास्त्रपूत वागणारा संन्यासी या भूतलावर पुन्हा या कलियुगात होणे ही गोष्ट ख-पुष्पाइतकी अशक्य आहे, " असे जे मोठमोठ्या धर्मशास्त्रज्ञांनी, पंडितांनी व विचारवंतांनी म्हटले आहे ते अक्षरशः सत्य आहे, हे आजकालच्या संन्याशांकडे पाहिले म्हणजे स्पष्टपणे प्रतीत होते. संन्यासाश्रमाचा सर्वोच्चादर्श श्रीमदाद्यशंकराचार्यानंतर त्यांच्या-

शिवाय कोणीही उपस्थित करू शकला नाही हेच खरे आहे.

श्रीक्षेत्र चिखलदा व कातरखेडा येथे श्रीस्वामीमहाराजांचा मुक्काम असताना दररोज अनेक लोक निरनिराळ्या कामना मनात बाळगून त्यांच्या दर्शनाला येत असत. त्यातील काहीजण श्रीस्वामीमहाराजांकडे वस्त्राची याचना करीत तर काहीजण ग्रंथांची व द्रव्याची मागणी करीत असत. श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनार्थ येणाऱ्या लोकांमध्ये रोगनिवारण करण्याची व संततीलाभाची अर्थात् पुत्रप्राप्तीची इच्छा असणारे लोक अधिक प्रमाणात असत. याशिवाय धर्मकार्यसिद्धी, यज्ञकार्यपूर्ती, भूतप्रेतपिशाच्चनिवारण इत्यादि विविध हेतू व वासना मनात ठेवून कितीतरी लोक श्रीस्वामीमहाराजांच्याकडे येत असत. या सर्व लोकांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणे "दुरिताचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥ १८.१७९६ ॥" प्राप्त होत होते यात काहीच शंका नाही.

अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेची प्रचीती सर्वांना त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणे व ज्याचा परमभाव असेल त्याप्रमाणे प्रसाद मिळत असल्यामुळे येत असे. मात्र श्रीस्वामीमहाराजांकडे येणाऱ्या लोकांची स्थूलात्मक दृष्टी व सांसारिक योगप्राप्तीची इच्छा पाहिल्यावर असे वाटते की, रत्नाकराजवळ जाऊन एखाद्याने एखादी कपर्दिक मागावी त्याप्रमाणेच सर्व लोकांच्या या याचना होत्या. त्यामुळेच एके दिवशी श्रीस्वामीमहाराज सर्वांना उद्देशून असे म्हणाले की–

"आपल्याकडे नित्य शेकडोशे लोक दर्शनाच्या निमित्ताने येतात; परंतु या लोकांमध्ये द्रव्य किंवा मुलगा या दोन वस्तूंखेरीज अन्य अध्यात्मवस्तू मागणारा कोणी दृष्टीस पडत नाही. सर्व लोक

द्रव्याची किंवा मुलाची याचना करून सांसारिक गोष्टीच मागतात. वास्तविक पाहता येथे ज्ञानफल प्राप्त होत असताना या लोकांना ते मागून घेता येत नाही हे आश्चर्यच आहे. "न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥" असे श्रीभगवंतांनी म्हटले असले व ते पवित्र ज्ञान आम्ही देण्यास तयार असलो तरी लोकांची दृष्टी मात्र याकडे न जाता संसाराकडेच जाते हे मोठे आश्चर्यच आहे."

श्रीस्वामीमहाराजांचे हे सर्व म्हणणे ऐकले म्हणजे एक प्रकारे त्यांनी आपल्या अपार सामर्थ्याची स्वमुखानेच ग्वाही दिली असल्याचे दिसून येते. असे असले तरी ज्याप्रमाणे श्रीकृष्णनाथांनी अर्जुनाला विश्वरूप दाखविल्यानंतर ते त्याला सहन न झाल्यामुळे व "यालागीं जी देवा। एथिचें भय उपजतसे जीवा। म्हणौनी येतुला लळा पाळावा। जे पुरे हें आतां ॥ ज्ञानेश्वरी ११.५९३॥" या श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितलेल्या न्यायाने त्या अपार विभुरूपात राहण्याचे धैर्य न झाल्यामुळे त्याने स्थूलत्व भावाने किंवा संसारमोहाने त्यांना साकार व चतुर्भुज होण्यास सांगितले. ज्ञान हे असेच अपार व महान् असल्यामुळे लोकांना ते सहन होत नाही. त्यामुळेच लोक सामान्य भोगांची इच्छा करतात. पण "हे योग्य नाही," असे जे श्रीस्वामीमहाराजांनी सांगितले अगदी तसेच अर्जुनाला सांगताना श्रीगोपालकृष्णनाथमहाराज म्हणत असल्याचे सांगताना श्रीज्ञानश्वरमहाराज "श्रीज्ञानेश्वरीत" असे म्हणतात की—

"हे अर्जुना! तुझे हे बोलणे ऐकून मला अत्यंत आश्चर्य वाटते. तुझ्यासारखा असा, साकार चतुर्भुजरूप दर्शनाची मागणी करणारा अर्थात् सांसारिक स्थूल गोष्टींची अपेक्षा करणारा, अविचारी मनुष्य मी पाहिला नाही. अरे! तुला हा विश्वरूप दर्शनाचा अर्थात् दिव्य चक्षूंच्या उन्मीलनाचा केवढा मोठा लाभ झाला आहे.

या लाभाचा संतोष न मानता उलट भीतीने अडाण्यासारखा काय बोलतोस हे काही कळत नाही. आम्ही कोणासही प्रसन्न झालो तरी बाह्यात्कारीच प्रसन्न होतो व त्यास सांसारिक गोष्टीच देतो; परंतु मनापासून प्रसन्न होऊन आपली आत्मानुभूती कोणाला तरी अर्पण केली आहे का ? अरे असे कधी घडले नाही. आम्ही तुझ्याकरिताच मनापासून प्रसन्न होऊन अंतःकरणातील गुह्य कमावून एवढे मोठे विश्वरूप ध्यान तुझ्याकरिता तयार करून तुला अनुभूत केले. माझी प्रसन्नताही तुझ्या प्रेमभक्तीने कशी काय वेडावली हे माझे मलाच न कळल्यामुळे आमच्या या परमगुह्य ज्ञानाची अर्थात् विश्वरूपाच्या अनुभूतीची ध्वजा तुझ्या मनोजगतात उभविली आहे. अरे ! माझे हे ज्ञानस्वरूप अनंत, अविनाशी व अनादि मायेपलीकडील असून त्याच्यापासूनच कृष्णादिक सर्व अवतार होत असतात. हे माझे स्वरूप केवळ ज्ञानतेजाने ओतप्रोत भरलेले, विश्वव्यापक, अनंत व अढळ असून सर्वांच्या आरंभीचे आहे. अर्जुना ! तुझ्यावाचून हे दुसऱ्या कोणीही पूर्वी ऐकलेले व पाहिलेले नाही; कारण हे कोणत्याही कल्पनांतर्गत साधनाने सहजासहजी प्राप्त होणारे नाही."
(ज्ञानेश्वरी ११-६०९ ते ६१६)

हे अर्जुना ! सर्वव्यापक विश्वरूपदर्शनाच्या अर्थात् ज्ञानस्वरूच्या अनुभूतीच्या लाभाने तू आज स्वतःला धन्य मान. याचे भय मानू नकोस आणि या अनुभूतीच्या ज्ञानावाचून (सांसारिक असे) दुसरे काहीही चांगले आहे असे मनात देखील आणू नकोस. अरे ! अमृताने तुडुंब भरलेला समुद्र जर अकस्मात् प्राप्त झाला तर आपण त्यात बुडून मरून जाऊ अशा भीतीने तो कोणी टाकून देईल काय ? किंवा सोन्याचा डोंगर दृष्टीस पडल्यावर तो एवढा मोठा

सोन्याचा डोंगर आपणास नेता येणार नाही म्हणून त्याचा कोणी अव्हेर करून जाईल का ? दैवयोगाने चिंतामणी रत्न सापडल्यावर ते अंगावर धारण करावयाचे सोडून त्याचे ओझे होते म्हणून कोणी टाकून देईल का ? किंवा कामधेनू आपल्याला पोसवत नाही म्हणून कोणी हाकून देईल का ? शीत उत्पन्न करणारा चंद्र घरी आला असता तुझ्यापासून उष्मा होतो म्हणून कोणी त्याला "बाहेर जा", असे म्हणेल काय ? तू सावली पाडतोस म्हणून "बाजूला जा", असे सूर्याला कोणी म्हणेल काय ? त्याचप्रमाणे या तेजस्वी विश्वरूप दर्शनाचे ऐश्वर्य अनुभवाच्या रूपाने आज तुझ्या हातात सहज आले असताना तुझ्या मनात गडबड व गोंधळ का उत्पन्न व्हावा ? पण अर्जुना ! तू अगदी गांवढळ असून तुला काही समजत नाही. यामुळे तुझ्यावर रागवून तरी काय उपयोग ? खरोखर तू अंग सोडून पडछायेला आलिंगन देतो आहेस. तू आपले मन अधीर करून सांसारिक चतुर्भुज रूपावर प्रीती करतो आहेस; पण हे बरे नाही, कारण ते माझे खरे स्वरूप नाही."

(ज्ञानेश्वरी ११.६२३ ते ६३०)

श्रीस्वामीमहाराजांचा कातरखेडा येथील मुक्कामाचा शेवट ज्यावेळी जवळ येत चालला त्यावेळी एक दिवस ते आपल्या जवळील श्री. कृष्णा नरसीकर यास असे म्हणाले की, "अरे कृष्णा ! कोणी काही कोणी काही असे काहीना काही मागण्यासाठी लोक आपल्याकडे सतत येतच असतात. मात्र हा गंगाधर (वैद्य) काही आपल्याकडे कसलीही मागणी करींत नाही. याला आमच्या सोवळ्याच्या छाटीतून एक हातभर वस्त्र प्रसाद म्हणून काढून देव त्याला असे सांग की, हे वस्त्र कोणाला देऊ नकोस. ते पोथीला गुंडाळून ठेव."

श्री. कृष्णा नरसीकर याने तत्काळ श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेचे पालन केले व त्यांच्या सोवळ्याच्या छाटीचा प्रसाद श्री. गंगाधरपंत वैद्य यांना दिला. या प्रसादप्राप्तीने श्री. गंगाधरपंतांना अपरमित आनंद झाला. कातरखेडा येथे मिळालेल्या या छाटीच्या प्रसादाचे व श्रीक्षेत्र पवनी येथे मिळालेल्या नारळाच्या प्रसादाचे श्री. गंगाधरपंपत वैद्य यांच्या लेखी जे अपार माहात्म्य होते ते त्यांनी लिहून ठेवलेल्या शब्दातच पाहणे योग्य ठरेल. यासंबंधी ते असे म्हणतात की, "हा मिळालेला (छाटीचा) प्रसाद ह्याचे (स्वतःच्या) जवळ असोन पवनी येथे दर्शनाला गेल्यावेळी नारळाचा प्रसाद ह्याला मिळाला. तो विशेष महत्त्वाचा असल्याने जपून ठेविला आहे. (श्रीस्वामीमहाराजांच्या) दर्शनाला (जे) लोक येतात ते बहुतेक करून नारळ श्रीस्वामीमहाराजांपुढे ठेवीत असत. श्रीस्वामी-महाराजांनी तोच त्याचा नारळ त्याला प्रसाद द्यावा. हा पवनी येथे मिळालेला प्रसादाचा नारळ असे प्रकारचा नाही. आज्ञा घेऊन पवनीहून निघण्याचे वेळी श्रीस्वामीमहाराजांनी श्रीसीताराम-महाराजांना बोलावून कोठारातून नारळ मागविला. तो प्रसाद-रूपाने दिल्यामुळे तो नारळ विशेष महत्त्वाचा प्रसाद आहे हे सांगणे न लागे."

कातरखेडा येथे श्रीस्वामीमहाराजांसाठी झोपडी बांधलेली होती. तेथे त्यांच्या बरोबर श्री. कृष्णा व श्री. बापू ही श्रीक्षेत्र नरसीची दोन मुले, श्रीक्षेत्र नरसोबावाडीचे श्री. केशवभटजी विभुते व तेथीलच काही स्त्रिया, इंदूरचे श्री. टिल्लू शास्त्री इत्यादि मंडळी राहात होती. श्रीस्वामीमहाराज यातील स्त्रिया सोडून सर्वजणांना वेदान्त निरूपण सांगत असत. कातरखेडा येथे राहणाऱ्या लोकांची पाणी पिण्याची सोय व्हावी म्हणून श्रीनर्मदानदीवरून पाणी आणण्या-

साठी श्री. गणपतसिंह राजेसाहेब यांनी बैलासकट एक माकण दिली होती. या माकणीतून पाणी आणून रोज सर्वांना पाणीपुरवठा केला जात असे. एके दिवशी पाणी वाहणारा बैल काही विकार होऊन अकस्मात् गतप्राण झाला. बैल मेल्याचे श्रीस्वामीमहाराजांना कळताच त्यामुळे भक्तमंडळीचे पाणी पिण्याचे हाल होतील हे जाणून त्यांनी आपल्या कमंडलूतील तीर्थ मृत बैलावर शिपडताच तो जिवंत झाला. श्रीस्वामीमहाराजांची ही अद्भुत लीला किंवा चमत्कार पाहिला म्हणजे हे लक्षात येते की, असे चमत्कार करण्यामागे त्यांची काहीतरी अपूर्व धारणा आहे. श्रीसंत तुकाराममहाराजांनी " जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥ " असे म्हणून महापुरुषांचा चमत्कार करण्यामागची धारणा स्पष्ट केली आहे. श्रीएकनाथमहाराज, श्रीतुकाराममहाराज, श्रीनिळोबा-महाराज व श्रीमध्वमुनीश्वर यांचे यासंबंधीचे अभंगादि पाहिले म्हणजे हे स्पष्ट होते.

कैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा ।
चैतन्याचा जिव्हाळा ज्ञानी माझा ॥ १ ॥
ज्ञानियांचा शिरोमणी वंद्य जो कां पूज्यस्थानीं ।
सकाळांसी शिरोमणी ज्ञानोबा माझा ॥ २ ॥
चालविली जड भिंती हरली चांगयाची भ्रांती ।
मोक्षमार्गीचा सांगाती ज्ञानोबा माझा ॥ ३ ॥
रेड्यामुखीं वेद बोलविला गर्व द्विजांचा हरविला ।
शांतिबिंब प्रगटला ज्ञानोबा माझा ॥ ४ ॥
गुरुसेवेलागीं जाण शरण एकाजनार्दन ।
चैतन्याचें जीवन ज्ञानोबा माझा ॥ ५ ॥

* * *

जयाचियें द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥१॥
करील तें काय नव्हे महाराज । परी पाहे बीज शुद्ध अंगीं ॥२॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥३॥
तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥४॥

★ ★ ★

बोलविला बोले वेद । म्हैसा सुबुद्ध स्वरान्वयें ॥ १ ॥
काय एक न करा देवा । भिंती चालवा निचेष्टिता ॥ २ ॥
शिष्यांलागी देतां बोध । न लगे पदार्थ निमिषही ॥ ३ ॥
निळा म्हणे ज्ञानेश्वरा । मजही अंगिकारा दीना ॥ ४ ॥

★ ★ ★

शुकसनकादिक महिमा ज्याचा वर्णिति वेदपुराणीं रे ।
गोकुळिं गोंवळ होऊनि गाई चारी चक्रपाणी रे ॥
जो हा पांडवघरिं हरि-सारथी पाजी तुरगा पाणी रे ।
तो हा सद्‌गुरु ज्ञानेश्वरहरि स्मरणें तारी प्राणी रे ॥ १ ॥
ज्यानें केली भगवद्‌गीतेवरती सुंदर टीका रे ।
सादर परिसति होती त्यांची संसारांतुनि सुटका रे ।
प्राकृत भाषा रुचिकर रचिली करूनि सुधारस फिका रे ।
भक्तिज्ञानविरक्तीचाही पोषीती रस निका रे ॥ २ ॥
दगडाची ही भिंति जयानें चालविली जड माती रे ।
पैठणिं दिधली वेदपरीक्षा वेडचा रेडचा हातीं रे ॥
सुवर्णाचा पिंपळ ज्याच्या द्वारीं वैष्णव पाहती रे ।
अजानवृक्षाखालें शांभव आसन घालुनि राहती रे ॥ ३ ॥

★ ★ ★

कातरखेडा येथे विंचवांची वस्ती आधीच खूप होती. त्यातच तेथे श्रीस्वामीमहाराजांच्या वास्तव्यामुळे आलेल्या भक्तांची वस्ती

झाल्यावर त्यांचा फारच सुळसुळाट झाला. परंतु श्रीस्वामीमहाराजांनी कोणालाही विंचू मारा किंवा विंचू मारू नका अशा दोन आज्ञांपैकी एकही आज्ञा केली नव्हती. श्रीस्वामीमहाराजांच्या भजनाच्या नियमाप्रमाणे ज्यावेळी दररोज रात्री कातरखेड्याला सर्व लोक एकत्र येऊन भजन करीत असत त्यावेळी नित्य शेकडोशे विंचू दिव्याजवळ येत असत. हे सर्व विंचू एका पात्रात घालून दूर नेऊन सोडून देण्यात येत असत. "अहिंसा परमो धर्मः।" हाच श्रीस्वामीमहाराजांचा एकमात्र नियम होता. अशा स्थितीत एके दिवशी रात्री श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या एका बाईंना दोन ठिकाणी विंचू चावला. त्याबरोबर त्या बाई जागृत होऊन मोठमोठ्याने रडू लागल्या. त्यांचे रडणे ऐकून श्रीस्वामीमहाराज व जवळची सर्व मंडळी उठून त्या बाईंच्या जवळ आली.

त्या बाईंच्या वेदना दूर होऊन विंचवाचे विष उतरावे म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी एका गृहस्थांना कडूलिंबाची पाने असलेली फांदी तोडून आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या गृहस्थांनी तत्काळ कडुलिंबाच्या झाडाच्या पानाने भरलेली एक फांदी तोडून आणली. श्रीस्वामीमहाराजांनी त्या फांदीने वारा घालून त्या बाईंच्या अंगात भिनलेले विंचवाचे विष उतरविण्यास सुरवात केली. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराज तासभर त्या बाईंना वारा घालीत बसले; पण विंचवाचे विष फार जालीम असल्यामुळे ते काही उतरले नाही आणि त्या बाईंचे रडणेही बंद झाले नाही.

श्रीस्वामीमहाराज कष्ट करून कडुलिंबाच्या फांदीने सतत त्या बाईंना वारा घालण्याचे कार्य एक तासापेक्षाही अधिक काळ करीत राहिल्याचे पाहून त्यावेळी त्यांच्या जवळ उभ्या असलेल्या श्री. गंगाधरपंत वैद्य यांना हे सहन न झाल्यामुळे ते अत्यंत नम्रपणे

श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "प्रभो ! आपली आज्ञा असल्यास मला माहीत असलेल्या एका वनस्पतीचा उपयोग केल्यास या बाईंचे विष उतरून यांना बरे वाटेल." श्री. गंगाधरपंत वैद्य यांचे हे म्हणणे ऐकताच त्यांना श्रीस्वामीमहाराज तत्काळ असे म्हणाले की, "आपणास अशी वनस्पती माहीत असल्यास तिचा जरूर उपयोग करा." त्याबरोबर श्री. गंगाधरपंत यांनी जवळच त्यांना निजण्यास जी खाट मिळाली होती, त्या खाटेखाली नागर-मोथा नावाची जी वनस्पती होती, ती काढून घेऊन तिचा उपयोग केला. अशा रीतीने त्या वनस्पतीचा वापर केल्यानंतर केवळ दोन मिनिटातच त्या बाईंचे रडणे बंद पडले. त्या बाईंना चावलेला विंचू अत्यंत विषारी असल्यामुळे पुढे त्यांना दोन दिवस कष्ट झाले; परंतु ते सहन करण्याजोगे होते.

अशा प्रकारे त्या बाईंना बरे वाटल्याचे पाहून सर्वांनाच हायसे वाटले. त्यावेळी श्रीगंगाधरपंत श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "प्रभो ! या बाईंचे विष उतरले हे केवळ आपल्या कृपेचेच फळ आहे. आपण कृपा केल्यामुळेच मला हे औषध सुचले. वास्तविक पाहता नागरमोथ्यामुळे सापाचे विष उतरते; परंतु या विंचवाचे विष फार तीव्र असल्यामुळे तीच वनस्पती आता वापरली. प्रभो ! आपणास हे सर्व विदितच आहे; परंतु आपण केवळ माझ्यातर्फे हे औषध देऊन जी लीला केली त्यामुळे मी अगदी आश्चर्यचकित झालो आहे. माझा अहंकार वाढू नये एवढीच आपण माझ्यावर कृपा करावी अशी आपल्या चरणी माझी प्रार्थना आहे."

श्री. गंगाधरपंत यांचे हे बोलणे ऐकून श्रीस्वामीमहाराज किंचित् हसले व गप्प बसले. पुढे कोणीही श्रीस्वामीमहाराजांना

विंचवाचे औषध विचारले तर ते त्याला नागरमोथा या वनस्पतीचा उपयोग करण्यास सांगत असत. नागरमोथा पोटात दिल्याने व विंचू किंवा सर्प चावून दंश झालेल्या माणसाच्या प्रत्येक कानात वीस वेळा फुंक घालण्यामुळ विषाची बाधा कमी होत असते. श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या बाईंची विंचवाची बाधा कमी व्हावी म्हणून याच वनस्पतीचा श्रीस्वामीमहाराजांनी दोन्ही प्रकारांनी उपयोग केला होता.

डहीचे श्रीराजेसाहेब श्री. गणपतसिंह ठाकूर हे श्रीस्वामीमहाराजांचे परमभक्त होते. त्यांनीच सर्व व्यवस्था करून कातरखेडा येथील श्रीस्वामीमहाराजांच्या भक्तमंडळींचा मुक्काम सुखावह केला होता. श्रीराजेसाहेबांची भक्ती अत्यधिक वृद्धिगत झाल्यामुळे श्रीस्वामीमहाराजांचे चरण आपल्या राजधानीला व राजवाड्याला लागावे म्हणून एक दिवस त्यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी साष्टांग दंडवत् प्रणाम घालून अशी प्रार्थना केली की, " हे प्रभो ! आपण कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् आहात. तरी या भक्ताची एक इच्छा पूर्ण करावी. आपण एकदा आमच्या राजधानीत येऊन आमच्या सर्व प्रजाजनांना आपले दर्शन द्यावे आणि आमच्या घरातील सर्व लोकांना आपला कृपाशीर्वादप्रसाद देऊन कृतार्थ करावे. आपण माझी ही प्रार्थना मान्य करावी. नाही म्हणू नये. "

श्रीराजेसाहेबांची भक्ती पाहून श्रीस्वामीमहाराजांना परम संतोष झाला त्यांनी त्यांची प्रार्थना ऐकली. आपली प्रार्थना मान्य झाल्याचे पाहून श्रीराजेसाहेबांनाही परम समाधान वाटले. एका शुभदिनी श्रीराजेसाहेब श्रृंगारलेला हत्ती व सैन्य घेऊन कातरखेड्याला आले. त्यानंतर निघण्याच्या वेळी श्रीराजेसाहेबांनी श्रीस्वामीमहाराजांना हत्तीवर बसण्याची प्रार्थना केली; परंतु

श्रीस्वामीमहाराजांनी श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या श्री. केशवभटजी विभुते पुजाऱ्यांना हत्तीवर वसवून आपण श्रीराजेसाहेबांच्या बरोबर चालत राजवाड्यावर गेले. श्रीक्षेत्र नरसोबावाडीचे पुजारी म्हणजे साक्षात् श्रीदत्तच आहेत अशी श्रीस्वामीमहाराजांची धारणा होती. त्यामुळेच त्यांनी श्री. केशवभटजी विभुते पुजारी यांना हत्तीवर वसविले होते.

श्रीस्वामीमहाराजांचा डही संस्थानच्या राजवाड्यातील प्रवेश अत्यंत वाजत–गाजत झाला. राजवाड्यात प्रवेश करताना सुवासिनी स्त्रियांनी त्यांना ओवाळले व त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. त्यानंतर श्रीराजेसाहेबांनी श्रीस्वामीमहाराजांना आपल्या सिंहासनावर वसवून त्यांचे चरण प्रक्षालन करून व त्यांना सुवासिक अत्तरे लावून त्यांची गंधपुष्पधूपदीपादिकांनी पूजा केली व सर्व परिवारासह श्रीस्वामीमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवून "दासावर कृपा असावी," अशी प्रार्थना केली. श्रीस्वामीमहाराजांच्या चरणावर मस्तक ठेवताच श्रीराजेसाहेबांचे डोळे प्रेमाश्रूंनी भरून आले व त्यांच्या शरीराला कंप सुटला. अत्यधिक भक्त्युद्रेकामुळे त्यांचा कंठ अगदी सद्‌गदित झाला. त्यांचा हा भक्तिभाव पाहून श्रीस्वामी-महाराज अत्यंत प्रसन्न झाले व त्यांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला वं त्यांचे सर्वाभीष्ट चिंतून त्यांना प्रसाद दिला.

त्यानंतर श्रीस्वामीमहाराजांच्या आदेशाने श्रीराजेसाहेबांनी श्री. केशवभटजी पुजाऱ्यांना पुष्कळ द्रव्य, उंची वस्त्रे व हातात घालावयाला बहुमोल सुवर्णाची मुद्रा दिली. श्रीक्षेत्र नरसोबा-वाडीच्या पुजाऱ्यांची पूजा म्हणजे श्रीदत्तात्रेयांचीच पूजा व त्यांचा

सत्कार म्हणजे श्रीदत्तमहाराजांचाच सत्कार होय, या दृढ धारणे-तूनच श्रीस्वामीमहाराजांनी ही संभावना करविली होती.

अशा रीतीने श्रीराजेसाहेबांचे व इतर सर्वांचे समाधान करून श्रीस्वामीमहाराज आले तसेच लव्याजम्यासह वाजत गाजत कातर-खेडचाला आपल्या पर्णकुटीवर परत गेले.

ही सर्व कथा वाचली म्हणजे बिदरच्या राजाने श्रीमन्नृसिंह-सरस्वतीस्वामीमहाराजांना आपल्या राज्यात कसे नेले याचे जे वर्णन श्रीसरस्वती गंगाधर यांनी श्रीगुरुचरित्रात केले आहे, त्याचे स्मरण झाल्याशिवाय राहात नाही. श्रीदत्तात्रेयांनी श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांच्या रूपाने "योगिराज" या नावाने चतुर्थ अवतार धारण केला असल्यामुळे तृतीय अवतारातील कथेचीच यथे पुनरा-वृत्ती झाल्याचे दिसून येते. तृतीय श्रीदत्तावतार श्रीमन्नृसिंहसरस्वती-स्वामीमहाराज हे एका यवनराजाच्या घरी गेले होते तर चतुर्थ श्रीदत्तावतार योगिराज श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासु-देवानन्दसरस्वतीस्वामीमहाराज हे एका रजपूत राजाच्या घरी गेले होते एवढाच फरक येथे आहे. श्रीमन्नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांच्या राजैश्वर्य अवलोकनाचे वर्णन श्रीस्वामीमहाराजांना किती तंतोतंत लागू पडते हे श्रीगुरुचरित्रातील पुढील वर्णन वाचले की लक्षात येईल. श्रीसरस्वती गंगाधर असे म्हणतात की—

राजा म्हणे स्वामियासीं । तुझें प्रसन्नत्वें आम्हांसी ।
राज्य पावलों संतोषीं । अष्टैश्वर्य भोगिलीं ॥ ५०.१८९ ॥
पुत्रपौत्र देखिलें नयनीं । पूर्ण निवालों अंतःकरणीं ।
संकल्प असे माझें मनीं । अष्टैश्वर्य माझें अवलोकावें ॥१९०॥
भक्तवत्सल ब्रीद तुझें । वासना पुरवावी जी माझे ।
इंद्रियसंसार उतरीं ओझें । लीन होईन तुझे चरणीं ॥१९१॥

श्रीगुरु म्हणती तयासी । आम्हीं तापसी संन्यासी ।
येऊं नये तुझे नगरासी । महापातकें होती तेथें ॥१९२॥

★ ★ ★

विस्मय करी अति मानसीं । घेऊनि लागला चरणासी ।
विनवितसे भक्तीसीं । गृहाप्रती यावें म्हणतसे ॥५०.२२८॥
नगर सर्व श्रृंगारले । प्रवाळ मोतियां तोरण केले ।
गुढिया मखरें उभारलें । समारंभ थोर नगरांत ॥२२९॥
बैसवोनियां पालखींत । आपण चरणचालीं येत ।
नवरत्नें असे ओंवाळीत । नगरलोक आरत्या आणिती ॥२३०॥
ऐशा समारंभें राजा देखा । घेऊनि गेला गुरुनायका ।
विस्मय झाला सकळ लोकां । महदाश्चर्य म्हणताती ॥२३१॥
सवें वाजंत्र्यांचे गजर । बंदिजन वाखाणती अपार ।
राजा हर्षें निर्भर । घेऊन जातो श्रीगुरूसी ॥२३९॥
नानापरीचीं दिव्य वस्त्रें । वांटीतसे राजा पवित्रें ।
दिवें ओंवाळिती स्वर्णपात्रें । भिक्षुक तुष्टले बहुत देखा ॥२४०॥
ऐशा समारंभें देखा । घेऊनि गेला राजा ऐका ।
महाद्वारी पातले सुखा । पायघड्या अंथरती ॥२४१॥
नानापरींची दिव्यांबरें । मार्गीं अंथरती अपारें ।
वाजती भेरी वाजंत्रें । राजगृहा पातले ॥२४२॥
महासिंहासनस्थानीं । श्रृंगार केला अतिगहनीं ।
जगद्गुरूतें नेऊनी । सिंहासनीं बैसविलें ॥२४३॥
राजमंदिराच्या नारी । आरत्या घेऊनियां करीं ।
ओंवाळिती हर्षनिर्भरीं । अनन्यभावें करोनियां ॥२४४॥

★ ★ ★

श्रीस्वामीमहाराजांचा कातरखेड्याला मुक्काम असतानाच डहीचे माजी खजिनदार श्री. सुखानंदी यांना त्यांनी काही औषधांची माहिती लिहून दिली होती. त्या सर्व औषधांची माहिती असावी म्हणून श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी त्या वहीची एक प्रत स्वतः तयार करून घेतली होती. याच मुक्कामात श्रीस्वामीमहाराजांनी आत्मचिंतन मराठीत लिहिले. साधक भक्तांनी हे आत्मचिंतन सतत करीत राहून अनर्थकारक जन्ममरणपरंपरा चुकवावी व ब्रह्मरूप व्हावे अशीच श्रीस्वामीमहाराजांची इच्छा असल्यामुळे सर्वांच्या सोयीसाठी ते पुढे देत आहोत.

॥ आत्मचिन्तन ॥

हा स्थूल देह अन्नमय कोश आहे; कारण अन्नापासून झालेले मातेचे रक्त व पित्याचे रेत यापासून विटाळात उपजला आणि मळमूत्रादि विटाळाने भरला. याला नाना विकार आहेत म्हणून हा आत्मा नव्हे. यामुळेच अविचाराने मीपणा व ममता होते. ती सर्व खोटी. त्याप्रमाणेच देह रोडला म्हणजे मी रोडलो इत्यादिक व्यवहारही खोटा. पायास काटा लागला, थंड, ऊन कळते ते देहचैतन्य नव्हे. देहाला ज्ञान असते; तर मेलेला देह हायहुय करीत असता. तर तो जळाला असताही, हालचाल करीत नाही. जिवंतपणी कळते ते या देहाच्या आत असणारा लिंगदेह जो, त्यातील अहंकार आहे. त्याचे व जीवात्म्याचे तादात्म्य म्हणजे एकरूप झालेल्या अहंकाराने देहाला व्यापिले म्हणजे देह जड असताही चेतनासारखा भासतो. त्यामुळे देहाला समजल्यासारखा भ्रम होतो. जसे नौकेत बसून आपण जात असता तीरावरची झाडे जातात असा भ्रम होतो ते सर्व खोटे, त्याप्रमाणे देहेंद्रिये, प्राण, मन, बुद्धी, चित्त, अहंकार हे

चेतनसे वाटतात. तो सर्व भ्रम खोटा, असा निश्चय झाला म्हणजे मी अमक्याचा व हे माझे इत्यादिक हे सर्व खोटे ठरते व मी सर्वांचा साक्षी व सर्वांहून वेगळा आहे असा निश्चय होतो. मग हा पिंडस्थूल-देह व येथे होणारी जाग्रत् अवस्था व याचा अभिमानी विश्वसंज्ञक आणि ब्रह्मांडदेह विराट् व याचा अभिमानी वैश्वानर हे सर्व नश्वर आणि मी साक्षीभूत आत्मा अविनाशी असा निर्धार करावा.

ज्याप्रमाणे या तमोगुणाच्या द्रव्य शक्तीपासून स्थूलप्रपंच झाला त्याप्रमाणे क्रियाशक्ती रजोगुणापासून पाच प्राण व पाच कर्मेंद्रिये आणि ज्ञानशक्ती, सत्त्वगुणापासून पाच ज्ञानेंद्रियें, मन, बुद्धी, चित्त व अहंकार झाले. यापासून सूक्ष्मभूत रचित स्थूलदेहाचे आत असणारा सूक्ष्मदेह म्हणजे लिंगदेह आहे. येथे स्वप्नावस्था आहे. याचा अभि-मानी तैजस आहे. यामध्ये तीन कोश आहेत. ते हे की–पाच प्राण व पाच कर्मेंद्रिये मिळून प्राणमय कोश होतो. भूक, तहान, बळ, देणे, घेणे, चालणे, बोलणे, रती व मलमूत्रोत्सर्ग हे सर्व धर्म प्राणाचेच आहेत. क्षुधापिपासादि धर्म आत्म्याचे मुळीच नव्हेत. तसेच पाच ज्ञानेंद्रिये व मन मिळून मनोमय कोश होतो. संकल्प, विकल्प, काम, संशय, विपर्यय, दुःख व शोकादिक हे सर्व मनोमय कोशाचेच धर्म आहेत. या धर्मांचा आत्म्याला मुळीच स्पर्शसुद्धा होत नाही. तसेच पाच ज्ञानेंद्रिये व बुद्धी मिळून विज्ञानमयकोश होतो. यामुळेच कर्तृत्व व ऊहापोहादिक घडते. हे धर्म विज्ञानमय कोशाचेच आहेत, आत्म्याचे नव्हेत. स्थूलदेह अधिष्ठान, अहंकार कर्ता, ज्ञानेंद्रिये पाच व कर्मेंद्रिये पाच व अंतःकरण ही कर्मसाधनभूत करणे. (म्हणजे साधने होत.) पाच प्राणांच्या चेष्टा आणि नेत्रादि इंद्रियादिकांच्या सूर्यादि देवता या पाचांच्या योगाने. कायिक, वाचिक व मानसिक अशी तीन प्रकारची कर्मे होतात. ती पापपुण्यरूपी कर्मे ही मी केली, असे

आपण अकर्ता असताही जीवात्मा आपल्यावर कर्तृत्व घेऊन बद्ध होतो आणि जन्ममरणाच्या फेऱ्यात पडून सुखदुःख भोगतो. या लिंगदेहाभिमानी जीवाचे नाम तैजस. लिंगदेहाचा वियोग होणे हेच मरण जाणावे. लिंगदेहतादात्म्याने, जीव स्वर्गवास, नरकवास, गर्भवास व बाल्यादि अवस्थांनी होणारे दुःख भोगतो.

स्थूल आणि सूक्ष्म हे दोनही देह कार्यभूत आहेत. याचे कारण, अनिर्वचनीय अविद्या म्हणजे अज्ञान आहे. हाच कारण देह होय. येथे निद्रावस्था असून याचा अभिमानी प्राज्ञ नावाने जीव जाणावा. या तीन देहांहून वेगळा जो त्याला प्रत्यगात्मा, साक्षी, कूटस्थ, असंग, पुरुष, त्वंपदलक्ष्य असे म्हणतात.

मुमुक्षूने एकांती बसून, एकाग्र मन करून असे चिंतन करावे की– स्थूल, सूक्ष्म, कारण हे तीन देह व येथे होणाऱ्या जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती यांचे कारण सत्त्व, रज, तमोगुण असून विश्व, तैजस व प्राज्ञ हे तीन देहांचे अभिमानी आहेत. या सर्वांचा द्रष्टा, साक्षी, कूटस्थ, निर्विकार प्रत्यगात्मा मी एकच आहे. हे सर्व गुणविकार मला लागत नाहीत. म्हणून मी असंग, अज्ञ, अजित, अविकारी, अजर, अमर, अनादि, अनंत, परिपूर्ण परब्रह्मरूपी, अकर्ता, अभोक्ता, नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त व सत्यस्वभावाचा असून अत्यंत निर्मल आहे. मी निरामय आहे. मी अक्रिय आहे. मी सदैव मुक्त आहे. मी इंद्रियांच्या व मनाच्या गतीपलीकडचा आहे. माझा अतपार नाही. मला भूतभौतिक संबंध नाही. असा मी एकच अद्वितीय आहे. याप्रमाणे अशा शब्दाने निरन्तर निश्चय करणे ही शब्दानुविद्ध सविकल्प समाधी जाणावी. अंतःकरणात ज्या ज्या कामक्रोधादि वृत्ती उठतात त्या त्या वृत्तींचा द्रष्टा, साक्षी मीच आहे. ज्याप्रमाणे पाण्यावर वाऱ्याने तरंग जिकडून उठतो तिकडे पाणी व जिकडे जातो तिकडे पाणीच असून तरंगात

त्र त्याच्या दोन्ही बाजूस पाणीच असते व वारा शांत झाल्यावर केवळ एक पाणीच असते त्याप्रमाणे मायामयवासनेने ज्या ज्या वृत्ती उठतात त्यांच्या आत, बाहेर, साक्षिभूत आत्माच आहे व वृत्ती शांत झाल्यावर केवळ एकच प्रत्यगात्मा असतो तोच मी. जाग्रत्स्वप्नांमध्ये जे द्वैत असते ते ज्यावेळी या साक्षीपणाच्या अभ्यासाने नष्ट होते व निद्राही येत नाही त्यावेळी जे सुख भासते तोच आत्मानंद होय. त्याचा निरंतर अभ्यास ठेवावा; म्हणजे क्रमाने निर्विकल्पसमाधी सिद्ध होईल. समाधीतून उठल्यावरसुद्धा बाहेर जे जे मायिक, नामरूपात्मक व भूतभौतिक जड जग दिसते त्याचे नामरूप टाकून सच्चिदानंदरूप तत्पदलक्ष्य ब्रह्म आहे तेच मी व मी प्रत्यगभिन्न परमात्मा आहे, असे निरंतर चिंतन करावे म्हणजे जन्ममरणादि अनर्थ निवारण करणारा प्रबोध होतो.

॥ इति आत्मचिंतन समाप्त ॥

श्रीस्वामीमहाराजांचा कातरखेडा येथील मुक्काम आता संपत आला होता. अशातच श्रीरामनवमी जवळ आली. श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेब हे दर वर्षी श्रीरामनवमीचा उत्सव डही येथे मोठ्या थाटामाटाने साजरा करीत असत. त्या दिवशी श्रीराममंदिरात श्रीरामजन्माचे कीर्तन होत असे. त्या वर्षी श्रीराजेसाहेबांनी मोठ्या भक्तिभावाने श्रीस्वामीमहाराजांना श्रीरामजन्माचे कीर्तन ऐकण्यास आमंत्रण केले. श्रीस्वामीमहाराजांनीही श्रीरामनवमीचा उत्सव करून तसेच पुढे श्रीक्षेत्र गरुडेश्वराला जावे असा विचार करून श्रीराजेसाहेबांनी दिलेल्या आमंत्रणाचा स्वीकार केला व त्यांनी चैत्र शुद्ध ८ ला तिसऱ्या प्रहरी कातरखेडा सोडले. सर्वसाधारणपणे रात्री आठ वाजता ते आपल्या बरोबरच्यां सर्व मंडळींसह डहीला आले.

श्रीमंत राजेसाहेबांनी श्रीस्वामीमहाराजांच्या उतरण्याची स्वतंत्र व्यवस्था आपल्या बगिच्यात केली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या बरोबरीच्या लोकांची त्याच बगिच्यात वेगळी व्यवस्था केली होती. श्रीस्वामीमहाराज ज्या जागी उतरले होते ती बगिच्यातील जागा आजपर्यंत सांभाळून ठेवण्यात आली आहे. या जागेत दर गुरुवारी भजन होऊन प्रसाद वाटला जात असे. जोपर्यंत श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेब होते तोपर्यंत ते स्वत: आपल्या सर्व मंडळींसह या जागेत भजन करण्यासाठी येत राहिल्यामुळे पुढेहीळ काहीका हे गुरुवारचे भजन अविच्छिन्नपणे चालत राहिले.

ज्या दिवशी श्रीस्वामीमहाराज येथे आले त्या दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध अष्टमीला रात्री बगिच्यात भजनाचा उत्तम कार्यक्रम झाला. दुसऱ्या दिवशी चैत्र शुद्ध नवमीला श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेबांनी श्रीस्वामीमहाराजांना श्रीराममंदिरात नेले व त्यांना उच्चासनावर बसवून साक्षात् प्रभू श्रीरामचंद्रच आपल्या येथे आले आहेत या भावाने त्यांची पूजा केली. त्यानंतर श्री. रामभाऊ बापट यांचे श्रीरामजन्माचे कीर्तन झाले. ते कीर्तन ऐकून श्रीस्वामीमहाराज अत्यंत संतुष्ट झाले. श्रीस्वामीमहाराजांनी सर्वांना आपल्या हाताने प्रसाद दिला. तेथे जमलेल्या सर्वच मंडळींना श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाने कमालीचा आनंद झाला. त्या दिवशी रात्री मंत्रजागर व भजन झाले. याही कार्यक्रमाला श्रीराजेसाहेब जातीने हजर राहिले होते.

श्रीरामनवमीच्या दुसऱ्या दिवशी दशमीला श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेब यांच्याकडून सर्व मंडळींना पक्वान्नाचे भोजन दिले गेले. अशा रीतीने हा सर्व कार्यक्रम पूर्ण झाल्यावर तिसऱ्या प्रहरी श्रीस्वामीमहाराजांनी श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे जाण्याची तयारी केली.

त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या बरोबर असलेल्या सर्व मंडळींना गाड्या देऊन पुढे रवाना करावे असे श्रीराजेसाहेबांना सांगितले. त्याप्रमाणे श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेबांनी सर्वांच्या गाड्यांची सोय करून त्यांना निसरपूर या गावापर्यंत पोहोचते केले. या सर्व मंडळीत जी जी मंडळी श्रीक्षेत्र नरसोबावाडीची होती त्या त्या सर्व मंडळींना श्रीक्षेत्र नरसोबावाडीपर्यंतच्या गाडीभाड्याचे पैसे देऊन त्यांची वाडीपर्यंत जाण्याची व्यवस्था केली.

अशा प्रकारे सर्वांची व्यवस्था करून श्रीस्वामीमहाराज एकटेच पुढील प्रवासाला निघाले. त्यावेळी श्रीमंत गणपतसिंह राजेसाहेब यांनी बरोबर शिपाई नेण्याची खूप प्रार्थना केली; परंतु श्रीस्वामीमहाराजांनी ती मान्य केली नाही. एवढेच नव्हे; तर "आपल्याबरोबर कोणीही येऊ नये," अशी श्रीस्वामीमहाराजांनी सर्वांना आज्ञा केल्याने सर्वांचाच त्याबाबतीत निरुपाय झाला. श्रीस्वामीमहाराजांची आज्ञा म्हणजे ब्रह्मवाक्य असून ती ओलांडण्याचे धैर्य कोणालाही नव्हते. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज दण्ड-कमण्डलू घेऊन उभे राहिले व एक क्षणभर सर्वांवर प्रेमाची दृष्टी टाकून, पुन्हा मागे वळून न पाहता, ते श्रीक्षेत्र गरुडेश्वरच्या वाटेने चालू लागले. त्यावेळी श्रीमंत राजेसाहेबांचे व तेथे जमलेल्या सर्व मंडळींची अंतःकरणे नियोगाग्नीने तापून गेल्यामुळे त्यांच्या डोळ्यांमधून अश्रुधारा वाहू लागल्या. या सर्व लोकांच्या दुःखाचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे.

श्रीस्वामीमहाराज अलीराजपूरहून श्रीक्षेत्र गरुडेश्वरला जावयास निघाले. वाटेत श्रीशूलपाणीश्वराच्या मंदिरात जाऊन दर्शन-वंदनादि करून श्रीशूलपाणीश्वराच्या जंगलातूनच ते पुढे जाण्यास निघाले.

श्रीशूलपाणीश्वराचे जंगल त्यावेळी अत्यंत घनदाट व घोर असून धड पाउलवाट सुद्धा नव्हती. या घनदाट जंगलात हिंस्र श्वापदे व भिल्ल यांचीच वस्ती होती. या श्रीशूलपाणीश्वराच्या जंगलातच चिरंजीव श्रीअश्वत्थामा वास करतो.

श्रीस्वामीमहाराजांना हा प्रदेश परिचयाचा नव्हता. त्यामुळे त्यांना प्रवास करणे कठीण जात होते. श्रीक्षेत्र गरुडेश्वर अद्याप किती दूर राहिले आहे याचा त्यांना अंदाज करता येत नव्हता. अशा स्थितीत आपण या घनदाट जंगलात वाट चुकून भलतीकडेच तर जाणार नाही ना एवढा विचार मनात येतो न येतो तोच एक भिल्ल त्यांच्या समोरून आला व त्याने श्रीस्वामीमहाराजांना असे विचारले की, "आपणास कोठे जावयाचे आहे ?" श्रीस्वामी-महाराज त्याला असे म्हणाले की, "आम्हास श्रीक्षेत्र गरुडेश्वरी जावयाचे आहे." श्रीस्वामीमहाराजांचे हे उत्तर ऐकताच तो भिल्ल त्यांना असे म्हणाला की, "गरुडेश्वराचा अगदी जवळचा रस्ता मला माहीत आहे. तो मी आपणास दाखवितो. आपण माझ्या पाठीमागून या." इतके सांगून तो पुढे चालू लागला व त्याच्या पाठीमागून श्रीस्वामीमहाराज चालू लागले. अशा रीतीने चालत चालत ते दोघेजण श्रीक्षेत्र गरुडेश्वराच्या समोर असलेल्या श्रीवरुणेश्वराच्या मंदिरापाशी आल्यावर तो भिल्ल त्यांना असे म्हणाला की, "ते जे समोर टेकडीवर मंदिर दिसते आहे तेच श्रीगरुडेश्वराचे मंदिर आहे. त्याच्या उजव्या बाजूला जे मंदिर दिसते आहे ते श्रीनारदेश्वराचे आहे. आपण श्रीनर्मदानदी ओलांडून पलीकडे जा म्हणजे झाले."

अशा प्रकारे श्रीक्षेत्र गरुडेश्वर दाखवून ज्यावेळी तो भिल्ल परत जाण्यास निघाला त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांना एकाएकी आतूनच अशी जाणीव झाली की, हा भिल्ल म्हणजे कोणी सामान्य व्यक्ती

नसावी. ही निश्चितच कोणीतरी अलौकिक व लोकोत्तर व्यक्ती असावी. असे वाटताक्षणीच श्रीस्वामीमहाराजांनी त्या भिल्लाला असे विचारले की, "तू कोण आहेस ते खरे सांग." हा प्रश्न ऐकताच तो भिल्ल एक क्षणभर स्तब्ध उभा राहिला आणि लगेच श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाला की, "मी अश्वत्थामा असून या जंगलातच राहतो." इतके सांगून श्रीअश्वत्थाम्याने आपले मूळ स्वरूप धारण केले व काही वेळाने पुन्हा आपले भिल्लाचे मूळ स्वरूप धारण करून तो जंगलात चालत जाऊन दिसेनासा झाला.

वास्तविक पाहता श्रीस्वामीमहाराज डहीवरून एकटेच निघाले होते व त्यांनी आपणाबरोबर कोणासही घेतले नव्हते; परंतु वाटेमध्ये गुरुभक्त श्री. परशुराम कृष्णाजी भोपटकर व आणखी एक गृहस्थ त्यांच्या बरोबर चालत चालत श्रीक्षेत्र गरुडेश्वरपर्यंत आले होते, असे पुढील हकीकतीवरून स्पष्ट होते. ही सर्व हकीकत श्री. परशुराम कृष्णाजी भोपटकर यांनी स्वतः लेखक श्री. द. सा. मांजरेकर यांना इ. स. १९९० च्या जुलै महिन्यात त्यांची भेट झाली असता सांगितली होती. श्री. भोपटकर यांचे दर्शन घेण्याचे भाग्य श्री. मांजरेकर यांना लाभले होते. त्यावेळी त्यांची सत्तरी उलटून गेलेली होती. श्री. भोपटकर हे वामनमूर्ती असून त्यावेळी त्यांची प्रकृती अगदी निकोप व तरतरीत होती. त्याही वयात ते चष्मा न वापरता बारीक अक्षर वाचू शकत असत. त्यांच्या अपूर्व अशा पूर्व सुकृतामुळे ते ९–१० वर्षांचे असताना जवळ जवळ दहा महिने श्रीस्वामीमहाराजांच्या दिव्य संगतीमध्ये राहण्याचे भाग्य त्यांना लाभले होते. त्यावेळी ते वयाने लहान असल्यामुळे व त्यांच्या आईनेच त्यांना श्रीस्वामीमहाराजांच्या स्वाधीन केल्यामुळे त्यांना श्रीस्वामीमहाराजांच्या अगदी निकट सहवासात राहता आले. श्रीस्वामीमहा-

राजांना ज्यावेळी श्रीअश्वत्थाम्याचे दर्शन झाले त्यावेळी श्री. परशुरामपंत भोपटकर व दुसरे एक वृद्ध गृहस्थ श्रीस्वामीमहाराजांबरोबर होते; परंतु ही हकीकत सांगताना श्री. भोपटकरांना त्या वृद्ध गृहस्थांचे नाव आठवेना. ज्यावेळी चिरंजीव श्रीअश्वत्थाम्याचे दर्शन झाले त्यावेळी श्री. परशुरामपंत श्रीस्वामीमहाराजांच्या जवळच होते. त्यांच्या शब्दातच त्या प्रसंगाची हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

" कातरखेडा येथेच मला श्रीस्वामीमहाराजांच्या पवित्र चरणांचे दर्शन झाले. माझ्याबरोबर माझी आई होती. श्रीस्वामीमहाराज तेथून निघताना मला माझ्या आईने श्रीस्वामीमहाराजांच्या चरणी सुपूर्द केले. त्यांनीही ते मान्य केले. त्या बाल वयात आपल्याला श्रीस्वामीमहाराजांच्या चरणांची सेवा घडणार व त्यांच्या सहवासात राहावयास मिळणार म्हणून खूप आनंद झाला. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र गरुडेश्वरी जाण्यास निघाले. श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे जाण्याची वाट अलीराजपूर, शूलपाणीश्वर अशी घनदाट जंगलातून जात होती. आता नक्की आठवत नाही; परंतु श्रीस्वामीमहाराज व मी असे दोघेजण जात असता अनसूया या ठिकाणी आलो. तेथे आम्हाला आणखी एक वृद्ध गृहस्थ येऊन भेटले. त्यांनी श्रीस्वामीमहाराजांबरोबर श्रीक्षेत्र गरुडेश्वरी येण्याची इच्छा प्रकट केली. ती श्रीस्वामीमहाराजांनी मान्य केली. आम्ही सर्वजण श्रीक्षेत्र गरुडेश्वरी निघालो खरे; पण वाट चुकलो. हळूहळू जंगल घनदाट होऊ लागले. सूर्यप्रकाशही अत्यंत कमी होऊ लागला. सूर्यास्ताच्या आत आपण श्रीक्षेत्र गरुडेश्वराला पोहोचू असे श्रीस्वामीमहाराजांना वाटेना. आता काय करावे या विचाराने ते जरा बुचकळ्यातच पडलेले दिसले. इतक्यात एक उंचापुरा भिल्ल श्रीस्वामीमहाराजांच्या पुढे उभा राहिला. त्याने श्रीस्वामीमहा-

राजांना असे विचारले की, "गरुडेश्वराला जावयाचे आहे काय?" त्याचा तो प्रश्न ऐकताच श्रीस्वामीमहाराज असे म्हणाले की, "होय, तिकडेच जावयाचे आहे. पण सूर्यास्ताच्या आत आम्ही पोहोचू शकणार नाही असे वाटते. त्यामुळे जंगलातच राहावे लागेल असे दिसते." श्रीस्वामीमहाराजांचे हे म्हणणे ऐकताच तो भिल्ल त्यांना असे म्हणाला की, "मला जवळची वाट माहीत आहे. मी तुम्हाला सूर्यास्ताच्या आत गरुडेश्वरी पोहोचवितो. आपण सर्वजण माझ्या मागे या म्हणजे झाले." इतके सांगूत तो भिल्ल त्या घनदाट जंगलातून झपाझप चालू लागला. त्यानंतर सूर्यास्ताच्या काही मिनिटेच आधी आम्ही श्रीक्षेत्र गरुडेश्वराच्या समोरील श्रीवरुणेश्वराच्या मंदिरासमोर उभे राहिलो. तेथे उभे राहिल्यावर त्या भिल्लाने बोटाने आम्हाला टेकडीवरील श्रीगरुडेश्वराचे मंदिर दाखविले व तेथे जाण्यास सांगून तो त्वरेने जाण्यास निघाला. हे पाहताच श्रीस्वामीमहाराजांनी जरा दरडावूनच त्याला असे विचारले की, "तू कोण आहेस ?" श्रीस्वामीमहाराजांनी अशा प्रकारे दरडावून त्या भिल्लाला असा प्रश्न का विचारला हे काही आम्हा लोकांच्या लक्षातच आले नाही. त्यांच्या त्या विचारण्याने आम्ही अगदी दिङ्मूढ झालो. परंतु श्रीस्वामीमहाराजांचा प्रश्न ऐकून तो भिल्लहसला आणि त्याने काही एक उत्तर देण्यापूर्वीच एक विलक्षण चमत्कार असा घडला की, त्या भिल्लाच्या ठिकाणी सप्त चिरंजीवातील अश्वत्थामा आमच्या सर्वांच्या समोर उभा राहिला. त्याला पाहताच श्रीस्वामीमहाराज एकदम चपापले. त्या भिल्लाला असे दरडावून विचारावयास नको होते असे त्यांना वाटले. अश्वत्थाम्याची प्रार्थना करून श्रीस्वामीमहाराजांनी त्याला वंदन केले. त्याबरोबर आपले भिल्लाचे रूप धारण करून अश्वत्थामा अदृश्य झाला. त्यावेळी

अश्वत्थाम्याचे दर्शन आम्हाला दहा, वीस सेकंदच झाले असेल. त्याची उंची सात फूट असून तो अत्यंत धिप्पाड होता. त्याने वल्कले धारण केली होती. त्याच्या कपाळावर व्रण होता व त्याने पाठीवर धनुष्यबाण धारण केले होते. अशा प्रकारचे अश्वत्थाम्याचे अपूर्व रूप होते. त्याची वल्कले जणूकाही एखाद्या करवतकाठी धोतरासारखी मला दिसली. अशा प्रकारे अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, बिभिषण, कृप व परशुराम या सप्त चिरंजीवांपैकी एका महापुरुषाचे दिव्य दर्शन मला झाले. हे सर्व श्रीस्वामीमहाराजांच्या पुण्याईचे फळ होय यात शंकाच नाही. श्रीस्वामीमहाराज पुढे श्रीक्षेत्र गरुडेश्वरला पोहोचल्यावर "आता येथेच राहावे," अशी देवांची आज्ञा झाल्यामुळे ते तेथेच सव्वा वर्ष म्हणजे आपल्या महासमाधीपर्यंत राहिले."

श्रीअश्वत्थामा निघून गेल्यावर श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र गरुडेश्वरला जाण्यासाठी श्रीनर्मदानदीच्या पैलतीरावर काही क्षण उभे राहिले. त्यानंतर एका क्षणात निर्णय घेऊन श्रीस्वामीमहाराजांनी आपली छाटी श्रीनर्मदेवर पसरली व त्यावर उभे राहून ते ऐलतीरावर आले. हा अलौकिक चमत्कार त्यावेळी फारच थोड्या लोकांच्या दृष्टीस पडला. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज श्रीगरुडेश्वराच्या देवळाच्या ओटचावर येऊन उतरले. तो दिवस चैत्र वद्य अष्टमी शनिवार शके १८३५ इ. स. १९१३ हा होता.

श्रीस्वामीमहाराज ! आपण अनन्तकोटी ब्रह्माण्डनायक राजाधिराज श्रीसद्गुरुनाथमहाराज आहात ! आपण निखिल भूमंडळातील सर्वश्रेष्ठ असे परमहंस परिव्राजकाचार्य आहात ! आपण साक्षात् पूर्ण ब्रह्म असून आपल्या रूपाने जणूकाही अमृताची मूर्तीच साकार झाली आहे ! आपण आमच्या हृदयस्थ श्रीसद्गुरुनाथमहाराजांचे सद्गुरू आहात ! आपला अखण्ड जयजयकार असो !

श्रीस्वामीमहाराज! आपण सकल श्रीगुरूंचे श्रीगुरू आहात. आपली कृपादृष्टी ही सर्व कलिमलाचे दहन करणारी आहे. आपल्या कृपादृष्टीचा जयजयकार असो. हे श्रीवासुदेवाश्रयाने राहणाऱ्या कृपादृष्टे! तू निर्मल, निःसंग, उदार, दुःखरहित व निरंतर आनंद देणारी आहेस. श्रीक्षेत्र गरुडेश्वरी आपले मानवीदेहाने वास्तव्य असताना आपल्या कृपावगुंठित दर्शनाने, स्पर्शाने व भाषणाने हजारो हजार भक्तांची देहबुद्धी श्रीदत्तचरणी मुरून गेली होती. आमचा आपल्याला नमस्कार असो. हे श्रीवासुदेवाश्रित श्रीगुरुकृपादृष्टे! विषयरूपी सर्पाने पछाडल्यामुळे मूर्च्छित झालेल्या मनुष्याचे विष तुझ्या प्रसादाने लगेच उतरते. हे श्रीगुरुवासुदेवाश्रित कृपादृष्टे स्नेहाळे! तुझ्या प्रसादाने "मी ब्रह्म व्हावे" अशी जी साधकाची हौस ती लगेच पूर्ण होत असल्यामुळे सर्व साधकांची तू माता आहेस. तुला माझा साष्टांग नमस्कार असो. हे श्रीमद् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज सद्गुरो! आपले पाय धरल्याने पूर्ण ज्ञानाची प्राप्ती होते व मन विषय पराङ्मुख होऊन आत्मज्योतीशी ऐक्य पावते. फार काय सांगावे, आपल्या कृपेने ज्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त प्राप्त होतो, तो जीवस्थितीत असूनही प्रत्यक्ष ईश्वराशी साम्य पावतो. आपल्या कृपेचा महिमा असा अपार असल्यामुळे आपले महत्त्व वर्णन करण्यास आमची वाचा असमर्थ आहे; परंतु आपली संगती व आपले भक्तिप्रेम आम्हाला अखंड प्राप्त व्हावे असे आमचे आपणापाशी लडिवाळपणे हात जोडून मागणे आहे.

श्रीस्वामीमहाराज! हे श्रीगुरुदेवा! तुम्ही निर्मल असून, आपल्या भक्तांचे सर्वथैव मंगल करणारे आहात. तुमचा जयजयकार असो. देवा! तुम्ही नेहमी परिपूर्ण असून, ज्यांनी विषयाचा त्याग केला आहे त्यांच्यावर कृपा करणारे आहात. आपण आपल्या लीलेने काळा-

च्याही क्रीडेस कारण असून कालातीत आहात. तुमचा जयजयकार असो. श्रीदेवा ! तुमचे स्वरूप निर्मळ शुद्ध असून, तुम्ही आनंदाला स्फूर्ती देणारे आहात. आपण सर्व पापांचे नित्य निरसन करणारे आहात व सर्वांस कारणीभूत आहात. तुमचा जयजयकार असो. हे श्रीगुरो ! जे तुमचे स्वरूप जाणतात त्यांना तुम्ही मायारूप भवसागरातून तरून नेण्यास नौकारूप आहात. ज्या मुमुक्षूंवर आपण कृपा करता तो मायिक जगाच्या व्यवहारातून मुक्त होऊन त्याचा द्वैतभाव नाहीसा होतो व तो तुमच्या स्वरूपीं मिळून जातो. ही अत्यंत विस्मयाची गोष्ट आहे. तुम्ही या विविधनामरूपात्मक जगताचा ठावठिकाणच नाहीसा करता, म्हणून तुम्ही जगद्बंधू आहात. असा हा भाव धरून जे कोणी आनंदित होऊन अनन्यभावाने तुम्हाला शरण येतात, त्यांचा देहसुद्धा तुम्ही शिल्लक ठेवीत नाही. अशा शरणागताला तुम्ही स्वस्वरूपच करता. तुमचा जयजयकार असो. हे श्रीगुरुदेवा ! तुमचे एकच रूप असून तुम्ही कामरूपी सर्पाचा तिरस्कार करणारे आहात व भाविक भक्तांच्या चित्तरूपी मंदिरातील केवळ प्रज्ज्वलित दीपच आहात. तुम्ही संसार तापाचे समूळ दहन करणारे आहात. तुमचा जयजयकार असो. हे श्रीदेवा ! तुमचे रूप अद्वितीय असून ते दीन झालेल्या मुमुक्षूवर प्रेम करणारे व केवळ भक्ताधीन असून, भजनास योग्य व मायेस अगम्य आहे. तुम्हास आमचा वारंवार नमस्कार असो.

श्रीस्वामीमहाराज आपण साक्षात् श्रीनर्मदास्वरूप असल्यामुळे तिची स्तुती म्हणजे आपलीच स्तुती होय. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी "श्रीनर्मदालहरी" लिहून श्रीनर्मदेचे जे स्तुतिरूप माहात्म्य वर्णन केले आहे तेच आपल्या चरणी प्रस्तुत करून आपला जयजयकार करून आम्ही स्वतःला धन्य मानीत आहोत. आम्ही केलेल्या या

शब्दरूप स्तुतीचा स्वीकार करून, आमच्यावर कृपेचा वर्षाव करून आम्हाला या घोरसंसारसागराच्या पार न्यावे व आपण ज्या दिव्य-रूपात स्थिर आहात त्या स्वरूपाशी एकरूप करून आम्हाला या जन्ममरणचक्र परंपरेतून कायमचे सोडवावे अशी आमची आपल्या चरणी अत्यंत विनम्र व करुण भावाने प्रार्थना आहे.

श्रीमद् आद्य शंकराचार्यकृत

॥ श्रीनर्मदालहरी ॥

ध्यानम्

आदौ ब्रह्माण्डखण्डे त्रिभुवनविवरे कल्पदा सा कुमारी ।
मध्यान्हे शुद्धरेवा वहति सुरनदी वेदकण्ठोग्रकण्ठैः ॥
श्रीकण्ठे कन्यरूपा ललितशिवजटाशङ्करी ब्रह्मशान्तिः ।
सा देवी वेदगङ्गा ऋषिकुलतरणे नर्मदा मां पुनातु ॥

लहरी

पुरारातेर्नीतं पदकमलयोर्येन हृदयम् ।
दृढा भक्तिः शक्त्या निभृतपदरत्या कुशलया ॥
चतुर्वर्गस्तस्य क्षितिपतिपदानन्दनिवहः ।
कवित्वं वक्तृत्वं स्फुरति कृपया शम्भुकृतया ॥ १ ॥
चतुःसङ्ख्याशान्तिप्रभृतिभगलक्ष्म्यादिपतितम् ।
मनः पावं पावं सकलविषयानन्दनिरतम् ॥
अये ! रेवे ! मातस्तव सलिलसेवादृढधिया ।
चलं धारं धारं भवजलधितारं गतभिया ॥ २ ॥

कृतं स्नानं दानं जननि तव तोयेन फलदम् ।
दृशा पेया ज्ञेया निगमऋतवाण्यापि सततम् ॥
हृदा ध्येयाऽमेया परमविदुषां पुण्यसिचया ।
सदा रेवासेवा वितरति पदं शूक्तिगदिनोः ॥ ३ ॥

यशः श्रावं श्रावं श्रवणसुभगं चारु चरितम् ।
पयः पायं पायं हरिहरपदानन्दजनकम् ॥
तरुण्ये पुण्येऽस्मिन् स्थितिकृतवतां सोमतनये ।
गता शङ्कातङ्का भवजनितभीती रिपुभये ॥ ४ ॥

सदा पातः स्नातैर्विमलजलदानैरविरलैः ।
क्रियासिद्धिं बुद्धिं सकलनिधिमृद्धिं वितरति ॥
सकामेभ्यः कामान्विगतविषयेभ्यः शिवपदम् ।
गताऽक्षैण्यं रेवा शरणगतदैन्यं न तनुते ॥ ५ ॥

इयं माता रेवा फलति फलमस्माकमुचितम् ।
तटे दत्वा वासं नियतमपि भैक्ष्यं वितनुते ॥
गभीरे नीरेऽस्मिन् परमरवधीरे कृतधियाम् ।
चिदानन्दाकारं वितरति मनोभावमनघम् ॥ ६ ॥

महामाये ! रेवे ! तव चरणपाथोजयुगलम् ।
भजे नित्यं सिद्ध्यै त्रिगुणरहितानन्दनिधये ।
क्रियातन्त्रीसङ्गे,! कृतसलिलसङ्गावतरणे ।
विचित्रं माहात्म्यं तव जननि वेदैर्न विदितम् ॥ ७ ॥

दुराचाराः पापाः परधनहरा देवि पतिताः ।
तरन्त्येते दुष्टाः कृतसुकृतशिष्टा इव जनाः ।।
पयो दृष्ट्वा पीत्वा भवजलधिमत्यन्तभयदम् ।
परां शुद्धिं गत्वा सुरपतिपदारूढमतयः ।। ८ ।।

महामाये तुङ्गास्त्रुटिततरुमूलाः क्षयभयाः ।
प्रवाहा राजन्ते गगनमिव गन्तुं धृतरयाः ।
त्वमेका लोकानां परमपददानार्द्रहृदया ।
पुरारातेर्जाता सुकृतभरपूरात्तकरुणा ।। ९ ।।

कदाचित्ते तीरे धनुषि शरसन्धानधिषणौ ।
गतौ कौचिद् द्विष्टौ हरिणमभि हन्तुं समुदितौ ।।
गतासू अन्योन्यं शरदशनगाढप्रहरणौ ।
रजोभिर्वा कान्तौ सुरपतिरभूतां तु शबरौ ।।१०।।

नरा धन्या लोके तव सलिलसेवातनुमुचः ।
प्रयाता देवत्वं त्रिदशवनितानन्दमुदिताः ।।
तथा धन्या नार्यः कृतविविधवांछोदितधियः ।
गता दिव्यस्त्रीत्वं त्रिदशगणसम्भोगनिरताः ।।११।।

शुभाशोकाऽलोकारचितसुरलोकाऽमरनदी ।
वृतानन्दानन्दाशरणगतलोकेषु सततम् ।।
सुधापुण्यारण्यं श्रितमिति गणापीतसलिला ।
शिवा माता रेवा मुदितमुनिदेवी विजयते ।।१२।।

अयोध्या माया त्वं त्वमसि मथुरा शम्भुनगरी ।
अवन्ती कांची त्वं जलधिहृदया सर्वसुदया ।।
शिवे गङ्गा तापी त्वमसि यमुना ब्रह्मतनया ।
प्रयागस्तीर्थानां त्वमसि विभुराजैव गदिता ।।१३।।

शुतुद्रिः सिन्धुस्त्वं त्वमसि सरयूर्जिष्णुतनया ।
सदानीरा क्षिप्रा भवसि वरुणा सिन्धुमुकुटे ।।
शची सावित्री त्वं जलधितनया शैलतनया ।
त्वमेका शेषाणां शिरसि सरितां पादमहिषी ।।१४।।

अये ख्याता ख्याता धरणिगिरिजातापहरणी ।
विभूतिर्भूतानां तव जननि वैकुण्ठगतये ।।
तृषां दूरीकर्तुं सुरनटितधारा हृदि गता ।
गतास्तृप्तिं देवाश्चतुरधिकपङ्क्तित्वमगमम् ।।१५।।

धरा पाथो वन्हिः सततगतिराकाशमनघे ! ।
रविश्चन्द्रो यज्वा सुरपतिरयं देवजलदा ।।
त्वदीया राजन्ते शिववरतनोर्देवि तनये ।
महासेवे ! रेवे ! जनितवरदेवाखिलगते ! ।।१६।।

विमानैरायान्तीर्गगनतलयानैर्द्युगणिकाः ।
अधः पाथःसङ्गान्मनुजतनुमुक्तान्सुरगणान् ।।
वरीतुं जल्पन्तीरलमिति ममायं पतिरयम् ।
हसन्तीः पश्यन्ती निजसहचरीवृन्दसहिता ।।१७।।

स्रवन्ती विन्ध्याद्रेरवनितलभद्राय तटिनी ।
नदन्ती दिव्यानां परमपददानाय भजताम् ॥
नृणामष्टौपाशान् हरति ददते भूतिमचलाम् ॥
सदा शान्ता दान्ता परमशिवमूर्तिर्विजयते ॥१८॥

गया गोदा गोमत्यसि पदवरा भीतिसलिला ।
अये कावेरि त्वं विमलतरमुक्ता धृतवती ॥
महायज्ञोद्भूते सुभगतरचर्मण्वति शिवे ।
विमा हेमारण्ये विततशुभवेत्राणि वहसे ॥१९॥

महीभाराक्रान्ता कठिनतरशुण्डाग्ररसनाः ।
महाकायोच्छ्राया रजतगिरिशङ्कावितरणाः ॥
दिगन्ते श्रूयन्ते मदमलिनगण्डाः करटिनः ।
म्रियन्ते कल्पान्ते तव जननि तोयेन रहिताः ॥२०॥

दिगीशा दिक्क्रान्ताः सदनगुणशान्ताः सुरगणाः ।
मुनीन्द्रा नागेन्द्रा अयि चतुरशीतेर्जितभवाः ॥
निधीशा ईशा वा सहजगुणदाना ऋषिगणाः ।
भजन्ते तीरे ते तव जननि कैवल्यगतये ॥ २१ ॥

कृपापारावारे ! प्रणतजनसन्तापशमने !
गुणातीते ! नित्ये ! धृतगुणगणाधीनहृदये ! ॥
अये ! रेवे ! मातस्तव सलिलसेवाहृतमनाः ।
शिवत्वं विष्णुत्वं व्रजति निगमातीतमहिमा ॥२२॥

अमुं देहं हित्वा तव जननि तोयेन मिलितम् ।
महामोहं छित्वा मदनसुखवीरोदितबलम् ॥
मृतास्तेषां भार्या परमपदहार्या सुखरता ।
भवाम्भोधिं तीर्त्वा परमपदमित्वा विहरति ॥२३॥

जटाजूटे गङ्गा दलितभवसङ्गा विजयते ।
विषं नीलं कण्ठे भुजगपतिहारोऽपि घटते ॥
सदा भाले वन्हिर्मुकुटतटचन्द्रार्धकलिका ।
विभूतिः सर्वाङ्गे तव जननि तीरे तनुमुचः ॥२४॥

गदा शङ्खं चक्रं कमलमपि कण्ठे वरमणिः ।
वपुर्नीलं पीतं वसनमपि राजीवनयने ॥
भुजा नित्योदारा विजितसुरकल्पद्रुविटपाः ।
किरीटं हेमाढ्यं सुभगरुचिवैडूर्यखचितम् ॥२५॥

लसद्गण्डद्वन्द्वं श्रवणरुचिदं कुण्डलमिदम् ।
महाखड्गश्चापो निभृतशरतूणीरयुगलम् ॥
महाधैर्यं वीर्यं सुरवरददैत्यादिदलनम् ।
जयत्येतद्रूपं तव जननि नीरं श्रितवतः ॥२६॥

फलैर्मूलैः कन्दैः कृतनिजशरीरं धृतवते ।
महापुण्येऽरण्ये तव जननि तीरे स्थितवते ।
मुरारित्वं ध(द)त्से कृतसलिलसेवाय विदुषे ।
महाभद्रेऽदान्ते गिरिविवरगुह्यं तपयते ॥२७॥

अमीषां धीराणां मुदितमतिसौभाग्यजनकम् ।
पयः पायं पायं तव निकटमम्ब स्थितिजुषाम् ॥
गतं मन्ये सर्वं भवजनितसंसर्गनिवहम् ।
पदं शम्भोर्विष्णोर्मिलितमिति कैवल्यसुखदम् ॥२८॥

फलहारा धारानयनगलधारा हि पयसाम् ।
यशो गायं गायं गलितभवमायं गतधियः ॥
हृदि ध्यायं ध्यायं परमशिवकायं कृतधियः ।
तवारण्ये धन्या विजितसुरकन्यास्तनुमुचः ॥२९॥

गुणाधानं मानं विमलतरभानं कृतवतीम् ।
सुधासाराकारां जनसुकृतदानेन्दुमुकुटे ! ॥
स्थितां दर्शं दर्शं तव जननि ! धाराततिमिमाम् ।
महापापाः शापाकलितवपुषो यान्ति शिवताम् ॥३०॥

युगानां सन्धिस्त्वं मनुजगुणतीर्थान्यसि शिवे ! ।
मनूनां सिद्धानां त्वमसि परमानन्दजननी ॥
चतुर्णां वेदानां भवसि जननी ब्रह्मविदुषी ।
महर्षीणां नृणां वहसि तपसां सिद्धिमनघाम् ॥३१॥

शिवानां तोयानां तव सलिलसंसर्गशरणम् ।
महाकल्पान्तेऽस्मिन् कुजलपवनाकाशमहसाम् ॥
सदा जीवन्मुक्तास्तव जननि भक्ताः क्षितितले ।
त्वमेकाऽनेकासि प्रकृतिगुणसेका त्रिभुवने ॥३२॥

दृगम्भोजाभ्यर्चा निगममतवाच्या धृतरया ।
गता कर्णद्वारं वितरसि सदा शम्भुपदवीम् ॥
महापुण्येऽरण्ये दलितत्रुटिते च व्यतिकरे ।
स्थिरो धीरो नीरं पिबति तव वीरोजितमनाः ॥३३॥

वरे शाखायुग्मे त्रुटितमवलग्ने दृढतरम् ।
शिरः शाखामृग्या वपुरमलमेतत्क्षतमले ॥
पतिस्तस्माद्भूपस्तव जननि नीरे प्लुतिगतः ।
स्वयं राज्ञी जाता मुखवनचरी स्वर्णरुचिरा ॥३४॥

भृगुक्षेत्रे यात्री नृपतिमपि राज्ञा सह गतम् ।
निजं मुण्डं दृष्ट्वा वचनमिदमूचे नृपवधूः ॥
इयं रेवातीरे कृतकगमनं पश्य नृपतिः ।
तथा कृत्वाऽपश्यन्मुखमुदितचन्द्रं किमपरम् ॥३५॥

श्रुतं लोकैश्चित्रं तव जननि माहात्म्यमतुलम् ।
दृढा श्रद्धा शुद्धा त्वयि परमवैकुण्ठगतये ॥
अये ! सर्वे लोका दलितभवशोकाः क्षतभये ! ॥
महामाये ! रेवे ! निगममुखसङ्गीतचरिते ! ॥३६॥

गता काचिद्धचेका शबरवरकन्या घटवती ।
समानेतुं नीरं मृगपतिहृता सा मृतवती ॥
तमारुह्य स्थात्री विबुधवरदा वा त्रिनयना ।
स्फुरद्रूपा सौम्या तव जननि ! संसर्गमहिमा ॥३७॥

मदोन्मत्तं क्रुद्धं वृषभवरमुत्तुङ्गककुदम् ।
जनः कश्चिन्नीत्वा तव जननि नीरे स्नपयते ॥
हतो येन स्वामी निशिततरशृङ्गेण पशुना ।
तमारूढः शम्भुर्धृतदशभुजः पंचवदनः ॥३८॥

धरागारेऽपारां विबुधवरसम्पत्तिजयिनीम् ।
हृदम्भोजे भव्ये स्थितिकृतवतीं सोमतनये ! ॥
स्फुरद्रूपां वाणीं कविधिषणचातुर्यनिलयाम् ।
महामाये मह्यं वितर महनीयं शिवपदम् ॥३९॥

अनूर्मित्वं मातस्तव जननि पाथोऽमृतभुजाम् ।
कृपाशीले ! दूरेश्रवणमिदसद्रेस्तटभुजाम् ॥
गतिर्गोर्गोबालप्रहृतिभिरदेहस्थमरुताम् ।
महःप्राप्तिः साक्षादखिलमितरूपस्य भजताम् ॥४०॥

सुधासिन्धुश्चन्द्रस्तव जननि पादौ प्रणतवान् ।
अथ प्रीतिं धत्ते प्रणतजनलोकस्य सततम् ॥
तव स्तुत्या लक्ष्मीरभरकृपयाम्भोधिनिलया ।
वसन्ती सन्तुष्टा तव जननि तोषं जनयते ॥४१॥

विभूतिं भूतेशः सकलसुखभूतिं वशयते ।
त्वदालम्बादम्ब स्फुरदनलचन्द्रार्कनयने ! ॥
जनो वारंवारं जननि तव वारीणि जुषते ।
पुनर्जन्मासङ्गं कृतसलिलसङ्गो न भजते ॥४२॥

गुरोर्देव्याः शम्भोः कमलनिलयाया मधुरिपोः ।
हृदि स्मारं स्मारं शमितयुगलं पादयुगलम् ॥
कृतिर्ज्ञेया ज्ञेयान्तरगतवतश्चंचलगिरः ।
सदा रम्या रेवापरमलहरी पुण्यलहरी ॥४३॥

॥ इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छङ्कराचार्यविरचितं
श्रीनर्मदालहरीस्तोत्रं सम्पूर्णम् ॥

॥ सार्थ श्रीनर्मदालहरी ॥

जगताच्या अर्थात् सृष्टीच्या प्रारंभी विराट ब्रह्मांडाच्या खंडविशेषातील ब्रह्मलोकामध्ये ब्रह्मदेवाच्या शक्तीने अर्थात् श्रीनर्मदामातेने कुमारीच्या रूपाने कल्पारंभात सृष्टीचा प्रारंभ केला होता. तीच शक्ती कल्पाच्या मध्यकाळी श्रीदेवनदीच्या रूपात वेद जाणणाऱ्या ऋषींच्या कंठातून बाहेर पडणाऱ्या संगीताच्या रूपाने या पृथ्वीवरून वाहू लागली. ही श्रीनर्मदानदी कल्पान्ताच्या वेळी रुद्राणीचे रूप धारण करून भगवान् श्रीशंकरांच्या अत्यंत मनोहर व सुंदर जटांमध्ये लीन होत ब्रह्मानंदाचा आभास प्राप्त करून देते. ही श्रीनर्मदानदी पवित्र ऋषीमुनींचा उद्धार करीत असल्यामुळे तिला श्रीवेदगंगा असे म्हटले जाते. असा हा महिमा असणाऱ्या श्रीनर्मदादेवी ! तू मला पवित्र कर. ॥ ध्यान ॥

ज्याने त्रिपुरारी भगवान् श्रीशंकरांच्या चरण कमलामध्ये आपल्या चित्ताला संलग्न केले आहे आणि आपल्या शक्तीनुसार शिवशक्ती भगवती शांकरी श्रीनर्मदादेवीच्या चरणकमलाची गंभीर भक्ती केली आहे त्याच्या हातात धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ आलेले असतात हे नितांत सत्य आहे, एवढेच नव्हे;

तर त्यानंतर असा साधक सर्व पृथ्वीचा सम्राट् होऊन त्याला ऐहिक परमानंदाचा लाभ होतो, हे सत्य आहे. भगवान् श्रीशंकरांच्या कृपेने त्या साधकभक्तामध्ये कवित्वशक्तीचे आणि वक्तृत्वशक्तीचेही स्फुरण होते. ॥ १ ॥

दासदासींच्या सेवेने देहाची शांती होते, रूपरसादि विषयांच्या भोगाने इंद्रियांची शांती होते, प्रियजनांच्या भेटीमुळे मनाची शांती होते आणि निर्विघ्न सुखनिद्रेमुळे बुद्धीची शांती होते. या चार प्रकारच्या शांतीला चतुःशांती असे म्हणतात. संसारातील सर्व लोक वैषयिक आनंदात बुडून गेलेले असल्यामुळे या लोकांच्या मनाचा उद्धार होणे अर्थात् विषयांची हाव सुटून त्यांचे मन भगवद्भक्तीत लागणे हे बहुतेक असंभवच असते. असे असले; तरी या लोकांच्या मनाचा उद्धार होण्याचा एकच उपाय असा आहे की, हे माते श्रीनर्मदादेवी ! ज्या कोणाच्या मनात कोणत्याही प्रकारे तुझ्या पवित्रजलात नित्यस्नान करण्याचा दृढ निश्चय उत्पन्न होतो तो भयशून्य होऊन हा संसारसमुद्र तरून जातो. ॥ २ ॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझ्या जलात स्नान आणि दान करणे हे महान् फलदायक आहे, असे शास्त्रामध्ये म्हटले आहे. वेदांच्या अर्थात् श्रुतींच्या सत्यवचनांवरूनही तुझा महिमा माहीत होतो. एखाद्याला तुझे पाणी प्राशन करण्यास मिळाले नाही तरी केवळ तुझ्या दर्शनानेच त्याला तुझे पाणी प्राशन केल्याचे फळ मिळते. वेद–वेदांगादि शास्त्रांच्या महान् व पारदर्शी विद्वानांच्या दर्शन-स्पर्शनादींच्या पुण्यामुळे तू इतकी समृद्ध झाली आहेस की, त्याची कोणी काही गणतीच करू शकणार नाही. जो नेहमी तुझी सेवा करतो त्याला श्रीशंकरांचे किंवा श्रीविष्णूंचे पद प्राप्त होते यात काहीच आश्चर्य नाही. ॥ ३ ॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझे यशकारक आणि कानांना सुखकर वाटणारे चरित्र जो वारंवार ऐकतो आणि तुझे जल जो पुन:पुन्हा प्राशन करतो त्याला श्रीशिव व श्रीविष्णुपदप्राप्तीइतका आनंद प्राप्त होतो. हे सोमतनये श्रीनर्मदादेवी माते ! जो मनुष्य अगदी बालपणापासूनच तुझ्या पुण्यतटावर निवास करतो त्याला संसार-सागरापासून आणि शत्रूंपासून कधीही भय राहात नाही. ।। ४ ।।

हे श्रीनर्मदादेवी माते ! जे लोक तुझे पाणी नेहमी प्राशन करतात, तुझ्या पात्रात नित्य स्नान करतात आणि तुझ्या पवित्र जलाने संकल्प करून दानादि पुण्य कर्मांचे अनुष्ठान करतात त्या सर्वांना तू क्रियेची सिद्धी, सुबुद्धी, सर्व प्रकारची धनसंपत्ती आणि सर्व प्रकारच्या अभ्युन्नतीचे वर इत्यादि प्रदान करतेस. जे सकाम भक्त आहेत त्यांना तू पाहिजे असलेली वस्तू देतेस आणि ज्यांना कोण-त्याही विषयाची अभिलाषा किंवा आकांक्षा नसते अशा निरिच्छ व निष्काम भक्तांना तू शिवपद प्रदान करतेस. अशा प्रकारे जे सकाम अगर निष्काम भावाने तुला शरण येतात त्यांना आपापली अभिलषित वस्तू देण्यात तू कसलेच दैन्य दाखवीत नाहीस. ।।५।।

ही श्रीनर्मदादेवीमाता आम्हाला योग्य ते फळ देऊन सफळ करते. ती आम्हाला आपल्या तटावर राहवून घेते आणि योग्यवेळी नियमितपणे आम्हाला जेवणही देते. जे लोक तिच्या गंभीर अशा उच्च शब्दमय जलात आपले चित्र एकाग्र करतात त्यांच्या हृदयात ही श्रीनर्मदादेवीमाता चिदानन्दस्वरूप परमेश्वराची पवित्र भावना उत्पन्न करते. ।।६।।

हे मायारूपिणी श्रीनर्मदादेवी माता ! त्रिगुणरहित ब्रह्मानन्द पुंजाचा अनुभव यावा म्हणून मी नित्य तुझ्या जलरूपी चरणकमलाची सेवा करतो; कारण की, या ब्रह्मानन्दाची प्राप्ती हीच सर्वश्रेष्ठ सिद्धी

आहे ज्यावेळी योग–याग इत्यादि कर्मकाण्डाच्या तंत्रावरोबर तुझ्या पाण्याचा संयोग होतो अर्थात् तुझ्या पाण्याचा वापर करून योग-यागादि कर्मकाण्डतंत्र संपन्न होते त्यावेळी तुझ्या विचित्र महिम्याचा अनुभव येतो. हा महिमा वेदही जाणू शकत नाहीत. ।।७।।

हे श्रीनर्मदादेवी माते ! जे लोक दुराचारी व पापी आहेत आणि दुसऱ्यांचे धन हरण करणे हेच ज्यांचे काम आहे व ते काम सतत केल्यामुळे जे लोक पतित झाले आहेत, असे लोकही तुझ्या पवित्र जलधारेच्या दर्शनाने व प्राशनाने पवित्र होतात आणि सर्व पापां-पासून मुक्त होऊन अत्यंत भीषण असा हा संसारसागर पार करून पलीकडे जातात व या पुण्यबलानें देवराज इंद्राचे पदसुद्धा प्राप्त करतात. ।। ८ ।।

हे महामाये श्रीनर्मदादेवी माते ! तुझा अतिवेगवान जलप्रवाह अत्यंत निर्भय होऊन आपल्या गगनस्पर्शी उत्तुंग तरंगांच्या आघाताने तुझ्या तीरावरील मोठमोठे वृक्ष मुळासकट उपटून पुढे धावत असतो. श्रीत्रिपुरारी शंकरांपासून उत्पन्न झाल्यामुळे तू अनन्त पुण्याने समृद्ध झाली आहेस. यामुळे एकमात्र तूच अशी नदी आहेस की, जी करुणार्द्रचित्त होऊन लोकांना परमपद प्राप्त करून देण्यास समर्थ आहेस. ।। ९ ।।

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझ्या तटावरील धुळीचाही महिमा अपरंपार आहे. यासंबंधी एक कथा अशी प्रसिद्ध आहे की, एकदा पुराणकालात शरसंधानात प्रवीण असलेले दोन भिल्ल तुझ्या तीरावर पशूंची शिकार करण्याकरिता आले होते. धनुष्यबाण घेऊन शिकार करीत असताना पशूंच्या शिकारीवरून त्या दोघां-मध्ये खूप भांडण झाले. त्यामुळे रागाने ते एक दुसऱ्यावर बाण सोडून आघात करू लागले. ज्यावेळी त्या दोघांजवळील बाण संपले

त्यावेळी त्या दोघांमध्ये मल्लयुध्द सुरू झाले. शेवटी तर ते दोघे एकमेकांना दातांनी चावे घेऊ लागले. यामुळे त्या दोघांच्या शरीरावर असंख्य जखमा होऊन ते दोघेजण श्रीनर्मदातटावरील श्रीनर्मदेच्या पवित्र जलाने भिजलेल्या धुळीने माखून जाऊन शेवटी मरण पावले. अशा प्रकारे ते दोघे मरण पावल्यामुळे त्या दोघांना श्रीनर्मदामातेच्या धुळीच्या स्पर्शाने इन्द्रत्व प्राप्त झाले. ॥१०॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझ्या पाण्यात जे लोक आपल्या शरीराचा त्याग करतात ते सर्व लोक धन्य होत; कारण की, या लोकांना देवत्व प्राप्त होऊन ते दिव्य स्त्रियांच्या बरोबर विहार करतात. त्याचप्रमाणे ज्या स्त्रिया तुझी सेवा करता करता तुझ्या पाण्यात शरीराचा त्याग करतात त्याही धन्य होत; कारण त्यांना दिव्य असे स्त्रीत्व प्राप्त होते व त्या देवतांच्या बरोबर संभोग सुखाचा उपभोग घेतात. ॥११॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! जे लोक तुला शरणागत होऊन तुझ्या तटावर निवास करतात आणि तुझ्या पाण्यात नेहमी तर्पणादि क्रिया करतात ते सर्व मंगलमय, शोकशून्य व ज्योतिर्मय अशा स्वर्गलोकात जाऊन देवतांबरोबर सभेमध्ये स्थान प्राप्त करतात. हे पाहताच तुला अत्यंत आनंद होतो. तुझे पाणी अमृताप्रमाणे पवित्र असे आहे, हे जाणून लोक तुला शरण येतात व परम प्रेमाने आणि श्रद्धेने तुझे पवित्र पाणी पितात. तू मंगलमयी आहेस. तुला पाहून मुनी व देवता लोक प्रसन्न होतात. तुझा जयजयकार असो ! ॥१२॥

हे मंगलमयी श्रीनर्मदादेवी माते ! तूच हरिद्वार व अयोध्यारूपिणी आहेस. तूच श्रीकृष्णांची जन्मभूमी मथुरा असून श्रीशंभुनगरी काशी आहेस. अवन्ती म्हणजे उज्जयिनी व कांचीही तूच आहेस. हे शिवे श्रीनर्मदे ! श्रीशंकरांची आनंदस्वरूपिणी सागर-

गामिनी श्रीगंगा, श्रीतापी, श्रीयमुना, ब्रह्मकन्या श्रीसरस्वती आणि तीर्थराज श्रीप्रयाग ही सर्व तुझीच स्वरूपे आहेत. यामुळेच तू विश्वाची सम्राज्ञी झाली आहेस असे मानले जाते. ॥१३॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तूच श्रीशतद्रू म्हणजे श्रीसतलज, श्रीसिंधू, श्रीशरयू आणि विष्णुतनया श्रीयमुना असून ही सर्व तुझीच स्वरूपे आहेत. हे सागरमुकुटरूपिणी ! श्रीसदानीरा अर्थात् श्रीकरतोया, श्रीक्षिप्रा आणि श्रीवरुणा या सर्व नद्या म्हणजे तूच आहेस. इंद्रपत्नी श्रीशची, जलधितनया श्रीलक्ष्मी आणि हिमालय कन्या श्रीपार्वती या सर्व देवता म्हणजे तुझीच रूपे आहेत. हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझे पदकमल हे सर्व नद्यांच्या मस्तकावर राहण्यास योग्य आहेत. ॥१४॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! भूमी व पर्वतावर उत्पन्न होणारे सर्व प्रकारचे वृक्ष, लता व वेली यांचे तापहरण करण्याचे सामर्थ्य तुझ्यात असल्यामुळेच तुझा महिमा अत्यंत मोठा आहे असे मानले जाते. तुझ्या तटावरील धूलिकणही मनुष्याला वैकुंठाला घेऊन जातात. मनुष्याची तहान दूर करण्याच्या बाबतीत देवांच्या नृत्याचे अनुकरण करणारी तुझी जलधारा इतकी श्रेष्ठ आहे की, तिचे प्राशन केल्यावर (मनुष्याला अत्यंत श्रेष्ठस्थान प्राप्त होत असल्यामुळे श्रीनारायण, श्रीब्रह्मा, श्रीविष्णू व श्रीशंकर या देवतांनाही) पाचव्या पंक्तीमध्ये स्थान प्राप्त होते. ॥१५॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! हे श्रीशंकरतनुजे ! श्रीमहादेवांच्या वरामुळे तू सर्वश्रेष्ठ देवता आणि अखिल जीवांना श्रेष्ठ गती देणारी झाली आहेस. त्यामुळे पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश ही पंचमहाभूते आणि सूर्य, चन्द्र, अग्निहोत्री इंन्द्र व देवनदी ही तुझ्याच सत्त्वाने विराजमान होतात. ॥१६॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझ्या पवित्र जलाच्या स्पर्शामुळे ज्या लोकांना देवत्व प्राप्त होऊन ते ज्यावेळी स्वर्गलोकाला जाऊ लागतात, त्यावेळी आकाशात विहार करणाऱ्या विमानांमधील स्वर्गातील अप्सरा त्या लोकांना पाहून "हा माझा पती आहे," "हा माझा पती आहे," असे म्हणत म्हणत त्यांचा पतीरूपाने स्वीकार करतात. हे श्रीनर्मदादेवी माते ! आपल्या सर्व सहचारी देवतांच्या समूहासमवेत त्या अप्सरांना पाहून तू हसत असतेस. ।।१७।।

हे श्रीनर्मदादेवी माते ! या भूतलावरील पार्थिव जीवांच्या कल्याणासाठी तू विन्ध्य पर्वतावरून नदीरूपाने वाहतेस. जे लोक तुझी सेवा व तुझे भजन करतात त्यांना परमश्रेष्ठ असे मोक्षपद द्यावे म्हणून तू गर्जना करतेस. तू मनुष्यांचे (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ईर्ष्या व अहंकार हे) अष्टपाश हरण करून अर्थात् नष्ट करून त्यांना स्थिर ऐश्वर्य प्रदान करतेस. अशा प्रकारचे रूप व काम करीत तू नेहमी शान्त, दान्त आणि परमसंगलमय मूर्तीच्या रूपाने विराजमान होतेस. हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझा जयजयकार असो. ।।१८।।

हे श्रीनर्मदादेवी माते ! तूच श्रेष्ठचरण असलेली श्रीगया, श्रीगोदावरी, श्रीगोमती आदि भयानकतर नद्यांच्या रूपाने विराजमान झालेली आहेस. तू श्रीकावेरीनदीच्या रूपाने मोत्याप्रमाणे अत्यंत स्वच्छ व शुभ्र असे जल धारण करतेस. महायज्ञापासून उत्पन्न झालेली व अधिक सौभाग्यशालिनी असलेली अशी श्रीचर्मण्वती नदीही तूच आहेस. हे मंगलमयी श्रीनर्मदादेवी माते ! तूच अत्यंत गतिमान रूप धारण करून हेमारण्यामध्ये पांढऱ्या वेतांना आपल्या तटावर धारण करतेस. ।।१९।।

हे श्रीनर्मदादेवी माते ! त्यांच्या तोंडा व जिभेचा अग्रभाग

अत्यन्त कठिण आहे आणि ज्यांचे अत्युच्च असे विशाल शरीर पाहून जणू काही हे चांदीचे पर्वतच आहेत अशी भ्रांती होते, असे हे सर्व भेदगर्वाने युक्त असे दिग्गजही पृथ्वीच्या महाभाराने आक्रांत होऊन प्रलय कालात तुझ्या पवित्र जलाचा संबंध न आल्यामुळे मरून जातात. ॥२०॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! सर्व दिशांना हिंडून आलेले व आपल्या घराच्या अर्थात् स्वर्गाच्या गुणांनी तृप्त असलेले दिक्पती म्हणजे देवता, मुनीन्द्र, नागन्द्र, चौऱ्यांशीलक्ष योनींवर जय प्राप्त करणारे महात्मे किंवा देवता, सर्व निधींचे स्वामी, राजवर्ग व यज्ञयाग करणे हा ज्यांचा स्वाभाविक गुण आहे असे ऋषिलोक हे सर्वजण तुझ्या तीरावर येऊन राहतात व तुझे भजन करतात. याचे एकच कारण असे की, तुझ्याशी अर्थात् तुझ्या जलाशी संबंध आल्यामुळेच या सर्व लोकांना कैवल्य किंवा मोक्ष प्राप्त होतो. ॥२१॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! हे तुला प्रणाम करून शरण आलेल्या लोकांचे दुःख हरण करणाऱ्या माते ! हे सर्व गुणांच्या पलीकडे असलेल्या देवी ! हे नित्ये ! हे सर्व गुणी लोकांच्या गुणांना वशीभूत होणाऱ्या माते ! हे श्रीरेवामाते ! तुझ्या पवित्र जलाची सेवा करणारे सर्वलोक श्रीशिवपद व श्रीविष्णुपदही प्राप्त करतात. तुझा महिमा श्रीवेदांनाही अगोचर आहे हेच खरे. ॥२२॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! हे जननी ! जे लोक तुझ्या जलात आपल्या शरीराचा त्याग करतात ते महामोह, शृंगारसुख व वीरांमध्ये प्रसिद्ध असलेले शौर्यसुख इत्यादि सर्व सुखांचा त्याग करून अमर होतात. इतकेच नव्हे; तर या सर्व लोकांच्या पत्नीही परमपदाची प्राप्ती

करण्यास योग्य होऊन संसारसागर पार करून पलीकडे जातात व परमपद प्राप्त करून आनंदाने विहार करतात. ॥२३॥

हे श्रीनर्मदादेवी माते! तुझ्या तीरावर जो मनुष्य शरीराचा त्याग करतो त्याच्या जटांमध्ये संसाराच्या सर्व बंधनांचा नाश करणारी श्रीगंगा विराजमान असते. त्याच्या गळ्यात नीलवर्णाचे विष आणि सर्पराज (श्रीवासुकी) हाराच्या रूपाने विराजमान होतात. त्याच्या कपाळामध्ये तिसऱ्या डोळ्याप्रमाणे अग्नी आणि डोक्यावर चंद्राची अर्धी कला शोभा देत राहते आणि त्याचे सर्वांग भस्माने विभूषित होते. (श्रीनर्मदानदीच्या तटावर मृत्यू आल्यावर हे सर्व घडते यात काहीच आश्चर्य नाही.) ॥२४॥

हे श्रीनर्मदादेवी माते! तुझ्या पाण्यात जे लोक आपल्या शरीराचा त्याग करतात त्यांच्या हातात गदा, शंख, चक्र, कमल व गळ्यात श्रेष्ठ कौस्तुभमणी सुशोभित झाला, त्यांचे शरीर निळ्या वर्णाचे झाले, त्यांचे वस्त्र पिवळ्या रंगाचे झाले आणि त्यांचे दोन्ही डोळे कमळाप्रमाणे सुंदर झाले तर काहीच आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. इतकेच नव्हे; तर त्यांना सुरकल्पतरूंवरही विजय प्राप्त करणारे चार हात आणि अत्यंत उज्ज्वल वैडूर्यमणिमंडित सुवर्णमय मुकुट मिळाला तर त्यात काहीच आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हे श्रीनर्मदादेवी माते! यापेक्षा तुझा अधिक महिमा काय वर्णावा? ॥२५॥

हे श्रीनर्मदादेवी माते! जे लोक तुझ्या तीरावर राहतात त्यांच्या दोन्ही कानांमध्ये दोन सुवर्ण कुंडले कानांची शोभा वाढवीत शोभत राहतात. त्यांना महान् तलवार, धनुष्य व बाणांनी परिपूर्ण भरलेला भाता मिळतो; त्यांनी दैत्यांचा नाश करावा म्हणून त्यांना अग्नीसारखे रूप मिळते. ते देवतांना वरप्रदान करतात

यातही काही आश्चर्य नाही. हे देवी ! तुझ्या तीरावर निवास करणाऱ्या सर्व भाग्यशाली लोकांचा जयजयकार असो. ॥२६॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! जे महात्मे साधक इत्यादि लोक तुझ्या तीरावर निवास करून तटावर असलेल्या महापुण्यमय अरण्यात उत्पन्न झालेली कंद–फळे–मुळे खाऊन आपल्या शरीराचे भरण–पोषण करतात व जे लोक तुझे पवित्र जल पिऊन तुझ्या काठावरील गुहेमध्ये तपश्चर्या करतात त्यांना जर श्रीविष्णुलोकाची प्राप्ती झाली तर ही काही अपूर्व घटना आहे असे नाही. ॥२७॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझे पवित्रजल धैर्यशाली व्यक्तींना नेहमी आनंदित करते आणि परमसौभाग्य प्रदान करते. जे लोक तुझ्या तीरावर अर्थात् काठाजवळ राहून तुझे पाणी दररोज वारंवार पितात त्यांचे संसारामुळे उत्पन्न झालेले सर्व पाप नष्ट होते आणि ते श्रीशिव व श्रीविष्णुलोकाच्या मुक्तिसुखाचा निश्चितपणे अनुभव घेतात अर्थात् ते सुख प्राप्त करून घेतात. ॥२८॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! जे लोक फलाहार करून व तुझे पवित्र पाणी पिऊन तुझ्या काठावर असलेल्या अरण्यात निवास करतात, जे लोक स्थिरचित्त व स्थिरबुद्धी होऊन तुझे यश गात गात आणि आपल्या हृदयात तुझ्या परम मंगलमयी अशा मूर्तीचे ध्यान करीत करीत तुझ्या तीरावरील अरण्यात शरीरत्याग करतात ते लोक खरोखरच धन्य होत; कारण की, मृत्यूनंतर ज्यावेळी हे लोक स्वर्गात जातात त्यावेळी ते देवतांचे मनही मोहित करतात. ॥२९॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तू या सकल भूमंडलातील पुण्यपुंजरूप चंद्राप्रमाणे असलेल्या मुकुटासारखीच आहेस. तुझ्या पाण्याचा विशाल प्रवाह हा अमृताच्या धारेप्रमाणे मधुर असून तो सर्व लोकांमध्ये गुण व मान धारण करून सर्व लोकांचे शरीर विशुद्ध

करतो तुझ्या या अपूर्व जलधारेचे वारंवार दर्शन घेणारा महापापिष्ठ शापदग्ध मनुष्यही श्रीशिवत्व प्राप्त करतो. ॥३०॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तू सर्व युगांना जोडणारी सन्धिस्वरूप आहेस. हे मंगलमयी देवी ! तू मनुष्यांना गुणप्रदान करणारी तीर्थस्वरूपिणी आहेस. तू सिद्ध मनुष्यांच्या परमानंदाची जननी असून ब्रह्मतत्त्व जाणणारी आहेस. याप्रमाणेच तू चार वेदांचीहीं जननी आहेस. तू ब्रह्मविदुषी असून महर्षींना व मनुष्यांना निर्मल तप:सिद्धी प्रदान करणारी आहेस. ॥३१॥

हे श्रीनर्मदादेवी माते! जे लोक तुझ्या परमपवित्र जलाला शरण जातात अर्थात् तुझ्याच पाण्यात स्नान, तुझ्याच पाण्याचे पान व तुझ्याच तीरावर दान करतात ते तुझे सर्व भक्तलोक, महाकल्पाच्या शेवटी पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश या पंचमहाभूतांचा विनाश झाल्यावरही जीवनमुक्त होऊन या भूतलावर हिंडतात. हे माते ! तू जरी एकच असली तरीही त्रिगुणमयी होऊन म्हणजे सत्त्व, रज व तम या तीन प्राकृतिक गुणांच्या द्वारा अनेक रूपे धारण करून या भूतलावर विराजमान होतेस. ॥३२॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तू नेत्रकमलांच्याद्वारा अर्चनीय व श्रीवेदांच्या द्वारा प्रशंसनीय आहेस. तुझी स्रोतयुक्त अर्थात् तीव्र वेगाने वाहणारी जलधारा मनुष्यांच्या कानांजवळ येऊन त्यांना शिवपदाच्या प्राप्तीची बातमी देते. तुझ्या काठावर जे महारण्य आहे ते मनुष्यांच्या सर्व पापांचा नाश करते. या अरण्यामध्ये अत्यंत धैर्यशाली असणारे, कमालीच्या स्थिर अंत:करणाचे आणि स्वत:च्या मनाला जिंकणारे लोकच तुझ्या जलाचे प्राशन करीत निवास करतात. ॥३३॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! तुझ्या तीरावरील एका वृक्षाच्या फांदीवर एक वानर व एक वानरी राहत होती. तुझ्या प्रवाहाच्या

वेगवान् गतीमुळे आघात होऊन ज्यावेळी ही फांदी तुटली त्यावेळी त्या फांदीवरील वानरी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. हे पाहताच वानरानेही तुझ्या प्रवाहात उडी मारली. पुढे ते दोघेही तुझ्या प्रवाहात मरण पावल्यावर पुढील जन्मात राजा व राजपत्नी म्हणून जन्माला आले. पुढे ते दोघे तीर्थयात्रेसाठी निघाल्यावर भृगुक्षेत्रात आले. त्यावेळी त्या राणीने आपल्या पूर्वजन्मातील वानरी अवस्थेतील मस्तक त्या भृगुक्षेत्रात पडलेले पाहिले आणि ती राजाला असे म्हणाली की, "हे राजन्! हे पाहा! हे माझेच पूर्वजन्मातील वानरी अवस्थेतील मस्तक आहे. आपण दोघेही मागील जन्मात श्रीनर्मदातटावर फिरण्यास गेलो असता एका वृक्षाच्या फांदीवर बसलो होतो. ती फांदी तुटल्यामुळे आपल्या दोघांचाही श्रीनर्मदानदीच्या पात्रात पडून मृत्यू झाला. मागील जन्मात मला जे वानरीचे शरीर मिळाले होते त्या शरीराचेच हे मस्तक आहे. आपल्या दोघांच्या मृत्यूच्या वेळी आपल्याला श्रीनर्मदानदीच्या पवित्र पाण्याचा स्पर्श झाल्यामुळेच आपल्या दोघांचा जन्म राजकुळात झाला. ॥३४–३५॥

हे श्रीनर्मदादेवी माते! ही सर्व आश्चर्यकारक घटना ऐकून सर्व लोक अत्यंत आश्चर्यचकित झाले. या गोष्टीमुळे श्रीनर्मदामातेचे माहात्म्य लक्षात येऊन सर्व लोकांची तुझ्यावर अत्यंत दृढ श्रद्धा बसली ज्यावेळी अशी शुद्ध श्रद्धा माणसाच्या अंतःकरणात उत्पन्न होते त्यावेळी ती त्याला वैकुंठाला घेऊन जाते. हे महामाये! श्रीरेवे! श्रीवेद सुद्धा आपल्या मुखाने तुझ्याच चरित्राचे गायन करीत असतात. हे भयनाशिनी! श्रीनर्मदादेवी माते! जे लोक केवळ तुझ्या महिम्याचे स्मरण करतात ते सर्व संसाराचा शोक विसरून जातात. ॥३६॥

हे श्रीनर्मदादेवी माते! एकदा एका भिल्लाच्या राजाची कन्या एक घडा घेऊन तुझे पाणी नेण्याकरिता तुझ्या काठावर आली होती. तेथे एका सिंहाने त्या कन्येला ठार मारले; परंतु त्यावेळी तुझ्या पाण्याचा संबंध आल्यामुळे त्या जलाच्या महिम्याने ती भिल्ल कन्या देवतांना वर देणारी त्रिनयनी श्रीदुर्गा झाली व ती त्या सिंहावर बसून तुझ्या काठावर विहार करू लागली. ॥३७॥

हे श्रीनर्मदादेवी माते! एकदा एक माणूस अत्यंत उंच शिंगे व वशिंड असलेल्या आपल्या मदोन्मत्त बैलाला घेऊन तुझ्या पाण्यात स्नान करीत होता. इतक्यात त्या बैलाने आपल्या अत्यंत तीक्ष्ण अशा शिंगांनी आपल्या मालकालाच ठार मारले. परंतु हे श्रीनर्मदा-देवी माते! तुझ्या नावाच्या महिम्यामुळे तो पुरुष पाच मुखांचा व दहा हातांचा श्रीशिवरूप होऊन त्या बैलावर बसून तुझ्या तीरावर फिरू लागला. ॥३८॥

हे श्रीनर्मदादेवी माते! या मृत्युलोकात जिची तुलना होऊ शकत नाही, जी देवराज इंद्राच्या ऐश्वर्यालाही जिंकणारी आहे, जी मंगलमय हृत्कमलात राहते व जी कवींच्या बुद्धिचातुर्याचा आश्रय आहे, अशी जी वाक्शक्ती आहे, ती तू मला प्रदान कर. हे महामाये! हे सोमतनये!! तू मला अत्यंत श्रेष्ठ असे शिवपद प्रदान कर. ॥३९॥

हे श्रीनर्मदादेवी माते! जे तुझ्या जलरूप अमृताचे पान करतात ते ऊर्मिरहित होतात अर्थात् या सर्वांचे मन अचंचल म्हणजे स्थिर होते. हे करुणामयी माते! तुझ्या बाजूला जे पर्वत आहेत त्यांच्या पायथ्याशी जे लोक राहतात त्यांना दूरश्रवणशक्ती प्राप्त होते. हे श्रीनर्मदादेवी माते! जे लोक तुझी सेवा करतात त्यांना ज्याप्रमाणे गाईच्या शेपटीवर प्रहार केल्यानंतर तिला अत्यंत वेगवान् अशा

बाह्य वायुप्रमाणे गती प्राप्त होते त्याप्रमाणे या लोकांना समस्त विश्वरूप ब्रह्माच्या तेजाची साक्षात् प्राप्ती होते. ॥४०॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! अमृताचा जणूकाही सागरच असलेला हा चन्द्र तुझी फार भक्ती करीत असतो. त्यामुळे तो सर्वांना प्रिय आहे. तुझी स्तुती करीत असल्यामुळेच भगवती श्रीलक्ष्मी क्षीरसागरामध्ये निवास करते आणि तुला संतोष देते. ॥४१॥

हे अग्नी, चन्द्र व सूर्यस्वरूप प्रकाशमान नेत्रांनी युक्त असलेल्या श्रीनर्मदादेवी माते ! तुझे अवलम्बन केल्यामुळेच श्रीशिवांनी सकल सुखकारक असे विभूतिस्वरूप ऐश्वर्य म्हणजे सिद्धी वश करून घेतली. तुझ्या पाण्याने स्नान केल्यामुळेच प्राण्यांना पुनर्जन्म प्राप्त होत नाही. तुझा हा महिमा ज्यावेळी जीवाला माहीत होतो त्यावेळी तो तुझ्या जलाचे अखंड सेवन करतो. ॥४२॥

हे श्रीनर्मदादेवी माते ! माझे श्रीगुरुजी, भगवती श्रीपार्वतीदेवी, भगवान् श्रीशंकर, कमलनिलया श्रीलक्ष्मी आणि भगवान् श्रीमधुसूदनाचे चरणयुगल हे अहंकार व ममाकार यांचा नाश करणारे आहेत. या सर्वांचे वारंवार स्मरण करीत करीत ज्ञेय परब्रह्मात प्रविष्ट झालेल्या माझ्या चंचलवाणीने या श्रीनर्मदालहरीस्वरूप परममुक्तीची रचना केली आहे. ही सर्वांना परमानंद देवो. ॥४३॥

॥ अशा प्रकारे श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीशंकराचार्य विरचित श्रीनर्मदालहरीस्तोत्राचा मराठी भावार्थ पूर्ण झाला. ॥

॥ श्रीनर्मदादेव्यर्पणमस्तु ।

हे श्रीनर्मदादेवी माते ! या घोर अशा संसारसागरातून सर्व जडजीवांचा उद्धार करण्यास व त्यांचे सर्व संसारभय नष्ट करण्यास तू समर्थ असल्यामुळे तुझी कीर्ती वाचेने कथन करणे केवळ अशक्य आहे, असे म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी तुझी जी आरती

केली आहे ती तुझ्या चरणी प्रस्तुत करून तुझी म्हणजे श्रीस्वामी-महाराजांची भक्तिपूर्वक सेवा करून " स्वयशः पावितजीवे मामुद्धर रेवे ॥" अशी आम्ही अनन्यभावाने तुझी प्रार्थना करीत आहोत.

॥ आरती ॥

जय जय नर्मद ईश्वरि मेकलसंजाते ॥
नीराजयामि नाशिततापत्रयजाते ॥ जय जय० ॥१॥
वारितसंसृतिभीते सुरवरमुनिगीते ॥
सुखदे पावन कीर्ते शंकरतनुजाते ॥
देवापगाधितीर्थे दत्ताग्र्यपुमर्थे ॥
वाचामगम्यकीर्ते जलमयसन्मूर्ते ॥ जय जय० ॥२॥
नन्दनवनसमतीरे स्वादुसुधानीरे ॥
दर्शितभवपरतीरे दमितान्तकसारे ॥
सकलक्षेमाधारे वृतपारावारे ॥
रक्षास्मानतिघोरे मग्नानसंसारे ॥ जय जय० ॥३॥
स्वयशःपावितजीवे मामुद्धर रेवे ॥
तीरं ते खलु सेवे त्वयि निश्चितभावे ॥
कृतदुष्कृतदवदावे त्वत्पदराजीवे ॥
तारक इह मेऽतिजवे भक्त्या ते सेवे ॥ जय जय० ॥४॥

हे मेकलकन्ये भगवती श्रीनर्मदे ! तुझा जयजयकार असो. त्रिविध तापांच्या समूहाचा नाश करणाऱ्या हे ईश्वरी ! मी तुझी आरती करतो. ॥१॥

संसारभयाचा नाश करणाऱ्या, देवांनी आणि मुनींनी स्तविलेल्या, सुखदायक अशा, पवित्र कीर्ती असलेल्या, श्रीशंकरांच्या

शरीरापासून उत्पन्न झालेल्या, श्रीगंगेपेक्षा श्रेष्ठ असे तीर्थस्वरूप असलेल्या, श्रेष्ठ अशा पुरुषार्थाची म्हणजे मोक्षाची प्राप्ती करून देणाऱ्या, वाणीला अगम्य म्हणजे जिचे वर्णन करता येत नाही अशी कीर्ती असलेल्या आणि अत्यंत सुंदर अशी जलमय मूर्ती असलेल्या हे श्रीनर्मदे ! मी तुझी आरती करतो. ।।२।।

नंदनवनाप्रमाणे रमणीय तट असलेल्या, अमृतासमान मधुर जल असलेल्या, भवसागराच्या पैलतीराला नेणाऱ्या, शत्रूंचे बल नाहीसे करणाऱ्या, सर्व कल्याणकारक गोष्टींचे अधिष्ठान असणाऱ्या आणि ज्ञानी लोकांनी सेविलेल्या हे श्रीनर्मदे ! अत्यंत भयंकर अशा संसारामध्ये गढलेल्या आमचे तू रक्षण कर. हे श्रीनर्मदे ! मी तुझी आरती करतो. ।। ३ ।।

आपल्या स्तुतीने पवित्र करणाऱ्या हे श्रीरेवे ! माझा उद्धार कर तुझ्यावर दृढ श्रद्धा ठेवून मी तुझ्या तीराचे सेवन करतो. दुष्कर्म-रूपी अग्नीचा दाह करणाऱ्या आणि अत्यन्त वेगवान असणाऱ्या हे श्रीनर्मदे ! तुझ्या तारक अशा पदकमलांची मी अत्यंत भक्ति-भावाने सेवा करतो. ।। ४ ।।

श्रीस्वामीमहाराज ! श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य शंकरा-चार्यांनी वर वर्णन केलेल्या श्रीनर्मदा महानदीच्या महिम्याप्रमाणे आपलाही महिमा अपरंपार आहे. आपल्या या जीवनचरित्राच्या अपारावार महिम्याच्या आधारानेच आम्ही आमची ही संसार-नौका हाकारून ती या संसारसागराच्या पैलतीराला नेण्याचा प्रयत्न करणार आहोत. आमच्या सारख्या आकंठ संसारात बुडून गेलेल्या व वासनांच्या जाळयात गुरफटलेल्या जडजीवांना आपल्या चरणां-शिवाय दुसरा आधारच नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

यामुळे या महामोहातून आम्ही जागृत व्हावे व या महामायेतून पार होऊन आपल्या भव्य, दिव्य व लोकोत्तर अशा आत्मस्वरूपाशी एकरूप होता यावे म्हणून आम्ही आपले परमभक्त व पूर्वाश्रमातील धाकटे बंधू श्रीसीताराममहाराज यांनी स्वत: म्हटल्याप्रमाणे " सद्‌गुरु केवळ ब्रह्मस्वरूप । मायिक धरिलें मानव रूप । ज्याच्या स्मरणें पळतें पाप । सीताराम जपि नित्य ।। " या न्यायाने फक्त आपलेच नामस्मरण करीत आहोत. आमची दयनीय व अत्यधिक जड अवस्था ध्यानात घेऊन आपण आपला कृपाकटाक्षलेश आमच्यावर टाकून आमचा उद्धार करावा अशी आमची आपल्या परमकोमलचरणी अत्यंत नम्र व करुणरसपरिप्लुत प्रार्थना आहे.

॥ पद ॥

गुरु हा केवळ माझा प्राण । इंद्रियें हालवि जो ।। धृ० ।।
कलियुगीं संन्यासी बनुनी । तीर्थें हिंडे जो अनुदिनीं ।
भक्तिमार्ग जना दाउनी । धर्मस्तंभा स्थापितसे ।। गुरु०।।१।।
श्रुतिस्मृत्यादिक आधार । देउनी ग्रंथहि केले फार ।
झाला व्यासांचा अवतार । भासे लोकां प्रत्यक्ष ।। गुरु०।।२।।
योगाभ्यासाची बहु प्रीत । शिष्यां शिकवुनि दाविति पंथ ।
ऐकुनि येती साधुसंत । दिसती जैसे कपिलमुनि ।। गुरु०।।३।।
वेदां न कळे ज्यांचा अंत । शेषहि थकला गावुनि गीत ।
भाविक भक्तांवरि बहु प्रीत । भक्तांहृदयीं वास करीं ।। गुरु०।।४।।
सद्‌गुरु केवळ ब्रह्मस्वरूप । मायिक धरिलें मानव रूप ।
ज्याच्या स्मरणें पळतें पाप । सीताराम जपि नित्य ।। गुरु०।।५ ।।

श्रीस्वामीमहाराज ! आपली समस्त जीवनचरित्रकथा ही श्रीनर्मदादेवीस्वरूप असल्यामुळे तिचे अत्यंत श्रद्धाभक्तिपूर्वक

अखंड वाचन, मनन व स्मरण केल्यानेच आम्हाला सद्गती मिळणार आहे, याबद्दल आमची पक्की खात्री झाली आहे. ज्याप्रमाणे श्रीनर्मदेच्या स्नानाने व जलपानाने जीवमात्र धन्य व कृतार्थ होतात असे श्रीव्यास महर्षींपासून श्रीमदाद्यशंकराचार्यांपर्यंत सर्वांनी अत्यंत उच्च घोषाने कथन केले आहे त्याप्रमाणेच आपल्या जीवनचरित्र-गंगेमध्ये स्नान करून व तिच्यातील अमृताचे पान करून आम्ही धन्य व कृतार्थ होऊ शकू. याशिवाय कोणताच अन्य उपाय आमच्या-सारख्या सामान्यांजवळ नाही, हे नितांत सत्य असल्यामुळे आपले परमभक्त व पूर्वाश्रमातील धाकटे बंधू श्रीसीतारामहाराज यांनी आपली "कांकड आरती" करून "करिती थोर जयजयकार। वासुदेव नामाचा ॥" असे म्हणून आपल्या नामाचा जसा जय-जयकार केला आहे त्याप्रमाणेच आम्हीही आपल्या नामाचा उच्च-रवाने जयजयकार करून आपल्या चरणकमली आमचे मन व अहंकार अर्पण करीत आहोत. या दोन्ही गोष्टी स्वीकारून आपण आम्हाला आपल्या स्वस्वरूपात एकरूप करून घ्यावे अशी आपल्या चरणी आमची नम्र प्रार्थना आहे.

॥ कांकड आरती ॥

आली विजयादशमी तिथी। भक्तजन हे मीळती ॥
होतसे कांकड आरती। माझ्या सद्गुरुरायाची,
स्वामी सद्गुरुरायाची ॥ धृ० ॥
उठा उठा भाविक जनें। त्रिगुणशय्या द्या सोडून ॥
अज्ञान आवरण काढून। जागृत व्हावें स्वरूपीं ॥ १ ॥
कामक्रोधादि दुर्मळ। सोडुनि व्हावें निर्मळ ॥
विवेककाष्ठें दन्मुखकमळ। शोधन बरवें सारावें ॥ २ ॥

इडापिंगला सुषुम्णा। हेचि त्रिवेणी हो जाणा ॥
येथें करोनि हो स्नाना। शांतिवसने नेसावीं ॥ ३ ॥
शुद्धभाव घेवोनि हातीं। ज्ञानटिळा रेखिजे माथीं ॥
जेणें न हो पुनरावृत्ती। कदाकाळीं कल्पांतीं ॥ ४ ॥
जीवेश्वराची ऐक्यता। हेचि संध्या सारा आतां ॥
मग निघोनि त्वरित। राउळीं यावें सत्वरीं ॥ ५ ॥
होतो वाद्यांचा गजर। भक्त मिळाले अपार ॥
करिती थोर जयजयकार। वासुदेव नामाचा ॥ ६ ॥
प्रेमभरें पहावें रूप। गावें नाचावें अमूप ॥
मग विदेहता ये आप। श्रीसद्‌गुरुप्रसादें ॥ ७ ॥
सीतारामाचा हा बोल। नका मानू तुम्ही फोल ॥
जेणे ऊर्ध्व पद पावाल। कांकडे आरति देखिलिया ॥ ८ ॥

॥ प्रातःस्मरणयुक्त ध्यान ॥

श्रीसद्‌गुरुं च यतिरूपधरं ह्यनन्तम् ॥
सच्चित्सुखं विधिहरीशमयं दयाब्धिम् ॥
भक्तिप्रियं भजदुःखहरं त्र्यधीशम् ॥
श्रीवासुदेवगुरुदत्तमहं नमामि ॥

॥ श्रीसद्‌गुरुप्रार्थना ॥

पिता माता बंधु तुजविण असे कोण मजला।
बहु मी अन्यायी परि सकळही लाज तुजला ॥
न जाणे मी कांहीं जपतपपुजा साधनरिती।
कृपा दृष्टी पाहें शरण तुज आलों गुरुपती ॥

॥ भजन ॥

गरुडेश्वरवासी दयाळा अंत किती पाहसी।
धांवत येई दर्शन देई आहे मी परदेशी ॥

परिशिष्ट क्रमांक १

लेखक :– श्री. दिनकरराव वासुदेवराव
उपाख्य पंडितकाका धनागरे बलवंत पेठ, भट गल्ली,
मु. पो. वाशीम जि. अकोला
पिन – ४४४५०५

श्रीथोरलेस्वामीमहाराज यांच्या हृद्य आठवणी

श्रीक्षेत्र चिखलदा

श्रीथोरलेस्वामीमहाराज अर्थात् श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेंबेस्वामीमहाराज यांचे जीवनचरित्र म्हणजे एक अथांग असा महासागरच आहे. कोणीही एखाद्याने आपले संपूर्ण आयुष्य खर्चून जरी त्यांच्या जीवनातील सर्व प्रसंग एकत्रित करून संकलित करतो असे म्हटले तरी ते शंभर टक्के पूर्ण होणे असंभवनीय आहे यात तिलःप्राय शंका नाही. श्रीनर्मदामैया व श्रीटेंबेस्वामी-महाराज हे दोन माझ्या निरंतरच्या अभ्यासाचे व आवडीचे विषय आहेत. श्रीस्वामीमहाराजांचे जेथे जेथे वास्तव्य झाले त्यांपैकी मलप्रभेपासून ब्रह्मावर्तापर्यंत अनेक ठिकाणी जाण्याचा आणि ती ठिकाणे अवलोकन करून तेथे वास्तव्य व अनुष्ठान करण्याचा मला लाभ झाला आहे. त्यावेळी त्या त्या ठिकाणी श्रीस्वामीमहाराजांच्या जीवनचरित्रातील अनेक हृद्य प्रसंग ऐकावयास मिळाले.

श्रीनर्मदातटाकी श्रीस्वामीमहाराजांनी एकंदर पाच चातुर्मास केले. त्यातील आठवा श्रीक्षेत्र तिलकवाडा, दहावा श्रीक्षेत्र चिखलदा,

सोळावा श्रीक्षेत्र बढवाई, बाविसावा श्रीक्षेत्र चिखलदा व तेविसावा श्रीक्षेत्र गरुडेश्वर या स्थानांमध्ये चातुर्मास झाले. अर्थात् श्रीनर्मदा-तीरावरील श्रीक्षेत्र चिखलदा येथे दोन चातुर्मास संपन्न झाले. श्रीक्षेत्र चिखलदा हे "अग्नितीर्थ क्षेत्र" असून तेथे महासती अनसूयेचे पिताश्री तपोनिधी श्रीकर्दममुनी यांनी तपश्चर्या केली होती. अशा या दिव्य व अलौकिक क्षेत्रात श्रीनर्मदा परिक्रमेच्या नंतर चातुर्मास करण्याचे सद्भाग्य प्रस्तुत लेखकाला लाभले आहे. श्रीनर्मदा परिक्रमा करीत असताना तिच्या किनारी तपश्चर्या केलेल्या संतांची बरीच माहिती मी संकलित केली आहे. हे काम करीत असताना एक मोठे बाड सापडले. त्यातील सगळ्या बोधक व हृदयस्पर्शी आठवणींपैकी श्रीस्वामीमहाराजांच्या संबंधी अत्यंत परिश्रमपूर्वक संकलित केलेल्या श्रीक्षेत्र चिखलदा येथील काही महत्त्वपूर्ण आठवणी येथे प्रकर्षत्वाने देत आहे.

श्री. विनायक भगवंत कवीश्वर या नावाचे एक मुन्सफ होते. इसवी सन १९१२ च्या मार्च महिन्यात निसरपूर येथे शंभर रुपये पगारावर त्यांची नियुक्ती झाली होती. तारुण्य, थोडीशी विद्या व निरंकुश वातावरण या सर्व गोष्टी त्यांच्या ठिकाणी एकत्रित झाल्या-मुळे ते विशेष करून आचारधर्म पाळीत नसत. मात्र श्री. गंगाधर-पंत वैद्य (महंमदपूरकर) यांच्या धाकामुळे ते थोडाफार आचार सांभाळून वागत असत. असे असले; तरी आपले स्वतःचे प्रामाणिक-पणे राहण्याचे तंत्र बिघडत चालले आहे असे त्यांना नेहमी जाणवत असे; कारण पक्षपात करणे, लोकांच्या नादी लागणे, मानसन्मान व सलाम—नमस्कारादि गोष्टींचा स्वीकार करणे या गोष्टी त्यांना मनापासून आवडत असल्यामुळे त्यांकडे त्यांचे फार लक्ष असे. एके दिवशी "श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेंबेस्वामीमहाराज या नावाचे

एक महात्मा श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले असून ते फारच कडकडीत तपस्वी आहेत," असे त्यांनी ऐकले. हे ऐकताच त्यांच्या मनात असा विचार आला की, "हे महात्मा संन्यासी कोण आहेत हे एकदा पाहू तर खरे! ते कसे आहेत व त्यांचे वैराग्य कडकडीत आहे म्हणजे काय आहे? हे त्यांना पाहिल्याशिवाय कसे कळणार!" अशा प्रकारे आपल्या मनातील विविध विचारांच्या तरंगांनी म्हणजे थोडी भीती, थोडी उत्सुकता, थोडी परीक्षा, थोडी भक्ती व थोडा कुत्सितपणा अशा मिश्र भावनांनी युक्त होऊन ते एके दिवशी श्रीक्षेत्र चिखलद्याला पोहोचले. तो इ. स. १९१२ मधील आषाढ शुद्ध एकादशीचा दिवस होता. ज्यावेळी श्री. कवीश्वर श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले त्यावेळी श्रीस्वामीमहाराज श्रीनर्मदातटाकी श्रीगंगामंदिरात बसले होते. ज्याक्षणी श्री. कवीश्वरांनी मंदिराच्या दाराशी बसलेली श्रीस्वामीमहाराजांची भस्म धारण केलेली तेजस्वी, दिव्य व अलौकिक अशी मूर्ती पाहिली त्याक्षणी त्यांच्या व्यक्तित्वाचा त्यांच्या मनावर अत्यंत विलक्षण असा परिणाम झाला.

श्री. कवीश्वर हे श्रीस्वामीमहाराजांना नमस्कार करून ज्यावेळी त्यांच्या जवळ बसले त्यावेळी बोलण्याच्या ओघात श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "वऱ्हाडात व मोगलाईत मुसलमानी राज्य असूनही तेथे व्यवस्था व धर्म चांगले आहेत." हे वाक्य ऐकताच आपल्या मनातील विचारच श्रीस्वामीमहाराज बोलून दाखवीत असल्याचे त्यांच्या प्रत्ययास आल्यामुळे ते अंतर्यामी आहेत अशी त्यांची खात्री पटली. त्यावेळीच "बहुधा हेच स्वामी आपल्या भागात एकदा झाबुवा येथे आले असता शिरायांनी त्यांना अडविले होते," असे विचार श्री. कवीश्वर यांच्या मनात येताच बोलण्याच्या ओघात श्रीस्वामीमहाराजांनी आपणही एकदा झाबुवा येथे गेलो

असता काय काय घडले याची सविस्तर हकीकत सांगितली. त्यावेळी श्री. कवीश्वर यांना असे वाटले की, "श्रीस्वामीमहाराजांच्या बोलण्यातून आपल्या गावाचा विषय निघावा." असा विचार श्री. कवीश्वर यांच्या मनात येताक्षणीच क्षणार्धात श्रीस्वामी-महाराजांनी त्यांना असे विचारले की, "आपण निसरपूरहूनच आलात ना? आपल्या गावाचा उच्चार ऐकून श्री. कवीश्वर यांना फार बरे वाटले. त्यानंतर "दक्षिण भारतात शैव व वैष्णव यांचा काय वाद आहे?" हे विचारण्याच्या बेतात श्री. कवीश्वर असतानाच त्यांना प्रश्नही विचारू न देता श्रीस्वामीमहाराजांनी नेमका तोच विषय काढून त्यांना तो सर्व विषय समजावून सांगितला. आपल्या मनात आलेले तीनही विषय श्रीस्वामीमहाराजांनी अंत-र्यामीपणाने जाणून ते सांगितल्याचे पाहून श्री. कवीश्वर त्यांच्या अंतर्यामीत्वाने फारच प्रभावित झाले.

श्री. कवीश्वर यांच्याशी चाललेला संवाद संपल्यानंतर तेथे जमलेल्या दहा-बारा मंडळींनी श्रीस्वामीमहाराजांची अशी प्रार्थना केली की, "प्रभो! आपण आता येथेच थांबावे व यावेळचा चातुर्मास येथेच करावा अशी आमची सर्वांची इच्छा आहे. तरी आपण आमची ही प्रार्थना मान्य करावी अशी आपल्या चरणी प्रार्थना आहे." त्या सर्व मंडळींची ही प्रार्थना ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "श्रीदत्तांची जशी इच्छा असेल तसे होईल. पौर्णिमेस श्रीगुरुमहाराजांची (ब्रह्मीभूत श्रीनारायणानंदसरस्वतीस्वामी-महाराज, उज्जयिनी यांची) पूजा चिखलद्यास झाली तर चातुर्मास नक्की येथे होईल. जशी श्रीदत्तांची इच्छा!"

त्यानंतर श्रीगुरुपौर्णिमेच्या पूर्वी एका रविवारी ही सर्व मंडळी पुन्हा श्रीस्वामीमहाराजांच्याकडे गेली. त्यावेळी त्या सर्व मंडळींना

श्रीस्वामीमहाराज असे म्हणाले की, "श्रीगुरुपौर्णिमेच्या दिवशी श्रीगुरूंच्या प्रसादास सर्वांनी जरूर यावे. येथे तर संन्याशाची भिक्षा आहे. तरी सर्वांनी अवश्य यावे." श्रीस्वामीमहाराजांच्या निमंत्रणानुसार श्रीगुरुपौर्णिमेच्या दिवशी ही सर्व मंडळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे आली. तेथे भिक्षान्न गोळा करून पाकसिद्धी झाली होती. श्रीस्वामीमहाराजांनी श्रीगंगामंदिरात श्रीगुरुपौर्णिमेच्या दिवशी व्यासपूजा अर्थात् आपल्या स्वतःच्या श्रीगुरूंची पूजा केली. तो सर्व समारंभ अप्रतिम असा होता. हा श्रीव्यास पूजेचा समारंभ संपल्यावर जमलेल्या सर्व मंडळींनी वरण, भात, पोळ्या, लाडू इत्यादि सर्व भोजनप्रसाद घेतला. त्या दिवशीच्या अन्नाचा स्वाद मोठा अपूर्व होता. श्रीस्वामीमहाराज स्वतः पंक्तीत फिरून गुळाचा खडा सर्वांना वाढीत होते व नम्रपणाने सर्वांना असे सांगत होते की, "पाहा बुवा! संन्याशाच्या भिक्षेचे अन्न आहे बरे!" त्या दिवशी सर्वांना दक्षिणाही दिली गेली. जो तो दुसऱ्याला असे सांगत होता की, "आज आपण इतके जेवलो की, एवढे कधीही जेवल्याचे आठवत नाही. अशा प्रकारचा अपूर्व स्वाद असलेले अन्न आपण यापूर्वी कधीच खाल्ले नाही."

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांच्या चातुर्मासाला प्रारंभ झाला त्यावेळी तेथे कॉलरा सुरू झाला. त्यामुळे श्रीस्वामीमहाराजांनी सर्व लोकांना असे कळविले होते की, "येथे कोणीही येऊ नये." अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांनी सर्व लोकांना निक्षून सांगून सुद्धा दर्शनार्थींची रीघ सुरूच असे. पुढे श्रीदत्तकृपेने कॉलऱ्याची शांती झाली. त्याबरोबर जमेल त्या साधनांनी आणि साधन उपलब्ध झाले नाही तर पायी-पायी, सर्व दिशांनी लोकांची ये-जा

सुरूच राहिली. या दिवसात तेथे येणाऱ्या सर्व मंडळींना श्रीदत्तांच्या दरबारात अन्नप्रसाद मिळत असे. सर्वात् आश्चर्याची गोष्ट अशी की, भोजन प्रसादास ऐनवेळी येणाऱ्या लोकांची संख्या श्रीस्वामीमहाराज आधीच सांगून ठेवीत असत. त्यामुळे स्वयंपाकी लोक अशा प्रकारे स्वयंपाक करीत असत की, अन्न कधीच कमी पडत नसे.

श्रीक्षेत्र चिखलदा येथं जे लोक दर्शनासाठी येत असत, ते बरोबर येताना काजू, बदाम, किसमिस, चारोळी, उत्तम खारका व खोबऱ्याचे तुकडे इत्यादि नानाविध वस्तू आणीत असत व तेथील श्रीदत्तमूर्तीसमोर ठेवीत असत. या वस्तूंचे पुरुषभर उंचीचे ढीग लागत असत. श्रीदत्तमूर्तीसमोर जमा झालेल्या या सर्व वस्तू श्रीस्वामीमहाराजांच्या सांगण्यावरून सर्व लोकांना प्रसाद म्हणून मिळत असत,

श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारात खडीसाखरेसहित सर्व प्रकारच्या साखरेवर पूर्णपणे बहिष्कार होता. इतकेच नव्हे; तर आरतीला कापूरही चालत नसे. श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारात सर्व पक्वान्ने अत्यंत उत्कृष्ट होत असत; पण ती कटाक्षाने गुळाचीच असत. गुळाची जिलबी देखील छान होत असे. सर्वकाही श्रीस्वामी-महाराजांच्या देखरेखीखाली होत असे; मात्र त्या पक्वान्नांपैकी किंवा अन्नापैकी ते स्वतः कधीही कांहीच ग्रहण करीत नसत.

श्रीस्वामीमहाराज तीन घरची भिक्षा मागून आणून ती श्रीनर्मदा-नदीत वुडवून प्रथम नीरस करीत व त्यानंतर त्या भिक्षेचे चार भाग करून त्यातील एक भाग जलचरांना, दुसरा भाग भूचरांना, तिसरा भाग भिक्षेकऱ्यांना व चौथा भाग समाजाला ज्ञान–वैराग्याचे वितरण करता यावे म्हणून स्वतः देहधारणेसाठी ग्रहण करीत असत. ते स्वतः ताक घेत असत. व इतरांनाही घेण्याची शिफारस करीत

असत. "अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त" असा गजर करून आलेली सर्व मंडळी जेवावयाला बसली व पंगती तृप्त व्हावयाला लागल्या की, श्रीस्वामीमहाराज आपण स्वतः कोठेतरी एकांतात निघून जात व तेथे बसून भिक्षा ग्रहण करीत असत.

एकदा बढवाणी संस्थानचे मुख्य न्यायाधीश श्री. परमानंद व मेजर श्री. रामप्रसाद दुबे हे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले. त्या दोघांना श्रीस्वामीमहाराजांना एकांतात भेटावयाचे होते. त्या दोघांची इच्छा कळताच श्रीस्वामी-महाराज हसले व त्यांनी त्यांच्या इच्छेप्रमाणे व्यवस्था केली. त्या दोघांची श्रीस्वामीमहाराजांशी एकांतात भेट होऊन बोलणे झाले. श्री. परमानंदसाहेबांची महत्त्वाकांक्षा आपण मुख्य दिवाण व्हावे अशी होती; परंतु बढतीच्या कामासंबंधी भेटीत काहीच निष्पन्न झाले नाही. त्यामुळे श्री. परमानंद उदास झाले. ही भेट संपल्या-नंतर श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना प्रसादाचे जेवण घेण्याचा आग्रह केला; परंतु आपले काम न झाल्यामुळे ते प्रसादाला नाही म्हणाले. त्यांची वृत्ती सकाम असल्यामुळेच त्यांनी प्रसाद घेण्यास नकार दिला. परंतु थोड्याच वेळात असा चमत्कार झाला की, श्रीस्वामी-महाराजांचे म्हणणे न ऐकल्यामुळे अर्थात् प्रसादाचा अनादर केल्या-मुळे श्री. परमानंद श्रीनर्मदानदीवर गेले असता तेथे त्यांना जबरदस्त घेरी आली. श्रीनर्मदेतच त्यांना सावरावे लागले. एक प्रकारे त्यांना ही शिक्षाच मिळाली. भविष्यात त्यांना मुख्य दिवाणाची जागा न मिळताच त्यांनी इहलोकीची यात्रा संपविल्याचे सर्वांना कळले.

एकदा बढवाणीचे एक पारशी न्यायाधीश श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र चिखलदा येथे आले. त्यावेळी त्यांनी श्रीस्वामी-महाराजांना असा प्रश्न विचारला की, "महाराज! न्याय कसा

करावा ? " हा प्रश्न ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, " मांजर ज्याप्रमाणे आपल्या पिल्लांना दातात धरून नेते त्याप्रमाणे न्याय करावा. आतून प्रेम असावे; मात्र त्याचबरोबर अपराध्याला अशी भीती असावी की, अपराधाबद्दल आपण कोणत्याही क्षणी चिरडले जाऊ ! असा न्याय करावा."

एक दिवस श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्री. त्रिभुवनसिंग सुभे हे आर्य समाजाचे एक गृहस्थ श्रीस्वामीमहाराजांकडे आले. आपण आर्य समाजाचे आहोत म्हणून व त्याची मते श्रीस्वामीमहाराजांना मान्य नाहीत हे त्यांना कळल्यामुळे श्रीस्वामीमहाराज आपल्यावर रागावतील असे त्यांना वाटले; परंतु ते आर्य समाजाचे आहेत म्हणून श्रीस्वामीमहाराज त्यांच्यावर रागवले नाहीत किंवा त्यांच्या संप्रदायाची मते आपल्याला मान्य नाहीत म्हणून त्यांचा त्यांनी अनादरही केला नाही. उलट अत्यंत प्रेमाने व आस्थेने त्यांनी त्यांची चौकशी करून त्यांच्याशी बोलणे केले. त्यामुळे श्री. त्रिभुवनसिंग सुभे यांना जे वाटत होते ते सर्व खोटे ठरले. श्रीस्वामीमहाराज प्रेमाशिवाय कोणाला कसलीही ताकीद देत नसत व ते व्यर्थ कधीही कोणावर रागवत नसत.

श्रीदत्तांच्या अर्थात् श्रीस्वामहारांच्या दरबरात नाना तऱ्हेचे अनेक लोक सतत येत असल्यामुळे कोठून काय काय पदार्थ येत असत हे काही सांगता येत नसे. त्यांचा दरबार नेहमीच कितीतरी उत्तम व भरपूर पदार्थांनी नुसता भरलेला असे. श्रीस्वामीमहाराज त्या सर्व पदार्थांना कधी स्पर्शही न करता आपल्या जवळील काही सेवकांना ते पदार्थ सर्वांना वाटून टाकण्यास सांगत असत. परंतु त्यातील काही सेवकांना तेथे जमलेल्या सर्व लोकांना ते पदार्थ भरपूर, सारखे व पोटभर वाटून देणे जमत नसे. असे करताना

त्यांचे पोट दुखत असे. ज्यावेळी अशा प्रकारे वागणाऱ्या सेवकांची संकुचितवृत्ती श्रीस्वामीमहाराजांच्या दृष्टोत्पत्तीस आली त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना तेथून निघून जाण्याची विनंती केली. श्रीस्वामीमहाराजांना पंक्तिप्रपंच, संकुचितवृत्ती व स्वार्थीपणा या गोष्टी बिलकुल आवडत नसत.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे दर्शनाला येणाऱ्या बऱ्याच महिला श्रीस्वामीमहाराजांकडे श्रीगुरूपदेश मागत असत. त्यावेळी श्रीस्वामी-महाराज त्यांना असे सांगत असत की, "पती हाच तुमचा गुरु आहे. तुम्हास दुसरा गुरू काय करावयाचा आहे ? " इतके सांगून झाल्यावर ज्या सौभाग्यवती स्त्रिया अधिकारी असत त्यांना त्यांच्या पतीची संमती असेल तरच अनुग्रह देत असत. मात्र विधवा स्त्रियांना श्रीदत्तप्रभूंचा आदेश घेऊनच श्रीगुरूपदेश देत असत व त्यांच्या इष्ट देवतेचीच त्यांना उपासना करण्यास सांगत असत. ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांना पुरुष लोक अनुग्रह मागत असत त्यावेळी त्यांचे जे इष्ट दैवत असेल त्या इष्ट देवतेचाच त्या पुरुषाला त्याच्या परमकल्याणार्थं जप व उपासना करण्यास सांगत असत. श्रीस्वामी-महाराज आपली स्वतःची उपासना व पूजा करण्यास कधीही सांगत नसत.

श्रीक्षेत्र चिखलद्याला मुक्कामं असताना श्रीस्वामीमहाराजांच्या सेवेत श्री. गंगाधर अण्णाजी वैद्य, महंमदपूरकर (निसरपूरकर); दुसते वेदमूर्ती श्री. वासुदेव ब्रह्मचारी आणि तिसरे श्री. वासुदेव-शास्त्री टिल्लू हे होते. हे तिघेहीजण अत्यंत सुपात्र असे सेवक आहेत हे पाहून त्यांनी त्या तिघांवर अपार कृपा केली. श्री. गंगाधरपंत वैद्य हे तर खरे विदेही पुरुषच होते.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे एके दिवशी एका गृहस्थाने एकदा बरीच

रक्कम आणून ती श्रीदेवांसमोर मोठ्या अहंकाराने ठेवली व ते श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "महाराज ! या द्रव्यातून माझ्यातर्फे उद्या ब्राह्मणभोजन करा." हे ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्या गृहस्थांना असे म्हणाले की, "ठीक आहे." वास्तविक पाहता आपण काहीतरी विशेष मोठे करीत आहोत अशा अहंकारी भावनेने देवासमोर कोणीही द्रव्य ठेवू नये. अर्थात् या दोषामुळे दुसऱ्या दिवशी अर्ध्या लोकांचे जेवण झाल्याबरोबर सर्व स्वयंपाक संपून गेला. पुन्हा नवीन भात टाकावा लागला. श्रीस्वामीमहाराजांच्या येथे स्वयंपाक अर्ध्यातच संपण्यासारखी कधीही न घडणारी गोष्ट आज घडली, हे ज्यावेळी त्या गृहस्थांच्या कानावर गेले त्यावेळी त्याचा गर्व व अहंकार आपोआपच दूर झाला. अभिमानी माणसाचा गर्व व अहंकार हरण करून त्याला मार्गी लावणे व गरीबांचा गौरव करणे हा तर श्रीस्वामीमहाराजांचा खेळ होता. ही त्यांची अवतार लीला होती. ही लीला पाहण्यास, ती कळण्यास व त्यांच्या अंतरंगात शिरून त्याच्या परार्थाची प्रचीती येण्यास महद्भाग्यच पाहिजे, हेच खरे आहे !

श्रीस्वामीमहाराज कधी कमी विनोदही करीत असत. जो अत्यंत गरीब व खरा भावुक भक्त असेल त्याला ते असे सांगत असत की "उद्या तुमच्याकडून स्वाहाकार व ब्राह्मणभोजन होईल बरे !" हे ऐकताच त्या बिचाऱ्या गरीब भक्ताची अगदी त्रेधातिरपीट उडत असे. त्याच्या जवळ मुश्किलीने एक-दोन रुपये असत. भोजनास तर कमीत कमी तीन–चारशे पान निश्चित असे. त्यात पुन्हा स्वाहाकाराची भर असे. त्यामुळे तर त्या भक्ताच्या त्रेधेला सीमा राहत नसे. त्यावेळी जमलेले इतर सर्व लोक ही गंमत पाहात असत. असतील त्या गरीबाने त्याच्या जवळ असलेले एक-दोन रुपये

इत्यादि जे काही ठेवण्यासारखे असतील ते देवापुढे ठेवले की, श्रीस्वामीमहाराज स्वत: त्याचे पाठीराखे बनून एखाद्या श्रीमंत यजमानापेक्षाही उत्कृष्ट प्रयोजन करवीत व त्या गरीबाचा गौरव करीत असत. त्या दिवशी सर्व प्रयोजन झाले की, श्रीस्वामी-महाराज सर्वांसमोर असे जाहीर करीत की, "आजचे यजमान हे गरीब गृहस्थ आहेत बरे!" केवढे भाग्य त्या गृहस्थांचे! अहं-काराच्या भानगडीत पडू नये, असा बोधच श्रीस्वामीमहाराज वरील प्रसंगातून करीत असत, यात काही शंकाच नाही. हा बोध आपणास घेता येणार नाही काय?

श्रीस्वामीमहाराज द्रव्याने गरीब स्थितीत असलेल्या माणसाला जसे काहीही उणे पडू देत नसत तसेच विद्येने व बुद्धीने कमी असलेल्या मनुष्याचा देखील अपमान होऊ नये म्हणून दक्ष असत. एके दिवशी श्रीक्षेत्र चिखलदा येथे काशीचे एक विद्वान् घनपाठी ब्राह्मण आले. श्रीस्वामीमहाराजांनी सकाळी त्यांनी केलेले वेदपठण ऐकले व रात्री वसंतपूजा ठरविली. त्याच दिवशी सायंकाळी एक गरीब ब्राह्मण गृहस्थ श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला आले. त्यांचे शिक्षण फक्त ज्योतिष, छंद, निघंटू इत्यादि वेदांगाचेच झाले होते. श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे सांगितले की, "आज रात्री तुम्ही वसंतपूजेला बसावे." हे ऐकताच "काशीच्या विद्वान् घनपाठी ब्राह्मणासमोर आपला टिकाव कसा लागणार?," या विचाराने त्या गरीब ब्राह्मण गृहस्थांना आपली रात्री होणाऱ्या फजितीची फारच भीती वाटली. परंतु श्रीसद्‌गुरुनाथ श्रीस्वामीमहाराज सर्वांना सांभाळणारे "समर्थ" व "दीनदयाळ" होते.

त्या दिवशी वसंतपूजेला सुरवात झाल्यावर श्रीस्वामीमहाराजांनी गंमत केली. अत्यंत विद्वान् लोक ज्योतिषाकडे दुर्लक्ष करतात हे

लक्षात घेऊन श्रीस्वामीमहाराजांनी जमलेल्या सर्व विद्वानांना असे सांगितले की, "आज ज्योतिष होऊ द्या." त्यानंतर ज्योतिष-शास्त्राच्या चर्चेस प्रारंभ होण्यापूर्वी श्रीस्वामीमहाराजांनी त्या गरीब ब्राह्मण गृहस्थांच्या जिभेवर विभूती अभिमंत्रित करून प्रोक्षण केली. ज्यावेळी तेथे जमलेल्या सर्व विद्वानांनी श्रीस्वामी-महाराजांची ज्योतिषशास्त्राच्या चर्चेची प्रदर्शित केलेली इच्छा ऐकली त्यावेळी ते सर्वजण गप्प बसले; कारण त्यांना ज्योतिष-शास्त्राचे ज्ञान नव्हते. मात्र श्रीस्वामीमहाराजांनी कृपा करून त्या गरीब ब्राह्मण गृहस्थांच्या जिभेवर विभूती प्रोक्षण करून जे दिव्य ज्ञान दिले होते, त्यामुळे त्यांना ज्योतिषशास्त्रात दिव्य गती उत्पन्न होऊन ते चांगले साधले व त्यांची फजिती झाली नाही. श्रीस्वामी-महाराजांच्या या कृपेमुळे त्या ब्राह्मण गृहस्थांना अत्यंत धन्यता वाटली. शेवटी श्रीस्वामीमहाराजांनी सर्वांना दक्षिणा देऊन संतुष्ट केले. "अल्पज्ञांचा अवमान होऊ नये," असे श्रीस्वामीमहाराज नेहमी म्हणत असत.

श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारात रोज उसळ, भाज्या, वगैरे सर्व पदार्थ होत असत. श्रीस्वामीमहाराजही स्वतः भाज्या निवड-ण्यास व चिरण्यास बसत असत. हे काम करताना ते सर्व लोकांना असे म्हणत असत की, "देवाच्या सेवेची अनंत माध्यमे आहेत. साधकाला कोणतेही काम करण्याची लाज वाटता कामा नये. आपण प्रत्येक काम ईश्वरप्रीत्यर्थ केले की, ती सेवा भगवंताला पोहोचलीच म्हणून समजा." श्रीस्वामीमहाराज शेंगांचे दाणे काढणे, होला सोलणे आणि रताळी, पेणखजूर व आरबी इत्यादि वस्तू धुण्यास स्वतः बसले की, मग काही विचारण्याची सोयच नसे. तेथ चालू असलेल्या सर्वच कामांना सर्व माणसांचा हातभार लागत असे

व तेथील प्रचंड कामे पाहता पाहता भरकन् होऊन जात असत. अशा प्रकारे श्रीक्षेत्र चिखलदा येथे ज्यावेळी सर्व लोक एकत्र येऊन तेथील कामे त्वरित गतीने मन लावून, प्रेमाने व श्रद्धाभक्तिपूर्वक करीत असत त्यावेळी तो देखावा मोठा प्रेक्षणीय असे. त्यावेळी बोलता बोलता हजारोंना पुरेल इतकी भोजनाची सामुग्री तयार होत असे.

ही सर्व कामे करीत असताना श्रीस्वामीमहाराजांची वैचारिक बैठक कायम असे. त्यामुळे बाहेर व्यावहारिक कामे चालू असली; तरी आतमध्ये अखंड आत्मानुसंधानात कसे राहावयाचे, हे लोकांना प्रत्यक्ष दिसत असे. श्रीस्वामीमहाराजांनी सर्व लोकांना कृतीने दिलेला तो वस्तुपाठच होता, असे म्हटले तर त्यात यत्किंचितही अतिशयोक्ती वाटण्याचे कारण नाही. बाहेर कामाशी व आतमध्ये आत्मारामाशी एकसमयावच्छेदेकरून कसे संलग्न राहावयाचे याचे श्रीस्वामीमहाराज प्रात्यक्षिकच दाखवीत आहेत, याची सर्वांना जाणीव होत असे. अशाप्रकारे आपणही असेच जीवन जगले पाहिजे याची प्रचोती सर्व लोकांना श्रीस्वामीमहाराजांच्या वागण्यातून, चालण्यातून व बोलण्यातून येत असे.

एकदा श्रीगंगामंदिरात दोन-चार मंडळी प्रसादाच्या वस्तू साफ करीत बसली होती. त्यावेळी श्रीस्वामीहाराज त्या लोकांना उद्देशून असे म्हणाले की, " प्रथम खजूर जर धुऊन घेतला तर तो उष्णता वाढवीत नाही. " त्यावेळी एकाने धैर्य करून श्रीस्वामीमहाजांना असा प्रश्न विचारला की, " महाराज ! जर कर्माचे फल भोगावयास कर्मच करावे लागते; तर मग प्रायश्चित्ताने काय होते ? " हा प्रश्न ऐकताच काम करता करता श्रीस्वामीमहाराज त्या गृहस्थांना उत्तर देताना असे म्हणाले की, " प्रायश्चित् तरी कर्मच आहे ना ? "

हे उत्तर ऐकताच प्रश्न विचारणाऱ्याच्या मनात लख्ख प्रकाश पडला.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराज रोज सकाळी उपनिषदे व श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा भाष्य पाठ सांगत असत. हा पाठ चालू असताना देखील कोणाचे कोठे काय अडले आहे, कोठे काय कमी पडते आहे व कोठे काय चालले आहे हे त्यांना बसल्या बसल्या समजत असे. स्वयंपाकात काही बिघाड झाला, भात बिघडला, जिलबी बिघडून ती करण्यास बायकांना सुधारेना अशी स्थिती तिकडे भंडाऱ्यात झाली की, श्रीस्वामीमहाराज जेथे बसलेले असत तेथे त्यांना अंतर्ज्ञानाने सर्व कळत असे. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज तत्काळ उठून फर्लांगभर अंतरावरील पाकशाळेकडे जात असत. तेथे गेले की, ते "श्रीगुरुदेवदत्त" असे म्हणून उभे राहात असत व स्वयंपाक करणाऱ्या बायकांना उद्देशून, "काहो बाई ! काय चालले आहे ?" असे विचारीत असत. श्रीस्वामीमहाराजांनी असे विचारल्यावर स्वयंपाक घरातील स्त्रिया असाहाय्य स्थितीत रडका चेहरा करून सगळी हकीकत सांगत असत. ती हकीकत ऐकली की, श्रीस्वामीमहाराज त्यावर उपाययोजना सांगत असत. "थोडे पाणी टाका, पदार्थ निखाऱ्यावर ठेवा, थोडे मोहन कडक घाला, अशा आवश्यक सूचना देऊन व त्या बिघडलेल्या पदार्थांकडे आपली अमृतदृष्टी टाकून ते निघून जात असत. हे घडले की, बिघडलेली ती वस्तू उत्तम होत असे. त्यानंतर जेवताना सर्व लोकांनी त्या पदार्थाची स्तुती केली की, स्वयंपाक करणाऱ्या सर्व बायकांना अत्यंत हायसे वाटत असे. हे पाहिले म्हणजे श्रीस्वामीमहाराजांसारखा स्वयंपाकांत निष्णात दुसरा कोणी असेल असे वाटत नाही. अशा प्रकारचे कौशल्य क्वचितच दृष्टीस पडणे शक्य

आहे. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांचे अवधान सर्वत्र असे. श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारात यथाशक्ती द्रव्य श्रीदत्तप्रभूंसमोर ठेवून अन्नसंतर्पणाचा पुण्यलाभ घडण्यासाठी देखील योगच लागत असे. पुढच्या पिढीस श्रीसद्गुरूंच्या सहवासाच्या सद्भाग्याची कल्पना यावी व अहोभाग्य काय असते हे कळावे म्हणून हेतुपुरस्सरच हा उल्लेख केला आहे.

श्रीस्वामीमहाराजांना कोणीही त्यांची स्तुती केलेली कधीच खपत नसे. एके दिवशी कोल्हापूरच्या दिवाणांचे पत्र आले. त्यात त्यांनी असे लिहिले होते की, "आपल्याच कृपेने मला नोकरीत उत्तम जागा मिळाली आहे; तरी दर्शनास येण्याची आज्ञा व्हावी." या पत्राला उत्तर देताना श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे लिहिले की, "आपण दर्शनास येऊ नये. ही कृपा आमची नव्हे. श्रीदत्तांची आहे. उपासना दृढ चालवावी." यावरून हे लक्षात येते की, श्रीस्वामीमहाराज कोणत्याही गोष्टीचे श्रेय स्वतःकडे घेत नसत.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे एके दिवशी इंदूर येथील एक गृहस्थ सर्वोत्कृष्ट तांदळाचे एक पोते घेऊन आले व त्यांनी ते श्रीस्वामीमहाराजांपुढे ठेवले. ते पाहताच श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे विचारले की "हे काय आहे?" हा प्रश्न ऐकताच ते गृहस्थ उत्तर देताना असे म्हणाले की, "महाराज! हे सर्वोत्कृष्ट तांदूळ असून ते आपल्यासाठीच आणले आहेत." त्या गृहस्थांच्या या उत्तरात उपकाराची भावना दिसून येताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "हे तांदुळाचे पोते प्रथम बाहेर काढा पाहू." श्रीस्वामीमहाराजांचे हे निष्काम व निस्पृह वर्तन पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे एके दिवशी सावेरचे एक विद्वान् कवी

श्री. बाळूभैय्या गणपतीबुवा आले. त्यांनी श्रीस्वामीमहाराजांना अशी प्रार्थना केली की, "प्रभो! आपल्यापुढे काही काव्य म्हणून दाखविण्याची इच्छा आहे, तरी आज्ञा व्हावी." श्री. बाळूभैय्यांनी अशी विनंती करताच श्रीस्वामीमहाराजांनी त्यांच्या मनातील भाव ओळखला व ते त्यांना असे म्हणाले की, "श्रीदत्तप्रभूंवर काही काव्य असल्यास ते म्हणावे. अन्य काही नको." अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांची आज्ञा मिळाल्यावर श्री. बाळूभैय्यांनी काव्य म्हणण्यास सुरवात केली. श्रीस्वामीमहाराजांच्या इच्छेप्रमाणे श्रीदत्तस्तुतीपर काव्य म्हणता म्हणता ते त्यांच्या स्तुतीपर काव्यही म्हणू लागले. हे ऐकताच श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना काव्य म्हणणे बंद करण्यास सांगितले. असा प्रकार तीन वेळा घडला. शेवटी श्री. बाळूभैय्यांना नाईलाजाने ते पद म्हणणे सोडून द्यावे लागले. "नाइकवे स्तुति वाणितां थोरीव। होतो माझा जीव कासावीस।" या श्रीसंत तुकाराममहाराजांनी स्वानुभूतीपूर्वक कथन केलेल्या न्यायाने श्रीस्वामीमहाराज आपली स्तुती आपल्या कानाने ऐकण्यास केव्हाही तयार नव्हते, हेच यावरून निर्विवादपणे स्पष्ट होते.

श्री. विनायक भगवंत कवीश्वर, निसरपूरकर यांचा उल्लेख सुरुवातीला आला आहे. या श्री. कवीश्वरांना आपल्या मनातून नेहमी असे जाणवावयाचे की, "आपले स्वतःचे संस्कार अत्यंत मलीन आहेत." खूप खावे, खूप प्यावे व मजा करावी असा त्यांचा जीवनक्रम चाललेला होता. त्यामुळे त्यांच्याकडून श्रीस्वामीमहाराजांची म्हणावी तशी सेवा घडत नव्हती. अशा स्थितीत त्यांना श्रीक्षेत्र चिखलदा येथे राहण्यासही मोठे जड वाटू लागले. मात्र यांच्या ठिकाणी अधिकाराची मस्ती व आवड कायम होती. श्रीस्वामीमहाराज रोज सकाळी श्रीमद्भगवद्गीता व उपनिषदे

समजावून सांगत असत; परंतु श्री. कवीश्वर यांचे दुर्दैव असे की, ते क्वचित्‌च सकाळी चालणाऱ्या पाठास जात असत. श्रीस्वामीमहाराजांकडून होणाऱ्या ज्ञानामृताचा लाभ घेण्याचे त्यांच्या नशिबात नव्हते हेच खरे.

कालौघात श्रीस्वामीमहाराजांचा मुक्काम श्रीक्षेत्र चिखलद्याहून हलला. त्यानंतर श्री. कवीश्वर यांना असे वाटू लागले की, "आपण श्रीस्वामीमहाराजांच्या सेवेचा व ज्ञानामृताचा लाभ घेतला असता, त्यांना शंका विचारल्या असत्या किंवा आपण आपल्या मनाला तरी "आपण असे का वागलो?" हे विचारले असते तर बरे झाले असते. आपण हा लाभ घेतला असता; तर आपल्या हृदयामध्ये ज्ञानाचे भांडार भरले असते व श्रीस्वामीमहाराजांच्या चरणसेवेने आपला उद्धार झाला असता." अशा रीतीने श्री. कवीश्वर यांना मागाहून खूप पश्चात्ताप झाला. त्यांच्या या पश्चात्तापामुळे दयाळू श्रीगुरुमाउलीने त्या वाट चुकलेल्या बालकाला कालांतराने योग्य मार्गावर आणले. खरोखर! जो श्रीस्वामीमहाराजांच्या चरणाशी एकदा जरी विनटला; मग तो कितीही सामान्य दर्जाचा असला, तरी त्याला पश्चात्ताप झाल्यावर श्रीस्वामीमहाराज त्याचा उद्धार करतातच करतात, हे नितांत सत्य आहे.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे ग्वाल्हेर, उमरेड, वाशीम, बेळगाव इत्यादि सुदूर अंतरावरची पुरुष भक्त मंडळी, महिला वर्ग, पेढीवाले श्रीमंत असे सर्व प्रकारचे हजारो लोक, हजारो रुपयांचे साहित्य बरोबर घेऊन श्रीस्वामीमहाजांच्या दर्शनासाठी येत असत. या सर्व लोकांना चोरांची जरा जास्तच भीती वाटत असे.. श्री. कवीश्वर यांना अधिकार गाजवण्याची खास हौस असल्यामुळे त्यांनी आपल्या अधिकाराचा उपयोग करून आसपासच्या भिल्लांचा कडक बंदोबस्त

केला. त्याचा परिणाम असा झाला की, जे भिल्ल लोक नावा चालवून लोकांची पैलतीराला ने–आण करीत होते व जे भिल्ल भांडी घाशीत होते ते पैसे देऊन व खावयाला–प्यावयाला देऊनही काम करावयास येईनासे झाले. यामुळे सर्व लोकांची मोठी अडचण होऊ लागली. शेवटी श्रीस्वामीमहाराजांनी या सर्वांची समजूत घालून ही दोन्ही कामे सुरळीत चालू केली. ज्यावेळी ही कामे पूर्ववत् व्यवस्थित होऊ लागली त्यावेळी हे कसे घडले हे सांगताना श्रीस्वामीमहाराज सर्वांना असे म्हणाले की, "ही सर्व कामगिरी कवीश्वरांचीच बरे! त्यांच्यामुळेच तुम्हा सर्व लोकांची सोय झाली." एखाद्या कामाचे श्रेय दुसऱ्याला देऊन त्याचे कौतुक करावयाचे ही श्रीस्वामीमहाराजांची रीतच होती. एवढेच नव्हे; तर कोणत्याही छोटया कामाचे व सर्वांचेच ते कौतुक करीत असत. एकदा एखाद्याला हाताशी धरले की, शेवटपर्यंत त्याला सोडावयाचे नाही, ही संतांची रीतच श्रीस्वामीमहाराजांच्या या वागण्यातून पावलो पावली प्रत्ययास येत असे.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे एकदा श्री. नारायणराव दफ्तरदार श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी त्यांच्या दरबारात आले. त्याच वेळी श्री. गंगाधरपंत वैद्य, महंमदपूरकर (निसरपूरकर) यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. गणपती तेथे होते. त्यावेळी श्री. दफ्तरदारांची मुलगी आणि श्री. गणपती यांचा मंगल विवाह श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारातच सुनिश्चित झाला. पुढे लवकरच त्यांचा लग्नसोहळा श्रीक्षेत्र चिखदा येथे मोठया थाटात साजरा झाला. खरोखर ! या दोघांचे अहोभाग्य असे की, साक्षात् श्रीदत्तावताराचे उपस्थितीत त्यांना गृहस्थाश्रमाचा स्वीकार घडला. खरोखर धन्य हे पतीपत्नी आणि धन्य त्यांचा गृहस्थाश्रम ! या भाग्यवान् बाई

सध्या हयात असून हल्ली त्यांचा निवास अहमदाबाद येथे आहे.

श्रीस्वामीमहाराज स्वतः अत्यंत वक्तशीर होते. त्यांचा नियमितपणा आश्चर्यकारक होता. सकाळची आसने शिकविणे, उपनिषदपाठ घेणे, ब्राह्मण भोजन, भजनाचा प्रारंभ व त्याची समाप्ती हे सर्व कार्यक्रम अगदी वेळच्या वेळी होत असत. यातील एकाही कार्यक्रमाची वेळ कधीही चुकत नसे. श्रीक्षेत्र चिखलदा येथे थंडीच्या दिवसात ज्यावेळी नामसप्ताह झाला त्यावेळी श्रीस्वामीमहाराज दर दोन तासांनी स्वतः पहारा बदलण्याची आठवण करून देत असत. त्यांची ही जागरुकता पाहिली की, सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटत असे.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे मुक्काम असताना बढवाणीच्या राजाच्या आमंत्रणानुसार एकदा श्रीस्वामीमहाराज एका ब्रह्मचारी साधकांना आपल्याबरोबर घेऊन सोवळ्यात नावेने वढावणीच्या राजघाट येथील मंदिरात भजनासाठी गेले. ठरल्याप्रमाणे तेथे भजन सुरू झाले; मात्र सायंकाळच्या संध्येची वेळ होताच श्रीस्वामीमहाराज भजनातून उठले व राजाकडे नुसते पाहून काही एक न बोलता ते तडक खाली उतरून घाटावर आले. श्रीस्वामीमहाराजांबरोबर जे ब्रह्मचारी साधक आले होते त्यांना "मी फार जलद चालणारा आहे," असा अभिमान होता. परंतु ज्यावेळी श्रीस्वामीमहाराज घाट उतरून श्रीनर्मदानदीकडे जाऊ लागले त्यावेळी तेही उठून त्यांच्या बरोबर चालू लागले. परंतु श्रीस्वामीमहाराज इतक्या वेगाने चालले होते की, ते ब्रह्मचारी साधक पार मागे पडले. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांची चालण्याची शक्ती पाहिल्यावर त्या ब्रह्मचारी साधकाचा गर्व पार वितळून गेला. श्रीस्वामीमहाराजांची चालण्याची अपूर्व स्फूर्ती काही अलौकिकच आहे याचा त्या ब्रह्मचारी साधकांना ...

मनोमन प्रत्यय आला. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांच्याबरोबर जे लोक येण्यास निघाले ते सर्वजण मागेच राहून गेले. या सर्व प्रसंगातून श्रीस्वामीमहाराजांचा वक्तशीरपणा, योगसाधनेने हलके झालेले शरीर, चालण्याचा विलक्षण वेग, निरहंकारीपणा, निर्मानीपणा, संध्येचा कटाक्ष इत्यादि सर्व काही लोकांना पाहण्यास मिळाले. एवढेच नव्हे; तर ब्रह्मचारी साधकाच्या द्वारा गर्वाचे घर देखील खाली झालेले बघण्यास मिळाले.

श्रीस्वामीमहाराज हे कमालीचे निराग्रही होते. यामुळेच श्री. कवीश्वर हे मुन्सफ अधिकारी असले तरी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे कधीही म्हटले नाही की, "तुम्ही येथे अमुक करा किंवा अमुक एक कार्य करून द्या. अथवा तुम्ही तुमच्या अधिकाराचा वापर करून येथे अमुक एक व्यवस्था करून द्या." श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना कधीच काहीही मागणी केली नाही. श्रीस्वामीमहाराज राजकीय व्यवहारात कधीही चुकीचा किंवा वाईट सल्ला देत नसत वढवाणीच्या राजाला ते असे कधीच सांगत नसत की, "तुम्ही राज्य सोडा व भजनाला लागा." ते राजाला आपले कर्तव्यच चोख करावयास सांगत असत. अनेक स्त्रिया श्रीक्षेत्र चिखलदा येथे येत असत. त्यांनी श्रीदत्तप्रभूंची सेवा करण्याची इच्छा प्रकट केली की, ते त्यांना पतीसेवा करण्यास सांगत व पाकगृहात पाठवून देत असत. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराज कोणासही आपला धर्म किंवा उपासना सोडण्यास सांगत नसत आणि श्रीदत्तोपासनाच सर्वांनी केली पाहिजे असा आग्रह तर ते कधीही धरीत नसत.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे रोजच पक्वान्नांचे जेवण चालू असे. यामुळे रोज खूप खूप गोड खाऊन तोंड फिरले म्हणून एकदा श्री. मुकुंदराव या नावाचे एक गृहस्थ श्रीस्वामीमहाराजांना असे

म्हणाले की, "महाराज ! येथें फारच तकलीफ आहे !" श्रीमुकुंदराव असे म्हणताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "काय तकलीफ आहे बुवा ?" हे ऐकताच श्री. मुकुंदराव त्यांना असे म्हणाले की, "महाराज ! खूप गोड खाऊन खाऊन तोंड फिरले आहे !" त्यांचे हे म्हणणे ऐकताच श्रीस्वामीमहाराज हसले व त्यांनी त्या दिवशी फोडणीचे वरण इतके उत्कृष्ट करविले की, तसा स्वाद श्री. मुकुंरावांनाच काय; पण इतर कोणासही उभ्या आयुष्यात कधी चाखावयास मिळाला नाही.

श्रीक्षेत्र चिखलद्याला खूप थंडी पडली की, श्रीस्वामीमहाराज सर्वांसाठी गुळाचा गवती चहा करवीत असत. श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारात खडीसाखर, साखर व कापूर यांना प्रवेश नव्हता. श्रीखंडात गूळही वर्ज्य असल्यामुळे बेदाणा उत्तम भाजून तो दह्याच्या चक्क्यात गाळला की, अपूर्व श्रीखंड तयार होत असे. श्रीस्वामीमहाराजांच्या दरबारात आवश्यकतेनुसार सर्व पदार्थांची पूर्ती होत असे.

श्रीस्वामीमहाराज समाधानकारक, शुद्ध व आचरणयुक्त म्हणजे जेथें सोवळ्यात नैवेद्य, वैश्वदेव होत असे अशा घरातून भिक्षा घेत असत. अशी भिक्षा मिळाली नाही तर श्रीस्वामीमहाराज आपल्या भ्रमणकालात किती दिवस व कोठे कोठे उपवास काढीत असत हे काही सांगता येत नाही. मात्र श्रीस्वामीमहाराजांनी सर्व इंद्रिये जिंकल्यामुळे त्यांना अशा प्रकारे उपवास काढणे हे सोपे होते. श्रीस्वास्वामीमहाराजांची जिव्हा तर इतकी ताब्यात होती आणि त्यांनी रसनेवर तर इतका विजय मिळविला होता की, श्रीक्षेत्र चिखलदा येथे त्या काळात हजारो रुपये खर्चून सुंदर सुंदर व उत्तमोत्तम पक्वान्नांचे संतर्पण रोज चालत असे; परंतु त्यातून

प्रत्यक्षात अपरिहार्य कारणांमुळे एक किंवा दोन वेळांशिवाय त्यांनी कधीही भिक्षा घेतली नाही.

श्रीस्वामीमहाराजांनी जशी रसना जिंकली होती तसाच झोपेवरती देखील त्यांचा विलक्षण ताबा होता. याचे प्रत्यंतर श्रीक्षेत्र चिखलदा येथे अनेक वेळा येत असे. कधी-कधी बाहेरून दर्शनासाठी आलेल्या मंडळींपैकी लोकांना रात्री दहा वाजल्यानंतर सवड मिळत असल्यामुळे ते लोक त्यावेळी आध्यात्मिक विषयावर प्रश्न विचारीत असत. अशा प्रकारे एकदा शंका-समाधान सुरू झाले की, ते कधी-कधी रात्री दोन वाजेपर्यंत चालत असे. त्यानंतर सर्वजण झोपी जात असत. परंतु श्रीस्वामीमहाराज नेहमीप्रमाणे लगेच चार वाजता उठून श्रीनर्मदास्नानासाठी जाण्यास निघत असत. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजापुढे थंडी-वाऱ्याचा प्रश्नच कधी उत्पन्न होत नसे. श्रीस्वामीमहाराजांची ही विदेही अवस्था पाहिली की, लोकांचे मन आश्चर्याने दिङ्मूढ होत असे; कारण हे सर्व अपरूप होते व आजही आहे.

श्रीस्वामीमहाराजांइतके स्वयंपाकात ज्याप्रमाणे कोणी प्रवीण नव्हते त्याप्रमाणे वैद्यकीतही त्यांचा हात कोणी धरणे शक्य नव्हते. श्रीक्षेत्र चिखलद्याच्या मुक्कामात शेकडोशे रोगी त्यांच्याकडे येत असत. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज त्यांना औषधे देऊन रोगमुक्त करीत असत. याशिवाय पत्रद्वारे उपाय सुचवून श्रीस्वामीमहाराज शेकडोशे भक्तांना व्याधिमुक्त करीत असत. श्रीस्वामीमहाराज श्रीनर्मदानदीवरून वनस्पती आणून त्यापासून लालरंगाच्या गोळ्या स्वतः तयार करून ठेवीत असत. आपली वैद्यकीची ही विद्या श्रीस्वामीमहाराजांनी श्रीगंगाधरपंत वैद्य यांनाही दिली होती. त्यामुळे क्षयासहित इतर सर्व असाध्य रोग बरे करण्यात

श्री. गंगाधरपंत यांना हमखास यश मिळत असे. "श्रीगुरुकृपाहि केवलम् ।" हेच या यशाचे एकमात्र कारण होते. श्री. गंगाधरपंत वैद्य यांच्यावर श्रीस्वामीमहाराजांची अपार व असीम कृपा होती हेच खरे !

श्रीस्वामीमहाराज ज्योतिषशास्त्रातही अत्यंत निष्णात होते. एखाद्या स्वप्नासंबंधी खुलासा विचारल्यास ते लगेच त्याचे स्पष्टीकरण करीत असत. "वेदशास्त्रसंपन्न" ही पदवी खऱ्या अर्थाने श्रीस्वामीमहाराजांनाच शोभून दिसत असे. श्रीस्वामीमहाराजांना सर्व वेद मुखोद्‌गत असून त्या सर्व वेदांचा अर्थही तयार असे. श्रीस्वामीमहाराज उपनिषदे व पुराणे अपूर्व पद्धतीने व अप्रतिम रीतीने सांगत असत. त्यांच्या सारखा विद्वान् प्रवचनकार या भूतलावर होणे ही दुर्मिळ गोष्ट आहे, असा सर्व वेदशास्त्रपंडितांनी एकमुखाने निर्णय दिला होता. श्रीस्वामीमहाराज संस्कृतचे कल्पनातीत विद्वान् होते. याची प्रचीती त्यांच्या सर्व ग्रंथावरून उत्तमरीतीने येते. ते वेदातील ऋचा आपल्या ग्रंथात अत्यंत अप्रतिमपणे गोवीत असत. कोणात्ररही संकटपर प्रसंग आल्यास ते एखादा मंत्रजप सांगून त्याची सुटका करून संकट टाळीत असत. याचा अनुभव अनेक साधकभक्तांनी घेतल्याची प्रचीती त्यांनी लिहून ठेवलेल्या घटनांवरून दिसून येते. श्रीस्वामीमहाराज मराठीत बोलत असत. त्यांना हिंदी व गुजराथी भाषा समजत असत. संस्कृत भाषा तर ते उत्तमच बोलत असत. श्रीस्वामीमहाराज त्यांना आलेल्या पत्रांना तत्काळ उत्तरे देत असत; मात्र ही सर्व उत्तरे अत्यंत संक्षिप्त व कमालीची मार्मिक असत. ज्यावेळी पत्र लेखकाला उत्तर मिळे त्यावेळी "हजारो लोकांमधून व भक्तांमधून श्रीस्वामीमहाराजांचे लक्ष आपल्याकडे कसे राहिले आणि दिवसभरच्या

कार्यक्रमांच्या गर्दीतून त्यांनी आपणास उत्तर कसे लिहिले," असा विचार मनात येऊन पत्रवाचकास आश्चर्य वाटत असे व तो स्वत:ला धन्य मानीत असे.

श्रीस्वामीमहाराज व्यवहारात अतिशय चोख असत. एखाद्याची खाजगी गोष्ट दुसऱ्याला कळणार नाही याची ते नेहमी काळजी घेत असत. एवढेच नव्हे; तर आपले सर्व व्यवहार इतरांना कळणार नाहीत असे करावेत अशीच त्यांची शिकवण असे पत्रामध्ये आपण ज्याप्रमाणे अमुकास नमस्कार, आशीर्वाद इत्यादि लिहितो त्याप्रमाणे श्रीस्वामीमहाराज सर्वांना न विसरता " नारायण " असे लिहीत व या शब्दाने ते सर्वांना आशीर्वाद देत असत. श्रीस्वामीमहाराज स्वत: फारच जलद–कलमी होते. एकदा एका गृहस्थांनी स्वत:च्या हाताने काढलेल्या सुताने विणलेली जाडी-भरडी कौपीन (लंगोटी) आणली. त्या गृहस्थांच्या मेहनतीचे व देशी वस्तूंच्या प्रेमाचे श्रीस्वामीमहाराज कितीतरी वेळा कौतुक करीत असत. त्याचप्रमाणे ते मल्लविद्या, देशी गायन व देशी कला यांचेही कौतुक करीत असत. श्रीस्वामीमहाराजांचा स्त्रियांच्या मर्यादेवर फार कटाक्ष असे. श्रीस्वामीमहाराजांची स्मरणशक्ती अत्यंत अपूर्व अशी होती. त्यामुळे त्यांच्याकडे दर्शनासाठी येणाऱ्या शेकडोशे भक्तांमधून देखील ते नेमके अमुक आले नाहीत, ते आज गैरहजर कसे याची चौकशी करीत असत. इतकेच नव्हे; तर आपल्या भक्तांच्या भेटी झाल्या की, ते त्यांच्या घरच्या लोकांची अगदी आस्थेवाईकपणे व नाव घेऊन बारकाईने चौकशी करीत असत.

एकदा श्रीक्षेत्र चिखलदा येथे मंडलेश्वराहून काही भजनी मंडळी आली. त्यांनी श्रीस्वामीमहाराजांपुढे गायनपूर्वक भजन म्हणण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी

त्यांना असे सुचविले की, “ खऱ्या भजनात फार गूढ गाणे नको बरे ! सर्वात् महत्त्वाची गोष्ट “ भावच ” आहे. ” हे ऐकताच त्या सर्व भजनी मंडळींनी भावपूर्वक भजनगायन केले. भजन–गायन संपल्यावर श्रीस्वामीमहाराजांनी त्या सर्व मंडळींना असे विचारले की, “ काहो मंडळी ! असे कोणते वृत्त आहे की, जे वाटेल त्या रागात जुळते ? ” हा प्रश्न भजनी मंडळीतील सर्व लोकांनी ऐकला; पण त्यांच्यापैकी कोणालाही काहीही सांगता आले नाही व या प्रश्नाचे उत्तरही देता आले नाही. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज असे म्हणाले की, “ त्रोटक वृत्त हे वृत्तच सर्व रागांना जुळते.” ही सर्व कथा वाचली म्हणजे श्रीस्वामीमहाराजांचे गायन कलेचे व वृत्तांचे सखोल ज्ञान व अध्ययन होते हे लक्षात येते.

श्रीस्वामीमहाराज हे अत्यंत क्षमाशील व दयावान् होते. “ जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत ॥१०.११८॥ ” या श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीत सांगितलेल्या वचनाचा प्रत्यय त्यांच्या कृतीतून नेहमी प्रकट होत असे. एकदा नेहमीप्रमाणे सायंकाळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे बरीच मंडळी पुराणश्रवणास बसली होती. ज्यावेळी पुराण संपले त्यावेळीच काही भिल्ल मंडळी श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेण्यासाठी तेथे आली. हा साधारण सायंकाळी पाच वाजण्याचा सुमार होता. त्या सर्व भिल्ल मंडळींच्या मनात श्रीस्वामीमहाराजांच्या चरणावर मस्तक ठेवून दर्शन घ्यावे अशी इच्छा होती. त्या सर्वांची ही इच्छा त्यांच्यातील एका प्रमुख भिल्लाने श्रीस्वामीमहाराजांच्या कानावर घातली. त्या सर्व भिल्ल मंडळींची ही इच्छा पाहून व त्यांचे मन दुखविले जाऊ नये म्हणून अत्यंत दयेने श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना संमती दिली व ते तेथेच उभे राहिले. श्रीस्वामीमहाराजांची संमती मिळताच त्या सर्व भिल्ल मंडळींनी

त्यांच्या पायावर मस्तक ठेवून मनसोक्त दर्शन घेतले. त्यामुळे त्यांना परमानंद झाला. अशा प्रकारे संमती देताना श्रीस्वामीमहाराजांनी त्या भिल्लांचा शुद्ध भावच पाहिला. त्या भिल्लांच्या प्रेममय भावाने श्रीस्वामीमहाराजही प्रेमविभोर झाले. खरोखर ते भिल्ल धन्य होत. त्या भिल्लांच्या गोपीसदृश विशुद्ध भावामुळेच त्यांना श्रीस्वामीमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवून नमस्कार करण्याचा व दर्शन घेण्याचा अपूर्व लाभ घडला. एरवी श्रीस्वामीमहाराज अखंड सोवळ्यातच असत व कोणीही त्यांना स्पर्शपूर्वक नमस्कार करीत नसत. सर्वजण लांबूनच नमस्कार करीत असत. श्रीस्वामीमहाराजांच्या या नियमामुळे तेथे जमलेल्या काही मंडळींच्या मनात विकल्प आला; परंतु हा विकल्प बोलून दाखविण्याचे धैर्य कोणालाही झाले नाही. मात्र श्रीस्वामीमहाराजांनी लोकांच्या मनात आलेला विकल्प ओळखला व ते सर्वांना उद्देशून एवढेच म्हणाले की, "त्यांच्या प्रेमासाठी त्यांना दर्शन दिले, आता तुमच्यासाठी व शास्त्रासाठी स्नान करतो !" श्रीस्वामीमहाराजांची ही समन्वय घालण्याची अपूर्व रीत पाहिली की, त्यांचे माहात्म्य किती मोठे होते याची मनोमन प्रचीती येते. जो समन्वय घालतो तोच महात्मा, तोच संत, तीच विभूती व तोच अवतार होय. श्रीस्वामीमहाराज अवतारी महापुरुष होते हेच खरे !

श्रीक्षेत्र चिखलदा येथ मुक्काम असताना दिवाळी आली. दिवाळीच्या दिवशी सर्व भक्त मंडळींनी श्रीस्वामीमहाराजांना अत्तर व तेल लावू देण्याबद्दल प्रार्थना केली. सर्वांचा भक्तिभाव पाहून श्रीस्वामीमहाराजांनी अत्तर व तेल लावण्यास संमती दिली. त्यानंतर सर्वजण श्रीनर्मदानदीवर स्नानास गेले. त्या दिवशीचा अभ्यंग स्नानाचा थाट मोठा बघण्यासारखा होता. सर्व भक्त मंडळींनी

श्रीस्वामीमहाराजांना स्नान घातले व श्रीस्वामीमहाराजांनीही आपल्या हाताने भक्तमंडळींच्या आग्रहावरून त्यांना स्नाने घातली. त्यानंतर श्रीस्वामीमहाराज काठावर आले व त्यांनी आपल्या सर्वांगास माती लावून पुन्हा स्नान केले. अशा प्रकारे श्रीस्वामी-महाराजांनी मृत्तिकास्नान केल्याचे पाहून सर्वजण अगदी दिङ्मूढ झाले. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज मनोमन प्रसन्नपणे हसत होते. खरोखर उद्वर्तनस्नान काय आणि मृत्तिकास्नान काय ? श्रीस्वामी-महाराजांना दोन्ही गोष्टी सारख्याच होत्या. त्यांना अत्तर आणि माती ही दोन्ही सारखीच होती. हे पाहिले म्हणजे "अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाण योगाचें ।। श्रीज्ञानेश्वरी २.२७३।।" व "जे साम्यापरौती जगीं । प्राप्ति नाहीं ।। ६.४१० ।।" या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या सिद्धान्ताचे मूर्तरूप पाहिल्याचे किंवा हे सिद्धान्तच श्रीस्वामीमहाराजांच्या रूपाने समूर्त झाल्याचे दृष्टीस पडून मनाला परम धन्यता वाटते.

एकदा श्रीक्षेत्र चिखलदा येथे पहाटे चार वाजता काही मंडळी श्रीनर्मदानदीवर स्नानासाठी चालली होती. त्यावेळी श्रीस्वामी-महाराज श्रीनर्मदानदीवरून स्नान करून परत येत होते. ज्यावेळी या सर्व मंडळींना श्रीस्वामीमहाराजांनी पाहिले त्यावेळी ते त्यांना असे म्हणाले की, "थंडी खूपच पडली आहे. सोसवेल तरच आंघोळ करा." हे ऐकताच सर्व भक्तमंडळी स्तंभितच झाली. वास्तविक पाहता त्या कडाक्याच्या थंडीत श्रीस्वामीमहाराज स्वतः स्नान करून आले होते; पण त्यांना स्वतःला थंडीचे काहीच नव्हते. मात्र भक्तांना थंडीमुळे त्रास होऊ नये म्हणून उशिरा स्नान केल्याबद्दल त्यांना दोष न देता ते शरीरधर्म सांभाळूनच सर्वकाही करण्यास सांगत असत. सामान्यांनी "शरीर रक्षितो धर्मः।" या न्यायाने

वागावे अशी श्रीस्वामीमहाराजांची धारणा होती, हे यावरून स्पष्ट होते.

श्रीस्वामीमहाराज कोणाही साधकाला, सेवकाला किंवा भक्ताला सतत व कायम आपल्याजवळ राहू देत नसत. त्यामुळे त्यांच्या जीवनात घडलेल्या सर्व घटना कोणालाच माहीत होऊ शकल्या नाहीत. अर्थात् त्याचे चरित्र पूर्णतः व क्रमशः कोणालाही लिहिणे शक्य झाले नाही.

श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा मुक्काम चालू असतानाच श्री. विनायकराव कवीश्वर यांची निसरपूरहून सेंधवा येथे बदली झाली. त्यावेळी त्यांचा पाय काही तेथून निघेना. आपली बदली झाल्यामुळे श्रीस्वामीमहाराजांचे चरण दुरावणार व त्यांचे दर्शन दुर्लभ होणार या विचाराने त्यांना फार वाईट वाटत होते व दुःख होत होते. शेवटी आपण बदलीच्या गावी जावयाचे नाही असा निश्चय त्यांनी आपल्या मनाशी केला. ज्यावेळी श्री. कवीश्वर हे बदलीच्या गावी सेंधवा येथे जाण्याची टाळाटाळ करीत आहेत असे श्रीस्वामीमहाराजांना समजले त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे सांगितले की, " बदलीच्या गावी जावे लागेल. तरी टाळाटाळ करू नये. तेथे जाण्यातच तुमचे कल्याण आहे. " श्रीस्वामीमहाराजांनी असे निक्षून सांगितल्यावर, श्री. कवीश्वर यांनी आपला सर्व भार श्रीस्वामीमहाराजांवर सोपविला व तेथून बदलीच्या गावी जाण्याचा निश्चय करून तो श्रीस्वामीमहाराजांना विदित केला.

त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी श्री. कवीश्वर यांच्या जाण्याची सर्व व्यवस्था केली. ते दिवस थंडीचे होते. त्यामुळे श्री. कवीश्वर हे जेवन जाणे इष्ट आहे, हे लक्षात घेऊन श्रीस्वामीमहाराजांनी

परभारेच पाकशाळेत त्यांच्यासाठी पिठलेभात करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे ते निघताना गर्दी व अव्यवस्था होऊ नये म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी स्वतःच त्यांच्या टांग्याचीही व्यवस्था लावून दिली. ज्यावेळी निघण्यापूर्वी श्री. कवीश्वर हे पिठलेभात खाण्यास बसले त्यावेळी श्रीस्वामीमहाराज पाकशाळेत आले व त्यांनी त्यांचा समाचार घेऊन त्यांना आग्रहाने खाऊ घातले. श्रीस्वामीमहाराज श्री. कवीश्वर यांना ज्यावेळी आग्रहाने भोजन करण्यास सांगत होते त्यावेळी श्रीमती भागूबाई वाशीमकर या तेथे होत्या. त्या श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाल्या की, "महाराज! यांना मुरडकानोला वाढू का ?" हा प्रश्न ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्यांना अत्यंत आनंदाने असे म्हणाले की, "वाढा, वाढा! अवश्य वाढा!" त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांच्या "वाढा, वाढा!" या बोलण्यातील भाव अत्यंत अर्थपूर्ण व आशीर्वादपूर्ण आहे याची जाणीव श्री. कवीश्वर यांना झाली. आपणास श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला येण्याचा पुन्हा योग येणार याचा तो कानोला जामीनच आहे, अशी श्री. कवीश्वर यांना खात्री वाटली. श्री. कवीश्वर यांचे जेवण संपत आल्यावर श्रीस्वामीमहाराज आपल्या नित्याच्या कार्यक्रमासाठी मंदिराकडे गेले व तेथे त्यांनी उपनिषदांचा पाठ सुरू केला. परंतु पाठ चालू असताना श्रीस्वामीमहाराजांनी श्री. कवीश्वरांचे वेळेवर आटोपले की नाही या गोष्टीचा दोनदा वेध घेतला. ज्यावेळी श्री. कवीश्वर जेवण संपवून कपडे करून श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला आले त्यावेळी उपनिषदाचा पाठ सुरू होता. पाठ संपल्यावर श्री. कवीश्वरं यांनी निघण्यापूर्वी श्रीस्वामीमहाराजांना साष्टांग दंडवत घातला व ते उभे राहिले. तेथून निघताना त्यांची पावले फार जड झाली. त्यावेळी

आपली बदली कसे करून टाळावी म्हणून ते पुनःपुन्हा श्रीस्वामीमहाराजांना आग्रह करीत होते. त्यासाठी त्यांनी अनेक युक्त्या केल्या; पण या सर्व बोलण्यावर श्रीस्वामीमहाराज श्री. कवीश्वर यांना "तुम्हाला बदलीच्या गावी जावेच लागणार आहे!" एवढे एकच उत्तर वारंवार देत होते.

इतके सर्व सांगूनही ज्यावेळी श्री. कवीश्वर आपल्या जागेवरून हलेनात त्यावेळी श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "वेळ झाली आहे, रवाना व्हा!" हे ऐकताच श्री. कवीश्वर श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की, "माझ्या अंगात ताप आहे. तरी मी आज जात नाही." अशा रीतीने श्री. कवीश्वर बदलीच्या गावी जाण्याविषयी कुरकुर करीत आहेत हे लक्षात आल्यावर श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "ताप उतरून जाईल. त्याची काळजी नको. आपण आज येथून निघून सेंधव्याला जा व उद्या ११ वाजता कामावर रुजू व्हा." श्रीस्वामीमहाराज असे म्हणताच "इतक्या दूरवर जाऊन उद्या ११ वाजता कामावर हजर होणे कठीण आहे," असे श्री. कवीश्वरांना वाटले. शेवटी काहीतरी करून जाणे टाळावयाचे म्हणून ते शेवटचा तर्क प्रस्तुत करताना असे म्हणाले की, "महाराज! आज आमावस्या आहे ना! आज जाणे बरोबर होणार नाही." श्री. कवीश्वरांचे हे म्हणणे ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "ज्योतिषात जे काही कुमुहूर्त आहेत ते सर्व आज आम्ही तुमच्यासाठी सुमुहूर्त केले आहेत. तुम्हाला काय वाटते की, आज आमावस्या आहे हे आम्हास माहीत नाही? तेव्हा आता वेळ वाया घालवू नका व तडक येथून लवकर निघा."

अशा प्रकारे श्रीक्षेत्र निरवळाहून आपणास निघावे लागू नये

म्हणून केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेल्याचे पाहून शेवटी श्री. कवीश्वर श्रीस्वामीमहाराजांचा निरोप घेऊन सेंधव्याला जाण्यास निघाले. श्रीक्षेत्र चिखलद्याहून निघून ते जुलवानियास आले. तेव्हा त्यांचा ताप उतरला. पुढील सर्व प्रवास सुखरूपपणे होऊन रात्री दहा वाजता ते सेंधव्याला पोहोचले. त्यांना कसलाही त्रास झाला नाही. दुसऱ्या दिवशी श्रीस्वामीमहाराजांनी सांगितल्या बरहुकूम बरोबर ११ वाजता श्री. गणेश विठ्ठल चितळे यांनी श्री. कवीश्वर यांना आपल्या कामाचा ताबा देऊन ते मोकळे झाले व श्री. कवीश्वर कामावर रुजू झाले. अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांनी सांगितल्या-प्रमाणे सर्व घडून आले.

श्री. कवीश्वर यांनी सेंधव्याला येताना अत्यंत जड अंतःकरणाने श्रीक्षेत्र चिखलदा सोडले होते. सेंधव्याला आल्यावर त्यांना अखंड श्रीस्वामीमहाराजांच्या चरणांचेच ध्यान लागले होते. पुढे थोड्याच दिवसात श्री. कवीश्वर यांना काही कामानिमित्त राजपूर येथे जाण्याचा हुकूम आला. राजपूर हे श्रीक्षेत्र चिखलद्याजवळ असल्या-मुळे कामाच्या अनुषंगाने तेथे जाऊन त्यांनी श्रीस्वामीमहाराजांचे पुन्हा दर्शन घेतले. मुरडकानोला सुफलित झाला होता हेच खरे!

श्री. कवीश्वर सेंधव्याला राहू लागल्यावर त्यांच्या मनात सतत असे विचार येत असत की, "आपल्या नोकरीमुळे आपली निसरपूरहून सेंधव्याला बदली झाल्यामुळेच आपण श्रीस्वामीमहा-राजांच्या सहवासास, सान्निध्यास व सेवेस मुकलो. त्यांचे दर्शन व सहवास मोठा प्रत्ययकारी होता. श्रीस्वामीमहाराजांचा आपण काहीच लाभ करून घेतला नाही. नुसते लाडू खाल्ले व अधिकार गाजविला. आपण त्यांच्याजवळ काही शिकलो नाही आणि धड त्यांची मनापासून सेवाही केली नाही." अशा प्रकारचे विचार

सतत मनात येत राहिल्यामुळे श्री. कवीश्वर यांना फार वाईट वाटत असे. श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनामुळे व आपण त्यांच्या येथे गेलो असताना जे प्रसंग घडले होते त्यामुळे श्रीस्वामीमहाराजांचे विभूतीमत्व किती महान् व अलौकिक आहे याची श्री. कवीश्वर यांना सेंधवा येथे फार तीव्रतेने जाणीव होत असे. या सर्व गोष्टींचा श्री. कवीश्वर यांच्या मनावर अत्यंत खोल परिणाम झाला होता. त्यामुळे सेंधव्यास गेल्यावर त्यांना ही ताटातूट फारच जाणवाव-याला लागली. त्यांचे मन त्यांना सारखे खाऊ लागले. शेवटी तर त्यांची अशी खात्री झाली की, "श्रीस्वामीमहाराजांना आपल्या-तील सर्व दोष माहीत असले पाहिजेत; पण श्रीस्वामीमहाराज त्याबद्दल आपल्याला कधीच काही बोलले नाहीत. हा त्यांचा थोर-पणा आहे." अखेरीस श्री. कवीश्वर यांनी आपल्या मनातील सर्व विचार व भावना व्यक्त करणारे एक पत्र सेंधव्याहून श्रीस्वामी-महाराजांना पाठविले. हे पत्र वाचताच श्री. कवीश्वर यांना उप-देशाची आवश्यकता आहे हे पाहून श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना असे उत्तर लिहिले की, "लोकांशी आपला व्यवहार सांभाळून करावा. सौजन्याने व हुशारीने वागावे. श्रीभगवंताचे कधीही विस्मरण होता कामा नये. त्याचे विस्मरण तेच मरण व त्याचे स्मरण तेच जीवन जाणावे!" अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांचे उपदेशाचे पत्र मिळाल्यावर श्री. कवीश्वरांचा अधिकाराचा, तारु-ण्याचा व विद्येचा मद कमी होऊन व्यवहारात कसे वागावे हे त्यांना कळले व परमार्थाची जाणीव होऊन श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने त्याचाही अनुभव आला. अशा प्रकारे श्री. कवीश्वरांच्या नीतीत, विचारात, आचारात, व्यवहारात व पूजेत श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने प्रगती झाली "श्रीगुरुकृपाहि केवलम्।।"

परिशिष्ट क्रमांक २

श्रीथोरलेस्वामीमहाराज यांच्या भावविभोर व मनोज्ञ आठवणी

लेखिका :– सौ. मंगलाताई म. उदंडकर
कांदीवली (पूर्व) मुंबई ४००१०१

श्रीक्षेत्र चिखलदा व श्रीक्षेत्र कातरखेडा

गरुडेश्वर पुण्यभूमी पवित्र ।
तिथे नांदतो यतिराजा समर्थ ।।
तया आठविता परमानंद प्राप्ती ।
नमस्कार माझा श्रीवासुदेवानंदांसी ।।

योगाभ्यास नि ध्यान पूजनीं मनीं वैराग्य ये जीवनीं ।
काव्यें ज्योतिष वेद नित्य पठणी हो मंत्रसिद्धी झणी ।।
मोठे लौकिक काव्य निर्मुनी मनिं उल्हास दत्तार्चनीं ।
गेले ते गरुडेश्वरात मिळुनी स्वानंद टेंबे मुनी ।।

श्री. गंगाधरपंत वैद्य हे माझे आजोबा असून ते श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानंदसरस्वतीटेंबेस्वामीमहाराज यांचे एकांतिक असे परमभक्त होते., ते मूळचे बऱ्हाणपुरचे राहणारे होते. त्यांना श्री. बाळाभाऊ हे वडील व श्री. पुरुषोत्तम हे धाकटे असे दोन बंधू होते. श्री. गंगाधरपंत वैद्य हे फार मातृभक्त होते. त्यांनी आपल्या आंधळ्या मातुश्री ती. आबई यांची आमरणान्त उत्तम प्रकारे सेवा केली. श्री. बाळाभाऊ यांना योगाभ्यासें चांगला

अवगत होता. श्रीगोंदवलेकरमहाराज यांचा इंदूर येथे मुक्काम असताना त्यांच्या सान्निध्यात राहून श्री. बाळाभाऊ यांनी त्यांच्या देखरेखीखाली योगाभ्यासात चांगली प्रगती केली होती.

एके दिवशी चांगली वेळ पाहून व श्रीगोंदवलेकरमहाराज हे प्रसन्न आहेत हे लक्षात घेऊन श्री. बाळाभाऊंनी त्यांना अशी प्रार्थना केली की, "महाराज ! आपण मला अनुग्रह देऊन कृतार्थ करा." श्री. बाळाभाऊंची ही प्रार्थना ऐकून श्रीगोंदवलेकरमहाराज त्यांना असे म्हणाले की, "मी काही तुला अनुग्रह देऊ शकत नाही." श्रीगोंदवलेकरमहाराजांनी असे सांगताच श्री. बाळाभाऊ वैद्य यांना अत्यंत मानसिक दुःख झाले व ते अत्यंत खिन्न मनाने त्यांच्या चरणापाशी बसून राहिले. या स्थितीत काही वेळ निघून गेल्या-नंतर श्रीगोंदवलेकरमहाराजांनी श्री. बाळाभाऊ यांना अत्यंत प्रेमाने उठविले आणि त्यांना असे सांगितले की, "तू कधीतरी उपदेश देण्यासंबंधी विचारशील याची मला पूर्ण कल्पना होती; परंतु मी काही तुझा गुरू नाही. तुझे गुरू निराळे आहेत. तुझा योगाभ्यास उत्तम चालला आहे. हा अभ्यास तू असाच चालू ठेव. चार वर्षांनी तुझे गुरू तुला तुझ्या गावी नर्मदाकिनारी भेटतील. आता तू आपल्या गावी परत जा." श्रीगोंदवलेकरमहाराजांनी असे सांगितल्यावर श्री. बाळाभाऊ शांत झाले व पुढे लवकरच ते त्यांच्या आज्ञेप्रमाणे श्रीक्षेत्र चिखलदा येथे परत येऊन वैद्यकी करू लागले. श्रीक्षेत्र चिखलदा येथे परत आल्यावर ते चार वर्षांच्या कालातिक्रमाची व आपल्या श्रीसद्गुरुनाथमहाराजांच्या भेटीची अत्यंत आतुरतेने प्रतीक्षा करू लागले.

अशा प्रकारे श्री. बाळाभाऊ श्रीक्षेत्र चिखलदा येथे आपल्या श्रीसद्गुरूंची वाट पाहात काळ घालवीत असता एके दिवशी एक वृद्ध

स्वामी तेथे आले. श्री. बाळाभाऊंचा व त्या श्रीस्वामींचा ज्यावेळी परिचय झाला त्यावेळी ते स्वामी बोलता बोलता श्री. बाळाभाऊंना असे म्हणाले की, " श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज नावाचे एक महान् सत्पुरुष व लोकोत्तर योगी ब्रह्मावर्तास चातुर्मास करीत असताना मी त्यांच्याजवळ सर्व योगाभ्यास शिकलो आहे. " ही माहिती सांगत असताना त्या वृद्ध स्वामींनी श्रीस्वामीमहाराजांची इतरही सर्व माहिती त्यांना सांगितली. परंतु श्रीस्वामीमहाराजां-संबंधीच्या माहितीकडे अधिक लक्ष न देता श्री. बाळाभाऊंनी योगाभ्यासाची आवड असल्यामुळे त्या वृद्ध स्वामींकडून प्रथम धौतीची माहिती करून घेतली.

त्यानंतर कालौघात श्रीगोंदवलेकरमहाराज यांनी सांगितल्या-प्रमाणे बरोबर चार वर्षांनी श्रीस्वामीमहाराजांचे श्रीक्षेत्र चिखलदा येथे आगमन झाले. अर्थात् प्रथमतः श्री. बाळाभाऊंना श्रीस्वामी-महाराजच आपले श्रीसद्‌गुरू आहेत हे माहीत नसले; तरी श्रीक्षेत्र-चिखलदा येथे पूर्वीच आलेल्या वृद्धस्वामींनी दिलेल्या माहिती-प्रमाणे ते त्यांच्या दर्शनासाठी गेले. ज्याक्षणी श्री. बाळाभाऊ यांनी श्रीस्वामीमहाराजांना पाहिले त्याक्षणी श्रीस्वामीमहाराज हेच आपले श्रीसद्‌गुरू आहेत याची मनोमन खात्री त्यांना पटली व श्रीगोंदवलेकरमहाराजांनी सांगितलेल्या गोष्टीची प्रचीती आली. अशा प्रकारे श्रीसद्‌गुरूंची प्राप्ती झाल्यामुळे श्री. बाळाभाऊ वैद्य यांना परमानंद झाला.

पहिल्या दिवशी श्री. बाळाभाऊंनी श्रीस्वामीमहाराजांना नमस्कार केल्यावर त्या दोघांच्यामध्ये सर्वसाधारणपणे प्रश्नोत्तरे झाली. पुढे एके दिवशी एकांत आहे असे पाहून श्री. बाळाभाऊंनी योगाभ्यास शिकविण्याची इच्छा श्रीस्वामीमहाराजांकडे प्रकट केली.

त्यावेळी "योग म्हणजे काय ?" हा प्रश्न विचारून श्रीस्वामीमहाराज शांत राहिले. हे ऐकताच श्री. बाळाभाऊ त्यांना असे म्हणाले की, "ब्रह्मावर्ताला आपल्यापाशी राहून जे वृद्धस्वामी आपल्याकडून धौती, बस्ती, नेती इत्यादि सर्व षट्क्रिया आणि इतरही योगाभ्यासाची सर्व साधने शिकले होते त्यांच्याकडून मी धौतीची क्रिया शिकून घेतली आहे. दुसरे म्हणजे माझे कुटुंब पूर्वीच निर्वतल्यामुळे आता माझ्यामागे कोणताही कौटुंबिक मोहपाश राहिला नाही. त्याचप्रमाणे मी इंदूर येथे विद्याभ्यास करीत असताना मला एका महात्म्यांनी (श्रीगोंदवलेकरमहाराज यांनी) असे सांगितले होते की, "चार वर्षांनी एका अद्वितीय व अलौकिक संन्याशांशी तुझी भेट होऊन त्यांचा सहवास तुला घडेल. ते तुला ध्यानादि सर्व विषय शिकवून योगाभ्यास पूर्ण करून घेतील."

श्री. बाळाभाऊंनी केलेले हे सर्व निवेदन ऐकल्यावर श्रीस्वामीमहाराज काही क्षण स्वस्थचित्त बसले. त्यानंतर श्री. बाळाभाऊ हे पूर्वजन्माचे भ्रष्ट योगी पुरुष आहेत, अशी त्यांची योग्यता जाणून श्रीस्वामीमहाराजांनी त्यांची पुढील योगाभ्यासाची योजना केली. श्रीस्वामीमहाराजांनी प्रथम "हठयोगप्रदीपिका" या नावाचे पुस्तक मागावून घेतले व ते नित्य थोडे थोडे श्री. बाळाभाऊंना समजावून देऊ लागले. त्याचबरोबर श्रीस्वामीमहाराज श्री. बाळाभाऊंना समजावून दिलेला अभ्यास प्रत्यक्ष नित्य तिन्ही–त्रिकाळी करून घेऊ लागले. त्यानंतर एके दिवशी सुमुहूर्तावर श्रीस्वामीमहाराजांनी श्री. बाळाभाऊंना मंत्रानुग्रह दिला व पुढे त्यांना उपनिषदांचे पाठ देऊन व त्यावरील भाष्य समजावून सांगून त्यांच्याकडून त्यांचे अध्ययन करविले. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांनी श्री. बाळाभाऊंकडून योगाभ्यास, मंत्रजपानुष्ठान व वेदान्ताभ्यास करवून घेऊन त्यांना

आध्यात्मिक मार्गात गती प्राप्त करून देऊन त्यांची पूर्वजन्मी अडलेली वाट मोकळी करून दिली. पुढे श्री. बाळाभाऊ वैद्य यांनी श्रीस्वामी-महाराजांनी सांगितलेला योग, वेदान्त व मंत्र या सर्वांचा अभ्यास आमरणान्त एकनिष्ठेने, निरंतर व श्रद्धाभक्तिपूर्वक करून अत्यंत उच्च अशी स्थिती प्राप्त करून घेतली.

अशा प्रकारे अध्यात्माच्या अभ्यासाबरोबर श्री. बाळाभाऊंना वैद्यकीय व्यवसायात मदत व्हावी व परमार्थाचा अभ्यास करताना कसलीही व्यावहारिक चिंता राहू नये म्हणून श्रीस्वामीमहाराजांनी रोज फिरावयास जात असताना त्यांना बहुमोल अशा वनस्पती व त्यांचे गुणधर्म समजावून सांगितले. श्री. बाळाभाऊ हे सर्व स्मृतीत साठवून ठेवून घरी आल्यावर ती सर्व माहिती लिहून काढीत असत व श्रीस्वामीमहाराजांच्या आदेशाप्रमाणे त्या औषधींचा वापर करीत असत. त्यामुळे त्यांचा चरितार्थ उत्तम चालत असे. ते सरकारी वैद्य झाल्यामुळेही त्यांना पुढे कसलीही अडचण भासली नाही.

श्रीस्वामीमहाराजांचे सर्व साधुसंतांवर व त्यांच्या ग्रंथांवर अत्यंत प्रेम होते. यामुळेच त्यांनी श्री. बाळाभाऊ यांना रोज दासबोध ग्रंथ वाचण्याची आज्ञा केली होती, श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्री. बाळाभाऊ दररोज न चुकता नित्यनियम म्हणून ग्रंथराज दासबोध वाचीत असत.

अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलदा येथे असेपर्यंत श्री. बाळाभाऊ वैद्य यांना त्यांचे सान्निध्य लाभले. एकदा श्री. बाळा-भाऊंनी श्रीस्वामीमहाराजांना मोठ्या प्रेमाने तेल लावून स्वहस्ते स्नान घालून अभ्यंगस्नानाचा सोहळा संपन्न केला होता. तद्द्वारा त्यांनी आपल्या आयुष्याचे सोने केले. त्यांच्या भाग्याला सीमा

राहिली नाही हेच खरे! पुढेही त्यांचा व श्रीस्वामीमहाराजांचा बराच पत्रव्यवहार झाला. कालौघात श्रीक्षेत्र चिखलदा येथेच श्री. बाळाभाऊ वैद्य यांनीं आपला देह ठेवला. अशा प्रकारे इंदूर येथे काही दिवस दिवाणसाहेबांकडे श्रीगोंदवलेकरमहाराज राहात असताना त्यांनी श्री. बाळाभाऊ वैद्य यांना जे भविष्य कथन केले होते, त्याप्रमाणे त्यांना श्रीस्वामीमहाराजांसारख्या श्रीसद्गुरुनाथ-महाराजांचा अलभ्य व दुर्मिळ लाभ प्राप्त झाला. ज्याला ज्याच्या-कडून लाभ मिळवायचा असतो त्याला तो त्याच्याकडूनच मिळत असतो. इतर दुसऱ्याकडून लाभाची प्राप्ती कदापीही होत नसते, हेच नितांत सत्य आहे.

श्री. बाळाभाऊ वैद्य यांचे धाकटे बंधू श्री. गंगाधरपंत वैद्य म्हणजे माझे आजोबा हे श्रीस्वामीमहाराजांचे एकांतिक व एकनिष्ठ भक्त होते. आपल्या या चरणसेवकावर श्रीस्वामीमहाराजांचेही निस्सीम प्रेम होते. श्रीगंगाधरपंत हे उंच, गोरे व अतिशय सात्त्विक वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी वेदवेदांगादि व न्यायव्याकरणादि शास्त्रांचे अध्ययन केले होते. त्यांचे हात गुडघ्यापर्यंत लांब होते आणि डोळे अतिशय मोठे व तेजस्वी होते. त्यांनी कधीच वर दृष्टी करून पाहिले नाही. त्यांची दृष्टी नेहमी खाली असे; कारण ते नेहमी आत्मलीन व स्वस्वरूपमग्न अशा अवस्थेत राहत असत. ही अवस्था त्यांना श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने प्राप्त झाली होती. ते फार कमी बोलत असत. त्यांना सर्व कर्मकांडाचे उत्तम ज्ञान होते व ते शास्त्रीपणाही करीत असत.

श्री. गंगाधरपंत वैद्य स्वतः स्नान, संध्या, पूजादि कर्मे अत्यंत नेकीने व व्यवस्थितपणे करीत असत. त्यांचे सोवळे फार कडक असे. ते अत्यंत स्वावलंबी असल्याने कोणावरही भार न टाकता ते

फार दक्षतेने वागत असत. श्रीक्षेत्र चिखलदा गावातील सर्व लोक त्यांना "बाबा" या नावाने ओळखत असत. श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत यांना त्यांच्या वडील बंधूंप्रमाणे औषधे व वनस्पती यांची सांगोपांग माहिती करून दिली होती. ज्यावेळी श्रीस्वामी-महाराज ही माहिती सांगत असत त्यावेळी श्री. गंगाधरपंत ती आपल्या स्मृतीत साठवून ठेवीत असत व घरी आल्यावर लिहून ठेवून त्याप्रमाणे औषधयोजना करीत असत.

श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलद्याला आल्यानंतर श्री. गंगाधरपंत वैद्य हे त्यांचे थोरलेबंधू श्री. बाळाभाऊ वैद्य यांच्या बरोबर श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला येऊ लागल्यावर त्या उभयतांमध्ये जो प्रेमसंबंध जुळून आला तो पुढे आदर्श गुरुशिष्यसंबंधात परिणत झाला. श्री. गंगाधरपंत वैद्य हे योग्य साधक-भक्त आहेत हे लक्षात घेऊन श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना अनुग्रह दिला व अनेक उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व अरणे ही भाष्यासह शिकवून त्यांचे उत्तम प्रकारे अध्ययन करवून घेतले.

श्री. गंगाधरपंत वैद्य यांचे थोरले बंधू श्री. बाळाभाऊ यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या जवळ अनेक वेळा अशी विज्ञापना केली होती की, "गंगाधरला योग शिकवावा. निदान त्याला एखादी मुद्रा तरी सांगावी." श्री. बाळाभाऊंनी अशी विनंती केली की, श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणत असत की, "अरे तो योगभ्रष्ट आहे. त्याचे पुष्कळ प्रारब्ध शिल्लक असून ते त्याला भोगावयाचे बाकी आहे." श्री. बाळाभाऊ अशी प्रार्थना वारंवार करीत राहिल्या-मुळे श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत यांना अनेक वेळा असे बजावले होते की, "तू पूर्व जन्मीचा योगी आहेस; परंतु कधीही योगात रममाण राहू नकोस. तुला शिकविल्याप्रमाणे वेदान्ताचा

अभ्यास, चिंतन व मनन कर. तेच तुला योग्य आहे. याशिवाय अयाचित वृत्तीने राहून जनसेवा करीत जा. तू जर योगाभ्यास करावयास जाशील तर इकडील प्रदेशात कोणी योगी पुरुष नाही. जर प्राण मस्तकातच राहिले तर ते खाली उतरविण्यास योगी पुरुषाची आवश्यकता लागते. तुझे प्राण योगाभ्यास करताना मस्तकातच राहिले तर तू मरण पावला आहेस, असे समजून पुढील दहनादि विधी करतील. त्यामुळे वेदान्ताचे चिंतन मननादिही नाही आणि योगाभ्यासातील शेवटच्या स्थितीची प्राप्तीही नाही, अशी वेळ येऊन दोन्ही कडून आचवशील."

श्रीस्वामीमहाराजांची आज्ञा श्री. गंगाधरपंतांनी आमरणान्त शिरोधार्य करूनच आपले सर्व जीवन घालविले. कधी कधी आजारी पडल्यावर त्यांची मोठी परस्वाधीन स्थिती होत असे. त्यावेळी ते श्रीस्वामीमहाराजांना मनोमन अशी प्रार्थना करीत असत की, "प्रभो! आपली आज्ञा पाळण्यास हा देह असमर्थ असल्यामुळे अडथळा येतो. त्याबद्दल आपण क्षमा करण्यास समर्थ आहात!"

श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास श्रीक्षेत्र चिखलदा येथे चालू असताना त्याला तीर्थयात्रेच्या क्षेत्राचे रूप आले होते. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी रोज हजारो लोक येत असत. भोजनाच्या पंक्ती दिवसा उठत असत. रात्री प्रसाद वाटप होत असे. त्या दिवसात राजे, महाराजे, संस्थानिक, शास्त्री, पंडित असे सर्व प्रकारचे व सर्व थरातील लोक श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी येत असत. त्या दिवसात श्री. गंगाधरपंतांकडे प्रथम भंडाऱ्यातील काम होते. त्यानंतर त्यांनी खजीनदाराचे काम केले. पुढे श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना ही सर्व कामे सोडून देण्यास सांगितले व त्यांच्याकडून वेदान्ताचे अध्ययन करवून घेतले.

ज्या दिवशी श्रीगुरुपौर्णिमा होती त्या दिवशी श्रीक्षेत्र निखलदा येथे हजारोंनी भक्तमंडळी, शास्त्रीपंडित, दशग्रंथी ब्राह्मण व विद्वान लोक हजर होते. त्यावेळी आता अग्रपूजेचा मान कोणास द्यावा या बाबतीत आपापसात चर्चा चालली होती. श्री. गंगाधरपंत नेहमीच अलिप्त वृत्तीने वागत असत. मात्र त्यादिवशी आपण श्रीस्वामीमहाराजांची अग्रपूजा करावी अशी त्यांच्या मनात तीव्र इच्छा झाली; परंतु "आपल्या सारख्या सामान्य माणसाचा काय पाड लागणार," असा विचार करून ते गप्प बसले. अग्रपूजेचा मान कोणास मिळणार याबाबत त्या दिवशी सर्वत्र चर्चा रंगली होती; पण निर्णय होत नव्हता.

अशा स्थितीत श्रीस्वामीमहाराज आपले नित्यकर्म आटोपून कुटीबाहेर आले आणि तत्काळ सर्वांना उद्देशून असे म्हणाले की, "आज अग्रपूजा गंगाधर करील." कोणी काही सूचना करण्यापूर्वीच श्रीस्वामीमहाराजांनी हा निर्णय दिल्यामुळे सर्व लोक आश्चर्यचकित झाले व त्यांना श्री. गंगाधरपंतांचा अधिकार कळला.

श्रीस्वामीमहाराजांनी अग्रपूजेचा मान आपल्याला दिल्याचे उद्गार ज्यावेळी श्री. गंगाधरपंतांनी ऐकले त्यावेळी त्यांच्या नेत्रातून अश्रू वाहू लागले. या निर्णयामुळे त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. श्रीस्वामीमहाराजांच्या निर्णयाप्रमाणे श्री. गंगाधरपंतांनी पूजेची तयारी केली. श्रीस्वामीमहाराजांच्यासाठी प्रसाद म्हणून मनुका भिजत घालून त्या वाटून घेऊन त्यांचे त्यांनी श्रीखंड तयार केले. त्या दिवशी श्री. गंगाधरपंतांनी श्रीस्वामीमहाराजांची अपूर्व भक्तिभावाने व अनन्य श्रद्धाभक्तिपूर्वक अंतःकरणाने पूजा केली व त्यांना श्रीखंडाचा नैवेद्य अर्पण केला. श्री. गंगाधरपंतांच्या जीवनातील हा परमोच्च आनंदाचा दिवस व प्रसंग होता.

श्रीस्वामीमहाराजांनी संवत् १९५४ मध्ये माघमाहात्म्य हा प्राकृत ग्रंथ लिहिला. या ग्रंथातील प्रत्येक ओवीचे आद्याक्षर वाचीत गेल्यास श्रीदत्तमालामंत्र तयार होतो. या ग्रंथाची पहिली प्रत श्रीस्वामीमहाराजांनी प्रसाद रूपाने श्री. गंगाधरपंत वैद्य यांना दिली.

श्रीदत्तपुराण हा ग्रंथही श्रीस्वामीमहाराजांनी रचला असून त्याची अत्यंत बारीक अक्षरातील एक प्रत त्यांच्या स्वतःजवळ होती. त्याचा अर्थ संवत् १९५४ मध्ये श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत याना समजावून सांगितला. ग्रंथाची जी मूळ प्रत श्रीस्वामीमहाराजांजवळ होती ती त्यांनी संवत् १९५७ मध्ये प्रसाद म्हणून श्रीगंगाधरपंत वैद्य यांना दिली. या प्रतीतील अक्षरे इतकी बारीक आहेत की, ती चष्मा लावूनही वाचणे सहजासहजी शक्य होत नाही.

श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंतांना तीव्र योगाभ्यास करण्यास बंदी केली असली; तरी संध्यादि कर्मात जो प्राणायाम करावा लागतो त्याची सर्व माहिती त्यांनी त्यांना यथाशास्त्र करून दिली होती. अर्थात् या अत्यल्प अभ्यासानेही श्री. गंगाधरपंतांच्या शरीराची शुद्धी झाल्यामुळे "प्राणायामाने मनाचे दोष दूर होऊन मनाला अमानुष सामर्थ्य प्राप्त होत असते," या योगशास्त्रांगभूत सिद्धांताचा अनुभव त्यांना अनेक वेळा आला होता. श्रीमद् भागवतात "प्राणायामः परंबलं" असे जे सांगितले आहे ते खरोखरच यथार्थ आहे.

श्रीस्वामीमहाराजांनी "द्विसाहस्री श्रीगुरुचरित्र" या स्वकृत ग्रंथाच्या अखेरीला योगरहस्य व बोधरहस्य अशी दोन रहस्ये दोन-अध्यायात लिहिली आहेत. यातील पहिल्या रहस्यात योगाभ्यास सांगितला असल्यामुळे हे योगरहस्य श्रीस्वामीमहाराजांनी श्री. बाळाभाऊ यांना समजावून दिले होते आणि दुसऱ्या रहस्यता

वेदान्त कथन केलेला असल्यामुळे हे बोधरहस्य त्यांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना समजावून दिले होते. "अधिकार तैसा करू उपदेश । साहे ओझें त्यास तेंचि द्यावे।" या श्रीसंत तुकाराममहाराजांनी सांगितलेल्या न्यायाप्रमाणे श्रीस्वामीमहाराजांचे वागणे होते हेच खरे !

श्रीस्वामीमहाराजांनी "द्विसाहस्री श्रीगुरुचरित्रात" मुळातील प्राकृत श्रीगुरुचरित्राच्या कथा कोठे संक्षेपाने तर काही ठिकाणी विस्तारपूर्वक सांगितल्या असून श्रीदत्तात्रेयांनी केलेल्या चोवीस गुरूंचे वर्णन व तद्द्वारा घ्यावयाचा बोध किंवा ज्ञान, योग आणि वेदान्त असे तीन विषय या ग्रंथात अधिक वर्णिले आहेत. श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांच्याकडून या ग्रंथाची प्रत लिहून घेतली होती. ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांचे श्रीक्षेत्र चिखलदा येथे शके १८२२ म्हणजे इ. स. १९०० मध्ये प्रथम आगमन झाले होते व पुढे तेथेच दहावा चातुर्मास झाला होता त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी श्री. गंगाधरपंत वैद्य यांना श्रीमारुतीरायांच्या मंदिराच्या पश्चिमेकडील खोलीत बसून या ग्रंथाची संथा देऊन तो समजावून सांगितला होता. प्राकृतजनांना या ग्रंथाचा अर्थ कळणे हे अत्यंत दुर्घट आहे हे जाणून श्री. गंगाधरपंत वैद्य यांनी संवत् १९८८ मध्ये या ग्रंथाचा अर्थ लिहून काढला होता.

श्रीस्वामीमहाराजांनी केलेला "द्विसाहस्री श्रीगुरुचरित्र" हा ग्रंथ श्रीदत्तप्रभूमहाराजांना फार आवडला होता. या ग्रंथात प्रथम ज्ञानयोगाचे तेरा अध्याय, नंतर कर्मयोगाचे पाच अध्याय आणि शेवटी भक्तियोगाचे पाच अध्याय असे एकूण तेवीस अध्याय असून शेवटी योगरहस्य व बोधरहस्य असे दोन अध्याय मिळून पंचवीस अध्यायांच्या या ग्रंथाची अत्यंत सुरेख मांडणी झालेली दिसू येते.

एके दिवशी श्रीक्षेत्र चिखलदा येथे एक श्री. शास्त्रीबुवा आले. त्यांनी तेथे हा ग्रंथ जेव्हा वाचला त्यावेळीं त्यांना व्याकरणाच्या नियमाप्रमाणे एके जागी दोष दिसला. त्यावेळी ते श्री. शास्त्रीबुवा श्रीस्वामीमहाराजांच्या जवळ गेले व त्यांना वंदन करून तो ग्रंथ दाखवून असे म्हणाले की, " महाराज! या ठिकाणी व्याकरण दृष्टचा काही अशुद्ध राहिले आहे असे वाटते. तरी जर येथे हा ग्रंथ शुद्ध केला तर आपणास ते आवडेल का ? " त्या श्री. शास्त्रीबुवांनी अत्यंत नम्रपणे असे विचारताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, " (" द्विसाहस्री श्रीगुरुचरित्र ") हा ग्रंथ देवाला आवडला असल्यामुळे आता त्यात मागाहून शुद्धाशुद्ध असलेले कमीजास्त करणे अयोग्य होईल. प्रथम ज्यावेळी हा ग्रंथ पूर्ण झाला त्यावेळी यात काही व्याकरण दृष्टीने अशुद्धी राहिल्याचे आमच्या मागाहून लक्षात आले. त्यामुळे आम्ही ते शुद्ध करण्यास प्रवृत्त झालो असता श्रीदत्तप्रभूंनी आम्हास असे सांगितले की, " झालेला सर्व ग्रंथ शुद्ध असून तो मला प्रिय आहे आणि एका विशिष्ट दृष्टीने पाहिले असता ते शुद्धच ठरते असे दाखवूनही दिले. " श्रीस्वामीमहाराजांचे हे सर्व म्हणणे ऐकल्यावर ते श्री. शास्त्रीबुवा एकदम गप्प बसले. ही सर्व कथा वाचली म्हणजे देव केवळ भक्तीच पाहतो व हृदयस्थ जनार्दन सर्व कर्मांचा कर्ता आहे अशी जाणीव नित्य बाळगूनच महापुरुषांची सर्व कर्मे घडत असल्याने त्यात अशुद्धी राहणे शक्यच नाही हे नितांत खरे आहे, हे लक्षात येते.

श्रीगंगाधरपंत वैद्य व त्यांच्या सौ. अन्नपूर्णा माँसाहेब म्हणजे माझे आजोबा व आजी श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांच्या सेवेत असतांना या ठिकाणाला एखादा महोत्सवाचे व महायात्रेचे

स्वरूप आले होते. त्यावेळी तेथे हजारोंनी लोक येत–जात असत. जेवणाच्या पक्तीच्या पंक्ती उठत असत. ब्राह्मण स्त्रिया ब्राह्मणांच्या पंक्ती सोवळ्याने वाढीत असत. मात्र श्रीस्वामीमहाराज आपल्या कुटीमध्येच अष्टग्रास जेवण करीत असत. त्यांचे जेवण झाल्यावर त्यांची पत्रावळ उचलण्यासाठी व उष्टे काढण्यासाठी स्त्रियांमध्ये मोठी चुरस लागत असे. त्यावेळी माझ्या आजीला नेहमी असे वाटत असे की, आपणही श्रीस्वामीमहाराजांचे उष्टे काढावे. परंतु चपळ बायका तेथे झटपट पोहोचून जात असल्यामुळे आजीचा नंबर कधीच लागत नसे व तिला ही संधी कधीच मिळत नसे. त्यामुळे तिचा पार विरस होऊन जात असे. माझ्या आजीची ही तळमळ श्रीस्वामीमहाराजांनी जाणून एके दिवशी जेवण झाल्यावर ते हात धुऊन परत कुटीमध्ये येताना जवळच उभ्या असलेल्या माझ्या आजीला असे म्हणाले की, "हे पहा! आमच्या हातचे खरकटे शीत येथे पडलेले आहे. ते काढून शेणगोळा लावून घ्या." श्रीस्वामी-महाराजांनी असे सांगताच माझ्या आजीने ते सर्व काम केले. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाजांनी आपल्या मनातील त्यांच्या सेवेची इच्छा पूर्ण केल्याचे पाहून माझ्या आजीला जो आनंद झाला त्याचे वर्णन शब्दात करणे शक्य नाही; कारण हा आनंद माझ्या आजीला आयुष्यभर पुरून उरला, हे तिच्या शब्दातून, कृतीतून व भक्तीतून वारंवार जाणवत असे.

श्रीस्वामीमहाराज आपला श्रीक्षेत्र चिखलद्याचा बाविसावा चातुर्मास संपल्यावर पुढे श्रीक्षेत्र कातरखेडा येथे गेल्यावर श्री. गंगाधरपंत वैद्य श्रीक्षेत्र चिखलदा येथेच राहिले व त्यांनी श्रीस्वामीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे अयाचित वृत्तीने राहून आमर-

णान्त वैद्यकी करून समाजाची सेवा केली. ते नेहमीच श्रीस्वामीमहाराजांचे नाव घेऊन प्रथम काही उपासना व कडक पथ्य सांगून औषध देत असत. श्रीस्वामीमहाराजांच्या अपार कृपेमुळे त्यांच्या हाताला नेहमीच अपूर्व यश येत असे. त्यांची नाडी परीक्षा फारच उत्तम होती. मोठमोठ्या वैद्यांनी हात टेकलेले रोगी सरतेशेवटी श्री. गंगाधरपंत यांच्याकडे येत असत व बरे होऊन जात असत. ज्यावेळी असे रोगी श्री. गंगाधरपंतांकडे येत असत त्यावेळी त्यांच्या राहण्याची व्यवस्था ते आपल्या नव्या घरात करीत असत व त्यांच्या औषधाची, पथ्यपाण्याची व जेवण्याची व्यवस्थाही आपल्या खर्चाने विनामूल्य करीत असत. तेथे थोडे बरे वाटले की, त्यांना औषधे देऊन आपल्या गावी ते परत पाठवीत असत. पुढे तो रोगी हमखास पूर्णपणे बरा होत असे. श्री. गंगाधरपंतांना श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेमुळे अनेक औषधे, वनस्पती, त्यांचे गुणधर्म, उपयोग व उपाय करण्याची पद्धती माहिती झालेली असल्यामुळे ते श्रीस्वामीमहाराजांचे स्मरण करून जो औषधोपचार करीत असत त्यामुळे महारोगी, कुष्ठरोगी इत्यादि सर्व प्रकारचे रोगी बरे होत असत. अर्थात् सर्व रोग्यांना पथ्य मात्र फार कडक पाळावे लागे.

श्री. गंगाधरपंत वैद्य यांना श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने ज्योतिषशास्त्राचीही चांगली माहिती झाली होती. त्याचाही उपयोग ते समाजाला कसलीही अपेक्षा न करता करून देत असत. त्यांचे आचरण कर्ममार्गी होते. त्यांनी काही काळपर्यंत गुमास्तेगिरी केली होती. नंतर त्यांनी फक्त श्रीस्वामीमहाराजांच्या आदेशाचे पालन केले. त्यांचे कुटुंब सौ. अन्नपूर्णाबाई (सौ. सीताबाई) या अत्यंत साध्या, प्रेमळ व वर्णाने काळ्या होत्या. शालजोडीला कांबळ्याचे ठिगळ लावावे असे ते जोडपे होते. परंतु सौ. अन्नपूर्णा माउली अत्यंत

भाग्यवान् होत्या. त्यांना कर्तृत्ववान् व श्रीस्वामीमहाराजकृपापात्र असा पती मिळाला होता. त्यांच्या ठिकाणी आपपरभाव नव्हता. त्यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या बाहेरील लोकांवर, रोग्यांवर व घरातील लोकांवर त्या अपत्यवत् प्रेम करीत असत. त्यामुळेच सर्वजण त्यांना माँ साहेब व आई असे म्हणत असत. त्यांच्या सौ. सूनबाईसुद्धा त्यांना आई म्हणून संबोधित असत.

श्री. गंगाधरपंत यांचे सर्व आयुष्य श्रीस्वामीमहाराजमय झाले होते. माझी आजी उखाणा घेताना त्यांच्या संबंधी असे म्हणत असे की, "चांदीच्या वाटीत गंधाचा गोळा गंगाधरपंताचे बोलणे शंभर रुपये तोळा." गावातील सर्व लोक त्यांना फार मान देत व "बाबा" असे म्हणून संबोधित असत. श्रीस्वामीमहाराजांनी बाबांना अयाचित वृत्तीने राहावयास सांगितले होते व त्याप्रमाणे ते राहात असले तरी त्यांच्या घरचा खर्च अवाढव्य होता. तो कसा चाले हे एक श्रीस्वामीमहाराजच जाणत असत. त्यांच्याकडे रोज ५० माणसे येत व २५ परत जात असत. बरे, फी व औषधाची किंमत नसल्यामुळे लोकांना फिकीर नसे. याशिवाय पाहुणे, आप्तेष्ट व इतर मंडळीही हक्काने येऊन राहात असत. दर सोमवारी श्रीक्षेत्र चिखलद्याचा बाजार असे. त्या दिवशी तुपाचे एक मोठे पातेले भरून तूप आणले जाई.

श्री. गंगाधरपंत वैद्य यांचा पोषाख नेहमी धोतर उपरणे हाच असे. ते गावाला जाताना फक्त बाराबंदी घालीत असत. मात्र गावातच जर बाहेर जावयाचे असेल तर बाहेर पडताना ते डोक्याला फक्त मुंडासे बांधीत असत. ते सकाळी उठून प्रथम नामस्मरण व भजन करीत असत. त्यानंतर ते श्रीनर्मदानदीवर स्नानास जात असत. तेथून परत येताना ते आपले धोतर व पंचा स्वतः पिळून आणीत व येतांना

देवपूजेसाठी कळशी व लोटा सोवळ्यात भरून आणीत असत. त्यांचे धोतर व उपरणे ते स्वतः सोवळ्यात वाळत टाकीत असत. त्यानंतर संध्या, देवपूजा, पाठ इत्यादि नित्यकर्मं ते करीत असत.

अशा प्रकारे सर्वं नित्यकर्म आटोपल्यावर ते बरोबर नऊ वाजता घरातील मोठ्या ओसरीत येऊन बसत असत. त्यावेळी ती ओसरी आलेल्या रोगी लोकांनी भरलेली असे. आणखी आलेले लोक नंतर ओटयावर बसत असत. त्यानंतर श्री. गंगाधरपंत प्रथम कपाट उघडून श्रीस्वामीमहाराजांच्या फोटोचे दर्शन घेऊन त्यांचे व त्यांनी सांगितलेल्या समाजसेवेच्या व्रतानुष्ठानाचे स्मरण करीत असत. त्यानंतर ते आम्हाला व जमलेल्या सर्व मुलांना ऋतुमानाप्रमाणे खारीक, बदाम, खडीसाखर, चारोळी, अक्रोड, अंजीर, बेदाणा व मनुका यांचा समावेश असलेला विविध प्रकारचा प्रसाद देत असत.

श्री. गंगाधरपंतांच्या घराच्या ओसरीत कणकेने भरलेले एक मोठे मडके ठेवलेले असे. श्रीनर्मदा प्रदक्षिणावासी घरात येऊन त्यांनी "नर्मदे हर" केले की, त्यांना सुकी भिक्षा घालण्यात येई. जर कोणी श्रीनर्मदा परिक्रमावासी जेवावयास आला तर त्याला बाहेर बसावे लागे. दुपारी बारा वाजता सर्वांबरोबर त्याची पत्रावळ वाढली जात असे. श्री. गंगाधरपंतांच्या घरी रोज कमीत कमी २५-३० माणसे जेवावयास असत. ते दुपारी ११-११।। वाजता रोग्यांना औषधे देऊन ओसरीतून आत घरात येत असत. त्यानंतर सोवळे नेसून उरलेले नित्यकर्म आटोपून ते वैश्वदेव करीत असत. त्रिसुपर्ण होऊन "नमः पार्वती पते हरहर महादेव" झाले की, सर्वजण जेवावयास बसत असत. श्री. गंगाधरपंतांचे खाणे फारच थोडे होते. त्यांना तिखट अजीबात चालत नसे. त्यांची [illegible] लवंग

खाल्ली तर गरम व वेलदोडे खाल्ले तर सर्दी व्हावी अशी होती. त्यामुळे ते फारच नियमित असत.

कालौघात श्रीक्षेत्र चिखलदा येथील कचेरी निसरपुरी आल्याने श्री. गंगाधरपंतांचे वास्तव्य पुढे निसरपूर येथे झाले. निसरपूर येथे राहावयास आल्यावर घरात विहीर नसल्यामुळे श्रीनर्मदानदीवरून पाणी आणावे लागे. त्यावेळी घरात तर माणसांची खूपच वर्दळ असे. त्यामुळे पाण्याच्या अभावी घरच्या माणसांचे फार हाल होत असत. उन्हाळ्यात तर सर्वांनाच फार कष्ट पडत असत. निसरपूर गावातील सर्व विहिरीही उन्हाळ्यात पार आटून जात असत. शेवटी श्री. गंगाधरपंत यांनी श्रीस्वामीमहाराजांचे व श्रीनर्मदेचे नाव घेऊन सर्वत्र खडक असतानाही विहीर खणली. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने विहिरीला उत्तम झरा लागला व त्या विहिरीला श्रीनर्मदेसारखे गोड पाणी लागले. श्रीस्वामीमहाराजांच्या अलौकिक कृपेचेंच हे फळ होते.

श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने श्री. गंगाधरपंत अत्यंत निस्पृह झाले होते. त्यांचे सर्व कुटुंब पूर्वी एकत्र राहात असे. त्यांचे धाकटे बंधू श्री. पुरुषोत्तमपंत हे घरातील खजीनदार म्हणून काम पाहात असत. त्यामुळे पुढे त्यांनी सर्व कागदोपत्री शेती वगैरे सर्व मालमत्ता आपल्या नावे करून घेतले. श्री. गंगाधरपंतांनीही त्यांच्या इच्छेप्रमाणे सही करून सर्व त्यांच्या नावे करून दिले. या वाटणीप्रमाणे श्री. पुरुषोत्तमपंत घरातील सर्व सामान घेऊन गेल्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांना घरात मडकी, गाडगी व जेवावयास पत्रावळी आणाव्या लागल्या; तरी त्यांनी ब्र काढला नाही व भावाचे मन दुखविले नाही.

ही सर्व हकीकत ऐकल्यावर गावातील लोकांना अत्यंत वाईट

वाटले. त्यामुळे प्रतिष्ठित मंडळी एकत्रित जमून त्यांनी असा निर्णय घेतला की, बाबा तर अत्यंत निस्पृह आहेत; परंतु त्यांचे जे दोन पुत्र आहेत त्यांच्यासाठी आपण काहीतरी करावे. यासाठी सर्व लोकांनी श्री. गंगाधरपंत यांच्या चि. गणेश व चि. गोविंद या दोन्ही मुलांना बोलाविले व त्यांना असे सांगितले की, "आम्ही सर्वजण मिळून तुमचा दोघांचा वाटा तुम्हाला मिळवून देतो. याबाबत तुमची काय इच्छा आहे?" त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांच्या अपार कृपेची फले असलेली ती दोन्हीही मुले "बापसे बेटा सवाई," या न्यायाने त्या लोकांना नकार देताना असे म्हणाली की, "बाबांचा जो निर्णण तोच आमचा निर्णय आहे. त्यांची जी इच्छा आहे तीच आमची इच्छा आहे. आम्हास काहीही नको." त्या मुलांचा हा निर्णय ऐकतांच सर्व लोक थक्क झाले. श्रीस्वामीमहाराजांची अपार कृपा श्री. गंगाधरपंतांच्या मुलांमध्ये पाझरून तेही निःस्पृह झाल्याचे पाहिले म्हणजे संतांचा महिमा किती अपार असतो याची प्रचीती येते.

श्रीस्वामीमहाराजांच्या अपार कृपेने पुढे कालौघात हळूहळू पंतांच्या घरची परमेश्वरानेच सर्व व्यवस्था केली. गावातील लोक त्यांच्या घरालाच जाता-येता नमन करून जात असत. "बाबा" दिसले तर रामराम म्हणत असत. भंगी असला तर दूर उभा राहात असे आणि औषधोपचारासाठी आला तर खाली उभा राहात असे. श्री. गंगाधरपंत प्रथम त्याची वास्तपुस्त करून त्याला औषध देत असत. त्यांच्या ठिकाणी भेदभाव नव्हता. असे असले; तरी श्री. गंगाधरपंतांकडे येणारे सर्व लोक आपली पायरी ओळखून वागत असत. श्री. गंगाधरपंतांना अहिराकडे जाण्याची वेळ आली तर ते जात असत व आल्यावर स्नान करून मग आपले कर्मकांडाचे

अनुसरण करीत असत. त्यांच्याकडे औषधोपचारासाठी गरीब श्रीमंत असा कोणीही आला तरी त्याच्यात भेद होत नसे व त्यांना कोणाकडून कसलीही अपेक्षा नसे. श्रीस्वामीमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे सेवा करणे हेच त्यांचे व्रत होते.

अशा प्रकारे श्री. गंगाधरपंत हे जरी समजात वावरत होते तरी त्यांनी आपल्या आध्यात्मिक प्रगतीचा कोणासही कधीच थांगपत्ता लागू दिला नाही. अग्निहोत्री गृहस्थाच्या घरी असलेल्या अग्नीप्रमाणे म्हणजे आत अग्नी प्रदीप असला तरी तो ज्याप्रमाणे अंगाऱ्याने झाकलेला दिसतो त्याप्रमाणे त्यांनी बाहेरून आपले अस्तित्व ठेवले होते. मात्र काही अधिकारी व्यक्तींना त्याची जाणीव होती.

श्री. गंगाधरपंत वैद्य यांचे धाकटे बंधू श्री. पुरुषोत्तमपंत वारल्यानंतर ते पार खचून गेले. त्यानंतर एक-दीड महिन्याच्या आसपास त्यांनीही आपली इहलोकीची यात्रा संपविली. ज्यावेळी श्री. गंगाधरपंतांची प्रकृती बिघडल्याची तार आली त्यावेळी त्यांचे चिरंजीव श्री. गणेशपंत म्हणजे माझे ती. वडील रतलाम येथे नोकरी करीत होते. तार मिळताच ते आम्हा सर्वांना घेऊन निसरपूर येथे जाण्यास निघाले. आम्ही रात्री कुक्षी येथे पोहोचल्यावर त्याच रात्री बैलगाडी करून निसरपुरी आलो. आमची बैलगाडी कुक्षीहून निघाल्याबरोबर श्री. गंगाधरपंतांनी घरातील सर्वांना असे सांगितले होते की, "गणपती सर्वांना घेऊन बैलगाडीने येत आहे ?" आम्ही घरी पोहोचल्यावर श्री. गंगाधरपंत पाच दिवसापर्यंत जीवित होते. त्या पाच दिवसात जरी श्री. गंगाधरपंतांचा अशक्तपणा वाढत होता तरी त्यांनी श्री. गणेशपंत यांना सर्व कुळाचार व कुळधर्मांची माहिती दिली.

श्री. गंगाधरपंतांनी मृत्युपूर्वी सर्व निरवानिरव करून ठेवली

होती. त्यांनी घरातील सर्वांना असे सांगून ठेवले होते की, "लोकांकडे बरीच येणी आहेत. मात्र कोणी आपणहून येणे दिले तर दिले; नाहीतर कोणालाही येणे मागू नये आणि जर येणे आलेच तर त्यातील पैसे घरात खर्च न करता ते सर्व श्रीक्षेत्र गरुडेश्वरी पाठवून द्यावेत." श्री. गंगाधरपंत यांची वास्तविकपणे मृत्युपूर्वी संन्यास घेण्याची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी सर्व तयारी करून ठेवली होती. या कामासाठी त्यांनी श्र क्षेत्र चिखलद्याहून श्री. बापट यांना बोलाविले होते. त्यांचे सर्व शिक्षण श्री. गंगाधरपंत यांच्याकडेच झाले होते. श्री. बापट आल्यावर श्री. गंगाधरपंत त्यांना असे म्हणाले होते की, "मला संन्यास घेण्याची इच्छा आहे. तू फक्त तयार हो. मी सर्व विधी सांगतो." हे ऐकताच श्री. बापट रडू लागले. हे पाहताच श्री. गंगाधरपंत श्री. बापट यांना असे म्हणाले की, "अरे! रडतो कशाला. इतके वाईट वाटत असेल तर राहू देत. माझा आत्मा पूर्ण संन्यासवृत्तीत वावरत आहे. त्यामुळे आता कसलीच इच्छा व अपेक्षा राहिली नाही. आज तीन दिवस झाले मला सतत प्रकाश दिसत आहे. अरे मी प्रकाशातच वावरत असून प्रकाशरूप झालो आहे."

ज्या दिवशी श्री. गंगाधरपंत यांनी श्री. बापट यांना हे सांगितले तो दिवस सोमवार, मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीचा होता. त्यावेळी घरात श्रीगुरुचरित्राची पारायणे चालू होती. श्री. गंगाधरपंतांचे दर्शन घेण्यासाठी बाहेरील लोकांची वर्दळ सतत वाढत होती. त्यामुळे घरातील स्त्री-मंडळींना त्यांचे दर्शन घेणे दुर्लभ झाले होते. दुसऱ्या दिवशी श्रीदत्तजयंती असल्याने श्रीगंगाधरपंतांनी बाजारातून रताळी इत्यादि सामान उपासासाठी आणण्याची सूचना केली. त्यावेळी एक नामांकित वैद्य श्री. गंगाधरपंतांची प्रकृती

पाहण्यासाठी म्हणून मुद्दाम आले होते. त्यांनी प्रकृती पाहण्याची इच्छा व्यक्त केल्यावर श्री. गंगाधरपंतांनी त्यांना असे सांगितले की, "आता प्रकृती तपासण्यासारखे व औषध घेण्यासारखे काही राहिले नाही. आपण येथून लवकर निघून गेलात तर तेच उत्तम होईल असे वाटते. आपण गेला नाहीत तर येथे अडकून पडाल." हे सर्व ऐकताच त्या वैद्यांनी काय ओळखावयाचे ते ओळखले व ते तेथून निघून गेले. त्यानंतर "श्रीगुरुदेवदत्त" नामाचा गजर सुरू झाला. अशा स्थितीत तिन्हीसांजा झाल्या. त्यावेळी मोठमोठ्याने "नारायण, नारायण, नारायण" असा तीनवेळा नामोच्चार करून श्री. गंगाधरपंतांनी प्रयाण केले. अशा प्रकारे श्री. गंगाधरपंतांनी कोणालाही कल्पना येणार नाही असे दिव्य गमन केले. श्रीस्वामी-महाराजांच्या कृपेने व त्यांच्या रूपाने त्यांना शेवटचे तीन दिवस जो दिव्य प्रकाश दिसत होता त्या प्रकाशरूप श्रीस्वामीमहाराजांशी ते एकरूप झाले. अशा प्रकारे श्रीस्वामीमहाराजांचा एकांतिक भक्त आपल्या श्रीसद्गुरूंशी एकरूप होऊन गेला.

श्री. गंगाधरपंतांना तीन मुली आणि तीन मुले होती. त्यातील पहिल्या मुलाचे नाव श्री. गणेश, दुसऱ्याचे नाव श्री. गोविंद व तिसऱ्याचे नाव श्री. दिनकर असे असून मुलींची नावे चि. द्वारका, चि. चंद्रभागा व चि. अनसूया अशी होती. श्री. दिनकर हा आठ वर्षांचा असतांना मृत्यू पावला आणि श्री. गोविंदाराव हे चोवीस वर्षांचे ऐन तरुण वयात असताना नवज्वराने मृत्यू पावले. श्री. गंगाधरपंतांनी श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेने आपल्या पुत्रांच्या मृत्यूचे हे अग्नि-समान असे दुःख मोठ्या धैर्याने सोसले. श्री. गोविंदराव ज्यावेळी मृत्यू पावले त्यावेळी त्यांच्या पत्नी श्रीमती सुंदराबाई यांचे वय

१४–१५ वर्षांचे होते. श्री. गोविंदराव यांच्या मृत्यूनंतर त्या सोवळच्या झाल्या व त्यांनी श्री. गंगाधरपंत यांची शेवटपर्यंत उत्तम सेवा केली.

श्री. गंगाधरपंतांच्या हयातीनंतर थोडया वर्षांनी म्हणजे इ. स. १९५९ साली त्यांची मंडळी म्हणजे माझी आजी ती. अन्नपूर्णाबाई (सीताबाई) आपल्या मुलाकडे म्हणजे माझे वडील ती. श्री. गणेशपंत यांच्याकडे निसरपूर येथे राहवयास आली व तेथेच तिने आपला देह ठेवला. शेवटी आमच्या ती. आजीच्या इच्छेप्रमाणे माझ्या वडिलांनी आमच्या सर्व नातेवाईक मंडळींना निसरपूर येथे बोलावून घेतले. आम्ही सर्व नातेवाईक मंडळी भेटावयास आल्याचे जेव्हा तिला समजले तेव्हा ती मुद्दाम घरातील जिना उतरून माडीवरून खाली आली. आम्हा सर्वांना पाहून माझ्या आजीला परमानंद झाला. माझी आई सौ. शारदाबाई हिने माझ्या आजीची खूप सेवा केली. ती. आजी ही सोवळी झालेली असल्यामुळे रोज स्नान झाल्यावर तिला सोवळे नेसवून सोवळचात जेवण द्यावे लागे. पुढे शेवटच्या चारपाच दिवसांपूर्वी ती आम्हा सर्वांना असे म्हणाली की, "ज्या दिवशी मला पुष्कळ ताप येईल त्या दिवशी मी प्रयाण करीन." त्यानंतर बरोबर चार-पाच दिवसांनी माझ्या आजीला सकाळी खूप अस्वस्थता वाटली व दुपारी खूप ताप आला. त्यावेळी माझ्या ती. वडिलांना अर्थात् श्री. गणेशपंतांना एकंदर परिस्थितीची कल्पना आली व त्यांनी तिच्या हातात श्रीस्वामीमहाराजांचा फोटो दिला. माझ्या आजीने तो फोटो हातात घेतला. त्याला अत्यंत मनोभावाने, प्रेमाने व श्रद्धाभक्तिपूर्वक शेवटचे वंदन केले व त्यानंतर "श्रीवासुदेवानंदसरस्वती" "श्रीवासुदेवानंदसरस्वती" "श्रीवासुदेवानंदसरस्वती" असे म्हणत म्हणत तिचा श्वास हळहळू कमी झाला व ती श्रीस्वामीमहाराजांशी एकरूप झाली.

अशा प्रकारे ज्यावेळी माझ्या आजीने श्रीस्वामीमहाराजांचे स्मरण करीत करीत देहत्याग केला त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या आम्हा सर्व लोकांना श्रीस्वामीमहाराज तेथे साक्षात् उपस्थित असल्याचा भास झाला. त्या दिवसाचे स्मरण झाले की, श्रीस्वामी-महाराजांचे माझ्या आजीवर किती अपूर्व प्रेम होते याचे त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आम्हा सर्वांना जे प्रत्यंतर दिले होते त्यामुळे आजही माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहतात.

श्री. गंगाधरपंतांनी इहलोकीची यात्रा संपविल्यावर त्यांच्या सूनबाई श्रीमती सुंदराबाई यांनी पुण्याच्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. पाठकशास्त्री अर्थात् संन्यास घेतल्यानंतरचे श्रीशंकरानंदभारती-स्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलदा मुक्कामी आले असताना त्यांच्या-कडे संस्कृतचे अध्ययन केले. त्यानंतर त्यांनी श्रीनर्मदानदीची प्रदक्षिणा केली व ती पूर्ण झाल्यावर कपिलासंगम येथे वास्तव्य केले. तेथे त्यांनी १२५ वर्षांचे श्रीसीतारामहाराज यांची सेवा केली व त्यांच्या पश्चात त्या तेथेच वास्तव्य करून आहेत. सध्या त्यांचे वय ७५ वर्षांचे असावे. भजन, कीर्तन, पुराण वाचन करणे व श्रीनर्मदा प्रदक्षिणावासीयांना भोजन घालणे हाच त्यांचा कार्यक्रम आहे.

श्री. गंगाधरपंतांचे प्रथम चिरंजीव श्री. गणेशपंत यांच्या लग्नाची हकीकत मोठी रोमहर्षक आहे. नाशिक जिल्ह्यातील वरखेड येथील राहणारे श्री. नारायणराव कृष्णराव देव हे होळकर राज्यात कचेरीत दफ्तरदार होते. ते श्रीस्वामीमहाराजांचे एकनिष्ठ व एकांतिक भक्त होते. श्रीस्वामीमहाराज श्री. देव यांना काका व त्यांच्या सौ. मंडळींना काकी असे संबोधित असत. त्यांना पाच कन्या व दोन मुले होती. त्यातील चि. शारदा नावाच्या कन्येचा विवाह श्रीस्वामीमहाराजांनीच कसा निश्चित केला व तो तेथेच कसा संपन्न

झाला याची सर्व हकीकत पृष्ठ २८६ वर व पुढेही आली आहे.

श्री. नारायणराव देवकाका यांचे वास्तव्य सावेर येथे असताना सौ. काकींना श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाची फार ओढ लागली. आपली ही इच्छा कशी पूर्ण होणार या विचारात असताना व तशी सोय व्हावी म्हणून त्या श्रीस्वामीमहाराजांची मनोमन प्रार्थना करीत असताना त्यांना व श्री. नारायणरावकाका यांना असे समजले की, श्री गणपती मंदिरात राहणाऱ्या आपल्या परिचयाच्या एक बाई श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी जाणार आहेत. त्या बाईंना योगाभ्यासाची बरीच माहिती असून त्यांना तो चांगलाच अवगत होता. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे त्यांच्या घरी गाडी बैल असून माणसेही कामाला होती. त्या काळात सावेर ते श्रीक्षेत्र चिखलदा येथे बैलगाडीने जाण्यास पाच–सहा दिवस लागत असत. त्यामुळे खाण्यापिण्याचे सर्व साहित्य बरोबर घेऊन जावे लागत असे. शेवटी पडाव करून श्रीक्षेत्र चिखलद्याला जावे लागे. श्रीगणपती मंदिरातील त्या श्रीमंत बाई ज्यावेळी श्रीक्षेत्र चिखलद्याला निघाल्या त्यावेळी श्री. नारायण-रावकाकांनी त्यांना असे विचारले की, "आमच्या मंडळींना श्रीक्षेत्र चिखलदा येथे जाऊन श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेण्याची तीव्र ओढ लागली आहे. तरी आपल्या गाडीत आमच्या मंडळींची सोय होऊ शकेल का ?" श्री. नारायणरावकाकांनी त्या श्रीमंत बाईंना असे विचारल्यावर त्यांना स्पष्ट नकार देताना त्या असे म्हणाल्या की, "आमच्या गाडीत जागा नाही; तरी आपल्या मंडळींची सोय करता येणे शक्य नाही." त्या श्रीमंत बाईंचा हा निरोप श्री. नारायणरावकाकांनी जेव्हा सौ. काकींना सांगितला त्यावेळी त्यांना फार दुःख वाटले. वास्तविक पाहता आपणास त्या श्रीमंतबाईंच्या

गाडीतून जावयास मिळेल म्हणून श्री. नारायणरावकाकांना सुट्टी नसताना व घरात अडचण असतानाही त्यांनी बाळंतपणासाठी आलेल्या मुलीची सर्व व्यवस्था व इतर निरवानिरव करून तेवढ्या प्रतिकूल परिस्थितीतही जाण्याची तयारी केली होती. अशा स्थितीत ज्यावेळी सौ. काकींना आपणास जावयास मिळणार नाही असा निरोप मिळाला त्यावेळी त्यांची श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाची तळमळ आणखीनच वाढली व त्यांना रात्रभर झोप आली नाही.

सौ. काकींनी अशा रीतीने श्रीस्वामीमहाराजांचे स्मरण करीत रात्र जागून काढली; परतु सकाळी चार वाजताच त्या श्रीमंत-बाईंची गाडी श्री. नारायणरावकाकांच्या दाराशी आली आणि त्या श्रीमंत बाई सौ. काकींना असे म्हणाल्या की, "आपणास चिखलद्याला आणण्याची श्रीस्वामीमहाराजांची रात्री आज्ञा झाली आहे. तरी आपण असाल तशा गाडीत बसा. आपणास घेतल्या-शिवाय गाडी चिखलद्याला जाणार नाही." त्या श्रीमंत बाईंनी असे सांगताच सौ. काकींचा आनंद गगनात मावेना. आपण श्रीस्वामीमहाराजांना रात्रभर मनोमन केलेली प्रार्थना पोहोच-ल्याची पावतीच सौ. काकींना मिळाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्यावेळी त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू पाझरू लागले. सौ. काकींनी एक साडी-चोळी व कुंकवा-मेणाचा डबा आपल्या झोळण्यात टाकला व त्या आनंदाने श्रीक्षेत्र चिखल-द्याला जाण्यासाठी गाडीत बसल्या.

श्रीक्षेत्र चिखलदा मुक्कामी आल्यावर सौ. काकी तेथे चार दिवस राहिल्या. श्रीस्वामीमहाराजांच्या चरणदर्शनाने व चरण-सेवेने त्या तृप्त झाल्या होत्या. चवथ्या दिवशी ज्यावेळी सावेरला परत जाण्यासाठी सौ. काकी त्या श्रीमंत बाईंबरोबर निघाल्या

त्यावेळी त्या श्रीस्वामीमहाराजांचा निरोप घेण्यासाठी गेल्या असता श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, " जाण्याची काय घाई आहे ? इतक्या लांबून येथे आला आहात; तर चार दिवस आणखी राहा." श्रीस्वामीमहाराजांनी इतक्या प्रेमाने राहण्याचा जरी आग्रह केला असला व त्यांच्याही मनात श्रीस्वामीमहाराजांच्या सत्संगात आणखी राहण्याची इच्छा असली तरीही त्या त्यांना असे म्हणाल्या की, " प्रभो ! मी ज्यांच्या बरोबर आले त्या बाईंची सोबत घरापर्यंत आहे. तरी आपण अनुज्ञा द्यावी ही प्रार्थना आहे." सौ. काकींनी अशी प्रार्थना केली; तरी जाण्याची अनुज्ञा न देता श्रीस्वामीमहाराजांनी मौन पाळले व ते काहीच बोलले नाहीत.

दुसऱ्या दिवशी सकाळी सौ. काकी त्या श्रीमंत बाईंच्या गाडी-बरोबर परत सावेरला जावयास निघाल्या. आपणास श्रीस्वामी-महाराजांनी घरी जावयास अनुज्ञा दिली नसली तरी आपण तसेच निघालो आहोत याची जाणीव सौ. काकींना गाडीत बसल्यावर व प्रवासात सतत होत होती. बढवाणी येथे गेल्यावर सौ. काकींना अडचण येऊन त्या बाजूला बसल्या. त्यामुळे त्या गाडीच्या श्रीमंत मालकीणबाईंनी त्यांना असे सांगितले की, " आपल्याला अडचण आल्यामुळे आम्ही आपल्याला आमच्याबरोबर नेऊ शकत नाही. आणि आम्ही आपल्याकरिता तीन दिवस येथे राहूही शकत नाही." त्या श्रीमंत बाईंचे हे म्हणणे ऐकल्यावर सौ. काकी त्यांना असे म्हणाल्या की, " आपण म्हणता ते बरोबर आहे. परंतु मी आपल्या गाडीच्या मागून चालत येईन." सौ. काकींच्या या म्हणण्याला त्या श्रीमंत बाई तयार झाल्या नाहीत. उलट त्या श्रीमंत बाई सौ. काकींना असे म्हणाल्या की, "आपण तीन दिवस बढवाणीलाच राहा, त्यानंतर एखाद्या कापसाच्या गाडीबरोबर किंवा दुसऱ्या

कोणाचीही सोबत मिळाल्यास त्यांच्याबरोबर सावेरला या." इतके सांगून त्या श्रीमंत बाई गाडी घेऊन निघून गेल्या.

त्यानंतर सौ. काकी तीन दिवस व तीन रात्र बढवाणी येथील धर्मशाळेत अन्नपाण्याशिवाय उपाशी राहिल्या. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी श्रीक्षेत्र चिखद्याहून निघण्यास आपणास अनुज्ञा का दिली नाही व ते मौन का राहिले याचा त्यांना उलगडा झाला. तिसऱ्या दिवशी रात्री ज्या धर्मशाळेत सौ. काकी उतरल्या होत्या, नेमक्या त्याच धर्मशाळेत श्री. नारायणरावकाका हे येऊन उतरले. श्री. नारायणरावकाका एवढ्या रात्री जरी तेथे आले होते तरी सौ. काकींनी त्यांना ओळखले. सकाळी ज्यावेळी श्री. नारायणरावकाका उठले त्यावेळी सौ. काकी त्यांना भेटल्या व घडलेली एकंदर सर्व हकीकत त्यांनी त्यांना निवेदन केली.

त्यानंतर श्री. नारायणरावकाकांनी सौ. काकींना विहिरीवर स्नान घातले व त्यांना आपले धोतर नेसावयास दिले. त्यांचे कपडे वाळल्यावर ते दोघे होडीने श्रीनर्मदानदी पार करून श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला गेले. पाचव्या दिवशी सौ. काकी स्नान करून ज्यावेळी शुद्ध झाल्या त्यावेळी श्री. नारायणरावकाका व सौ. काकी श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनाला गेल्या. ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी सौ. काकींना पाहिले त्यावेळी ते त्यांना एवढेच म्हणाले की, "काय ? परत आला ना ?" श्रीस्वामीमहाराजांचा हा प्रश्न ऐकताच सौ. काकी मनात काय समजावयाचे ते समजल्या व गप्प बसल्या. आपण श्रीस्वामीमहाराजांचे ऐकले असते तर तीन दिवस बढवाणीला उपाशी व एकटे राहण्याचा प्रसंग आपल्यावर आला नसता हाच भाव त्यांच्या गप्प बसण्यातून व्यक्त झाला.

श्रीस्वामीमहाराजांनी एके दिवशी श्री. नारायणरावकाका यांना असे विचारले की, "आता किती मुली उजवावयाच्या आहेत ? त्यावेळी श्री. नारायरायणकाका श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाले की "प्रभो ! आता दोन मुलींचीच कार्ये व्हावयाची राहिली आहेत. ती आपल्या समक्ष करावयाची इच्छा आहे." त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी सुचविल्याप्रमाणे चि. सीता या मुलीचा विवाह त्यावेळी श्रीनर्मदा प्रदक्षिणा करणारे व तेथे उपस्थित असलेले श्री. कुंभोजकर यांचे चिरंजीव श्री. माधवराव (वय २५) यांच्याशी व दुसरी मुलगी चि. शारदा हिचा विवाह श्री. गंगाधरपंत वैद्य यांचे चिरंजीव श्री. गणेशपंत (वय १४) यांच्याशी झाला. हे दोन्हीही विवाह श्रीस्वामीमहाराजांच्या समक्ष त्यांच्या दरबारात श्रीक्षेत्र चिखलदा येथे मोठ्या थाटात पार पडले. या दोन्ही लग्नात दोन्ही कडचा खर्च श्रीस्वामीमहाराजांच्या अर्थात् श्रीदेवांच्या भंडाऱ्यातून करण्यात आला. माझे पिताश्री गणेशराव व मातुश्री सौ. शारदाबाई यांचे एवढे अहोभाग्य की, त्यांचे लग्न श्रीस्वामीमहाराजांनी स्वतः ठरविले व लग्नाचा खर्चही त्यांनी स्वतः केला.

श्री. गणेशपंत यांचे सासरे म्हणजे माझ्या ती. आईचे वडील श्री. नारायणराव कृष्णराव देव हे काही दिवस बढवाणी येथे राहिले होते. ते दररोज सकाळी पहाटे त्यांच्या घरी केलेले गायीचे ताक श्रीस्वामीमहाराजांना देण्यासाठी व त्यांचे दर्शन घेण्यासाठी श्रीक्षेत्र चिखलदा येथे येत असत. त्या दिवसात श्रीस्वामीमहाराजांना संग्रहणीचा वगैरे विशेष त्रास होत असल्याने ते फक्त ताकच घेत होते.

श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र चिखलद्याहून पुढे श्रीक्षेत्र कातरखेडा येथे गेल्यावर एकदा श्री. नारायणरावकाका व सौ. काकी असे दोघेजण आपल्या लेकी सुनांसह श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठी

गेले होते. ज्यावेळी श्रीस्वामीमहाराजांची ही भक्तमंडळी श्रीक्षेत्र कातरखेडा येथे जात असल्याचे डहीचे राजे श्री. गणपतसिंह ठाकोर-साहेब यांना कळले त्यावेळी त्यांनी डोंगरातून जाणारा रस्ता नीट करून बैलगाडी चढावर व्यवस्थित चढेल व ती उतारावर नीट उतरणीस लागेल अशी व्यवस्था केली. त्यानंतर या सर्व मंडळींच्या गाड्या रस्त्याने निघाल्या. जरी राजाने सर्व व्यवस्था केली असली तरी रस्ता फारच कठीण होता. एका बाजूला डोंगर व दुसऱ्या बाजूला घळी असल्यामुळे गाड्या फार काळजीपूर्वक हाकाव्या लागल्या. ज्यावेळी ही सर्व मंडळी श्रीक्षेत्र कातरखेडा येथे आली त्यावेळी दुपार झाली होती. या लोकांच्या बैलगाड्या श्रीनर्मदा-नदीच्या किनाऱ्यापासून खूप दूर उभ्या कराव्या लागल्या. सर्व मंडळी खाली उतरून जेव्हा चालू लागली तेव्हा वाळवंटातून जाताना बरोबरच्या मुलांचे पाय पोळू लागले. त्यामुळे ती मुले आईवडिलांनी किंवा मोठ्या मंडळींनी आपल्याला कडेवर घ्यावे म्हणून रडू लागली; परंतु सर्वच मोठी मंडळी सामानसुमान घेऊन चालत असल्यामुळे मुलांना कडेवर घेणे त्यांना शक्य नव्हते. हे सर्व श्रीस्वामीमहाराजांनी दुरून पाहिले व लागलीच जवळच्या मंडळींना असे सांगितले की, " अरे ! येणाऱ्या मंडळींच्या मुलांचे पाय पोळत असल्यामुळे ती रडत आहेत. तरी त्यांना उचलून घेऊन या. " हे ऐकताच जवळ असलेली भक्त मंडळी त्वरित धावली व त्या मुलांना उचलून घेऊन आली. सर्व मंडळी मुक्कामाला आल्यावर त्यांनी श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेतले. यानंतर श्रीनर्मदानदीच्या पात्रातच पिलूच्या व जांभळाच्या झाडांचा पाला घालून ज्या लहान लहान झोपडीवजा कुटी तयार केल्या होत्या त्यात श्री. नारायणराव

काकांची व त्यांच्या सर्व मंडळींची व्यवस्था करण्यात आली.

अशा प्रकारे माझ्या मातुश्री सौ. शारदाबाई त्यांच्या ती. वडिलां-बरोबर अर्थात् श्री. नारायणरावकाकांबरोबर ज्यावेळी श्रीक्षेत्र कातरखेडा येथे आल्या त्यावेळी त्यांचे वय सात वर्षांचे होते. एके दिवशी त्यांनी श्रीस्वामीमहाराजांना भिक्षा घालण्याची इच्छा प्रदर्शित केली. श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र कातरखेडा येथे फक्त पाचच ठिकाणी व जेथे सोवळचात स्वयंपाक व नैवेद्य–वैश्वदेव होत असे तेथेच भिक्षा घेत असत. भिक्षा आणल्यावर श्रीस्वामीमहाराज ती श्रीनर्मदानदीत बुडवून त्याचे पाच भाग करीत व त्यातील एक भाग ग्रहण करीत असत. श्रीस्वामीमहाराज भिक्षेला निघाले की, सर्वांना अशी ताकीद असे की, "भिक्षेला जाताना कोणीही श्रीस्वामी-महाराजांना नमस्कार करू नये. सर्वांनी आपापल्या भिक्षेची (माधुकरीची) जय्यत तयारी ठेवावी. श्रीस्वामीमहाराज आपल्या कुटीच्या बाहेर निघाले की, सर्वांनी भिक्षेबाबत दक्षता ठेवावी."

सौ. शारदाबाईंनी व्यक्त केलेली इच्छा श्री. नारायणराव-काकांनी श्रीस्वामीमहाराजांना सांगितली असता श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "परकर पोलके सोवळचातच वाळत टाकून भिक्षा वाढण्यास सांगावे." दुसऱ्या दिवशी श्रीस्वामी-महाराजांनी सांगितल्याप्रमाणे सौ. शारदाबाई सोवळचाचे परकर पोलके नेसून श्रीस्वामीमहाराजांच्या भिक्षेच्या वेळी कुटीच्या बाहेर येऊन त्यांची वाट पाहात उभ्या राहिल्या. त्या दिवशी सौ. काकींनी सोवळचात स्वयंपाक केला होता व श्री. गंगाधरपंतांनी नैवेद्य वैश्वदेव स्वतः केला होता. त्यांनीच सौ. शारदाबाईंकडून भिक्षेचा संकल्प सोडून घेतला होता. ठरलेल्या वेळी श्रीस्वामीमहाराज भिक्षेसाठी आले. त्यावेळी सौ. शारदाबाईंनी त्यांना भिक्षा वाढली. एवढ्या लहान वयात म्हणजे सातव्या वर्षी श्रीस्वामीमहाराजांना वाढलेल्या

या भिक्षेच्या प्रसंगाचे वर्णन ज्या ज्या वेळी माझी आई करीत असे त्या त्या वेळी तिच्या नेत्रातून अश्रू पाझरत असत. तिची गुरुभक्ती इतकी दिव्य होती. या प्रकारानेच एकदा त्या प्रसंगाचे वर्णन करीत असताना माझी आई मला असे म्हणाली की, " ज्या क्षणी मी श्रीगुरुपदारविंदांचे ध्यान करते त्या क्षणी माझे ध्यान तेथे स्थिर होते. त्यानंतर मला कसलेही भान राहात नाही. " अशा प्रकारे माझ्या आईला ध्यानाची अत्यंत उच्च अवस्था श्रीस्वामी-महाराजांच्या अपार कृपाशीर्वादाने प्राप्ती झाली होती. हे गुपित माझ्या आईने मला सांगितल्यामुळेच कळले व ते येथे सांगता आले. श्रीस्वामीमहाराजांच्या चरणारविंदांवर असलेल्या माझ्या ती. आईच्या निष्ठेची आज नुसती स्मृती झाली; तरी तिच्या दिव्य अशा श्रीगुरुभक्तीचे व श्रीस्वामीमहाराजांवरील तिच्या श्रीगुरु-प्रेमाचे व श्रीस्वामीमहाराजांचे तिच्यावरील शिष्य प्रेमाचे स्मरण होऊन माझ्याही डोळ्यातून अश्रू पाझरू लागतात.

माझी ती. आई मला असे सांगत असे की, " श्रीक्षेत्र कातर-खेडा येथे झोपडीत राहताना फार भीती वाटत असे; कारण तेथे नेहमी वाघ येत असत. एकदा तर एक वाघ मोठमोठ्या डरकाळ्या फोडीत आला व तो श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन घेऊन परत गेला. परंतु त्याच्या डरकाळ्यांनी सर्वजण भयभीत होऊन गेले होते. तेथील वाघांच्या या त्रासामुळे तेथे राहणारे भिल्लही तीरकमठा घेऊन श्रीस्वामीमहाराजांच्या सेवेसाठी रात्री त्यांच्या झोपडीवर पहारा देत असत. "

श्रीक्षेत्र कातरखेडा येथे श्रीनारायणरावकाका यांच्या बरोबर त्यांच्या मोठ्या मुलीचे चिरंजीव श्री. वसंतरावजी गंधे हे आले होते त्यावेळी ते ४-६ महिन्यांचे असतील. त्यावेळी प्रवासाने व उष्णतेने

तो हैराण होऊन त्याला गोवर निघाला होता. त्यामुळे सौ. काकींनी त्याला श्रीस्वामीमहाराजांच्या दृष्टीक्षेपासाठी आणले व त्याला श्रीस्वामीमहाराजांच्या समोर निजविले. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्याच्या अंगावर आपल्या कमंडलूतील तीर्थ शिंपडले. त्यामुळे चि. वसंतास लवकरच बरे वाटले.

श्री. नारायणरावकाका यांची तृतीय कन्या सौ. कुशाताई अर्थात् सौ. भागीरथीबाई ही श्री. गणपतराव नाईक यांना दिली होती. श्रीक्षेत्र चिखलदा येथे श्रीस्वामीमहाराजांचा चातुर्मास चालू असताना व पुढेही मुक्काम असताना सौ. कुशाताई तेथेच राहिली होती. श्री. गणपतराव यांचे सर्वच कुटुंब अत्यंत धार्मिक व कर्ममार्गी असल्यामुळे ते नैवेद्य, वैश्वदेव, अतिथी भोजन वगैरे सर्व व्यवस्थित करीत असत. या सर्व गोष्टींमुळे श्रीस्वामीमहाराज त्यांच्याकडे अचूक माधुकरी घेत असत.

श्रीक्षेत्र चिखलदा येथील चातुर्मास संपल्यावर श्रीस्वामीमहाराज श्रीक्षेत्र कातरखेडा येथे गेले. एकदा सौ. कुशामावशी आपल्या तीन महिन्यांच्या मुलाला घेऊन श्रीस्वामीमहाराजांकडे श्रीक्षेत्र चिखलद्याहून श्रीक्षेत्र कातरखेडा येथे गेली व तेथेच काही दिवस श्रीस्वामीमहाराजांच्या सेवेसाठी राहिली; परंतु काही दिवसांनी तिच्या सौ. सासूबाई तिला घेऊन जाण्यासाठी श्रीक्षेत्र कातरखेडा येथे आल्या. ज्यावेळी सौ. कुशामावशीला घेऊन जाण्यासंबंधी तिच्या सौ. सासूबाईंनी श्रीस्वामीमराहाराजांकडे परवानगी मागितली त्यावेळी श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, "हिला सध्या येथेच 'राहू द्या." श्रीस्वामीमहाराजांनी असे सांगितल्यावर सौ. कुशाभावशीच्या सासूबाई श्रीस्वामीमहाराजांना असे म्हणाल्या की, आता शिमगा जवळ आला आहे. घरी जाणे अत्यावश्यक आहे.

तरी हिला घेऊन जाते." इतकें सांगून सौ. कुशामावशीच्या सासूबाई तिला व तिच्या मुलाला घेऊन श्रीक्षेत्र कातरखेडयाहून श्रीक्षेत्र चिखलदा येथे घरी गेल्या. तिसऱ्या दिवशी सौ. कुशामवशीचा मुलगा एकाएकी अकस्मात गेला. यामुळे तिला फारच पश्चात्ताप झाला. ज्यावेळी ही गोष्ट श्रीस्वामीमहाराजांना कळली त्यावेळी ते एकदम शांत बसले. त्यावेळी त्यांची मौन मुद्रा हेच सांगत होती की, "आपण सौ. कुशामावशीला येथे राहावयास सांगितले होते; पण ती राहिली नाही. जर ती येथे राहिली असती तर तिचा मुलगा वाचला असता. ईश्वराची इच्छा मोठी बलवत्तर असते हेच खरे!"

श्रीस्वामीमहाराज श्रीनर्मदाकिनारी श्रीक्षेत्र कोटेश्वर येथे असताना एके दिवशी श्री. बळवंतराव ताथवडकर या नावाचे एक तरुण गृहस्थ त्यांच्या दर्शनास आले. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांनी त्यांना त्यांची सर्व हकीकत विचारली असता ते असे म्हणाले की, "प्रभो! गृहकलहामुळे त्रासून जाऊन मी ग्वाल्हेरहून पळून आलो असून सध्या श्रीनर्मदा प्रदक्षिणा करीत आहे." श्री. बळवंतरांची ही हकीकत ऐकताच श्रीस्वामीमहाराज त्यांना असे म्हणाले की, अशा रीतीने त्रागा करून पळून येऊन श्रीनर्मदा प्रदक्षिणा करणे योग्य नाही; कारण त्याचें काहीच फल आपणास मिळणार नाही. तरी आपण आपली प्रदक्षिणा थांबवून परत जावे व संसारास लागावे. यातच आपले कल्याण आहे." श्रीस्वामीमहाराजांनी असे सांगताच श्री. बळवंतराव त्यांना असे म्हणाले की, "प्रभो! आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मात्र माझी आपल्या चरणी एवढीच प्रार्थना आहे की, आपण मला अनुग्रह देऊन कृतार्थ करावे. म्हणजे मी आपल्या आज्ञेप्रमाणे येथेंच श्रीनर्मदातीरावर श्रीक्षेत्र कोटेश्वर येथे राहून संसार करीन." श्री. बळवंतराव यांची श्रद्धाभक्ती

पाहून श्रीस्वामीमहाराजांना परमानंद झाला व त्यांनी त्यांना अनुग्रह देऊन कृतार्थ केले. त्यानंतर त्यांनी आपल्या सौ. मंडळींना ग्वाल्हेरहून बोलावून घेतले आणि श्रीक्षेत्र कोटेश्वर येथे एक कुटी बांधून श्रीस्वामीमहाराजांच्या इच्छेप्रमाणे व आज्ञेप्रमाणे संसार सुरू केला. पुढे श्री. बळवंतराव ताथ्वडकर आपल्या मृत्यूपर्यंत श्रीक्षेत्र कोटेश्वर येथेच राहिले.

श्री. बळवंतरावांनी आपला चरितार्थ भिक्षा अर्थात् माधुकरी मागून आणून चालविला. त्यांना चि. रेवा व चि. नर्मदा या नावाच्या दोन मुली व चि. नारायण या नावाचा एक मुलगा झाला. चि. रेवाचा विवाह ग्वाल्हेर निवासी श्री. आफळे यांच्या घरी झाला. चि. नर्मदेचा विवाह श्री. दत्तात्रेय वांगे यांच्या मेव्हण्याशी झाला. चि. नारायण याची मुंज श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या भंडाऱ्यात लावली. मुंज झाल्यावर ज्यावेळी चि. नारायण श्रीस्वामीमहाराजांच्या पाया पडण्यासाठी आला त्यावेळी त्यांनी त्याला असे विचारले की, "नारायण! तुला काय हवे?" त्यावेळी चि. नारायण त्यांना तत्काळ असे म्हणाला की, "महाराज! आपण मला विद्या द्या. ज्ञान द्या."

चि. नारायण नऊ वर्षांचा असताना त्याचे वडील श्री. बळवंतराव कैलासवासी झाले. पुढे चि. नारायणच्या मातुश्रींच्या इच्छेप्रमाणे त्याला ग्वाल्हेर येथे श्री. गंगाधरपंत वैद्य यांच्याकडे पोहोचते केले. श्री. गंगाधरपंत वैद्यांनी श्री. नारायणराव यांच्या शिक्षणाचा सर्व भार उचलून त्यांना उच्च शिक्षण दिले. श्री. नाराणयराव यांची श्रीस्वामीमहाराजांवर अलोट भक्ती होती. ते फार देखणे, हुशार, चतुर, नियमित व सर्वगुणसंपन्न होते. श्री. गंगाधरपंतांनी आपल्या अपत्यांपेक्षाही श्री. नारायणराव यांच्याकडे जास्त लक्ष पुरविले.

पुढे डॉ. नारायणराव मध्यप्रदेशाच्या डेप्युटी डायरेक्टर पदापर्यंत पोहोचले.

श्री. गंगाधरपंत वैद्य यांची कन्या चि. द्वारका ही रंगाने काळी आणि कडक मंगळ असलेली होती. तिच्याकरिता अनेक ठिकाणी पत्रिका पाहिल्या; परंतु तिचे लग्न जमले नाही. मात्र डॉ. नारायणराव ताथवडकर यांच्या पत्रिकेशी तिची पत्रिका जुळली; परंतु श्रीगंगाधरपंत यांना तिच्या करिता त्यांच्याजवळ शब्द टाकण्यास मन धजत नव्हते. मात्र ज्यावेळी श्री. नारायणराव डॉक्टरकीचे शिक्षण पूर्ण करून निसरपूरला आले त्यावेळी श्री. गंगाधरपंतांनी द्वारकेबद्दल त्यांना विचारले. चि. द्वारका डॉ. नारायणराव यांना पसंत नसली तरी श्री. गंगाधरपंत यांचा शब्द मोडण्याची नैतिक हिंमत त्यांच्यात नसल्यामुळे ते हो म्हणाले. या गोष्टीमुळे डॉ. नारायणराव व त्यांच्या घरातील सर्वच मंडळी नाराज झाली. परंतु शेवटी जणूकाही श्रीस्वामीमहाराजांच्या इच्छेप्रमाणे आपल्या भक्तांच्या मुला–मुलींचे लग्न झाले.

श्रीस्वामीमहाराजांचा श्रीक्षेत्र चिखलदा येथे मुक्काम असताना एके दिवशी श्री. गंगाधरपंत वैद्य यांची दोन्ही मुले, चि. गणेश (माझे वडील) व चि. गोविंद (माझे काका) यांची नुकतीच मुंज झाली असताना, एके दिवशी दुपारच्या वेळी हे दोघेजण लंगोटी नेसून श्रीस्वामीमहाराजांच्याकडे गेले व दूर उभे राहून त्या दोघांनी श्रीस्वामीमहाराजांना नमस्कार केला. त्यावेळी श्रीस्वामीमहाराज एकटेच बसून काहीतरी लिहीत होते. या दोघांनी श्रीस्वामीमहाराजांना नमस्कार करताच त्यांनी मान वर उंच करून त्या दोघांकड पाहिले व त्यांना जवळ बोलावून घेऊन एक मंत्र लिहून दिला. या अहेतुककृपेमुळे त्या दोघांचे ईहपर अखंड कल्याण झाले. श्रीस्वामी-

महाराजांनी न मागता दिलेला मंत्र माझे वडील श्री. गणेशपंत आयुष्यभर एकनिष्ठेने जपत असत.

श्री. बाबूराव कोरान्ने हे श्रीस्वामीमहाराजांचे परमभक्त होते. १९७०-७१ मध्ये ज्या दिवशी श्रीनर्मदानदीला "न भूतो न भविष्यती" असा महापूर आला होता त्या दिवशी ते नेहमीप्रमाणे श्रीनर्मदानदीवरील श्रीकोटेश्वर महादेवाच्या पूजेसाठी गेले होते. त्यावेळी श्री. बाबूराव पूजा करीत असतानाच श्रीनर्मदानदीचे पाणी इतक्या वेगाने चढले की, त्यांना त्यातून बाहेर येणे शक्य झाले नाही. हळूहळू त्यांच्या दुतर्फा अथांग पाणी पसरले. त्यावेळी श्री. बाबूराव श्रीराममंदिराच्या कळसाला पकडून दीड दिवस राहिले होते. पाणी उतरल्यावर ते खाली उतरून आले. या दीड दिवसाचे वर्णन करताना ते नेहमी असे म्हणत असत की, "श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेमुळेच मी त्या संकटातून बाहेर पडलो. त्यांनीच मला त्या दिव्यातून ओढून बाहेर काढले."

बढवाणी येथे राहणारे श्री. माधवराव बिवलकर हे श्रीस्वामीमहाराजांचे परमभक्त असून ते आपल्या दम्यावरील रोगासाठी नेहमी औषध घेण्यासाठी निसरपूर येथे श्री. गणेशपंतांकडे म्हणजे माझ्या ती. वडिलांकडे येत असत. त्यावेळी श्रीक्षेत्र चिखलदा येथे पुलाचे बांधकाम नुकतेच सुरू झाले होते. त्यावेळी श्री. माधवराव डोंग्यात बसून श्रीनर्मदानदी पार करीत असता एकाएकी पुराने नाव उलटली. श्री. माधवराव दम्याचे रोगी असल्यामुळे या संकटामुळे पार दमून गेले. इतक्यात त्यांच्या हातात एक लाकडाची फळी लागली. ती पकडून ते प्रवाहाबरोबर वाहू लागले. त्याचवेळी त्यांचे धोतर सुटले व त्याचा सोगा धरून एक व्यापारी त्यांच्या साहाय्याने वाहू लागला. अशा प्रकारे आठ-दहा कोस वाहत गेल्यावर

किनाऱ्यावरील लोकांनी त्यांना पुरातून बाहेर काढले. अशा रीतीने दोघे किनाऱ्यावर आल्यावर श्री. माधवरावांच्या आधाराने जो व्यापारी वाचला होता तो श्रीमंत असल्यामुळे त्याने श्री. माधवरावांना बरीच रक्कम देऊ केली. पण त्यांनी ती घेतली नाही. वास्तविक पाहता श्री. माधवराव यांच्या घरची खूपच गरिबी होती. अशा स्थितीतही ते त्या श्रीमंत व्यापारी गृहस्थांना असे म्हणाले की, " श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज हे माझे सद्गुरू आहेत. त्यांनी मला जसे आज या संकटातून वाचविले तसे तुम्हालाही वाचविले आहे. आपण वाचलात त्याचे सर्व श्रेय माझ्या श्रीसद्गुरुनाथमहाराजांना आहे. तरी तुम्हाला जी काही सेवा करावयाची आहे ती त्यांची करा. मला काहीही नको." श्री. माधवराव विवलकर यांचे हे उद्गार ऐकताच त्यांची श्रीसद्गुरुनिष्ठा, श्रीसद्गुरुप्रेम व श्रीसद्गुरुविश्वास पाहून त्या श्रीमंत गृहस्थांच्या डोळ्यात अश्रू तरळू लागले.

माझे वडील ती. श्री. गणेशपंत व आई ती. सौ. शारदाबाई हे दोघेजण निसरपूरहून श्रीनर्मदातीरावरील श्रीक्षेत्र कोटेश्वर हे स्थान जवळ असूनही तेथील मोठा घाट चढवा व उतरावा लागू नये म्हणून तेथे न जाता श्रीक्षेत्र चिखलदा जेथे श्रीनर्मदास्नानासाठी जात असत व पूर्वी श्रीस्वामीमहाराज येथे स्नान करीत असत तेथेच अचूक स्नान करीत असत. श्रीस्वामीमहाराज ज्या ठिकाणी स्नान करीत असत तेथे दगड घालून जागा बांधून काढली असली; तरी ते पाणी फार खोल असून त्यातील खडक पाण्यात फक्त पाय राहील इतकाच वर दिसत असे. या खडकाजवळच एक कोनाडा करून त्यात श्रीगणेशाच्या आकाराची एक मूर्ती खोदून काढली आहे. एके दिवशी

सौ. आई तेथे स्नान करून हांताने त्या श्रीगणेशाच्या मूर्तीला पाणी घालीत असताना तो खडक निसरडा झाल्यामुळे तोल जाऊन श्रीनर्मदानदीत पडली व गटांगळ्या खात खात वाहात जाऊ लागली. त्यावेळी माझे ती. वडील स्नान करून खडकावर बसले होते.

माझी आई वाहात चालल्याचे पाहून तेथे जवळच उभी असलेली एक बाई जोराने ओरडली. त्याबरोबर ती. वडिलांचे श्रीनर्मदानदीत वाहत जाणाऱ्या माझ्या आईकडे लक्ष गेले. माझ्या ती. वडिलांना चांगले पोहता येत असल्यामुळे त्यांनी तत्काळ श्रीस्वामीमहाराजांचे स्मरण करून श्रीनर्मदानदीत उडी मारून तिला बाहेर ओढून काढले. त्यावेळी श्रीनर्मदेच्या त्या खोल पाण्यात पोहत जाऊन ती. सौ. आईला वाचविणे हे अत्यंत दुर्घट व दुष्कर कर्म होते; परंतु श्रीस्वामीमहाराजांच्या कृपेमुळे माझ्या ती. वडिलांना हे सहज शक्य झाले. पुढे त्यांनी आम्हाला पत्रातून ही सर्व हकीकत कळविली व शेवटी असे लिहिले की, “तुमच्या मातुश्री श्रीनर्मदेमध्ये श्रीक्षेत्र चिखलद्याहून वाहात गेल्या होत्या; परंतु श्रीस्वामीमहाराजांच्या अपार कृपेमुळेच त्या तुम्हाला परत लाभल्या आहेत. श्रीस्वामीमहाराजांच्या आपल्या सर्वांवरील अपार कृपेला पारावार नाही हे लक्षात आले म्हणजे धन्यता वाटते व त्यांच्या चरणांच्या अखंड स्मरणानेच जीवन कृतार्थ होईल याची खात्री पटते.”



श्रीसीताराममहाराजकृतम्

॥ श्रीवासुदेवानंदसरस्वतीचरितम् ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥

कोंकणाख्यप्रदेशे तु राजधानी बहुश्रुता ।
सावंतवाटिका नाम्ना सर्वलक्षणलक्षिता ॥ १ ॥

तस्याः समीपे सुपुण्यो माणग्रामोस्ति सुंदरः ।
तद्ग्रामे निर्मला नाम्ना पापघ्नी वर्तते नदी ॥ २ ॥

तत्र कश्चिद्द्विजवरो गणेशो नामधारकः ।
टेंब्योपाव्होतिविख्यातः सदाचाररतो गृही ॥ ३ ॥

आसीत्तत्स्त्री सुशीला च रमानाम्नी पतिव्रता ।
तत्प्राक्पुण्यचयाद्दत्तः प्रसन्नोभूद्वरं ददौ ॥ ४ ॥

धृतव्रतासि भद्रं ते श्रद्धयाराधितस्त्वया ।
छेत्ता ते हृदयग्रंथिर्भवेत्पुत्रो मम प्रियः ॥ ५ ॥

इति तस्यै वरं दत्वा भगवानत्रिनंदनः ।
विचारयामास हृदि मत्समो नास्ति कश्चन ॥ ६ ॥

अतोवतीर्य मेदिन्यां स्वधर्मपरिपालनं ।
करिष्यामीति निश्चित्य स्वयमेवाभवत्सुतः ॥ ७ ॥

आनंदवत्सरे मासि श्रावणे च सितेतरे ।
पंचम्यां रविवारे च जज्ञे स्वयमजो विभुः ॥ ८ ॥

य आचारव्यवहृतिकुशलो बालभावतः ।
ब्रह्मचर्याद्याश्रमादीन् स्वीकृत्य विधिपूर्वकम् ॥ ९ ॥

कर्माचरन्ननासक्तो आप्तकामो जितेंद्रियः ।
शीतोष्णादिद्वंद्वहीनो अमानी मानदः कृती ॥१०॥

सर्वलक्षणसंपन्नः सर्वविद्याविशारदः ।
आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् समदृङ्मुनिः ॥११॥

धर्मं गोप्तुं सतस्त्रातुं चचार धरणीतले ।
मेनिरे भगवद्रूपं वासुदेवं त्र्यधीश्वरं ॥१२॥

कुंडीदंडधरं शांतं काषायांबरधारिणं ।
श्रीपादश्रीवल्लभोयमवतीर्णोस्ति भूतले ॥१३॥

मेदिनीं पावनीकृत्य कृतकृत्यो ययौ स्वयं ।
रेवायामुतरे तीरे देशे गुर्जरसंज्ञके ॥१४॥

तार्क्ष्येश्वराभिधाने तु क्षेत्रे परमपावने ।
उवास गौप्यरूपेण सतां प्रत्यक्षदो विभुः ॥१५॥

यो जागर्ति सदा स्वीयभक्तानां गुप्तये कलौ ।
नररूपेण यतिराट् सोस्मान् रक्षतु सर्वदा ॥१६॥

इत्थं षोडशभिः श्लोकैः श्रीगुरोश्चरितं शुभं ।
सीतारामेण रचितं यः पठेत् स सुखी भवेत् ॥१७॥

॥ इति श्रीवासुदेवानंदस्वामिमहाराजानुज
श्रीसीताराममहाराजकृतं श्रीसद्गुरुचरितस्तोत्रं संपूर्णम् ॥

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराजकृत

॥ श्रीवासुदेवानन्दगुरुचरित्रसार ॥

वन्दे श्रीसद्गुरुं दत्तं माधीशं साक्षिणं शिवं। तदीरितेन तत्तुष्टयै लिख्यते चरितं गुरोः ॥ १ ॥ श्रीगुरोश्चरितं स्वल्पं रम्यं मंगलपावनं। सारभूतं हि तद्वच्मि ध्यादिशुद्धयै च बालधीः ॥ २ ॥ मानग्रामे मानवा मानहीना प्रत्यग्वाहा निर्मला निर्मलाभाः। बालः स्वज्ञो ब्रह्म गाणेशजोऽभूद्वन्दे दत्तं श्रीगुरुं वासुदेवम् ॥ ३ ॥ मौंज्या बंधनमष्टमे गुरुकुलावासो व्रतानां धरो वृत्वा सांगमृचं सुशास्त्रबहुविद्विद्याकलापारगः। मंत्रज्ञो विधिवत्स्वधर्मनिरतः सर्वार्द्धसिद्धिप्रदः त्वत्पादं सततं नमामि च गुरो रक्षस्व मां बालकम् ॥ ४ ॥ स्वार्थं भिक्षान्नपूर्णाकरसुयुजमथो शांतिदांतिप्रदानो विद्वाङमेशं हि वृत्वा त्रिविधमृणमपाकृत्य संन्यस्य योगीट्। तीर्थं तीर्थेशपादो व्रजति सुजनहृत्तापदीनार्तिहर्ता वन्दे तं वासुदेवं गुरुकविसदयेड्रक्ष रक्ष स्वबालम् ॥ ५ ॥ ससुखगवज्ज्येष्ठामाप्रतिपदि चानन्दवत्सरे विरमे। विरमे ब्रह्मणि सकलो विकलो भूत्वा नतोस्मि तत्पद्मे ॥ ६ ॥ कृष्णांत्यपूर्णानंदावत्सरे खे जातवब्दभौ। कृष्णाद्यपूर्णानंदावत्सरे खेजातवब्दभौ ॥ ७ ॥ श्रीसद्गुरोश्चरित्रान्तं नो जानन्ति सुरादयः। वागीशा बालवाचात्र प्रीणातु प्रार्थना हि मे ॥ ८ ॥

॥ इति श्रीवासुदेवानन्दगुरुचरित्रसारं संपूर्णम् ॥

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
श्रीमन्नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराजकृत

॥ आरत्या ॥

क्रमांक १

जयदेव जयदेव पुरुषोत्तममूर्ते जय आनंदमय मूर्ते ।
वासुदेवानंदसरस्वति गुरुकीर्ते ॥ ध्रृ० ॥
कृष्णावेणी-पंचगंगा-संगमीं ।
येउनि सुरमुनि वंदित श्रीदत्तस्वामी ।
तो करुणासिंधु हृदयिं सांठविला नामी ।
तद्रूपचि होउनियां विचरतसां स्वामी ॥ जयदेव० ॥१॥
सद्विद्या संपादुनि उपनिषदीं रमला ।
तीर्थें हिंडुनि सर्वां गुरुपदिं रंगविला ॥
गुरुचरितादि ग्रंथामृत हा पाजविला ॥
यच्छ्रवणें पठणें हरि हरिभवविधिजाला ॥ जयदेव० ॥ २ ॥
श्रीमद्दत्तगुरुयशादशदिशि गाजविलें ॥
जगदीश्वरदत्तगुरु हृदिं ज्यांच्या डोले ॥
सुरमुनि गंगा कृष्णा रेवा स्तुति बोले ॥
तो हा सद्गुरु यत्पदिं मम मानस रमले ॥ जयदेव० ॥ ३ ॥
प्रथमानंदवत्सरिं देहीसा झाला ।
अन्त्यानंदवत्सरिं विदेहि हा भरला ।
मध्यें सर्वानंदमयकायचि गमला ।
तो आनंदमयचि गुरुगुरु मद्धृदिं समला ॥ जयदेव० ॥ ४ ॥

अठराशें छत्तिसशकिं ज्येष्ठीं कुहू तिथिला ।
आनंद संवत्सरिं स्वानंदीं भरला ।
मंगलदिनिं सविताऽस्ताऊर्ध्व दिशा घटिला ।
ब्रह्मचि होउनि ब्रह्मीं गुरुपदिं हा बसला ॥ जयदेव० ॥ ५ ॥

सद्विद्या देउनियां सन्मार्गीं लावी ।
ह्या तव पदभक्ती जी भवसिंधुस नुरवी ।
अघौघहारक नामस्मरण मनीं वसवी ।
त्वत्पदकमलरसास्पद नृसिंहहृत्करवी ॥ जयदेव० ॥ ६ ॥

क्रमांक २

जय जय श्रीमद्गुरुवरस्वामिन् परमात्मन् हंसा ।
वासुदेवानंदसरस्वति आरति तदहंसः ॥ ध्रु० ॥

सोहं हंसः पक्षाभ्यां संचरसि ह्याकाशे ।
वासस्ते खलु लोके सत्ये क्रीडा तव मानसे ॥ जय० ॥ १ ॥

मुक्ताहारो ब्रह्मवाहको वैराड्रूपधर ।
भक्तराजहृद्ध्वांततमोहृत्स्वीकुरु मांच हर ॥ जय० ॥ २ ॥

पक्षस्यैके वातेनैते भीताः काकाद्याः ।
पलायितास्ते द्रुतं प्रभावाद्भवंति चादृश्याः ॥ जय० ॥३ ॥

एवं सति खलु बालस्तेहं ग्रसितः कामाद्यैः ।
मातस्त्वरया चोद्धर कृपया प्रेषितशांत्याद्यैः ॥ जय० ॥ ४ ॥

दासस्ते नरसिंहसरस्वती याचे श्रीचरणं ।
भक्तिश्रद्धे वासूस्ते हृदि सततं मे शरणं ॥ जय० ॥ ५ ॥

क्रमांक ३

जयजय श्रीमद्गुरुवरदेवाधिदेवा ।
पंचारति हे चरणीं घडवी मज सेवा ।। जयदेव०।।ध्रृ०।।

वास तुझा ब्रह्मांडीं चालक तूं देवा ।
असशी तूं सर्वांचा आनंदठेवा ।
वदती वेद सरस्वती न होय हा ठावा ।
का मति माझी नमितों पदिं देई ठावा ।। जय० ।।१।।

सद्दाता तव महिमा वर्णितसे वेद ।
मोक्षाची सत्रें हीं ठेविलि बहुसुखद ।
अतिदु:खें शक्ति नसे हरि माझा खेद ।
ज्ञानामृत पाजुनि दे अखंड तव पद ।। जय० ।।२।।

लीला अनंत तूझ्या वदतां आनंत ।
चारी साही अठरा पाहतां नच अंत ।
नारद व्यास मुनींद्र ध्यातां नच येत ।
तो तूं देहा धरुनी देशी करिं स्वार्थ ।। जय० ।।३।।

पदिं गंगा कटिं शोभे छाटी कोपीन ।
हृदयीं लक्ष्मी कौस्तुभ भृगुपद लांछन ।
दंड कमंडलु हातीं रवींदुसम वदन ।
राहो माझे हृदयीं हेंचि सदा ध्यान ।। जय०।।४।।

आलिंगो त्वन्मूर्ति दिसोच हे नयना ।
ऐको कर्ण गुणातें नामामृत रसना ।
त्वत्पदसुमगंध सदा लाभो ह्या घ्राणा ।
दे पदभक्ति श्रद्धा सतत करूं नमना ।। जय० ।।५।।

